# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ / वैशाख २५, १९४५ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

६१. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ३८८ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी २८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण ३६० लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. आता एकूण प्रलंबित ३६० निवेदनांपैकी १६२ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १५ मे, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

प्राची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

जमिनींवर असलेले निर्बंध उठविण्यास परवानगी देणे शक्य नाही. त्यामुळे राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रांमधील खातेदारांच्या ज्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत व भविष्यातही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही, अशा भूधारकांच्या जमिनीच्या ७/१२ मधील इतर हक्कातील नोंदीमध्ये असलेले "पुनर्वसनासाठी राखीव" असे शेरे कमी करून जमिन हस्तांतरण व्यवहारांवरील निर्बंध उठविण्याबाबत महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक ०५.०८.२०१९ अन्वये कार्यपध्दती विहीत केलेली होती.

परंतू राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील ज्या स्लॅबपात्र भूधारकांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत किंवा उपलब्ध होणार आहेत, अशा प्रकरणी देखील संबंधित खातेदारांकडून "पुनर्वसनासाठी राखीव" असे ७/१२ च्या इतर हक्कात नोंदविलेले शेर कमी करून निर्बंध उठविण्याबाबत मागणी करण्यात येत होती, तसेच मा. उच्च न्यायालयात विविध याचिका दाखल केलेल्या होत्या. परंतु सदर जमिनींना सिंचन सुविधा उपलब्ध आहेत / होणार असल्याने अशा प्रकरणी उक्त दिनांक ०५.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे शक्य होत नव्हते.

यास्तव, राज्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी लाभक्षेत्रामध्ये जमिनींची आवश्यकता विचारात घेता, पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील ज्या स्लॅबपात्र भुधारकांच्या जमिनींना सिंचन सुविधा उपलब्ध नाही, तसेच सिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत किंवा उपलब्ध होणार आहेत, अशा दोन्ही प्रकारच्या जमिनींच्या हस्तांतरणावरील निर्बंध लादण्यासाठी ७/१२ च्या इतर हक्कामध्ये नोंदविलेले "पुनर्वसनासाठी राखीव असे शेरे कमी करून निर्बंध उठविण्याबाबत पूर्वीचा शासन निर्णय अधिक्रमीत करून महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि. १८.०१.२०२२ अन्वये कार्यपद्धती विहीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

तथापी, दरम्यानच्या कालावधीत राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील स्लॅबपात्र भूधारकांच्या ७/१२ च्या इतर हक्कातील शेरे कमी करून हस्तांतरण निर्बंध उठविण्यासाठी मा. उच्च न्यायालयात मोठ्या प्रमाणात याचिका प्रलंबित होत्या. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाचे आदेश पारित होत होते व मा. उच्च न्यायालयाने बहुतांश आदेशान्वये, पुनर्वसनासाठी जमिनींवर हस्तांतरण निर्बंध लादण्यासाठी ७/१२ च्या इतर हक्कात नोंदविलेले शेरे कमी करण्याचे आदेश दिले असून सदर शेरे कमी केल्यानंतर भविष्यात आवश्यकता भासल्यास राज्य शासनास सदर जमिनी संपादन करण्यास मा. न्यायालयाच्या सदर आदेशामुळे बाधा येणार नाही, असेही मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

मा. उच्च न्यायालयाचे वरील आदेश तसेच प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी लाभक्षेत्रामधील जमिनींची भविष्यातील आवश्यकता विचारात घेता, राज्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील ज्या स्लॅबपात्र भुधारकांच्या जमिनी संपादित करण्याची कार्यवाही अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाही, परंतु पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीअन्वये अशा

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशनामध्ये मान्य झालेल्या लक्षवेधी सूचनांचे जोडपत्रातील (अ.क्र.९) लक्षवेधी सूचना क्रमांक- १७८९

ॲड. अशोक पवार, श्री. दिलीप मोहिते-पाटील, श्री. चेतन तुपे, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक- १७८९ पुढीलप्रमाणे आहे -

"पुणे जिल्हयातील हवेली तालुक्यातील १६ गावांत भामा आसखेड प्रकल्पाचे शेरे व शिरुर तालुक्यातील तळेगाव ढमढेरे व न्हावरा परिसरातील शेतकऱ्यांच्या ७/१२ वर इतर हक्कात टाकलेल्या शेऱ्याऐवजी "पुनर्वसन अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने राज्य शासनाचा भूसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून फक्त शेती वापरासाठी हस्तांतर व्यवहार अनुज्ञेय" असा शेरा मार्च २०२२ मध्ये फेरफार होऊन दाखल करण्यात येणे, राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत व भविष्यातही अशा सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही अशा प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनी हस्तांरणाच्या व्यवहारावरील असलेले निर्बंध उठविण्याची कार्यवाही करणेबाबत दिनांक ५ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार भामा आसखेड प्रकल्पाचे शेरे उठविणेबाबत कार्यवाही झालेली असणे, मा. जिल्हाधिकारी पुणे यांनी जानेवारी, २०२२ वा त्या सुमारास हवेली तालुक्यांतील १८ गावांत ७/१२ वरील इतर हक्कातील पुनर्वसन राखीव शेरा कायमस्वरुपी कमी करणेबाबत प्रस्ताव शासनास दाखल होऊनही अद्यापपर्यंत त्यावर शासनाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, मा. उच्च न्यायालयामध्ये ज्यांनी ७/१२ वरील शेरे उठविणेबाबत याचिका दाखल केली त्यांचे शेरे उठले परंतू आर्थिक दुर्बल घटकातील शेतकरी न्यायालयामध्ये गेले नसल्याने त्यांचे ७/१२ वरील शेरे उठलेले नाहीत, शेतकऱ्यांच्या ७/१२ वर सद्या "पुनर्वसन अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने राज्य शासनाचा भूसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून फक्त शेती वापरासाठी हस्तांतर व्यवहार अनुज्ञेय" असा शेरा टाकण्यात आल्याने या अर्थ काय याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम अवस्था निर्माण होणे, शेतकऱ्यांना स्वत:चा व्यवसाय करावयाचा असेल तर शेती ना विकास झोन करता येणार नसल्याने शेतकरी उद्योग व्यवसायाला चालणा न मिळणे याकरिता ७/१२ वरील "पुनर्वसन अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने राज्य् शासनाचा भूसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून फक्त शेती वापरासाठी हस्तांतर व्यवहार अनुज्ञेय" असा शेरा पुर्णत: काढणेबाबत शासन शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबत शासनाची प्रतिक्रया."

---

### मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीनुसार पाटबंधारे प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन उपलब्ध होण्यासाठी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात स्लॅबपात्र भुधारकांच्या जमिनीं संपादन करण्याच्या अनुषंगाने त्यांच्या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यामधील इतर हक्कातील नोंदीमध्ये "पुनर्वसनासाठी राखीव" असे शेरे नमुद करुन अधिनियमातील तरतुदीनुसार हस्तांतरण व्यवहारावर निर्बंध लादण्यात आले आहेत. सदर जमिनी संपादीत केलेल्या नाहीत व वरील निर्बंधामुळे भुधारकांना अनेक वर्षापासुन त्यांच्या जमिनी खरेदी-विक्री, खातेफोड आणि वारसा हक्कानुसार विभागणी करण्यास अडचणी येत होत्या.

तथापी, राज्यातील उर्वरीत प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कार्यवाही सुरु असून त्यासाठी लाभक्षेत्रामध्ये जमिनींची आवश्यकता विचारात घेता, लाभक्षेत्रातील सर्व स्लॅबपात्र

जमिनींच्या हस्तांतरणावर निर्बंध लादण्यासाठी ७/१२ च्या इतर हक्कामध्ये पुनर्वसनासाठी राखीव म्हणून नमूद केलेले शेरे कमी करून त्याऐवजी, "पुनर्वसन अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने राज्य शासनाचा भूसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून फक्त शेती वापरासाठी हस्तांतर व्यवहार अनुज्ञेय" असा शेरा नमूद करणेबाबत महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक ११.०२.२०२२ निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे अशा भुधारकांना त्यांच्या जमिनी खरेदी-विक्री, खातेफोड व वारसा हक्कानुसार विभागणी करणे शक्य झाले आहे.

त्यानुसार पुणे जिल्हयातील हवेली तालुक्यातील १८ गावांत भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात शेतक-यांच्या ७/१२ च्या इतर हक्कातील पुर्वीच्या शे-याऐवजी वरील प्रमाणे शेरा नमूद करणेत आला आहे. तसेच भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील ८ गावातील २६ गटांपैकी २४ गटांच्या ७/१२ च्या इतर अधिकारातील पुनर्वसन राखीव शेरे पूर्ण कमी करणेस १८.०१.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता दिलेली असून त्यानुसार सदर गटातील पुनर्वसन राखीव शेरे कमी करणेत आले आहेत. तसेच अशा भुधारकांच्या ७/१२ च्या इतर अधिकारातील पुनर्वसन राखीव शेरे पूर्ण कमी करणेच्या शासनास प्राप्त प्रस्तावासंदर्भात आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशनामध्ये मान्य झालेल्या लक्षवेधी सूचनांचे जोडपत्रातील (अ.क्र.१०) लक्षवेधी सूचना क्रमांक- १७९२

ॲड. अशोक पवार, श्री.दिलीप मोहिते-पाटील, श्री.चेतन तुपे, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक- १७९२ पुढीलप्रमाणे आहे -

"पुणे जिल्हातील शिरुर तालुक्यातील चासकमान प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनासाठी जमीन संपादित झालेली असताना लाभ क्षेत्रात वीर, नीरा देवघर, गुंजवणी, टेमघर, उजनी, कळमोडी, भामा आसखेड या प्रकल्प ग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी जमिन वाटप करणे, चासकमान प्रकल्पाचे धरणग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण झाल्याचे असतानाही लाभ क्षेत्रातील जमिनीवर संपादन होण्याचे शेरे असणे, सन १८९४ च्या भूसंपादन कायदयाने कलम ४ व कलम ६ च्या अधिसूचना २०१३ च्या नवीन भूसंपादन कायदयाने व्यपगत असल्याने शेरे काढून टाकणे आवश्यक असणे, एकत्र कुटुंब पध्दतीत ए.कु.म्य. असे ८ अ नोंद असताना सहहिस्सेदार यांचे क्षेत्र विभागणी करणे गरजेचे होते तसे न करता शेतकरी खातेदारांना अल्प भूधारक, भूमिहीन करणे, स्लॅब आकारताना कालवे, रस्ते, पाझर तलाव, लागवडी अयोग्य क्षेत्र वगळयाची तरतूद असताना अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनीवर चुकीचे संपादन करणे, परंतू सदरचा भाग हा स्लॅब मधून वगळणे आवश्यक असणे, स्लॅब आकारणी करताना लाभ क्षेत्रातील व लाभ क्षेत्राबाहेरील जमिनीच्य १/४ जमीन हिशोबात धरुन स्लॅब आकारणी करणे आवश्यक असतानाही लाभ क्षेत्राबाहेरील जमिन प्रत्यक्ष शेतीसाठी पाण्याचा लाभ होत नाही. असे संपादन मंडळाचे अभिप्राय असतानाही चुकिचे स्लॅब लावणे, प्रामाणित संकलन नसताना बोगस प्रकल्प ग्रस्तांना जमिन वाटप होणे, संकलानात फेरबदल करण्याचे अधिकार नसतानाही प्रकल्प ग्रस्तांची संकलने बदलणे, प्रकल्प ग्रस्तांना जमिन वाटप झाल्यावर लगेच कायदयातील तरतुदीचे उल्लंघन करुन अधिकार अभिलेखात फेरफार होण्याआधीच जमिनीचे एंजट लोकांनी खरेदी खते नोंदवणे, जिल्हा पुर्नवसन कार्यालयात संपादित जमिन वाटप जमिन यांचा हिसेब नसणे, त्यामुळे एकाच कुटुंबात दुबार तिबार वाटप होण्याची शक्यता असल्याने जिल्हा पुर्नवसन कार्यालयाची १९९० पासून दप्तर तपासणी होणे गरजेची असणे, वीर, नीरा देवघर, गुंजवणी, टेमघर, उजनी, कळमोडी, भामा आसखेड यांचे त्यांचे लाभ क्षेत्रात धरण ग्रस्तांचे पुनर्वसन होणे गरजेचे असणे, शिरुर तालुक्यातील शेतकऱ्यांची ७/१२ वरील चासकमान, टेमघर इत्यांदी पुनर्वसनाचे शेरे पुर्णत: उठविणेबाबत शासनाने केलेली कार्यवाही, प्रकल्पिनहाय लाभार्थ्यांना वाटप झालेल्या व राखीव ठेवलेल्या प्रकल्पाग्रस्तांची माहिती मिळणेबाबत मा. विभागीय आयुक्त, पुणे व पुनर्वसन विभाग, पुणे यांना लोकप्रतिनिधीने ९ स्मरणपत्रे देवूनही अद्यापर्यंत पुनर्वसन विभाग, पुणे यांच्याकडून माहिती उपलब्ध न होणे, पसंतीनुसार प्रकल्पग्रस्तांना शेती जमिन गट वाटप मंत्रालय स्तरावर न होता ते गट वाटप जिल्हास्तरावर सक्षम अधिकाऱ्याकडून होणे अपेक्षित असणे, तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई यांचा आदेश असतानाही हवेली तालुक्यातील १६ गावे व दौंड तालुक्यातील ९ गावांचे भामा आसखेड प्रकल्पाचे ७/१२ वरील इतर हक्कातील शेरे अद्यापर्यंत काढलेले नसणे, एप्रिल, २०२२ च्या सुमारास पुनर्वसन विभाग, पुणे यांच्याकडून सदरचे शेरे काढणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठवूनही कारवाई न होणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

चासकमान लाभक्षेत्रातील संपादित जमिन वीर, गुंजवणी, टेमघर, आरळा कळमोडी, भामा आसखेड प्रकल्पग्रस्तांना वाटप झालेली आहे. प्रकल्पग्रस्तांसाठी संपादित जमिनी ह्या महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियमातील तरतुदी नुसार वाटप करण्यात आलेल्या आहे. टेमघर, वीर, आरळा कळमोडी या प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात संपादित जमिनी नसल्याने सदर प्रकल्पांच्या काही प्रकल्पग्रस्तांना चासकमान लाभक्षेत्रात वाटप झालेले आहे. तसेच गुंजवणी प्रकल्पासाठी लाभक्षेत्रामध्ये संपादन जमिन शिल्लक नसल्याने काही प्रकल्पग्रस्तांना चासकमान प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात वाटप करण्यात आले आहे.

चासकमान प्रकल्पातील एकुण प्रकल्पग्रस्त २६४० आहेत. यापैकी १५८८ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप करण्यात आलेली आहे. तर उर्वरित १०५२ प्रकल्पग्रस्त प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियममधील तरतुदीनुसार विहीत मुदतीत ६५ % रक्कम न भरलेने अपात्र आहेत. सदरचे १०५२ अपात्रपैकी काही प्रकल्पग्रस्तांनी दाखल केलेल्या याचिकाप्रकरणी मा. उच्च न्यायालयाचे आदेश पारित होऊन प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीसाठी नोटीस देण्याबाबत आदेश देण्यात येत आहेत त्यानुसार याबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीनुसार पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र जमिनीं संपादन करण्यासाठी त्यांच्या ७/१२ वर इतर हक्कामध्ये पुनर्वसनासाठी राखीव किंवा इतर शेरे नमूद करून हस्तांतरण निर्बंध लादलेले होते. अद्यापही काही प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप करणेची कार्यवाही सुरू असल्याने त्यासाठी पर्यायी जमिनीची आवश्यकता भासू शकते. तथापी, महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दि. ११/०२/२०२२ अन्वये, वरीलप्रमाणे हस्तांतरण व्यवहारांवर लादलेले निर्बंध शिथिल करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला असून भुसंपादनाचा अधिकार अबाधित ठेवून शेती वापरासाठी व्यवहार अनुज्ञेय करून त्याप्रमाणे कोणताही अर्ज न घेता नोंद घेण्याचे निर्देश दिले आहेत. सदर शासन निर्णयानुसार शिरूर तालुक्यातील सुमारे २६४० हेक्टर क्षेत्रावरील हस्तांतरण व्यवहारांवर लादलेले निर्बंध शिथिल करणेबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे. महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १८/०१/२०२२ नुसार हस्तांतरण निर्बंध पुर्णपणे उठविण्याबाबत कार्यपद्धती विहीत केलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार शिरूर तालुक्यातील ५७ जमिन गटांचे हस्तांतरण निर्बंध पूर्णपणे उठविण्यात आले आहेत. तसेच क्षेत्रिय कार्यलयामार्फत अन्य काही जमिन गटांचे हस्तांतरण निर्बंध उठविण्याबाबत शासनास प्राप्त प्रस्ताव त्रुटी पुर्ततेसह माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये सादर केले असून त्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पनर्वसन अधिनियमानुसार चासकमान प्रकल्पासाठी जमिन संपादनाचा स्लॅब ०३ हे. २३ आर चा आहे. भूसंपादन अधिनियम, १८९४ नुसार जमिन संपादनाची कार्यवाही करणेत आलेली आहे. सदर अधिनियमानुसार संपादन करतेवेळी चौकशीमध्ये संबंधित शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत भूसंपादन अधिकारी निर्णय घेत असतात व तदनंतर अंतिम निवाडा जाहीर करणेत येतो. चासकमान प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये भूसंपादन अधिनियम, १८९४ नुसार जमिनीचे संपादन करणेत आलेले आहे. तसेच संबंधित खातेदारास भूसंपादनाची मोबदला रक्कम वाटप करणेत आलेली आहे व जमिनीचा ताबाही घेतलेला आहे. तसेच प्रकल्पग्रस्तांना संपादित जमिनीचे वाटपही करण्यात आलेले आहे. संपादित जमिनीचा ताबा घेण्यापूर्वी भूसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ४८ (१) अन्वये अपर आयुक्त यांच्याकडे दाद मागणे आवश्यक होते अशी दाद मागितली नसल्यास अशा जमिनी आज रोजी संपादनातुन वगळण्यात येणार नाही.

प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटप करतेवेळेस भूमी संपादन अधिकारी यांचेकडील पारीत करणेत आलेला निवाड्यानुसार गावी तयार झालेले अधिकार अभिलेखे (फेरफार, ७/१२ व ८ अ) तसेच प्रकल्पग्रस्त यांचे वैयक्तिक कागदपत्रे घेऊन संबंधित प्रकल्पग्रस्त यांची जमिन वाटपाबाबतची पात्रता निश्चित करण्यात येते. तद्नंतर महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियमातील तरतुदींनुसार प्रकल्पग्रस्त यांचेकडून प्राप्त जमीन मागणी प्रस्तावाची पडताळणी करून संबंधित प्रकल्पग्रस्ताला पर्यायी जमीनीचे वाटप करण्यात येते.

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियमातील १९९९ कलम १६(१) (अ) नुसार प्रकल्पग्रस्त यांची बाधित क्षेत्रातील जमिन प्रकल्पग्रस्त व्यक्तींने पूर्वी धारण केलेले भोगवटा विषयक स्थितीसह त्या व्यक्तीस मंजुर करण्यात येते. प्रकल्पग्रस्त यांची बाधित क्षेत्रातील जमिन भोगवटदार वर्ग १ ची असल्यास त्यास लाभक्षेत्रात मंजुर करण्यात आलेली जमिन भोगवटदार वर्ग १ देण्यात येते. त्यामुळे लाभक्षेत्रातील वाटप करण्यात आलेली जमिन विक्रीबाबत शासनाचे कोणतेही निर्बंध प्रकल्पग्रस्त यांचेवर राहत नाहीत.

बुडीत क्षेत्रातील संपादन जमिनीचे पुणे जिल्ह्यातील सर्व २५ प्रकल्पातील उपलब्ध संपादन निवाडे प्राप्त करण्यात आले असुन त्या निवाड्याची माहिती संगणकीकृत करण्यात आली आहे. जेणेकरून प्रकल्पग्रस्तांची पात्रता तपासणे सोईचे होईल याच बरोबर लाभक्षेत्रातील बंदी दिनांकापासूनचे संपादनातील निवाड्यातील जमिन गट नं. तसेच शासकीय जमिनी वाटप केले असतील अशा जमिनीचे जमिन गट नंबर व क्षेत्र इत्यादी ची माहिती संकलीत करण्यात आलेली आहे. सदर जमिन गटावरील बंदी दिनांकापासुनचे सर्व फेरफार व त्याचा तपशिल, हस्तांतरण इत्यादी बाबतची २६ मुद्यांची माहिती तलाठी व मंडल अधिकारी स्तरावरून जमा करुन ती डिजीटल स्वरुपात संगणकीकृत करण्यात आली आहे. अशा सर्व डिजीटल माहितीच्या आधारे पुनर्वसन विभागातील सॉफ्टवेअर संगणक प्रणाली करण्याचे नियोजित आहे. यामुळे संकलन रजिस्टर मधील तफावती, दुबार वाटप व जमिनीच्या हस्तांरणाबाबत माहिती उपलब्ध होउ शकेल या साठी पुणे जिल्हयात SRS (System Regu. Studies) करण्यात आला असून राज्यस्तरावर संगणक प्रणाली करण्याबाबत पुनर्वसन विभागाकडून नियोजित आहे. सदरची माहिती संकलित करण्याबाबत कालावधी लागणार आहे. विभागीय आयुक्त, पुणे यांचे कार्यालयामार्फत पुनर्वसन शाखेची तपासणी करण्याबाबत समिती स्थापन करण्यात आली होती. सदरील समितीने सादर केलेल्या अहवालातील नोंदविलेल्या निष्कर्षास अनुसरून संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांची एकत्रित विभागीय चौकशी करणेचे प्रस्तावित आहे.

निरा देवघर प्रकल्पाला सातारा व उजनी प्रकल्पाला सोलापूर येथे लाभक्षेत्र आहे. वीर प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांना वीर बाजी पासलकर व पानशेत पकल्पाच्या लाभक्षेत्रात पर्यायी जमिन वाटप करण्याकामी मान्यता देण्यात आलेली आहे. टेमघर, आरळा कळमोडी व भामा आसखेड यांना स्वतः चे लाभक्षेत्र नसल्याने त्यांना उपलब्ध पुनर्वसन जमिनींमधुन महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १४/०६/२०२२ मध्ये निश्चित करण्यात आलेल्या कार्यपध्दती / प्राधान्यक्रमानुसार जमीन वाटप करणेचे दक्षता घेण्यात येत आहे.

सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी विचारलेली माहिती सन १९७९ पासुन असल्याने सदर माहिती विस्तृत स्वरूपाची आहे. सदरची माहिती एकत्रितरित्या उपलब्ध नसल्याने भूसंपादन अधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांच्या स्तरावरून प्राप्त करून संकलित करण्याबाबतची कार्यवाही अद्यापही सुरू आहे. तरी जिल्हाधिकरी कार्यालयामार्फत उपलब्ध असणारी माहिती संकलित करुन दिनांक ०६/०६/२०२२ रोजी सन्माननीय विधानसभा सदस्य यांना रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित माहिती संकलित झाल्यानंतर तात्काळ उपलब्ध करुन देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

प्रकल्पग्रस्तांना लाभक्षेत्रातील व लाभक्षेत्राबाहेरील पर्यायी जमीन वाटप करण्याबाबत शासन निर्णय दि. १४/१०/२०२१ अन्वये सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहे. महसूल व वन विभागाच्या दि. १८/०१/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील हवेली तालुक्यातील १६ गावे व दौंड तालुक्यातील ०९ गावांच्या ७/१२ च्या इतर अधिकारातील पुनर्वसन राखीव शेरे कमी करणेबाबतचा प्रस्ताव क्षेत्रिय कार्यलयामार्फत शासनास प्राप्त प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरू आहे.

---

महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक- १९६१

श्री. लहु कानडे वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक-१९६१ पुढीलप्रमाणे आहे

"अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील मौजे मातुलठाण, सरला गोवर्धन, महाकालवडगाव ७ कमालपूर, खानापूर, भामाठाण आदि गोदावरी नदीकाठच्या पूररेषा नियंत्रण रेषेमधील गावांना नवीन गावठाण मंजूर करण्यात आलेले असणे, सन १९७२ मध्ये किंवा त्या दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांमार्फत वरील सर्व गावांसाठी जमीन संपादन करण्यात आलेली असणे, तथापि सरला - २६७ गोवर्धन- ३२८, भामाठाण - ३३८, महाकालवडगाव - ४१६, कमालपूर- ११४, खानापूर - १६३ आणि मातुलठाण- ३३८ एवढ्या मोठ्या संख्येने पात्र लाभार्थी असणे तथापि जिल्हा पुनर्वसन अधिकारी किंवा तहसीलदार यांनी आज पावतो संपादित गावठाणा मध्ये प्लॉट पाडून सर्व लाभार्थ्यांना प्लॉटचे वाटप केलेले नसणे, त्यामुळे अद्यापही अनेक लाभार्थी जुन्याच गावात राहत असणे, जुन्याच गावात धोकादायक स्थिती मध्ये राहत असणे, लाभार्थ्यांच्या नावे प्लॉट जमीन नसल्याने शेकडो लाभार्थ्यांना घरकुले मंजूर होऊनही रद्द होत असणे, शाळा, अंगणवाडी पाणीपुरवठा योजना अशा सार्वजनिक अत्यावश्यक सुविधा पासून ग्रामस्थ वंचित राहत असणे, आणि याबाबत तहसीलदारांकडे सदर प्लॉट वाटपाबाबत वारंवार मागणी करूनही प्रशासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया..."

मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

सन १९७२ साली आलेल्या अतिवृष्टीमुळे गोदावरी नदीच्या पुरामुळे बाधित झालेल्या अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर तालुक्यातील गावातील माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**मातुलठाण** :- सदर गावामध्ये भूखंड वाटपासाठी अभिन्यास तयार करणेत आला असुन बाधित लाभार्थी ३६८ आहे. सदर गावामध्ये भूखंड वाटपासाठी अभिन्यास तयार करण्यात आला असून एकुण २०३ प्लॉट पाडण्यात आलेले आहे. त्यापैकी गावठाण विस्तारास पात्र लाभार्थी १७६ होते. तथापि ग्रामस्थांनी मुळ गावठाणालगतच नवीन गावठाणाची मागणी केल्याने संपादीत गावठाणातील प्लॉट ताब्यात घेण्यास नकार दिला आहे. सदर गावातील मंजूर ३४ घरकुल लाभार्थ्यांना आवश्यक क्षेत्र ०.१५ हे.आर. नवीन संपादीत गावठाणात शिल्लक आहे.

**सरला** :- सदर गावांत २६७ लाभार्थी कुटूंब असून नवीन गावठाण स्थलांतरणासाठी गावक-यांनी विरोध केलेला असून गट क्र.१४२ खाजगी गट प्रस्तावित करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. सदर गावठाणात सध्यस्थिती ९५ कुटूंब राहत आहेत, उर्वरित पैकी १३९ लाभार्थी शेतात ३३ लाभार्थी जुन्या गावठाणात वस्ती करून राहत आहेत. प्रस्तावित गावठाणात ग्रामपंचायत इमारत, अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा पाणी पुरवठा व समाजमंदीर या नागरी सुविधा आहेत. सदर गावातील मंजूर ३० घरकुल लाभार्थ्यांना आवश्यक क्षेत्र ०.१३ हे.आर. नवीन संपादीत गावठाणात शिल्लक आहे.

**गोवर्धनपूर** :- सदर गावाचा भूखंड वाटपासाठी अभिन्यास तयार करण्यात आला आहे. या गावात एकुण ३२८ कुटूंबे लाभार्थी असुन त्यापैकी एकुण १२१ लाभार्थ्यांना भूखंडाचे वाटप करण्यात आलेले असून नवीन गावठाणात ८५ कूटूंबे राहत असून सदर गावातील मंजूर २५ घरकुल लाभार्थ्यांना आवश्यक क्षेत्र ०.११ हे.आर. नवीन संपादीत गावठाणात शिल्लक आहे. सदर गावठाणात ग्रामपंचायत इमारत, अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा, पाणी पुरवठा व स्मशानभूमी या नागरी सुविधा आहेत.

**महांकाळवडगाव** :- सदर गावातील सन १९९८ साली सर्वेक्षण करून ४१६ लाभार्थी संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. नवीन गावठाण हे जुन्या गावठाणापासून ४ किमी लांब असल्याने ४१६ लाभार्थ्यांपैकी १०१ कुटूंबेच नवीन गावठाणात राहत आहेत. सदर नवीन गावठाणामध्ये ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामपंचायत विहिर, पाण्याची टाकी, घरकुल योजनेतील घरे व अंतर्गत रस्ते या नागरी सुविधा आहेत. सदर गावातील मंजूर १२ घरकुल लाभार्थ्यांना आवश्यक क्षेत्र ०.०५ हे.आर. नवीन संपादीत गावठाणात शिल्लक आहे.

**कमालपूर** :- सदर गावामध्ये भूखंड वाटपासाठी अभिन्यास तयार करणेत आला असुन बाधित लाभार्थी ११४ असून त्यानूसार संपादीत गावठाणात ११४ प्लॉट पाडण्यात आलेले आहे. सदर गावातील मंजूर १९ घरकुल लाभार्थ्यांना आवश्यक क्षेत्र ०.०८ हे.आर. नवीन संपादीत गावठाणात शिल्लक आहे.

**खानापूर** :- :- सदर गावामध्ये भूखंड वाटपासाठी अभिन्यास तयार करणेत आला असुन बाधित लाभार्थी १६३ असून त्यानूसार संपादीत गावठाणात १६३ प्लॉट पाडण्यात आलेले आहे. नवीन गावठाणात १६३ लाभार्थ्यांपैकी १०-११ कुटूंबे राहतात. सदर गावातील मंजूर ६८ घरकुल लाभार्थ्यांना आवश्यक क्षेत्र ०.३१ हे.आर. नवीन संपादीत गावठाणात शिल्लक आहे.

**मामाठाण** :- सदर गावात बाधित कुटूंबे एकुण ३३८ आहे त्यापैकी या गावात ७१ कुटंबे घरे बांधुन व २८ घरकुलामध्ये राहत आहे. उर्वरित २०८ कुटूंबे ही शेतात, ३१ कुटूंबे ही जुन्या गावठाणांत राहतात. सदर गावातील मंजूर १४८ घरकुल लाभार्थ्यांना आवश्यक क्षेत्र ०.६८ हे. आर. नवीन संपादीत गावठाणात शिल्लक आहे. संपादीत गावठाणात ग्रामपंचायत कार्यालय, प्राथमिक शाळा, मंदीर, पाणीपुरवठा विहीर, स्मशानभूमी इ. नागरी सुविधा उपलब्ध आहेत.

सन १९७२ साली आलेल्या गोदावरी नदीच्या पुरामुळे पुनर्वसन करावे लागलेल्या मुळ लाभार्थ्यांना प्लॉट वाटप करणे व नंतर १९७२ ते २०२२ या कालावधीत सदर ठिकाणी नव्याने रहिवासासाठी आलेले मूळ लाभार्थ्यांच्या कुटूंबातील सदस्य, भूमीहीन शेतमजूर यांना घरकुलांसाठी जागा उपलब्ध करून देणे या दोन स्वतंत्र बाबी आहेत.

वरीलप्रमाणे नमूद गावांमध्ये मूळ बाधित लाभार्थ्यांकरीता संपादीत नवीन गावठाणात प्लॉट पाडून त्याचे वाटप करण्याची कार्यवाही करतांना मुळ गावठाणापासून नवीन गावठाणामधील अंतर अधिक असल्याने, तसेच खाजगी जमीन संपादीत करण्याची मागणी ग्रामस्थांची असल्याने बाधित लाभार्थी नवीन गावठाणात स्थलांतरीत होण्यास विरोध करीत आहेत. या नवीन गावठाणातील काही गावात नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच घरकुल योजनेसाठी नवीन गावठाणात पुरेसे क्षेत्र उपलब्ध आहे. याबाबत शासनाकडून वेळोवेळी पाहणी व कार्यवाही करण्यात येत आहे.

-----

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना क्र.१८

**श्री. रोहित पवार,श्री. विनोद निकोले,श्री. अजित पवार,श्री. जयंत पाटील,श्री. छगन भुजबळ,श्री. संजय बनसोडे,श्री. दत्तात्रय भरणे,श्री. चेतन तुपे,श्री. दौलत दरोडा,श्रीमती यामिनी यशवंत जाधव,श्री. गणपत गायकवाड,डॉ. बालाजी किणीकर, श्री.कुमार आयलानी,श्री. किसन कथोरे,कुमारी आदिती तटकरे,श्री. संजय जगताप,श्री. अबू आजमी वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८ पुढीलप्रमाणे आहे:-**

"सफाई कामगारांसाठी लाड समितीच्या शिफारशीनुसार त्यांचे वारसांना शासकीय/निमशासकीय सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात शासनाची भूमिका असणे, त्यासाठी वाल्मिकी, मेहतर समाजाला सामाजिक, आर्थिक संरक्षण देण्यासाठी त्यांचेसाठी वारसा पध्दत पुढे चालू ठेवण्यात येणे, अशा अनेक शासन निर्णय अस्तित्वात असतांना सुध्दा घाण व कचऱ्यांशी संबंधीत कर्मचारी, शवग्रह सेवक/ परिचर, धोबी, स्मशान कामगार, मलवाहिन्या, ड्रेनेज व स्टॉर्म वॉटर ड्रेनेज मध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सफाई कामगार पदनाम देऊन लाड-पागे समितीच्या शिफारशी लागू करण्याची सफाई कामगार संघटनांची मागणी, सफाई कामगारांच्या घरांचा २१ वर्षे प्रलंबित असलेला अनुशेष भरून काढणे, वर्षांचे ३६५ दिवस चालणाऱ्या या अत्यावश्यक कामासाठी ठेकेदारी प्रथा बंद करण्याची मागणी, एकंदरीत सफाई कामगारांच्या समस्या व सोईसुविधाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा.मंत्री (सामाजिक न्याय विभाग) यांचे निवेदन -

सफाई कामगार व अस्वच्छ व्यवसायातील कामगारांच्या कामांबाबत व सेवांबाबत विचार करण्याकरीता श्री.लाड यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या क्रमांक- एमएससी ८०४७१/१२८४९८/ का-३ ए, दिनांक २०/६/१९७२ अन्वये एक समिती नेमली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशी शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.एमएससी १०७५/१७९०/ कामगार-५, दिनांक १२/८/१९७५ अन्वये स्वीकृत करण्यात आल्या व या शिफारशींनुसार कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधित कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

लाड पागे समितीने सफाई कामगारांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी नगर विकास विभाग, सामान्य प्रशासन विभाग व उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग या विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येवून सर्वसमावेशक शासन निर्णय दि.२४.०२.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार सफाई कामगारांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर, स्वेच्छा सेवानिवृत्ती नंतर किंवा शासम सेवा पूर्ण करण्यासाठी त्यांना वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर अथवा सेवेत असताना दिवंगत झाल्यास लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. शौचालय स्वच्छता, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या खालील व्यक्तींना:-

१) अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्ग,

२) सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार

३) पूर्वी ज्या सफाई कामगारांनी डोक्यावरुन मैला वाहून नेण्याचे काम केले आहे, अशा सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात आले आहे.

राज्यातील महानगरपालिकेतील / नगरपालिकेतील सफाई कामगारांचे विशिष्ट स्वरुपाचे काम विचारात घेवून ज्या सफाई कामगाराची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्तीच्या वेळी किंवा सफाई कामगारांचा सेवेत असताना मृत्यू झाला झाल्यास अशा सफाई कामगारांच्या निधनानंतर त्यांच्या पात्र वारसास महानगरपालिका / नगरपालिकेकडून मालकी हक्काने मोफत सदनिका देण्याबाबत "डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना" ही योजना राबविण्यात येते.

*******

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

श्री.धनंजय मुंडे मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईतील दादर येथील इंदूमिल परिसरात उभारण्यात येत असलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारक उभारणीचे काम मागील काही महिन्यात ठप्प असल्याचे निदर्शनास आले असणे, सदर स्मारक स्थळी उभारण्यात येणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची प्रतिकृती अद्यापही अंतिम नसणे, राज्य सरकारने स्मारक उभारणीच्या कामाचे संनियंत्रण करण्यासाठी स्थापन केलेली समिती बरखास्त करण्यात आली असणे व त्यामुळे संपूर्ण कामकाज ठप्प असणे, या स्मारक उभारणीच्या कामात होणाऱ्या विलंबामुळे प्रकल्प खर्चाची किंमत वाढत जात असणे तसेच अपेक्षित कालावधी देखील वाढत जात असणे व त्यावरून तीव्र संताप पसरत असणे, स्मारक स्थळी उभारण्यात येणाऱ्या पुतळ्याची प्रतिकृती तातडीने अंतिम करून मुख्य पुतळ्याचे काम सुरू करणे, संनियंत्रण समितीचे पुनर्गठन करणे, स्मारक कामाच्या दैनंदिन देखरेखीसाठी एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याची/अभियंत्यांची नियुक्ती करणे, याबाबत सातत्याने होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

श्री. एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन -

राज्य शासनाने दिनांक १९ मार्च, २०१३ रोजी इंदू मिल क्र.६, दादर येथील अंदाजे ४.८४ हेक्टर जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाच्या कामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली असून दिनांक २० एप्रिल, २०१३ रोजीच्या आदेशान्वये सदर भव्य स्मारकाच्या विकासासंदर्भात प्राधिकरणाने पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या विहीत केल्या आहेत.

राज्य शासनाने दि. १४ मार्च २०१६ रोजीच्या निर्णयान्वये स्मारकाचा आराखडा अंतिम करण्यासाठी मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांची एकसदस्यीय समिती गठीत केली होती. सदर समितीने स्मारकाशी संबंधित व्यक्ती व संस्थांशी बैठक घेवून सल्लागाराकडून आराखडा तयार करून तो शासनास सादर केला होता. त्यानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने स्मारकासाठी रू. ६०० कोटी इतका अंदाजित खर्चाचा प्रस्ताव तयार करून तो नंतर राज्य शासनाकडून वर्ग करण्यासाठी मान्यता दिली. तद्नंतर दि. १२ जानेवारी,२०१८ सदर कामास रू.७६३.०५ कोटी इतक्या सुधारीत अंदाजित रकमेस मान्यता देण्यात आली आहे.

तद्नंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारकाच्या सुधारीत संकल्पनेचे सादरीकरण दि. १५/०१/२०२० रोजी मा.मंत्रीमंडळासमोर करण्यात आले व त्यास मान्यता दिली. त्यानुसार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकातील पुतळ्याची उंची वाढवून पादपीठ ३० मीटर (१०० फूट) उंच व पुतळा १०६.६८ मीटर (३५० फूट) उंच अशी एकूण १३६.६८ मीटर

(४५० फूट) उंची ठेवण्यास मान्यता देण्यात आली. सुधारीत संकल्पनेनुसार प्रकल्पाचा खर्च ७६३.०५ कोटी वरून सुधारीत अंदाजित खर्च रू. १०८९.९५ कोटी अपेक्षित आहे.

प्रकल्पासाठी सुधारीत संरचनेनुसार बांधकाम नकाशे तसेच आवश्यक असणाऱ्या विविध मंजुऱ्या प्राप्त करण्यात आल्या आहेत व स्मारकाचे काम प्रगतीपथावर आहे. सद्यस्थितीत स्मारक इमारतीचे काम १२ टक्के, स्मारक इमारत व पुतळा वगळता प्रकल्पाचे झालेले अंदाजित काम ५१ टक्के इतके पूर्ण झाले असून प्रकल्पाचे एकूण अंदाजित काम २५ टक्के काम पूर्ण झालेले आहे व उर्वरीत कामे प्रगतीत आहेत.

सदर प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्यांना लागलेला कालावधी, प्रकल्पातील स्मारकाची उंची ३५० फुटांवरून ४५० फुट (पादपीठ १०० फुट व पुतळा ३५० फुट) होणे तसेच कोविड-१९ च्या जागतिक महामारीच्या संकटामुळे निर्माण झालेली परिस्थिती यामुळे प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याच्या निर्धारित कालावधीत वाढ होऊन सदर कालावधी एप्रिल, २०२५ झाला आहे व त्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मंजूरी दिली आहे. सदर काम पूर्ण करण्यास निधीची कोणतीही अडचण नसून स्मारकाचे काम पूर्ण करण्याकरीता कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला आहे. सदर काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजिले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून महानगर आयुक्त यांच्या स्तरावर तसेच प्रतिनियुक्तीने प्राधिकरणाकडे कार्यरत असलेले प्रमुख,अभियांत्रिकी हे सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग दर्जाचे अधिकारी यांच्या स्तरावर प्रकल्पाच्या कामांचा नियमित आढावा घेण्यात येतो.

प्रकल्पासाठी आजतागयत खर्च रू. २९८.५२ कोटी इतका खर्च झाला असून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत या स्मारकाच्या कामाच्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्याकरीता आजतागयत रू.३८८.७१ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत स्मारकाचे काम प्रगतीत आहे.

-----------------

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक ९**

**श्री. अतुल भातखळकर, श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई सारख्या शहरात सुमारे १३ ते १५ लाख नागरिक कायदेशीर पाण्यापासून वंचित असल्याचे धक्कादायक वास्तव माहे जानेवारी २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, पाणी वितरण व्यवस्थेत दररोज ३० टक्के बेहिशोबी पाणी वाया जात असून हे पाणी हॉटेल, निवासी आणि खासगी क्रीडा संकुलाना अवैध जोडण्या देऊन वितरित केले जाणे, तसेच, तलावात पुरेसा पाणी साठा असतानाही पाण्याचा अपुरा व अनियमित पुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होणे, त्यामुळे, भूस्तरीय पाणी स्त्रोतांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज असणे, तसेच, वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून ते पुनर्वापराकरीता उपयोगात आणण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**-: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहे मे, २०२२ पासून 'सर्वांसाठी पाणी' हे धोरण अंमलात आणले आहे. या धोरणांतर्गत झोपडपट्टी, अनधिकृत बिगर झोपडपट्टी निवासी बांधकामे, गावठाण व कोळीवाड्यातील निवासी बांधकामे या ठिकाणी असलेल्या सर्व रहिवाशांना अर्ज प्राप्तीनंतर व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यावर प्रचलित नियमानुसार जल जोडणी देण्यात येत आहे. सर्वांसाठी पाणी या धोरणांतर्गत आजमितीस जलजोडणीकरीता एकूण ३२०४ परवानग्या देण्यात आल्या असून, त्यापैकी १४६८ जलजोडण्या पूर्ण झाल्या आहेत.

बेहिशोबी पाण्याचे प्रमाण कमी करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत मागील तीन वर्षांत ११० कि.मी. लांबीच्या जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलण्यात आल्या आहेत. तसेच ९६४०० ठिकाणी गळती अन्वेषण व दुरुस्ती करण्यात आली असून ९८२४ अनधिकृत जलजोडण्या निष्कासित करण्यात आल्या आहेत.

मुंबई शहर व उपनगरात दररोज सुमारे ३९०० द.ल.लि. इतका पाणी पुरवठा करण्यात येता. सध्या पाणी पुरवठा सुरळीत असून मोठ्या दुरूस्तीच्या कामाच्या वेळेस अपुऱ्या वा अनियमित पाणी पुरवठ्याच्या काही तक्रारी प्राप्त होतात. परंतु महानगरपालिकेमार्फत त्याचे त्वरित निराकरण करुन पाणी पुरवठा नियमित करण्यात येतो.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वरळी, वांद्रे, धारावी, वर्सोवा, मालाड, भांडुप व घाटकोपर या ७ ठिकाणी अद्ययावत मलजल प्रक्रिया सुविधा केंद्रे उभारण्याची कामे प्रदान करण्यात आली आहेत. सदर ७

मलजल प्रक्रिया सुविधा केंद्रामधील ५० टक्के मलजलावर तृतीय स्तराची प्रक्रिया करुन हे पाणी पिण्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी वापरण्याचे प्रस्तावित आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत १००० चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्रफळ असणाऱ्या भूखंडांचा विकास / पुनर्विकास करताना रेन वॉटर हार्वेस्टिंग बंधनकारक करण्याच्या अटीचा समावेश अमान्यतेच्या सूचनेमध्ये (आय.ओ.डी.) दिनांक ०१.१०.२००२ पासून करण्यात आला आहे. तसेच शासनाच्या दिनांक ०६.०६.२००७ रोजी अधिसूचनेन्वये गावठाणा व्यतिरिक्त ३००.०० चौ.मी. वा जास्त क्षेत्रफळ असणाऱ्या भूखंडांचा विकास / पुनर्विकास करताना रेन वॉटर हार्वेस्टिंग बंधनकारक करण्यात आली आहे. विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील अधिनियम ६२ अन्वये, ५०० चौ.मी. वा जास्त क्षेत्रफळ असणाऱ्या भूखंडांचा विकास / पुनर्विकास करण्याच्या प्रस्तावांना मंजुरी देताना वर्षा जल संचयन योजना (रेन वॉटर हार्वेस्टिंग) बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुषंगाने महापालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या इमारत विकास परवानगीमध्ये पावसाळी पाण्याचे पुनर्भरण (रेन वॉटर हार्वेस्टींग) बाबत अट सामील करण्यात येते. तसेच इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यापुर्वी पावसाळी पाण्याचे पुनर्भरण (रेन वॉटर हार्वेस्टींग) ची अंमलबजावणी करण्यात आली आहे याची खातरजमा महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास कामांमध्ये वर्षा जल संचयन व विनियोग ची अट बंधनकारक आहे अशा सर्व भुखंडांवर वर्षा जल संचयन व विनियोग योजना राबविण्यात येतात. तसेच महानगरपालिकेच्या विभाग प्रमुखांना त्यांच्या अखत्यारित अस्तित्वात असलेल्या इमारतींमध्ये वर्षा जल संचयन व विनियोग योजना राबवून घेण्याबाबत सुचना देण्यात आली आहे.

भूस्तरीय पाणी स्त्रोतांचे संरक्षण आणि संवर्धनासाठी वर्षा जल संचयन व विनियोग योजना राबविण्यात येतात. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील इमारतींमध्ये आजपावेतो अशा प्रकारच्या एकूण ९४० योजना राबविण्यात आल्या आहेत.

*******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक ८०

**ॲड आशिष शेलार, ॲड पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. किसन कथोरे, श्री. प्रशांत ठाकूर, श्री. संजय केळकर, श्री. बंटी भांगडिया, श्री. योगेश सागर, श्री. अतुल भातखळकर, श्री. मिहीर कोटेचा, श्री. पराग शाह, श्री. राम कदम,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"मुंबई उपनगरातील बोरिवली राजेंद्र नगर येथील फिल्ड मार्शल करिअप्पा उड्डाणपुलाला जोडलेल्या पादचारी पुलाची अवस्था अत्यंत बिकट झाल्याचे फेब्रुवारी २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, सदर पुलावरून नागरिकांना जीव मुठीत घेऊन पुल ओलांडावा लागत असल्याचे निदर्शनास येणे, जवळपास २२ वर्षांपूर्वी बांधकाम झालेला हा पुल मागील काही वर्षांपासून जीर्णावस्थेत असणे, पुलाच्या सर्व पाय-या झिजल्याने संरक्षणासाठी लावलेल्या लोखंडी पट्ट्याही अर्धवट निघालेल्या असणे, लोखंडी पट्ट्यामुळे प्रवाशांना शारिरीक इजा पोहचण्याचा धोका निर्माण होणे, महानगरपालिकेकडे सदरहू पुलाची डागडुजी करण्यासाठी अनेकदा मागणी व विनंती करूनही पालिकेचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली चीडेची भावना, शासनाने तातडीने उक्त पुलाची डागडुजी करण्याबाबत पालिका प्रशासनाला आदेश देऊन करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

बोरीवली पश्चिम, राजेंद्र नगर येथील जुना जनरल करिअप्पा रोड ओव्हर पूल असून, सदर पुलाचे नियमित निरीक्षण व संरचनात्मक तपासणी मे. एस. सी. जी. कन्सल्टंसी सर्व्हिसेस या सल्लागाराकडून करण्यात आली आहे. सदर सल्लागाराच्या संरचनात्मक तपासणी अहवालामध्ये आर.ओ.बी. ला जोडलेल्या जिन्याच्या पायऱ्यांसंबंधी निरीक्षण करण्यात आले आहे. सल्लागाराने सादर केलेला अहवाल व अंदाजपत्रकानुसार सदर पुलाची दुरुस्ती करण्यासाठी निविदा काढून लवकरच दुरुस्तीचे काम सुरु करण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत नियुक्त तांत्रिक सल्लागाराच्या अभिप्रायानुसार प्रतिबंधात्मक व सुरक्षात्मक उपाय करण्यात येत आहेत.

********

शेटा - एच - ०१७४ (७५०-४-२३)

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक १२०७**

**श्री. निलेश लंके, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेले लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"माहे जानेवारी २०२३च्या शेवटच्या आठवडयात वा त्या सुमारास, मुंबई येथील हॉटेल ग्रँड हयात, सांताक्रुझ या हॉटेल व्यवस्थापनाने हॉटेल भूखंडा शेजारील ३,०३६.२७ रिक्रिएशन ग्राऊंडचा उपयोग हॉटेलच्या दोन कुलिंग टॉवरची उभारणी करुन बेकायदेशीररित्या करीत असल्याची कबुली विधानसभेत उपस्थित करण्यात आलेल्या एका मुद्याच्या स्पष्टीकरणात उघडकीस येणे, सीटीएस क्र. ३४५४ हा भूखंड मुंबई मनपास अद्यापही हस्तांतरीत करण्यात न येणे, या हॉटेल व्यवस्थापना मार्फत मनोरंजनाचे मैदान म्हणून आरक्षित असलेल्या सुमारे ३० ते ३५ हजार चौ. फूट जागेचा वापर बेकायदेशीररित्या करण्यात येत असून त्यावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन त्यातून दरमहा लाखो रुपयांचे उत्पन्न हॉटेल ग्रँड हयात, सांताक्रुझ यांना मिळत असूनही, मुंबई मनपा प्रशासनाचे त्याकडे हेतूत: होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाच्या मालकीच्या जमिनीवर अतिक्रमण करुन हॉटेल ग्रँड हयात, सांताक्रुझ शासकीय भूखंडाचा गैरवापर करीत असल्याच्या अनेक तक्रारी मुंबई मनपा प्रशासन, आयुक्त, प्रधान सचिव, नगरविकास यांचेकडे करण्यात आल्याची बाब उघडकीस येणे, तरीही मुंबई मनपा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी हॉटेल व्यवस्थापनाशी झालेल्या आर्थिक हातमिळवणीकडे विधानसभेला खोटी उत्तरे व माहिती सादर करुन लोकप्रतिनिधींची हेतूत: केलेली दिशाभूल, व हॉटेल ग्रँड हयात, सांताक्रुझ व्यवस्थापनाला गैरकारभार करण्यास केलेले बहुमोल सहकार्य, यामुळे हॉटेल ग्रँड हयात, सांताक्रुझ यांना कोटयावधी रुपयांचा झालेला आर्थिक नफा, याकडे मुंबई मनपा प्रशासन हेतूत: करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी तक्रारदारांच्या मनात मुंबई मनपा प्रशासनाच्या हेतूबद्दल व अक्षम्य दिरंगाईबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष, चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

### -: मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

सांताक्रुझ, मुंबई येथील सीटीएस क्रमांक ३४५४/सी या भूखंडावरील हॉटेल ग्रॅण्ड हयात व्यवस्थापनास पंचतारांकित हॉटेलकरिता मंजुरी देतेवेळी भूखंडाच्या वापरातील सुधारीत अभिन्यासानुसार सीटीएस क्रमांक ३४५४ अ/१ धारण करणारा ३३८१६.६३ चौ.मी. चा भूखंड हॉटेल ग्रॅण्ड हयात यांच्या वापराकरिता व सीटीएस क्रमांक ३४५४ अ/२ धारण करणारा ३०३६.२७ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा सुविधा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक १३.१२.२०२१ रोजी प्राप्त झाला आहे. सदर सुविधा भूखंडापैकी १०% मनोरंजन मैदान या सुविधेसाठी राखीव आहे. सदर राखीव असलेल्या मनोरंजन मैदानाचा ताबा घेतेवेळी त्यावर कुलिंग टॉवर्स अस्तित्वात नव्हते. हॉटेल ग्रॅण्ड हयात व्यवस्थापनाने त्यांच्या मालकीच्या भूखंडावर दोन्ही कुलिंग टॉवर्सचे बांधकाम केले असून, त्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेने परवानगी दिली आहे. तसेच, हॉटेल ग्रॅण्ड हयात व्यवस्थापनामार्फत त्यांच्या मालकीच्या भूखंडावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

*******

रोटा/एच-२११[७५०-५-२०२३].

102

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक १५७३

**श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स.** यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेले लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबई येथील लोअर परळ स्थानकाजवळील डिलायल रोड उड्डाणपुलाचे बांधकाम गत ४ वर्षांपासून प्रलंबित असणे, सन २०१८ मध्ये सदरहू उड्डाणपुल धोकादायक अवस्थेत असल्याने नुतनीकरणासाठी पाडण्यात आला असणे, सदरहू पुलाचे बांधकाम महानगरपालिकेकडून ५० टक्केच झाले असणे, तसेच पुलाच्या बांधकामाकरिता महानगरपालिकेने ८५ मीटर लांबीचे बांधकाम करण्यासाठी रेल्वेस निधी प्राप्त करुन देऊनही रेल्वे प्रशासनाने तांत्रिक कारण देऊन सदर पुलाचे बांधकाम करण्यास जाणीवपुर्वक विलंब केल्याने एल्फिस्टन, वरळी व प्रभादेवी या विभागातील नागरीकांना मोठ्याप्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे सदरहू विभागातील नागरीकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाचे भावना, उक्त प्रकरणी शासनाने रेल्वे प्रशासनाकडून होत असलेल्या विलंबाबाबत चौकशी करुन सदरहू पुलाचे बांधकाम तात्काळ पुर्ण करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.."

**-: मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

लोअर परळ येथील डिलाईल रोड पुलाचे ७५% काम पूर्ण झाले असून, पश्चिम बाजूची सर्व गर्डर उभारणी पूर्ण झाली आहे. तसेच, सदर पुलाच्या पूर्व बाजूचे सर्व पिअर व पिअर कॅम्पचे काम पूर्ण झाले असून गर्डर उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच रेल्वेमार्फत रेल्वेवरील पुलाचे काम शेवटच्या टप्प्यात असून सदर काम लवकरच पूर्ण होण्याच्या स्थितीत आहे.

मध्यंतरी टँकरचा संप, तसेच सद्य:स्थितीत असलेली कॉक्रिटमधील घटक खडीची कृत्रिम अनुपलब्धता यामुळे थोडा उशीर होत असून, सदर पुलाचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

*******

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक २०६१**

**श्री. नितेश राणे, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"औद्योगिक प्रशिक्षण संस्था लोअर परेल यांची वापरात असलेली इमारत मडकळीस आल्याने तसेच जागा अपुरी पड़त असल्या कारणाने जागा नवीन जागा ११६ बी अरबी चांदोरकर मार्ग आगरी पाडा मुंबई ११ येथे देण्याचे शासन निर्णय द्वारा ठरने, तसेच त्याकरिता महाराष्ट्र शासन द्वारा आर्थिक तरतूद सुद्धा करण्यात येणे, सदरील जागा ही औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत लोअर परेल यांच्या ताब्यात देण्यात आलेली असताना सदरील जागेवर होमलेस शेल्टर चे आरक्षण होते व सदर आरक्षण बदलून ते (इतर शिक्षण) Other Education करावे अशा स्वरूपाचा पत्रव्यवहार वेळोवेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारा करण्यात येणे, परंतु त्यास तत्कालीन शासनाने कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद देण्यात न येणे,आणि २०२० साली मंजूर झालेल्या डीपी २०३४ मध्ये हे आरक्षण बदलून इतर शिक्षण असे करण्यात येणे, आणि सदगीर आरक्षण बदलल्यानंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारा महानगरपालिकेशी पत्रव्यवहार करून मोजणी करणे, तसेच संरक्षण भिंत बांधण्यास परवानगी मागण्यात येणे व याबाबतचा झालेला पत्रव्यवहारही उपलब्ध असून, सदरील बाब मुंबई महानगरपालिकेद्वारा कुठल्याही प्रकारे प्रतिसाद न देणे, आणि दिनांक २५ ऑक्टोबर २०२१ रोजी झालेल्या सभेमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था लोअर परेल यांना शैक्षणिक वापराकरता देण्यात आलेली जागा प्रस्तावित भूभाग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला शैक्षणिक उद्दिष्टा करता देण्यात आलेला असतानाही संस्थेकडून सदर भूभागावर शैक्षणिक उद्दिष्ट अनुरूप कोणतेही बांधकाम करणात आलेले नसल्यामुळे हा भूभाग वापराविना आहे तसाच ठेवून मग त्याच्या अटी व शर्तीचा भंग केलेला असणे, तसेच सदरील मक्त्याने दिलेल्या भूभागाचे संपूर्ण विहित भुई भाडे महाराष्ट्र शासनाकडून महानगरपालिकेला अद्याप प्राप्त झालेले नाही अशा रूपाचे कारण दाखवून ती जागा परत घेण्याचा निर्णय घेण्यात ठराव करण्यात येणे, तसेच सदरील भूभाग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून काढून घेऊन त्या जागेवर उर्दू लर्निंग सेंटर उर्दू भवन उभारण्याचा निर्णय परस्पर घेण्यात येणे, तसेच तीन महिन्याचे आतच म्हणजे फेब्रुवारी २०२२ मध्ये साडेबारा कोटी रुपयांचे उर्दू लर्निंग सेंटर उभारण्यासंदर्भातले टेंडर ही मागवण्यात येणे,आणि सदरील टेंडर मागवून प्रक्रिया राबवून सदर जागेवर उर्दू लर्निंग सेंटर संदर्भात बांधकाम सुरू करण्यात येणे, तसेच सर्व बैठका बी.एम सी ने कोरोनाकाळात घेणे, आणि याबाबतीत कोणत्याही बैठकीचे मिनिट्स,बैठकीचे पुरावे नसणे,तसेच याबाबत आयुक्तांना राष्ट्रीय बालहक्क आयोगाने नोटीस देऊन याबाबत अहवाल मागवणे आणि अद्याप प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना बांधकाम चालू असणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**-: मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यातील भायखळा विभागातील आर.बी. चांदोरकर मार्ग, आग्रीपाडा येथील मालमत्ता शहर सर्व्हे क्रमांक १९०८ (भाग), भूभाग क्र. ११६ बी हा अंदाजे १०६१ चौ.मी. क्षेत्रफळ असलेला भूभाग हा राज्य शासनाच्या संचालक, ग्रामीण ध्वनीक्षेपण व सेवा संचालनालय यांना दिनांक ०१.१२.१९६८ पासून रिक्त भूभाग भाडेपट्टी तत्वावर वापर करण्यास प्रथमतः दिला होता. सदर भूभागाचा वापर वाणिज्यस्थित असून त्याचे मासिक भाडे रु. ४००० /- इतके होते. तथापि, राज्य शासनाच्या

दिनांक ०७.०१.२००३ व दिनांक २२.०१.२००४ रोजीच्या परिपत्रकानुसार सदर रिक्त भूभाग संचालक, ग्रामीण ध्वनीक्षेपण व सेवा संचालनालय यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांना औद्योगिक संस्था विकास करण्याकरिता देणे व सदर रिक्त भूभागाचा विकास शैक्षणिक कारणास्तव करावा असे निर्देश दिले. त्यानुसार सदर भूभाग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस ३० वर्षाच्या कालावधीकरीता वार्षिक रु. ५,१०,५००/- इतके भुईभाडे आकारून मक्त्याच्या अटी व शर्तीनुसार महानगरपालिकेच्या दिनांक २०.०९.२०११ रोजीच्या ठरावानुसार मक्त्याने दिला होता.

मंजूर पुनर्रचित विकास आराखडा १९९१ नुसार सदर भूखंडावर कोणतेही आरक्षण नव्हते तथा कोणत्याही विद्यमान सुविधांनी बाधीत नव्हता. तथापि मंजूर विकास आराखडा २०३४ नुसार सदर भूभाग हा "इतर शिक्षण सुविधा" याकरिता आरक्षित आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने दिनांक १२.०८.२०२१ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे भूभाग मोजणीकरिता अर्ज सादर केला होता. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिनगरपालिकेने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसोबत दिनांक २०.०९.२०११ रोजीच्या ठरावान्वये संमत केलेले पूर्वीचे आदेश रद्द करुन, तसेच सदर भूभागाचा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसोबत केलेला मक्ता करार रद्द करुन सदर भूभाग महानगरपालिकेने ताब्यात घ्यावा, असा निर्णय दिनांक २५ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या ठराबान्वये घेऊन खालील कारणास्तव सदर भूभाग बृहन्मुंबई महानगरपालिकेने ताब्यात घेतला आहे:-

१) प्रस्तावित भूभाग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला शैक्षणिक उद्दिष्टांकरिता देण्यात आलेला असतांनाही, या संस्थेकडून सदर भूभागावर आजमितीपर्यंत शैक्षणिक उद्दिष्टानुरूप कोणतेही बांधकाम करण्यात आलेले नसल्यामुळे, सदर संस्थेने हा भूभाग वापराविना आहे तसाच ठेवून मक्त्याच्या अटी व शर्तीचा भंग केला आहे,
२) मक्त्याने दिलेल्या प्रस्तावित भूभागाचे संपूर्ण विहित भुईभाडे दिनांक २० सप्टेंबर, २०११ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेस अद्यापि प्राप्त झालेले नाही,
३) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची फोर्ट, लोअर परळ, धारावी, खार व मुलुंड या ठिकाणांबरोबरच भायखळा येथील आग्रीपाडा या एकाच परिसरामध्ये प्रस्तावित भूभागावर आणि घासगल्ली येथे अशी दोन प्रशिक्षण केंद्रे असून, सदर प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थ्यांची अल्प संख्या लक्षात घेता, एकाच परिसरात या संस्थेच्या दोन प्रशिक्षण केंद्रांची आवश्यकता दिसून येत नसल्याकारणाने, हा भूभाग महानगरपालिकेने आपल्या ताब्यात परत घेण्याची कार्यवाही करणे अगदी योग्य ठरेल.

आग्रीपाडा येथे उर्दू भाषा भवन स्थापन करण्यात यावे याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार भायखळा विभागातील "ई" प्रभागाममधील नगर भूक्रमांक १९०८ (भूभाग क्र. ११६ बी) या जागेवर उर्दू भाषा शिक्षण केंद्र उभारण्यासाठी दिनांक २१.१२.२०२१ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मंजुरी देण्यात आली असून, तद्नंतर प्रस्तावित इमारतीचे आराखडे मंजूर करून निविदा प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे. त्यानुसार सदर कामाचे मसुदापत्र दिनांक २३.०८.२०२२ रोजीच्या ठरावान्वये मंजूर करण्यात आले आहे.त्याअनुषंगाने कंत्राटदारास दिनांक ०४.१०.२०२२ रोजी कार्यादेश देण्यात आला असून

प्रस्तावित कामामध्ये तळमजला + ५ मजले असे बांधकाम प्रस्तावित आहे. सदर कामास १८ महिन्यांचा कालावधी प्रस्तावित केला असून, सदर कामाची कंत्राट किंमत रु. ११.३४ कोटी इतकी आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस देण्यात आलेला भूभाग परत घेण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतलेला निर्णय याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने ठोस कार्यवाही करुन त्याचा अहवाल सादर करण्याबाबत मा. राष्ट्रीय बाल हक्क आयोगाने कळविले आहे. तथापि सदर भूभाग महानगरपालिकेने परत ताब्यात घेण्याचा स्व-अधिकारात घेतलेला निर्णय महानगरपालिकेच्या दिनांक २५.१०.२०२१ रोजीच्या ठरावानुसार संमत झाला आहे.

*******

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक महानगरपालिका क्षेत्राचा विकास करण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासन यांच्या भागीदारीतून स्मार्ट सिटी योजना तयार केली असणे, या स्मार्ट सिटी योजनेच्या माध्यमातून नाशिक शहरातील विविध योजना व मूलभूत प्रकल्प कार्यान्वित करुन नाशिककरांना जास्तीत जास्त सुविधा देण्याचा उद्देश असणे, परंतु सुरुवातीपासूनच स्मार्ट सिटी योजनेचे कामकाज निराशा जनक होणे,

के पी एम जी या संस्थेला तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती केली जाणे, के पी एम जी ही संस्था वित्तीय संस्था असून वित्तीय क्षेत्रात काम करण्याचा सदर संस्थेला अनुभव असल्यामुळे सदर संस्थेने एका दुसऱ्या संस्थेची भागीदारी (जेवी) करुन सदर काम प्राप्त करुन घेणे, तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या संस्थेलाच तांत्रिक ज्ञान नसल्यामुळे प्रकल्पांची उभारणी करण्यात मोठ्या प्रमाणावर अडचणी येणे अनेक प्रकल्प यशस्वी ठरणे, या सर्वांची जबाबदारी सदर संस्थेवर करुन संस्थेकडून झालेल्या नुकसानाची भरपाई घेण्याची आवश्यकता असणे. गोदावरी नदीवरील होळकर पुलाजवळ असलेला बंधारा काढून त्या ठिकाणी मेकॅनिकल गेट तयार करण्यासाठी २०१९ साली कार्यारंभ आदेश देऊन देखील अद्यापही कामाला सुरुवात झालेली नसणे, गोदावरी नदी खोलीकरण करण्याचे काम १२ कोटीचे असताना यातून केवळ वाळू काढली जाणे, सदर काम ७० टक्के पेक्षा जास्त झालेले असताना देखील गोदावरी नदीपात्रात खोलीकरण न होणे, त्याचप्रमाणे वॉटर ट्रीटमेंट प्लांट व इलेक्ट्रिक मीटर या कामात देखील कार्यारंभ आदेश होऊन देखील काम सुरु झालेले नसणे, अशा प्रकाराने कामे सुरु न होण्यात अधिकाऱ्यांसमवेत तांत्रिक सल्लागार यांची अकार्यक्षमता जबाबदार असणे तसेच या कामांमुळे स्मार्ट सिटी योजनेच पर्यायने राज्य व केंद्र शासनाचे करोडो रुपयाचे नुकसान होणे रस्ते करण्याचे काम पुणे येथील ठेकेदार श्री शिर्के यांना दिलेल्या असणे त्यांच्याकडून कामे सुरु करण्यास विलंब झालेला असणे, स्थानिक बाबींची माहिती नसल्यामुळे कामाचा दर्जा खराब होणे, अनेक रस्त्यांची कामे सुरु देखील न करणे पर्यायी कमी महत्त्वाचे रस्ते करणे, त्यामुळे नाशिक शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांचे कामे प्रलंबित असणे, सल्लागार व ठेकेदार नियुक्ती करताना झालेला मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार, संपूर्ण स्मार्ट सिटीच्या कामांचीच चौकशी होण्याची असणारी आवश्यकता, नाशिक महानगरपालिका राज्य शासन व केंद्र शासन यांच्या यांच्या निधीचा झालेल्या दुरुपयोग, अपूर्ण व दर्जाहीन कामांमुळे झालेले नुकसान, याबाबत चौकशी त्रयस्थ संस्थेकडून करण्याची असणारी आवश्यकता, प्रशासनाचे संदर्भा इकडे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, माननीय मुख्यमंत्री यांनी चौकशीचे आदेश दिल्यानंतर देखील सदर चौकशी स्मार्ट सिटी योजनेकडूनच करुन घेण्यात येणे, त्यामुळे नुकसानात झालेली वाढ, गैरव्यवहार करणाऱ्यांना मिळालेले संरक्षण, तसेच संचालक मंडळाची बैठक वेळेवर न झाल्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना याबाबत शासन स्तरावरुन कारवाई करण्याचे असणारी आवश्यकता, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

रोटा H/126 (750-4-23)

## -: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

केंद्र पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियानांतर्गत राज्यातील आठ शहरांमध्ये नाशिक शहराची निवड करण्यात आलेली आहे. नाशिक स्मार्ट सिटीमार्फत खुल्या स्पर्धात्मक पद्धतीने मे. केपीएमजी ॲडव्हायजरी सर्व्हिसेस प्रा.लि. या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनीस नाशिक स्मार्ट सिटी प्रकल्पांचा विकास, आराखडा, आरेखन, नियोजन, व्यवस्थापन, अंमलबजावणी व देखरेख करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनीकडून अपेक्षित व्यवस्थापन अंमलबजावणी व देखरेख न झाल्यामुळे करारनाम्यानुसार जास्तीत जास्त १० टक्के रक्कमेची नुकसान भरपाई लादण्यात आली आहे. तद्नंतर, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना कोणतेही देयक अदा केलेले नसून त्यांना देण्यात येणाऱ्या देयकामधून सदर नुकसान भरपाई वसूल करण्यात येणार आहे.

गोदावरी नदीपात्रात होळकर पुलाच्या खालील बाजूस स्वयंचलित यांत्रिकी गेटचे काम मे. बेकम इंफ्रा, हैद्राबाद यांना कार्यारंभ आदेश दिलेले असून याकामासाठीचे संकल्पन व संकल्पनाची तपासणी मान्यता प्राप्त संस्था आय.आय.टी., मुंबई कडून करून घेण्यात आलेली आहे. सद्यस्थितीस पायाचे खोदकाम पूर्ण झालेले आहे. याकामासाठी लागणारे सुटे भाग हे ओबेर मेअर कंपनी, अमेरिकेकडून कोव्हीड-१९, लॉकडाऊनमुळे अद्याप पर्यंत प्राप्त न झाल्याने पुढील काम प्रलंबित आहे. सदरचे सुटेभाग प्राप्त झाल्यानंतर सदरचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

गोदावरी नदीपात्रातील होळकर पुल ते फॉरेस्ट नर्सरी पुल या दरम्यान ३.२ किमी लांबीमधील नदीपात्रातील गाळ काढण्याच्या कामाचे रुपये ८.९४ कोटी (GST विरहित) कार्यारंभ आदेश दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजी देण्यात आले आहेत. निविदेनुसार आजतागायत ७० टक्के काम झाले असून यामध्ये होळकर पुल ते रामवाडी पुलादरम्यान ४०० मीटर लांबीमध्ये सरासरी १ मीटर खोली व ११० मीटर रुंदी पात्रातील गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे, नदीची पुरवहन क्षमता वाढली असून त्याचा परिणाम म्हणून मागील दोन वर्षात या परिसरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली नाही. यावरून नदीपात्रात अपेक्षित असलेले खोलीकरण झाल्याचे आढळून येते.

नाशिक गावठाणातील क्षेत्रामध्ये जलशुद्धीकरण केंद्र, स्काडा व स्मार्ट वॉटर मीटर बसविणे या कामांचा समावेश असून सदर कामाचे कार्यादेश दिनांक ०४ एप्रिल, २०२२ रोजी देण्यात आलेले असून सदर कामाचा कालावधी ३० महिन्यांचा असून सद्यस्थितीस सदर काम प्रगतीपथावर असून सदर कामात इलेक्ट्रिक मीटरच्या कामाचा समावेश नाही.

नाशिक गावठाणातील (क्षेत्रनिहाय विकास) लहान व मोठे रस्ते, युटीलिटी, पाणी पुरवठा व मलनिस्सारणासह पुनर्विकासाची काम खुल्या स्पर्धात्मक निविदा पद्धतीने मे. बी.जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉ. प्रा.लि. पुणे यांना दिनांक ०७ सप्टेंबर, २०१९ रोजी रुपये २०१.०३ कोटी (GST विरहित) रकमेचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत. या कामामध्ये जुन्या गावठाणातील एकूण १७१ लहान व मोठे रस्ते,

फुटपाथ, भविष्यातील लोकसंख्येचा विचार करून रस्त्यांबरोबरच मलनिस्सारण व सांडपाणी व्यवस्थापन, २४*७ पाणी पुरवठा, युटीलिटी या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर कामांची गुणवत्ता तपासणी केंद्र शासन पुरस्कृत त्रयस्थ संस्था सर्टीफिकेशन इंजिनियर्स इंटरनॅशनल लिमिटेड (सीईआयएल) या कंपनीकडून नियमितपणे करून घेण्यात येत आहे. तसेच, गावठाण हद्दीमधील अरुंद रस्ते, वर्दळ व मुख्य बाजार पेठ, जुन्या व धोकादायक इमारती ई. कारणांमुळे व कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे काही रस्त्यांची कामे वेळेत पूर्ण करता आली नाहीत. सद्यस्थितीस एकूण ८० रस्त्यांची कामे पूर्ण झालेली असून ९१ रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

स्मार्ट सिटी अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या प्रकल्पांची गुणवत्ता तपासणीसाठी केंद्र शासन पुरस्कृत त्रयस्थ संस्था सर्टीफिकेशन इंजिनियर्स इंटरनॅशनल लिमिटेड (सीईआयएल) या कंपनीची नेमणूक करण्यात आलेली असून सदर कंपनीमार्फत नियमितपणे गुणवत्ता तपासणी करण्यात येत आहे.

नाशिक स्मार्ट सिटी स्थापनेपासुन कंपनी कायदा २०१३ नुसार डिसेंबर, २०२२ पर्यंत संचालक मंडळाच्या एकूण २५ बैठका होणे अपेक्षित होत्या त्यापैकी २४ बैठका झालेल्या आहेत.

नाशिक स्मार्ट सिटी अंतर्गत नाशिक शहरात पथदिव्यांचे एलईडी मध्ये रूपांतरण, सौरऊर्जा प्रकल्प, कलामंदिर, नाट्यगृह, उद्यान यांचे नुतनीकरण, विद्युत शववाहिनी, स्मार्ट रोड व इतर अशा विविध प्रकल्पांमुळे नाशिक शहरात नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून देण्यात मदत झाली आहे.

*****

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक २२९५**

**श्री. अतुल बेनके, श्री. सुरेश (राजूमामा) भोळे,** वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेले लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईतील भुलेश्वर विभागात तीसरा भोईवाडा, मोठा मंदिर, प्रसिद्ध असलेल्या जीवनजी महाराज कंपाऊंड लग्नाची वाडीमधील मालक चेनाराम, खेताराम राजपुरोहीत व महेश्वरी या तीन मालकांनी भागीदारीमध्ये मे.प्रतुल एक्झीम प्रा. लि. या कंपनीतर्फे इमारत क्र. १०५ ते १०७ या दोन जी + १ व जी + २ या दोन जुन्या इमारती पाडून त्याठिकाणी ४२ अनाधिकृत व्यापारी गाळ्यांचे बांधकाम व विक्री करुन कोट्यावधी रुपयाचा आर्थिक घोटाळा केल्याचे दिनांक ०९.०३.२०२३ रोजी नुकतेच उघडकीस येणे, उक्त १०५-१०७ सदरहू जुन्या उपकरप्राप्त इमारतीमध्ये १२ निवासी व ४ अनिवासी मिळून १६ सदनिकाधारक रहात असताना सदरहू इमारती पाडून त्या जागेवर अतिरिक्त चटई क्षेत्राचा गैरवापर करुन आणि वाडीतील डीपी रोडच्या ३५ टक्के चटई क्षेत्राचा वापर करुन ४२ व्यापारी गाळ्याच्या मॉलचे अनाधिकृत बांधकाम करण्यात येणे, महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्यानुसार निवासी सदनिकांचे व्यापारी गाळ्यात रुपांतर कायद्यात कोणतीही तरतुद नसताना विकासकाने हारून बागड या आर्किटेक्टची नियुक्ती करुन आणि महापालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागातील संबंधित अधिकाऱ्यांबरोबर अर्थपूर्ण व्यवहार करुन ४२ गाळ्यांचे मॉलचे बांधकाम केल्याचा प्रकार घडणे, भुलेश्वर हा विभाग दाटीवाटीचा असून या ठिकाणी मॉलचे बांधकाम करण्यास डीसी रुल नियमानुसार सभोवताली ६ मीटर जागा सोडणे बंधनकारक असतानाही इमारत मालक तथा विकासक यांनी याबाबत संबंधित नियमाचे उल्लंघन करुन बेकायदेशीररित्या मॉलचे बांधकाम करुन तसेच बांधलेले व्यापारी गाळे कोट्यावधी रुपये किमतीला विक्री करुन शासन तथा महापालिकेची प्रचंड आर्थिक फसवणूक केल्याची बाब उघडकीस येणे, उक्त अनाधिकृत बांधकामावर कारवाई करण्यासंदर्भात स्थानिक नागरीकांनी कार्यकारी अभियंता, इमारत प्रस्ताव विभाग आणि महापालिका आयुक्त तसेच राज्य शासनास दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्रव्यवहार करण्यात येऊनही अद्याप अनाधिकृत मॉलचे बांधकाम निष्कासीत करण्याबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही न करता प्रकरण दडपून टाकण्यात येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

### -: मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

भुलेश्वर विभागातील सी.एस.क्र. २७९६ या भूखंडावर इमारत क्रमांक १०५-१०७ या तळमजला + १ व तळमजला + २ अशा प्रकारच्या उपकरप्राप्त जुन्या इमारती अस्तित्वात होत्या. सदर इमारती मोडकळीस आल्याने त्या इमारतीच्या मालकांच्या वतीने वास्तुविशारद यांचेमार्फत पुनर्बांधणी या प्रकारात मोडणाऱ्या १००% दुरुस्तीसाठी दिनांक २३.१०.२०१५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्रस्ताव सादर केला. सदर प्रस्तावाच्या छाननीनंतर कामास दिनांक १४.०६.२०१७ रोजी अमान्यतेची सूचना व दिनांक ०३.०३.२०१८ रोजी काम सुरु करण्याची परवानगी देण्यात आली. सदर अस्तित्वातील जुन्या इमारती या रस्ता रुंदीकरणाने बाधीत असल्यामुळे जुळ्या खांबांच्या रचनेबाबत महानगरपालिका अधिनियम २९७(३)

अन्वये स्थायी समितीस दिनांक १७.१०.२०१७ रोजी माहितीकरिता प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

बांधकाम परवानगीच्या मंजूर आराखड्यानुसार बांधकाम पूर्ण करुन परवानगीच्या अटी व शर्तींची पूर्तता करुन वास्तुविशारदाने केलेल्या विनंतीस अनुसरुन छाननीअंती सदर इमारतीस दिनांक २१.१२.२०२० रोजी दुरुस्तीचा पूर्णत्वाचा दाखला देण्यात आला आहे. दिनांक २१.१२.२०२० रोजीच्या मंजूर आराखड्याप्रमाणे सदर इमारतीमध्ये १३ निवासी व ६ अनिवासी सदनिका होत्या. तद्नंतर वास्तुविशारदाने दिनांक १९.०३.२०२१ रोजी सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन छाननीअंती सदर इमारतीमध्ये तळमजला व पहिल्या मजल्यावरील अनिवासी गाळ्यांमध्ये दरवाजांसह अतिरिक्त अंतर्गत दुभाजक भिंती उभारण्यासाठी दिनांक १५.०९.२०२१ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मान्यतेचे पत्र देण्यात आले. दिलेल्या बांधकाम परवानगीच्या अटी व शर्तींची पूर्तता केल्यानंतर वास्तुविशारदाने केलेल्या विनंतीस अनुसरुन छाननीअंती दिनांक १४.०१.२०२२ रोजी सदर बांधकामास पूर्णत्वाचा दाखला देण्यात आला आहे.

सदर मंजूर आराखडे हे पुनर्विकासाकरिता मंजूर करण्यात आले असून, पुनर्बांधणी या प्रकारात मोडणाऱ्या १००% दुरुस्तीसाठी असल्याने मूळ बांधकाम क्षेत्रफळात कोणताही फेरफार न करता जागेवर जसे बांधकाम होते तशीच परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे ६ मी. मोकळी जागा सोडणे बंधनकारक नाही.

सदर बांधकाम परवानगीबद्दल दिनांक १२.०१.२०२३ वा त्यासुमारास बृहन्मुंबई महानगरपालिकेस कोणतीही तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि दिनांक ८ डिसेंबर, २०२२ रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्थळनिरीक्षण करण्यात आले असून, सदर ठिकाणचे बांधकाम हे मंजूर आराखड्यानुसार असल्याचे निदर्शनास आले होते व त्याप्रमाणे तक्रारदारास दिनांक १०.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

*******

८६.

लक्षवेधी सूचना क्र. २३५०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. निलेश लंके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २३५० खालीलप्रमाणे आहे:-**

"माहे फेब्रुवारी,२०२३ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास वसई विरार मनपाच्या नगररचना विभागाचे उपसंचालक श्री वाय शिवा रेड्डी यांचे या पदावर झालेली नियुक्ती बेकायदेशीर असून गेले आठ ते दहा वर्षे ते एकाच पदावर व एकाच ठिकाणी विना खंडन नियुक्ती वर असल्याची बाब उघडकीस येणे, वाय शिवारेड्डी यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून मनपा क्षेत्रात शेकडो बेकायदेशीर बांधकामे करण्यास विकासकांना केलेले सहकार्य, आरक्षित केलेल्या ८८६ खंड पैकी " ३२९ लोकांनांवर बेकायदेशीर बांधकामे झाल्याचे प्रतिज्ञापत्र मनपा ने मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणे. आज पर्यंत ४४३७ कोटी रुपये खर्च करून ५६ भूखंडांचा ताबा घेण्यात वसई विरार मनपाला आलेल्या दारुण अपयशचा उल्लेख या प्रतिज्ञापत्रात असणे, तात्कालीन गटनेता म.न.पा यांनी मार्च-एप्रिल २०१६ ला विरार पो. स्टे. मध्ये श्री वाय शिवा रेड्डी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत अनेक पुराव्यासह केलेल्या लेखी तक्रारी, शासकीय नोकरी व बदलीचे कोणतेही नियम या नगर रचना विभागाच्या उपसंचालकाना बंधनकारक नाही का ? असं मनपा क्षेत्रातील नागरिकांना पडलेला गंभीर प्रश्न गेली १० ते १२ वर्षे एकच पदावर कार्यरत राहिल्याने विकासकांशी आर्थिक हात मिळवणी करून अनेक विकासकांच्या 'बेकायदेशीर बांधकामांकडे हेतूत करण्यात आलेल्या अक्षरशः दुर्लक्ष श्री वाय शिवा रेड्डी यांची तात्काळ बदली करण्यात येऊन त्यांचे कार्यकाळात घेण्यात आलेले निर्णयांची फेर तपासणी नगर विकास विभागाच्या उच्चपदस्य व्यक्तीने करून उत्पत्र स्तोत्र पेक्षा जास्त कोट्यावधी रुपये जास्त संपत्ती असलेल्या पदाचा गैरवापर करून जमा केली असल्याने पोलिसांच्या आर्थिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या मार्फत वाय शिवा रेड्डी यांची तपासणी करण्याची तक्रार मनपा प्रशासन हे करण्याची जनतेमधून होत असलेली मागणी व वाय शिवा रेड्डी यांना प्रशासनाचे कोणते नियम लागू होत नसल्याने सिद्ध झाल्याने मनपस क्षेत्रातील लाखो नागरिकांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संताप याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**<u>मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>**

वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दिनांक ०३.०७.२००९ रोजी झाली असून त्यावेळी सिडकोने तयार केलेला आराखडा राबविण्यासाठी सिडकोचे तेव्हाचे संयोगी नियोजनकार श्री. वाय.एस.रेड्डी यांना वसई विरार शहर महानगरपालिकेच्या उपसंचालक नगररचना या पदावर दिनांक १३.०८.२०१० रोजी प्रतिनियुक्तीने नियुक्ती दिल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे. तसेच दिनांक ०९.०२.२०१२ रोजी महानगरपालिकेने श्री. रेड्डी यांना उपसंचालक नगररचना या पदावर सरळ सेवेने नियुक्ती देण्यास मान्यता प्रदान केली आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेचा सुधारीत आकृतीबंध शासनाने दिनांक ०९.०९.२०१४ रोजी मंजूर केला असून नगररचना विभागात उप संचालक १ पद, सहाय्यक संचालक १ पद व नगररचनाकार अशी पदे मंजूर केली आहेत. उपरोक्त पैकी सद्यस्थितीत सहाय्यक संचालक व नगररचनाकार हे पद रिक्त आहे.

दरम्यान वसई विरार शहर महानगरपालिकेकडून कळविल्यानुसार दिनांक ०७.०५.२०१६ रोजी श्री. रेड्डी यांची महानगरपलिकेतील प्रतिनियुक्ती वरील सेवा संपुष्टात आणून त्यांना कार्यमुक्त करण्यात आले होते. उपरोक्त कार्यमुक्तीच्या आदेशा विरुध्द श्री. रेड्डी यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असता दिनांक १५.०१.२०१९ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशास अनुसरुन दिनांक १३.०२.२०१९ च्या महानगरपालिकेच्या ठरावान्वये श्री. रेड्डी यांना महानगरपालिकेत पुन: स्थापित करण्यात आले आहे. तथापि, मा. उच्च न्यायालयात सदर प्रकरणी अद्याप प्रलंबित आहे.

श्री. वाय. शिवा रेड्डी, उप संचालक, वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या विरोधात शासनाकडे प्राप्त तक्रारी आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे वेळोवेळी पाठविण्यात आल्या आहेत. तथापि, प्रस्तुत लक्षवेधी सूचनेत उल्लेखीत मार्च-एप्रिल २०१६ मध्ये पोलीस स्टेशन, विरार येथे दाखल तक्रारीबाबत महानगरपालिका अनभिज्ञ असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. तथापि, महानगरपालिका हद्दीतील खाजगी व्यक्तींकडून हेतूपुरस्पर पोलीस विभागाकडे अधिकाऱ्यांच्या विरोधात करण्यात येत असलेल्या तक्रारींमध्ये तथ्य नसल्याचे निदर्शनास आल्याने आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या स्तरावरुन पोलीस अधीक्षक पालघर यांना महानगरपालिकेच्या पुर्व परवानगी शिवाय अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येऊ नये असे दिनांक ०८.०२.२०१६ रोजी कळविण्यात आले आहे. दरम्यान पोलीस स्टेशन विरार पोलीस उप आयुक्त, विरार यांच्याकडील दिनांक १५.०३.२०२३ च्या अहवालानुसार तक्रारींचा नोंदणी रजिस्टर कालावधी ३ वर्षे असून सन २०१७ पर्यंतचा रेकॉर्ड नाश झाल्यामुळे सदर तक्रारीं संदर्भात कोणताही अभिलेख पोलीस स्टेशन मध्ये उपलब्ध नाही.

वसई विरार शहर महानगरपालिका कळविल्यानुसार मा. उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र. १०/२०२२ मध्ये महानगरपालिकेकडून दिनांक ०३.०९.२०२२ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले असून विकास योजने अंतर्गत आरक्षित ८८६ पैकी ५६ भुखंड महानगरपालिकेने ताब्यात घेतले असून उर्वरित भुखंडावर अतिक्रमणाबाबत महानगरपालिका महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमानुसार कारवाई करत असल्याचे नमूद केले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका कळविल्यानुसार महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या कामकाजाची व्याप्ती, प्रस्तुत लक्षवेधी सूचनेतील उल्लेखीत श्री. रेड्डी, उपसंचालक यांचा नगररचना विभागातील प्रदिर्घ तांत्रिक अनुभव व महानगरपालिकेची प्रशासकिय निकड विचारात घेता श्री. रेड्डी यांच्या सेवा आवश्यक आहेत.

दरम्यान वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील नगररचना विभागातील विविध संवर्गातील तांत्रिक पदे तातडीने भरण्याच्या सूचना संबंधितांना कळविण्यात येत आहेत.

****

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

मा. श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२४२६ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम येथील मे ओशिवरा लँड डेव्हलपेंट कंपनी प्रा. लि. या कंपनीच्या ताब्यातील क्षेत्रावर नागरी जमीन कमाल धारणा कायदा कलम २० अन्वये गृह बांधणी प्रयोजनार्थ विकासकाला सूट देण्यात येते, त्यानुसार विकासकाला सूट दिली असणे, मौजे ओशिवरा ता. अंधेरी येथील सर्व्हे क्र. ४१ येथील क्षेत्रावर विकासकाकडून अनियमितता झाली असणे, विकासकाने अत्यंत उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटातील सदनिका बांधणे आवश्यक असणे, मात्र विकासकांनी सदनिका बांधल्या नसणे, त्या संदर्भात विकासकावर कठोर कार्यवाही करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, मनपाचे संबंधित अधिकारी अहवाल देण्याचे टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येत असल्याचे स्पष्ट झाले असणे, नागरी जमीन (कमाल धारणा विनियमन) अधिनियम, १९७६ च्या कलम ३४ अन्वये सदनिकाच्या आकारमानाबाबत महानगरपालिका व संबंधित अधिकारी या कार्यालयाच्या अधिका-यांनी सयुंक्तरीत्या बारकाईने पहाणी करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, तथापि या ठिकाणी तसे घडत असल्याचे दिसून येत नसणे, शासनास अहवाल सुध्दा सादर केला नसणे, मनपा व शासनाचे संबधित अधिकारी विकासकाला मदत करीत असणे, संबंधित अधिका-यांवर व विकासकाचे संगनमत असणे, त्यामुळे शासनाचे नुकसान होत असणे, विकासकावर कोणतीच कार्यवाही होत नसणे, याला तिन्ही यंत्रनेतील अधिकारी जबाबदार असणे, या कामात दिरंगाई व कर्तव्यात कसूर केल्या प्रकरणी कठोर कारवाई करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे मनपा व शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी शासनाचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असणे, याबाबत स्थानिकात निर्माण झालेला तीव्र असंतोष व मनपा व शासना प्रती निर्माण झालेली विडीवी भावना या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तातडीची उपाययोजना व प्रतिक्रिया."

---

## मा.मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे निवेदन

मौजे ओशिवरा, ता.अंधेरी येथील स.क्र.४१ (भाग) मधील मे. ओशिवरा लॅन्ड डेव्हलपमेंट कंपनी प्रा.लि. यांच्या ताब्यातील ५,८५,२००.०० चौ.मी. क्षेत्राकरीता दि.१२.११.१९७९ अन्वये नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ अंतर्गत गृहबांधणी प्रयोजनार्थ कलम २० खाली सुट देण्यात आली असून, सदर सुटीच्या आदेशास दि.३०.११.१९९३ व दि.११.१२.१९९५ रोजी शुध्दीपत्रक पारीत केले असून, अंतिम शुध्दीपत्रक दि.११.१२.१९९५ नुसार सुटीखालील क्षेत्र ६,०८,१९६.५५ चौ.मी. आहे.

मुळ कलम २० च्या सुटीच्या आदेशातील मुख्य अटीनुसार प्रस्तावाधिन जमीन श्री स्वामी समर्थ प्रसन्न को.ऑ.हौ.सो.लि.(नियोजित) या संस्थेस किंवा संस्थेच्या उपसंस्थेस अभिहस्तांतरीत करून, त्या संस्थेच्या सभासदांसाठी गृहबांधणी योजना राबविणे व कमीत कमी ८००० सदनिका बांधणे बंधनकारक असून, त्यापैकी ५०% सदनिका ४० चौ.मी. पर्यंत आकारमानाच्या व उर्वरीत ५०% सदनिका ८० चौ.मी. पर्यंतच्या आकारमानाच्या बांधणे योजनाधारकास बंधनकारक आहे.

सदर कलम २० च्या योजनेचे बांधकाम करताना सुटीच्या आदेशातील अटी व शर्तीचे उल्लंघनाबाबत शासनाकडे प्राप्त तक्रार विचारात घेऊन, शासनाने नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ च्या कलम ३४ मधील तरतूदीनुसार सुनावणी आयोजित करून स्वामी समर्थ प्रसन्न को.ऑ.हौ.सो.लि. मधील अविकसीत क्षेत्र १०,००० चौ.मी. व यमुना नगर मधील ६३१८ चौ.मी.

असे एकूण १६,२१८.०० चौ.मी. अविकसीत क्षेत्राकरीता दि.२४.११.२००७ रोजी पुनरिक्षण आदेश पारीत केले आहेत. तद्नंतर शासन पत्र दि.२१.११.२००८ नुसार प्रस्तुत प्रकरणी योजनेतील अटी व शर्तीची पूर्तता झाल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र न देण्याचे सक्षम प्राधिकारी कार्यालयास आदेशित केले आहे. त्यानुसार सक्षम प्राधिकारी कार्यालयाने योजनाधारकाकडून दंडात्मक मुदतवाढीची रक्कम भरून घेऊन योजनेस दि.२२.११.२०१२ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

नाजकधा कलम २० अन्वये सूट देण्यात आलेल्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्याच्या दिनांकापासून ५ वर्षांनंतर व सदर इमारत नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेस हस्तांतरीत झालेली असल्यास अशा सोसायटींच्या विनंतीनुसार शासन निर्णय दि.१.८.२०१९ मधील धोरणानुसार नाजकधा कलम २० च्या आदेशामधील एकूण जमिनीच्या बाजारमूल्य दर तक्यामध्ये नमूद दराच्या २.५% दराने येणारे शुल्क आकारून सोसायटीमधील सदनिकांच्या addition/alteration/ amalgamation/regularization of amalgamation साठी विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीच्या अधिनतेने मान्यता देण्याबाबत शासन पत्र दि.५.११.२०२० अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने ओबेरॉय स्काय हाईट्स को. ऑ.सो.लि. यांनी सक्षम प्राधिकारी कार्यालयास दि.११.११.२०२० अन्वये केलेल्या विनंतीनुसार संबंधितांकडून शासन पत्र दि.५.११.२०२० मधील तरतूदीनुसार विहित अधिमुल्य भरून घेवून, सदर सोसायटीमधील सदनिकांच्या addition/alteration/amalgamation/ regularization of amalgamation साठी विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीच्या अधिनतेने जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई यांनी दि.७.१२.२०२० रोजी ना-हरकत दिलेली आहे.

नाजकधा कलम २० खालील योजनांबाबत शासन निर्णय दि.१.८.२०१९ नुसार गृहबांधणी योजनांखालील क्षेत्रासाठी १०% अधिमुल्य भरून घेणेबाबत व इतर अनुषंगिक धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहे. त्यानुसार समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांनी दि.२७.८.२०२१ अन्वये सक्षम प्राधिकारी कार्यालयास केलेल्या विनंतीनुसार स्वामी समर्थ प्रसन्न को.ऑ.हौ.सो.लि. यांच्या अविकसित ७७४७.१० चौ.मी. क्षेत्रासाठी शासन निर्णय दि.१.८.२०१९ नुसार १०% अधिमुल्य व दंडात्मक मुदतवाढीची रक्कम भरून घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई यांनी केली आहे.

सदर भूखंडावर बांधकाम परवानगी देतांना इमारतीतील सदनिकांचे क्षेत्रफळ विहित केलेल्या आकारमानानुसार इमारतीच्या मंजुर आराखड्यात देण्यात आलेले आहे. इमारतीचा मंजूर आराखड्यानुसार ४० चौ.मी. क्षेत्रफळाच्या एकूण ५,७२९ सदनिका व ४० चौ.मी. ते ८० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या एकूण ५४८३ सदनिका अशा एकूण ११,२१२ सदनिका बांधण्यात आलेल्या आहेत. सदर भूखंडावर एकूण १८६ इमारती उभारण्यात आल्या असून, त्या इमारतीत एकूण ११,२१२ सदनिकांमध्ये सद्यस्थितीत जवळपास ६०,००० रहिवाशी मागील २५ ते ३० वर्षापासून वास्तव्यास आहेत.

सद्यस्थितीत शासन पत्र दि.३०.०५.२०२२ व दि.११.७.२०२२ अन्वये नाजकधा कलम ३४ खालील दि.२४.११.२००७ चे आदेश विचारात घेता प्रस्तुत प्रकरणी सदनिकांच्या आकारमानाबाबत महानगरपालिका व जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडील संबंधित अधिका-यांच्या संयुक्त पथकाद्वारे स्थळपाहणी करण्याचे निदेश आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई यांना देण्यात आले आहेत. तथापि, सदरच्या क्षेत्रावरील १८६ इमारतींच्या सदनिकांच्या आकारमानात फेरफार/अनियमिततेबाबत कारवाई करणे ही बाब अतिशय विस्तृत व व्यापक स्वरूपाची असल्यामुळे के / पश्चिम विभागामार्फत नमुन्यादाखल (Sample) व क्रमरहित (Random) स्थळ निरीक्षण करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने मनपा अधिनियम ४८८ अन्वये नोटिसा बजावल्या असून, कायद्याच्या अधिन राहून पुढील सविस्तर कारवाई करण्यात येत आहे.

*******

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना:-२४५७

सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**श्री.सिध्दार्थ शिरोळे, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"शिवाजीनगर (जि. पुणे) येथे पुणे महानगरपालिकेच्या पांडवनगर व वाकडेवाडी याठिकाणी ४० ते ५० वर्षांपूर्वीच्या जुन्या वसाहती असणे, पांडवनगर येथे एकूण २४० सदनिका व वाकडेवाडी येथे एकूण २८८ सदनिका असणे, सदर सदनिका फार जुन्या झाल्या असून याचे पुणे मनपा तर्फे structural audit केले असणे, या structural audit च्या अहवालानुसार सदर दोन्ही इमारती धोकादायक असणे, सदरील इमारती नागरिकांच्या राहण्याच्या दृष्टीने असुरक्षित असल्याचे आढळून येणे, जीवित हानी टाळण्यासाठी पांडवनगर व वाकडेवाडी याठिकाणी नवीन इमारती बांधण्याची आवश्यकता असणे, या दोन्ही ठिकाणी जवळपास ९०० सदनिकांची गरज असणे, नवीन इमारती बांधण्यासाठी जवळपास १०० कोटी निधीच्या तरतुदीची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

पुणे पेठ शिवाजीनगर येथील पांडवनगर व वाकडेवाडी याठिकाणी अंदाजे ५० वर्षांपूर्वीच्या पुणे मनपाच्या जुन्या वसाहती आहेत. याची माहिती खालील प्रमाणे आहे.

पांडवनगर येथे एकूण १० इमारती मध्ये २४० सदनिका आहेत. या पैकी ७ इमारती मधील १४८ सदनिकाम मध्ये पुणे मनपाचे चतुर्थ श्रेणी मधील सेवक रहात असून उर्वरित ३ इमारतीमध्ये ९२ सदनिकांमध्ये गलिच्छ वस्ती निर्मुलन योजनेअंतर्गत पुनर्वसन केलेले नागरिक रहात आहेत.

वाकडेवाडी येथे एकूण ९ इमारती मध्ये एकूण २८८ सदनिका आहेत. या पैकी २८० सदनिकांमध्ये रस्तारुदिमुळे बाधित नागरिक रहात असून उर्वरित ८ सदनिकांमध्ये पुणे मनपाचे चतुर्थ श्रेणी मधील सेवक रहात आहेत.

या ठिकाणी राहणारे पुणे मनपाचे सेवक निवृत्त झाल्यावर त्यांचे वारसदार या सदनिकांचा वापर करीत आहेत. सदर सदनिका मासिक भाडेतत्वावर त्यांना देण्यात आलेल्या आहेत.

या दोन्ही वसाहतीमधील सर्व इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट पुणे मनपा मार्फत सल्लागार मे. केबीपी सिव्हील इंजिनिअर्स सर्व्हिसेस यांचेकडून करून घेण्यात आलेले आहे. सदर स्ट्रक्चरल ऑडीटच्या अहवालामध्ये दोन्ही वसाहतीमधील अनेक इमारतींमध्ये बऱ्याच प्रकारच्या संरचनात्मक हानी झाल्याचे व त्यामुळे सदर वसाहतींमधील इमारती राहण्याच्या दुष्टीने धोकादायक असल्याचे नमूद केले आहे. याशिवाय सदर इमारती देखभाल दुरूस्ती करण्याच्या पलीकडे गेल्या असून, सदर इमारतींची देखभाल दुरूस्तीची कामे करावयाची असल्यास त्याचा खर्च एकूण नविन इमारतीच्या खर्चाच्या अदाजे ६०% इतका येवू शकेल असेही नमूद केले आहे. यास्तव त्या ठिकाणी सदर इमारती पाडून नव्याने रहिवासी इमारती बांधणे आवश्यक असल्याचे अंतिम अहवालात नमूद केले आहे.

त्यामुळे अशा इमारतीमधील नागरिकांचे पुणे मनपाच्या इतर इमारतीमध्ये स्थलांतर करणेबाबत पुणे मनपाच्या चाळ विभागाने कार्यवाही सुरू केली होती. यासाठी तीन ते चार वेळा त्या विभागामार्फत प्रयत्न करण्यात आले होते. मात्र तेथील नागरिकाच्या प्रखर विरोधामुळे याकामी पुढील कार्यवाही झालेली नाही. यापूर्वी चाळ विभागाने दि.०३/०५/२०२१ रोजीच्या जाहिर प्रकटनाव्दारे इमारतीच्या धोक्याबाबत नागरिकांना माहिती दिली आहे.

यापूर्वी वाकडेवाडी पीएमसी कॉलनी येथे बीओटी तत्वावर इमारती बांधण्याचे नियोजन करून त्याप्रमाणे जागेवर पुणे मनपाने कामही चालू केले होते. परंतु सदर वसाहतींमधील सदनिकाधारकांना या बांधण्यात येणाऱ्या इमारतींमध्ये मालकी हक्क अपेक्षित असल्याने सदर कामास मोठया प्रमाणावर विरोध झाला होता. त्यामुळे आजतागायत सदर काम सुर होऊ शकलेले नाही.

सदयस्थितीत अंबिल ओढा मनपा वसाहत, राजेवाडी भवानी पेठ वसाहत येथे जुन्या जीर्ण झालेल्या इमारती पाडून नव्याने इमारतीचे पुर्ननिर्माण करण्याचे काम सुरू झाले असून या ठिकाणी एकूण २५२ सदनिका उपलब्ध होणार आहेत. यासाठी अंदाजे रू. ३३ कोटी खर्च अपेक्षित आहे. याचधर्तीवर पांडवनगर व वाकडेवाडी येथील जुन्या इमारती पाडून सर्व इमारतींचे टप्याटप्याने नव्याने पुर्ननिर्माण करणे शक्य होणार आहे. यासाठी अंदाजे रू. ८० ते ९० कोटी तरतूद आवश्यक आहे.

सन २०२३-२४ च्या पुणे मनपाच्या अंदाजपत्रकात वर नमूद अंबिल ओढा मनपा वसाहत, राजेवाडी भवानी पेठ वसाहत येथील चालू कामांसाठी व नवीन नियोजित कामांसाठी विविध अर्थाशिर्षाकांमध्ये रु.२०.० कोटी तरतूद सुचविण्या आली आहे.

सद्यस्थितीत पांडव नगर व वाकडेवाडी येथील दोन्ही वसाहतीमध्ये पुणे महानगरपालिकेमार्फत प्रतिवर्षी देखभाल दुरुस्ती करण्यात येत आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात पुणे शहरातील पुणे मनपाच्या सर्व वसाहतींच्या देखभाल दुरूस्तीसाठी पुणे मनपाच्या अंदाजपत्रकात रु. १.५० कोटी तरतूद उपलब्ध करण्यात आली होती. सन २०२३-२४ च्या पुणे मनपाच्या अंदाजपत्रकात पुणे मनपाच्या सर्व वसाहतींच्या दुरुस्तीसाठी रु.२.० कोटी तरतूद सुचविण्यात आली आहे.

आत्तापर्यंत गतकाळातील पाच वर्षामध्ये केवळ पांडव नगर व वाकडेवाडी येथील दोन्ही वसाहतीमधील इमारतीसाठी अंदाजे रु. २.० कोटी इतका खर्च देखभाल दुरूस्तींच्या कामासाठी करण्यात आलेला आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र. २५४१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. अनिल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २५४१ खालील प्रमाणे आहे:-**

"पालघर जिल्हयातील वसई-विरार महापालिका शहरात सन २०१८ ते २०२१ या तीन वर्षात ६९ कोटींचे किटकनाशक व औषध फवारणीचे कंत्राट घेतलेल्या किरण कॉर्पोरेशन कंत्राटदार कंपनीने किटकनाशक औषध फवारणी करुनही पालिका हद्दीत डासांचा प्रसार वाढून डेंग्यु, मलेरिया व फायलेरियाचा प्रसार झाल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक १३/१/२०२३ रोजी निदर्शनास येणे, महापालिकेचे तांत्रिक सल्लागार मे.टंडन अर्बन सोल्युशन प्रा.लि.यांचेमार्फत सदरचा ठेका किरण कॉर्पोरेशन कंपनीला देण्यात येणे, दर महापालिकेतर्फे किटकनाशक फवारणीसाठी दरवर्षी २३ कोटी देण्यात येऊनही मागील वर्षी डेंग्युचे प्रमाण १००, मलेरिया ९३ व फायलेरियाचे प्रमाण ८० रुग्ण असणे, तर खासगी रुग्णालयात याच रुग्णांची संख्या ५०० हून अधिक असल्याची आकडेवारी स्वत:महापालिकेतर्फे देण्यात येणे, यामुळे दरवर्षी किटकनाशक फवारणीसाठी दरवर्षी २३ कोटी निधी देऊनही शहरात डासांचा प्रसार होऊन रुग्ण वाढत असल्याचा प्रकार चिंताजनक असणे, सदर प्रकरणात ठेकेदार, महापालिकेचे सबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी आर्थिक संगनमताने कमी व स्वस्त किटकनाशके वापरुन यामध्ये आर्थिक घोटाळा करण्यात येणे, सबंधितांच्या भ्रष्टाचारामुळे शहरातील करदात्या नागरिकांच्या पैशांची उधळपट्टी होऊन सदरहू नागरिकांना विविध रोगांचा प्रादूर्भाव होऊन उपचारासाठी रुग्णालयात जावे लागणे, यामुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका, सदर प्रकरणाची शासनने चौकशी करुन तातडीने यातील दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन सदर कंपनीचा ठेका तात्काळ रद्द करुन सदर कंपनीला काळया यादीत टाकण्याची नितांत आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे शहरातील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

<u>मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>

वसई, नवघर-माणिकपुर, नालासोपारा व विरार या ४ नगरपालिका व आसपासची ५३ गावे मिळून वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दिनांक ०३.०७.२००९ रोजी झाली. सन २०११ च्या जनगणनेनुसार वसई विरार शहर महानगरपालिकेची लोकसंख्या १२,२१,२३३ इतकी आहे. तसेच सद्यस्थितीत महानगरपालिकेची लोकसंख्या अंदाजित २२ लक्ष आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेचे ३११ चौ.कि.मी. इतके विस्तीर्ण क्षेत्रफळ आहे. तसेच वसई विरार शहर हे मुंबई लगतचे शहर असल्याने येथील शहरीकरण मोठया प्रमाणात झाले आहे. शहराची वाढती लोकसंख्या तसेच सदर शहरातील ६०% नागरीक हे बैठी चाळीमध्ये राहत असल्याने यांठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी नागरीक मोठ्या प्रमाणात पाण्याचा साठा करतात.

त्यामुळे सदर क्षेत्रात पावसाळयात मलेरीया, डेंग्यू व हिवाळ्यात फायलेरीया या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात होण्याची शक्यता असते.

सदरील निर्माण होऊ शकणाऱ्या साथीच्या रोगांवर नियंत्रण मिळविणेकामी एकात्मिक डास निर्मुलन व नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेने औषध फवारणी व धुर फवारणी करणेकामी योग्य नियोजन, पर्यवेक्षण व योग्य त्या रसायनांचा वापर करुन कर्मचारी वापरुन या क्षेत्रामधील तांत्रिक दृष्टीकोनातुन कुशल नामांकित व राष्ट्रीय तसेच आंतराष्ट्रीय पातळीवरील अनुभवी संस्थाकडून Request for Proposal (RFP) मागविण्याकरिता दिनांक १६.०३.२०१८ च्या ठरावान्वये ई-निविदा प्रसिध्द करुन येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तद्नुषंगाने मागविण्यात आलेल्या निविदामध्ये मे.किरण कॉर्पोरेशन यांची कमी दराची निविदा प्राप्त झाली होती. सदर ई-निविदा स्थायी समितीच्या दिनांक १७.११.२०१८ च्या ठरावान्वये सदरील अभिकर्त्यासोबत दिनांक १०.१२.२०१८ रोजी करारनामा करण्यात आला होता व मे.किरण कॉर्पोरेशन यांना दिनांक १९.१२.२०१८ रोजी कार्यादेश देण्यात आला होता. महानगरपालिकेच्या हद्दीतील माहिती व डासांच्या उत्पत्तीची ठिकाणे या सर्व बाबींची माहिती घेऊन मे.किरण कॉर्पोरेशन यांनी प्रत्यक्षात दिनांक ०१.०३.२०१९ पासून कामास सुरूवात केलेली होती. तथापि, सदर कंत्राटदारास वेळोवेळी मुदत वाढ देण्यात आली असून सद्यस्थितीत सदर कंत्राटदारामार्फतच सेवा घेण्यात येत आहे.

एकात्मिक डास नियंत्रण व निर्मुलन कार्यक्रमा अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत मे.किरण कॉर्पोरेशन यांनी औषध व धूर फवारणी करणेकामी योग्य नियोजन, पर्यवेक्षण व योग्य त्या रसायनांचा वापर करुन, कुशल कर्मचारी वापरुन सन २०१९ ते २०२२ या कालावधीत मलेरिया, फायलेरिया व डेंग्यू या साथीच्या रोगांवर नियंत्रण मिळविल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे. सबंधित कंत्राटदारामार्फत आय.एस.आय, डब्लु.एच. ओ., एच ए.सी.सी.पी., यांनी प्रमाणित केलेली डेल्टामेथरीन, टेमीफॉस्ट इ. जंतुनाशके उपयोगात आणली जात आहेत. उपरोक्त कामांमध्ये फॉगींग, स्प्रेईंग, कंटेनर सर्वे, ट्रीटमेंट कार्यपध्दतीचा अवलंब केला जात असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर कंपनीच्या विरोधात महानगरपालिका स्तरावर तक्रारी प्राप्त झाल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सदर तक्रारीवर जलद कार्यवाही करण्यात येते. तसेच संपुर्ण कामावर आरोग्य विभागामार्फत नियमितपणे पर्यवेक्षण करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

मे.किरण कॉर्पोरेशन यांना मनुष्यबळ, जंतू किटकनाशके आणि इंधन पुरवठासाठी जी.एस.टी.सह सन २०१९-२० या वर्षी रुपये २६.५३ कोटी, सन २०२०-२१ यावर्षी रुपये २७.३३ कोटी व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात ३२.९१ कोटी इतके देयके अदा केली आहेत. सदरची देयके लेखापरिक्षण विभागाकडून लेखापरिक्षण करुनच अदा केली असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे. एकूणच सदर कामाअंतर्गत कंत्राटदाराची देयके अदा करण्यापूर्वी त्यांनी केलेल्या कामांची तपासणी केल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

****

लक्षवेधी सूचना क्रमांक २४८

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. छगन भुजबळ, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. दौलत दरोडा, श्री. विनोद निकोले, श्री. अजित पवार, श्री. जयंत पाटील, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. धनंजय मुंडे, श्री. संजय बनसोडे, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. चेतन तुपे, श्री. धर्मरावबाबा आत्राम विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २४८ पुढीलप्रमाणे आहे:-**

"औष्णिक ऊर्जा प्रकल्पात निर्माण होणारी राख प्रकल्पाच्या परिघातील बांधकामासाठी मोफत वितरित करण्याचा नियम असताना डहाणूतील अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड कंपनीतील राखेची मात्र विक्री केली जात असणे, स्थानिकांना राखेचे वितरण करणाऱ्या वीज कंपनीने राख वितरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी गुजरातमधील एका कंपनीची नियुक्ती केलेली असणे, ती देखभाल शुल्काच्या नावाखाली स्थानिक व्यावसायिकांना राखेची विक्री करत असून त्यासाठी अनामत रकमाही घेत असणे, ५०० मेगावॉट क्षमतेच्या औष्णिक ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणारी पाणीमिश्रित सौम्य दर्जाची राख (पॉण्ड ॲश) प्रकल्पापासून दूर एका विशेष डबक्यामध्ये गोळा केली जात असणे, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने जारी केलेल्या नियमावलीनुसार, प्रकल्पापासून ३०० किमी परिघातील बांधकामांमध्ये तसेच बांधकाम साहित्यांच्या निर्मितीसाठी ही राख वापरणे सक्तीचे असणे, तसेच राखेचे वितरण विनाशुल्क करण्याचेही केंद्र सरकारने स्पष्ट केले असणे, मात्र डहाणूतील अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड कंपनीच्या बाबतीत हा नियम पायदळी तुडवण्यात आलेला असणे, कंपनीतून १५ वर्षांपासून राखेचे वितरण स्थानिकांना करण्यात येत असणे, त्यामुळे येथील स्थानिक राख वाहतूकदारांना रोजगारही मिळत असणे, मात्र जानेवारी २०२२ पासून कंपनीने स्थानिक वितरकांना थेट राखपुरवठा करण्यास मज्जाव केलेला असणे, त्याऐवजी गुजरातमधील मे. रेहवर इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या कंपनीकडे राख वितरणाचे कंत्राट दिले असणे, आता या कंपनीने ३० रुपये प्रति टन या दराने राखेसाठी शुल्क आकारण्यास सुरुवात केलेली असणे, त्यासाठी कंपनीच्या अंतर्गत रस्त्यांच्या देखभाल खर्चाचे कारण पुढे करण्यात आलेले असणे, राखेचे वितरण बंद झाल्यामुळे स्थानिक नागरिकांवर बेरोजगारीचे संकट उभे ठाकलेले असणे, त्यामुळे त्यांनी माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये या विरोधात ठिय्या आंदोलन सुरू केले असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने दिनांक २२.०२.२०२२ च्या पत्रान्वये थर्मल पॉवर प्रकल्पांमध्ये निर्माण होणाऱ्या राखेच्या वापराबाबत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमधील सूचनांमधील तरतूद खालीलप्रमाणे आहे:-

"5.5 The Ash shall be offered to the prospective user agencies as stipulated in the MoEF&CC Notification dated 31.12.2021 on competing demand basis, i.e. user agency who offers the highest price and meets the transportation cost will be offered the ash on priority. This will reduce the tariff of electricity and burden on the consumers. It will also be in accordance with sound vigilance practices."

अदानी डहाणू धर्मल पॉवर स्टेशन (ADTPS) हे उपरोक्त तरतूदीनुसार त्यांच्या संबंधित वीज प्रकल्पांमध्ये निर्माण होणाऱ्या राखेची पारदर्शक बोली प्रक्रीयेद्वारे (Transperant bid Process) विल्हेवाट किंवा विक्री करत आहेत. या तारखेपूर्वी राखेची विल्हेवाट/ विक्री पर्यावरण वन आणि हवामान बदल मंत्रालयाने दिनांक ०३.११.२००९ रोजी जारी केलेल्या अधिसुचनेतील खालील तरतूदीनुसार करण्यात येत होती:-

"3.(1)(i) the pond ash should be made available free of any charge on "as is where is basis" to manufacturers of bricks, blocks or tiles including clay fly ash product manufacturing unit (s), farmers, the Central and the State road construction agencies, Public Works Department, and to agencies engaged in backfilling or stowing of mines."

सदर कंपनीला औष्णिक विद्युत केंद्र, राख साठवणुकीची शास्त्रोक्त पद्धतीची जागा (ash pond) इत्यादीसाठी संबंधित जमिनीच्या अकृषिक वापराकरिता जिल्हाधिकारी, रायगड यांच्या दिनांक १३.०३.२००३ च्या आदेशानुसार परवानगी देण्यात आली आहे. सदर ॲश पॉंडमध्ये सतत राख उचलल्यामुळे अनेक खोल खड्डे निर्माण झाले व त्यामुळे राख साठविण्याचा बंधाऱ्याच्या स्थिरतेसाठी आणि सुरक्षिततेसाठी संरक्षण आवश्यक असल्याने ऊर्जा मंत्रालयाच्या (MOP) दिनांक २२ फेब्रुवारी २०२२ च्या मार्गदर्शक तत्वांनुसार बदलावयाची स्थिरता व सुरक्षिततेच्या तांत्रिक कारणास्तव सदर ॲश पॉंडमधील राख उचलणे थांबविण्यात आले आहे.

मेसर्स रेवर इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्या बरोबर राखेच्या व्यवस्थापनासाठी २०२० मध्ये कंपनीचा ५ वर्षांसाठी करार झाला होता. दिनांक ३१.१२.२०२१ पर्यंत हा करार दिनांक ०३.११.२००९ च्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने (MoEF & CC) जारी केलेल्या अधिसूचनेनुसार लागू होता. तद्नंतर हा करार MoEF & CC ने जारी केलेल्या दिनांक ३१.१२.२०२१ ची अधिसूचना व ऊर्जा मंत्रालय (MoP) ने दिनांक २२.०२.२०२२ रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक नियमांनुसार लागू आहे. अदानी डहाणू थर्मल पॉवर स्टेशन (ADTPS) यांनी स्थानिक वाहतूकदारांना राखेच्या वाहतूकीसाठी नियुक्त केले नव्हते, कदाचित राखेपासून उत्पादन तयार करणाऱ्या उत्पादकांनी त्यांच्यासाठी वाहतुकदारांना नियुक्त केलेले असावे. सद्यस्थितीत तांत्रिक कारणांमुळे मेसर्स रेवर इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीला ॲश पॉंडमधील राख पूरवठा थांबविला आहे.

.................

लक्षवेधी सूचना क्र.२४२

महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२३ चे प्रथम अधिवेशन**

श्री.छगन भुजबळ, श्री.जितेंद्र आव्हाड, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र.२४२** पुढीलप्रमाणे आहे :

" दि. १९ जानेवारी, २०२३ रोजी सातपूर नाशिक दोघांनी फेसबुक पोस्टच्या वादातून एका युवकाची हत्या केल्याची घटना ताजी असतांना दि.२१ जानेवारी २०२३ रोजी नाशिक शहरात पुन्हा एका तरुणाची दगडाने ठेचून हत्या करण्यात आलेली असणे, दि.१५ जानेवारी २०२३ रोजी मेनरोड नाशिक येथे दोन गटात तुफान हाणामारी व प्राणघातक हल्ला तर देवळाली (जि.नाशिक) येथे दोन गटात प्राणघातक हल्ला झाल्याचे निदर्शनास आलेले असणे, माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात अश्विनी कॉलनी नाशिकरोड येथे दोन युवकांच्या दोन गटामध्ये चॉपर तलवारी आणि कोयत्याने मारामारी झाली तर धात्रकफाटा परिसरात आर्थिक व्यवहारातून गोळीबार झाल्याची घटना निदर्शनास आलेली असणे, दि.७ फेब्रुवारी, २०२३ रोजी सिडकोतील बुरकुले सभागृहाजवळ बहिणीची छेड काढल्याबद्दल विचारणा करण्यासाठी गेलेल्या भावासह बहिणीवर टोळक्याने कोयत्याने प्राणघातक हल्ला केलेला असणे, शहरात वर्षभरात ४४५५ गुन्हे दाखल होवून गुन्ह्यांच्या चढत्या आलेखामुळे आणि गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाल्यामुळे पोलिसांपुढे आव्हान निर्माण झालेले असणे, सिडको परिसरात दिवसेंदिवस गुन्हेगारीमध्ये वाढ होत असून नवनवीन टोळ्या उदयास येत असणे, अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोयते आणि तलवारी बाळगून कोयता गँग आणि वाय गँग ने दहशत निर्माण केली असणे, नाशिक शहरातील सातपूर व अंबड पोलीस ठाण्याचे विभाजन करून नवीन 'एमआयडीसी पोलीस ठाणे' निर्माण करण्याची लोकप्रतिनिधींनी दि.१८ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, नाशिक शहर येथील सातपूर व अंबड पोलीस ठाण्याचे विभाजन करून नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्यासाठी पोलीस महासंचालक मुंबई यांनी दि. ४ सप्टेंबर २०१८ रोजी गृह विभागाला प्रस्ताव पाठविलेला असून अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुन्ह्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढल्यामुळे नवीन पोलीस स्टेशन निर्माण करण्यासाठी नागरिकांनी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या सुमारास स्वाक्षरी मोहीम इ. विविध आंदोलने केलेली असणे, नाशिक पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाण्यांच्या विभाजनासह आयुक्तालय कार्य क्षेत्राची हद्दवाढ व विस्तार करण्याबाबत पोलीस आयुक्त नाशिक यांनी माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्या सुमारास पोलीस महासंचालकांना प्रस्ताव पाठवलेला असणे, सन २०२१ च्या तुलनेत सन २०२२ मध्ये नाशिक पोलीस आयुक्तालयात १५५९ गुन्ह्यांची वाढ झाल्यामुळे वाढत्या शहरीकरणामुळे नाशिक पोलीस आयुक्तालयाची हद्दवाढ आणि पोलीस ठाण्यांचा विभाजन करण्याची आवश्यकता असणे, नाशिक शहरातील गुन्हेगारीमध्ये प्रचंड वाढ झालेली असणे, शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांना आळा घालण्याबाबत शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

..........................................................................

रोटा H10046 (750-4-23)

## मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

नाशिक पोलीस आयुक्तालयातील सातपूर पोलीस ठाणे हद्दीत फेसबूक पोस्टच्या वादातून एका युवकाची हत्या झाल्या प्रकरणी दिनांक १८.०१.२०२३ रोजी गु.र.नं.११/२०२३, भारतीय दंड संहिता कलम ३०२, ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे, यातील दोन्ही आरोपींस अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे. पंचवटी पोलीस ठाणे हद्दीत दारु पिण्यासाठी पैशाच्या वादातून एका तरुणाची हत्या झाल्या प्रकरणी दिनांक २१.०१.२०२३ रोजी गु.र.नं.३५/२०२३, भारतीय दंड संहिता कलम ३०२, ३४ अन्वये गुन्हा नोंद झाला आहे, यामध्ये दोन विधीसंघर्षीत बालकांस ताब्यात घेण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे. दिनांक १५.०१.२०२३ रोजी मेनरोड, नाशिक येथे दोन गटांत हाणामारी व प्राणघातक हल्ल्याबाबत भद्रकाली पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२६/२०२३, भारतीय दंड संहिता कलम ३०७, १६०, १४३, १४७, १४८, १४९, ४२७ व मुंबई पोलीस कायदा १९५१, कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे, सदरच्या गुन्ह्यात आतापर्यंत १९ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे. देवळाली, जिल्हा नाशिक येथे दोन गटात प्राणघातक हल्ल्याबाबत दिनांक १९.०१.२०२३ रोजी उपनगर पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गु.र.नं.३४/२०२३, भारतीय दंड संहिता कलम ३०७, ५०४, ५०६, ३४ व शस्त्र अधिनियम १९५९, ३/२५ सह, मुंबई पोलीस कायदा, १९५१, कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल आहे, सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे. अश्विनी कॉलनी, नाशिक रोड येथे दोन युवकांच्या दोन गटांमध्ये चॉपर, तलवारी आणि कोयत्याने मारामारी झाल्याबाबत नाशिक रोड पोलीस ठाणे येथे दिनांक ०५.०१.२०२३ रोजी गु.र.नं. ०५/२०२३, भारतीय दंड संहिता कलम ३२६, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. यामध्ये तीनही आरोपींस अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे. धात्रक फाटा परिसरात आर्थिक व्यवहारातून गोळीबार झाल्याबाबतची घटना निदर्शनास आलेली नाही. नाशिक शहरात सिडकोतील बुरकुले सभागृहाजवळ बहिणीची छेड काढल्याबद्दल विचारणा करण्यासाठी गेलेल्या भावासह बहिणीवर टोळक्याने कोयत्याने प्राणघातक हल्ला केल्याबाबत अंबड पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे दिनांक ०६.०२.२०२३ रोजी गु.र.नं.८४/२०२३, भारतीय दंड संहिता कलम ३०७, ३५४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८ सह, शस्त्र अधिनियम १९५९, कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे, सदर गुन्ह्यामध्ये ३ आरोपींना अटक करुन १ विधीसंघर्षित बालकास सुधारगृहात पाठविण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

अंबड पोलीस ठाणे क्षेत्रात सद्यःस्थितीत कोयता गँग अथवा वाय गँग अशी कोणतीही गँग अस्तित्वात नसून विविध ठिकाणी वेगवेगळ्या इसमांनी कोयते व तलवारी बाळगल्याबाबत शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये सन २०२३ मध्ये ०६ गुन्हे दाखल आहेत, सदर ०६ गुन्ह्यात एकूण २० कोयते व ०४ तलवारी जप्त करण्यात आले असून त्यामध्ये १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे, अटक करण्यात आलेल्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असुन त्यामध्ये ०१ आरोपीवर एमपीडीए अंतर्गत स्थानबध्दता व ०५ गुन्हेगारांना तडीपार करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच दैनंदिन बिट मार्शल गस्त पथकाद्वारे व गुन्हे शोध पथकाद्वारे गस्त घालण्यात येत आहे.

रेटा H/००५६ (750-५-23)

(हस्ताक्षर) मा.प.

नाशिक शहरातील सातपूर व अंबड पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन एमआयडीसी पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी त्यांच्या दिनांक १७.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालक, मुंबई यांना सादर केलेला प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाने त्यांच्या दिनांक ०४.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावावर वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक कार्यालयाने सदर मुद्यांची पूर्तता करुन त्यांच्या दिनांक ०३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव गृह विभागास फेर सादर केलेला आहे. सदर प्रस्तावावर पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच नाशिक पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्राची हद्दवाढ करण्याबाबतचा सुधारीत प्रस्ताव पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी त्यांच्या दिनांक ०६.१२.२०२२ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक यांना सादर केला आहे. सदर प्रस्तावावर पोलीस महासंचालक कार्यालयाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

नाशिक शहरात पोलीस आयुक्तालयांतर्गत सन २०२१ व सन २०२२ मध्ये अनुक्रमे एकूण ३६६८ व ४४६२ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. सन २०२१ च्या तुलनेत सन २०२२ मध्ये एकूण दाखल गुन्ह्यांच्या संख्येत ७९४ ने वाढ झालेली आहे. सन २०२२ मध्ये लॉकडाऊन चे नियम शिथिल झाल्यामुळे, निर्बंध उठल्यामुळे सन २०२१ च्या प्रमाणात सन २०२२ मध्ये गुन्ह्यांची संख्या वाढलेली आहे, ही वस्तुस्थिती आहे. नाशिक शहर हे धार्मिक, पर्यटन स्थळ असल्याने देशभरातून पर्यटक नाशिक शहरात फिरावयास येतात. तसेच वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरणामुळे नाशिक शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे गुन्हेगारीच्या प्रमाणातही वाढ झाली आहे. वाढलेल्या गुन्हेगारी बाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई, एमपीडीए अंतर्गत स्थानबध्दता, हद्दपार कारवाई इ. प्रकारच्या कायदेशीर कारवाई करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने नाशिक पोलीस आयुक्तालयात सन २०२२ मध्ये ०१ मोक्का, ०२ एमपीडीए, १२७ तडीपार कारवाई करण्यात आलेल्या तसेच सन २०२३ मध्ये आजपावेतो ०२ एमपीडीए, ०८ तडीपार कारवाई करण्यात आलेल्या आहेत. आयुक्तालय हद्दीत सर्वत्र सतर्क पोलीस गस्त ठेवून गुन्हेगारांवर नजर ठेवण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. पोलीस ठाणे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार, हिस्ट्रीशिटर यांच्यावर नजर ठेवण्यासाठी शहरात अचानक कोंबींग, ऑल आऊट ऑपरेशन, विशेष नाकाबंदी करण्यात येत आहे. पाहिजे व फरारी आरोपी पकडण्यासाठी खास पथके तयार करण्यात आलेली आहे. याप्रमाणे सर्व प्रकारच्या उपाययोजना करून गुन्हेगारी नियंत्रणात ठेवण्याबाबत नाशिक आयुक्तालयामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

**********

गृह विभाग

लक्षवेधी सुचना क्र.१८३६

## लक्षवेधी सुचना क्र.१८३६

## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

मा.श्री. भास्कर भाऊराव जाधव, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे-

"रत्नागिरी जिल्हयात वाढत्या गुन्हेगारीबरोबरच अंमली पदार्थांचा विळखा घट्ट होत चाललेला असणे, रत्नागिरी शहर व परिसर त्याचे मुख्य केंद्र असल्याचे समोर येणे, या ठिकाणाहून गांजा, चरस, टर्की पावडर, मेथ्यॅक्युलॉन (एमडी) सारख्या अंमली पदार्थांची छुपी वाहतूक व तस्करी सुरू असणे, दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ रोजी रत्नागिरी शहरातील शांतीनगर भागात एका तरूणीसह चैघेजण अंमली पदार्थांची विक्री करताना आढळून येणे, त्यांच्याकडे सुमारे २ लाख रू. किंमतीचे अंमली पदार्थ आढळून येणे, माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये रत्नागिरी शहरातील मिरकरवाडा येथे गांजा हा अंमली पदार्थ विक्रीसाठी बाळगणाऱ्या एका तरूणावर पोलिसांनी कारवाई केलेली असणे, त्याच्याकडे सुमारे १८ हजार रू. किंमतीचा गांजा आढळून येणे, त्याआधी मार्च २०२२ मध्ये शहरातील एका लॉजवर टाकलेल्या छाप्यात मेथ्यॅक्युलॉन (एमडी) हा विक्रीसाठी आणलेला अंमली पदार्थ आढळून येणे, त्याची किंमत सुमारे ५ लाख रू. इतकी असणे, याप्रकरणी केरळमधील दोघांना झालेली अटक, कारवाई झाल्याने या घटना समोर येणे, परंतु, मोठया प्रमाणात छुप्या पध्दतीने अंमली पदार्थाची तस्करी होत असणे, अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांचा आंतरराष्ट्रीय टोळयांशी संबंध असल्याचे स्पष्ट होवूनही मुख्य सूत्रधारांवर कारवाई करण्यास पोलिसांना आलेले अपयश, अंमली पदार्थांबरोबरच गोवा बनावटीच्या लाखो रूपयांच्या दारूची राजरोसपणे बेकायदा वाहतूक सुरू असल्याच्या घटनांमध्ये झालेली वाढ, दिनांक २५ जानेवारी २०२३ वा त्या सुमारास मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर (जि. रायगड) नजीक ४ लाख १८ हजार रू. किंमतीची गोवा बनावटीची विदेशी दारू एका कारमध्ये आढळून येणे, अशाचप्रकारे दिनांक ३१ ऑक्टोबर २०२२ वा त्यासुमारास सुमारे २४ लाख रू. किंमतीची गोवा बनावटीची दारू घेवून नाशिकच्या दिशेने निघालेला मोठा कंटेनर महामार्गावर कळंबस्ते, ता. चिपळूण (जि. रत्नागिरी) येथे आढळून येणे, याचदरम्यान कळंबस्ते गावातील एका घरामध्ये लाखो रूपयांच्या दारूचा साठा आढळून येणे, दररोज मोठया प्रमाणात राजरोजपणे बेकायदा गोवा बनावटीच्या दारूची वाहतूक होत असताना मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर जागोजागी तपासणीसाठी उभ्या असलेल्या महामार्ग पोलिसांच्या नजरेतून दारू भरून चाललेली कंटेनरसारखी वाहनाना महामार्ग विभागाचे पोलीस जाणीपूर्वक दुर्लक्ष करणे, बेकायदा वाहतूक करणारे आणि महामार्ग पोलीस यांचे असलेले संगनमत, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली संतापाची व चिडीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

अंमली पदार्थ संदर्भात रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात सन २०२२ मध्ये एकुण १२ गुन्हे दाखल असून अंदाजे एकुण रुपये ५,५७,६८०/-किंमतीचा अंमली पदार्थ जप्त केले असुन त्यामध्ये १४ आरोपीना अटक केली आहे .तर जिल्ह्यात २१ गुन्हे दाखल असुन अंदाजे एकुण रुपये ५,८८,७५५/- किंमतीचा अंमली पदार्थ जप्त केले असुन २१ आरोपीना अटक केली आहे.

दि. १६ फेब्रुवारी २०२३ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती रत्नागिरी समोरील रस्त्यावर २ आरोपी १० ग्रॅम वजनाचा amphetamine व methqualone अंमली सदृश्य पदार्थ गैरकायदा विक्री करित असल्याचे आढळून आले, म्हणुन रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ३८/२०२३ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोविकारावर परिणामकरणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये कलम ८(क), २२(अ) प्रमाणे दिनांक १७/०२/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीच्या ताब्यातून एकुण रू २,२२,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी एका तरुणीसह चार जणांना अटक करण्यात आली आहे.

दिनांक १५/१०/२०२२ रोजी रत्नागिरी शहरातील मिरकवाडा येथे एक तरुण ०.३७४ किलोग्रॅम गांजा विक्री करीत असताना आढळून आल्याने त्याच्याविरुद्ध रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.३८१/२०२२, गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोविकारावर परिणाम करणारे अधिनियम १९८५ अन्वये कलम ८(क),२०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल आहे व आरोपीला अटक करण्यात आली आहे.

दिनांक ०१/०३/२०२२ रोजी ०४:३० वा चे सुमारास निलराज लॉज मध्ये ९९ ग्रॅम वजनाचा एम डी सदृश्य अमली पदार्थ गैरकायदा विक्री करित असल्याचे आढळून आले म्हणुन २ आरोपी(राज्य केरळ) विरुद्ध रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं १०१/२०२२ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोविकारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(क),२१(क) प्रमाणे २ आरोपी(राज्य केरळ) विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीच्या ताब्यातून रू ४,९५,०००/- किंमतीचा ९९ ग्रॅम वजनाचा एम. डी. सदृश्य अंमली पदार्थ रू २१०००/- किंमतीचे ४ मोबाईल व इतर साहित्य मिळून रू ५,१६,०५०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.तसेच आरोपींचा आंतरराष्ट्रीय टोळयांशी संबंध असल्याचे गुन्हयाचा तपासात निष्पन्न झालेले नाही.

दि. २४.१.२०२३ रोजी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील धामणदेवी गावाजवळ ता. पोलादपूर जि रायगड येथे गोवा बनावटीची विदेशी दारू वाहतूक करीत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ अंतर्गत गुन्हा रजिस्टर क्र. ०४/२०२३ दि. २४.०१.२०२३ रोजी नोंदविलेला आहे. या गुन्हयात गोवा बनावटीचे विविध ब्रॅन्डचे ३०४ लि. विदेशी मद्य ज्याची अंदाजे किंमत रु. २,५७,२८०/- व कार जप्त करण्यात आलेली आहे. या गुन्हयात जप्त केलेली कार, मद्य व आरोपीचा मोबाईल इ. ची एकुण किंमत रु. ४,१८,३८०/- इतकी आहे. या गुन्हयात २ इसमांना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाच्या सखोल तपास चालू आहे.

दिनांक ०१/११/२०२२ रोजी ०१.४४ वा आरोपी बाबासाहेब सुखदेव बुधवंत हा आपल्या मालकीच्या कंटेनर मधुन गोवा बनावटीची विदेशी दारु गैरकायदेशीर बिगर परवाना, वाहतूक करीत असताना मुंबई गोवा महामार्गावर कळंबस्ते फाटा येथे आढळून आल्याने त्याच्याविरुध्द चिपळुण पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. ३५७/२०२२ महाराष्ट्र दारुबंदी कायदा क ६५ (ई)(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीच्या ताब्यातून रु २४,४५,०७२/-एवढी गोवा बनावटीची दारु व रु १०,००,००/- किंमतीचा कंटेनर जप्त करण्यात आले आहे.

त्याच प्रमाणे दिनांक ०२/११/२०२२ रोजी चिपळुण पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाने कळंबस्ते बौध्दवाडी ता चिपळुण येथील घर क्र ३१८, येथे छापा टाकला असता आरोपीत राजाराम तानाजी जोईल याने गैरकायदा विनापरवाना एकुण रु ४,७४,००२/- किंमतीची गोवा बनावटीची दारु ताब्यात बाळगले स्थितीत मिळुन

आला म्हणुन चिपळुण पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ३५९/२०२२ महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये कलम ६५ (ई) प्रमाणे दिनांक ०३/११/२०२२ रोजी गुन्हा दाखल आहे.गुन्ह्याचा तपास चालू आहे.

महामार्ग पोलीस विभागामार्फत महामर्गावरील होणा-या मोटार अपघातांचे ठिकाणी तात्काळ भेट देणे, अपघाताला तात्काळ वैदकीय उपचार मिळणेकामी रुग्णालयात दाखल करणे, वाहतूक कोंडी होऊ नये याकरिता उपाययोजना करणे तसेच महामार्गावर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-या कसुरदार वाहन चालक यांच्यावर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करणे हे महामार्ग पोलीसांचे मूळ उद्दिष्ट आहेत. अंमली पदार्थ विरोधात स्थानिक गुन्हे अन्वेषन विभाग व स्थानिक पोलीस ठाणे हे कारवाई करत असतात.त्यानुसार दि.२१.०२.२०२३ रोजी टेम्पो क्र.एम एच ०८ ए पी १६०९ हे धोकादायकरित्या वाहन चालवित असल्याचे आढळून आल्याने तपासणीअंती वाहनामधे ५६ बॉक्स गोवा बनावटीची दारु व ५ सुट्या बाटल्या असा माल आढळल्याने चालकावर कणकवली पोलीस स्टेशन गु. र. क्र ४९/२०२३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ ए,६५ ई अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारारा आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकांमध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेला आहे. अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थाबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. राज्यामध्ये अॅन्टी नार्कोटीक्स टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे तसेच केंद्र शासनाच्या दि.२५.०३.२०२२ च्या आदेशानुसार अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

**********

लक्षवेधी सूचना क्र. २२९४

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. नारायण कुचे. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २२९४ पुढीलप्रमाणे आहे :-

"छत्रपती संभाजी नगर येथे पोलिस अधिकाऱ्याने मद्यधुंद अवस्थेत महिलेचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान घडली असल्याचे निदर्शनास येणे, तसेच सदर पोलीस हा संबंधीत खात्यातील वरिष्ठ पदावर काम करणारा असून त्याने मध्यरात्रीच्या सुमारास जोडप्याकडे लिफ्ट मागण्याच्या बहाण्याने त्यांच्या सोबत गैरवर्तणूक करून सदर महिलेचा विनयभंग करून बेकायदेशीरपणे त्यांच्या घरात घुसणयाचा प्रयत्न केला असणे, सदर धक्कादायक प्रकरणी पोलिस अधिकारी याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असणे, अधिका-यांच्या या प्रकारामुळे संपूर्ण छत्रपती संभाजीनगरात भीतीचे वातावरण असून स्थानिक महिला व तरुणी यांच्या मध्ये असुरक्षित असल्याची भावना निर्माण झाली असणे, उपरोक्त प्रकरणी शासनाने तातडीने अधिका-यांला निलंबित करून भविष्यात अशा घटना घडू नयेत याकरीता करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

### मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

छत्रपती संभाजी नगर येथे सहायक पोलीस आयुक्त यांनी दिनांक १५/०१/२०२३ रोजी पहाटेच्या सुमारास दारुच्या नशेत महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी संबंधित सहायक पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजी नगर यांच्याविरोधात पोलीस ठाणे सिटी चौक, छत्रपती संभाजी नगर शहर येथे गुन्हा नोंद क्रमांक २७/२०२३ कलम ३५४, ३५४(अ), ३५४ (ड), ४५२, ३२३, ५०४, ५०६, भारतीय दंड विधान संहिता प्रमाणे दिनांक १५/०१/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधित सहायक पोलीस आयुक्त यांना तात्काळ प्रभावाने गुन्हे शाखा येथून नियंत्रण कक्ष, छत्रपती संभाजी नगर शहर येथे पोलीस आयुक्त यांच्यामार्फत संलग्न करण्यात आले होते.

सदर आरोपी हा पोलीस खात्यातील उच्चपदस्थ अधिकारी असल्याने पुराव्यामध्ये फेरफार करण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये या घटनेबाबत असंतोष असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये किंवा गोंधळ होऊ नये म्हणून आरोपीस अटक करणे गरजेचे असल्याने दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने संबंधित सहायक पोलीस आयुक्त यांना दिनांक १६/०१/२०२३ रोजी सिडको पोलीस स्टेशन येथे अटक करण्यात आली. त्यानंतर सदर आरोपीस मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट ३ रे, छत्रपती संभाजी नगर यांच्याकडे हजर केल्यानंतर मा. न्यायालयाने आरोपीस जामीनावर सोडलेले आहे.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, संबंधित सहायक पोलीस आयुक्त यांनी शिस्तप्रिय पोलीस दलाच्या प्रतिमेस बाधा पोहचेल असे दृष्कृत्य केल्याचे निषन्न होत असल्याने तसेच संबंधित सहायक पोलीस आयुक्त यांनी शासकीय अधिकारांचा केलेला गैरवापर तसेच महिला अत्याचारासारख्या गंभीर प्रकरणामधील त्यांचा सहभाग या बाबी लक्षात घेऊन संबंधित सहायक पोलीस आयुक्त यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ४ (क) च्या तरतुदीनुसार अटकेच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक १६/०१/२०२३ पासून शासन आदेश दिनांक १८/०१/२०२३ अन्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ खाली विभागीय चौकशी सुरू करण्यात येत आहे.

पोलीस ठाणे सिटी चौक येथे दाखल गुन्ह्याचा सखोल तपास करुन आरोपीविरुद्ध दोषारोप क्र. ३२/२०२३ दिनांक २२/०२/२०२३ अन्वये मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट ३ रे, छत्रपती संभाजी नगर यांच्याकडे दोषारोपपत्र सादर केले असून त्याचा आरसीसी नंबर ४९८/२०२३ दिनांक २४/०२/२०२३ असा आहे. सदर खटला सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

******

लक्षवेधी सूचना क्र. २३४९

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. निलेश लंके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २३४९ खालीलप्रमाणे आहे:-**

" माहे फेब्रुवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास वसई-विरार शहर म.न.पा च्या नगर रचना विभागाचे उप संचालक श्री. वाय. शिवारेड्डी यांचे विरोधात तत्कालीन म.न.पा गटनेता त्यांनी तात्कालीन पोलीस निरीक्षक विरार पो.स्टे. विरार (पूर्व) ता. वसई, जि. पालघर यांचे कडे दि. ६ मार्च २०१६, १४ मार्च २०१६ (२ तक्रारी ) १ एप्रिल २०१६, २३ मार्च २०१६ (४ तक्रारी) १० मार्च २०१६, ८ मार्च, २०१६ अश्या सुमारे ८ ते १० लेखी तक्रारी दाखल करणे, सर्व तक्रारी मध्ये उपसंचालक नगर रचना यांनी पदाचा गैर उपयोग करून अनेक विकासकाना जादा बिल्टअप एरिया मंजूर करणे, खोट्या नोंदी करून निमबाह्य FSI वाढवून देणे, DRC नियमांचे उल्लंघन करून बांधकामास परवानगी देणे. दोन विकासकांना एकाच सर्व्हे नंबर वर बांधकामाची परवानगी देताना FSI चा केलेला घोटाळा, आरक्षण असलेल्या जमिनीवर आरक्षण न उठवता बांधकामांना दिलेल्या अवैद्य परवानग्या बेकायदेशीर बांधकामांना विरोधात झालेल्या तक्रारी कडे केलेले अर्थपूर्ण दुर्लक्ष श्री. वाय शिवारेड्डी यांची नेमणूकच बेकायदेशीर झालेल्या असणे, ई असंख्य पुरावे देऊन फौजदारी गुन्हे दाखल करण्याची वारंवार केलेली विनंती, तात्कालीन पोलीस निरीक्षक यांनी या गंभीर तक्रारीची दखल न घेणे,गेल्या ६ ते ७ वर्षात या तक्रारीचा तपास म.न.पा च्या सहाय्याने करण्यात न येणे, या मुळे वसई- विरार म.न.पा मध्ये बेकायदेशीर बांधकाम करण्याचे वाढलेले प्रमाण, म.न.पा क्षेत्रातील शेकडो नागरिकांनी पोलीसांकडे वाय शिवारेड्डी यांचे विरोधात केलेल्या तक्रारीकडे हेतून: अर्थपूर्ण होत असलेल्या अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे नागरिकांचा पोलीस प्रशासना वरील उडालेला विश्वास व पोलीस प्रशासनाच्या संशयास्पद "वागणुकीमुळे निर्माण झालेली तीव्रचीड व संताप,तसेच गेल्या ८ वर्षात या प्रकरणी जबाबदार असलेल्या सर्व पोलीस निरीक्षक व अन्य अधिकार्यांनी तपासात केलेले हेतुत: दुर्लक्ष,या बाबत शासनाने तातडीने करायवाची कार्यवाही व प्रतिकिया."

### मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नगर रचना विभागात श्री.वाय.एस. रेड्डी हे उप संचालक पदावर कार्यरत आहेत.

तथापि, गृह विभागामार्फत उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार प्रस्तुत लक्षेवधी सूचनेत उल्लेखित सन २०१६ च्या तक्रारीबाबत पोलीस उप आयुक्त, विरार यांच्यामार्फत माहिती उपलब्ध करुन घेण्यात आली आहे त्यानुसार सदर तक्रारी नोंदणींचा रजिस्टर कालावधी ३ वर्षे असल्याने सन २०१७ पर्यंतचा रेकॉर्ड नष्ट झाला असून सदर रेकॉर्ड सबंधित पोलीस स्थानकाच्या अभिलेखात उपलब्ध नाही, तथापि, उपरोक्त तक्रारी प्रशासकीय स्वरुपाच्या आहेत किंवा अन्य याबाबत स्पष्टता येत नाही ही वस्तुस्थिती आहे.

दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांच्याकडून वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सबंधित अधिकाऱ्याविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उक्त माहितीनुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील १० प्रकरणांत सबंधित विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच सदर तक्रारीच्या अनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत कळविल्यानुसार उपरोक्त तक्रारींबाबत महानगरपालिका अनभिज्ञ आहे. अशाप्रकारे खाजगी व्यक्तींकडून हेतुपुरस्सर पोलीस विभागाकडे विविध अधिकाऱ्यांच्या बाबतीत करण्यात आलेल्या तक्रारींमध्ये तथ्य नसल्यामुळे तत्कालीन आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी दिनांक ०८.०२.२०१६ अन्वये जिल्हा पोलीस अधीक्षक, पालघर यांना महानगरपालिकेच्या पुर्वपरवानगी शिवाय महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येऊ नये असे कळविण्यात आले होते.

वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना सन २००९ मध्ये झाली आहे. वसई-विरार परिक्षेत्रात महानगरपालिका स्थापनेपुर्वीपासुन म्हणजेच तत्कालीन सिडको प्राधिकरणापासून बहुतांश अनधिकृत बांधकामे अस्तित्वात आहेत. महानगरपालिका हद्दीत निदर्शनास येणाऱ्या अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण निष्कासन व नियंत्रण याकरिता शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करणे बंधनकारक आहे. तथापि, अशा प्रकारच्या बांधकामांवर / अतिक्रमणावर सातत्याने व नियमितपणे कार्यवाही करण्यात येत असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द प्राप्त होणाऱ्या तक्रारी शासन स्तरावरुन वेळोवेळी सबंधित महानगरपालिकेस पाठविण्यात येत असून त्याबाबत आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्यास आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना यापूर्वीच कळविण्यात आले आहे.

****

एच-१७९ -१अ.

**लक्षवेधी सूचना क्र. २४०७**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. शांताराम मोरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४०७ पुढीलप्रमाणे आहे :-

*"गुन्हे अन्वेषण विभाग छत्रपती संभाजीनगर येथे नुकतीच बदली झालेले आणि नाशिक ग्रामीणचे तत्कालीन पोलीस अधीक्षक श्री सचिन पाटील यांनी नाशिक येथे कार्यरत असताना राष्ट्रीय महामार्ग तीन वरील पिंपळगाव बसवंत टोल नाक्यावर जाण्यासाठी लेन रिकामी ठेवण्यात आली नसल्याने त्यांना राग येऊन त्यांनी टोल नाक्यावरील महिला कर्मचारी यांच्याशी केलेले गैरवर्तन, त्यांना उठवशा काढायला लावून केलेली मारहाण, दारू पिऊन घातलेला धिंगाणा, स्वतःला वाचविण्यासाठी आरटीपीसी चा बागुलबुवा करून महिला कर्मचाऱ्यावर भारतीय दंड संहिता कलम ३५३ ३३२ अन्वये दाखल केलेले गुन्हे सीसीटीव्ही मधील फुटेज उघड होऊ नये म्हणून dvr ची केलेली चोरी, litigation च्या जमिनी देण्याच्या नावाखाली नाशिक ग्रामीण भागातील स्वतःच्या नावे केलेली ८० एकर जमीन, अमलदाराकडून नियमितपणे हप्ता वसुली करून पूर्ण कालावधीत सुमारे शंभर कोटीची केली कमाई व जमवलेली माया, बंगल्यावर दहा महिलांची नेमणूक करून त्यांच्याकडून दारूचे पेग भरून घेणे, त्यांच्याशी अंगलट करणे, मुलाची शी साफ करून घेणे, अधिकारी कर्मचारी यांच्या बदली करण्यासाठी घेतलेले दोन ते पाच लाख रुपये, स्वतःचे जिल्हा बदलीचे प्रकरण चव्हाट्यावर येऊ नये म्हणून ५७ वर्षाच्या महिला कर्मचाऱ्यावर भारतीय दंड संहिता कलम ४२० व ४६५ अन्वये दाखल केलेले गुन्हे, तसेच इगतपुरी तालुक्यातील आदिवासींच्या शिधावाटप दुकानावर बेकायदेशीरपणे कारवाई करून आदिवासी लोकांना जातीवाचंक केलेली शिवीगाळ, या प्रकरणी नाशिक येथील न्यायालयात त्यांच्याविरुद्ध ॲट्रॉसिटी खाली दाखल झालेले गुन्हे, तसेच पोलिस उप आयुक्त, ठाणे येथे पदाचा गैरवापर करून सृष्टी को ऑ. हौ. सो., कोलबाड, ठाणे येथील पदाधिकाऱ्यांवर खोटे व चुकीचे गुन्हे दाखल केल्या प्रकरणी चौकशी करून कार्यवाही करण्या बाबत मुख्यमंत्री, अतिरिक्त सचिव, गृह विभाग, पोलिस महासंचालक यांचेकडे केलेल्या लेखी तक्रारी, उपरोक्त सर्व प्रकरणी त्यांची विभागीय चौकशी होऊन पुढील कार्यवाहीसाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठविलेला अहवाल तथापि त्यावर अध्यापही न करण्यात आलेली कारवाई, त्यामुळे पोलीस विभागात व जनतेत पसरलेली असंतोषाची भावना, अशा अधिकाऱ्यांमुळे जनतेचा पोलीस विभागावरील उडालेला विश्वास, अशा मनमानी करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता आणि ज्या लोकांवर अन्याय केला आहे त्यांना न्याय मिळवून देण्याची गरज, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

**मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

श्री. सचिन पाटील हे भारतीय पोलीस सेवेतील सन २००६ च्या बॅचचे महाराष्ट्र कॅडरचे अधिकारी आहेत. ते दिनांक ९ ऑगस्ट २०१४ ते १६ मे २०१६ या कालावधीत पोलीस उपायुक्त, ठाणे पोलीस आयुक्तालय व दिनांक २० सप्टेंबर २०२० ते २१ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण या पदांवर कार्यरत होते. सध्या श्री. सचिन पाटील हे पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, छत्रपती संभाजी नगर येथे कार्यरत आहेत.

प्रस्तुत लक्षवेधी सूचनेमध्ये ६ घटनांचा समावेश आहे. त्या पुढीलप्रमाणे आहेत :-

१) पिंपळगाव बसवंत टोलनाका प्रकरण.

२) नाशिक ग्रामीण भागातील ८० एकर जमीन गैरव्यवहार व इतर आक्षेप.

३) नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस अंमलदार यांच्या बदल्यांमधील भ्रष्टाचार प्रकरण.

४) जिल्हा बदली प्रकरणाच्या अनुषंगाने कर्मचा-यांवर दाखल झालेले गुन्हे प्रकरण.

५) इगतपुरी तालुक्यातील आदिवासींच्या शिधावाटप दुकानांवर केलेली बेकायदेशीर कारवाई प्रकरण

६) पोलीस उपायुक्त, ठाणे येथे पदाचा गैरवापर करुन सृष्टी को.ऑ.हौ.सो., कोलबाड ठाणे येथील पदाधिका-यांवर खोटे व चुकीचे गुन्हे दाखल केल्याबाबतचे प्रकरण.

**घटनावार विश्लेषण**

पिंपळगाव बसवंत टोलनाका प्रकरणी श्री. सचिन पाटील, पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांच्याकडून अशोभनीय वर्तन झाल्याचा व त्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन आपले अधिनस्त असलेल्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांना चुकीचे आदेश देऊन गुन्हे दाखल करुन गंभीर गैरवर्तन केले आहे, असा निष्कर्ष काढून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्याची व त्यांच्यावरील दोषारोप हे गंभीर स्वरुपाचे असल्याने अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६९ मधील नियम ३ (१) अन्वये त्यांना शासन सेवेतून निलंबित करण्याची शिफारस पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक १९/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास केली होती. त्यानुषंगाने श्री. सचिन पाटील, पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांना तात्काळ प्रभावाने शासन सेवेतून निलंबित करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. दरम्यान, श्री. सचिन पाटील, भा.पो.से. यांनी मा. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणात मूळ अर्ज क्र. ८०२/२०२२ अन्वये याचिका दाखल केली असून या याचिकेमध्ये मा. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणाने दिनांक ३०/०९/२०२२ रोजी "parties to maintain status quo" असे आदेश देऊन परिस्थिती "जैसे थे" ठेवण्याचे आदेश दिले आहेत. सदर प्रकरणात दिलेला "status quo" रद्द करण्यासाठी मा. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणास विनंती करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरण मा. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणात प्रलंबित आहे.

नाशिक ग्रामीण भागातील ८० एकर जमीन गैरव्यवहार व इतर आक्षेप या प्रकरणी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अहवालानुसार त्यांच्या कार्यालयातील अभिलेखावर याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

नाशिक ग्रामीण जिल्ह्यातील पोलीस अंमलदार यांच्या बदल्यांमध्ये भ्रष्टाचार झाल्याबाबत खोट्या नावाने एक निनावी तक्रार अर्ज पोलीस उप महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांच्याकडे प्राप्त झाला होता. त्यावर पोलीस उप महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांनी प्राथमिक चौकशी केली आहे. प्राथमिक चौकशीत श्री. सचिन पाटील, तत्कालिन पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांची कसूरी दिसून येत असल्याचे नमूद करुन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यासाठीचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाने शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने श्री. सचिन पाटील, तत्कालिन पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांच्याकडून चौकशी अहवालातील मुद्यांबाबतचा खुलासा मागविण्यात आला आहे.

जिल्हा बदली प्रकरणासंदर्भात बाहेरील घटकांमधून नाशिक ग्रामीण घटकात आंतरजिल्हा बदलीने बदलीवर येऊ इच्छिणाऱ्या २१ अंमलदारांनी त्यांची स्वत:ची अथवा त्यांच्या नातेवाईकांच्या

उपचारांची बनावट वैद्यकीय कागदपत्रे बनविल्या प्रकरणी नाशिक तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदणी क्र. १५१/२०२२, कलम ४२०, ४६८, ४७१, ४६७, १२० (ब), ३४ भारतीय दंड विधान संहिता प्रमाणे दाखल करण्यात आला होता. सदर घटना पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या हद्दीत घडलेली असल्याने सदर गुन्हा दि. ०७/०२/२०२३ रोजी गुन्ह्याच्या मूळ कागदपत्रांसह पुढील तपासासाठी पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्याकडे वर्ग करण्यात आला असून पुढील तपास नाशिक शहर पोलीस करीत आहेत.

इगतपुरी तालुक्यातील आदिवासींसाठी असलेल्या शिधावाटप दुकान क्रमांक १११ गडगड सांगवी येथे वितरण करण्यासाठी ठेवलेले ३२ कट्टे तांदुळ व १ कट्टा गहू असे धान्य रेशनदुकानदार हे काळ्या बाजारात विक्रीसाठी नेतांना दिसून आल्याने प्राप्त झालेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदणी क्र.१२९/२०२२, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ प्रमाणे संबंधितांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा दाखल करताना आरोपीचे पती यांचा संबंधित पोलीस निरीक्षक यांच्याशी झालेल्या वादावरुन व्यथित होवून आरोपीच्या पतीने मा. अपर जिल्हा सत्र न्यायालय - २, नाशिक यांचे न्यायालयात सीआरपीसी क्र.१५६ (३) प्रमाणे तक्रार दाखल केली होती. त्यानुषंगाने मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार वाडीव-हे पोलीस ठाणे येथील तत्कालिन पोलीस अधीक्षक, व इतर ६ यांचेविरुध्द फिर्यादीस जातीवाचक शिवीगाळ करुन, पदाचा गैरवापर करुन सार्वजिक ठिकाणी अपमानित करुन हाकलून दिल्याबाबत गुन्हा नोंदणी क्र.१९६/२०२२, कलम १९३, २०३, २०५, २१९, २२०, ३२३, ५०४, ३४ भारतीय दंड विधान संहिता सह अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, १९८९ च्या कलम क्र. ३ (१) (पी) (क्यु) (आर) (एस) प्रमाणे दि. ३०/११/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणातील आरोपींनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे एफ. आय. आर. रद्द करण्यासाठी दाखल केलेल्या याचिकेमध्ये मा. न्यायालयाने तपास चालू ठेवून आरोपींताविरुद्ध कोणतीही कठोर कारवाई न करणेबाबत व दोषारोप मा. न्यायलायाच्या पुर्वपरवानगीने दाखल करणेबाबत आदेशित केले असल्यामुळे या प्रकरणी कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. सदर गुन्हयाचा तपास उप विभागीय पोलीस अधिकारी, मालेगांव ग्रामीण विभाग हे करीत आहेत.

दिनांक ०९/०१/२०१६ रोजी फिर्यादी यांनी त्यांच्या कार पार्किंगच्या जागेवर सिमेंट पिलरला लोखंडी साखळ्या लावून त्यांची मोटार गाडी पार्क करण्यास प्रतिबंध केल्याबाबतच्या तक्रारीवरुन सोसायटीचे सचिव, अध्यक्ष व खजिनदार यांचेविरुध्द ठाणे पोलीस आयुक्तालयाअंतर्गत राबोडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. II ०२/१६, कलम ४४७, ३४ भारतीय दंड विधान संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याच्या तपासामध्ये फिर्यादी व सोसायटी सभासद यांनी तक्रारीत नमूद केलेला वाद हा दिवाणी स्वरुपाचा असल्याने सदर वाद दिवाणी न्यायालयातून सोडविणे अपेक्षित असतांना फिर्यादी यांनी त्यांना पार्किंगचे हक्क खरेदी खतामुळे प्राप्त झाले आहेत या गैरसमजुतीतून हा गुन्हा दाखल केल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे दि.३०/०९/२०१६ रोजी मा. मुख्य महानगर न्यायदंडाधिकारी, मुख्य न्यायालय, ठाणे यांचे न्यायालयात गुन्हयाची "क" समरी अहवाल सादर करुन गुन्ह्याची निर्गती करण्यात आलेली आहे. सदर गुन्हा दाखल करणेबाबत तत्कालिन पोलीस उप आयुक्त यांनी पदाचा गैरवापर केल्याप्रकरणी कोणतेही तक्रारी अर्ज प्राप्त झाले नसल्याचे पोलीस महासंचालक कार्यालयाने कळविले आहे.'

*********

लक्षवेधी सूचना क्र.१२५

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

मा.श्री.रोहित पवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

कुकडी प्रकल्पासाठी कर्जत तालुक्यातील एकूण ११० भूसंपादन प्रस्ताव असून प्रस्तावांपैकी ९० भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात सादर असणे, तसेच कर्जत तालुक्यातील मौजे राक्षेवाडी करपरडी व कोरेगाव तीन प्रस्तावांकरिता १५ कोटी रुपये निधी महामंडळाकडे प्रलंबित असून काळेची वाडी, कुळधरण, आळसुंदे, देशमुख वाडी, चिलवडी येथील पाच प्रस्ताव स्पेशल इम्पॅक्ट असेसमेंट मधील कलम १० क अंतर्गत प्रलंबित प्रस्तावांवर कुठलीही कारवाई केलेली नसणे, भूसंपादनाचा निधी वाटप व आपापसातील संमतीवादामुळे वेळ लागणे, परिणामी कुकडी यंत्रणेमार्फत थेट खरेदीच्या प्रस्तावांमध्ये मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित असणे, भूसंपादन प्रक्रिया पूर्ण होऊनही प्रकल्पग्रस्तांना अद्याप त्यांच्या जमिनींचा मोबदला न मिळाल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये पसरलेली असंतोषाची व नाराजीची भावना, कुकडी प्रकल्पातील भुसंपादन केलेल्या प्रकल्पग्रस्तांना तातडीने मोबदला देण्याची होत असलली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

कुकडी प्रकल्पाकरीता भूसंपादनाबाबत कर्जत तालुक्यातील एकूण ११ भूसंपादन प्रस्ताव व ५५ थेट खरेदी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेकडे प्राप्त झाले.

सदर ११ भूसंपादन प्रस्ताव प्रकरणी नमूद करण्यात येते की, भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम १० क, प्रकरण २ व ३ च्या तरतूदी लागू करण्यापासून सूट देणारी अधिसूचना प्रकाशित करण्याबाबतचे ११ प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आले. त्यापैकी एकूण १० प्रकरणी अधिसूचना प्रकाशित करण्यात आली व त्यापैकी ७ प्रकरणी कलम ११ ची अधिसूचना प्रकाशित करण्याची कार्यवाहीत आहे, व ३ प्रकरणी निवाडा पूर्ण करण्यात आला आहे. उर्वरीत १ प्रकरणी कलम १० क ची अधिसूचना बाबत कार्यवाही प्रस्तावित आहे. काळेची वाडी, कुळधरण, आळसुंदे, देशमुख वाडी, चिलवडी या ५ गावांकरीता कलम १० क ची अधिसूचना शासन स्तरावर प्रकाशित होऊन उपविभागीय अधिकारी, कर्जत यांच्या स्तरावर कलम ११ ची अधिसूचना प्रकाशित करण्याची कार्यवाही चालू आहे.

थेट खरेदीचे प्रस्ताव प्रकरणी नमूद करण्यात येते की, एकूण ५५ प्रस्तावापैकी २२ प्रस्तावास जिल्हास्तरीय समितीने मान्यता दिली आहे. ८ प्रस्तावाबाबत मुल्यांकन प्रस्ताव जिल्हास्तरीय

समितीपुढे सादर करण्याची कार्यवाहीत आहेत. ६ प्रस्तावाबाबत मुल्यांकन निश्चितीची कार्यवाही चालू आहे. ४ प्रस्तावाबाबत वृत्तपत्रात नोटीस काढण्याच्या कार्यवाहीत आहेत. ३ प्रस्तावाबाबत भूसंपादन अधिकारी नियुक्त करण्याची कार्यवाही चालू आहे. १२ प्रस्ताव त्रुटी पुर्ततेसाठी यंत्रणेकडे परत पाठविण्यात आले आहेत. मौजे राक्षेवाडी, करपरडी व कोरेगाव या तीन गावांचे थेट खरेदी प्रस्तावाबाबत मूल्यांकन करुन संपादक संस्थेला पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. त्याअनुसार थेट खरेदीचा नोंदणीकृत खरेदी दस्त करुन मोबदला देणे ही कार्यवाही संपादक संस्था म्हणून कुकडी प्रकल्प यंत्रणे मार्फत कार्यवाही त्यांचे स्तरावर चालू आहे.

अधिनियमानुसार भूसंपादन कार्यवाही करून निवाडा घोषित केल्यानंतर मोबदला वाटप करण्यात येतो. थेट खरेदी धोरणानुसार मोबदला वाटप हे खरेदी खत झाल्यानंतर संपादक संस्थेकडून अदा केले जाते.

कुकडी प्रकल्प यांचेकडून सलग चारीचे थेट खरेदीचे प्रकरण एकाच वेळेस न पाठविता वेगवेगळया ठिकाणाची वेगवेगळी तुकडयामध्ये प्रकरणे पाठविली जातात. तसेच मोबदला निश्चितीनंतर शेतकरी यांचेमध्ये संमती होत नाही. त्यामुळे थेट खरेदीची प्रक्रिया पुर्ण होण्यास मर्यादा येते व परिणामी भूसंपादन प्रक्रिया तशीच प्रलंबित राहते.

मा.मंत्री महसूल यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३.०९.२०२२ रोजी सहयाद्री अतिथी गृह येथे अहमदनगर जिल्ह्यातील कुकडी प्रकल्पातील प्रलंबित भूसंपादनाबाबत झालेल्या बैठकीमध्ये थेट खरेदीऐवजी भूमी संपादन पुनर्वसन व पुनः स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये करण्याबाबत एकमत झाले. त्याअनुसार अधिक्षक अभियंता, कुकडी यांना जिल्हाधिकारी, अहमदनगर पत्र दिनांक ०४.१०.२०२२ अन्वये व दि.१२.१२.२०२२ रोजी बैठकीत थेट खरेदी ऐवजी भूमी संपादन पुनर्वसन व पुनःस्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत भूसंपादनाचे प्रस्ताव सादर करण्यासंदर्भात अभिप्राय सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. संपादन संस्था / अधिक्षक अभियंता, कुकडी यांचेकडून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत भूसंपादन प्रक्रिया तातडीने पुर्ण करण्याची तजवीज ठेवली आहे.

**************************

लक्षवेधी सूचना क्र.१२२६

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. निलेश लंके. मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"माहे जानेवारी २०२३ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या सुमारास, तहसीलदार कार्यालय, वसई (जि.पालघर) यांनी ३ मे २०२१ रोजी सतीश जमनादास दत्ताणी, रा.सांडोर, ता.वसई, जि.पालघर या विकासक तसेच जागा मालक यांना त्यांच्या मालकीच्या वसई येथील सर्वे नं.२५२ अ, २५२ ब, २५५ अ, २५६/२ व ४, २५७ हि.नं.२/१, ३, ४, ५, १०/१ व ११ व सर्वे नं.२५८, २५९, २८४ या ठिकाणी करण्यात आलेली खोदाई, गौण खनिज खोदण्यास शासनाने दिलेल्या परवानगीचे उल्लंघन करुन हजारो ब्रासची बेकायदेशीररित्या खोदाई झाल्याच्या विरोधात उपविभागीय अधिकारी, वसई यांचेकडे दि.२/११/२०१९ रोजी करण्यात आलेली लेखी तक्रार, अनुषंगाने मंडळ अधिकारी, माणिकपूर यांनी दि.१७/११/२०१९ रोजी तक्रार अर्जात नमूद केलेली मोजमाप घेऊन बेकायदेशीरपणे गौण खनिजाचे उत्खनन झाल्याचे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन आपला अहवाल दि.४/१२/२०१९ रोजी वरिष्ठांना सादर करणे, त्यानंतर जागा मालकाच्या घेतलेल्या आक्षेपानुसार दि.४/२/२०२० रोजी निवासी नायब तहसीलदार, वसई आणि मंडळ अधिकारी, माणिकपूर यांनी संयुक्तपणे तक्रारीत नमूद केलेल्या जागेचे मोजमाप घेऊन आपला पुर्नरपाहाणी अहवाल सादर करणे, त्यानंतर सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होऊन दि.३/५/२०२१ रोजी तहसीलदार, वसई यांनी सतीश जमनादास दत्ताणी, रा.सांडोर, यांना १५,९१७ ब्रास मातीचे बेकायदेशीर उत्खनन केल्याबद्दल पाचपट दंडाची रक्कम धरुन ८ कोटी ७७ लाख ७० हजार इतकी रक्कम शासनाकडे जमा करावी असे दिलेले लेखी आदेश, सदर आदेश देऊन १७ ते १८ महिने झाले तरीही जमीन मालक सतीश जमनादास दत्ताणी यांनी शासनाकडे दंडाची रक्कम दिलेल्या लेखी मुदतीत वा नंतर जमा न करणे, तहसीलदारांनी शासनातील नियमानुसार दंड जमा झाला नाही म्हणून जागा मालका विरोधात करावयाची कारवाई करण्यास केलेली अक्षम्य दिरंगाई व हेळसांड, यामुळे महसुल विभागाच्या कारभारा विरोधात सामान्य जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

मौजे सांडोर ता. वसई येथील स.नं.२५२अ, २५५अ, २५६/२ व ४, २५७ हि.नं. २/१, ३, ४, ५, १०/१ व ११ व स.नं.२८४अ या जमीनीत माती उत्खनन होत असल्याबाबतची तक्रार दिनांक ०२.११.२०१९ रोजी उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, वसई यांना लेखी स्वरुपात प्राप्त झाली. सदर, तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी

माणिकपूर यांनी मोजमाप घेऊन तहसिलदार वसई यांना दि.०४.१२.२०१९ रोजी अहवाल सादर करुन मौजे २५२/अ, २५५अ, २५६/२ व ४, २५७/२/१, ३, ४, ५, १०/१ व ११ व २८४ या जमीनीत एकूण ११३४८ ब्रास माती उत्खनन केल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.

त्याअनुषंगाने तहसिलदार वसई यांनी विकासक व जागा मालक यांना कारणे दाखवा नोटीस दिली. सदर नोटीसानुसार तहसिलदार वसई यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये घेतलेले भरावाचे मोजमाप मान्य नसल्याचे लेखी व तोंडी स्वरुपात कळविण्यात आले.

त्यानुसार दिनांक ०४/०२/२०२० रोजी निवासी नायब तहसिलदार वसई यांनी मंडळ अधिकारी माणिकपुर यांचे समवेत मौजे सांडोर येथील स.नं. २५५अ २५२अ २५६/२, २५६/४, २५७/२/१, २५७/३, २५७/४, २५७/५, २५७/१०/१, २५७/११ या जागेचे पुनश्च मोजमाप केले असता सदर जागेत एकुण एंकदर १७,९१७.३६ ब्रास माती उत्खनन झाल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. यांनुसार जागा मालक यांना आपले म्हणणे दाखल करणेकामी वेळोवेळी सुनावणी घेणेत आलेली आहे. व प्रकरण हे निर्णयाकामी बंद करणेत आलेले आहे.

जमीन मालक यांनी वेळोवेळी घेतलेल्या सुनावणीचे वेळी मौजे सांडोर स.नं. २५२ अ या जागेत उपविभागीय अधिकारी, वसई यांचे कार्यालयाकडून २००० ब्रास माती उत्खनन करणेची परवानगी घेतल्याचे कागदपत्र तसेच सदर बांधकाम हे पूर्ण ले-आऊट मध्ये चालु असून त्याची प्रत दाखल केलेली आहे. व वसई विरार शहर महानगरपालिका नुसार स.नं. २५६/२ व ४, स.नं. २५७/२/१, ३,४,५, १०/१ व ११, स.नं. २५५/अ, २५२अ या जागेत मंजुरी दिलेबाबत कागदपत्र दाखल केली आहे. सदरच्या ठिकाणी माती उत्खनन करण्यासाठी विकासकाने उपविभागीय अधिकारी, वसई यांचेकडुन २००० ब्रास माती उत्खनन करुन हस्तांतरण करण्याची परवानगी विकासकाने घेतली होती. त्यानुसार उत्खननधारक यांनी केलेल्या एकुण १७९१७.३६ ब्रास मधुन २००० ब्रास परवानगीची रक्कम वजा जाता उर्वरीत १५,९१७.३६ एवढे ब्रास माती उत्खनन हे विनापरवाना केलेले दिसून आल्याने महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७) अन्वये मौजे सांडोर ता. वसई येथील २५५अ, २५२ व २५५, २५६/२ व २५६/४, २५७/२/१, २५७/३, २५७/४, २५७/५, २५७/१०/१, २५७/११ व २८४ या जागेत अनधिकृतपणे १५,९१७.३६ ब्रास माती उत्खनन केलेबाबत तहसिलदार वसई यांनी दिनांक ०३.०५.२०२१ च्या आदेशान्वये रु. ८,६६,७०,०२५/- अक्षरी (आठ कोटी सहासष्ट लाख सत्तर हजार पंचविस रु. मात्र) इतक्या रक्कमेचे आदेश पारीत केलेले आहे.

तथापि, जमिनमालक यांनी सदर आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय मुंबई येथे रिट पिटिशन नं. २१३७/२०२१ दाखल केलेली असून प्रस्तूत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

*************

लक्षवेधी सूचना क्र.२३३१

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**मा.श्री.तान्हाजी मुटकुळे, सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३३१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मौ. बळसोंड (ता. जि. हिंगोली) येथील जुना शेत सर्वे क्रमांक ४ नवीन गट क्रमांक १२ एकूण क्षेत्रफळ ९ हेक्टर ६० आर ही पूर्वी मूळची गायरान जमीन असणे, ही शेत जमीन हिंगोली शहरानजीक असल्यामुळे व बाजार मूल्य जास्त असल्यामुळे काही राजकीय भूमाफियांनी तत्कालीन शासकीय अधिकाऱ्यांशी संगनमत करून सदर जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करून लगेच श्री केशव शेषराव गवळी या व्यक्तीच्या माध्यमातून विक्रीची परवानगी घेणे व त्या आधारे शासकीय जमीन बळकावणे, सदर जमीन भोगवटदार वर्ग २ असून सुद्धा या जमिनीवर अनाधिकृत व विनापरवाना इमारत बांधकाम करून शैक्षणिक संस्थेस भाडेतत्त्वावर देणे, परिणामी सदर प्रकरणी शर्तभंग होणे, याप्रकरणी विधानसभेत दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी लक्षवेधी सूचना उपस्थित केली असता तत्कालीन महसूल मंत्री महोदयांनी सदर प्रकरणी शर्तभंग झाल्याचे मान्य करून संपूर्ण जमीन शासन जमा करण्याबाबतचे आश्वासन देणे, परंतु अद्यापही ८ हे ८० आर जमीन शर्तभंग करणारी व्यक्ती श्री केशव शेषराव गवळी यांचे नावे असणे, सदर जमीन बेकायदेशीर रित्या हडप केल्याप्रकरणी मूळ लाभार्थ्यांनी श्रीमती सखुबाई भीमराव पाईकराव व इतर सर्व यांनी माहे फेब्रुवारी ,२०२३ मध्ये वा त्या सुमारास आमरण उपोषण करणे व जमीन परत देण्याबाबत प्रशासनास विनंती करणे. परंतु याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होणे, याप्रकरणी शासनाने तात्काळ सदर संपूर्ण शेतजमीन शासन जमा करून मूळ लाभार्थ्यांना देण्याबाबत व दोषींना कठोर शिक्षा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

## मा. मंत्री महोदयांचे निवेदन

मौजे बळसोंड येथील जुना शेत स. न. ४, नविन गट क्र. १२ मधील सरकारी गायरान जमिनीवर असलेले अतिक्रमण तहसिलदार हिंगोली यांचे कार्यालयीन आदेश दि.२७/३/१९९२ अन्वये कृषी प्रयोजनासाठी एकुण १४ व्यक्तींना उपजिवेकेसाठी प्रत्येकी ०.८० आर असे एकुण ११.२० हे.आर.जमिनीवरील अतिक्रमण नियमित केले होते.

सदर १४ अतिक्रमण धारकांपैकी एकूण १० जणांनी त्यांचे नावे असलेली गट क्र.१२ मधील ९.६० हेक्टर आर जमीन कृषी प्रयोजनार्थ विक्री करण्याची परवानगी मागितली असून सदर विनंतीचे अनुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे कार्यालयीन आदेश क्र.२००३/मशाका२/ आरईव्ही/प्र.क्र./९२ दिनांक १७/०५/२००५ अन्वये परवानगी दिली होती.

उक्त प्रकरणातील गायरान जमिनीबाबत नरेंद्र शास्त्री शेवाळीकर, दत्तगड ध्यानमंदीर,बळसोंड ता.जि.हिंगोली यांनी मा.राज्यमंत्री (महसूल) महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे न्यायालयात विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे आदेश क्र.२००३/ मशाका२/ आरईव्ही/प्र.क्र./९२ दिनांक.१७/०५/२००५ रोजीच्या नाराजीने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम २४८ नुसार अपील दाखल केले होते.

सदर अपीलाचे प्रकरणात मा.राज्यमंत्री (महसूल) महाराष्ट्र शासन यांनी दिनांक.२०/१०/२०१० रोजी 'विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे कार्यालयाचे आदेशातील दिनांक ०८/०९/१९८३ चे शासन निर्णयानुसार व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व उपबंध परिच्छेद ७८ व ८१ मधील तरतुद व

अटीशर्तीनुसार अनर्जित प्राप्तीची रक्कम रुपये ४,२४,८००/- इतकी निश्चित करुन दिनांक १७/०५/२००५ च्या अन्वये मौजे बळसोंड ता.जि.हिंगोली येथील ९.६० हे.आर इतकी जमीन श्री.केशव शेषराव गवळी रा.पारोळा यांना विक्री करण्यासाठी परवानगी देण्यात आलेले आदेश कायम करण्यात येतो' असे आदेश पारीत केले आहेत.

या प्रकरणी विधानसभेत दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचनेच्या अनुषंगाने तत्कालीन मा. महसूल मंत्री यांनी निवेदन केले की, " विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दि.१७/०५/२००५ या आदेशान्वये मौजे बळसोंड ता.जि.हिंगोली येथील गट क्र.१२ क्षेत्र ९.६० हे.आर. ही जमिन श्री.केशव गवळी यांना विक्री करण्याची परवानगी दिली आहे. सदर जमीन विक्री केल्यानंतरही भोगवटदार वर्ग -२ धारणाधिकारावर धारण केलेली आहे. श्री. केशव शेषराव गवळी यांनी दि.२१/०७/२०१४ रोजी जिल्हाधिकारी हिंगोली कार्यालयास विकत घेतलेल्या ग.क्र.१२ मधील ९.६० हे.आर.क्षेत्रापैकी ८० आर जमिनीचा शैक्षणिक प्रयोजनासाठी वापर करण्यासाठी परवानगी मागितली आहे.परंतु अशी परवानगी अद्याप देण्यात आलेली नाही. श्री.गवळी यांनी परवानगीची वाट न पहाता सदर ग.क्र.१२ मध्ये इमारतीचे बांधकाम केलेले असून या इमारतीमध्ये आज रोजी पोदार इंटरनॅशनल स्कूल या नावाने शाळा सुरु असून सदर इमारत उक्त शाळेस भाडेतत्वावर दिल्याचे स्थानिक चौकशीमध्ये आढळून आले आहे. श्री.केशव शेषराव गवळी यांनी सदर जमिनीवर इमारत बांधकाम करुन उक्त शैक्षणिक संस्थेस भाडयाने दिले असल्याने सदर प्रकरणी शर्तभंग झाला असून त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे."

श्री.केशव गवळी यांनी मौजे बळसोंड ता.जि.हिंगोली येथील गट क्र.१२ क्षेत्र ९.६० हे.आर. या जमिनी पैकी गट क्र.१२ क्षेत्र ०.८० आर मौजे बळसोंड या जमिनीचा अनाधिकृतपणे अकृषीक वापर केल्यामुळे शर्तभंग झाला असल्याने लक्षवेधी सुचना क्र.१०२४५ मध्ये मा.महसूल मंत्री महोदय यांनी दिलेल्या उत्तरानुसार तहसिलदार,हिंगोली यांनी दिनांक १६/०६/२०१७ रोजी आदेश पारीत करुन ग. क्र.१२ क्षेत्र ०.८० आर मौजे बळसोंड या जमिनीचे ७/१२ वर महाराष्ट्र शासन अशी नोंद घेण्यात आली आहे. सदरील जमिनीवर अस्तित्वात असलेल्या इमारतीचे भाडे तत्वावर पोदार इंटरनॅशनल स्कुल असून सदर इमारत कायद्याच्या विहीत प्रक्रियेनुसार ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु होती. या प्रकरणी मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद रिट पिटीशन क्र.५७५२/२०१७-KESHAV SESHERAO GAVALI V/S THE STATE OF MAHARASHTRA AND OTHERS प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७/०४/२०१७ रोजी अंतरीम आदेश पारीत केला असून त्यामधील परिच्छेद क्र.२. मध्ये पुढील प्रमाणे आदेशीत केले आहे. "In the meanwhile, the building which is being utilized for school shall not be demolished and not to takeover possession of the property without following due process of law." सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ असून पुढील आदेश प्राप्त झाल्यानंतर आदेशाप्रमाणे कार्यवाही अनुसरण्यात येईल.

मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेश दिनांक.२७/०४/२०१७ नुसार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगोली यांनी पोदर इंटरनॅशनल स्कूल यांचेकडून भाडे मुल्यांकन अहवाल दिनांक १६/०२/२०२२ नुसार जिल्हाधिकारी हिंगोली यांचे आदेश दिनांक १९/०५/२०२२ नुसार दरमहा २,३०,४१०/- प्रमाणे वसूल करण्यास तहसिलदार हिंगोली यांना आदेशीत केले होते.

तहसिलदार, हिंगोली यांनी दिनांक २९/०७/२०२२ रोजी नुसार रुपये १४७४६२४२/- भाडे थकबाकी भरण्याबाबत पोदार इंटरनॅशनल स्कुल यांना नोटीस दिली होती. ती नोटीस पोदार इंटरनॅशनल स्कुल यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ , औरंगाबाद येथे रिट पिटीशन नं.८२७९/२०२२ पोदार इंटरनॅशनल स्कुल विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर अशी रिट याचिका दाखल करुन आव्हानीत केली आहे. प्रकरणात मा.उच्च न्यायालय खंडपीठ , औरंगाबाद यांनी दिनांक.१२ ऑगस्ट २०२२ रोजी अंतरीम स्थगिती दिली असून

आदेशामधील परिच्छेद क्र.६ मध्ये पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत. "In view of the above statement , the impugned order dated २९.०७.२०२२ shall stand stayed and the Respondents would refrain from initiating coercive steps against the petitioner until further orders in this matter." सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ असुन पुढील आदेश प्राप्त झाल्यानंतर आदेशाप्रमाणे कार्यवाही अनुसरण्यात येईल.

सदर जमीनधारक यांनी माहे ऑगस्ट २०२२ मध्ये मौजे बळसोंड ता.जि.हिंगोली येथील गट क्र.१२ क्षेत्र ९.६० ह.आर.जमीन श्रीमती सखुबाई भिमा पाईकराव व इतर रा.बळसोंड ता.जि.हिंगोली यांनी त्यांचे नांवे असलेली जमीन हडप केल्याने आमरण उपोषण करणे व जमीन परत देण्याबाबत प्रशासनास विनंती केली आहे.

प्रकरणातील श्रीमती सखुबाई भिमराव पाईकराव व इतर (११) रा.बळसोंड यांनी त्यांचे नांवे असलेली गट क्र.१२ मधील ९.६० हेक्टर आर जमीन कृषी प्रयोजनार्थ विक्री करण्याबाबत दिनांक ०८/०१/२००३ रोजी विनंती केली होती. श्रीमती सखुबाई भिमराव पाईकराव व इतर (११) रा.बळसोंड यांनी दिनांक१०/०४/२००३ रोजी ७५% नजराणा भरण्यासाठी प्रतिज्ञापत्र रुपये २०/- नुसार ७५% रक्कम भरण्यास तयार असल्याचे सादर केले आहे. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दिनांक ०७/०३/२००५ रोजी सादर केले. यावरुन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे कार्यालयीन आदेश क्र.२००३/मशाका२/ आरईव्ही/प्र.क्र./९२ दिनांक १७/०५/२००५ नुसार गायरान विक्रीची परवानगी असून त्यात कोणताही शर्तभंग झालेला नाही. त्यामुळे उपोषणार्थी यांची मागणी अवास्तव असून याप्रकरणी कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

**********

लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" बृहन्मुंबई दूध योजनेच्या माध्यमातून आरे, वरळी, कुर्ला या शासकीय दूध डेअरीतर्फे माहे फेब्रुवारी २०२२ पासून दूध पुरवठा बंद केल्यामुळे मुंबईभर दुध वितरण करणारे १८०० स्टॉलधारक आणि त्यास संलग्न असलेले वितरकांवर उपासमारीचे व बेकारीचे संकट कोसळल्याचा प्रकार दि.१०.०२.२०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, आरे दुध व दुग्धजन्य पदार्थ तसेच आरेची सहउत्पादने तातडीने उपलब्ध करणे, केंद्र संचालकाने आगाऊ भरणा केलली दुध विक्रीची रक्कम परत करणे, आणि थकीत रक्कमेबाबत निर्णय घेऊन निपटारा प्रमाणपत्र द्यावे, केंद्र संचालकाकडून वसून केलेले भुईभाडे तातडीने महापालिकेकडे जमा करणे, केंद्र चालकाच्या वारसाच्या किंवा मदतनिसाच्या नावावर केंद्र हस्तांतरीत करण्याबाबतच्या मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र दुध वितरक संघटनेने दि.७.९.२०२२ रोजी व यानंतर दि. १०.२.२०२३ रोजी मा. दुग्ध विकास मंत्री महोदयांना देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, राज्य शासनाच्या उपरोक्त तीन दूध डेअऱ्या बंद करून त्या डेअरींची कोट्यावधी रुपये किमतीची जागा खाजगी विकासकास विक्री करण्याचे षडयंत्र रचल्याची धक्कादायक बाब उघड होणे, सदरहू जागा विकासकास देण्यासाठी राज्य शासनातील उच्च अधिकाऱ्यांनी शासकीय दूध वितरण बंद करुन व सदरहू दुध संस्था आर्थिकदृष्ट्या तोट्यात आणून बंद करण्यासाठी कार्यवाही करुन खाजगी दुध संस्थांचा व्यवसायास चालना देऊन नफेखोरी करण्याचा घडलेला गंभीर प्रकार, सदरहू प्रकरणी तातडीने गंभीर दखल घेऊन शासनाच्या तीन्ही दुध डेअऱ्यांचे दुध वितरण व दुग्धजन्य पदार्थ व सहउत्पादने तात्काळ सुरु करून मुंबईकर जनतेस रास्त दरात विशेष ब्रण्डच्या माध्यमातून दुध वितरण करण्यासाठी तसेच स्टॉलधारकांच्या रास्त मागण्या तत्काळ मान्य करण्याच्यादृष्टीने ठोस उपायोजनात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले व होत असलेले शासनाचे अक्षम्य व जाणीवपूर्वक दुर्लक्ष,

परिणामी मुंबईतील १८०० केंद्र चालक आणि मुंबईकर जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया ."

---

**श्री. राधाकृष्ण विखे पाटील, मा. मंत्री (दुग्धव्यवसाय विकास) यांचे निवेदन**

बृहन्मुंबई शहरातील निर्भेळ दूधाची मागणी वाजवी दरात पूर्ण करण्यासाठी सन १९५१ पासून बृहन्मुंबई दुध योजना सुरु करण्यात आली. या योजनेअंतर्गत मुंबई शहर आणि उपनगरात ३ दुग्धशाळा कार्यरत होत्या. सन १९५१ मध्ये मध्यवर्ती दुग्धशाळा आरे ची उभारणी करण्यात आली, युनिसेफ या जागतिक संस्थेच्या सहकार्याने वरळी दुग्धशाळेची माहे नोव्हेंबर १९६१ मध्ये उभारणी करण्यात आली, तसेच सन १९७५ मध्ये मातृ दुग्धशाळा, कुर्ला ची उभारणी करण्यात आली असून सद्य:स्थितीत दूध वितरण बंद आहे.

बृहन्मुंबई दूध योजनेअंतर्गत संकलित केलेल्या दुधावर उपरोक्त दुग्धशाळांमध्ये प्रक्रिया करून मुंबई शहरात वितरीत करण्यात येत होते. सदर दुधाची विक्री करण्यासाठी बृहन्मुंबई कार्यक्षेत्रात एकूण १८११ केंद्रांचे (स्टॉल) विविध व्यक्तींना देण्यात आले होते. कालांतराने दूध व दुग्धजन्य पदार्थांचे झालेल्या कमी विक्रीमुळे बऱ्याचशा लोकांनी केंद्र रद्द करण्याची केलेली विनंती लक्षात घेता ११६ दुध केंद्रे निष्काषित करण्यात आले आहेत. सद्यस्थितीत १६९५ केंद्रे कार्यान्वित आहेत. बृहन्मुंबई दुध योजने अंतर्गत सद्यस्थितीत दुधाचे वितरण होत नसल्याने मुंबई शहर व उपनगरातील आरे स्टॉलवरुन इतर सहकारी संस्था व खासगी दुग्धशाळेची पॅकबंद दुध व दुग्धजन्य पदार्थ विकण्यास परवानगी देण्यात आली आहे.

आरे दूध केंद्रांचा वापर विहित कारणास्तव होत नसल्याबाबतच्या प्राप्त तक्रारी विचारात घेऊन बृहन्मुंबई दुध योजनेअंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या दूध केंद्रांचे सर्व्हेक्षण / तपासणी करण्याकरीता १८ पथके नियुक्त करण्यात आली असून अनधिकृत केंद्रे आढळून आल्यास त्यांच्याविरुध्द मुंबई महानगरपालिके मार्फत निष्कासनाची कारवाई करण्यात येते.

सध्या कार्यान्वित असलेल्या १६९५ पैकी ८२ केंद्र वाटपासाठी उपलब्ध असून सदर केंद्रांचे वाटप करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जाहिरात प्रसिद्ध करून अर्ज मागविले आहेत.

प्राप्त अर्जांची तपासणी झाल्यानंतर तसेच तपासणी पथकामार्फत करण्यात येणाऱ्या तपासणीअंती उपलब्ध आरे केंद्रांची संख्या विचारात घेऊन आरे केंद्रांचे वाटप करण्यात येईल.

दि.२९/७/२०२२ रोजी आरे सरिता केंद्र वाटप नियमावली तयार करण्यात आली आहे. यानूसार आरे सरीता केंद्रांवर अन्य सहकारी व व्यावसायिक संस्थाचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विकण्यास परवानगी आहे. तसेच केंद्र चालक मयत झाल्यास अथवा केंद्र चालविण्यास सक्षम नसल्यास सदर केंद्र, शासनाच्या ताब्यात घेऊन विहित कार्यपध्दतीनुसार पुर्न:वाटप करण्यात येईल. आरे सरीता केंद्र हे १० वर्षाच्या कालावधीसाठी चालविण्यास देण्यात येऊन प्रत्येक ५ वर्षांनी परवान्याचे नुतनीकरण करण्यात येईल. नुतनीकरण करताना परवानाधारक केंद्र चालविण्यास सक्षम असणे आवश्यक राहील. केंद्र चालक सक्षम नसल्यास किंवा मयत झाल्यास सदर केंद्र शासनजमा करण्यात येईल.

..................................

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन
लक्षवेधी सूचना क्र:-२००३

श्री.छगन भुजबळ, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.२००३ पुढीलप्रमाणे आहे :-

"दि.२७ फेब्रुवारी २०२३ रोजी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद म्हणजे एआयसीटीईचे मुंबईतील पश्चिम विभागीय कार्यालय दिल्ली येथे स्थलांतरीत करण्याबाबत परिपत्रक जारी करण्यात आलेली असणे, मुंबई येथील विभागीय कार्यालय पळविल्याने शैक्षणिक संस्था, विद्यार्थ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झालेली असणे, विविध शासकीय विभाग, संस्थांच्या कार्यालयाची पळवापळवी चर्चेचा मुद्दा ठरली असून, यावरून राजकारण पेटलेले असताना नुकताच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने जारी केलेले परिपत्रक वादाच्या भोवऱ्यात सापडलेले असणे, 'एआयसीटीई'च्या वरीष्ठ स्थरावरुन घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मुंबई येथील पश्चिम विभागीय कार्यालय नवी दिल्ली येथे स्थलांतरित करण्यात येत असणे, 'एआयसीटीई'चे एकूण दहा विभागीय कार्यालये देशभरात कार्यरत असणे, त्यापैकी मुंबईतील चर्चगेट परिसरात असलेले सध्याचे विभागीय कार्यालय नवी दिल्ली येथे स्थलांतरित करत असल्याचे परिपत्रक नुकतेच जारी करण्यात आलेले असणे, विशेष म्हणजे संकेतस्थळावर कुठेही हे परिपत्रक अपलोड करण्यात आलेले नसणे, 'एआयसीटीई'अंतर्गत विविध तंत्रशिक्षण शिक्षणक्रम आणि औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम येत असणे, अशावेळी प्रवेश क्षमतेपासून अन्य विविध परवानग्यांशी निगडित बाबी या विभागाअंतर्गत येत असणे, विभागीय कार्यालय स्थलांतरामुळे शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांची गैरसोय होणार असणे, देशाची राजधानी दिल्ली असली तरी आर्थिक राजधानी म्हणून मुंबईची वेगळी ओळख आहे. मुंबई सुसज्ज असतानाही कार्यालय दिल्लीत स्थलांतर करण्याचे नेमके कारण काय, असा प्रश्न शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांकडून उपस्थित केला जात असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**श्री.चंद्रकांतदादा पाटील, मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे निवेदन**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE), नवी दिल्ली ही संस्था केंद्र शासनाच्या शिक्षण मंत्रालयाच्या (मानव व संसाधन विकास मंत्रालय) नियंत्रणाखाली येते. तंत्रशिक्षणाशी संबंधीत शैक्षणिक व सेवाविषयक बाबींचे नियमन करणारी ही शिखर संस्था असून, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर परिषदेचे मुंबई येथील पश्चिम क्षेत्रीय विभागीय कार्यालय दिल्ली येथे हलविण्याबाबतची पूर्वसूचना शासनाकडे प्राप्त झालेली नाही.

तथापि, या संस्थेचे कार्यालय नवी दिल्ली येथे स्थलांतरीत होत असल्यासंदर्भातील बातमी दि.२३/११/२०२२ रोजीच्या "दैनिक भास्कर" या दैनिकात प्रसिध्द झालेली आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या पश्चिम क्षेत्रीय विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व संबंधित घटकांची (All Stake Holders) गैरसोय होऊ नये म्हणून पवई, मुंबई येथील पश्चिम क्षेत्रीय विभागीय कार्यालय दिल्ली येथे हलविण्यात येऊ नये, अशी विनंती तंत्रशिक्षण संचालनालयाने दि.१४/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या कार्यालयास केलेली आहे.

दरम्यान, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या कार्यालयाने त्यांच्या दि.२७/०२/२०२३ च्या नोटीशीव्दारे परिषदेचे पश्चिम क्षेत्रीय कार्यालय दिल्ली येथे स्थलांतरीत करण्याचा निर्णय, सक्षम प्राधिकारी म्हणून त्यांचे स्तरावरुन घेण्यात आल्याचे कळविले आहे.

तसेच महाराष्ट्र व गोवा या राज्यातील आणि दिव, दमण, दादरा व नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील सर्व संबंधित घटकांना (Stake Holders) पुढील पत्रव्यवहार दिल्ली येथील पत्यावर करण्यास कळविलेले आहे.

****

शेटा - एच - ०९५७(७००-४-२३)

**लक्षवेधी सूचना क्र २५२**

## ( सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन )

मा. **श्रीम. नमिता मुंदडा, विधानसभा सदस्य** यांनी विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे-

**"बीड जिल्ह्यातील अनुसूचित जाती/जमातींच्या जि.प. शाळांच्या इत्त ७ व ८ वर्गात शिक्षण घेत असलेल्या मुलींना जिल्हा वार्षिक योजना सन २०१९-२० व २०२०-२१ अंतर्गत विशेष तरतूद म्हणून सायकल खरेदी व शाळांना सौर संच बसवण्यासाठी अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असणे, परंतु शिक्षण विभागातील अधिकारी व कंत्राटदार यांच्या नियोजनाअभावी सदर निधी अखर्चित राहून परत गेला असणे, त्यामुळे जवळपास जिल्ह्यातील १५०० विद्यार्थीनी सायकल पासून व १४२ शाळा सौर संचांच्या लाभापासून वंचित राहिल्या असणे, त्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने दिलेला निधी वेळेत खर्च न करण्यास जबाबदार अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्यावर कार्यवाही करून उक्त निधी सन-२०२२-२३ वर्षात उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका"**

---

### मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

सन २०१९-२० मध्ये जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अनुसूचित जाती जमातींच्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती या योजनेअंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये के.व्ही. ऑफग्रीड सोलर प्लँट बसविणेसाठी शासन मान्यता देण्यात आली असुन त्यानुसार प्रकल्पासाठी रु. १५० लक्ष एवढा निधी मंजुर केला आहे. त्याअनुषंगाने विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (MEDA) विभागीय कार्यालय, लातूर यांना १,४२,९३,०३८/- ( एक कोटी बेचाळीस लक्ष त्र्यान्नव हजार अडोतीस रुपये) एवढा निधी वितरीत केला आहे. त्यानुसार महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण यांनी नियुक्त केलेल्या संबंधित एजन्सीने १४२ शाळांना १ के.व्ही. ऑफग्रीड सोलर प्लँट बसविले असुन योजना पुर्ण केलेली आहे.

सन २०२०-२१ मध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती या योजनेअंतर्गत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा व शिक्षण समिती यांनी इ.७ वी व ८ वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना सायकल पुरविणेसाठी मान्यता दिली आहे. विद्यार्थीनीसाठी सायकलींचा पुरवठा करण्यासाठी केंद्र शासनाच्या जीईएम पोर्टल (GEM Portal) वरुन निविदा प्रकाशीत करुन पुरवठा दर निश्चित करण्यात आला होता. जिल्हास्तरीय खरेदी समितीने न्युनतम बोली असणाऱ्या ( एल-१ ) पुरवठादाराचे दर जास्त असल्यामुळे, सदरची निविदा रद्द करून नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता दिली होती. त्यानुसार ई-निविदा प्रक्रिया राबवुन न्युनतम बोली असणाऱ्या ( एल-१ ) निविदाकारास पुरवठा आदेश देण्यात आला होता. परंतु संबंधित निविदाकाराने त्या दराने सायकलींचा पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे विहित मुदतीत निधी खर्च होऊ शकला नाही. त्यामुळे २०२०-२१ चा अखर्चीत राहिलेला निधी समर्पित करण्याच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, बीड यांच्या कार्यालयाकडुन कार्यवाही सुरु आहे.

—xx०x—

रोटर H/1376 (750-3-23)

( लक्षवेधी सूचना क्र.७५ )

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

---

**ॲड.आशिष शेलार, ॲड.पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री.किसन कथोरे, श्री.प्रशांत ठाकूर, श्री.संजय केळकर, श्री.बंटी भांगडीया, श्री.विनोद निकोले, श्री.मंगेश चव्हाण, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री.योगेश सागर, श्री.अतुल भातखळकर, श्री.मिहीर कोटेचा, श्री.पराग शाह, श्री.गणपत गायकवाड, श्रीमती श्वेता महाले, ॲड.राहूल कुल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७५ पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्याच्या आरोग्य विभागात तज्ज्ञ डॉक्टर व परिचारारिकांची हजारो पदे रिक्त असल्याने सर्वसामान्य रुग्णांना दिली जाणारी आरोग्य सेवा अपुरी पडत असल्याचे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, आरोग्य संचालक, अतिरिक्त संचालक, सह संचालक, उप संचालकांसह आरोग्य विभागातील डॉक्टरांसह अन्य श्रेणीतील तब्बल १७०५१ पदे रिक्त असणे, राज्याच्या आरोग्य विभागात आरोग्य खात्याची ५२७ रुग्णालये असून ग्रामीण व दुर्गम भागातील आरोग्याची काळजी घेण्यासाठी १८२८ प्राथमिक आरोग्य केंद्रे तर १०,६६८ उपकेंद्रे असणे, याकरिता आवश्यक डॉक्टरांची तसेच विशेषज्ञांची हंगामी पदे भरण्यासाठी वेळोवेळी जाहिरात देऊनही डॉक्टर मिळत नसणे, यामागे ग्रामीण व दुर्गम भागातील डॉक्टरांना पुरेसे मानधन मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, सदरहू रिक्त पदे तात्काळ भरुन रुग्णांना दिलासा देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

***

**मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन.**

राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत २६ जिल्हा रुग्णालये, ०८ सामान्य रुग्णालये, २८ स्त्री रुग्णालये, ४७० उपजिल्हा रुग्णालये (५० व १०० खाटांचे) व ग्रामीण रुग्णालये (३० खाटांचे), ०३ क्षय रुग्णालये, ०४ मनोरुग्णालये व ०२ विभागीय संदर्भ सेवा रुग्णालये अशी एकूण ५४१ रुग्णालये कार्यान्वीत आहेत. त्याचबरोबर १९०६ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १०७४० उपकेंद्रे कार्यान्वीत आहेत.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ ते गट-ड मधील मंजूर भरलेल्या व रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे -

| क्र | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | मवैआसे गट-अ व सामान्य राज्य सेवा, गट-अ | १७८४ | १००८ | ७७६ |
| २ | वैद्यकीय अधिकारी, गट-अ | ८४४१ | ६२९० | २१५१ |
| ३ | वैद्यकीय अधिकारी, गट-ब | १२८५ | १०४७ | २३८ |
| ४ | सामान्य राज्य सेवा, गट-ब | ९९० | २४७ | ७४३ |
| ५ | गट-क | ३१९११ | २१९०२ | १०००९ |
| ६ | गट-ड | १३११२ | ८१९७ | ४९१५ |
| | एकूण | ५७५२३ | ३८६९१ | १८८३२ |

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट -अ (एस -२३ व त्यावरील ) मधील जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा आरोग्य अधिकारी, विशेषज्ञ संवर्ग तसेच सामान्य राज्य सेवा या संवर्गातील रिक्त पदांच्या अनुषंगाने माहे डिसेंबर,२०२१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेल्या एकूण ४४४ पदांच्या मागणीपत्रांच्या अनुषंगाने निवड प्रक्रिया अवलंबिल्यानंतर पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्याने आयोगाकडून केवळ २१७ उमेदवारांच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्या असून त्यांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याच्यादृष्टीने, सन २०२१-२२ या निवडसुची वर्षात एकूण ३८२ पदांवर पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे सन २०२२-२३ या निवडसुची वर्षात उपसंचालक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्गातील एकूण १९५ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

मवैआसे गट-अ (वेतनस्तर एस-२०) मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण ८४४१ पदे मंजूर असून त्यापैकी ६२९० पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून उर्वरित २१५१ नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. सदर २१५१ रिक्त पदांमध्ये १७२९ पदे सरळसेवेची व ४२२ पदे पदोन्नतीच्या कोट्यातील आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ (वेतनस्तर एस-२०) ची सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरिता अद्ययावत बिंदुनामावली व आकृतीबंध तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे. तर पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने आयुक्तालय स्तरावर छाननी सुरू आहे. सद्यस्थितीत २१५१ नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांपैकी ११४६ पदांवर बंधपत्रित व तदर्थ / कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

सामान्य राज्य सेवा गट-ब मधील दंत शल्य चिकित्सक- २८९, प्रशासकीय अधिकारी-७३, सांख्यिकी अधिकारी-२३, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी-४९, संजीवनी शास्त्रज्ञ-४ व कनिष्ठ किटक शास्त्रज्ञ-४ अशा एकूण ४४२ पदांच्या जाहिराती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या असून त्यापैकी प्रशासकीय अधिकारी पदांच्या परिक्षा दि.२/१२/२०२२ रोजी ऑनलाईन पध्दतीने झालेल्या आहेत. तसेच सन २०२२-२३ या निवडसुची वर्षात एकूण १४८ रिक्त पदे पदोन्नतीची भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

आरोग्य यंत्रणेतील गट-क संवर्गातील कनिष्ठ लिपीक संवर्गातील २६४ पदांची जाहिरात लोकसेवा आयोगामार्फत देण्यात आलेली आहे. तसेच गट-क संवर्गातील ९३५२ व गट-ड संवर्गातील ४९१५ पदांची नव्याने जाहिरात देण्यासाठी बिंदुनामावली प्रमाणीत करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यात यापूर्वी रद्द करण्यात आलेल्या परीक्षेतील पदांचाही समावेश आहे. तसेच सदर पदांची परीक्षा घेण्यासाठी कंपनी निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

*****************

लक्षवेधी सूचना क्रमांक २४७

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.छगन भुजबळ, डॉ. जितेंद्र आव्हाड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक:- २४७

"राज्य शासनाने वर्ग तीन व चारच्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासाठी बक्षी समिती नियुक्त करुन या समितीच्या अहवालानुसार वेतनश्रेणी लागू करण्याची प्रक्रिया सुरु केलेली असणे, या समितीच्या खंड दोनमध्ये विशिष्ट संवर्गातील कर्मचाऱ्यांनाच सुधारित वेतनश्रेणी लागू केल्याचा संशय व्यक्त करत राज्यातील ४५०० हून अधिक औषधनिर्माण अधिकाऱ्यांनी मोठा अन्याय झाल्याची तक्रार केली असून ते आंदोलनाच्या पवित्र्यात असणे, औषधनिर्माता संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री व आरोग्यमंत्र्यांकडे तक्रार करण्यात आलेली असणे, समितीने काही निवडक संवर्गातीलच कर्मचाऱ्यांनाच सुधारित वेतनश्रेणी लागू केलेली असणे, खंड दोननुसार समान पदांना सुधारित वेतनश्रेणी लागू न केल्याने कर्मचाऱ्यांत अन्यायाची भावना निर्माण झालेली असणे, सातव्या वेतन आयोगानुसार एकाकी पदांच्या वेतनश्रेणीत मोठया प्रमाणात वेतन त्रुटी आढळूनही समितीच्या खंड दोनमध्ये या एकाकी पदांचा विचार केलेला नसणे, यामध्ये केवळ वर्ग अ, ब व एस ८ पेक्षा अधिक वेतन असणाऱ्या वर्ग क मधील १०४ संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आलेली असणे, ज्या पदांच्या वेतनश्रेणीत त्रुटी होत्या अशा पदांचा विचारही समितीने केलेला नसणे, त्यामुळे या कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

*****************************

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांनी करावयाचे निवेदन

केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्य शासनाच्या धोरणानुसार केंद्र शासनाच्या वेतनश्रेणीचा अभ्यास करुन राज्य शासकीय व पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनसुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाकडून "राज्य वेतन सुधारणा समिती" ची स्थापना करण्यात येते. सदर समितीकडे केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन सुधारित वेतनश्रेणीची शिफारस करणे तसेच निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतन निश्चिती व अनुषंगिक बाबींसंबंधी शिफारशी करणे या बाबी सोपविण्यात येतात.

सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतनसुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाने श्री. के. पी. बक्षी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ स्थापन केली होती. सदर समितीच्या कार्यकक्षेत सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतनसंरचनेची शिफारस करणे आणि सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचनेत त्रुटीं असल्यास त्या दूर करण्याबाबत शिफारशीं करणे. या दोन बाबी प्रामुख्याने अंतर्भूत होत्या.

त्यानुषंगाने विविध संघटना, अधिकारी-कर्मचारी, तसेच प्रशासकीय विभागांना त्यांचे वेतनत्रुटीं/वेतनवृध्दीविषयक मागण्यासंदर्भातील प्रस्ताव ऑनलाईनरीत्या बक्षी समितीच्या विचारार्थ सादर करण्यासाठी स्वतंत्र ऑनलाईन वेबपोर्टल (https://www.mahaseventhpay.in) तयार करण्यात आले होते. त्या अनुषंगाने सदर वेब पोर्टलवर ऑनलाईन विविध संवर्गाच्या एकूण ३७३९ मागण्या समितीस प्राप्त झाल्या होत्या.

बक्षी समितीने सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्यासंबंधीचा आपला अहवाल खंड-१ दिनांक ०५ डिसेंबर, २०१८ रोजी शासनास सादर केला होता. सदर अहवालातील शिफारशींवर मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. तसेच बक्षी समितीने आपला विविध संवर्गाचा वेतनत्रुटींसंबंधीचा शिफारशींचा अहवाल खंड-२ शासनास दिनांक ८ फेब्रुवारी,२०२१ रोजी सादर केला होता. बक्षी समितीने आपल्या अहवालात प्राप्त एकूण ३७३९ मागण्यापैकी, १०४ संवर्गाच्या वेतनत्रुटीसंदर्भातील मागण्या मान्य केल्या आहेत.

शासकीय औषध निर्माता गट- क कर्मचारी संघटना यांनी बक्षी समितीसमोर "औषध निर्माता" या संवर्गाच्या वेतनत्रुटींबाबत समितीस प्रस्ताव सादर केला होता. परंतु सदर अहवालात सार्वजनिक आरोग्य विभागातील औषध निर्माता या संवर्गाबाबत समितीने वेतनत्रुटींसंदर्भात शिफारस केलेली नाही. बक्षी समितीच्या सदर अहवालातील शिफारशींवर दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात येऊन, त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १३ फेब्रुवारी,२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

****************************

# विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२१२४**

मा. सर्वश्री . सिध्दार्थ शिरोळे, सुनिल कांबळे, ॲड. राहूल कुल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

---

"पुणे जिल्हा रुग्णालय औंध येथे दि. २४ फेब्रुवारी २०२३ रोजी रात्री साडेतीन वाजता गर्भवती महिला प्रसूतीसाठी येणे, रुग्णालयातील रात्रपाळीच्या डॉक्टरांनी महिलेवर जुजबी उपचार करून रुग्णालयामध्ये सुविधा नसल्याचे सांगून ससून रुग्णालय, पुणे येथे जाण्यास सांगणे, महिलेची प्रसूती जवळ आली असतानाही जिल्हा रुग्णालयाने रुग्णवाहिका व सोबत डॉक्टर न देणे, महिलेच्या नातेवाईकांनी दुसऱ्या रुग्णालयातून रुग्णवाहिका बोलवून गर्भवती महिलेस ससून हॉस्पिटलमध्ये जावे लागणे, परंतु शिवाजीनगरजवळ रुग्णवाहिकेतच बाळाचा जन्म होऊन मृत्यू होणे, पुणे जिल्हा रुग्णालय येथे नवजात बालकांसाठी लागणारा व्हेंटीलेटर उपलब्ध नसल्याने नवजात बालकाचा दुर्दैवी मृत्यू होणे, त्यामुळे रुग्णाच्या नातेवाईकांमध्ये पुणे जिल्हा रुग्णालय प्रशासनाविरोधी असंतोष निर्माण होणे, उक्तप्रकरणी कठोर चौकशी करून कारवाई करण्याची आवश्यकता असणे, याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन

दिनांक २४/०२/२०२३ रोजी पहाटे सुमारे ४.०० वाजता रुग्ण नामे सौ. दिप्ती शाम विरणक, वय २२ राहणार पिंपळेगुरव, ता. हवेली, जि. पुणे ही सुमारे २६ आठवडे गरोदर माता पोट दुखी व बाळाची हालचाल जाणवत नसल्याने जिल्हा रुग्णालय औंध, पुणे येथे उपचाराकरिता आली होती. त्यावेळेस सदर रुग्णास JR-II डॉक्टर यांनी तपासले असता, रुग्णांच्या गर्भाशयाचे तोंड ३ से.मी. उघडलेले होते. तसेच बाळाच्या ह्रदयांचे ठोके कमी प्रमाणात लागत असल्याने, बाळ २६ आठवडयाचे (Pretern) आहे, असे ऑन कॉल डॉक्टर बिडकर यांना दुरध्वनीद्वारे कळविले. डॉ. बिडकर यांनी बाळ २६ आठवडयाचे गरोदरपण असल्याने प्रसुती पश्चात तात्काळ बाळाला व्हेन्टीलेटर आवश्यक असल्याने याकरिता सदर रुग्णास ससून सर्वोपच्चार रुग्णालय, पुणे येथे १०८ सुविधेसह संदर्भित करण्याबाबत निर्देशित केले होते. कर्तव्यावर असलेल्या अधिपरिचारिका यांनी रुग्णांच्या नातेवाईकांना १०८ रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात येत असल्याचे सांगितले असता, रुग्णाच्या नातेवाईकांनी आमचे स्वतःचे वाहन असल्याने आम्ही त्या वाहनाने घेऊन जातो असे सांगून लेबर रूममधून संदर्भ चिठ्ठी घेऊन गेले. रुग्णालयातील स्त्री सुरक्षा रक्षकाने त्यांना त्याचे खाजगी वाहनात बसवून दिल्यावर ते ससून रुग्णालयाकडे रवाना झाले.

"पुणे टाइम्स मिरर" या दैनिक वर्तमानपत्रात दि. ०१.०३.२०२३ रोजी यासंदर्भात बातमी प्रसिध्द झाली होती. सदरहू बातमीच्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय पुणे

यांनी प्रकरणाची चौकशी करण्याकरिता दि. ०१.०३.२०२३ रोजी त्रिसदस्यीय समिती गठीत केली होती. समितीने त्यांचा अहवाल त्याच दिवशी सादर केलेला आहे. समितीच्या चौकशी अहवालानुसार असे निदर्शनास आले की, जिल्हा रुग्णालय, औंध, पुणे येथून सदर रुग्ण हा औंध कुटी व प्रसुती रुग्णालयात गेल्याबाबत निदर्शनास आले. समितीने सदर रुग्णालयास भेट देऊन माहिती घेतली असता, तेथील वैद्यकीय अधिकारी व अधिपरिचारिका यांनी सदर रुग्ण जिल्हा रुग्णालयातून त्यांच्याकडे आले असल्याबाबत सांगितले. परंतू कुठलेही उपचार न घेता तेथील रुग्णवाहिकेमधून तात्काळ ससून सर्वोपच्चार रुग्णालय, पुणे कडे रवाना झाले.

समितीच्या अहवालानुसार गरोदर मातेचे बाळ हे कमी दिवसाचे असल्याने प्रसुती पश्चात बाळाची श्वसन क्रिया चालु होण्यास अडचण येण्याची शक्यता पाहता बाळास जन्मानंतर तात्काळ व्हेन्टीलेटरची आवश्यकता भासू शकते, असे समितीचे निरीक्षण आहे. प्रसुती कक्षातील उपस्थित रेसिडेन्ट (JR-II) डॉक्टर व अधिपरिचारिका यांनी आवश्यक ती तपासणी, उपचार व समुपदेशन केले, परंतु रुग्णाची गुंतागुंतीची परिस्थिती असल्याचे लेखी स्वरुपात रुग्ण अथवा नातेवाईकांची स्वाक्षरी घेण्यात आली नाही. तसेच वैद्यकीय अधिकारी यांनी रुग्णास तपासणे गरजेचे होते. संबंधित वैद्यकीय अधिकारी डॉ. बिडकर यांनी सदर रुग्णास तपासले नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. तरी त्यांच्यावर पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस समितीने केली आहे.

सदर चौकशी अहवालाचे अनुषंगाने डॉ. बिडकर, कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. तसेच संबंधित अधिपिचारिका यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

***********************************************

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले अधिवेशन

**मा.डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.छगन भुजबळ, श्री.जयंत पाटील, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री.रोहित पवार, श्री.दत्तात्रय भरणे, श्री.शेखर निकम, श्री.संजय बनसोडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित लक्षवेधी सूचना क्रमांक २१७ :-**

"भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्रींचे जन्मस्थळ असलेल्या ठाणे जिल्ह्यातील आंबेटेंभे (ता.मुरबाड) येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे भीमाई स्मारक उभारण्याची कार्यवाही सुरु असणे, मात्र या स्फूर्तिस्थळाकडे जाण्यासाठी रस्ताच नसल्याची गंभीर माहिती दि.१६ फेब्रुवारी, २०२३ रोजी उघडकीस येणे, रस्ताच नसल्याने सामाजिक कार्यकर्त्यांना या स्मारकाकडे ये-जा करतांना प्रचंड त्रासदायक अडचणींचा सामना करावा लागत असणे, आंतरराष्ट्रीय भीमाई स्मारकाकडे जाण्यासाठी प्रशस्त रस्ता तयार करण्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आवश्यक उपाययोजना करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी देश-विदेशातील आंबेडकर प्रेमींमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, सदर ठिकाणी येण्याजाण्याकरिता रस्त्याचे काम लवकरात लवकर करण्यासाठी कार्यात्मक कार्यवाही करुन त्याची अंमलबजावणी करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा. मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

आंबेटेंभे हे गांव मुरबाड तालुक्यापासून १५.०० कि.मी अंतरावर आहे. आंबेटेंभे हे गाव भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्रींचे जन्मस्थळ असून त्याठिकाणी माता भिमाई यांचे लहान स्वरुपाचे स्मारक अस्तित्वात आहे.

सदर रस्ता हा ग्रामिण मार्ग क्र.१४८ दर्जाचा असून देखभाल दुरुस्तीकरीता ग्राम विकास विभागाअंतर्गत संबंधित जिल्हा परिषदेच्या अखत्यारित आहे. या ग्रा.मा.१४८ ची एकूण लांबी २.०० कि.मी इतकी आहे, सदर रस्त्याची सुरुवातीची ०.७५० कि.मी व ०.३५० किमी म्हणजेच कि.मी ०/० ते ०/७५० व कि.मी.०/७५० ते कि.मी १/१०० ही लांबी डांबरी पृष्ठभागाची असून अनुक्रमे ५.५० मी. व ३.०० मी.रुंदीची आहे.

सदर ग्रामीण मार्ग १४८ च्या कि.मी. १/१०० पासून भिमाई स्मारकाकडे जोडला जाणारा जोडरस्ता अस्तित्वात असून तो योजनाबाहय (Non Plan) आहे. सदर जोडरस्त्याची एकूण लांबी ही १.४७० कि.मी इतकी आहे. जोडरस्त्याच्या सुरुवातीची १००.मी. लांबी डांबरी पृष्ठभागाची, त्यानंतरची १३५ मी. खडीकरण व उर्वरित १.२३५ कि.मी या लांबीत कच्चा रस्ता आहे.

माता भिमाई स्मारकाकडे जाणाऱ्या जोडरस्त्याचे काम प्रस्तावित स्मारकाच्या प्रकल्पामध्ये समाविष्ट असून सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

--------

रोहेत/एच-११३[७५०-५-२०२३].

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

विधानसभा लक्षवेधी क्र. १८२

श्री.छगन भुजबळ , डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री. अस्लम शेख वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८२ पुढीलप्रमाणे आहे :-

पुणे मुंबईसह इतर शहरामध्ये सीबीएससी बोर्डाच्या ६०० शाळा बोगस किंवा अनधिकृत असल्याचे दिनांक ११ जानेवारी २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, या शाळांना सीबीएसई, आयसीएसई बोर्डासाठी राज्य शासनाच्या बनावट एनओसी दिल्याचे निदर्शनास आलेले असणे, "राज्यात गाजलेला टीईटी घोटाळ्यानंतर बनावट सीबीएससी शाळा वाटप करणारी टोळी मंत्रालयात निर्माण झाल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीला येणे, सुमारे १२ लाख रुपयामध्ये बनावट ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) देऊन राज्यभर अशा शाळा सुरू झाल्या असणे, विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरातील काही शाळांना देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र बनावट असल्याचे आढळून येणे, यानंतर शिक्षण विभागाने मुंबईसह मोठ्या शहरात बनावट शाळांची शोध मोहीम सुरू केलेली असणे, त्यामध्ये शेकडो शाळा अशा प्रकारचा बनावट ना हरकत प्रमाणपत्राच्याद्वारे सुरू झाल्याचे निष्पन्न होणे, ज्या शाळाकडे बनावट प्रमाणपत्र आढळून आले त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याचे आदेश शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी दिलेले असले तरी अद्याप एकही प्रकरणात पुढील कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे राज्यातील विद्यार्थी, पालक यांची राज्य शासनाच्या संदर्भात निर्माण झालेली असंतोषाची भावना, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## निवेदन

(मा.श्री.दीपक केसरकर , शालेय शिक्षण मंत्री)

राज्यमंडळाव्यतिरिक्त इतर मंडळाच्या अभ्यासक्रमांशी संलग्नित होणाऱ्या शाळांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासंदर्भात व ना-हरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यासंदर्भात दिनांक ०४.०३.२०२० च्या शासन निणर्यान्वये कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार नव्याने ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता तसेच ना-हरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्यासाठी संबंधित संस्थामार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येतात. असे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावांची

छाननी करून सर्व अटी व शर्तींची पुर्तता करणाऱ्या शाळांना इतर मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्याकरीता शासनामार्फत ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते.

२. जुलै २०२२ मध्ये पुणे जिल्ह्यातील पुढील तीन शाळांना १) क्रिएटिव्ह एज्युकेशनल सो. पुणे संचलित पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, पुणे. २) एम.पी. इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, शिवाजीनगर पुणे व ३) एज्युकेशन करीअर फाऊंडेशन नमो आरआयएमएस इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, पुणे या शाळांना देण्यात आलेली प्रमाणपत्रे ही शासन स्तरावरून निर्गमित झालेले नसुन ती बोगस असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली. त्यावरुन अशी प्रकरणे राज्यातील सर्वच विभागामध्ये झाली असल्याची शक्यता विचारात घेऊन पुणे विभागीय शिक्षण, उपसंचालकांसोबतच इतर सर्व विभागीय शिक्षण उपसंचालकांना दि. १४.०७.२०२२ च्या पत्रान्वये कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले होते. या प्रकरणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक ), जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून समर्थ पोलीस स्टेशन पुणे येथे FIR क्र. ००११/२०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

३. राज्यात राज्यमंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळाशी सलग्न शाळांची संख्या युडायस नुसार १७२३ इतकी असून युडायसनुसार मदरशांसह अनाधिकृत शाळांची संख्या ६६१ इतकी आहे.राज्यात विविध शाळा बोगस असल्याबाबत शासनास प्राप्त होणा-या तक्रारी लक्षात घेवून आयुक्त शिक्षण याच्या आदेशाने राज्यातील शाळांच्या प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी शिक्षण सहसंचालक, प्रशासन, अंदाज व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीकडून शाळांना मिळालेल्या इरादापत्रांची मान्यता प्रमाणपत्राची / आदेशांची / नाहरकत प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यासाठी माहिती संकलीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर कार्यवाही पूर्ण होताच अनधिकृत / मान्यता नसलेल्या / बोगस प्रमाणपत्र असणाऱ्या शाळांबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

----------------xxxxxxxxxxxxx------------------

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन
## लक्षवेधी सूचना क्र. २०७५

श्री. चंद्रकांत नवघरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २०७५ पुढीलप्रमाणे आहे :-

"शेतकऱ्यांनी टोकाई सहकारी लि., कुरुंद्रा, (ता. वसमत, जि.हिंगोली) या साखर कारखान्यास ऊस दिलेला असुन दिनांक १ जानेवारी ते २८ फेब्रुवारी पर्यंत कारखान्याने ऊस उत्पादक शेतकरी यांचे ऊसाचे पैसे दिलेले नसणे, या कारखान्याने खुल्या बाजारात साखर बर्गस मोलॅसेस राख हे खुल्या मार्केट विकले असून आज रोजी कारखान्यात कुठलाही माल शिल्लक नसल्याचे निदर्शनास येणे, सन २०२२-२३ या वर्षाच्या गाळपाचे अंदाजे १ लाख मेट्रीक टन ऊसाचे बील रूपये २० ते २२ कोटी शिल्लक असणे, सन २०२१-२२ या वर्षाचे ऊसाचे पैसे दिले नाहीत साखर आयुक्त, पुणे यांनी कारखान्यांवर RRC ची कारवाई केली व नंतर कारखाना प्रशासनाने कारखान्याची FRP १३ कोटी ६५ लाख रूपये शेतकऱ्यांना तीन हप्ते करून देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, आज रोजी कारखान्यात कुठलाही माल शिल्लक नसल्यामुळे साखर कारखान्याकडे सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षातील FRP चे पैसे देण्याबाबत शेतक-यांकडून होत असलेली आग्रही मागणी तथापि टोकाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष यांनी थकीत असलेले ऊसाचे २३ कोटी रूपये देणे शक्य नसल्याचे मा. साखर आयुक्त, पुणे यांना दिनांक १ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, परिणामी ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर आलेली उपासमारीची पाळी, त्यासाठी शासनस्तरावरून अध्यक्ष व संचालक मंडळास जबाबदार धरून शेतक-यांचे पैसे देण्याचे शासनाने आदेश देण्याची आवश्यकता, परिणामी शेतक-यांच्या मनात निर्माण झालेले भितीचे वातावरण व उदासिनतेची भावना, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री (सहकार) यांचे निवेदन

टोकाई सहकारी साखर कारखाना म., कुरुंदा, ता. वसमतनगर, जि. हिंगोली हा सहकार कायद्यांतर्गत नोंदणीकृत साखर कारखाना असून कारखान्याची गाळप क्षमता १२५० मे.टन प्रतिदिन आहे. कारखान्याने गाळप हंगाम २०२१-२२ मध्ये ऊस पुरवठादार शेतकऱ्यांचे ऊसबील रू. १४९६.४२ लाख अदा केले नव्हते. ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ मधील कलम ३(३) मधील तरतुदीनुसार कारखान्याने हंगामामध्ये गाळप केलेल्या ऊसाची एफआरपी प्रमाणे ऊस किंमत १४ दिवसात ऊस पुरवठादारांना अदा करणे बंधनकारक आहे. तसेच विहीत कालावधीत एफआरपी देयके अदा न केल्यास उक्त कायद्याच्या कलम ३(३ए) नुसार विलंब कालावधीकरीता १५% व्याज आकारण्याची तरतूद आहे. त्यानुसार साखर आयुक्तालयाने या साखर कारखान्याविरूध्द ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ मधील तरतुदीनुसार विहीत कालावधीत एफआरपीची रक्कम ऊस पुरवठादार शेतक-यांना १५% व्याजासह अदा करणेस कसूर केला म्हणून ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ मधील कलम ३(८) नुसार रू. १४९६.४२ लाख रकमेचे आरआरसी आदेश दिनांक ०५/१२/२०२२ अन्वये निर्गमित करण्यात आले. तसेच सदर आरआरसीची अंमलबजावणी करणेकरीता जिल्हाधिकारी, हिंगोली यांना प्राधिकृत करण्यात आले. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड कार्यालयाकडुन प्राप्त माहितीनुसार सदर कारखान्याने गाळप हंगाम २०२१-२२ मधील गाळप केलेल्या ऊसाची संपुर्ण एफआरपी अदा केली आहे. तथापी १५% व्याज प्रलंबित आहे.

गाळप हंगाम २०२२-२३ मध्ये या कारखान्याकडे दिनांक १५/०२/२०२३ अखेर एफआरपी पोटी रू. १३८१.७५ लाख इतकी रक्कम थकीत आहे. या प्रकरणी दिनांक ०२/०३/२०२३ रोजी सुनावणी निश्चित करण्यात आली होती.

या सुनावणीच्या संदर्भात कारखान्याने दिनांक ०१/०३/२०२३ च्या पत्रान्वये लेखी म्हणणे सादर केले असून गाळप हंगाम २०२२-२३ करीता पुर्व हंगामी कामे, मशिनरी देखभाल दुरूस्ती खर्च, ऊसतोडणी वाहतुक यंत्रणा भरणेकरीता ॲडव्हान्स वाटप, कर्मचारी पगार, व्यापारी देणी, दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून घेतलेल्या विविध कर्जाचे हप्ते व त्यावरील व्याजाची रक्कम थकीत होती. प्रोसेस खर्च व अन्य गाळप अनुषंगिक खर्च भागविण्यासाठी कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे व स्थानिक बँकेचे कर्ज मिळाले नाही. कारखान्याने कर्ज प्रस्ताव तयार करून बँकेकडे सादर केला होता. तथापी सदरील कर्जे मंजूर झाली नाहीत. मागील गाळप हंगामातील एफआरपी मोठ्या प्रमाणात थकीत होती. कारखान्याने चालु गाळप हंगाम २०२२-२३ मधील साखर विक्रीपोटी व मोलॅसिस विक्रीपोटी व्यापाऱ्यांकडून ॲडव्हान्स घेवून पुर्व हंगामी कामे करून कारखाना सुरू केला. कारखान्याने चालु गाळप हंगाम २०२२-२३ मधील उत्पादित झालेली साखर व मोलॅसिस विक्री करून उपलब्ध होणाऱ्या रकमेमधून गळीत हंगाम २०२१-२२ मधील थकीत एफआरपी रक्कम दिली आहे. चालु गाळप हंगाम २०२२-२३ मधील माहे जानेवारी २०२३ व माहे फेब्रुवारी २०२३ चे ऊसबील रक्कम रूपये १९.०३ कोटी थकीत आहे. या हंगामातील हे थकीत ऊसाचे बील देणे शक्य नाही.

कारखान्याला लेखी म्हणणे मांडण्याची संधी दिली असता कारखान्याने ऊस पुरवठादार शेतकऱ्यांची ऊसबीले अदा करण्याबाबत असमर्थता दर्शविली असल्याचे दिसुन आल्याने साखर आयुक्तालयाने दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या आदेशान्वये कारखान्याविरूध्द रू. १३८१.७५ लाख रकमेची आरआरसी आदेश निर्गमित करण्यात आले आहे. तसेच सदर आरआरसीची अंमलबजावणी करणेकरीता जिल्हाधिकारी, हिंगोली यांना कारखान्याची मालमत्ता जप्ती करून त्याची विहीत पध्दतीने विक्री करून या रकमेतुन ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ मधील तरतुदीनुसार देयबाकी रकमेची खात्री करून ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना विलंबीत कालावधीसाठी १५% व्याजासह अदा करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे.

दि. २८/०२/२०२३ अखेरच्या एफ. आर. पी. अहवालानुसार टोकाई सहकारी साखर कारखाना म., कुरुंदा, ता. वसमतनगर, जि. हिंगोली या कारखान्याकडे रू. १८७३.७९ लाख एवढी एफ. आर.पी. थकबाकी आहे.

सदर कारखान्याने साखर, बगॅस, मोलॅसेस, राख हे खुल्या बाजारात विक्री केले आहे किंवा कसे? याबाबत कारखाना अभिलेख्यांची पडताळणी करणेसाठी दि. ०८/०३/२०२३ रोजी विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था (साखर), परभणी यांनी कारखान्यास प्रत्यक्ष भेट दिली. त्यांनी दिलेल्या अहवालानुसार हंगाम २०२२-२०२३ मधी.ल पांढरी साखर २३ क्विंटल व कच्ची साखर २२० क्विंटल अशी एकुण २४३ क्विंटल साखर ५० किलोच्या एकुण (४८६) बॅग्जमध्ये तसेच ९०० मे. टन बगॅस साठा आणि १८७३.५७० मे. टन मोलॅसेस साठा कारखानास्थळी आढळुन आला आहे.

**************

गृह (परिवहन) विभाग

लक्षवेधी सूचना क्र.३६

# महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२३ चे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.कुणाल पाटील, डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.छगन भुजबळ, श्री.जयंत पाटील, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री.रोहित पवार, श्री.दत्तात्रय भरणे, श्री.शेखर निकम, श्री.संजय बनसोडे, श्री.अबू आजमी, श्री.धनंजय मुंडे, श्री.चेतन तुपे, श्री.विनोद निकोले, श्री.सुनिल प्रभू, श्री.अजित पवार, कुमारी. आदिती तटकरे, श्री.दौलत दरोडा, श्री.धर्मरावबाबा आत्राम, श्री.अनिल पाटील, श्री.अस्लम शेख, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३६ पुढीलप्रमाणे आहे:-**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या चालक वाहकांच्या अनेक मागण्या शासन दरबारी प्रलंबित असणे, त्यासाठी एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी अनेक वेळा आंदोलने करुन शासनाचे लक्ष वेधलेले असणे, एसटी महामंडळाचे चालक वाहक एखाद्या ठिकाणी मुक्कामी बस घेऊन गेल्यास त्यांना अवघा 75 रुपये भत्ता मिळत असणे, प्रत्यक्षात मात्र त्यांना राहण्या व खाण्यासाठी एकूण 150 रुपयांपेक्षा जास्तीचा खर्च येणे, त्यामुळे मुक्कामी बस घेऊन जाण्यास वाहक चालक नाखुश असल्याचे दिसून येणे, कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी यासाठी गेल्या पाच वर्षात तीन वेळा एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यासाठी संप केलेला असणे, तरी शासनाने अद्यापही योग्य निर्णय घेतलेला नसणे, दहा वर्षे सेवा केल्यानंतरही एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांचा पगार 18 हजार रुपये इतकाच असणे, आजच्या महागाईच्या काळात घरखर्च भागविणे कठीण झालेले असणे, त्यामुळे राज्यातील एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या पगारात भरघोस वाढ करण्याची आवश्यकता असणे, परंतु शासनाचे या बाबींकडे दुर्लक्ष होत असल्याने सदर कर्मचाऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेल्या तीव्र असंतोष व नाराजीची भावना राज्यातील एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या तातडीने सोडविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व यावर राज्य शासनाची प्रतिक्रिया.

## निवेदन

### {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (परिवहन)}

रा.प.महामंडळातील कामगार करार सन २०१२-२०१६ या कराराची मुदत दि.३१.०३.२०१६ रोजी संपुष्टात आली आहे. सन २०१६-२०२० या करारासाठी मान्यताप्राप्त संघटनेने २७६ मागण्या सादर केल्या होत्या. त्यापैकी रा.प.महामंडळातील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करावा ही प्रमुख मागणी होती. मान्यताप्राप्त संघटनेने सादर केलेल्या मागण्यांवर वेळोवेळी वाटाघाटीकरीता बैठक आयोजित केल्या. परंतू या बैठकीमध्ये रा.प.महामंडळाने दिलेली वाढ संघटनेने अमान्य केली. त्यामुळे करार पुर्ण होत नसल्याने दि.१७.१०.२०१७ ते

१९.१०.२०१७ या काळात रा.प.कर्मचाऱ्यांनी संप पुकारला होता. या संपाच्या अनुषंगाने मा.मुंबई, उच्च न्यायालय येथे अनुक्रमे २९७८८/२०१७ व २९७९१/२०१७ जनहित याचिका दाखल केल्या होत्या. या प्रकरणी मा.मुंबई, उच्च न्यायालयाच्या दि.२०.१०.२०१७ रोजी न्यायालयाने संप बेकायदेशीर ठरवून सर्व कामगारांना ताबडतोब कामावर रुजू होण्याचे आदेश दिले व राज्य शासनास वेतनवाढीसाठी उच्च स्तरीय समिती नेमण्याचे आदेश दिले. त्याअन्वये सर्व कर्मचारी कामगिरीवर रुजू झाले.

दि.०१.०६.२०१८ रोजी तत्कालीन मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांनी रा.प.कर्मचाऱ्यांकरीता घोषित केलेली वेतनवाढ मान्य नसल्याने दि.०८.०६.२०१८ ते ०९.०६.२०१८ रोजी रा.प.कर्मचाऱ्यांनी कोणतीही पुर्वसूचना न देता अचानकपणे संप पुकारला होता. अंतिमत: तत्कालीन मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांनी केलेल्या घोषणेनुसार रा.प.कर्मचाऱ्यांसाठी कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२७/२०१८ जा.क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/३९४२ दि.३० जून, २०१८ अन्वये सुधारीत भत्ते व वेतनवाढ देण्यात आली होती. या परिपत्रकान्वये रा.प.कर्मचाऱ्यांना साधारण ठिकाणी रात्रवस्ती भत्ता रु.९/- वरुन रु.७५/-, जिल्हा ठिकाणी रात्रवस्ती भत्ता रु.११/- वरुन रु.८०/- तसेच विर्निदिष्ट ठिकाणी उदा. मुंबई यासारख्या ठिकाणी रात्रवस्ती भत्ता रु.१५/- वरुन रु.१००/- असा वाढविण्यात आला आहे. सदरची वेतनवाढ सर्व कर्मचाऱ्यांनी स्विकारली होती.

तथापि, कामगार करार सन २०१६-२०२० या करारास अंतिम स्वरुप येत नसल्याने तसेच रा.प.महामंडळ व मान्यताप्राप्त संघटना यामध्ये समेट न झाल्यामुळे मा.कामगार आयुक्तांनी सदर प्रकरण मा.औद्योगिक न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडे वर्ग केला असून सदर प्रकरण मा.औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित आहे. यामुळे कामगार करार सन २०१६-२०२० अद्यापपर्यंत पुर्णत्वास आलेला नाही.

रा.प.महामंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण करावे या मागणीकरीता रा.प.कर्मचाऱ्यांनी दि.२९.१०.२०२१ पासून कोणतीही पुर्व सूचना न देता अचानकपणे संप पुकारला होता. या संपाच्या अनुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालय येथे रिट याचिका क्र. २१६९९/२०२१ अन्वये प्रकरण दाखल करण्यात आले. या प्रकरणी दि.०८.११.२०२१ रोजी दिलेल्या आदेशानुसार म.रा.मा.प.महामंडळातील कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचारी समजण्यात यावे या मागणीचा विचार करण्याकरीता समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने रा.प.महामंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण करता येणार नाही, असे स्पष्ट केले. सदरचा अहवाल विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करुन मान्यता घेण्यात आली. तद्नंतर सदरचा अहवाल मा.मुंबई उच्च न्यायालयात सादर करण्यात आला.

रा.प.महामंडळाचे परिपत्रक क्र.३४/२०२१, दि.१.१२.२०२१ अन्वये सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना सेवा कालावधीनिहाय मुळ वेतन व एकुण वेतनात वाढ झाली आहे. या परिपत्रकानुसार सुधारीत वेतन निश्चिती करुन अधिकारी व कर्मचाऱ्यांचे माहे नोव्हेंबर, २०२१ चे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये देय होणारे सुधारीत वेतनवाढीसह व तदूअनुषंगिक भत्ते दि.०७.१२.२०२१ रोजीच्या वेतनापासून अदा करण्यात आले आहेत.

*****

2

लक्षवेधी सूचना क्र. १०१

महाराष्ट्र विधानसभा
सन-२०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**मा. श्री. अतुल भातखळकर, विधानसभा सदस्य यांनी नियम क्र.१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१०१ पुढीलप्रमाणे आहे:-**

"परिवहन विभागाचे प्रमाणपत्र न घेताच तब्बल ३० हजार वाहने मुंबईच्या रस्त्यावरुन धावत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, फिटनेस चाचणी न करणाऱ्या वाहनांवर उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये, १५ वर्षाहून अधिक जुन्या वाहनांवर green tax वाढवण्याची, त्यांची तपासणी आणि मोठ्या प्रमाणात दंड आकारण्याची योजना आखली असणे, त्यामुळे, फिटनेस चाचणी न करणाऱ्या वाहनांवार कारवाई न करण्याची गरज असणे, तसेच, प्रत्येक वाहनांची फिटनेस चाचणी होण्यासाठी स्वयंचलित फिटनेस चाचणी केंद्रे उभारण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

निवेदन
{श्री. एकनाथ शिंदे, मा. मुख्यमंत्री (परिवहन)}

दिनांक १४.०१.२०२३ रोजीच्या दैनिक लोकमत वृत्तपत्रामध्ये "३० हजार गाडया अनफिट" अशा आशयाची बातमी प्रसिद्ध झाली आहे.

मोटार वाहन विभागाच्या संगणकीय अभिलेखानुसार मुंबई शहर व उपनगर अंतर्गत तीन प्रादेशिक परिवहन अधिकारी दर्जाचे कार्यालय व एक उप प्रादेशिक परिवहन अधिकारी दर्जाचे कार्यालय कार्यरत आहेत. सदर परिवहन कार्यालयांमध्ये परिवहन संवर्गात नोंद झालेल्या वाहनांची संख्या ३,०३,११८ इतकी असून त्यापैकी ६३,०५८ वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र वैध नसल्याचे दिसून आले आहे.

उपरोक्त कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण न करता रस्त्यावर वापरल्या जाणा-या वाहनांची वेळोवेळी तपासणी करुन मोटार वाहन अधिनियम व त्या अंतर्गत नियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते. माहे एप्रिल २०२२ ते जानेवारी २०२३ या कालावधीत योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण न करता वापरल्या जाणा-या वाहनांवर केलेल्या कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| कार्यालयाचे नाव | दोषी वाहने | दंड वसुली (रुपये लाखात) |
|---|---|---|
| प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) | ८९२ | ३७.४० |
| प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) | १०८९ | ३५.५५ |
| प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) | २२८६ | ४२.५८ |
| उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली | ७८० | २.७३ |
| एकूण | ५,०४७ | ११८.२६ |

शासनाने ऑक्टोबर २०१० पासून १५ वर्षापेक्षा जुन्या परिवहनेत्तर (खाजगी) वाहनांना व ८ वर्षापेक्षा जुन्या परिवहन वाहनांना पर्यावरण कर लागू केला असून विहीत केलेल्या दरानुसार पर्यावरण कराची वसूली करण्यात येते. सदर पर्यावरण कराचे दर नव्याने वाढविण्याची कोणतीही योजना सध्या प्रस्तावीत नाही.

शासनाने दि.३०.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार रस्ता सुरक्षा निधीतून ताडदेव (मुंबई), तळोजा (पनवेल), हिंगणा (नागपूर), भोसरी (पिंपरी-चिंचवड), दिवेघाट (पुणे), कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, नांदिवली (कल्याण) व मर्फी (ठाणे) या १० ठिकाणी ARAI, पुणे या संस्थेमार्फत वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्र (I & C centers) उभारण्याकरिता कार्यवाही सुरू आहे.

तसेच शासनाने दि.२४.०६.२०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मुंबई (पश्चिम), नांदेड, लातूर, नागपूर(ग्रामीण), सातारा, बुलढाणा, श्रीरामपूर, वाशिम, अकोला, परभणी, सोलापूर, बारामती व अंबेजोगाई या १३ परिवहन कार्यालयासाठी येथे ऑटोमोटीव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया,(ARAI) पुणे या संस्थेमार्फत वाहन निरीक्षण व परिक्षण केंद्र (Inspection & Certification Centre) स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे. उपरोक्त २३ कार्यालयांमध्ये वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्र (I & C Centers) उभारण्याकरिता निवीदा प्रसिद्ध केली असून सेवापुरवठादाराची निवड करण्याची बाब देखील कार्यवाहीखाली आहे.

याव्यतिरिक्त राज्यातील अहमदनगर, धुळे, जळगाव, मालेगाव, सांगली, अकलूज, गडचिरोली, कराड, उस्मानाबाद, वर्धा, भंडारा, गोंदिया, हिंगोली, पेण, यवतमाळ, जालना, सिंधूदुर्ग, नागपूर (पूर्व), नवी मुंबई (वाशी), वसई या २० कार्यालयांमध्ये ऑटोमोटीव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया, (ARAI) पुणे या संस्थेमार्फत वाहन निरीक्षण व परिक्षण केंद्र (Inspection & Certification Centre) स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

**************

3

**गृह (परिवहन) विभाग**

**लक्षवेधी सूचना क्र.१०१८**

# महाराष्ट्र विधानसभा
# सन-२०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१०१८ पुढील प्रमाणे आहे:-**

"माहे जानेवारी २०१७ दरम्यान राज्यामधील बस स्थानकांचा कायापालट करण्याकरिता १३ अत्याधुनिक बस पोर्ट बांधण्यात येण्याची घोषणा करणे, पहिल्या टप्प्यातील बस पोर्टकरिता १३ जागांची निवड करण्यात येणे, खासगी-सार्वजनिक भागीदारीतून त्याची उभारणी करण्यात येणे. त्याची देखभाल व दुरुस्ती "बस पोर्ट" उभारणारी संस्थाच करणार असल्याचे नमूद करणे.२०२२ पर्यंत एकही बस पोर्ट उभारण्यात न येणे, या बस पोर्टच्या बांधकामाची सध्याची परिस्थिती. महाराष्ट्रातील जुनी बस स्थानके व नव्याने बांधलेली बस स्थानकांची सध्याची अवस्था चांगली नसून प्रवश्यांची गैरसोय होत असणे. माझ्या मुख्यमंत्री काळात कराड बस स्थानकांची अत्याधुनिक इमारत बांधकाम करण्यात येणे, परंतु प्रवाश्यांच्या सोयीकरिता बसण्याची बाकडे तुटलेली असल्याने प्रवाश्यांची गैरसोय होणे. पावसाळ्यामध्ये पाणी साठत असल्याने व स्थानकाची देखभाल दुरुस्ती होत नसल्याने बस स्थानकांची मोडतोड व दुरावस्था होणे. शासनाने महाराष्ट्रातील बस स्थानकांच्या सोई व देखभाल दुरुस्तीकडे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## निवेदन
## {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (परिवहन)}

राज्यातील बसस्थानकांच्या आधुनिकीकरणाच्या मोहिमेअंतर्गत राज्यात विविध १३ ठिकाणी आधुनिक सुविधांनी युक्त बसतळ "बांधा-वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर उभारण्याच्या प्रस्तावास महामंडळ ठराव क्र.२०१६:०५:०६, दि.१८/०५/२०१६ नुसार मान्यता देण्यात आली आहे. सदर ठिकाणे खालील प्रमाणे आहेत:-

१)पनवेल (मुंबई), २)बोरीवली-नॅन्सीकॉलनी (मुंबई), ३)नाशिक- महामार्ग (नाशिक), ४)जळगाव (जळगाव), ५)धुळे (धुळे), ६)छत्रपती संभाजीनगर (छत्रपती संभाजीनगर), ७)नांदेड (नांदेड), ८)पुणे-शिवाजीनगर (पुणे), ९) कोल्हापूर (कोल्हापूर), १०)सांगली (सांगली), ११)सोलापूर (सोलापूर), १२)अकोला (अकोला), १३)नागपूर -मोरभवन (नागपूर).

"बांधा-वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वानुसार बस पोर्ट उभारण्याच्या प्रकल्पासाठी विकासक व रा.प. महामंडळ यांच्यातील करारानुसार विकासक देखभाल व दुरूस्ती करतो

१३ बसतळांपैकी छत्रपती संभाजीनगर व पनवेल या दोन प्रकल्पांना विकासकांचा प्रतिसाद प्राप्त झाला. उर्वरीत ११ ठिकाणी बऱ्याचदा निविदा कालावधी वाढवून देखील विकासकांचा प्रतिसाद प्राप्त झाला नाही.

रेग H/0055 (750 - 4 - 23) [हे.मो.पृ.

सदर १३ ठिकाणात छत्रपती संभाजीनगर सिडको बसस्थानकाचा समावेश होता. या ठिकाणी बसपोर्ट उभारणीची कार्यवाही सुरु आहे.

उर्वरित प्रकल्पांकरीता विकासक आणि प्रकल्प सल्लागार यांचे सोबत झालेल्या बैठकीत काळानुरुप रा.प.महामंडळाने अस्तित्वातील धोरणात काही सुधारणा प्रस्तावित केल्यास प्रकल्पांना प्रतिसाद प्राप्त होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले. त्याअनुषंगाने तत्कालिन मंत्री (परिवहन), यांनी सुधारीत धोरण तयार करण्याचे निर्देश रा.प.महामंडळास दिले. प्राप्त निर्देशांच्या अनुषंगाने नवीन नियमावली व आलेल्या अनुभवांच्या अनुषंगाने सुधारीत धोरण तयार करण्यात आले.

सुधारित ठिकाणे निश्चित करण्यात येत आहे. रा.प.महामंडळातर्फे 'बांधा वापरा व हस्तांतरीत करा' (B.O.T.) या प्रकल्पांकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पटलांवरील तज्ञ सल्लागार यांच्याकडून प्रकल्पांची विभागणी करुन त्वरीत निविदा प्रक्रियेबाबत कार्यवाही करणे आवश्यक असल्याने, नव्याने प्रकल्पाच्या निविदा प्रसारीत करणे करीता तांत्रिक सुसाध्यता, वाणिज्य उपलभ्यतेची पडताळणी करणे, वास्तुशास्त्रीय रेखांकन (Architectural design), प्रकल्प आखणी, निविदा प्रक्रिया, राबविण्यासाठी इ.गोष्टीकरीता कालावधी कमी आहे व प्रकल्पांची संख्या जास्त आहे. त्यामुळे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची निवड करणे अभिप्रेत आहे व त्याकरीता प्रथम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची निवड करणे करीता प्रक्रिया सुरु आहे.

सातारा विभागामध्ये कराड येथे नव्याने बांधणेत आलेल्या बसस्थानकामधील स्टील बेंचेसची मोडतोड झालेने सध्या बसस्थानकामध्ये प्रवाशांना बसण्याकरीता गैरसोय होत आहे, ही बाब खरी आहे. सदर बसस्थानकाचे उद्‌घाटन दि.०७/०१/२०१९ रोजी झाले आहे. उद्‌घाटना नंतर बसस्थानकामधील संपूर्ण आसन व्यवस्था व्यवस्थित होती, परंतु बस स्थानकावरील प्रवाश्यांकडून सदर बेंचेस चा वापर योग्य प्रकारे न झाल्याने सन २०२१-२२ च्या दरम्यान सदरचे स्टील बेंचेस तुटण्यास सुरुवात झाली.

सदर बेंचेस तुटलेने प्रवाशी तक्रारीमुळे स्टील बेंचेस पुन्हा वेल्डींग करुन दुरुस्ती करण्याचा महामंडळाकडून प्रयत्न करण्यात आले. परंतु त्याला फारसे यश आले नाही. व पुन्हा बेंचेस मोडू लागले. त्याकरीता त्यावर कायमचा उपाय म्हणून सदर ठिकाणी बेंचेस दुरुस्ती करण्याऐवजी त्याठिकाणी आरसीसी बेंचेस तयार करणेचे अंदाजपत्रक महामंडळाकडून तयार करण्यात आले.

सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी महामंडळाकडून देण्यात आलेली असून निविदा प्रक्रिया पूर्ण होताच सदरचे काम तातडीने हाती घेणेत येईल.

पावसाळ्यामध्ये बसस्थानक परिसरामध्ये पाणी साठत नाही. बसस्थानक इमारतीच्या तळघरामध्ये पार्किंगची व्यवस्था करणेत आलेली आहे. सदर ठिकाणी पावसाचे पाणी साठते. परंतू, सदरचे साठलेले पाणी काढणेसाठी मोटरची व्यवस्था करणेत आलेली आहे.

# महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशनामध्ये मान्य झालेल्या लक्षवेधी सूचनांचे जोडपत्रातील (अ.क्र.६) लक्षवेधी सूचना क्रमांक- १५६

डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. छगन भुजबळ, श्री. जयंत पाटील, श्री. रोहित पवार, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. शेखर निकम, श्री. संजय बनसोडे, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक- १५६ पुढीलप्रमाणे आहे -

"ठाणे जिल्ह्यातील ठाणे आणि भिवंडी तालुक्यात १८१ आणि मुरबाड तालुक्यात ११७ हेक्टर जमीन कोयना धरणग्रस्तांना जागावाटप करण्यासाठी मंजुर केलेली असणे, मात्र सदरची जमीन अद्यापही कोयना धरणग्रस्तांना वाटप केलेली नसल्याचे दि. १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी निदर्शनास आलेले असणे, मागील ६० वर्षापासून कोयना प्रकल्पग्रस्त पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असणे, कोयना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यास प्रशासनास अपयश आलेले असणे, कोयना प्रकल्पग्रस्तांसाठीच्या ठाणे जिल्ह्यातील जमीनीवर वर्षानुवर्षे असलेले अतिक्रमण दुर करण्यात आलेले असणे, सदरची जागा कोयना धरणग्रस्तांना वेळीच वाटप न केल्यास सदर जागेवर पुन्हा भूमाफियांकडून अतिक्रमण होणार असतांनाही यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केली जात असणे, सदरची जागा लवकरात लवकर वाटप करण्यासाठी कोयना धरणग्रस्तांनी मा. मुख्यमंत्री, मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे दि. १७ फेब्रुवारी, २०२३ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतांनाही यासंदर्भात आवश्यक उपाययोजना करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कोयना प्रकल्पग्रस्तांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, सुमारे ६० वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असलेल्या कोयना प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात निर्णय घेऊन त्याची त्वरेने अंमलबजावणी करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

कोयना प्रकल्पातील ४६६ प्रकल्पग्रस्तांना ठाणे जिल्ह्यात ठाणे तालुक्यामध्ये ६८.३२४ हे. आर., भिवंडी तालुक्यामध्ये ५४६.८०५ हे. आर. व शहापूर तालुक्यामध्ये १३०.३५० हे. आर. असे एकूण ७४५.४७.९ हे. आर पर्यायी जमिन वाटप केलेली आहे. सदर ४६६ प्रकल्पग्रस्तांपैकी ३०० प्रकल्पग्रस्तांना पुर्णतः जमिन वाटप केलेली असून, १६६ प्रकल्पग्रस्तांना अंशतः जमिन वाटप केलेली आहे. सदर १६६ पैकी ११७ प्रकल्पग्रस्तांस मौजे मासले, ता. मुरबाड येथे १११.६७.० हे. आर शासकीय जमीन वाटप आदेश केले होते. मात्र स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांचे तीव्र विरोधामुळे अद्याप कब्जा देता आलेला नाही. त्यामुळे सदर ११७ प्रकल्पग्रस्तांपैकी काही प्रकल्पग्रस्त अन्य ठिकाणी जमिन मागणी करत असून त्यानुसार प्राप्त होणा-या अर्जाप्रकरणी प्रचलित नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच कोयना प्रकल्पग्रस्तांसाठी ठाणे जिल्ह्यातील ठाणे व भिवंडी तालुक्यामध्ये राखीव ठेवलेल्या जमिनीवरील बांधकामाची अतिक्रमणे निष्कासीत करण्यात आलेली असून उर्वरीत शेतीचे अतिक्रमण काढण्यात येत आहेत.

वास्तविकत: सातारा जिल्ह्यातील कोयना प्रकल्प राज्यातील सर्वात जुना प्रकल्प असून या प्रकल्पाच्या कामास १९५३ साली सुरुवात होवून सन १९६७ साली पूर्ण झालेला आहे. कोयना प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाबाबत तत्कालीन मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील दि. १९/०३/२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार कोयना प्रकल्पग्रस्तांचे संकलन रजिस्टर तयार करणेसाठी जिल्हाधिकारी, सातारा यांचे अध्यक्षतेखाली विशेष कृती गट स्थापन करण्यात आलेला आहे. सदर कृती गटाच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कोयना प्रकल्पाच्या अनुषंगाने झालेले सर्व बुडीत क्षेत्राचे सर्व निवाडे उपलब्ध करून घेण्यासाठी संबंधीत विशेष भूमी संपादन अधिकारी, कार्यकारी अभियंता कोयना प्रकल्प, पुनर्वसन अधिकारी सातारा यांचे कार्यालय, उपविभागीय अधिकारी, पाटण अशा विविध कार्यालयामधील अभिलेखांचा शोध घेवून कोयना प्रकल्पाच्या अनुषंगाने करण्यात

आलेले निवाडे प्राप्त करून घेतले आहेत. सदर उपलब्ध निवाड्यांमध्ये नमुद खातेदार त्यांचा स.नं. व बुडीतात गेलेले क्षेत्र याची माहिती उपलब्ध झाली. त्याअनुषंगाने संकलनाचा भाग १ प्रारुप प्रसिध्द करुन त्यावर उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत हरकती मागविणेत आल्या होत्या. त्यानंतर सदर संकलन भाग १ अंतिमत: प्रसिध्द करण्यात येवून त्या माहितीनुसार कोयना प्रकल्प बुडीत क्षेत्रातील एकूण प्रकल्पग्रस्त खातेदार निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच कोयना प्रकल्प हा जलविद्युत प्रकल्प असल्याने या प्रकल्पाला लाभक्षेत्र नाही. त्यामुळे सदर प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना सातारा, सांगली, सोलापूर, रायगड, रत्नागिरी, ठाणे व पालघर या जिल्ह्यामध्ये ४० ते ५० वर्षांपासून पर्यायी जमीन वाटप करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने कोयना प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या पर्यायी जमीनीची माहिती संकलीत करताना सातारा जिल्ह्यातील सर्व संबंधीत तालुके तसेच ठाणे, रायगड, रत्नागिरी, पालघर, सांगली व सोलापूर या जिल्ह्यांकडून मुळ प्रकल्पग्रस्त अथवा त्यांचे वारसांना संबंधीत जिल्ह्यामध्ये झालेल्या पर्यायी जमीनीचे वाटप अभिलेखे तपासून उपलब्ध करून देण्याबाबत कळविणेत आले होते. त्याअनुषंगाने संबंधित जिल्ह्यांकडून वेळोवेळी माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. कोयना प्रकल्पग्रस्तांना वाटप करणेत आलेल्या पर्यायी जमीनीची माहिती तपासणी करुन एकत्रित करणेकामी काही जिल्ह्यात पथके नेमण्यात आली होती. त्यानुसार सदर माहिती एकत्रित करून वाटपाबाबतची माहिती संकलनामध्ये अद्यावत करणेत येत असून त्यानुसार जमीन वाटप केलेल्या प्रकल्पग्रस्तांचे मुळ खातेदारांशी नाते जुळले अथवा मुळ खातेदारास पर्यायी जमीन वाटप झाली असल्याबाबत माहिती प्राप्त होत आहे अशा खातेदारांच्या समोर पर्यायी जमीन वाटपाबाबतची माहिती अद्यावत करण्यात येत आहे.

तसेच सद्यस्थितीत महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि. १४/०६/२०२२ नुसार प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटप करण्याची कार्यपद्धती / प्राधान्यक्रम विहीत करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मा. मुख्यमंत्री महोदयांनी विधानमंडळ हिवाळी अधिवेशन, २०२२ मध्ये दिलेल्या आश्वासनानुसार कोयना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन संबंधित प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी मा. मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) तथा पालकमंत्री सातारा यांच्या अध्यक्षतेखाली दि. १३/०१/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चस्तरीय समन्वय समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

---

महाराष्ट्र विधान सभा सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सुचना क्र. २०३

श्री. विजय वडेट्टीवार,श्री.सुनिल केदार, श्री. अस्लम शेख वि.स.स. यांनी चंद्रपूर जिल्हयात वेस्टर्न कोल्ड फिल्ड कंपनी अंतर्गण एकोणा ओपन कोळसा खाणीबाबात महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सुचना खालीलप्रमाणे आहे.

"चंद्रपूर जिल्हयात वेस्टर्न कोल्ड फिल्ड कंपनी अंतर्गत एकोना ओपन कोळसा खाणीसाठी मौजा वनोजा, चरुरखटी, मार्डा व एकोना गावातील जमीन भुसंपादित करण्यात येणे, त्या जागेवर ओपन कोळसा खाण सुरू करण्यात येणे, मात्र एकोना व माड गावातील शेतकऱ्यांच्या जमीनी अघापही भुसांपादित करण्यात न येणे, तसेच मौजा ऐकोणा, मार्डा, वनोजा व चरूरखटी गावाचे अघापही पुनरवर्सन करण्यात आलेले नसल्यामुळे शेकडो नागरिक अघापही त्या गावात राहत असणे, त्यामुळे एकोणा ओपन कोळसा खाणीमूळे होणारे प्रदुषर्ण व कोहसा वाहतुकीमूळे होणारे प्रदुषणामुळे नागरिकांचे आरोगया धोक्यात आले असून अनेकांना श्वसनाचे, दमाचे यासह अनेक आजार उदभवने तर शेतकऱ्यांची शेती सुध्दा कोळशाच्या धुळीमूळे संपूर्ण पिक खराब होऊन नष्ट होत असल्याने शेतकऱ्यासह त्यांच्या कुटूंबाना आर्थीक व माणसिक त्रास करावा लागत असणे, कोळसा खदानीत होणाऱ्या विस्फोटामूळे नागरिकांच्या घराला तडे जात असून केव्हाही घरे कोसळून जिवित हाणी सुध्दा होण्याचा धोका असणे, या गंभीर प्रकराची तक्रार व निवेदन एकोण कोयला खदान संघर्ष समितीच्या वतीने मुख्य प्रबंधक निर्देशक वेस्टर्न कोलफिल्ड लि नागपूर व जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना वेळोवेळी देण्यात येणे, मात्र मात्र सदर तक्रारीवर कोणतीच कार्यवाही होत नसल्याने याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामूळे शेतकऱ्यासह नागरिकात पसरत असलेले असंतोष व सतांपाचे वातावरण परिणामी याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.'

## मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

Amalgamated Yekona I & II खुली खदान चे स्विकृत प्रोजेक्ट रिपोर्ट मध्ये एकुण १७०१.३२ हे. आर जमीन संपादित करण्याची तरतुद करण्यात असुन, त्यापैकी १६५०.३२ हे. आर जमीन CBA (A & D) Act १९५७ अन्वये संपादित करण्यात आली आहे. सदर जमीनीचा महाराष्ट्र शासन निर्णय २०१२ अन्वये जे दर ठरविण्यात आले त्यानुसार ३१३.८० कोटी रुपये मोबदला देण्यात आलेला असून उर्वरित ५० हे. आर जमीन संपादित करण्याची प्रक्रीया सुरु आहे. सदर जमीन ही रेल्वे साईडिंग, कर्मचारी यांचे वसाहतीकरीता व मार्डा गावाचे पुनर्वसनासाठी संपादित करण्यात येणार आहे. याव्यतीरीक्त कोणत्याही जमीनीचे संपादन शिल्लक नाही. कोल इंडीया R & R पॉलीसीनुसार एकुण ८८९ लोकांना नोकरी/अनुदान देण्यात आले आहेत . सदर कोळसाखाणी करीता MOEF व्दारा पर्यावरण मंजुरी दि.०१/०१/२०२१ रोजी प्राप्त झाली. त्यानंतर DGMS केंद्रीय कामगार मंत्रालय यांना वेकोली माजरी एरीया व्दारा नोटीस ऑफ ओपनिंग देण्यात आला. त्यानंतर नियमानुसार कोळसा खदान सुरु करण्यात

आली. CBA (A & D) Act १९५७ अन्वये एकोणा गावातील एकुण ६५०.८५ हे. आर पैकी ३१२.१९ हे. आर व मार्डा या गावातील एकुण ८११.८२ हे. आर पैकी ६०५.९३ हे. आर जमीन संपादित करण्यात आली आहे. स्विकृत प्रोजेक्ट रिपार्ट नुसार फक्त मार्डा या गावाचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्यासाठी Base Line Socio Economic Survey करण्याची प्रक्रीया सुरु आहे. तसेच एकोणा, वनोजा व चरुरखटी हे गावे प्राजेक्ट हददीचे बाहेर असल्यामुळे त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार नाही. भविष्यात खदानीचा विस्तार झाल्यास आवश्यकतेनुसार पुनर्वसन करण्यात येईल.

एकोणा कोळसा खाणीपासून वनोजा व चरुरखटी हे गाव अंदाजे ३ ते ४ कि. मी. दुर आहे. तसेच एकोणा हे गाव खाणीपासुन ७५० मिटर दूर असुन वाहतुकीमुळे होणारे प्रदुषण टाळण्याकरीता दररोज रस्त्यावर पाणी मारण्यात येते, वाहतुक करतांना वाहनावर ताडपत्रीने झाकुन नेण्यात येते आणि कोळसा खाणीत कोल स्टॉक जवळ Fog Canon तसेच Water Sprinkler ची व्यवस्था करण्यात आलेली आहे त्यामुळे धुळ निघत नाही. कोळसा खदानीच्या चारही बाजुला थ्रीलेअर प्लॅन्टेशन करण्यात येत आहे. Continuious Ambient Air Quality Monitoring Station स्थापन करण्यात आले. तसेच एकोणा, मार्डा व वनोजा येथे मागील ३ वर्षापासुन दरवर्षी दोन वेळा वैदयकीय कॅम्प लावुन नागरीकांचे आरोग्याची तपासणी करण्यात येते. त्यानुसार कोणालाही श्वसनाचे दमाचे आजार आढळून आलेले नाही. कोळशाची धुळ कमी करण्याकरीता करण्यात आलेल्या उपाययोजनामुळे एकोणा कोळसा (Mine Working) खाणीमुळे कोणत्याही शेतक-यांचे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता नाही. एकोणा कोळसा खाणीत ब्लास्टींगची प्रक्रीया पुर्णपणे DGMS च्या दिशानिर्देशाप्रमाणे खाणीमध्ये सर्व सुरक्षा मापदंडाची अंमलबजावणी केली जाते.

एकोणा गाव हे एकोणा १ या खाणीपासुन १.५ कि. मी. दुर आहे. एकोणा २ या खाणीपासुन ७५० मिटर दुर आहे. त्यामुळे ब्लास्टींग करतांना कोणताही धोका होण्याची शक्यता नाही. तसेच गाव व खदान यामध्ये एक उंच तटबंध (Embankment) बनलेला असल्याने विस्फोटामुळे नागरीकांच्या घराला तडे जात आहे किंवा नाही याबाबत अभ्यास करण्यासाठी आणि एकोणा कोयला खदान संघर्ष समितीच्या वतीने मुख्य प्रबंधक निर्देशक वेकोली नागपुर व जिल्हाधिकारी चंद्रपुर यांना निवेदनाच्या अनुषंगाने मा. पालक मंत्री चंद्रपुर जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली व मा. जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचे उपस्थितीत दिनांक २८/११/२०२२ रोजी बैठक घेण्यात आली असून त्यात मा. जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचे निर्देशाप्रमाणे वेकोली व्दारा सायंटीफीक स्टडी करीता VNIT नागपुर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच वेकोली व्दारे संबंधीत मुदयावर कार्यवाही सुरु असून त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

*****

महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशनामध्ये मान्य झालेल्या लक्षवेधी सूचनांचे जोडपत्रातील (अ.क्र.८) लक्षवेधी सूचना क्रमांक- १४६८

श्री. समाधान अवताडे, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक- १४६८ पुढीलप्रमाणे आहे -

"सोलापूर जिल्ह्यातील तत्कालीन उपजिल्हाधिकारी पुनर्वसन व तहसीलदार व महसूल विभागातील कर्मचारी यांनी सन २०१६ ते सन २०२० च्या दरम्यान पदाचा दूरपयोग करून पुनर्वसन जमिनी व भूखंड दुबार वाटप करून सुमारे ५०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, सदर भूखंड अथवा जमिनी सन १९८८ ते २०१२ या उजनी व सातारा जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना पुनर्वसन कायद्याअंतर्गत वाटप करण्याचे शासनाचे आदेश असणे, सदर रहिवासी भूखंडाचे / जमिनीचे वाटप सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील मौजे सिद्धापूर व त्याच्या सभोवतालच्या गावांमध्ये तसेच पंढरपूर तालुक्यात, उत्तर सोलापूर तालुक्यात तर काही मोहोळ तालुक्यात झालेले असणे, पुनर्वसन कायद्याप्रमाणे एखाद्या जमीन अथवा भूखंडाचे वाटप केल्यास त्याच प्रकल्पग्रस्तास दुबार जमीन किंवा भूखंड वाटप करता येत नसणे असा कायदा असताना देखील तत्कालीन उपजिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी व पुनर्वसन जिल्हाधिकारी यांनी संगणमताने पूर्वी वाटप झालेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कागदोपत्री हेराफेरी करून दुपार शेतजमिनी व एका प्रकल्पग्रस्तास पाच पाच भूखंड वाटप केल्याचे निदर्शनास येणे, उदाहरण दाखल पूर्वी झालेल्या आदेशाची यादी व पदाचा गैरवापर करून शेत जमिनी व भूखंडाची दुबार वाटप केलेले ची माहिती खालील प्रमाणे असणे, अ.क्रप्रकल्पग्रस्त शेतकर्यांची नावे आदेश तालुका गाव गट क्र१ श्रीपती सीताराम वाडकर व इतरक्र. पुनव/फे/ सी. आर. दि. १९९० मंगळवेढा ४३५५/२ ब २ मारुती कोंडीबा पवार व नथुराम मारुती पवार व इतर क्र.पुनव/३,एस आर/०२/१०/आरआर/२५७/१० उतर सोलापूर बेलाटी१४६/०२३ कोंडीबा गेनू शेंडगे व ज्ञानदेव कोंडीबा शेंडगेक्र.पुनव/३/आर आर /५१७/१०/आर आर/६/२०१० उत्तर सोलापूर भाटेवाडी १९/१ पैकी४ श्रीमती तनु पांडू वरवडे व मारुती पांडू वरवडे क्र. पुनव/३/आर आर/९७/१० इसार/१७६/१० इ.०३/०५/२०१० मंगळवेढामंगळवेढा ४३५५/२अ२ पदाचा गैरवापर करून भूखंडाचा दुबार वाटप त्याच व्यक्तीच्या नवे केल्याची यादी अ.क्रप्रकल्पग्रस्त शेतकर्यांची नावे आदेश तालुका गाव गट क्र१ श्रीपती सीताराम वाडकर व इतरक्र.पुनव/फे/सी.आर दि.१९९० मंगळवेढा सिद्धपुर फेरफार ३३०४ ने नोंद२९० व २६३ व २४४ २ मारुती कोंडीबा पवार व नथुराम मारुती पवार व इतर क्र. पुनव/३,एस आर/०२/१०/आरआर/२५७/१० मंगळवेढा सिद्धपुर फेरफार ३३१२ ने नोंद३०४ क्षेत्र १.२१ आर व ३८२ क्षेत्र १.२३ आर ३ कोंडीबा गेनू शेंडगे व ज्ञानदेव कोंडीबा शेंडगेक्र. पुनव/ ३/आर आर/५१७/१०/आर आर/६/२०१०मंगळवेढा सिद्धपुर फेरफार ३४४० ने नोंद४४३ ४श्रीमती तनु पांडू वरवडे व मारुती पांडू वरवडे क्र.पुनव/३/आर आर/९७/१० इसार/१७६/१० इ.०३/०५/२०१० मंगळवेढासिद्धपुर ६६१तत्कालीन उपजिल्हाधिकारी पुनर्वसन यांनी चक्क सरकारी जमिनीचे दुबार वाटप करण्यासाठी एकरी दोन लाख ते पाच लाख रुपये असे दर ठरवून दलाला मार्फत सदर रक्कम घेऊन तालुक्यातील शेत जमिनी व भूखंड वाटप करण्याचे काम निर्धास्तपणे केलेले असणे, तसेच सन २०१६ ते २०२० च्या दरम्यान महसूल विभागातील अनेक अधिकारी, वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी स्वतः कागदोपत्री हेराफेरी करून मोठ्या प्रमाणावर शासकीय भूखंड विकत घेतले असणे, याबाबतची अधिक माहिती मिळवण्याकरता माहिती अधिकार अंतर्गत अर्ज दाखल केला असता संबंधित विभागातील अधिकाऱ्यांकडून वारंवार दिरंगाई करून टाळाटाळ केला जात असल्याचे देखील निदर्शनास येणे, तसेच पुरावे सादर करून देखील तक्रारदारास चुकीची माहिती उपलब्ध करून देणे, वारंवार वरिष्ठांकडे तक्रार करून देखील सदर प्रकरणी साधी चौकशी देखील केली नसल्याची निदर्शनास येणे, याकरता शासनाने पुनर्वसन अंतर्गत सन २०१६ पासून ते २०२० पर्यंत सोलापूर जिल्ह्यातील वाटप करण्यात आलेल्या सर्व जमीन व भूखंडाचे रेकॉर्ड त्वरित जप्त

रोटा H/164 (750-4-23)

करून त्याची सखोल चौकशी करून शासनाची फसवणूक करून कोट्यावधींचे नुकसान केलेल्या संबंधित तत्कालीन अधिकारी व कर्मचारी यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशी करण्याची आवश्यकता व शासनाने करावयाची कारवाई."

---

मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

सोलापूर जिल्ह्यातील उजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये उत्तर सोलापूर, मंगळवेढा, पंढरपूर, मोहोळ, माढा व माळशिरस या तालुक्यातील गावांचा समावेश होतो. सातारा जिल्ह्यातील कोयना प्रकल्पास लाभक्षेत्र नाही तसेच धोम, वीर, कण्हेर, नागेवाडी इत्यादी प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामध्ये पात्र प्रकल्पग्रस्तांना वाटप करणेकामी पुरेशी जमीन उपलब्ध नसल्याने सन १९८० पासून सोलापूर जिल्ह्यातील उजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये सातारा जिल्ह्यातील पात्र प्रकल्पग्रस्तांना जमीन व भूखंड वाटप करण्यात येत आहे.

सोलापूर जिल्ह्यातील तत्कालीन उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) तसेच तत्कालीन मंडळ अधिकारी (पुनर्वसन) यांचे विरुध्द पुनर्वसन जमीनी व भूखंड दुबार वाटप करण्याच्या विविध तक्रारी वेळोवेळी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत प्रत्येक प्रकरणी पडताळणी करुन तथ्य आढळल्यास दुबार जमीन अथवा भूखंड वाटप रद्द करणेत आलेले आहे.

सदर लक्षवेधी सूचनेमध्ये नमूद चार प्रकरणाबाबत वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रकल्पग्रस्ताचे नाव व मुळ गाव | वाटप आदेश दिनांक | वाटप गाव व क्षेत्र | ७/१२ सदरी अंमल झाला का | आदेशाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १. | मारुती कोंडीबा पवार म. वा. नथुराम मारुती पवार व इतर रा. धावली ता. वाई | दि. ०८/१२ /१९८९ | मौजे सिध्दापूर, ता. मंगळवेढा गट नं. ४४३ पै क्षेत्र ०.८१ हे आर | सन २०१९ मध्ये झाला | सदर आदेश हे अपर जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन (जमीन) सोलापूर यांनी रद्द करून सदर जमीन गटांच्या अधिकार अभिलेखात शासनाचे नावांची नोंद पूर्ववत दाखल झाली आहे. |
| | | दि. १०/११ /२०१० | मौजे बेलाटी ता. उत्तर सोलापूर गट नं. ९४६ ब पै क्षेत्र २.४१ हे आर | सन २०११ मध्ये अंमल झाला | सदर आदेश आज रोजी कायम आहेत. |
| २. | कोंडीबा गेणू शेंडगे व ज्ञानदेव कोंडीबा शेंडगे व इतर रा. धावली ता. वाई जि. सातारा | दि. ०८/१२ /१९८९ | मौजे सिध्दापुर ता. मंगळवेढा गट नं. ४४३ पै क्षेत्र ०.८१ हे आर | सन २०१९ मध्ये झाला | सदर आदेश हे अपर जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन (जमीन) सोलापूर यांनी रद्द करून सदर जमीन गटांच्या अधिकार अभिलेखात शासनाचे नावांची नोंद पूर्ववत दाखल झाली आहे. |
| | | दि. १०/११ /२०१० | मौजे, बेलाटी ता. उत्तर सोलापूर गट नं. ९४६ब पै क्षेत्र २.४१ हे आर | सन २०११ मध्ये अंमल झाला | सदर आदेश आज रोजी कायम आहेत. |
| ३. | श्रीमती तानु पांडु वरकडे म.वा. मारुती पांडु वरकडे व इतर रा. धावली ता. वाई जि. सातारा | दि. ३०/०३ /१९९१ | मौजे, सिध्दापूर ता. मंगळवेढा गट नं. २६१ पै क्षेत्र १.२१ हे आर | अंमल झाला नव्हता | सदर आदेश हे अपर जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन (जमीन) सोलापूर यांनी रद्द करुन सदर जमीन गटांच्या अधिकार अभिलेखात शासनाचे नावांची नोंद कायम ठेवली आहे. |
| | | दि. ०८/०७ /१९९२ | मौजे. मंगळवेढा ता. मंगळवेढा गट नं. ४३५५/२/२ क्षेत्र १.२१ हे आर | सन १९९३ मध्ये अंमल झाला | सदर आदेश आज रोजी कायम आहेत. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | रामचंद्र सीताराम वाडकर म.वा. हणमंत श्रीपती वाडकर व इतर रा. धावली ता. वाई | दि. २५/०८ /१९८९ | मौजे. सिध्दापूर ता. मंगळवेढा गट नं. २९० पै क्षेत्र १.२२ हे आर. गट नं. २९३ पै क्षेत्र ०.४२ हे आर आणि गट नं. २४४ पै क्षेत्र ०.२५ हे आर | सन २०१९ मध्ये अंमल झाला. | सदर आदेश हे अपर जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन (जमीन) सोलापूर यांनी रद्द करुन सदर जमीन गटांच्या अधिकार अभिलेखात शासनाचे नावांची नोंद पूर्ववत दाखल झाली आहे. |
| | | दि. २७/०३ /१९९१ | मौजे. मंगळवेढा ता. मंगळवेढा गट नं. ४३५५ पै क्षेत्र २.०२ हे आर | सन २०१९ मध्ये अंमल झाला. | सदर आदेश आज रोजी कायम आहेत. |

उपरोक्त चारही प्रकरणी प्रकल्पग्रस्तांना सन १९८९- १९९१ कालावधीत पर्यायी जमीन वाटप झालेल्या आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन ) सोलापूर यांनी सन २०१९ मध्ये कब्जे देण्याबाबत आदेश निर्गमित केले होते. तथापी, सदर प्रकल्पग्रस्तांना दुबार जमीन वाटप झाल्याने दिलेले आदेश हे अपर जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन (जमीन) सोलापूर यांनी रद्द करुन सदर जमीन गटांच्या अधिकार अभिलेखात शासनाचे नावांची नोंद पूर्ववत दाखल झाली आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यात प्रकल्पग्रस्तांना जमीनी व भूखंड दुबार वाटप करण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अशा प्रकारच्या प्रकरणी सखोल चौकशी करुन तत्कालीन उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) यांचे कार्यकाळातील एकुण ४३ जमीन वाटप आदेश आज अखेर रद्द करणेत आलेले आहेत.

त्यासंदर्भात तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर तसेच तत्कालीन मंडळ अधिकारी (पुनर्वसन) यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेत आलेली आहे. त्यानुसार तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम १९८१ चे नियम १० अन्वये विभागीय आयुक्त कार्यालय यांचेकडून विभागीय चौकशीची कार्यवाही ज्ञापन दि. ०३/०८/२०२२ अन्वये सुरु करण्यात आली होती. तथापि सदर अनियमितता गंभीर स्वरुपाची असल्याने प्रस्तुत विभागीय चौकशी प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील, १९७९ चे नियम ८ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार चौकशी करणे आवश्यक होते. त्यानुसार विभागीय आयुक्त कार्यालय (महसुल) शाखा, पुणे विभाग, पुणे यांचेकडून दिनांक २८/०२/२०२३ अन्वये तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर यांचे विरुध्द विभागीय चौकशीबाबत महसुल विभागास प्रस्ताव सादर केलेला आहे.

---

महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय )अधिवेशन
लक्षवेधी सूचना क्रमांक- १८२४

**मा. श्री. रवि राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचना क्रंमाक १८२४ पुढीलप्रमाणे आहे:-**

" विभागीय आयुक्त अमरावती यांनी त्यांचे कार्यालयाचे स्मरणपत्र क्रमांक माहे जानेवारी २०२३ चे दरम्यान शासनास सादर केलेला प्रस्ताव या अगोदर दिनांक २४/११/२०२०व त्यानंतरची स्मरणपत्र क्रमांक डिसेंबर २०२२ च्या दरम्यान तालुका भातकुली जिल्हा अमरावती प्रकल्पातील सावरखेडा ततारपुर अंशतः बाधीत गावांचे १००% पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला असणे त्या प्रस्तावामध्ये अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील प्रकल्पाला जो मोबदला दिला तो मोबदला व तोच न्याय पेढि प्रकल्पातील लाभधारकांना देण्याबाबत संबंधित पेढी प्रकल्प ग्रंस्ताची मागणी केली असणे वारंवारं शासनाचे माननीय मंत्री महोदय व विभागास निवेदन दिले असूनही अद्याप पर्यंत शासनाकडून कोणत्याही प्रकारची करवाई झाल्याचे दिसून न येणे.पेढी प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडे वारंवार मागणी केली असणे व त्या मागणीद्वारे धरणांचे काम पूर्ण करून सुरु करणे, काही गावांचे पुनर्वसन करण्याचे आदेश देण्याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांचे कडे दिलेल्या निवेदनात आमरण उपोषणाचा इशारा दिला असणे. तातडीने वरीप्रमाणे निर्णयात्मक आदेश करण्याकरिता या संबंधाने शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका वा प्रतिक्रिया "

---

## मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

निम्न पेढी हा मोठा प्रकल्प अमरावती जिल्हयातील भातकुली तालुक्यातील मौजे निंभा गावाजवळ पेढी नदीवर बांधण्यात येत आहे. निम्न पेढी प्रकल्पास दि.१२.०८.२००४ अन्वये मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त असून दि.०१.९.२०१८ अन्वये रु.१६३९.४३ कोटी किमंतीची सुधारीत प्र.मा.प्रदान करण्यात आली. सदर प्रकल्प मा.राज्यपाल यांच्या अनुशेष निर्मुलन व प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेमध्ये २००८ पासून अंतर्भूत आहे. निम्न पेढी प्रकल्पाद्वारे ७५.२६६ दलघमी पाणीसाठा निर्मिती होणार असून सुमारे १०१९२ हे. लाभक्षेत्राला सिंचनाचा व पिण्याच्या पाण्याचा लाभ होणार आहे. निम्न पेढी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात मौजे अळणगाव,गोपगव्हाण,हातुर्णा,कुंड सर्जापूर व कुंडखुर्द ही ५ गावे पूर्णत: बाधित होत असून मौजे सावरखेड व ततारपूर ही २ गावे अंशत: बाधित होतात. पूर्णत: बाधित होणाऱ्या पाचही गावांच्या नागरी सुविधांचे कामे पूर्ण होऊन सदर नागरी सुविधा जिल्हा परिषदेस जून २०२२ मध्ये हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत.

मौजे सावरखेड व ततारपूर या दोन गावांचा पुनर्वसनाबाबत शासनाच्या दि.१७/०२/२०२१ च्या निर्णयानुसार निम्न पेढी प्रकल्पाचा पाश्वःजल अभ्यासानुसार मौजे सावरखेड व ततारपुर ही दोन गावे पुर्णत: बाधित होत असून या दोन गावांचा पुनर्वसनाचा प्रस्ताव मौजे, सावरखेड व ततारपुर या बाधीत गावांचा १००% पुनर्वसनाचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त,अमरावती यांच्या मार्फत दि. ०७ / ०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये विभागास प्राप्त झाला आहे.

निम्न पेढी प्रकल्पाची कलम ११(१) ची अधिसूचना दिनांक २२.०९.२००५ व शुध्दीपत्रक दि.२३.११.२००६ , कलम १३(१) ची अधिसूचना दिनांक २१.१२.२००६ रोजी तसेच कलम १३(३) ची अधिसूचना दिनांक ०७.०६.२००७ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन

अधिनियम १९९९ मधील तरतूदीन्वये करण्यात आलेली आहे.तथापि ,भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क(महाराष्ट्र) नियम २०१४ मधील नमूद नियम १७ मध्ये खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.

> नियम १७ - पुनर्वसन व पुनर्स्थापना विषयक घटक- (१) ज्या प्रकल्पांच्या संबंधात अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) खालील प्रारंभिक अधिसूचना काढण्यात आली असेल अशा प्रकल्पातील बाधित कुटूंबेच केवळ अधिनियमाच्या दुसऱ्या व तिसऱ्या अनुसूचीनुसार पुनर्वसन व पुनर्वसाहतीचे घटक म्हणून विचार केला जाण्यासाठी पात्र ठरतील.

भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या प्रारंभापूर्वी महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम,१९८६(१९८९ चा महा.३२) आणि त्याद्वारे निरसित करण्यात आलेला महाराष्ट्र प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची पुनर्स्थापना अधिनियम १९७६ (१९७६ चा महा.४१) यांच्या तरतुदी आणि ज्याद्वारे १९८६ च्या उक्त अधिनियमास निरसित करण्यात आले त्या महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ (२००१ चा महा.११) यांच्या तरतूदी ज्यांना लागू असतील अशी प्रकल्पबाधित कुटुंबे अधिनियमाच्या दुसऱ्या व तिसऱ्या अनुसूचीनुसार पुनर्वसन व पुनर्वसाहतीचे घटक म्हणून विचार केला जाण्यासाठी पात्र ठरणार नाहीत. निम्न पेढी प्रकल्पातील बाधित कुटूंबांच्या पुनर्वसना करिता महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील तरतूदी लागू असल्याने प्रकल्पग्रस्तांना नवीन भूसंपादन कायदा २०१३ च्या तरतूदीन्वये पुनर्वसनाचे लाभ व त्यानुसार सुविधा उपलब्ध करुन देता येत नाही.

*************************************************************************************************

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन
## लक्षवेधी सूचना क्रमांक- १९३४

श्री. संतोष बांगर, श्री. नामदेव ससाणे वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक-१९३४ पुढीलप्रमाणे आहे

"देवसरी ता.उमरखेड, जि.यवतमाळ या गावातील पूरग्रस्त बाधित कुटुंबाच्या वस्तीचे शासनाने मंजूर केलेल्या मौजे आंबवण, ता. उमरखेड येथील जागेचे पुनर्वसन मागील १७ वर्षापासून रखडले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी उघडकीस येणे, सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे व पैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे दिवसरी गावामध्ये पाणी शिरुन १८७ कुटूंबांच्या घरांचे पडझड होऊन मोठया प्रमाणात नुकसान होणे, याप्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्कालीन जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी मा. सचिव, मदत पुनर्वसन विभाग यांना आधित १८७ कुटूंबांचे पुनर्वसन करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करणे, सदरील प्रस्तावाच्या अनुषंगाने बाधित कुटूंबांचे पुनर्वसन मौजे आंबवण, ता. उमरखेड, जि.यवतमाळ येथे सर्व सोयीसुविधांसह प्रस्तावित केलेला आहे. परंतु याबाबत १८७ कुटूंबांना न्याय मिळण्यास आजपावेतो विलंब होत असणे, मागील अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२२ मध्ये विधीमंडळ सभागृहात तारांकित प्रश्न क्रमांक ३८१८६, दि.०७/०३/२०२२ रोजी उपस्थित केला असता तत्कालीन मदत व पुनर्वसन मंत्री यांनी सदरील बाधित कुटूंबाचे पुनर्वसन नियमात बसत असल्याने पुढील एका महिन्यामध्ये बाधित कुटूंबाचे पुनर्वसन करण्यात येईल असे आश्वासन दिले असणे, परंतु याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे आढळून येणे, परिणामी बाधितांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व चिंता निर्माण होणे, त्यानुषंगाने शासन निर्णय दि.१४/१०/२०२२ नुसार जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडून पत्र क्रमांक जिपूर्व/अ.का.१/कावि/१२३/२०२३ या दि.०८/०२/२०२३ रोजी उपसचिव मदत व पुनर्वसन मंत्रालय यांच्याकडून शासनास पुन्हा प्रस्ताव सादर करण्यात आला असणे, जिल्हाधिकारी यवतमाळ यांनी देवसरी येथील बाधित कुटूंबाचे मौजे आंबवणं, ता.उमरखेड, जि.यवतमाळ येथील नवीन जागेवर स्थलांतरीत करुन गावातील बाधित कुटूंबाचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याबाबत आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण निर्णय घेईल, असे शासनास पाठविलेल्या प्रस्तावात नमूद केले असणे, करीता १८७ बाधित पूरग्रस्त कुटुंबाचे पुनर्वसन त्वरीत करण्याबाबत व त्यांचेवर होणारा अन्याय दूर करुन बाधिताना दिलासा देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

### मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे व पैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे मौजे देवसरी ता. उमरखेड जि.यवतमाळ गावामधील १८७ कुटूंबांपैकी ९९ दलीत कुटूंबे बाधित झाली आहे. त्याअनुषंगाने शासन निर्णय दि.२३/०३/१९८४ अन्वये मौजा आंबवण येथील गट क्र.६ ई वर्ग-२ क्षेत्रफळ ५.८१ पैकी ३.०० हे आर जमीनीवर पुनर्वसन करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. तथापि सदर प्रस्ताव पुनर्वसन धोरणानूसार नसल्याने दि.१४/११/२०१८ अन्वये अमान्य करण्यात आला.

शासन निर्णय १४/१०/२०२२ च्या तरतुदीनूसार मौजे देवसरी येथील ९९ बाधित कुटूंबांचा पुनर्वसन प्रस्ताव सादर करणेबाबत दि.२८/१०/२०२२ च्या शासन पत्रान्वये विभागीय आयुक्त, अमरावती यांना निदेश देण्यात आले होते. त्यानूसार जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी आंबवन येथील ३.०० हे क्षेत्रावर मौजा देवसरी येथील ९९ कुटूंबाचे पुनर्वसन करणेबाबतच्या प्रस्ताव सादर केला आहे. सदर पुनर्वसनास मान्यता देण्याची बाब प्रस्तावित आहे.

शेटा/ छच-0075 (750-4-2023)

१९१५

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

## लक्षवेधी सूचना क्रमांक १९१५

श्री. शिरीष चौधरी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १९१५ पुढीलप्रमाणे आहे :-

"लातूर जिल्हयातील अहमदपुर, जळकोट, उदगीर या तालुक्यात बी. आर. आंदे कन्स्ट्रक्शन या कंपनीमार्फत सातत्याने भ्रष्टाचार होत असुन संबंधित तालुके अंतर्गत गांवे १. जळकोट तालुक्यात घोणसी ते आतनुर डांबर रोड काम २. अहमदपुर तालुक्यात शि. ताजबंद ते वायगांव पाटीचे रोड काम ३. उदगीर शहरातील शिवाजी चौक ते जाकेर हुसेन चौक व जाकेर हुसेन चौक ते तोंडार पाटी पर्यंत सिमेंट रोड व डिवायडर व रोड च्या दोन्ही बाजुने साईड पट्टयाचे काम मोजमाप पुस्तिकेप्रमाणे होत नसल्याचे व हे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, या रस्त्याचे काम करण्यासाठी एक मिटर जमिन खंदणे व खंदवल्यानंतर रोड बांधणे आवश्यक असतानाही विनाखोदकाम जुन्या डांबरी रोडवर सिमेंट बांधुन शासनाची फसवणुक करुन या मध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार संबंधितांनी केली असल्याचे सकृतदर्शनी आढळले, सदर रोडवर डिवायडर चे खोदकाम न करता कमी प्रमाणात स्टील वापरणे. एम. बी. प्रमाणे काम न करता बेकायदेशीरपणे काम केल्याने शासनाचा कोटयावधी रुपयांचा निधी लाटला असणे, हा भ्रष्टाचार अभियंता व गुत्तेदार यांच्या संगनमताने केला असणे, याकरिता सदर कामाची गुणनियंत्रक पथकामार्फत चौकशी करुन संबंधित शाखा अभियंता श्री. देशपांडे, जळकोट उपअभियंता देवकर, उदगीर यांच्या विरुध्द गुन्हा नोंद करावी तसेच बी. आर. आंदे कन्स्ट्रक्शन कंपनीची मान्यता रद्द करुन काळया यादीत टाकण्यात यावे असे निवेदनाद्वारे सातत्याने संबंधित नागरिकांनी मागणी करीत असुन अनेक वेळा मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. बांधकाम सचिव, मा. विभागीय अधिकारी मा. जिल्हाधिकारी तसेच संबंधित प्रशासनाला निवेदनामार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे परंतू आवश्यक कार्यवाही व दोषापिंतावर कारवाई न झाल्याने नागरिक सध्य:स्थितीत मुंबईतील आझाद मैदान येथे उपोषणास बसले असुन अद्यापही उचित कार्यवाही, चौकशी न झाल्याने शासनाने त्वरीत याबाबत चौकशी करुन करावयाची कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया "

## मा. मंत्री (सा.बां.) (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

श्री. सौदारगर महमद रफी, संस्थापक अध्यक्ष, अन्याय अत्याचार, भ्रष्टाचार विरोधी समिती महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ३०.११.२०२२ रोजीच्या अर्जान्वये १. जळकोट तालुक्यात घोणसी ते आतनुर डांबर रोड काम २. अहमदपुर तालुक्यात शि. ताजबंद ते वायगांव पाटीचे रोड काम ३. उदगीर शहरातील शिवाजी चौक ते

जाकेर हुसेन चौक व जाकेर हुसेन चौक ते तोंडार पाटी पर्यंत सिमेंट रोड करणे या तीन कामांबाबत तक्रार केली आहे. व दिनांक १९/१२/२०२२ रोजी पासून बेमुदत आमरण उपोषणास बसत असल्याचा इशारा दिला होता.

उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने विषयांकित कामाची वस्तुनिष्ठ चौकशी करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम मंडळ, लातूर या कार्यालयाच्या दिनांक २१/१२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. त्यानुसार चौकशी समितीने दिनांक १०/०१/२०२३ रोजी सदर कामांबाबतचा चौकशी अहवाल सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालयास सादर केला होता. सदर अहवालाचे अवलोकन करुन अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, लातूर कार्यालयाच्या दिनांक ११/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदारास त्यांच्या तक्रारीतील मुद्दे हे मोघम व वस्तुस्थितीवर आधारित नसल्याचे दिसून येत असून सदर तक्रार निकाली काढण्यात येत असल्याचे कळविण्यात आले होते.

दरम्यानच्या कालावधीत अर्जदाराने माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्जाच्या अनुषंगाने उपरोक्त कामांच्या स्थळ ठिकाणी उपस्थित राहून कामाविषयक अभिलेख्यांची माहिती पाहून माहिती प्राप्त करुन घेतली. त्यानुसार गैरसमज दुर होऊन शंकांचे निरसन झाले असल्याचे कबुल करुन दिनांक ०१/०३/२०२३ रोजी आझाद मैदान, मुंबई येथील उपोषण स्थगित करत असल्याचे लेखी पत्र सादर केले आहे.

विषयांकित प्रकरणी चौकशी समिती मार्फत सविस्तर चौकशी करण्यात आलेली असून प्रगती पथावरील व पूर्ण झालेल्या कामांची गुणवत्ता व दर्जा विहित मानकाप्रमाणे असुन या कामांत कोणतीही अनियमिता अथवा भ्रष्टाचार झालेला नाही.

---

लक्षवेधी सूचना क्र. २३५३

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय )अधिवेशन

**श्री. सचिन कल्याणशेट्टी, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २३५३ खालीलप्रमाणे आहे:-**

"महाराष्ट्र शासनाच्या वसुंधरा पाणलोट विकास पुणे मार्फत जुलै २०२२ कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, अशासकीय संस्था यांच्या कडून अर्ज मागविण्यात येणे. त्यानंतर सदर प्रकल्प राबविण्याकरीता १३ ऑक्टो २०२२ रोजी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे यांच्यामार्फत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार PIA म्हणून काम करण्यासाठी शासकीय यंत्रणा व अशासकीय संस्था यांची जिल्हा स्तरावर छानना करण PIA यांची निवड करण्यात येणे असे पत्र सर्व संबंधित जिल्हा स्तरावर देण्यात येणे. केंद्रशासनाच्या धोरणानुसार सदर योजनेतील प्रकल्प अंमलबजावणी ही शासकीय यंत्रणा व अशासकीय संस्था मार्फत राबविण्याचे धोरण असणे तत्कालीन सचिव यांनी ४.११.२०२२ च्या SLSC बैठकीचे केंद्र शासनाने मंजूर करणे महाराष्ट्र महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व १४४ प्रकल्प हे शासकीय यंत्रणेमार्फत राबविण्याच्या सूचना व आदेश दिलेले असणे. केंद्रशासनाच्या मार्गदर्शन सूचनेच्या क्रमांक ११.२.१ नुसार योजनेतील २५% प्रकल्प हे अशासकीय संस्थांना देण्यात येणे असा नियम असताना संबंधित विभाग संस्थांना या योजनेपासून वंचित ठेवण्याचे काम करणे केंद्र शासनाच्या मार्गदर्शन तत्वांच्या छेद दिले असणे, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत पाणलोट विकास प्रकल्पांकरीता प्रकल्प कार्यान्वयन अभिकरण (PIA) म्हणून स्वयंसेवी / बिगर शासकीय संस्थांची निवडसूची तयार करण्यासाठी इच्छुक नोंदणीकृत संस्थामार्फत शासनस्तरावरून दिनांक ०६.०७.२०२२ रोजी जाहिरातीव्दारे अर्ज मागविण्यात आले होते. याअन्वये एकूण ३१४ संस्थांचे प्रस्ताव विहित मुदतीमध्ये वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.० पुणे, या कार्यालयाकडे प्राप्त झाले आहेत.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ११.१ नुसार PIA यांची नेमणूक जिल्हास्तरावरील जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) यांनी मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने करणे आवश्यक आहे. राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या (SLNA) दि.१२.१०.२०२२ च्या बैठकीमध्ये PIA

निवडीबाबत निकष ठरविण्यात येवून वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेने PIA म्हणून नियुक्तीसाठी प्राप्त ३१४ संस्थांची यादी दि. १३.१०. २०२२ च्या पत्रान्वये जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) यांना पाठविण्यात आली आहे. तसेच, मा. प्रधान सचिव, मृद व जलसंधारण, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली आयोजित प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० या योजनेच्या दिनांक २०.१०.२०२२ रोजीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे अशासकीय संस्थांच्या PIA म्हणून निवडीबाबतचे निकष दि. २१.१०.२०२२ च्या पत्रान्वये संबंधित जिल्हयांच्या प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव कळविले आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमधील महा क्र ११.१.२ नुसार स्वयंसेवी संस्था (VOs) / अशासकीय संस्था (NGOs) यांची जिल्हयातील २५ टक्के प्रकल्पांपर्यंत प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) म्हणून निवड करता येवू शकेल व मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र.११.१ नुसार याबाबतचा निर्णय जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) यांनी घ्यावयाचा आहे. मात्र संस्थांची निवड झाल्यानंतर त्यास शासनाची मान्यता घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार वर्धा व सोलापूर जिल्हयातील प्रत्येकी एका प्रकल्पांसाठी संस्थेची निवड जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) मार्फत करण्यात येवून शासनस्तरावर प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

स्वयंसेवी / बिगर शासकीय संस्थांकडून एकूण ३१४ प्रस्ताव प्राप्त झाले असून, जिल्ह्यांमधील प्रकल्पांच्या २५ टक्के पर्यंतच्या मर्यादेत संस्थांची प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) म्हणून निवड करण्यासाठी काही कालावधी जाणार आहे. केंद्र शासनाकडून योजनेच्या अंमलबजावणीबाबत होणारा पाठपुरावा विचारात घेता, तातडीची बाब म्हणून शासकीय PIA म्हणून निवड करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत कृषि विभाग- ८२, जलसंधारण विभाग -४१, वन विभाग- ६, जिल्हा परिषद जलसंधारण -१०, ग्रामीण पाणी पुरवठा - ३, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा-१ व सामाजिक वनीकरण -१ अशा एकूण १४४ PIA कार्यरत आहेत.

राज्यस्तरीय मान्यता समितीच्या (SLSC) दि.०४.११.२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये वार्षिक कृती आराखड्यास मान्यता प्रदान करणेत आली. तसेच या योजने अंतर्गत कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळ उपलब्ध करून घेणे बाबत चर्चा झाली. परंतू PIA म्हणून स्वयंसेवी संस्थेच्या निवडीबाबत कोणतेही निर्देश या बैठकीत देण्यात आलेले नाहीत.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने, विभागाने कार्यवाही केली असून कोठेही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांना छेद दिले गेले नाहीत.

***************************************************

(२८)

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. ५५०**

श्री.धनंजय मुंडे,वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम,१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

" सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ स्थापन करुन यांतर्गत सन २०२१ मध्ये संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरु करण्यात आली असणे मात्र या योजनेतून ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी २० वसतिगृहे मंजूर करुन देखील अद्याप ही वसतिगृहे सुरु करण्यात आलेली नसणे,ऊसतोड कामगारांना स्थलांतर करुन अन्य ठिकाणी ऊस तोडणी साठी जाताना आपल्या पाल्यांची शाळा सोडून द्यावी लागणे व त्याचे गंभीर परिणाम त्या मुलांच्या आयुष्यावर होत असणे, लोकप्रतिनिधी मार्फत मंजूर करण्यात आलेली वसतिगृहे तात्काळ सुरु करण्याबाबत वारंवार मागणी होत असणे व सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात सातत्याने मागणी करुनही सदर वसतिगृहे सुरु न झाल्याने विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान, त्यावरुन पसरलेला असंतोष यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

..........................................................................................................................

### श्री.एकनाथ शिंदे,मा.मुख्यमंत्री यांनी करावयाचे निवेदन

ऊसतोड कामगारांच्या स्थलांतराच्या वेळी त्यांच्यासोबत त्यांची मुलेही स्थलांतरीत होत असतात. स्थलांतरामुळे ऊसतोड कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नये, तसेच त्यांना उच्च शिक्षण घेता यावे,यासाठी दिनांक १५ जून, २०२१ च्या शासन निर्णयान्वये **"संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना"** सुरू करण्यास त्यानुसार पहिल्या टप्प्यात बीड,अहमदनगर व जालना जिल्हयातील १० तालुक्यामध्ये मुलांसाठी १० व मुलींसाठी १० अशी एकूण २० वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. यापैकी एकूण ११ वसतिगृहे प्रत्यक्ष सुरू करण्यात आलेली असून उर्वरीत ९ वसतिगृहासाठी भाडे तत्वावरील जागा ताब्यात घेवून ती येत्या शैक्षणिक वर्षापासून प्रत्यक्षात सुरू करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा | तालुक्याचे नाव | मंजूर वसतिगृहे | | सुरू झालेली वसतिगृहे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुलांची | मुलींची | मुलांची | मुलींची |
| १ | बीड | पाटोदा | ०१ | ०१ | ० | ० |
| २ | | केज | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| ३ | | बीड | ०१ | ०१ | ०१ | ० |
| ४ | | परळी | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| ५ | | गेवराई | ०१ | ०१ | ० | ० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | | माजलगाव | ०१ | ०१ | ० | ० |
| ७ | अहमदनगर | पाथर्डी | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| ८ | | जामखेड | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| ९ | जालना | घनसावंगी | ०१ | ०१ | ० | ० |
| १० | | अंबड | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| | | एकूण | १० | १० | ०६ | ०५ |

पहिल्या टप्प्यातील अहमदनगर जिल्हयातील मंजूर असलेली सर्व वसतिगृहे सुरू करण्यात आलेली आहे. जालना जिल्हयातील मंजूर ४ वसतिगृहांपैकी २ वसतिगृहे भाडे तत्वावरील इमारतीत सुरू करण्यात आली असून २ वसतिगृहासाठी भाडे तत्वावरील इमारती ताब्यात घेवून येत्या शैक्षणिक वर्षापासून प्रत्यक्ष सुरू करण्यात येत आहे. बीड जिल्हयातील मंजूर १२ वसतिगृहांपैकी ५ वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. उर्वरीत ७ वसतिगृहांपैकी ५ ठिकाणी भाडे तत्त्वावरील इमारती ताब्यात घेण्यात आल्या असून २ ठिकाणी इमारती भाडे तत्वावर घेवून येत्या शैक्षणिक वर्षापासून वसतिगृहे प्रत्यक्ष सुरू करण्यात येत आहे.

संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या शासकीय वसतिगृहांमध्ये आवश्यक सोयीसुविधा तसेच भोजन पुरवठा सुरू आहे.

***********

लक्षवेधी सुचना क्रमांक- ७३७

## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

श्री. धनंजय मुंडे, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-

*"ऊसतोड कामगारांच्या उन्नतीसाठी लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आली असणे मात्र मागील सुमारे सहा ते आठ महिन्यांपासून महामंडळाचे कामकाज पूर्णपणे ठप्प असणे, ऊसतोड कामगारांची नोंदणी प्रक्रिया ठप्प असून पूर्वी नोंदणी केलेल्या कामगारांचे रेकॉर्ड शासनाकडे उपलब्ध नसणे, राज्यातील साखर कारखाने यांच्याकडून कामगार कल्याण निधी संकलित करण्याबाबत सरकारची भूमिका उदासीन असणे व त्यामुळे ऊसतोड कामगारांच्या उन्नतीसाठी कोणतीही योजना किंवा उपाययोजना शासनाने अस्तित्वात आणलेली नसणे, ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ तातडीन कार्यान्वित करुन रखडलेली कामगार नोंदणी पूर्ण केली जावी, महामंडळाचे काम पूर्ण क्षमतेने सुरु केले जावे, ऊसतोड कामगार कल्याण निधीचे संकलन केले जाऊन कामगारांसाठी सुरक्षा, आरोग्य व विमा आदी योजना लागू केल्या जाव्यात याबाबत सातत्याने होत असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

## मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यामध्ये साखर उद्योग हा एक प्रमुख उद्योग असून सद्य:स्थितीमध्ये राज्यात कार्यरत सुमारे १०१ सहकारी क्षेत्रातील व ८७ खाजगी क्षेत्रातील साखर कारखान्यांमध्ये अंदाजे ८ लाख उसतोड कामगार या क्षेत्रात काम करतात. बहुतांश उसतोड कामगार हे मराठवाडा विभागातील व विशेषत: बीड, अहमदनगर, नांदेड, नंदुरबार, जालना, जळगाव ,उस्मानाबाद, हिंगोली आदी जिल्ह्यातील असून राज्यातील विविध जिल्ह्यांत स्थलांतरीत होऊन काम करतात. ऊसतोड कामगारांना महाराष्ट्र राज्य साखर कारखाना संघाच्या स्तरावरून होणाऱ्या सामंजस्य करारानुसार मंजूरी व अन्य लाभ देण्यात येतात. उसतोड कामगारांचे व पर्यायाने त्यांच्या कुटूंबियांचे जीवन अस्थिर व अत्यंत हलाखीचे असल्यामुळे त्यांचे जीवन सुखकारक करून त्यांचे राहणीमान उंचावून आयुष्य स्थिर व सुरक्षित करण्यासाठी ऊस तोडणी व्यवसायातील उसतोड कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी स्व. गोपीनाथ मुंडे उसतोड कामगार महामंडळ स्थापन करण्यात आले आहे.

गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळास ऊसतोड कामगार, त्यांचे कुटूंब व पाल्यांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध होणेकरीता सहकार विभागाच्या मान्यतेने साखर कारखान्यांकडून ऊस गाळपावर प्रती मेट्रीक टन रु.१०/- प्रमाणे (शेतकऱ्यांना देय असणाऱ्या रास्त व किफायतशीर दरांमधून कपात न करता) ऊसतोड कामगार कल्याण निधी जमा करण्याबाबतचा दिनांक ६.१.२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार

रोय H/1146C750-3-23)

महामंडळाकडे ३६ कोटी रू. जमा झाले असून त्याच्या समप्रमाणात पुरवणी मागणीद्वारे शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. ऊसतोड कामगारांची नोंदणी करुन त्यांना ओळखपत्र देणे . सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ४ ऑगस्ट, २०२१ अन्वये ऊसतोड कमागारांची नोंदणी करुन ग्रामसेवकामार्फत ओळखपत्र देण्याची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली १० सदस्यीय समिती गठीत केलेली असून ऊसतोड कामगार ज्या ठिकाणी वास्तव्याला आहेत व जे सतत मागील तीन वर्ष ऊसतोड कामगार म्हणून काम करत असतील त्यांची ग्रामसेवकाने नोंदणी विहित नमुन्यात करुन ओळखपत्र देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे राज्यातील ऊसतोड कामगारांच्या सर्वेक्षण / नोंदणीसाठी वेब व मोबाईल ॲप्लीकेशन माहिती व तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) मार्फत करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर काम तात्काळ पुर्ण होणेसाठी महाआयटी यांचेकडे पाठपुरवा करण्यात येत असून, कामकाज पुर्ण होताच ऑनलाईन नोंदणीची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. सद्यस्थितीमध्ये ऑफलाईन नोंदणी केलेल्या ऊसतोड कामगारांची संख्या २३३७७५ इतकी आहे तसेच, ओळखपत्र दिलेल्या एकूण ऊसतोड कामगारांची संख्या ९८७७१ इतकी आहे. महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांसाठी विमा संरक्षण देण्याचा खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

| अक्र | तपशिल | विमा संरक्षण |
|---|---|---|
| १ | अपघातामुळे मृत्यु आल्यास. | रु. ५,००,०००/- |
| २ | अपघातामुळे दोन्ही हात/ दोन्ही पाय/ दोन्ही डोळा यापैकी कोणतेही दोन अवयव संपूर्ण निकामी झाल्यास. | रु. ५,००,०००/- |
| ३ | अपघातामुळे हात पाय डोळा यापैकी एक अवयव निकामी झाल्यास. | रु. २,५०,०००/- |
| ४ | अपघातामुळे कायमचे संपुर्ण अपंगत्व आल्यास. | रु. ५,००,०००/- |
| ५ | अपघातामुळे हॉस्पिटलमधील वैद्यकिय उपचार खर्च (वय मर्यादा ७० वर्ष पर्यंत.) अथवा सर्पदंश, बिबट्या किंवा तत्सम हिंस्त्र जंगली श्वापदांकडून हल्ला झाल्यास. | रु.५०,०००/- |
| ६ | झोपडीचा विमा - झोपडी आणि झोपडीतील वस्तूंचे आग/दंगल/संप/वादळ महापूर इ.मुळे नुकसान झाल्यास विमा संरक्षण. | रु.१०,०००/- प्रति झोपडी. |

| अक्र | तपशिल | विमा संरक्षण |
|---|---|---|
| १ | बैलजोडी (गाडी सेंटर) - नैसर्गिक आपत्तीमुळे निधन / अपघाती निधन/ आग / वीज पडून/ महापूर/ दंगल / वादळ अथवा इतर कारणास्तव पुर्णतः अकार्यक्षम बनल्यास. (मिळणारी भरपाई ही ऊसतोड कामगारास दिली जाईल.) | रु. ७५,०००/- प्रति बैलजोडी. |

| अक्र | तपशिल | विमा संरक्षण |
|---|---|---|
| १ | बैलजोडी (टायरगाडी) - नैसर्गिक आपत्तीमुळे निधन / अपघाती निधन/ आग / वीज पडून/ महापूर/ दंगल / वादळ अथवा इतर कारणास्तव पुर्णतः अकार्यक्षम बनल्यास. (मिळणारी भरपाई ही ऊसतोड कामगारास दिली जाईल.) | रु. १,००,०००/- प्रति बैलजोडी |

राज्यातील सर्व सहकारी आणि खाजगी साखर कारखान्यांशी संलग्न असलेल्या ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार, साखर हमाल व मुकादम यांना वरीलप्रमाणे विमा संरक्षण देण्यासाठी महामंडळाकडून त्यांची माहिती आकडेवारी साखर आयुक्तांकडून उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात असुन विमा संरक्षण देण्याबाबतची कार्यवाही प्रगतीप्रथावर आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १५ जून २०२१ च्या शासन निर्णयानुसार राज्यात स्थलांतरीत ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींसाठी "संत भगवानबाबा शासकीय वसतीगृह योजना सुरू करण्यास व त्यानुसार मुलांसाठी ४१ व मुलींसाठी ४१ अशी एकूण ८२ (प्रत्येकी १०० क्षमतेची) वसतिगृह सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रथम टप्प्यात बीड, जालना, अहमदनगर या जिल्ह्यांमध्ये खालील तालुक्यांमध्ये ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी प्रत्येक १०० क्षमतेची एकूण २० शासकीय मंजूर केलेली आहेत.

| अक्र | जिल्हा | तालुक्याचे नाव | मंजुर वसतिगृहे संख्या | | सुरु झालेली वसतिगृहे संख्या | | प्रवेशित विद्यार्थी संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुलांची | मुलींची | मुलांची | मुलींची | मुलांची | मुलींची |
| १ | बीड | पाटोदा | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० |
| | | केज | ०१ | ०१ | १ | १ | ४ | २० |
| | | बीड | ०१ | ०१ | १ | ० | २ | ० |
| | | परळी | ०१ | ०१ | १ | १ | २ | १२ |
| | | गेवराई | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० |
| | | माजलगाव | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० |
| २ | अहमदनगर | पाथर्डी | ०१ | ०१ | १ | १ | ८६ | ८० |
| | | जामखेड | ०१ | ०१ | १ | १ | ९२ | ८९ |
| ३ | जालना | घनसावंगी | ०१ | ०१ | ० | ० | ० | ० |
| | | अंबड | ०१ | ०१ | १ | १ | ४१ | २६ |
| एकूण | | . | १० | १० | ०६ | ०५ | २२७ | २२७ |

सदर बाबत नमुद करण्यात येते की, सामाजिक न्याय विभागामार्फत संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहे या योजनेअंतर्गत औरंगाबाद विभागातील बीड या जिल्ह्यामध्ये एकूण मंजुर असलेल्या १२ वसतिगृहांपैकी एकूण १० वसतिगृहांकरीता भाडेतत्वावरील इमारती ताब्यात घेण्यात आलेल्या असून,

त्यापैकी ५ वसतिगृहे प्रत्यक्षामध्ये सुरु करण्यात आलेली आहेत. सुरु करण्यात आलेल्या वसतिगृहांमध्ये तात्पुरत्या स्वरुपामध्ये सोयीसुविधा पुरविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच प्रवेशितांच्या भोजन पुरवठ्यासाठी संबधित विभागाचे प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, छत्रपती संभाजी नगर यांनी भोजन पुरवठा आदेश निर्गमित केलेले असून, त्यानुसार सुरु असलेल्या संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहांमधील ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींकरीता भोजन पुरवठा सुरु आहे. ऊसतोड कामगार हे ऊसतोडणी करीता दुस-या जिल्हयात स्थंलातरीत होत असतात, अशा कामगारांना रेशनकार्ड वर ते ज्या जिल्हयात असतील त्या ठिकाणी त्यांना रेशनकार्ड वर अन्न धान्य मिळत नाही. त्याकरीता केंद्रशासनाच्या एक देश एक रेशन कार्ड योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होणेकरीता राज्यामध्ये एकूण १०४ खाजगी व ११० सहकारी साखर कारखान्यांशी संलग्न असलेले एकूण ४११४६ ऊसतोड कामगारांचे रेशन कार्ड पोर्टेबिलीटी करण्यात आली आहे. राज्यातील ऊसतोड कामगारांना रोजगाराच्या ठिकाणी आरोग्य तपासणी होणेकरीता कामाच्या ठिकाणी जिल्हा आरोग्य विभागाच्या सहकार्याने हेल्थ कॅम्प चे आयोजन करण्यात आले. त्यानुसार राज्यामध्ये एकूण ९२ खाजगी व १०० सहकारी साखर कारखान्यांशी संलग्न असलेले एकूण १२०३५६ ऊसतोड कामगारांचे हेल्थ कॅम्प मार्फत आरोग्य तपासणी करुन त्यांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात आली. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या पदांचा आकृतिबंध वित्त विभागाच्या सहमतीने मंजूर करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. ऊसतोड कामगारांचे महामंडळ स्थापन झाल्यामुळे ऊसतोड कामगारांचे सामाजिक, आर्थिक व आरोग्य विषयक प्रश्न सोडविणे व त्यांच्या पाल्यांना शैक्षणिक स्थैर्य निर्माण करुन देणे याबाबींसह ऊसतोड कामगार, मुकादम, साखर कारखाना, इत्यादींबाबतचे सर्व प्रश्न मार्गी लावण्यास निश्चितच मदत होत आहे.

---

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. ११४८**

**डॉ. नितिन राऊत, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. अमित विलासराव देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री विकास ठाकरे, श्रीमती सुलमा खोडके, ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय जगताप, श्री. धिरज देशमुख, श्री. बळवंत वानखडे, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. जितेश अंतापूरकर, श्री. मोहनराव हंबर्डे, श्री. माधवराव पवार, श्री. राजेश एकडे, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"शासनाने दि. ८ मार्च, २०१९ रोजी शासन निर्णय क.बीसीएच २०१८/प्र.क्र.६१ /शिक्षण- २ अन्वये १६५ निकषपात्र आश्रमशाळांसाठी शाहू, फुले आंबेडकर अनुसूचित जातींच्या मुला-मुलींसाठी निवासी शाळा योजना ही नवीन योजना तयार करून अनुदान मंजूर केले असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या अटीस अनुसरून सदर १६५ आश्रमशाळांची अनुक्रमे दिनांक ९ जानेवारी, २०२० व दि. २२ ते २४ डिसेंबर, २०२० अशा दोन वेळा तपासण्या केल्या असणे, सदर अहवाल समाजकल्याण आयुक्तांमार्फत आपल्या कार्यालयात सादर करण्यात आले असणे, आपल्या स्तरावर सदर अहवालाची छाननी समिती स्थापन करण्यात आली असणे, तद्नंतर सदर अहवालाची छाननी करून आश्रमशाळा अनुदानास पात्र घोषित करण्याची प्रक्रिया आजतागायत प्रलंबित असणे, शाहु फुले आंबेडकर निवासी योजनेसाठी लेखाशिर्ष तयार करुन आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात सदर लेखाशीर्षाकार रु. २५ कोटीची आर्थिक तरतूद करण्यात आलेली असणे, या प्रकियेदरम्यान सदरील आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना मानधन मंजूर झाले असल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी असोसिएशनच्या मागणीनुसार तत्कालीन सन्माननीय मंत्री महोदयांनी कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणी देणे व व्हीजेएनटी च्या धर्तीवर आश्रमशाळा संहिता लागू करण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्याचे निर्देश दिले असणे, सदर वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव अद्यापही प्रलंबित असणे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना नियमिती वेतनश्रेणी लागू करण्याच्या प्रस्तावास तात्काळ मंजुरी देण्याची आवश्यकता असणे व त्यानुषंगाने त्यासाठी लागणाऱ्या आर्थिक तरतुदीची हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्याव्दारे शासनाने मंजुरी देण्याची आवश्यकता, सध्य:स्थितीत वरिल संस्थाची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे परीपोषण व तद्नुषंगिक इतर बाबीकरिता मंजुर आलेला निधी तात्काळ वितरीत करण्याची आवश्यकता असुनही शासन याबाबत दुर्लक्ष करित असलेल्या नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड लक्षात घेता शासनाने त्वरीत करावयाची आवश्यकता तसेच शासनाची प्रतिक्रिया "

**********************************************************************************************************

### मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे निवेदन

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयामार्फत स्वयंसेवी संस्थाकडून चालविल्या जाणाऱ्या अनुसूचित जातीच्या आश्रमशाळांना सहाय्यक अनुदाने ही योजना सन १९९८-९९ पासून सुरू करण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत राज्यातुन केंद्रीय अनुदानासाठी एकूण ३२२ आश्रमशाळांचे प्रस्ताव

शेटा H/0047 (720-5-23)             ए.क्ष.गा.प.

केंद्र शासनास पाठविण्यात आले होते. त्यापैकी ३४ आश्रमशाळांना केंद्र शासनाने अनुदान मंजूर केलेले आहे. उर्वरित २८८ आश्रमशाळांना केंद्र शासनाने अनुदान मंजूर न केल्यामुळे या शाळांमधील अनुसूचित जातीच्या मुलांना शिक्षणाच्या मुलभूत सोयी सुविधा मिळाव्यात तसेच, आर्थिक अडचणीमुळे या स्वयंसेवी संस्थांना आश्रमशाळा चालविणे शक्य होत नसल्याने व्यवस्थापन, संघटना तसेच, लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत या आश्रमशाळांना अनुदान देण्याची सातत्याने मागणी करण्यात येत होती. सदरील मागणीच्या पार्श्वभुमीवर दिनांक १६ मार्च, २०१५ च्या तपासणी मध्ये अ-श्रेणी प्राप्त ४० व ब श्रेणी प्राप्त ५६ आश्रमशाळा व त्याचबरोबर सदर तपासणीस असहकार दर्शविलेल्या ६९ अशा एकूण १६५ आश्रमशाळांसाठी शासन निर्णय, दिनांक ८ मार्च,२०१९ अन्वये राज्य शासनाची "शाहू, फुले, आंबेडकर निवासी/ अनिवासी आश्रमशाळा" ही नवीन योजना कार्यान्वित करुन सदर योजनेंतर्गत या आश्रमशाळांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून तपासणीच्या अधीन राहून २०% अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनुदान मंजूर करण्यात आलेल्या आश्रमशाळांची आयुक्तालय स्तरावर तपासणी करून अहवाल शासनास सादर केलेला आहे. शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी आश्रमशाळा योजनेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी, संस्थाचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना यांच्याकडून शासनाकडे सातत्याने मागणी करण्यात येत होती. त्यानुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (सा.न्या.) महोदयांनी सदर आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करणे तसेच, वि.जा.भ.ज. (इतर मागास व बहुजन कल्याण विभाग) आश्रमशाळेच्या धर्तीवर शाळा संहिता लागू करण्याचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळासमोर सादर करण्याचे निर्देश दिलेले होते. तत्कालीन मा.मंत्री (सा.न्या.) महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार सदर आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करणे तसेच, वि.जा.भ.ज. आश्रमशाळेच्या धर्तीवर शाळा संहिता लागू करण्याबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे. तथापि, वि.जा.भ.ज. आश्रमशाळेच्या धर्तीवर वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासन मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, शाहू, फुले, आंबेडकर निवासी/ अनिवासी शाळा योजनेंतर्गत खर्च भागविण्यासाठी लेखाशिर्ष २२२५- एफ ५६८, ३१ - सहायक अनुदाने अंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये २५ कोटीची तरतूद करण्यात आलेली असून सदर आश्रमशाळांना अनुदान देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

********************

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १७१०**

श्री.सुनिल राणे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम,१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात मुला-मुलींची ४४५ वसतिगृहे सामाजिक न्याय विभागाच्या वतीने असून ज्यामध्ये पन्नास हजाराहून अधिक विधार्थी शिक्षण घेत असून सदरहू विद्यार्थांना राज्य सरकारच्या नियमांनुसार निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य, गणवेश भत्ता, छत्र्या, रेनकोट आणि प्रकल्प अहवालासाठी आवश्यक देय असताना मागील सहा महिन्यापासून रखडलेला असल्याने तसेच कोरोना काळातील १९ महिन्याच्या निर्वाह भत्ता अदयापी देण्यात आलेल्या नसल्यामुळे सदरहू विद्यार्थांची आर्थिक कोंडी होऊन त्यांच्या शिक्षणावरही विपरीत परिणाम होणे, कोरोना काळामध्ये सामाजिक न्याय विभागाची सर्व वसतिगृहे बंद असली तरीही या दरम्यान शाळा, महाविद्यालयेही बंद असलीतरीही ऑनलाइन शिक्षण सुरू असणे, वसतिगृहातील बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातील असून गावांमध्ये इंटरनेटची जोडणी नसल्याने ऑनलाइन शिक्षण घेणे कठीण झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शहराच्या ठिकाणी बाहेर भाड्याची खोली घ्यावी लागणे, मात्र या काळात केवळ वसतिगृहे बंद असल्याचा निकष लावून सामाजिक न्याय विभागाने पर्यायाने शासनाने या काळातील १९ महिन्याचा निर्वाह भत्ता आणि शैक्षणिक साहित्यांच्या खर्चही विद्यार्थ्यांना देण्यात नकार दिल्यामुळे या विद्यार्थ्यांना गंभीर आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागणे, वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचीत जातीच्या विद्यार्थ्यांना बाहेर भाड्याच्या खोलीत राहून शिक्षण पूर्ण करता यावे म्हनून स्वाधार योजना असणे, कोरोना काळात स्वाधार योजनेच्या लाभर्थ्यांना सर्व लाभ देण्यात येणे, मात्र वसतीगृहांमध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांना कोरोना काळात केवळ वसतीगृह बंद असल्याचे कारण देव त्यांना निर्वाह भत्ता व शैक्षणिक माहिला भत्यापासून वंचित ठेवण्यात आले असल्याचे समान तत्वावर सुरू असलेल्या दोन योजनाच्या लाभार्थीमध्ये शासन भेद करीत असल्याने नाराजी व्यक्त करून कोरोना काळातील १९ महिन्याच्या निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य भत्ता मिळावा म्हणून शासनाकडे रीतसर लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात येणे, सदर मागणीबाबत शासनाने अद्याप ठोस निर्णय घेतला नसणे, तसेच मागील सहा महिन्यापासून रखडलेला निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य भत्ता आदी तसेच कोरोना काळातील १९ महिन्याचे भत्ते विनाविलंब देण्याचे दृष्टीने शासनाने ठोस कार्यवाही करण्याची आवशाक्यता असणे, याकडे शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

.............................................................................................................

### श्री.एकनाथ शिंदे,मा.मुख्यमंत्री यांनी करावयाचे निवेदन

सामाजिक न्याय विभागांतर्गत राज्यात मागासवर्गीय मुलामुलींची ४४१ शासकीय वसतीगृहे कार्यान्वित असून या वसतीगृहांची मान्य संख्या ४३,३५८ ( मुले-२२,९५८ व मुली-२०,४००) इतकी

रोटा H/10070 (700-4-23) क्रि.ग.9.

आहे. शासन निर्णय दिनांक १६ मे,१९८४ आणि शासन निर्णय दिनांक २६ जुलै,२०११ अन्वये शासकीय वसतीगृहातील प्रवेशितांना निवास,भोजन, इत्यादी आवश्यक सोयी सुविधा व निर्वाह भत्ता देण्यात येतो.

राज्यात मागासवर्गीय मुलामुलींसाठी सुरू असलेल्या वसतिगृहातील बहुतांश प्रवेशित विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ मधील माहे फेब्रुवारी, २०२३ पर्यंतचा निर्वाह भत्ता अदा करण्यात आला असून व शैक्षणिक साहित्य,गणवेश भत्ता,छत्र्या, रेनकोट आणि प्रकल्प अहवालासाठी अनुज्ञेय असलेले देय भत्ता अदा करण्यात आलेला आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे राज्यातील बहुतांश वसतीगृहे ही जिल्हा प्रशासनाने क्वारंटाईन सेंटर म्हणून अधिग्रहित केली होती. या कालावधीत विद्यार्थी वसतीगृहामध्ये राहत नव्हते. परंतु शैक्षणिक संस्थाचे अभ्यासक्रम ऑनलाईन सुरू असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाईन सुरु होते. शासन निर्णय, दिनांक २६ जुलै, २०११ नुसार शासकीय वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याची तरतूद आहे. तथापि कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शासन आदेशानुसार विभागांतर्गत शासकीय मुलामुलींची वसतिगृहे बंद ठेवण्यात येवून सदर वसतिगृहे कोविड सेंटर म्हणून वापरात होती. लॉकडाऊन कालावधीतील निर्वाह भत्ता नियमानुसार देय नसल्याने निर्वाह भत्त्याची रक्कम देण्यात आलेली नाही.

सन २०२२-२३ च्या शैक्षणिक वर्षात ज्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता व इतर देय भत्ते देण्यात आलेले नाही त्यांना सन २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात प्राधान्याने अदा करण्याच्या सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

*****

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.नारायण कुचे,वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम,१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-**

"जिल्हा जालना येथील अंबड शहरातील शासकीय वसतिगृहात सोयी-सुविधा मिळत नसल्याने संतप्त मुलींनी तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केलेले असणे, तेथील शासकीय वसतिगृहात सोयी-सुविधा मिळत नसल्याने संतप्त मुलींनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या दरम्यान अंबड तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणे, मुलींनी ठिय्या आंदोलन करताच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तात्काळ दखल घेऊन सदर वसतिगृहात झालेल्या गैरसोयीची प्रशासकीय अधिकाऱ्यांना तात्काळ वसतिगृह गाठून चौकशी सुरू केली असता अनेक धक्कादायक खुलासे आढळून येणे, तसेच या वसतिगृहात कालबाह्य झालेली बिस्किटे गोर गरीब शिकणाऱ्या विद्यार्थिनींना देण्यात आल्याचे आढळल्याने पुरवठादाराविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केलेली असणे, सदर वसतिगृहात माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०२०, माहे मार्च-एप्रिल २०२१ या कालावधीत कालबाह्य झालेल्या बिस्किटांचा साठा आढळलेला असणे, तसेच सदर प्रकरणी माहिती घेतली असता सदर पुरवठा करणारी कंपनी ही परभणी येथील असल्याचे निदर्शनास येणे, सदर मे.बहुजन हिताय व भोजन उत्पादक व पुरवठा मागासवर्गिय सहकारी संस्था जिल्हा परभणी या नावाची संस्था संपूर्ण राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात अनेक शासकीय वसतीगृहे यांना आहार पुरवठा करण्याचे काम शासनाच्या सामाजिक विकास विभागाने दिलेले असणे, परंतु सदर भोजन पुरवठा निविदा देताना अनेक अनियमितता झालेल्या असणे, सदर संस्था गुणवत्तेनुसार पात्र नसतानाही त्या संस्थांना राज्यातील अनेक जिल्ह्यांचे काम देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, जालना जिल्ह्यातील उपरोक्त प्रकरणासारखे अनेक प्रकरणं राज्यात झालेले असणे, परंतु सदर संस्थेच्या व सामजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांनी पैसे घेऊन अनेक प्रकरणे दाबली असली तसेच संबंधीत आहार पुरवठा करणारी संस्था यांना एकाप्रकारे पाठीशी घातलेले असणे, तसेच सदर परभणी येथील इतरही अनेक शासकीय वसतिगृहे यांची कंत्राट यांनाच देण्यात आल्याचे स्पष्ट झाले असणे, त्यामुळे शासनाने त्या पुरवठा करणारी कंपनी यांच्यावर कठोर कारवाई करून त्याचे ऑडिट करावे, तसेच सदर पुरवठा करणाऱ्या बनावट कामाची सखोल चौकशी करावी होत असलेली मागणी, मे.बहुजन हिताय व भोजन उत्पादक आणि सहकारी संस्था परभणी याचे अध्यक्ष श्री.श्रीरंग नागोराव हत्ती आंबिरे यांना सदर प्रकरणी गोरगरीब मागासवर्गातील समाजातील मुलींच्या आरोग्याशी हेळसांड करणाऱ्या व्यक्तीला तात्काळ अटक करून त्यांचेवर गंभीर खटला दाखल करून शिक्षा देण्याची पालकांची मागणी, सदर संस्थेकडून राज्यातील आहार पुरवठ्याचे काम काढून घेऊन शासनाने सदर संस्थेला यापुढे कोणतेही काम देऊ नये, तसेच सदर संस्थेला काळया यादीत टाकण्याची कारवाई करावी अशी मागणी सामान्य नागरिक व स्थानिक लोप्रतिनिधींनी शासनाच्या सामाजिक न्याय विभाग यांचेकडे करण्यात येणे, परंतु शासनाने अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्याने

विद्यार्थिनी, पालक व स्थानिक जनतेत शासनाच्या प्रती पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

************************************************************************************************************

## मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे निवेदन

जालना जिल्ह्यातील मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, अंबड, जि.जालना येथील शासकीय वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थीनींनी वसतिगृहात देण्यात येणाऱ्या अपुऱ्या सोयीसुविधा व भोजनाच्या तक्रारीबाबत दिनांक ०४.०२.२०२३ रोजी तहसिल कार्यालय, अंबड येथे धरणे आंदोलन केले होते. सदर तक्रारीमध्ये प्रवेशित विद्यार्थीनींना नाश्ता,जेवण व्यवस्थीत न मिळणे,जेवण चविष्ट नसणे, फळे, सलाद, तुप, अंडी, दूध इत्यादी न मिळणे इ.बाबत निवेदन दिले होते.

दिनांक ०४.०२.२०२३ रोजी दुपारी ०१.३० ते ०२.०० च्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या भ्रमणध्वनीवरुन प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग,छत्रपती संभाजीनगर यांना फोन करून मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, अंबड, जि.जालना या वसतिगृहातील ४५ विद्यार्थीनी या अंबड तहसिल कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत असल्याचे सांगितले. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी श्री. डी. आर. वाघ, विशेष अधिकारी (शा.नि.शा) गट-ब, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, जालना यांना कार्यालयातील महिला कर्मचारी आणि पुरुष कर्मचारी यांना तात्काळ सोबत घेवून वसतिगृहास भेट देण्याबाबत आदेशित केले.तसेच,प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे दिनांक ०४.०२.२०२३ च्या आदेशान्वये सदर वसतीगृहाची चौकशी करण्यात आली.

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी सायंकाळी ०५.३० च्या दरम्यान वसतीगृहात भेट दिली. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या समस्या उपस्थित सर्व अधिका-यांसमक्ष जाणून घेतल्या असता विद्यार्थ्यांनी कार्यरत गृहपाल व वसतीगृहात मिळणा-या सोयीसुविधाबाबत अनेक तक्रारी केल्याचे निदर्शनास आले.

सदर वसतीगृहात गृहपाल यांच्या निवासस्थानी विद्यार्थीनीं करीता ठेवण्यात आलेली कालबाहय झालेली बिस्कीटे आढळून आली. मोनॅको,पारले,मारी या बिस्कीटांच्या पाकीटावरील एक्सपायरी डेटच्या तारखा या सन २०२०, २०२१ या वर्षाच्या कालावधीतील होत्या. त्यामुळे श्री.प्रशांत अजिठेकर,अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन कार्यालय,जालना यांनी पुरवठादार बहुजन हिताय भोजन उत्पादक मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था,परभणी यांचेविरुद्ध पोलिस स्टेशन अंबड येथे गु.र.नं.८३/२०२३ अन्वये मुदतबाहय बिस्कीटांचा पुरवठा केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच,प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे दि.०६.०२.२०२३ च्या आदेशाअन्वये जालना जिल्हयातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतीगृह,जालना व संत रामदास मुलांचे शासकीय वसतीगृह,जालना आणि मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय

मुलींचे शासकीय वसतीगृह,अंबड,ता.अंबड जि.जालना या तीन वसतीगृहांना भोजन पुरवठा करणा-या बहुजन हिताय भोजन उत्पादक मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था, जि.परभणी या संस्थेचा भोजन ठेका रद्द करण्यात आला असून अन्य पुरवठादारास भोजन पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहे. मुलींशी चर्चा करतांना संबंधित मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह, अंबड या वसतिगृहाच्या गृहपालाबाबत प्राप्त तक्रारींमध्ये तथ्यता आढळून आल्याने त्यांना आयुक्त, समाज कल्याण,पुणे यांचे दिनांक ०९.०२.२३च्या आदेशान्वये शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आले असून नियमानुसार चौकशी करण्यात येत आहे.

प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण, छत्रपती संभाजीनगर विभाग यांनी दिनांक २२.३.२०२३ च्या आदेशान्वये बहुजन हिताय भोजन उत्पादक मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था, जि.परभणी या संस्थेकडे जालना जिल्हयाव्यतिरीक्त छत्रपती संभाजीनगर येथील मुलांचे शासकीय वसतिगृह, विभागीय स्तर, युनीट क्र.१ ते ३ (२५० क्षमतेचे ) व मुलींचे शासकीय वसतिगृह,युनीट क्र.४ (२५० क्षमतेचे ) तसेच परभणी येथील मुलींचे शासकीय वसतिगृह,परभणी व मुलींचे शासकीय वसतिगृह,सेलू,जि.परभणी या वसतिगृहाचा भोजन पुरवठा रद्द करण्यात आलेला आहे.

बहुजन हिताय भोजन उत्पादक मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था, जि.परभणी या संस्थेविरूध्द गुन्हा दाखल झाल्याने तसेच विद्यार्थ्यांच्या जालना/ छत्रपती संभाजीनगर /परभणी येथील वसतिगृहाच्या निकृष्ठ भोजनाबाबतच्या तक्रारी विचारात घेवून सदर संस्थेस काळया यादीत टाकण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त,समाज कल्याण आयुक्तालय,पुणे यांचेकडून शासनास प्राप्त झाला असून उद्योग,उर्जा व कामगार विभागाच्या मान्यतेने निर्णय घेण्यात येत आहे.

******

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

### लक्षवेधी सूचना क्रमांक ५२

**श्री. रोहित पवार, श्री. हसन मुश्रीफ, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने कर्मचाऱ्यांसाठी सन १९२६ मध्ये क्रिडा भवनची स्थापना करण्यांत येणे, त्यानुसार मुंबई मुख्यालयासमोर एक व दुसरी दादर येथील शिवाजी पार्क येथे क्रिडा भवन इमारत उभारण्यात आलेली असणे, सदर क्रिडा भवनातून अनेक कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय व यशस्वी कामगिरी बजावलेली असणे, तथापि सन २०१२ मध्ये क्रिडा भवनच्या कार्यकारिणी सदस्यांवर झालेल्या गैरकारभाराच्या आरोपानंतर २०१० मध्ये क्रिडा भवनाला टाळे ठोकण्यात आल्याने आजतागायत म्हणजे १२ वर्षांनंतरही क्रिडा भवन बंदच असणे, क्रिडा भवनचे १० हजार सदस्य असून अडीच हजारापेक्षा जास्त आजीव सदस्य असून त्यामध्ये १२ ते १५ खेळ खेळणारे खेळाडू सभासद असल्याचे व ते आपापली वार्षिक वर्गणी नित्यनियमाने भरत असल्याचेही निदर्शनास येणे, तथापि म्युनिसिपल को.ऑप.बँकेने क्रिडा भवनचे खाते माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये सील करण्यांत येणे, त्यामुळे त्याचे पर्यावसन नोव्हेंबर,२०२२ पासून कामगारांचे पगार व खेळाडूंना मिळणारी आर्थिक मदत थांबण्यात आल्याचे आढळून येणे, जवळपास १०० वर्षांची वाटचाल करणाऱ्या क्रिडा भवनाला पुन्हा उभारणी येण्याच्यादृष्टीने मा.आयुक्त, महानगरपालिका, यांनी क्रिडा भवन कार्यकारिणीची निवडणूक घ्यावी व १२ वर्षांपासून बंद असलेल्या क्रिडा भवनाच्या दोन्ही इमारती खुल्या करण्यांत याव्या तसेच बँक खातेही सुरु करावे अशी मागणी कर्मचाऱ्यांनी दि.२२ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यादरम्यान महापालिका प्रशासनाकडे केली असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी, जागतिक, राष्ट्रीय, देश व राज्य पातळीवर खेळाडूंचे महत्व विचारांत घेऊन, शाससनाने महापालिकेचे क्रिडा भवन बंद प्रकरणी चौकशी करण्याची गरज व क्रिडा भवन पुन्हा सुरु करण्याचेदृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

### -: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २६.०४.१९२६ रोजी 'बृहन्मुंबई महानगरपालिका क्रीडाभवन' या संस्थेची स्थापना करण्यात आली. माहे डिसेंबर २०१४ मध्ये क्रीडाभवनाचे आंतरीक संचालक मंडळाने केलेल्या गैरव्यवहारामुळे, सदर संचालक मंडळ महानगरपालिकेमार्फत बरखास्त करण्यात आले. क्रीडा भवनाच्या खेळाडू सभासदांच्या खेळावर परिणाम होऊ नये म्हणून आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सहाय्यक आयुक्त, जी/उत्तर विभाग यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका क्रीडाभवनाच्या दोन इमारती असून त्या खालीलप्रमाणे आहेत :-

**१) शिवाजी पार्क, दादर येथील बृहन्मुंबई महानगरपालिका क्रीडाभवन :-**

सदर इमारत मोडकळीस आल्यामुळे वापरास धोकादायक होती. त्यामुळे सदर इमारत निष्कासित करण्यात आली आहे. सदर जागेचे आरक्षण "महानगरपालिका जिमखाना" ऐवजी "महानगरपालिका निवासस्थान" असे बदलण्यात आल्यामुळे सदर जागेवर मा. महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे निवासस्थान बांधण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

२) आझाद मैदान येथील क्रीडाभवन :-

सदर इमारतीचे महानगरपालिकेमार्फत सन २०१६-१७ मध्ये संरचनात्मक डागडुजी करुन सभासदांसाठी खुली करण्यात आली असून सर्व खेळाडू सभासद तेथे उपलब्ध असलेल्या खेळांचा उपभोग घेत आहेत.

सद्य:स्थितीत आझाद मैदान येथील इमारत, फोर्ट पुरातन प्रासिमामध्ये आहे. सदर इमारतीला पूर्णतः संरचनात्मक बदल करुन आजूबाजूच्या पुरातन वास्तूप्रमाणे सुबक करण्याचे तसेच इमारतीत अंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाची सुसज्ज वातानुकूलीत दालने आणि पुरुष व महिला खेळाडूंसाठी पुरेशी स्वच्छतागृह बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावास पुरातन समितीची मान्यता मिळाली असून महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्रीडाभवन या संस्थेचा कारभार सुरळीत चालण्यासाठी तसेच खेळांवर परिणाम होऊ नये म्हणून खालील बाबींची पूर्तता करण्यात आली आहे :-

- विविध खेळांसाठी, त्या खेळामध्ये प्राविण्य असलेल्या सभासदांची प्रत्येक खेळासाठी द्विस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमार्फत खेळाडुंना विविध स्पर्धेत सहभागी होण्यासाठी लागणारे मानधन, विशेष नैमित्तिक रजा, खेळाचे साहित्य, गणवेश, किट्स इ. बाबींची पूर्तता करण्यात येते.
- क्रीडाभवनात कार्यरत असलेले विविध कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन नियमितपणे अदा करण्यात येते.
- शिवाजी पार्क मैदानात असलेले क्रिकेट पीच दुरुस्त करुन खेळाडुंना उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच इतर वेळी सदर पीच विविध क्रिकेट क्लब यांना भाडेतत्वावर देऊन क्रीडाभवनाकरिता महसूल जमा करण्यात येत आहे.
- क्रीडाभवनामार्फत दरवर्षी राज्य नाट्य स्पर्धेमध्ये महानगरपालिकेच्या कलांकारांमार्फत नाट्यप्रयोग सादर करण्यात येतो. सदर कालांकारांमधील कलागुणांना वाव देण्यासाठी क्रीडाभवनामार्फत सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.

रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार, क्रीडाभवनाच्या बँक खात्याचे के.वाय.सी. प्रणालीनूसार पॅन कार्ड असणे आवश्यक असल्याने क्रीडाभवनाच्या बँक खात्याचे पॅन कार्ड तयार करण्यासापेक्ष माहे डिसेंबर २०२२ पासून ते दिनांक १५.०२.२०२३ पर्यंत क्रिडाभवनाचे बँक खाते व्यवहार तात्पुरत्या स्वरुपात रोखण्यात आले होते. दिनांक ११.०२.२०२३ रोजी क्रीडाभवनाचे पॅन कार्ड प्राप्त झाले असून बँक खात्याचे सर्व व्यवहार पुर्ववत करण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्रीडाभवनाकरीता अस्तित्वात असलेल्या नियमावलीत प्रशासकामार्फत काही अमुलाग्र बदल सुचविण्यात आले असून त्यानुसार एक नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर नवीन नियमावलीनुसार, क्रीडाभवनाची निवडणूक होण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेस सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी विधी अधिकारी यांना तपासणी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने विधी अधिकारी यांनी, "तत्कालीन क्रीडा समितीच्या सन २०१० ते २०१५ पर्यंतचा आर्थिक ताळेबंदाचा अहवाल सादर करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे नमूद आर्थिक वर्षाच्या ताळेबंद, खाजगी लेखापरिक्षकाची नेमणूक करुन लेखा परिक्षण करुन घ्यावेत तसेच सन २०१० ते २०१५ चा ताळेबंद अहवालाचे लेखापरिक्षण होईपर्यंत क्रीडाभवनाचा कारभार प्रशासकामार्फत सुरु ठेवावा" असे अभिप्राय दिले. सदर अभिप्रायांना आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी मान्यता दिली असून त्यानुसार, आर्थिक ताळेबंद तपासणीची कार्यवाही सुरु आहे.

*******

H-0132-10
C:\Users\ujwal.salvi\Desktop\Backup of Ajit\Backup of E\UDD-UD21\CR 176_2023_BMC_C_01.docx

महाराष्ट्र विधानसभा

लक्षवेधी सूचना क्र.६२ | नगर विकास विभाग

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा.श्री. अतूल भातखळकर, श्री.सुनिल टिंगरे, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.सुनिल केदार, श्री.अस्लम शेख, श्री. प्रताप सरनाईक विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :

" रस्त्यांवर वाढत असलेल्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर उपाय शोधताना त्यांचे नियमन करणे गरजेचे असून कुत्र्यांचे निर्बिजीकरण, त्यांचा आहार, देखभाल, लसीकरण यावरही उपाय होणे गरजेचे असल्याचे मत मुंबई उच्च न्यायालयाने दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, श्वानांवर आवर घालण्यासंबंधीच्या उपाययोजना, त्यांचे लसीकरण, रेबिज इंजेक्शन याकरिता आवश्यक निधी प्रशासनाला उपलब्ध करुन देण्याची गरज असणे, तसेच, स्वयंसेवी संस्थांची मदत घेऊन भटक्या कुत्र्यांचा प्रश्न सोडविण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. "

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे याचिका क्र.६९१/२००९ Animal Welfare Board of India V/s. People for Elimination of Stray Troubles and Others दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेनुसार दिनांक १८.११.२०१५ व दिनांक ०९.०३.२०१६ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी मा.न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया, केंद्र शासन यांनी शपथ पत्र दाखल केले होते. सदर शपथपत्रानुसार कुत्र्यांची वाढती संख्या मर्यादीत ठेवण्यासाठी, रेबीज निर्मुलनासाठी आणि मनुष्य-कुत्रा संघर्ष टाळण्यासाठी सचिव,नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.०८.२०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्य स्तरीय देखरेख समिती गठीत केलेली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे याचिका क्र.६९१/२००९ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०४.१०.२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी काटेकोरपणे कार्यवाही करण्याचे आदेश नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ११.११.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात आले. सदर आदेशात नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी Animal Birth Control Monitoring Committee स्थापन करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना सादर करण्याबाबत नमुद केले आहे. तसेच आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी एकत्रित अहवाल राज्यस्तरीय देखरेख समिती यांना सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार सदर समित्या प्रामुख्याने Animal Birth Control (Dogs) Rules, २००१ मधील तरतूदीनुसार Dog Control Program चे नियोजन व व्यवस्थापन करणे, भटक्या कुत्र्यांना पकडणे, वाहतूक करणे, नसबंदी करणे, लसीकरण करणे व औषधोपचार करुन कुत्र्यांना मूळ स्थानी सोडून देणे इ. अनुषंगीक कामांसाठी कार्यरत आहेत. तसेच राज्यातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण, लसीकरण बाबत सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती या स्वायत्त संस्था असल्याने भटक्या कुत्र्यांच्या उपाययोजनांवरील खर्चाची तरतूद ही त्यांचे स्तरावर करण्यात येते.

प्रस्तुत लक्षवेधी सूचनेतील मुद्दे विचारात घेता, मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे याचिका क्र.६९१/२००९ Animal Welfare Board of India V/s. People for Elimination of Stray Troubles and others च्या अनुषंगाने राज्यातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण, लसीकरण बाबत सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती यांचे स्तरावर गठीत समितींकडून कार्यवाही करण्यात येत असून शासनाकडून वेळोवेळी सदर कार्यवाहीचा अनुपालन अहवाल घेण्यात येत आहे.

 ----- XXX -----

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक ६३**

**श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई वाहनतळ प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणार असल्याचे माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, पालिकेच्या २४ विभागातील वाहनतळ व्यवस्थापनाचा आराखडा तयार करण्यात येणार असणे, त्यामध्ये, कांदिवली पूर्व येथील स्व. मनोहर पर्रीकर मैदानात भूमिगत वाहनतळ उभारण्याचे काम सुरु असणे, त्यामुळे, मुंबई शहरात भूमिगत वाहनतळाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**-: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

मुंबई शहराचा विकास आराखडा व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रातील सर्व सार्वजनिक वाहनतळ स्थळे आणि रस्त्यावरील वाहनतळाचे व्यवस्थापन, नियोजन आणि नियंत्रण करण्याकरीता महानगरपालिका स्तरावर मुंबई वाहनतळ प्राधिकरणाची निर्मिती करावी, अशी शिफारस करण्यात आली आहे.

शहरातील वाहतूकीची चलनशिलता व अर्थव्यवस्था यामधील सुधारणा, वाहनतळ धोरण निश्चित करणे, पार्किंग व्यवस्थापनेचे एकात्मीकरण, नाविन्यपूर्ण पध्दतीने पार्किंगच्या व्यवस्थापनेसह रस्त्यावरील व रस्त्यालगतचे पार्किंगचे व्यवस्थापन, जाहिरातीकरण, पार्किंग दराचे सुसुत्रीकरण, खाजगी रस्त्यालगतच्या वाहनतळांचा विकास व व्यवस्थापनाचे नियमन, पार्किंगची संकल्पचित्रे, पार्किंग परवाना निर्गमित करणे, करारनामा करणे, पार्किंगमधून निर्माण होणारे उत्पन्न व प्राधिकरणाच्या खर्चाचा ताळमेळ करणे, महत्वाचे भागधारक (कॉर्पोरेट कार्यालये, ऑटोमोबाईल उद्योग संस्था, शासकीय कार्यालये, अशासकीय संस्था इ.) यांना सहभागी करुन घेणे ही वाहनतळ प्राधिकरणाची उद्दीष्टे आहेत.

सदर वाहनतळ प्राधिकरण, महापालिकेतील विविध क्षेत्रांत/पट्ट्यांकरीता पार्किंग शुल्क, दंड निश्चित आणि जाहिर करणे, तसेच बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील सर्व पार्किंगच्या रिक्त स्थानांची अंकात्मक भौगोलिक माहिती प्रणाली (Digital GIS), आय.टी.ई.एस. सक्षम मानक ऑपरेटिंग प्रक्रियेसह बृहन्मुंबईच्या हद्दीत पार्किंगचे नियम विकसित करणे इत्यादी कामकाज करेल.

सदर वाहनतळ प्राधिकरणाच्या स्थापनेकरीता महानगरपालिकेमार्फत समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीस पार्किंग संबंधिची माहिती उपलब्ध करुन देण्याण्याकरीता मे. टाटा सामाजिक विज्ञान संस्था

यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मे. टाटा सामाजिक विज्ञान संस्था यांनी महानगरपालिकेच्या २४ विभागातील सर्वेक्षण करुन 'विभाग वाहनतळ व्यवस्थापन आराखडा' तयार केला असून त्यावरील पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील नियम क्रमांक ५३ अन्वये भुमिगत वाहनतळ बनविण्याबाबत सुचविले आहे. महानगरपालिका हद्दीतील विविध विभागामध्ये उद्याने, खेळाची मैदाने व सार्वजनिक खुल्या जागा यांमध्ये अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने स्व. मनोहर पर्रीकर मैदानावर भूमिगत वाहनतळ उभारण्याकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्ल्यागाराची नियुक्त करण्यात आला आहे. तसेच मे. मास्टर अँड असोसीएट्स यांना स्वीकृतीपत्र देण्यात आले आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने सदर भूमिगत वाहनतळाचे आराखडे व नकाशे तयार केले असून त्यांना मंजूरी देण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

*******

## महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना**

### सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.छगन भुजबळ, डॉ.जितेंद्र आव्हाड, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक महानगरपालिकेने गेल्या अडीच वर्षात केलेल्या साडेसहाशे कोटींच्या रस्त्यांची पावसाळ्यात अक्षरशः चाळण झाल्यामुळे विविध संघटनांकडून माहे सप्टेंबर मध्ये वा त्या सुमारास आंदोलने करण्यात आलेले असणे, नाशिक शहरातील रस्त्याच्या कामांची गुणवत्ता खराब व दर्जाहीन असल्याबाबत नाशिक महानगरपालिकेला माहे सप्टेंबर मध्ये असंख्य तक्रारी प्राप्त झालेल्या असणे, नाशिक शहरात दर्जेदार रस्ते तयार करण्यासाठी या कामांची त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्याचा नाशिक महानगरपालिकेने माहे ऑगस्ट मध्ये निर्णय घेतलेला असणे, रस्त्याच्या कामांची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी बांधकाम विभागासह गुणवत्ता नियंत्रण विभागाची असूनही प्रत्यक्षात या विभागांमार्फत कोणावरही कारवाई करण्यात आलेली नसणे, सन २०१९ ते २०२२ या तीन वर्षांत सुमारे एक हजार कोटी रुपयांच्या रस्त्यांची कामे झालेली असणे, परंतु तीन वर्षे होण्याच्या आतच गेल्या पावसाळ्यात शहरातील सर्व रस्त्यांची चाळण झालेली असणे, खड्यामध्ये रस्ते शोधण्याची वेळ नाशिककरांवर आलेली असणे, रस्त्यांच्या झालेल्या दुर्दशेमुळे नागरिक त्रस्त झाल्यामुळे या खड्डयांविरोधात ठिकठिकाणी आंदोलने करण्यात आलेली असणे, महानगरपालिकेने रस्ते दुरुस्तीसाठी ठेकेदारांना वेळोवेळी मुदती देण्यासह त्यांना काळ्या यादीत टाकण्याचे इशारे दिलेले असणे, प्रत्यक्षात महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत निकृष्ट काम केलेल्या ठेकेदारांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, रासात्यांच्या कामांची तपासणी त्रयस्थ पार्टीमार्फत करण्याची केवळ घोषणा करण्यात आलेली असणे, मात्र याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये सुमारे २१९५ कि.मी. लांबीचे रस्ते असुन त्यापैकी सुमारे १५८२ कि.मी. लांबीचे डांबरी रस्ते आहेत. नाशिक महानगरपालिकेमार्फत मागील २०१९-२० ते २०२१-२०२२ या तीन वर्षांमध्ये रस्ते बांधणे कामांकरीता रु.४८९.७२ कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे.

ज्या रस्त्यांचे डांबरीकरण व अस्तरीकरण गेल्या तीन वर्षात करण्यात आले आहे मुख्यत: त्या रस्त्यांवर खड्डे पडलेले नसून सुमारे ९ ते १० वर्षापुर्वी अस्तरीकरण केलेल्या इतर रस्त्यांवर खड्डे पडलेले होते. तथापि, जी कामे दोष दायित्व कालावधीतील आहेत व त्यापैकी काही कामांमध्ये विहीत मुदतीत दोष निर्माण झाले आहेत, त्या कामांमधील दोष निवारण्याची जबाबदारी निविदा अटी व शर्तींनुसार संबधीत मक्तेदार यांचीच असल्यामुळे त्यांचेवर जबाबदारी निश्चित करुन अशा ३९ कामांच्या १४ मक्तेदारांना

नोटीसा बजावण्यात येऊन त्यांचे स्वखर्चाने रस्ते दुरुस्तीची कामे करुन घेण्यात आली आहेत. शासन निर्णय दिनांक १४/०१/२०१९ व Indian Road Congress (IRC) 82-2015 यामध्ये रस्ते दुरुस्तीच्या कामासाठी डांबर मिश्रीत खडीने खड्डे भरणे या करीता डिसेंबर ते जुन नजीकच्या पावसाळ्यापर्यंत असा दोष दायित्व कालावधी निर्धारीत केलेला आहे. त्यानुसार मक्तेदाराकडून काम करून घेण्यात येते.

तसेच, दिनांक २८ मार्च २०१८ च्या शासन निर्णयानुसार शासकिय तंत्रनिकेतन, नाशिक यांचेमार्फत त्रयस्थ संस्था तांत्रिक लेखा परिक्षण करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील दैनदिन कामांचे गुणवत्ता नियंत्रणाचे दृष्टीने त्रयस्थ संस्था नेमणुकीची प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

सन २०२२ मधील नाशिक शहरातील पर्जन्यमान हे इतर वर्षाचे तुलनेने सरासरी पर्जन्यमानापेक्षा जास्त झालेले आहे. त्यामुळे या कालावधीमध्ये अस्तित्वातील रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग सतत ओला असल्यामुळे सुमारे ९ ते १० वर्षापुर्वी अस्तरीकरण केलेल्या रस्त्यांवर खड्डे पडले होते.

नाशिक शहरामध्ये सद्यस्थितीत विभागांतर्गत भुयारी गटारींची कामे, पाणीपुरवठयाची कामे, भुमीगत MNGL गॅस पाईपलाईन, रिलायन्स, एअरटेल, जिओ फायबर आदी कंपन्यांचे केबल नेटवर्किंगची कामे, यामुळे अनेक रस्त्यांवर खोदकामे सुरु आहेत. यामुळे देखील रस्त्यांवर खड्डे पडतात. त्याचप्रमाणे नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नाशिक स्मार्टसिटी मार्फत सुध्दा अनेक विकासकामे सुरु आहेत. त्याअंतर्गत भुमीगत पाण्याच्या पाईपलाईन व इतर सुविधांसाठी खोदकामे करण्यात येत असतात. शासन निर्णय व IRC मधील तरतुदीनुसार या रस्त्यांचा दोष दायित्व कालावधी त्यापुर्वीच संपलेला आहे. त्यामुळे अशा रस्त्यांवर पावसाळा कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात खडीयुक्त मटेरियल वापरुन तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली होती. सद्यस्थितीत पावसाळा कालावधी संपल्यामुळे डांबरयुक्त मटेरियल वापरुन रस्ते दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आलेले असुन मोठया प्रमाणावर रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

दिनांक १४/०१/२०१९ रोजीचा शासन निर्णय व Indian Road Congress (IRC) 82-2015 मधील तरतुदीनुसार डांबरी रस्त्यांना दर तीन वर्षांनी नुतनीकरण करुन नियतकालिक देखभाल करणे गरजेचे आहे. याकरिता नाशिक महानगरपालिकेस दरवर्षी सुमारे रु.७२० कोटी प्रतिवर्ष खर्च अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त नाशिक महानगरपालिकेच्या क्षेत्रातील उर्वरित नविन विकसीत होणाऱ्या भागांमध्ये नविन रस्ते विकसीत करण्याची जबाबदारी व दायित्व नाशिक महानगरपालिकेवर आहे. तथापी नियतकालिक देखभाल करीता उपलब्ध होणारी तरतुद अल्प प्रमाणात आहे. IRC मधील मानांकनानुसार नुतनीकरण अथवा अन्य आवश्यक कामे वेळेवर झाल्यास अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होणार नाही. यासाठी आवश्यक तरतुद उपलब्ध करुन देण्यासाठी अर्थसंकल्प तयार करतांना महानगरपालिकेमार्फत उचित काळजी घेण्यात येत आहे.

***************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

**डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. छगन भुजबळ, श्री. जयंत पाटील, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. रोहित पवार, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. शेखर निकम, श्री. संजय बनसोडे,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"मुंबई महापालिका क्षेत्रात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढलेला असून मागील दोन वर्षात तब्बल १ लाख १४ हजार पेक्षा जास्त जणांना कुत्र्याने चावा घेतल्याची माहिती दि.१० फेब्रुवारी,२०२३ रोजी उघडकीस आलेली असणे, भटक्या कुत्र्यांचा उपद्रव रोखण्यासाठी निर्बीजीकरण आणि रेबीज लसीकरण आदि उपक्रम राबविले जात असतांनाही महापालिका प्रशासनास अपयश आलेले असणे, विशेषतः रात्रीच्या वेळी दबा धरुन बसणारे श्वानांकडून प्रवाशी, वाटसरुंवर अचानक हल्ला करुन चावा घेण्याचे प्रकार दररोज घडत असणे, लहान मुले, महिला व अबालवृध्दांवर या श्वानांकडून हल्ले केले जात असणे, कामावरुन उशिरा घरी परतणा-या नोकदारांमध्ये नेहमीच प्रचंड भीतीचे वातावरण असणे, परिसरात सुमारे ३ लाखांपेक्षा जास्त भटके कुत्रे असून समाजातील काही जणांकडून भटक्या कुत्र्यांना बेकायदेशीररीत्या अन्न दिले जात असल्यामुळेही कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली असणे, मुंबई परिसरात भटक्या कुत्र्यांची समस्या गंभीर बनलेली असतांनाही, सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष,संताप तसेच चिडीची भावना, भटक्या कुत्र्यांच्या आक्रमणामुळे अनेकजण गंभीर जखमी होत असून मानवी आरोग्यावर घातक परिणाम होत असणे, मुंबईबरोबरच मुंबई महानगर प्रदेशात नागरीकांवर श्वानांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे त्यांच्या जिवीतासंदर्भात गंभीर प्रश्न उभा राहिलेला असणे, यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन सदरबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

भटक्या श्वानांची संख्या नियंत्रित ठेवण्याबाबत प्राणीक्लेष प्रतिबंधक कायदा, १९६० अन्वये प्राणी जनन नियंत्रण नियमावली, २००१ बनविण्यात आली असून, भारतीय जीव जंतू कल्याण मंडळाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशांनुसार भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण व रेबीज लसीकरण करावयाचा कार्यक्रम बृहन्मुंबई महानगरपालिका सन १९९४ पासून अशासकीय संस्थांच्या मदतीने राबवित आहे. सदर श्वान निर्बिजीकरण व लसीकरण कार्यक्रमांतर्गत सन १९९४ ते जानेवारी २०२३ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ३,८९,२०४ भटक्या श्वानांच्या निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

सद्य:स्थितीत एकूण ६ शासकीय / अशासकीय संस्थांच्या माध्यमातून श्वानांचे निर्बिजीकरण व रेबीज लसीकरण करणे याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता रु. ६ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे. भटक्या श्वानांद्वारे नागरीकांना होणारे चावे कमी करण्याच्या दृष्टीने भटक्या श्वानांविषयी व रेबीज रोगाविषयी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक,

शेटा-H-0065(750-4-23) (कृ.मा.प.)

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भटके श्वान निर्बिजीकरण व लसीकरण कार्यक्रमांतर्गत जास्तीत जास्त शासकीय / अशासकीय संस्थांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेमार्फत विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. सन २०२३-२४ मध्ये २२,२५१ भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण व रेबीज लसीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. तसेच, एप्रिल २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये १,००,००० इतक्या भटक्या श्वानांचे रेबीज लसीकरण करण्याचे उद्दिष्ट असून, त्यासाठी "वर्ल्डवाईट वेटेरीनरी सर्व्हिसेस" या जागतिक अशासकीय संस्थेची मदत घेण्यात येणार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका पुरस्कृत एकूण ६ अशासकीय प्राणीप्रेमी संस्थांमध्ये निर्बिजीकरण व लसीकरणासाठी दाखल करण्यात आलेल्या भटक्या श्वानांना खाऊ घालणे व देखभाल करणे इत्यादी कामे पार पाडली जातात. सन २०१४ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत भटक्या श्वानांचे सर्वेक्षण करण्यात आले होते, तसेच सन २०२३ मध्ये देखील भटक्या श्वानांचे सर्वेक्षण करणे प्रस्तावित आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सन २०२१ मध्ये ६१,३३२ व सन २०२२ मध्ये ६७,९२९ इतक्या श्वानांनी चावा घेतल्याच्या नोंदी आहेत. परंतु, सदर कालावधीमध्ये एकाही नागरिकाचा रेबीज या आजाराने मृत्यू झाल्याची नोंद आढळून आलेली नाही. बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण १४७ श्वान दंश लसीकरण केंद्रावर श्वानदंशावर लसीकरण करण्यात येत आहे.

मृत श्वानांसाठी दहनभट्टीची व्यवस्था मालाड, देवनार व महालक्ष्मी येथे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील नागरिकांच्या भटक्या श्वानांबाबतच्या तक्रार निवारणाकरिता श्वान नियंत्रण विभागांतर्गत श्वान अनुज्ञापन आस्थापना अनुक्रमे मस्जिद बंदर, मुलुंड, बांद्रा व मालाड या ठिकाणी कार्यरत आहेत. सदर आस्थापनांमार्फत भटके श्वान पकडणे, निर्बिजीकरण करणे, लसीकरण करणे व पुन्हा मूळ ठिकाणी सोडण्याचे काम पार पाडले जाते. सदर प्रकरणी भारतीय जीव जंतू कल्याण मंडळाने आदर्श मार्गदर्शक प्रणाली निर्गमित केली असून, त्यानुसार भटक्या श्वानांवर नियंत्रण ठेवण्याकरिता विहित आराखड्यानुसार कार्यवाही होते.

*********

लक्षवेधी सूचना क्र. ५७१

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. संजय केळकर, श्री. किसन कथोरे, ॲड. आशिष शेलार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५७१ खालीलप्रमाणे आहे:-**

"प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे व राजकीय दबावामुळे ठाणे महानगर पालिका हद्दीत दिवसेदिवस अनाधिकृत बांधकामे वाढत असून शहराचे विदृपीकरण होत असणे. तथापि, ठामपा हद्दतील दिवा प्रभाग समितीमधील प्रभाग क्र. २९ व ३३ येथील शिवली नगर दोस्ती पाठीमागील डी.पी. रोड लगत, खान कंपाऊड शीळ आचार गल्ली, शीळ ठाकूर पाडा या परिसरात गेल्या दीड वर्षापासून मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकामे सुरु असल्याची तक्रार केल्याने सदर तक्रारीची दखल घेऊन आयुक्तांनी दखल घेणे व तेथील सहाय्यक आयुक्त फारूक शेख यांच्यावर दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी कारवाई करण्यात येणे. परंतु ठाणे शहरात उथळसर प्रभाग समिती राबोडी नं - १ व २ मधील झालेले अनधिकृत बांधकामे तसेच ठाणे मुख्य मार्केट, कोपीनेश्वर मंदिराच्या दुरुस्तीच्या नावाखाली केलेले वाढीव बांधकाम तसेच लक्ष्मीनारायण मंदिर मधील आनंदभारती मंदिराच्या समाधीच्या बाजूला दुकानाचे वाढीव बांधकाम याबाबत अतिक्रमण हटवण्याची मागणी होऊनही कारवाई न करणे. तसेच माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीमध्ये ढोकाळी, दादलानी, बालकुम या परीसरात फुटपाथावर अनधिकृत गाळे व इमारतही बांधून शासकीय व महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण होऊनही जबाबदार अधिका-यांवर कारवाई न होणे. तसेच अनधिकृत पाईप लाईन टाकणे, बार दुकानदारांकडून अनधिकृत बांधकामे करण्यात येणे. परिणामी स्थानिक रहिवाश्यांना उपद्रव होणे. तसेच खोपट येथे विकास आराखड्याप्रमाणे बांधकाम न करता परवानगीपेक्षा अधिकचे बेकायदेशीर बांधकाम रामचंद्र टावर येथे बांधण्यात येणे. खोपट येथे परदेशी चाळ येथे परवानगी नसताना डबल रूमचे बेकायदेशीर बांधकाम करणे. तसेच जांभळीनाका, स्टेशन रोड, नागरी स्टोर, दत्त मंदिर, चेंदणी कोळीवाडा, अशोक टॉकिज परिसरात हातगाडी, फेरीवाले यांचे अतिक्रमणामुळे वर्दळीच्या रस्त्यावरील नागरिकांना उपद्रव होणे. या सर्व अतिक्रमणाबाबत, बेकायदेशीर बांधकामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०२३ रोजी आयुक्तांसह सबंधित अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करूनही जबाबदार अधिका-यांवर कोणतीच कारवाई न होणे. तथापि दिवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त श्री. शेख यांना तेथील अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामांना जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई केली गेली त्याच नियमानुसार राबोडी, ढोकाळी, बाळकुम, जांभळीनाका, स्टेशन परिसरातील अतिक्रमण व अनाधिकृत बांधकामांना जबाबदार धरून येथिल अतिक्रमण विभागातील जबाबदार अधिका-यांना निलंबित करण्याची मागणी होणे. परंतु वरिष्ठ अधिकारी व राजकीय नेत्याच्या पाठबळांमुळे संबंधित अधिका-यांना वाचविण्याचा प्रयत्न होणे. परिणामी नागरीकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होणे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची सचिव स्तरावरील त्रयस्थ वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागणी करणे व त्यातील दोषींवर निलंबनासारखी तात्काळ कारवाइ करण्याची देखील मागणी होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

रेरा H153 B (750-4-23)

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार ठाणे क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण यांच्या विरोधात सातत्याने व नियमितपणे कारवाई करण्यात येते. दरम्यान ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिवा प्रभाग क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम प्रकरणी तेथील सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांच्यामार्फत प्रभावीपणे कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित अधिकाऱ्यास दिनांक १३.०२.२०२३ रोजी निलंबित करण्यात आले असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार शहरातील उथळसर प्रभाग समिती अंतर्गत राबोडी परिसरातील अनधिकृत बांधकामांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील विविध कलमान्वये कार्यवाही करण्यात आली आहे. तथापि, ठाणे मुख्य मार्केट, कोपीनेश्वर मंदिराच्या बांधकामांबाबत महानगरपालिकेकडे कोणताही संदर्भ प्राप्त झाला नसल्याची बाब ठाणे महानगरपालिकने कळविली आहे. तसेच लक्ष्मीनारायण मंदिर असलेल्या विध्वंस इमारत दुरूस्तीस सन २०२० मध्ये नौपाडा प्रभाग कार्यालयामार्फत परवानगी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे उथळसर कार्यक्षेत्रातील रामचंद्र टॉवर नामक इमारतीस सन २००३ मध्ये वापर परवाना अदा करण्यात आला आहे. तथापि, इमारतीच्या आवारामध्ये ऑफिस / वॉचमन रुम बांधकाम डिसेंबर, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आल्याने मंजुरी व्यतिरिक्त बांधकामाकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीन्वये नोटीस बजाविण्यात आली आहे. तसेच उथळसर भागातील परदेशी चाळ या जुन्या मालमत्तेमध्ये वाढीव बांधकाम यापूर्वी एप्रिल, २०२२ मध्ये निष्कासित करण्यात आले होते. तथापि, सदर जागेवर पुन:श्च बांधकाम झाल्याचे निदर्शनास आल्याने उपरोक्त बांधकामातील भोगवटा रिक्त करण्याकरिता पोलीस विभागास संपर्क करण्यात आला आहे. सदर भोगवटा रिक्त झाल्यावर प्रत्यक्ष बांधकाम निष्कासनाची कार्यवाही करण्याची तजविज महानगरपालिकेने ठेवली आहे.

माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीअंतर्गत बाळकुम, ढोकाळी येथील अनधिकृत बांधकाम प्रकरणी महानगरपालिका स्तरावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. बाळकुम, दादलानी येथील अनिवासी गाळे / पत्रा शेड पुर्णत: निष्कासित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे ठाणे शहरातील जांभळी नाका, स्टेशन परिसर व इतर सर्व क्षेत्रांमध्ये अतिक्रमण रोखण्याकरिता, हातगाडी / बेकायदेशीर फेरीवाले यांना आळा घालण्यासाठी विशेष अतिक्रमण विरोधक पथकांद्वारे मोहिम हाती घेण्यात येते. सदरच्या पथकांना अतिक्रमण विरोधी कार्यवाही करताना पुरेसे मनुष्यबळ, यंत्र सामुग्री, पोलीस सुरक्षा पुरविण्यात येते. तसेच सदर क्षेत्राची वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत वेळोवेळी पाहणी करून आवश्यक ते निर्देश देण्यात येतात.

ठाणे महानगरपालिका स्तरावर प्राप्त होणाऱ्या अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण संदर्भातील तक्रारींची गंभीर दखल घेण्यात येते. अनधिकृत बांधकामे कोणत्याही क्षणी महानगरपालिकेमार्फत निष्कासित होऊ शकतात, त्यामुळे अशा बांधकामामध्ये घरे किंवा रहिवास न करण्याबाबत नागरिकांना विविध माध्यमातून आवाहन करण्यात येते. तसेच अनधिकृत बांधकाम निदर्शनास आल्यास अधिनियमातील तरतुदीन्वये विहित मुदतीत कार्यवाही करण्यात येते. आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्या स्तरावर वेळोवेळी आढावा बैठक आयोजित करुन शहरातील अनधिकृत

बांधकामांवर झालेल्या किंवा सुरू असलेल्या कारवाईच्या अनुषंगाने सर्व संबधित अधिकाऱ्यांना सूचना व निर्देश देण्यात येत असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन २०१८ नंतर झालेल्या अनधिकृत बांधकामांबाबत माहे एप्रिल, २०२२ मध्ये आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्या आढावाअंती महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ५ अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरू आहे. तसेच शासनाकडून प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यात आलेल्या ९ अधिकाऱ्यांविरुध्द अनधिकृत बांधकामांवर प्रभावीपणे कार्यवाही न केल्याच्या कारणाने त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

तसेच, शासनाने यापूर्वी वेळावेळी ठाणे शहर क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन संदर्भात दिनांक २.३.२००९ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना तसेच अधिनियमातील विविध तरतुदींच्या आधारे तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना दिले आहेत. दरम्यान दिनांक २६.१२.२०२२ च्या शासन पत्रान्वये ठाणे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकाम / अतिकमणासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून दुर्लक्ष व टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्याविरुध्द सक्त कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना सूचित करण्यात आले आहे.

प्रस्तुत लक्षवेधी सूचनेतील उल्लेखित क्षेत्रातील विविध तक्रारींचे गांभीर्य विचारात घेता, सदर प्रकरणी आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्या स्तरावरून सखोल चौकशी करुन आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना शासन स्तरावरून देण्यात येत आहेत. तसेच उपरोक्त तक्रारींमध्ये तथ्य आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द सक्त कार्यवाही करण्याचे निर्देश निर्गमित करण्यात येत आहेत.

****

लक्षवेधी सूचना क्र. ७९४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. प्रमोद (राजू) रतन पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७९४ खालीलप्रमाणे आहे:-**

"ठाणे महानगरपालिका दिवा प्रभाग समिती अंतर्गत दिवा प्रभाग समितीमध्ये सुरु असलेली बेसुमार अनधिकृत बांधकामे, मनपा अधिकाऱ्यांकडून संगनमत करुन बांधकामाना संरक्षण देणे, याबाबत वारंवार पत्रव्यवहार करून, प्रत्यक्षात भेट घेऊन निदर्शनास आणूनही कारवाई करण्यास होत असलेली टाळाटाळ, केवळ १५ दिवसांत ७-७ मजल्यांच्या धोकादायक इमारती बांधण्याचे काम सर्रासपणे सुरु असणे. गार्डन, रुग्णालय, डी.पी. तसेच इतर आरक्षणांवरही बांधकामे सुरु असल्याने रहिवाशांना कोणत्याही सोयी सुविधा देणे शक्य नसणे, सदर बांधकामांना पाणी, रस्ते, वीज, ड्रेनेज सारख्या मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्यास महानगरालिका असमर्थ असणे, कोणतीही दुर्घटना घडल्यास बचाव कार्यासाठी अग्निशमन दलही या इमारतीपर्यंत पोहचू शकत नसणे, अनधिकृत बांधकामे थांबवावी यासाठी सर्वच लोकप्रतिनिधींनी जिल्हा नियोजन बैठकीपासून अगदी विधानसभेपर्यंत आवाज उठवूनही कोणतीही कारवाई होत नसणे, दिनांक २४ जून, २०१३ रोजी शीळ परिसरातील लकी कंपाऊंडमधील एक इमारत कोसळून ७६ पेक्षा जास्त नागरिकांचे गेलेले दुर्दैवी बळी, तरीही महानगरपालिका प्रशासन अशा बांधकामांवर कोणतीही कारवाई नसणे, २६ जुलै सारखी पूर परिस्थिती निर्माण झाल्यास दिव्यामध्ये बिकट परिस्थिती निर्माण होऊन अनेक रहिवाशांचे बळी जाण्याची शक्यता, कारण खाडी व खारपुटीवरही बांधकामे सुरु असणे, तसेच स्टेशन परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांकडून कचरा खाडीमध्येच टाकला जाणे, त्यामुळे पावसाळ्यात पाणी निचरा होण्यास येत असलेली अडचण, दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी दिवा प्रभाग समितीमधील वॉर्ड ऑफिसर यांच्यावर झालेली निलंबनाची कार्यवाही, परंतु केवळ ही कारवाई पर्याप्त नसून ठाणे महानगरपालिकेतील गेल्या काही वर्षांपासून दिवा प्रभागातील वॉर्ड ऑफिसर, अतिक्रमण विभागातील उपायुक्त तसेच मनपा प्रशासनातील अतिक्रमण, घनकचरा, सार्वजनिक बांधकाम, पाणी पुरवठा, आरोग्य, स्मार्टसिटी अशा सर्वच विभागात सुरु असलेल्या भ्रष्टचार पाहता मनपाच्या कामाची कॅगद्वारे ऑडीट करण्याची आवश्यकता, तसेच सर्वच विभागातील संबंधित सर्व अधिकाऱ्यांची अँटी करप्शन विभागाकडून चौकशी करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिका हद्दीतील दिवा प्रभाग कार्यक्षेत्रात निदर्शनास येणाऱ्या अनधिकृत बांधकामावर नियमितपणे कार्यवाही करण्यात येते. तथापि, या क्षेत्रात निदर्शनास आलेली अनधिकृत बांधकामे कायदेशीर प्रक्रिया पार पाडून निष्कासित करण्याकरिता दिवा प्रभाग समितीच्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना निर्देश देण्यात आले आहेत.

रोटा H/53८ (750-423)

ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार दिवा प्रभाग कार्यक्षेत्रातील शिवली नगर, खान कंपाउंड व डिपीरोड व अन्य ठिकाणच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई अंतर्गत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार ९२ बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली असून ६९ बांधकामावर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व नियोजन अधिनियम, १९६६ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दिवा प्रभाग कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामासंदर्भात नागरिक, लोकप्रतिनिधी व शासनामार्फत मुख्यालय स्तरावर प्राप्त होणाऱ्या तक्रारी / निवेदनांवर वेळीच नियमोचित कार्यवाही करण्यात येते. ठाणे महानगरपालिका स्तरावर अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे यावर करावयाच्या कार्यवाहीची प्रमाणित कार्यपध्दती दिनांक ०८.०५.२०१३ रोजीच्या आदेशान्वये निश्चित करण्यात आली आहे. उपरोक्तच्या मार्गदर्शक सूचनान्वये अनधिकृत बांधकामावर कारवाई करणे महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना बंधनकारक आहे. तथापि, शासकीय जमीन / भूखंडाचे संरक्षण करणेची व त्यावर अनधिकृत बांधकाम होवू न देण्याची जबाबदारी दिनांक ०७.०९.२०१० च्या शासन निर्णयानुसार संबंधित विभागांची आहे. त्यानुषंगाने दिवा प्रभाग कार्यक्षेत्रातील खारफुटी नष्ट करुन त्यावर होणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई आयोजित करण्याबाबत महसूल विभागास वेळोवेळी ठाणे महानगरपालिकेकडून पत्रव्यवहार करण्यात येत असून महसूल विभागाने सूचित केल्यावर मनुष्यबळ व यंत्रसामग्री महापालिकेकडून उपलब्ध करुन दिली जाते.

दिवा प्रभाग कार्यक्षेत्रातील फेरीवाल्यांवर सातत्याने कारवाई करण्यात येत असून नागरिकांना व रहदारीस अडथळा करणाऱ्या, तसेच अनधिकृतपणे हातगाडी लावणाऱ्या फेरीवाल्यांवर दोन सत्रात कारवाई करण्यात येत आहे. त्याअंतर्गत चालू आर्थिक वर्षात एकूण ३७५२ हातगाडयांवर कारवाई करण्यात आल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे. सद्यास्थितीत फेरीवाल्यांची संख्या नियंत्रणात असून त्यांचे राष्ट्रीय फेरीवाला धोरणांतर्गत नियमितीकरण करण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

शहर क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणाचा विपरित परिणाम शहराच्या पायाभूत सोईसुविधांवर होतो, ही वस्तुस्थिती आहे. यास्तव, शहराचा सुनियोजित विकास करण्याच्या दृष्टीकोनातून क्लस्टर योजना राबविणेसाठी ठाणे महानगरपालिकेकडून सर्व्हेक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्या अंतर्गत दिवा प्रभाग कार्यक्षेत्रात क्लस्टर योजना अंमलबजावणीचे काम सुरु आहे.

दरम्यान दिवा प्रभाग कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर प्रभाविपणे कारवाई होत नसल्याचे निदर्शनास येताच दिवा प्रभाग कार्यालय, सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात आली असून या अंतर्गत दिनांक १०.०२.२०२३ रोजीच्या आदेशान्वये त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

एकंदरीत ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, हातगाडी/फेरीवाले यावर प्रभावीपणे कारवाई व नियंत्रण होणेकरिता प्रशासनामार्फत आवश्यक ती दक्षता/उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा, सार्वजनिक बांधकाम, पाणी पुरवठा, आरोग्य, स्मार्टसिटी इत्यादी विभागात लोकप्रतिनिधी, सामान्य जनता किंवा इतर सर्व माध्यमातून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निरसन करणे, तथ्य निदर्शनास आल्यास आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्यात येत असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

****

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक ८९८**

**श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

**"बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बी, सी, डी, ई, के/पश्चिम, के/पुर्व, पी/उत्तर, एल, एच/पश्चिम, या प्रभागांत मोठ्या प्रमाणामध्ये बेकायदेशीरपणे अनधिकृत इमारतींचे बांधकामे होत असणे, अशा इमारती पुर्ण झाल्यानंतर** त्या इमारतींवर अधिकृत वा अनधिकृत याबाबत न्यायालयात प्रकरण जाणे, न्यायालयाने सदर अशा इमारती अनधिकृत घोषित करणे, परिणामी तेथील रहिवाशी यांना बेघर होण्याची पाळी येणे, नुकतेच सी वॉर्ड येथील गुलिस्तान अर्पाटमेंट मधील १४० परिवारांना बेघर व्हावे लागणे, त्याच घटनेची बी वॉर्ड येथे मेहबूब सोरटीया या विकासकामार्फत पुनरावृत्ती होणे, मध्या हबीब हायस्कूल समोर इकोनॉमिक हाऊस नावाच्या १५ मजली इमारतीचे राजरोसपणे अनधिकृत बांधकाम सुरू असणे, बी वॉर्ड मधिल डोंगरी या भागात इमारत क्रमांक २२, २४, २६ हे धोकादायक स्थितीत असताना महानगर पालिकेने टेंडर काढून सदर इमारतींचे बांधकाम निष्कासित करणे, सदरच्या इमारतींचे पुन्हश्च: अनधिकृत बांधकाम सुरू असणे, संबंधित अधिकाऱ्यांचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, अशा अनधिकृत इमारती पडण्याच्या दुर्घटना वारंवार घडत असणे, नुकतेच बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कुर्ला एल प्रभागामध्ये दिनांक २९ जून, २०२२ रोजी ४ मजली इमारत कोसळणे, त्यामध्ये १९ जणांची झालेली जिवित हानी, ९ जून २०२१ रोजी मालाड पी/नॉर्थ वॉर्ड येथे ४ मजली अनधिकृत इमारत पडून त्यामध्ये ८ बालके आणि ११ पौढ यांचा दुर्दवी मृत्यू होणे, सदर बाबी लाईफ इन लाईट या सामाजिक स्वयंसेवी संस्थेच्या निदर्शनास येणे, याबाबत त्यांनी वेळीच कार्यवाही होणेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी शहर/उपनगर कार्यालय, उपायुक्त झोन-१, उपायुक्त झोन-४, संबंधित सहायक आयुक्त, कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) यांचेकडे तक्रार करणे, सबब अशा अनाधिकृत बांधकामाकरिता जबाबदार असणाऱ्या बांधकाम व्यवसायीक व बांधकांमावर प्रशासनातर्फे कार्यवाही न होणे, त्यामुळे जनसामान्यामध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, यास जबाबदार असणाऱ्या प्रशासकिय अधिकाऱ्यांवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न होणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

तातडीने

**-: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बी विभागामधील हबीब हायस्कूल समोर स्थित असलेल्या इकनॉमिक हाऊस, १ ला फ्लेंक रोड, डोंगरी, मुंबई येथे चौथ्या मजल्याच्या अनधिकृत आर.सी.सी. कॉलमच्या बांधकामास मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५४(अ) अन्वये दिनांक २२.०७.२०१९ रोजी नोटीस बजाविण्यात आली होती. तद्नंतर, सदर काम हे बंद अवस्थेत होते. दिनांक १६.०७.२०२१ रोजी रोजी सदर काम सुरु असल्याची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाली. या इमारतीची महानगरपालिकेमार्फत स्थळपाहणी केली असता चौथ्या मजल्याच्या वरील कॉलम व स्लॅबच्या शटरिंगचे काम सुरु असल्याचे आढळले. यास्तव, महानगरपालिकेमार्फत दिनांक ०३.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये डोंगरी पोलिस ठाणे मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६५ च्या कलम ५२(४३) अंतर्गत तक्रार नोंदविण्यात आली आहे. तसेच, डोंगरी पोलिस ठाण्यामध्ये दिनांक १८.०८.२०२१ रोजी प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला आहे.

तसेच, महानगरपालिकेमार्फत दिनांक २१.०९.२०२१, २२.०९.२०२१, २७.०९०.२०२१, ०६.१०.२०२१, ०८.१०.२०२१, ०९.१०.२०२१, १२.१०.२०२१, १३.१०.२०२१, १८.१०.२०२१, ०८.११.२०२१, ०९.११.२०२१, १०.११.२०२१, १२.११.२०२१, १३.११.२०२१, ०९.१२.२०२१, १०.१२.२०२१, ११.१२.२०२१ व १३.१२.२०२१ रोजी निष्कासन कारवाई करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी नोटीस धारकाने मा.नगर दिवाणी न्यायालयात क्रमांक २५६४/२०२१ अन्वये खटला दाखल केला होता. मा.नगर दिवाणी न्यायलयाने दिनांक २२.१२.२०२१ रोजी महानगरपालिकेस, पक्षकाराने सादर केलेले कागदपत्रांची छाननी करुन अंतिम आदेश पारित करण्याचे आदेश दिले. तसेच, अंतिम आदेश पारित केल्यानंतर पक्षकारास सक्षम न्यायालयात अपील करण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्याचे आदेश मा.न्यायालयाने दिले. सदर आदेशाच्या अनुषंगाने इमारतीला देण्यात आलेल्या अमान्यतेची सूचना, प्लॅन, सी.सी. ही कागदपत्रे पक्षकाराने सादर केली. सदर कागदपत्रांची छाननी करुन मा.नगर दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक २४.०१.२०२२ रोजी महानगरपालिकेमार्फत अंतिम आदेश पारित करण्यात आले. तसेच, सदर अनधिकृत बांधकाम मोठ्या स्वरूपाचे असल्याने त्याचे निष्कासन करण्याकरिता महानगरपालिका अधिकृत निष्कासन ठेकेदाराची नेमणूक करण्यात आली आहे. तद्नंतर, पक्षकाराने मा.उच्च न्यायालयात क्रमांक १६४ / २०२२ अन्वये दिनांक २८.०२.२०२२ रोजी  खटला दाखल केला आहे. सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिनांक २८.०२.२०२२, १४.०३.२०२२, ०१.०४.२०२२ व १२.०४.२०२२ रोजीच्या आदेशान्वये दिनांक ०८.०६.२०२२ पर्यंत स्थगिती आदेश दिले व महानगरपालिकेस प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले. सदर याचिकेवर मा. उच्च न्यायालयात अद्याप पर्यंत सुनावणी झालेली नाही.

इमारत क्रमांक २४-२६, टनटनपुरा स्ट्रीट, मुंबई येथील इमारत ही उपकरप्राप्त असून धोकादायक होती. सदर इमारत निष्कासित करण्याकरिता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्यामार्फत दिनांक ०९.०८.२०२१ रोजी कार्यादेश देण्यात आला होता. त्या अनुषंगाने सदर धोकादायक इमारत मालक / ताबेदार / म्हाडा प्राधिकरण यांनी अधिकृत कंत्राटदारामार्फत निष्कासित केली होती. तदनंतर, मालक / ताबेदार यांच्यामार्फत या इमारतीचे संबंधित सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता पुनर्बांधकाम करण्यात आले असता या बांधकामास मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४अ अन्वये दिनांक २४.०३.२०२२ रोजी नोटीस बजाविण्यात आली होती. सदर नोटीसीच्या अनुषंगाने मालक / ताबेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने दिनांक १४.०६.२०२२ रोजी अंतरिम आदेश पारित करण्यात आले आहे. तदनंतर, मालक / ताबेदार यांनी सदर अनधिकृत बांधकाम करण्याचे थांबविले होते. मालक / ताबेदार यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाची कोणतीही परवानगी न घेतल्या कारणास्तव दिनांक २८.०६.२०२२ व २९.०६.२०२२ रोजी निष्कासन कारवाई करण्यात आली. तदनंतर, सदरचे बांधकाम पुनश्च: चालू केले असल्याने महानगरपालिकेमार्फत निष्कासन कारवाई सुरु आहे.

गुलीस्थान अपार्टमेंट, पायधुनी, मुंबई या इमारतीच्या अनधिकृत बांधकामास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४अ अन्वये दिनांक १६.११.२०१७ रोजी अनधिकृत बांधकाम थांबविण्याबाबत मालक/धारक/विकासक यांच्यावर नोटिस कारवाई करण्यात आली होती. तद्नंतर मालक/धारक/विकासक यांनी सदर नोटिस विरोधात मा.शहर व दिवाणी

न्यायालयामध्ये दावा क्रमांक ६१८/२०१८ दाखल केला. त्यानुषंगाने मा.शहर व दिवाणी न्यायालयाने दिनांक ०३.०३.२०१८ रोजी स्थगिती आदेश पारित केले. तसेच मा.शहर व दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार सदर इमारतीच्या तळ मजला ते १० मजले असे एकुण ११ मजल्याच्या अनधिकृत बांधकामावर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये दिनांक २७.०३.२०१८ रोजी नोटिस बजाविण्यात आली. सदर अनधिकृत बांधकाम झाल्याप्रकरणी महानगरपालिकेच्या सी विभागातील तत्कालीन अधिकाऱ्यांवर दिनांक १८.०४.२०१८ रोजीच्या आदेशान्वये निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. सद्यस्थितीत संबंधित अधिकाऱ्यांवर खात्यांतर्गत चौकशी चालू आहे.

मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या अंतरिम अर्ज क्रमांक १७३४/२०२१ व मा.उच्च न्यायालयाने दाखल केलेल्या सुमोटो जनहित याचिका क्रमांक ०१/२०२० मध्ये दिनांक २७.०१.२०२२ रोजी दिलेल्या आदेशान्वये तसेच मा. सर्वोच्च न्यायालयच्या SLP (CIVIL) Diary No.(S) ३८९२/२०२२ अन्वये सदर अनधिकृत इमारतीच्या निष्कासन कारवाई करिता कंत्राटदारची नेमणूक करण्यात आली असून सदर इमारतीच्या निष्कासनाची कारवाई सुरू आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एल विभागातील नाईक नगर को. ऑप. हौ. सोसायटीमध्ये ए, बी, सी आणि डी विंग अशा एकूण 4 इमारती (विंग) अस्तित्त्वात होत्या. सदर इमारतीपैकी ए व बी विंग या तळमजला + ४ मजले व सी व डी विंग या तळमजला + ३ मजले या स्वरुपाच्या होत्या. सदर इमारती प्रथमदर्शनी धोकादायक स्थितीमध्ये निदर्शनास आल्यामुळे या इमारतींना महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५४ अन्वये दिनांक २८.०६.२०१३ रोजी दुरुस्ती करण्यासाठी नोटीस बजाविण्यात आली होती. सदर नोटीसीच्या अनुषंगाने, नाईक नगर को. ऑ. हौसिंग सोसायटी मधील इमारत - ए, बी, सी, डी ची दुरुस्ती न केल्यामुळे महानगरपालिकेमार्फत नाईक नगर सोसायटीच्या पदाधिकारी यांच्यावर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ४७५अ अन्वये न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी दिनांक ०३.१०.२०१३ रोजी महानगरपालिकेच्या कायदा अधिकारी यांना कळविण्यात आले होते.

परंतु, इमारतीची दुरुस्ती करण्यात आली नाही. त्यामुळे दिनांक १८.११.२०१४ रोजी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५४ अन्वये ए, बी, सी, डी विंग या इमारतींना रिकामी करुन निष्कासित करण्याबाबत नोटीस देण्यात आली होती. तद्नंतर दिनांक २६.०५.२०१५ रोजी इमारती रिकाम्या करुन निष्कासीत करण्याबाबत नोटीसीचे स्मरणपत्र पाठविण्यात आलेले होते. तद्नंतर दिनांक १६.०५.२०१६ रोजी या ४ इमारतीच्या जलजोडणी व विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता.

त्याअनुषंगाने, नाईक नगर को. ऑ. हौसिंग सोसायटीने संरचनात्मक तपासणी करुन दिनांक ३१.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस असे कळविले की, इमारत डी, सी आणि बी यांचे दुरुस्तीचे काम मे. सचदेव आणि असोसीयट्स यांच्या संरचनात्मक अहवालाप्रमाणे पूर्ण केले. तसेच सदर इमारती "Structural stable" असल्याचे नमूद केले व इमारत 'ए' च्या दुरुस्तीचे काम पुढील ८ आठवड्यामध्ये पूर्ण करण्याचे निर्देश मे. सचदेव आणि असोसियट्स यांच्यामार्फत देण्यात आले आहे. सदर पत्रामध्ये पुढे नाईक नगर को. ऑ. हौसिंग सोसायटीने रु.१००/- च्या मुद्रांक पेपरवर असे ही नमूद केले की, "इमारत विंग नं. डी, सी आणि बी या इमारतीचे मे. सचदेव आणि असोसीयट्स यांच्यातर्फे देण्यात आलेले Structural stability report

यापूर्वीच सादर केलेले असून सदर इमारतीमध्ये राहणारे सभासद स्वतःच्या जबाबदारीवर इमारतीमध्ये वास्तव्य करणार असून व भविष्यात कोणतीही संभाव्य दुर्घटना घडल्यास महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नसून सदर बाबतची सर्वस्वी जबाबदारी सदर इमारतीमध्ये राहणाऱ्या सभासदांची राहील" व त्याप्रमाणे सदर अर्जामध्ये इमारत डी, सी, बी यांचे जलजोडणी व विद्युत पुरवठा पूर्वरत करण्यासाठी नाईक नगर सोसायटीने विनंती अर्ज महानगरपालिकेस सादर केला. सदर विनंती अर्जानुसार दिनांक ३१.०५.२०१६ रोजीच्या आदेशान्वये, इमारत डी, सी व बी यांचे जलजोडणी व विद्युत पुरवठा जोडणी पूर्वरत करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार दि. ०८.०६.२०१६ रोजी सहाय्यक अभियंता (जलकामे) व रिलायन्स एनर्जी यांना या जलजोडणी करण्यासाठी पत्रान्वये कळविण्यात आले होते.

दिनांक २७.०६.२०२२ रोजी रात्री २३.५२ वाजता नाईक नगर सीएचएस, सी-विंग, शिवसृष्टी रोड, कुर्ला (पूर्व), मुंबई ४०००२४ येथे तळ मजला + ३ मजले असलेली इमारत कोसळल्याची वर्दी नियंत्रण कक्षास प्राप्त झाली. सदर दुर्घटनेत एकूण ३१ पुरुष व ०२ महिला यांना ढिगा-याखालून बाहेर काढण्यात आले व विविध रुग्णवाहिकेतुन पालिकेच्या राजावाडी आणि लोकमान्य टिळक (सायन) रुग्णालयात पाठविण्यात आले त्यापैकी १३ पुरुष व ०१ महिला जखमी झाली व १८ पुरुष व ०१ महिला यांना रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषित केले.

सदरहू घटनेनंतर नाईक नगर सोसायटीमधील उर्वरित ए, बी, सी विंग इमारतींना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ अन्वये धोक्याची सूचना देऊन सदर इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या रहिवाशांना त्वरीत बाहेर काढून इमारती रिकामी करण्यात आल्या. सदर इमारतींची जलजोडणी व विद्युत जोडणी खंडीत करुन खाजगी कंत्राटामार्फत मनुष्यबळ व यंत्र सामुग्रीच्या सहाय्याने धोकादायक स्थितीत असलेल्या उर्वरित इमारतींचे निष्कासन करण्यात आले. सदर इमारत कोसळल्याच्या घटनेबाबतचा तपास नेहरु नगर पोलीस ठाणे यांच्यामार्फत करण्यात आला आहे व त्यादरम्यान एल विभागामार्फत आवश्यक ती माहिती/अहवाल वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नेहरु नगर पोलीस ठाणे यांना देण्यात आलेला आहे. याबाबत, नाईक नगर हौ. सोसायटीने 'एल' विभाग कार्यालयाच्या पूर्वीच्या दिलेल्या नोटीसी नुसार त्यांनी structural consultant कडून पुनर्तपासणी करुन संरचनात्मक अहवाल देणे गरजेचे होते, परंतु सोसायटी धारकांनी तसे केले नाही.

मालाड मालवणी गेट क्र.०५, न्यु कलेक्टर कंपाऊंड, अब्दुल हमीद मार्ग येथे तीन मजली इमारत त्या नजीक असलेल्या एक मजली इमारतीवर कोसळल्याची वर्दी दिनांक ०९.०६.२०२१ रोजी रात्री २३.१३ वाजता नियंत्रण कक्षास प्राप्त झाली. सदर दुर्घटने दरम्यान १० पुरुष व १० महिला यांना ढिगा-याखालून बाहेर काढण्यात आले व रुग्णवाहिकेतुन रुग्णालयात पाठविण्यात आले. त्यापैकी ०४ पुरुष व ०४ महिला जखमी झाले होते व ०६ पुरुष व ०६ महिला यांना रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिकारी यांनी मृत घोषित केले.

*******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्रीमती जयश्री जाधव, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

" कोल्हापूर जिल्ह्यातील शासन स्तरावरील विविध विकास प्रस्ताव तत्कालीन राज्य शासनाकडे सादर करण्यात आलेली असणे, त्यात प्रामुख्याने कोल्हापूर येथील तीर्थक्षेत्र श्री महालक्ष्मी परिसर विकास आरखड्यास सुमारे ७९.९६ कोटी रूपयाच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिलेली असणे, तसेच त्यापैकी सुमारे ८.२० कोटी रुपयाचा निधी प्राप्त झालेला असणे, उर्वरित निधीसाठी सुमारे ७१.७६ कोटीचा प्रस्ताव शासनास सादर केला असणे, परंतु त्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसणे, तसेच राजर्षि शाहू महाराज यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक कोल्हापूर येथील शाहू मिलच्या जागेवर उभारणे तसेच राजर्षि छत्रपती शाहू महाराज समाधी स्थळाचे सुशोभीकरण व इतर कामे करण्यासाठी रुपये ९ कोटी ४० लाख ५० हजार इतक्या निधीला शासनाकडून मंजूरी मिळालेली असणे, परंतु सदरच्या निधीची स्थगिती उठऊन निधी देणेबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नसणे, तसेच कोल्हापूर येथे खंडपीठ व सर्किट बेंच त्वरती सुरू करण्याबाबत शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही किंवा पाठपुरावा केलेला नसणे, तसेच नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या कामाला दिलेली स्थगिती उठवणे व त्याजागी जागा उपलब्धतेचा निर्णय घेणेत यावा अशी मागणी असणे, तसेच जिल्हा क्रीडा संकुल करीत जागा उपलब्ध करून दिलेली नमणे, यासह कोल्हापूर शहरातील केशवराव भोसले नाट्यगृह व राजर्षि शाहू खासबाग कुस्ती मैदान संवर्धन व सुशोभीकरण करण्यासाठी सुमारे ८.९३ कोटी रुपयाचा निधी शासनाने उपलब्ध करून द्यावा, अशी हि मागणी असणे, तसेच शासनाने कोल्हापूर शहर अंतर्गत रस्त्यासाठी राज्यस्तरीय नगरीयान अंतर्गत सुमारे १६५ कोटीच्या प्रस्तावास मान्यता द्यावी, अशी मागणी असणे, तसेच राज्य शासनाच्या तेजस्विनी बस योजनेमधून महिलांसाठी बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी असूनही अद्याप कोणतीही उपाययोजना शासनाने केलेली नसणे, तसेच कोल्हापूर सुरक्षित टप्पा क्र.२ या प्रकल्पास मान्यता देण्यात आलेली नसणे, तसेच पंचगंगा प्रदूषणाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुण त्याची अमलबजावणी करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून शासनाकडे करण्यात येणे, परंतु शासनाने निधीबाबत केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी कोल्हापूर वासीयांचा शासनाच्या प्रति वाढलेली तीव्र संतापाची लाट, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

श्रीक्षेत्र महालक्ष्मी (करवीर निवासिनी, अंबाबाई) मंदिर, कोल्हापूर तिर्थक्षेत्र विकास आराखड्यास शासनाने तत्वत: सहमती दर्शविली असून सदर आराखड्याच्या प्रथम टप्प्यात करावयाच्या निश्चित केलेल्या रु.७९.९६ कोटी इतक्या रक्कमेच्या कामांना दि.२०/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार प्रथम टप्प्यातील करावयाच्या कामांसाठी दि.०८/०३/२०१९ व दि.२०/०३/२०२० च्या शासन निर्णयान्वये अनुक्रमे रु.७.०० कोटी व रु.१.२० कोटी असा एकूण रु.८.२० कोटी इतका निधी महानगरपालिकेस उपलब्ध करुन दिला आहे.

सदर निधीमधून प्रशासकीय मंजूरी झालेल्या सरस्वती चित्र मंदिरानजिक बहुमजली पार्किंग बांधण्यासाठी रु.७.९२ कोटी इतक्या रकमेची कामे सुरु आहेत. सदर कामाची आर्थिक प्रगती ६७.७०% व भौतिक प्रगती ७५% झाली आहे. वितरीत केलेल्या रक्कम रु.८.२० कोटी निधीपैकी रु.५.५५ कोटी महानगरपालिकेने खर्च केले असून रु.२.६५ कोटी निधी शिल्लक आहे. चालू वित्तीय वर्षाचा उर्वरित कालावधी, महानगरपालिकेकडे या प्रयोजनार्थ शिल्लक असलेला निधी विचारात घेऊन चालू वित्तीय वर्षात उर्वरित कामे पूर्ण करणयासाठी रु.२.५० कोटी इतका निधी सन २०२३ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीव्दारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

राजर्षी शाहू महाराजाचे स्मारक शाहू मिलच्या जागेवर उभारण्यात येणार असून सदर जागा वस्त्रोद्योग महामंडळाच्या मालकीची आहे. सदर जागा कोल्हापूर महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यासंदर्भात यापूर्वी तत्कालिन पालकमंत्री, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचे पुनर्गठन करणे आवश्यक असल्याने याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील श्रीमंत राजश्री शाहू महाराज यांच्या समाधी स्थळाचे सुशोभिकरण व इतर कामे करण्यासाठी रुपये ९ कोटी ४० लाख ५६ हजार इतक्या रक्कमेच्या कामांना मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर कामास दिलेली स्थगिती उठविण्यात आली आहे. तसेच, निधी महानगरपालिकेकडे वर्ग करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

राज्यात उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ स्थापन करण्यास बराचसा कालावधी लागू शकतो. ही बाब विचारात घेऊन प्रलंबित खटल्यांची संख्या, मुंबई शहरापासूनचे अंतर व लोकसंख्या या निकषांवर कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्यास मान्यता देण्यात यावी, अशी शिफारस करण्याबाबतचा निर्णय दि.१२/०५/२०१५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. त्यानुसार मा.मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ स्थापन करण्यासंबंधी शिफारस मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्यात आली आहे. त्यानुसार सद्य:स्थितीत मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.१०/०३/२०२२ रोजी कोल्हापूर खंडपीठ कृती समितीचे सदस्य तसेच त्या भागातील बार असोसिएशनचे सदस्य यांची बैठक घेतली असून बैठकीत फिरते खंडपीठ स्थापनेसंबंधीची कार्यपध्दती, त्याच्या कायदेशीर बाबी तसेच फिरते खंडपीठ कार्यरत होण्याकरीता आवश्यक पायाभूत सुविधा याबाबत चर्चा झाली असून याप्रकरणी निष्कर्षाप्रत पोहचण्याकरीता काही अवधी आवश्यक असल्याची बाब मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांनी कळविली आहे.

कोल्हापूर येथे नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे या कामास सार्वजनिक बांधकाम विभागाने दि.०५/०३/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून सदरचे काम सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आले आहे. काम सुरु करण्याच्या दृष्टीने वास्तुविशारद नेमण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पूर्ण झाली असून कार्यारंभ आदेश देण्याचे प्रलंबित आहे. प्रशासकीय मान्यता आदेशामध्ये नियोजित जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात, अशी अट नमूद आहे. त्यानुसार जमिनीचा ताबा देण्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना कळविण्यात आले आहे. जमिन ताब्यात आल्यानंतर वास्तुविशारद यांना कार्यारंभ आदेश देऊन कामास सुरुवात करण्यात येणार आहे.

कोल्हापूर शहरातील क्रीडा संकुलासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी, कोल्हापूर यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे जागेची मागणी केली आहे. तथापि, मागणी केलेली जागा कृषी विभागाकरीता आरक्षित असल्याचे दिसून आल्याने सदर जागेऐवजी नवीन ठिकाणी जागेची मागणी करण्यात आली असून याबाबत तपासणी करण्याची कार्यवाही स्थानिक स्तरावर सुरु आहे.

कोल्हापूर महानगरपालिकेच्या संगीतसुर्य केशवराव भोसले नाटयगृह व राजर्षि शाहू खासबाग मैदान या ऐतिहासीक वास्तुंचे शताब्दी वर्षानिमित्त रु.१० कोटी इतका निधी महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात आला होता. सदर निधीमधून केशवराव भोसले नाटयगृह व शाहू खासबाग मैदान या प्रकल्पांचे जतन व संवर्धनाची कामे उत्तमरीत्या पुर्णत्वास आली आहेत. तसेच सदर कामाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामांसाठी रु.९कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला असून, निविदा प्रक्रीया राबविण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजनेअंतर्गत नागरी दळणवळण साधनांचा विकास यासाठी कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील १६ रस्त्यांच्या कामांचा रु.११०.३३ कोटीचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत गठीत राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीसमोर सादर करण्यात आलेला असून यासंदर्भातील पुढील कार्यवाही सुरु आहे.

दि.०३ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील मुंबई, नवी मुंबई, ठाणे, नागपूर व कल्याण-डोंबिवली, तसेच दि.०९ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये केवळ महिलांसाठी "तेजस्विनी बस" योजना सुरु करण्यात आली होती. सदर शासन निर्णयामध्ये कोल्हापूर महानगरपालिकेचा समावेश नसल्यामुळे महानगरपालिकेने सादर केलेला प्रस्ताव तेव्हा विचारात घेण्यात आलेला नाही.

महाराष्ट्र राज्यातील विविध शहरांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी शहरांचे प्राधान्यक्रम निश्चित करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक (नि.व स.) यांनी सादर केलेल्या धोरणास शासन मान्यता देण्यात आली असून ठरविलेल्या धोरणानुसार कोल्हापूर शहराचा प्राधान्यक्रम २२ इतका आहे. त्यानुसार कार्यवाही करण्याबाबत अपर पोलीस महासंचालक (नि.व स.) यांना कळविण्यात आले आहे.

कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील दुधाळी नाला, जयंती नाला, बापट कॅम्प नाला व लाईन बाजार नाला मलनिस:रणाच्या ४ प्रकल्पास केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानाअंतर्गत केंद्र शासनाच्या शिखर समितीने मान्यता दिलेली आहे. सदर प्रकल्पांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मान्यता घेऊन विहित कार्यपध्दतीनुसार प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

H/96-10

******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे अर्थसंकल्पीय (पहिले) अधिवेशन

विधानसभा लक्षवेधी सूचना

डॉ. राहुल पाटील वि.स.स. यांच्या लक्षवेधी सूचना क्र.१३३९ वरील निवेदन मुख्यमंत्री सभागृहासमोर ठेवतील:-

"परभणी महानगरपालिकेंतर्गत सन २०१८ मध्ये १००० आसन क्षमतेच्या नवीन नाट्यगृहाचे बांधकाम व विकास कामांना नगरविकास विभागाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असणे, सदर कामासाठी मार्च , २०१८ मध्ये १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येणे , सद्यः स्थितीत निधी अभावी सदर नाट्यगृहाचे काम अपूर्ण अवस्थेत असणे , नाट्यगृहाचे अपूर्ण असलेले काम पूर्ण करण्यासाठी अजून ११ कोटी ७५ लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता असणे, या नवीन नाट्यग्रह बांधकामासाठी वाढीव ११ कोटी ७५ लाख रुपये निधीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव १६/०६/२०२२ रोजी परभणी महानगरपालिकेने शासनास सादर केलेला असणे, सदर वाढीव निधीस मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दि. ०२/११/२०२२ रोजी लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, मागणीच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत निधी मंजूर न होणे, परिणामी सदर नाट्यगृहाचे काम अद्यापही निधी अभावी रखडलेले असणे, त्यामुळे जिल्ह्यातील व परिसरातील कलावंताची होणारी फरफट, शासनाने परभणी येथील १००० आसन क्षमतेच्या मंजूर नवीन नाट्यगृहाचे काम पूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेला निधी तात्काळ मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाच कार्यवाही."

-:मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन:-

“महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधाच्या विकासासाठी विशेष तरतुद” या योजनेअंतर्गत परभणी महानगरपालिकेस सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात दिनांक २७ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णया अन्वये १००० आसन क्षमतेच्या नविन नाट्यगृहाचे बांधकामाकरीता प्रशासकीय मान्यता देऊन रुपये १०.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत नाट्यगृहाचे स्थापत्य उपांगाशी निगडीत ८० % कामे पुर्ण झाली असुन रुपये १०.०० कोटी निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच सदर नाट्यगृहाचे उर्वरित स्थापत्य व विद्युत कामे पुर्ण करण्याकरीता परभणी महानगरपालिकेने रुपये ११.७५ कोटी निधीची मागणी केलेली आहे. मंजूर अर्थसंकल्पिय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करुन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

*************

६८

महाराष्ट्र विधानसभा

नगरविकास विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१३९०

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.सुनिल टिंगरे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"माझ्या वडगावशेरी मतदार संघातील स.नं.२१४/२ येथे एका बांधकाम व्यावसायिकाने जवळपास ३४० झाडांची कत्तल केली असणे, झाडे तोडतांना शासनाकडून संबंधित व्यावसायिकाकडून प्रतीशुल्क न घेणे, तसेच परवानगी घेतांना संबंधित झाडांएवढे वृक्षारोपण करावे लागत असून तसे न करणे, संबंधित व्यावसायिकावर अद्याप कार्यवाही न होणे, तसेच अधिकारी व व्यावसायिक यांचे लागेबांधे दिसून येणे, संबंधित बाब वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित होणे, तसेच माझे दि.०५/०१/२०२३ रोजी महापालिका आयुक्त यांना निवेदन देणे, परंतु संबंधित व्यावसायिकांवर आजतागायत महापालिकेकडून कार्यवाही न होणे, पर्यावरणाचा सर्रास ऱ्हास होणे, वरिल बाब खरोखर चिंताजनक असणे, सदर घडलेल्या प्रकारामुळे पर्यावरणप्रेमी व सामान्य नागरीकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला असून याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

वडगावशेरी भागातील ट्रानसेरा रिॲलीटी तर्फे श्री.रणजीत दराक या बांधकाम व्यावसायिकाने स.नं. २१४/२ लोहगाव येथे दि.०७.१२.२०२२ रोजी ३४० वृक्षांची अनधिकृत कत्तल केली ही वस्तुस्थिती आहे.

पुणे महानगरपालिका अधिकार क्षेत्रावरील वृक्ष पूर्ण काढणे/पुनर्रोपण करणे किंवा वृक्ष छाटणी करणेसाठी, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ नुसार, वृक्ष प्राधिकरण विभागाकडील, वृक्ष अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. परंतु, सदर वृक्ष तोडताना ट्रानसेरा रिअलीटी तर्फे श्री. रणजीत दराक या बांधकाम व्यावसायिकाने महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम,१९७५ नुसार वृक्ष प्राधिकरण विभाग, पुणे महानगरपालिका यांच्याकडून कोणतीही पूर्व परवानगी घेतलेली नाही.

वृक्ष प्राधिकरणाकडून परवानगी देताना महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अन्वये, विहित नमुन्यामध्ये वृक्ष प्राधिकरणाकडे अर्ज दाखल करून, सदर अर्जावर, वृक्ष अधिकारी यांच्यामार्फत पाहणी करून, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशान्वये, गठीत वृक्ष तज्ञांकडून शिफारस

शेटा H/0052 (750-4-23) कृ.मा.प.

घेऊन, निर्देशपत्र तयार करून वर्तमान पत्रात जाहीर प्रकटन देण्यात येते. तसेच वृक्ष बाबतचे निर्देश पत्र हे पुणे महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येते. ८ दिवसांच्या मुदतीमध्ये नागरिकांनी या झाडांबाबत काही आक्षेप घेतल्यास त्या नागरिकांना संबंधित वृक्ष अधिकारी यांच्याकडून सुनावणी घेऊन वृक्ष तोडीबाबतचा प्रस्ताव महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या वृक्ष प्राधिकरण समितीपुढे मान्यतेस्तव सादर करण्यात येतो.

वृक्ष प्राधिकरण समितीच्या मान्यतेनुसार, संबंधिताकडून प्रती वृक्ष रु.१०,०००/- इतकी अनामत रक्कम स्विकारून वृक्ष तोडणे/पुनर्रोपण करण्याच्या बदल्यात तोडावयाच्या वृक्षाच्या वयाइतके नविन वृक्ष लावण्याच्या अटीवर वृक्ष पूर्ण काढण्यास/पुनर्रोपण करण्यास परवानगी देण्यात येते. (उदाहरण- २० वर्ष वयाचे वृक्ष असल्यास २० झाडे लावणे बंधनकारक असते)

परंतु, ट्रानसेरा रिअलीटी तर्फे श्री.रणजीत दराक या बांधकाम व्यावसायिकाने दि.०७.१२.२०२२ रोजी विनापरवाना वृक्षतोड केलेली असल्याने, त्या व्यावसायिकावर कारवाई करण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्याकडून सदर वृक्ष प्राधिकरणाचा कार्यभार काढून घेण्यात आलेला आहे व त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी नोटीस बजावण्यात आलेली आहे.

वृक्ष अधिकारीमार्फत दि.०८.०३.२०२३ रोजी संबंधित व्यावसायिकास नोटीस बजावण्यात आली असून सदर नोटीसचा खुलासा ८ दिवसात सादर करण्याबाबत कळवित आले आहे. खुलासा समाधानकारक नसल्यास दुसरी नोटीस देण्यात येईल. तद्नंतर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण ५ कलम ८ (१) चे उल्लंघन केल्याने संबंधितांविरुद्ध मे.ज्युडीशिअल मॅजेस्ट्रेट वर्ग १, पुणे महानगरपालिका न्यायालय, पुणे येथे फौजदारी खटला दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

सदरची बातमी दै. पुढारी या वृत्त पत्रामध्ये दि.०३.०१.२०२३ रोजी प्रसिद्ध झालेली होती. तसेच दि.०५.०१.२०२३ रोजी नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाकडे मा.विधानसभा सदस्य यांनी निवेदन दिलेले आहे ही वस्तुस्तिथी आहे. या प्रकरणी जबाबदार असलेले ट्रानसेरा रिअलीटी तर्फे श्री.रणजीत दराक या बांधकाम व्यावसायिकास महानगरपालिकेने नोटीस बजावली असून महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अन्वये योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित व्यावसायिकावर आजतागायत महानगरपालिकेकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही, असे म्हणणे व याप्रकरणी अधिकारी व व्यावसायिक यांचे लागे बांधे आहे, असे म्हणणे संयुक्तीक नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

*****

# महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना**

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्रीमती देवयानी फरांदे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"पंतप्रधान यांचे प्रत्येक भारतीय नागरिकाला स्वतःचे हक्काचे घर असावे असे स्वप्न असणे, माननीय पंतप्रधान यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरणाची आखणी करून प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नगर विकास विभागाने दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ व दिनांक ०६ मार्च, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करणे, खाजगी व सरकारी जमिनीतील अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी दोन स्वतंत्र शासन निर्णय काढलेले असणे, दिनांक ०१/०१/२०११ पूर्वी वास्तव्य करणाऱ्या नागरिकांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे शासनाचे स्पष्ट आदेश असणे शासनाचे स्पष्ट आदेश असताना देखील नाशिक महानगरपालिके कडून मात्र याबाबत कोणती कारवाई करण्यात न येणे, नाशिक मध्य विधानसभा मतदारसंघातील विविध झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी कोणती कारवाई करण्यात येणे, शासन निर्णयात नमूद असताना देखील अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी बैठकीचे आयोजन न करण्यात येणे, यामुळे नाशिक शहरात राहणाऱ्या अनेक नागरिकांना हक्काच्या घरापासून वंचित राहावे लागणे, महानगरपालिकेचे सदर शासन निर्णयाकडे होत असणारे दुर्लक्ष, नाशिक महानगरपालिकेत सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी पुरेशी यंत्रणा नसणे त्यामुळे नागरिकांची होत असणारी गैरसोय, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, सर्वांसाठी घरे देण्यासाठी धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची असणारी आवश्यकता, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात खाजगी जागेवरील ८२, महानगरपालिकेच्या जागेवरील ०६ व शासकिय जागेवरील १६ अशा एकुण १०४ अघोषित झोपडपट्ट्या आहेत.

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत शहरी भागात लाभार्थ्यांची निवड स्वतःच्या मालकी हक्काची जागा व वार्षिक उत्पन्न या निकषाच्या आधारे करण्याबाबत गृहनिर्माण विभागाने धोरण निश्चित केलेले आहे. या धोरणानुसार झोपडपट्ट्यांचा आहे तेथेच विकास करणे अपेक्षित आहे. सबब, नागरी भागात प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत लाभ मिळण्यास पात्र ठरत असलेल्या व राज्य शासनाच्या उर्वरित सर्व विभागांच्या (वन विभाग वगळून) नागरी भागात असलेल्या जमिनींवर निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमण

केलेल्या अतिक्रमण धारकांची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची कार्यवाही करण्यासाठी समिती स्थापन करून समितीच्या आवश्यकतेनुसार सहा. संचालक नगररचना यांच्या सल्ल्याने अतिक्रमणे नियमीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश नगरविकास विभागाने दि.०६ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत.

तथापि, नाशिक महानगरपालिका क्षेत्रात असणाऱ्या शासकिय/खाजगी/मनपा जागेवरील १०४ झोपडपट्ट्यांचे सर्व्हेक्षण करून, खाजगी जागेबाबत मिळकत विभागाकडून भूसंपादनाची प्रक्रिया राबविणे, तसेच शासकिय जागेवरील झोपडपट्ट्यांबाबत शासनाकडून मान्यता घेऊन महानगरपालिकेने कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सन २०२० ते २०२२ या कालावधीत सर्व्हेक्षणाचे कामकाज महानगरपालिकेस करता आलेले नाही.

सद्यस्थितीत नाशिक मध्य विधानसभा मतदार संघातील सर्व्हे नं.४२८/२ ब ही जागा शासनाच्या मालकीची असल्याने येथील अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी, सदर जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेमार्फत जिल्हाधिकारी, नाशिक यांना दि.१४/१०/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. उर्वरित झोपडपट्ट्यांचे अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत जागेच्या मालकी (खाजगी/शासकिय/मनपा मालकी) हक्काबाबत महानगरपालिकेमार्फत सर्व्हेक्षण करून, सविस्तर प्रस्ताव सहा. संचालक, नगररचना, जिल्हा नाशिक यांच्या सल्ल्याने शासन निर्णयानुसार स्थापित समिती समोर मान्यतेसाठी सादर करण्यात येईल, असे नाशिक महानगरपालिकेने कळविले आहे.

**********

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक १९२०**

**श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"जोगेश्वरी पूर्व येथील नवलकर मंडई धोकादायक जाहिर करुन सन २०१५ मध्ये मंडई खाली करण्याच्या देण्यात आलेल्या सूचना, सदरहू मंडई रिक्त करुन निष्कासित करण्याचे देण्यात आलेले निर्देश, बहुतांशी गाळेधारकांचा तात्पुरत्या स्थलांतरास असलेला विरोध, सदर मंडईचा सुधारित आराखडा तयार असून त्यास अंतिम मंजूरीकरिता महानगरपालिकेच इमारत विभागाकडे पाठविण्यात येऊनही आज सहा वर्षाहून अधिक काळ लोटूनही अद्याप कोणताच निर्णय न होणे, किरकोळ मंडईकरिता आरक्षित असलेल्या नगर भूमापन क्रमांक २५५, २५६, २५७, २५८, व २५९ पैकी २५६, २५७ हे भूखंड अधिग्रहणासाठी सन २०१२ पासून अधिक्षक भूमिलेख यांच्याशी पत्रव्यवहार करुनही त्यास इच्छित यश न मिळणे यासंदर्भात महसूल व नगरविकास यांची संयुक्त बैठक घेण्याबाबत आश्वासन देऊनही अदयाप पुर्तता न होणे, परिणामी या अत्यंत धोकादायक अवस्थेत असलेल्या मंडईच्या पुनर्विकासास प्रशासन उदासिन असणे, मंडईच्या पुनर्विकासाचे स्वप्न फक्त कागदावर राहणे, मा.नगरविकास मंत्रीमहोदयांनी सदर मंडईचा पुनर्विकास ४ वर्षात करण्याचे महानगरपालिकेमार्फत नियोजित असून सदर मंडईच्या पुनर्विकासानंतर गाळेधारकांना पुनर्विकसित मंडईमध्ये पुनस्थापित करण्यात येणार असल्याचे आश्वासित करणे, सदरहू नवलकर मंडईचा भूखंड महानगरपालिकेच्या नावावर करण्यात येणे, त्याचबरोबर निर्मलाताई राजेश्वर रागिनवार प्रेमनगर मार्केट, जोगेश्वरी पूर्व हे मार्केट अत्यंत धोकादायक अवस्थेत असणे, याठिकाणी असलेले प्रसाधनगृह, शेड, पायवाट, विजेचे कनेक्शन, पाणी पुरवठा याची अवस्था अत्यंत दयनीय असून या मंडईचा देखील पुर्नविकास करण्यात यावा याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधिनी सातत्याने पाठपरावा करुनही प्रशासनाकडून कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, उपरोक्त नवलकर मंडई व निर्मलाताई राजेश्वर रागिनवार मंडई या दोन्ही मंडईचा तातडीने पुर्नविकास होण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून मंडईच पुर्नविकांसाकरिता भरीव निधीची उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**-: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

बृहन्मुंबई महानगरपालिकेची नवलकर मंडई ही नगर भूमापन क्रमांक २५६, २५७(भाग),२५८(भाग) व २५९(भाग) मौजे बांदीवली या भूखंडावर स्थित आहे. विकास नियोजन आराखडा, २०३४ नुसार, नगर भूमापन क्रमांक २५६, २५७(भाग), २५८(भाग) व २५९(भाग) मौजे बांदीवली हा भूखंड अस्तित्वातील महापालिका किरकोळ मंडईने बाधित आहे. नगर भूमापन क्रमांक २५५(भाग) मौजे बांदीवली हा भूखंड खुले विक्री क्षेत्र असणारी महानगरपालिका मंडई आणि महापालिका शाळा या आरक्षणाने बाधित आहे. सदर भूभाग रहिवाशी व वाणिज्यिक क्षेत्रात समाविष्ठ आहे.

नगर भूमापन क्रमांक २५८(भाग) व २५९(भाग) मौजे बांदीवली हे भूभाग महापालिकेने भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या तरतुदीनुसार संपादित केले आहेत. त्यापैकी नगर भूमापन क्रमांक २५९(भाग) च्या मालमत्ता पत्रकावर १७३३.९० चौ.मी. क्षेत्रफळाकरिता सदरी धारक बृहन्मुंबई महानगरपालिका अशी नोंद आहे.

भूसंपादन केलेला नगर भूमापन क्रमांक २५८(भाग) च्या मालमत्ता पत्रकावर महापालिकेची धारक सदरी नोंद घेण्याकरिता नगर भूमापन अधिकारी, अंधेरी यांना दिनांक २१.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

नगर भूमापन क्रमांक २५४(पैकी) २५६, २५७ (पैकी) २५८, २५९ पैकी मौजे बांदिवली येथील नवलकर मंडईच्या संक्रमण शिबिराचे आराखडे दिनांक २४.०९.२०१५ रोजी महानगरपालिकेमार्फत मंजूर करण्यात आले आहेत. तसेच सदर मंडईच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाचे आराखडे मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या सवलतींच्या अहवालास आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ०९.०५.२०२२ रोजी मंजुरी दिली आहे.

नवलकर मंडईचा पुनर्विकास महानगरपालिकेमार्फत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याकरिता नियुक्ती करण्यात आलेल्या वास्तुसल्लागाराने पूर्वी बनविलेल्या आराखड्यानुसार तळ मजला + १८ मजल्याची इमारत प्रस्तावित होती. तसेच, त्यासाठी लागणाऱ्या वाहनतळासाठी पार्कींग टॉवर कार लिफ्टसह प्रस्तावित करण्यात आले होते. सदर आराखड्यानुसार पुनर्विकास 'फेज वाईज' करण्यात येत असल्याने अनुज्ञापत्रधारकांना तात्पुरत्या संक्रमण शिबिराची जागा मंडई जागेवरच प्रस्तावित होती. तद्नंतर स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या सुचनेनुसार पार्कींग टॉवर व कार लिफ्ट काढून, बेसमेंट व रॅम्प देऊन सुधारीत आराखडा बनविण्यात आला. सदर सुधारीत आराखडा महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव खात्यास तसेच, रेल्वे प्रशासनास मंजुरीकरिता पाठविण्यात आला. नवलकर मंडईच्या पुनर्विकास प्रकल्पासंबंधी रेल्वे प्राधिकारणाने सुचविल्यानुसार आराखड्यात सुधारणा करुन वास्तुसल्लागाराने सुधारित आराखडे गाळेधारकांना दाखविले होते. परंतु सर्व गाळेधारकांना तळमजल्यावर जागा पाहिजे असल्याने गाळेधारक वरील मजल्यावर जाण्यास तयार नाहीत असे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले. त्या अनुषंगाने मंडई असोसिएशन सोबत झालेल्या बैठकीमध्ये, नवलकर मंडई असोसिएशन त्यांच्या वास्तुविशारदाकडून आराखडे बनवून महानगरपालिकेस सादर करणार होते. त्याबाबत महानगरपालिकेमार्फत त्यांना पुनःश्च अवगत करण्यात आले होते. परंतु आजतागायत मंडई असोसिएशनकडून कोणतेच आराखडे प्राप्त झालेले नाहीत. मात्र महानगरपालिकेने तयार केलेल्या सुधारित आराखड्यास दिनांक २८.०२.२०२३ रोजी प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली असून सदर आराखडे रेल्वे प्रशासनास तसेच महापालिकेच्या इमारत प्रस्ताव खात्याकडे अंतिम मंजुरीकरिता पाठविण्यात येत आहेत.

निर्मलाताई राजेश्वर रागिनवार प्रेमनगर मंडई ही महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागात स्थित आहे. सदर मंडईमध्ये १६८ परवानाधारक आहेत. मंडई भुभागावर, महानगरपालिका मंडई असे आरक्षण आहे. परंतु सदर भुभागाच्या मालमत्ता पत्रकावर महानगरपालिकेचे नाव दिसून येत नाही. यास्तव, महानगरपालिकेकडून नगर भूमापन अधिकारी, अंधेरी आणि संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आले आहेत. सदर मंडईचा अद्ययावत सर्व सोयीयुक्त पुनर्विकास होईपर्यंत तात्पुरती दुरुस्ती महानगरपालिकेच्या के/पूर्व विभाग कार्यालयाकडून करण्याचे प्रस्तावित आहे.

*******

नगर विकास विभाग
लक्षवेधी सूचना क्र. १९४४

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. चंद्रकांत निंबाजी पाटील, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. १९४४ पुढीलप्रमाणे आहे:-

"भुसावळ नगरपालिकाच्या मुख्य अधिकारी यांच्या विरोधात शासनाकडे तथा जिल्हा प्रशासनाकडे विविध भ्रष्टाचार करणेबाबतची तक्रार शहरातील नागरिकांनी वर्ष २०२२ पासून केली असल्याची माहिती समोर येणे, सदर भ्रष्टाचाराची दखल घेत शासनाने जिल्हा प्रशासनाला त्रिस्तरीय समिती नेमण्याचे आदेश देणे सदर तिरीस्तरीय समिती वर्ष २०२२ च्या मार्च या महिन्यात गठीत होणे परंतु सुमारे एक वर्ष उलट आला तरी या समितीने शहरातील विविध भ्रष्टाचारांच्या बाबतीत कोणतीही कारवाई न करणे तसेच संबंधित तक्रारदाराला न बोलवता परस्पर चौकशी केली असल्याची बाब समोर येणे, शहरातील दलित वस्तीचा निधी दलित बहुल विभागात न खर्च करता दुसऱ्या विभागांमध्ये खर्च करत असल्याची तक्रार होणे शहरातील रस्त्यांचे काम १२ कोटी मधून होत असल्याने सुद्धा ज्या रस्त्यांच्या समावेश १२ कोटीच्या रस्त्यामध्ये आहे त्या रस्त्यांना तीन वर्षाची देखभाल दुरुस्तीचे कालावधी असताना त्या रस्त्यावर परत तीस लाख रुपयांच्या काम करायची ना हरकत प्रमाणपत्र आपल्या अधिकारात नसताना त्यामुळे शहरांमध्ये विविध विकास कामांमध्ये भ्रष्टाचार होत असल्याची बाब समोर येणे सदर रस्त्याच्या उद्घाटन प्रसंगी जे नागरिक नगरसेवक नाही आशांचा उल्लेख सदर बोर्ड वरती होत असणे त्यामुळे सार्वजनिक बांधकाम अथवा नगरपालिका प्रशासन या कोणत्या विभागाने हा उद्घाटन समारंभ केलेला आहे त्यांनी जनताची फसवणूक करणे, शहरामध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण असून त्या अतिक्रमण निर्माण करण्यासाठी मुख्याधिकारींकडे तक्रारी प्रलंबित असून सुद्धा त्याने आर्थिक देवाण-घेवाण करून या अतिक्रमण न काढणे त्यामुळे या नागरिकांच्या जमिनीवरती अतिक्रमण आहे त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे मुख्याधिकारी भुसावल यांनी शहरातील विविध ओपन स्पेस जागेवरती जॉगिंग पार्क व गार्डन बनवण्याची निविदा प्रसिद्ध करणे व त्या काम त्यांना देण्यात आलेला कालावधीमध्ये न करणे त्यामुळे शासनाच्या पैशाचा अपव्य होणे व ज्या ठिकाणी क्रीडांगणाचा आरक्षण आहे त्या ठिकाणी ग्रीन पेस्ट अंतर्गत गार्डन तयार करणे व त्याची देखभाल दुरुस्ती न होणे घरामध्ये दुभाजक तयार करत असताना ते शासनाच्या नियमाप्रमाणे होत नसल्याची

तक्रार नगरपालिका प्रशासन व जिल्हा प्रशासन तसेच राज्य सरकारकडे होत असणे शहरातील नगरपालिका दवाखान्यामध्ये औषधी उपलब्ध नसणे व नगरपालिकातील डॉक्टर आपल्या मनमर्जी कारभार प्रमाणे कार्य करत असणे त्यामुळे शहरातील होणारे पोस्टमार्टम ला उशिरा होणे भुसावळ नगरपालिकेतील मुख्याधिकारी हे क वर्ग दर्जाचे अधिकारी असताना त्यांना वर्गाचा नगरपालिकाचा प्रभार देणे जे शासनाच्या नियमाला बगल देत असणे त्याबाबतची तक्रार शहरातील विविध माजी नगरसेवक व लोकांनी शासनाकडे करत असणे शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात कॉंक्रीट व डांबरीचे रस्ते असताना शासनाच्या नियमाला डावलून पेवर ब्लॉकचे रस्ते तयार करणे मुख्याधिकारी यांच्यावर असलेले विविध भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी होणे गरजेचे असताना त्या बाबतीत कोणती चौकशी न होत असल्याची बाब समोर येणे व शासनाच्या निर्णयाप्रमाणे २५ मे, २०२२ रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयाला देखील यांनी कचऱ्याची टोपली दाखवली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सन १९९९ सन २०१२ आणि आत्ताचे २५ मे, २०२२ चे शासन बाजूला करत मुख्य अधिकारी ने आपल्या अधिकारात आपल्या कार्यालयात एअर कंडीशन बसवल्यामुळे नगरपालिकाचे वीज बिल मोठ्या प्रमाणात येणे त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होत असणे तरी शहरातील विविध विकास कामांच्या कामाची चौकशी करण्यासाठी गठीत असलेल्या समितीने लवकरात लवकर चौकशी अहवाल देऊन संबंधितांवर कारवाई करणे गरजेचे असताना ते न करणे या मुख्याधिकारी भ्रष्टाचार मध्ये लिंपीत असल्यामुळे त्याची चौकशी आर्थिक गुन्हा शाखा मार्फत होणेची नितांत गरज त्यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

---

## मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

भुसावळ नगरपरिषदेमध्ये नागरीकांकडून प्राप्त तक्रार व निवदेनाच्या अनुषंगाने, विविध विकासकामांची चौकशी करण्याकरिता जिल्हाधिकारी, जळगाव यांनी जिल्हा प्रशासन अधिकारी, जळगांव यांच्या अध्यक्षतेखाली दि.२३ मार्च, २०२२ च्या आदेशान्वये चार सदस्यांची समिती गठीत केली आहे. सदर समितीचा अहवाल अंतिम करुन सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

भुसावळ नगरपरिषदेमार्फत नगर विकास विभागाच्या दि.०५ मार्च, २००२ रोजीच्या शासन निर्णयानुसार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलीत वस्ती सुधार योजना अंतर्गत निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अनुसूचित जाती तसेच नवबौध्दांसाठी भुसावळ नगरपरिषदेच्या ०७ आरक्षित असलेल्या प्रभागांमध्ये निकषाची कामे रेखांकन/ नकाशे यास जिल्हाधिकारी कार्यालयाची

प्रशासकीय मंजुरी प्राप्त करुन रस्ते व नाली ही नागरी सुविधा विषयक कामे दलीत वस्तीतच करण्यात आलेली आहेत.

विशेष रस्ता अनुदानातील रु. ११.०९ कोटी किंमतीच्या कामापैकी ७.७५ कोटीची कामे झालेली असून रु.३.३४ कोटीची कामे प्रगती पथावर आहे. या व्यतिरिक्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठी भुसावळ नगरपरिषदेअंतर्गत करावयाच्या २९ कामांकरीता नगर विकास विभाग, दि.०७ जुलै, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.५ कोटी इतका निधी देण्यात आला. या सर्व कामांची कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. याच कामांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते गांधी चौक पर्यतचा रस्त्याच्या नगरपरिषदेमार्फत बीबीएम करण्यात आला होता व कारपेट व सिलकोटचे काम बाकी होते, त्यासाठी रु.३० लक्ष मंजूर करण्यात आले. सदर रस्त्यावरील लादीकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी, जळगांव यांचेकडून प्रशासकीय मान्यता घेण्यात आली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते गांधी चौक पर्यतचा रस्ता डांबरीकरण न करता त्याठिकाणी काँक्रीट पेव्हर ब्लॉक बसविण्याबाबत स्थानिक व्यापाऱ्यांनी केलेल्या विनंतीनुसार सदर रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम नगरपरिषदेची ना-हरकत घेऊन, सार्वजनिक बांधकाम विभागाने पुर्ण केले आहे.

सदर रस्ता बांधकामाची कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग असल्याने नगरपरिषदेमार्फत कोणताही उद्घाटन समारंभ घेण्यात आलेला नाही किंवा बोर्ड लावण्यात आलेला नाही.

भुसावळ नगरपरिषदेमार्फत शहरात अतिक्रमणाची समस्या असल्याने माहे फेब्रुवारी, २०२२ या कालावधीमध्ये अतिक्रमण हटाव मोहीम राबवुन २२६ अतिक्रमण धारकांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

भुसावळ नगरपरिषदेमार्फत वैशिष्टपूर्ण योजनेअंतर्गत नगर विकास विभागाच्या दि.१७ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करुन सर्वसाधारण सभेने मंजूर केल्यानंतर जॉगिंग ट्रॅक व गार्डनच्या कामांना जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या प्रशासकीय मंजूरीने करण्यात आली असून सदर काम नोव्हेंबर, २०२२ मध्ये विहित मुदतीत पूर्ण करण्यात आले आहे.

भुसावळ नगरपरिषदेमार्फत केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियाना अंतर्गत भुसावळ शहरातील स्टेडीयम भागातील हरीतक्षेत्र विकास करणे या कामाचे नगरपरिषदेत ठराव पारीत करून सर्व कामांना

शासनाद्वारे दि.२६ मे,२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकिय मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार दि.२१.०२.२०१९ रोजी काम पूर्ण झालेले असून सदरील गार्डनची नगरपरिषदेमार्फत नियमीत देखभाल दुरुस्ती तसेच सफाई करण्यात येत आहे.

भुसावळ नगरपरिषदेमार्फत भुसावळ शहरातील नहाटा चौफुली श्रीराम डेअरी पासुन ते मोटुमल शोबराज चौक पर्यंत दुभाजक तयार करणे या कामासाठी १९.१९% कमी दराने निविदा रक्कम स्विकारण्यात आली असून, याबाबत एल-१ या निविदाधारकास दि.२८ जून, २०२२ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. तसेच जॉली पेट्रोल पंप ते गांधी पुतळा पर्यंत दुभाजक तयार करणे या कामासाठी २१.२१% कमी दराने निविदा रक्कम स्विकारण्यात आली असून, याबाबत एल-१ या निविदाधारकास दि.२८ जून २०२२ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. तसेच महात्मा गांधी पुतळा ते राहुल नगर, तापी पुलापर्यंत दुभाजक बनविणे या कामासाठी १६% कमी दराने निविदा स्विकारण्यात आली असून, याबाबत एल-१ या निविदाधारकास दि.२३ जून, २०२२ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत.

भुसावळ नगरपरिषद संचलित संत गाडगे महाराज नगरपालीका दवाखाना येथे बाह्य रुग्ण विभाग, श्वानदंश, अंतररुग्ण विभाग, प्रसुती विभाग इ. करीताची आवश्यक औषधे उपलब्ध आहेत. दवाखान्यात शहरातील नागरीकांना आवश्यकतेनुसार रुग्णसेवा देण्याकरीता ४ मंजूर पदांपैकी ३ वैद्यकिय अधिकारी कार्यरत आहेत. यानुसार भुसावळ ग्रामीण रुग्णालयामार्फत शवविच्छेदनाकरीता अधिकारी उपलब्ध आहेत.

भुसावळ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी हे गट-ब (राजपत्रित) दर्जाचे अधिकारी असून त्यांची पदस्थापना शासन मान्यतेने दि.११ ऑगस्ट, २०२० रोजीच्या आदेशान्वये करण्यात आली.

भुसावळ नगरपरिषदेमार्फत शहरातील आवश्यक त्या ठिकाणी नगरपरिषदेचा ठराव पारीत करुन सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजूरी व प्रशासकीय मंजुरी प्राप्त करुन पेवर ब्लॉक बसविण्याची कामे करण्यात आलेली आहेत. तसेच सर्व कामांचे साहित्य चाचणी अहवाल व त्रयस्त तांत्रिक लेखा परीक्षणाचे अहवाल नगरपरिषदेकडे उपलब्ध आहे.

भुसावळ नगरपालीकेच्या सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४५, दि.२७ नोव्हेंबर, २०२० अन्वये नगराध्यक्ष, उपाध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या दालनात एअर कंडीशनर बसविण्यात आले आहेत. भुसावळ नगरपरिषदेचे स्थानिक निधी लेखापरिक्षा कार्यालयामार्फत दरवर्षी, तसेच प्रधान महालेखाकार कार्यालय यांच्यामार्फत नियमित लेखापरिक्षण झालेले आहे. सदर लेखापरिक्षण अहवालात कोणताही आक्षेप नोंदविण्यात आलेला नाही.

*******

## महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना**

### सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई), मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यात नाशिक महापालिकेत नोकर भरतीसाठी ३५ टक्के आस्थापना खर्चाच्या मर्यादेची अट शासनाने शिथिल केल्यामुळे महापालिकेतील २८०० रिक्त पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला असल्याने ही पदे भरण्यासाठी शासनाची अनुमती घ्यावी लागणार आहे असणे. त्यामुळे महापालिकेच्या स्थापना परिशिष्टावर विविध संवर्गातील ७०९० पदे मंजूर असणे त्यातील जवळपास २८०० हून अधिक पदे रिक्त असून गेल्या २१ वर्षापासून महापालिकेत नोकर भरती झालेली नाही. पदोन्नत 'ब' संवर्गानुसार महापालिकेने शासनाच्या मान्यतेसाठी १४ हजार पदांचा सुधारित आकृतीबंध सादर केला आहे. मात्र त्यास अद्याप मंजुरी मिळू शकलेली नसणे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तातडीची बाब म्हणून अग्निशमन विभागाच्या ३४८ वैद्यकीय व आरोग्य विभागातील ३५८ अशा एकूण ७०४ पदांच्या भरतीला शासनाने मान्यता दिली आहे, परंतू ही भरती करताना टिसीएस किया आयबीपीएस या संस्थेच्या माध्यमातून भरतीच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. त्यानुसार महापालिकेने आयबीपीएस संस्थेसमवेत कराराची प्रक्रिया सुरू कारणे नाशिक महापालिकेने आणखी ११ विभागांच्या सेवा प्रवेश नियमावलीचे प्रस्ताव महासभेच्या मान्यतेने शासनाकडे सादर केलेले आहेत. सेवा प्रवेश नियमावलींना मंजुरी घेऊन उर्वरित रिक्त पदांच्या भरतीची महापालिकेची योजना असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकूण ७७१७ पदे मंजूर असून त्यापैकी ३२०२ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांपैकी २८०६ पदे सरळसेवा कोट्यातील असून त्यापैकी सफाई कामगारांची २०५ पदे लाड-पागे समितीच्या शिफारशीप्रमाणे वारसाहक्काने भरली जात असल्याने, सद्यस्थितीत सरळसेवा भरतीसाठी एकूण २६०१ पदे उपलब्ध आहेत.

नाशिक महानगरपालिकेने दिनांक ०३/०५/२०२१ व दिनांक २२/०७/२०२१ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार, महानगरपालिकेतील आरोग्य विभागातील अत्यावश्यक असलेली ३४८ रिक्त पदे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन सरळसेवेने भरण्यास दिनांक ०८/१२/२०२१ अन्वये आस्थापना खर्चाची अट शिथील करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तद्नंतर दिनांक १४/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सन २०२३ च्या पदभरतीकरीता केवळ एक वेळची बाब म्हणून आस्थापना खर्चाच्या ३५% मर्यादेची अट शिथील करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग, वैद्यकीय विभाग व अग्निशमन विभागातील पदांच्या सेवा प्रवेश नियमांस दिनांक २८/०९/२०२२ रोजीच्या अधिसूचनेनुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार, सदर संवर्गातील पदांची बिंदुनामावली पडताळणी करुन उक्त संवर्गातील एकूण ६७१ पदांची सरळसेवा भरतीची प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

नाशिक महानगरपालिकेने दिनांक ०४/०१/२०१७ अन्वये सादर केलेल्या आकृतीबंधाच्या अनुषंगाने, महानगरपालिकेच्या आरोग्य व अग्निशमन विभागासाठी एकूण ६३५ नवीन पदे निर्माण करण्यास दिनांक १६/०४/२०२१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तदनंतर दिनांक २८/०४/२०२१ च्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या आकृतीबंधात असलेल्या त्रुटींची पुर्तता करुन सुधारित आकृतीबंध सादर करण्याबाबत महानगरपालिकेस कळविण्यात आले असून, सदर निर्देशांच्या अनुषंगाने महानगरपालिकेतील सर्व विभागातील सद्यस्थितीतील मंजुर पदे व नव्याने आवश्यक असलेल्या पदांचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंध तयार करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

नाशिक महानगरपालिकेने दिनांक ०९/०१/२०२२, दि.१२/०१/२०२२ व दि.१३/०१/२०२२ अन्वये, महानगरपालिकेच्या प्रशासन सेवा, लेखा व लेखापरीक्षण सेवा, वैद्यकीय सेवा, अभियांत्रिकी संवर्गातील स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी सेवा, उद्यान सेवा, सुरक्षा सेवा, माहिती व तंत्रज्ञान सेवा, क्रीडा व सांस्कृतीक सेवा इत्यादी विभागांतील पदांचे सुधारित सेवा प्रवेश नियम मान्यतेसाठी सादर केले आहेत. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

*************

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक २०६३**

**श्री. नितेश राणे, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"मुंबई भारत सोसायटी, जंगलेश्वर महादेव मंदिर रोड, सुभाष नगर, असल्फा व्हिलेज, घाटकोपर पश्चिम, मुंबई-४०००८४ येथे असलेल्या "मदरसा मस्जिद अरबिया सिराजुल उलुम" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका बेकायदेशीर बांधकाम झालेले असणे, तसेच सदर बांधकाम जुलै २०२० च्या सुमारास कोविड १९ चा फायदा घेऊन या बेकायदेशीर संरचनेचे बांधकाम सुरू झालेले असणे, त्यानंतर ४ डिसेंबर २०२० रोजी वरिष्ठ अभियंता इमारत आणि कारखाना विभाग, एल वॉर्ड, कुर्ला, मुंबई यांना तक्रार पत्र देणे,. तरी देखील आणि बेकायदेशीर बांधबेकायदेशीर बांधकामावर कारवाई न होणे, त्यानंतर पुन्हा दिनांक १ नोव्हेंबर २०२२ रोजी सहाय्यक आयुक्त, एल वॉर्ड, कुर्ला, मुंबई यांना पत्र देणे आणि त्यानंतर स्थानिक रहिवाशी शिष्टमंडळासह सहाय्यक आयुक्तांची भेट घेणे, सहायक आयुक्तांच्या सूचनेनुसार अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करणे, त्यानंतर देखील कारवाई करण्यासाठी टाळाटाळ करणे, सदर मज्जित ज्या ठिकाणी आहे तो भूखंड उद्यान म्हणून आरक्षित भूखंड असणे, यासंदर्भातील सर्व पुरावे महानगरपालिकेचे असताना देखील श्री. नितिन कांबळे (पदयुक्त अधिकारी, बी अँड एफ, एल वॉर्ड), श्री रामेश्वर वाकडे (एई, बी अँड एफ, एल वॉर्ड),श्री. शिल्पेश दिनकर वाघमोडे (जेई, बी अँड एफ, एल वॉर्ड, कुर्ला), श्री दत्ता (मुकादम, बी अँड एफ, एल वॉर्ड, कुर्ला) यांनी कारवाही न करणे स्थानिक रहिवाशांवार दबाव आणणे, तसेच सदर बांधकाम चालू ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असणे, तसेच सदर अधिकाऱ्यांनी अनधिकृत बांधकाम करण्यासाठी तोंडी परवानगी देऊन बांधकाम चालू ठेवणे, तसेच सदर अधिकाऱ्यांच्या आणि त्यांचा नातेवाइकांचा संपत्तीमध्ये वाढ होणे, आणि या बाबत स्थानिक पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना देखील वेळोवेळी रहिवाश्यांनी संपर्क केला असता त्यांनी देखील कोणतीही दखल न घेता उलटी कारवाही करण्याची धमकी देणे, या संदर्भात शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**-: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

मंजूर विकास नियोजन आराखडा २०३४ नुसार मौजे असल्फा येथील नगर भूमापन क्रमांक ११६ हा बगीचा / उद्यान या सार्वजनिक उद्दिष्टाकरिता आरक्षित आहे. तसेच सदर भूभाग १८.३० मी. रुंद विद्यमान रस्त्याने बाधित होत आहे.

भारत सोसायटी रहिवाशी संघ ही, लकडा मार्केट, जे. एम. एम. रोड, सुभाष नगर, असल्फा घाटकोपर (प), मुंबई येथे स्थित आहे. सदर सोसायटीच्या रस्त्यामध्ये मस्जीद / मदरशाचे आर.सी.सी. स्वरुपातील अनधिकृत बांधकाम होत असल्याने ते तात्काळ थांबविण्याची विनंती येथील रहिवाशांमार्फत सहाय्यक आयुक्त, एल विभाग यांच्याकडे दिनांक १४.११.२०२२ रोजी करण्यात आली. त्यानुषंगाने दिनांक १६.११.२०२२ रोजी

महानगरपालिकेमार्फत सदर ठिकाणाची प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्यात आली. या पाहणी दरम्यान सदर अनधिकृत बांधकामधारकांनी परवानगीची प्रत सादर न केल्याने त्यांना दिनांक १८.११.२०२२ रोजी महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५४(अ) अन्वये काम थांबवा नोटीस बजावण्यात आली.

या नोटीसीच्या अनुषंगाने पक्षकाराने दिनांक २४.११.२०२२ रोजी वकीलामार्फत उत्तरासह काही कागदपत्री पुरावे महानगरपालिकेस सादर केले. सदर कागदपत्रांची छाननी करुन दिनांक २५.११.२०२२ रोजी महानगरपालिकेमार्फत अंतिम आदेश पारित करण्यात आला. या आदेशामध्ये, सदर बांधकाम अनधिकृत असल्याचे घोषित करुन ताबाधारकाने ते त्वरीत निष्कासित करावे असे आदेशित करण्यात आले. तसेच सदर ठिकाणी कायदा व सुव्यवस्था राखण्याकरीता सहकार्य करण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका पोलीस ठाणे यांना दिनांक २४.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले.

तद्नंतर ताबाधारकाने महानगरपालिकेच्या अंतिम आदेशाविरोधात मा. शहर दिवाणी न्यायालयात क्रमांक १८१/२०२३ अन्वये खटला दाखल केला. सदर प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक २९.११.२०२२ रोजीच्या आदेशान्वये महानगरपालिकेस, दिनांक २३.०१.२०२३ पर्यंत कोणतीही कारवाई न करण्याचे आदेश दिले व पुढील सुनावणीपूर्वी (दिनांक २३.०१.२०२३ पूर्वी) लेखी निवेदन सादर करण्यास सांगितले. त्याअनुषंगाने महानगरपालिकेमार्फत दिनांक २३.०१.२०२३ रोजी मा. न्यायालयास सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे. सदर प्रकरणात महानगरपालिकेमार्फत वरिष्ठ विधिज्ञ यांची नेमणूक करण्यात आली आहे.

सदर अनधिकृत बांधकामावर आळा बसण्याकरिता, ताबाधारक सिकंदर अली कितबुल्ला यांच्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५२/४३ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदविण्याकरीता वरिष्ठ पोलीस निरिक्षक, साकीनाका पोलीस ठाणे यांना दिनांक २७.०१.२०२३ रोजी महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

सदर प्रकरणात मा. न्यायालयाने दिनांक ०६.०३.२०२३ रोजीच्या सुनावणीमध्ये, दिनांक ३१.०३.२०२३ पर्यंत कोणतीही कारवाई करु नये असे आदेश पारित केले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सद्य:स्थितीत मस्जिद / मदरशाचे काम बंद असून ते स्थानिक पोलीस ठाणे, साकीनाका व महानगरपालिकेच्या निगराणीखाली ठेवण्यात आले आहे.

*******

**लक्षवेधी सूचना क्र. २०६४**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री. नितेश राणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २०६४ खालीलप्रमाणे आहे:-**

"वसई येथील सर्व्हे नं. १७६, १७७ आणि इतर गांव मौजे दिवाणमान, तालुका वसई (प), पालघर ह्या जागेवर हिंदु बहुल वस्तीमध्ये मुस्लीम दफनभूमी बांधण्यासाठी वसई तालुक्यामध्ये शर्थीचे प्रयत्न सुरु असणे, तसेच सदर वादातील दफनभुमीची जागा गाव मौजे दिवाणमान, तालुका वसई (प.) पालघर येथील स. नं. १७६, १७७ आणि इतर ही जागा केंद्रशासनाच्या पर्यावरण विभागाने तयार केलेल्या वेटलँड (पाणथळ जागा) मध्ये अंतर्भुत असून सदर जागा व्हेटलँड मध्ये अंतर्भुत असल्याची (व्हेटलँड ॲटलासने बाधीत असल्याचे) खुद्द वसई विरार महानगरपालिका प्रशासनाने त्यांच्या दिनांक ०२/०३/२०१९ च्या पत्रामध्ये स्पष्टपणे मान्य केलेलं असणे, तसेच वादातील दफनभुमीची जागा व्हेटलँड ॲटलासने मध्ये अंतर्भुत असल्याची नोंद वेदास रुपेस सेंटरच्या संकेतस्थळामधुन सिद्ध होऊ शकते आणि http://vedas.sac.gov.in ह्या भारत सरकारच्या संकेतस्थळावर माहिती पुरावे असणे, तसेच माननीय मुंबई उच्च न्यायालयाने जनहीत याचीका क्र. ८७ /२०१३ मध्ये १४ ऑक्टोबर पोलीस ठाण अमर ०१३, १९ मार्च, २०१४ मध्ये पारीत केलेल्या आदेशामध्ये ज्या व्हेटलँड ॲटलास मध्ये पोली व्लड (पाणथळ जागा) म्हणुन दाखवलेल्या आहेत त्या जागेवर कोणत्याही प्रकारचा "भराव अथवा बांधकाम करण्यासाठी बंदी घातलेली असणे, तसेच नगरविकास खात्याने राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपंचायत इत्यादी यांना MRTP Act Sec. १५४ प्रमाणे स्पष्टपणे सुचना दिलल्या असुनही तथा व्हेटलँड ॲटलास मध्ये (पाणथळ नकाशात) दिवाणमान सर्व्हे क्र. १७६, १७७ व इतर ही जागा येत असल्याची पुर्णपणे माहिती असुन देखील ह्या जागेवर वारंवार भराव व बांधकाम केले जात असने, आणि यासंदर्भात पर्यावरण विभागाने दिलेले पत्र हे माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केले जात असणे, आणि सदर काम करणेपुर्वी महानगरपालिकेने माननीय उच्च न्यायालयाची परवानगी घेणे बंधनकारक होती मात्र तरी देखील परवानगी न घेता बांधकाम करणे, आणि प्रस्तावीत मुस्लीम दफनभूमी ही सुरुवातीपासुन वादाच्या भोवऱ्यात असून सुद्धा जनसमुदायाचा ह्या गोष्टीसाठी विरोध मोठयाप्रमाणावर असुनही महापालिकेचा अधिकाऱ्यांनी जनभावना लक्षात न घेता अर्धवट अभ्यास करून सर्व्हे क्र. १७६, १७७ आणि इतर दिवाणमान येथेच दफनभुमीचा घाट घातला जात असणे, व वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बऱ्याच ठिकाणी कायमस्वरुपी पाणथळ जागा असुनही मोठया प्रमाणावर भराव टाकुन बांधकामे करून विकास झाल्याचे भासवले जाणे, दफनभूमीबद्दलची विरोधाची जनभावना केराच्या टोपलीत टाकुन, दफनभुमी बांधण्यात येणे आणि त्यासाठी स्थानिक नागरिकांचा ह्या सर्व गोष्टींना पुर्णपणे विरोध असणे,तसेच या बाबत दिनांक २६ फेब्रुवारी रोजी वसई शहरात स्थानिक नागरिकांनी मोठा जनआक्रोश मोर्चा काढणे, आणि या मोर्चाची दखल वृत्तपत्र आणि नॅशनल मीडियाने घेणे, आणि अद्याप काम चालू असणे, तसेच याबाबत संपूर्ण राज्यात तीव्र आंदोलन

रोवा H/0053A (750-4-23)

करणार असल्याचे राज्यशासनास निवेदन देणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार मंजूर विकास आराखड्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे दिवाणमान, स.नं. १७६, १७७ मध्ये आरक्षण क्र. ५९४ (अ) दफनभुमीसाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे. सदरचे आरक्षण EP मध्ये ठेवण्यात आले असून आरक्षणाचे क्षेत्र सुमारे ११ एकर इतके आहे. सदरची जागा मुळत: शासनाच्या मालकीची आहे. तथापि, मौजे दिवाणमान स.नं.१७६, १७७ मधील आरक्षणाखालील जागा जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक २०.०८.२०११ च्या आदेशान्वये वसई विरार शहर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.

वसई विरार विकास आराखडयातील मौजे दिवाणमान, साईट नं.५९४ अ सर्व्हे नं. १७६ व १७७ मध्ये दफनभूमीसाठी महानगरपालिकेच्या दिनांक ०४.०४.२०१२ आदेशान्वये आरक्षण मंजूर करण्यात आले आहे. तसेच सदर जागेत सर्व धर्मियांसाठी दफनभूमी विकसित करणेसाठी महानगरपालिका ठराव दिनांक २०.०४.२०१३ अन्वये रु ४.१४ कोटीच्या रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याची बाब वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

उपरोक्त प्रस्तावांतर्गत तांत्रिक मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून मे. जी आर. कंस्ट्रक्शन यांना दिनांक २५.११.२०१३ रोजी कार्यादेश देण्यात आला. उपरोक्त ठेकेदाराने प्रत्यक्ष कामास सुरवात करुन कंपाऊंड वॉल व माती भरावाचे काम पुर्ण केले होते. तद्नंतर महानगरपालिका ठराव दिनांक १८.०६.२०१६ अन्वये सदर प्रकरणी प्रस्तावित दफनभूमीत सर्वधर्मीयासाठी जागा विभागून देणेबाबत निर्णय घेण्यात आला व त्यानुसार संबंधित ठेकेदाराने अंतर्गत भिंतीचे व रस्त्याचे काम सुरु केलेले होते.

दरम्यान प्रस्तावित दफनभूमी विकासाबाबत श्री.सुनिल मुळे यांनी राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथे दावा क्र. १६/२०१७ ने दावा दाखल केला होता. सदर दाव्याबाबत लवादाने दिलेल्या दिनांक २४.१०.२०१७ रोजीच्या आदेशास अनुसरुन दफनभूमी भोवतालची कंपाऊंड वॉल पाडण्यात आली. तसेच सदर प्रकरणी राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशानुसार MCZMA व Wet Land ची परवानगी घेवून दफनभूमीचा वापर करण्यात यावा असे कळविण्यात आले होते. उपरोक्त आदेशास अनुसरुन वसई विरार शहर महानगरपालिकेने दिनांक ०३.११.२०१७ रोजी पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे CRZ परवानगी साठी अर्ज दाखल केला होता. तथापि, MCZMA (महाराष्ट्र कोस्टल झोन रेग्युलेशन ॲथोरीटी) यांनी पत्र दिनांक १८.०७.२०१९ अन्वये सदरची जागा CRZ नसलेबाबत कळविलेले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे दिवाणमान येथील सर्वे नं.१७६, १७७ ही जागा पर्यावरण व वन मंत्रालय यांचे दिनांक ०४.१२.२०१० रोजीच्या अधिसूचनेतील वेटलँड ॲटलास नुसार वेटलँडने (पाणथळ जागा) बाधित आहे. तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.८७/२०१३ दिनांक १८.१२.२०१३ वेटलँड ॲटलासने बाधित असलेल्या

जागेमध्ये कोणत्याही प्रकारचा भराव अथवा बांधकाम पूर्वपरवानगी शिवाय करण्यात येऊ नये असे निर्देश दिलेले आहेत. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ नुसार केंद्र सरकार अथवा राज्य सरकारने जनहितापोटी दिलेल्या धोरणात्मक आदेशांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्या त्या विकास प्राधिकरणाची आहे असे नमुद आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. ८७/२०१३ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी, पालघर यांच्यामार्फत तयार करण्यात आलेल्या संक्षिप्त दस्तऐवजानुसार मौजे दिवाणमान, ता.वसई येथील स.नं. १७६ व १७७ या जमिनीचा पाणथळ जमिनी म्हणुन समावेश नाही.

तथापि पर्यावरण व वन मंत्रालय यांच्या दिनांक ०४.१२.२०१० रोजीच्या अधिसूचनेमधील भाग क्र.४ (कलम २ मधील XII) अन्वये महानगरपालिकेने सार्वजनिक हितासाठी असलेला (दफनभूमी) वापर राज्य शासनाची पूर्व परवानगी घेऊन करावा असे नमुद आहे. त्यास अनुसरून मौजे दिवाणमान, सर्वे नं.१७६, १७७ व इतर या मिळकतीमध्ये आरक्षण क्र. ५९४ अ मध्ये दफनभूमीचा वापर अनुज्ञेय करणेबाबत सन २०१९ मध्ये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पर्यावरण विभागाने शासनपत्र दिनांक ०९.०९.२०१९ अन्वये सदरची जागा वेटलँड नसलेबाबत कळविलेले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार मौजे दिवाणमान स.नं. १७६ व १७७ येथील प्रस्तावित सर्वधर्मीय दफनभूमी विकास कामास नव्याने प्रशासकीय ठराव दिनांक १५.१२.२०२१ अन्वये रु. १.७५ कोटीच्या रकमेस मंजूरी घेतलेली आहे. तद्नुषंगाने सदर कामी नव्याने निविदा प्रक्रिया राबवून मे.महावीर एन्टरप्रायजेस यांना दिनांक ०७.१०.२०२२ रोजी उक्त कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे.

दरम्यान पर्यावरण विभागाच्या वेटलॅन्ड क्लीअरन्सबाबत दिनांक ०९.०९.२०१९ रोजीच्या आदेशास श्री. सुनिल मुळे यांनी दिनांक १७.०१.२०२३ रोजी राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथे पुनःश्च आव्हान दिलेले आहे. सदर खटला अद्याप प्रलंबित आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार मौजे दिवाणमान स.नं. १७६ व १७७ येथील प्रस्तावित सर्वधर्मीय दफनभूमी विकास कामास सकल हिंदू समाज यांनी विरोध दर्शवून आंदोलन करणे बाबतचे निवेदन महानगरपालिकेस दिनांक १७.०२.२०२३ रोजी दिले आहे, ही वस्तूस्थिती आहे. तथापि, महानगरपालिकेकडून संबंधित प्रतिनिधी शिष्टमंडळासोबत चर्चा करुन सदरचे आंदोलन मागे घेण्याचे आवाहन देखील करण्यात आले. दरम्यान प्रस्तावित दफनभूमीचे काम तरी तूर्त दिनांक ३१.०३.२०२३ पर्यंत बंद ठेवणे व पुढील आदेशाशिवाय काम करण्यात येऊ नये असे संबंधित ठेकेदारास वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आलेले आहे.

****

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२१४५**

**मा.श्री.हरिभाऊ बागडे, वि.स.स यांनी, महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेचा विकास आराखडा १९९०-१९९१ या वर्षी मंजूर झालेला असणे, आता त्याला ३२ वर्षापेक्षा अधिक काळा झालेला असणे, ३०-३२ वर्षांत या शहरात नवीन विकास आराखडा तयार नसल्याने शहरात २० X ३० चौ.फुटाच्या क्षेत्रफळाचे प्लॉट मोठ्या प्रमाणात विक्री होणे, त्या सर्व प्लॉटवर घरे बांधून झोडपट्ट्या तयार झाल्या असणे, शहरातील अशा झोपडपट्टींची संख्या इतर कोणत्याही महापालिकेपेक्षा जास्तच असणे, त्यामुळे या भागात मुलभूत सोयीसुविधा पुरविण्यास महापालिका असमर्थ ठरणे, या वस्त्यांमध्ये ड्रेनेज, पाणी, रस्ते, लाईटची सुविधा नसणे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला बाधक असे वातावरण निर्माण होणे, त्यामुळे छत्रपती संभाजीनगर महापालिकेचा नवीन विकास आराखडा तात्काळ मंजूर करून तो लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना दि.१५.१०.१९९१ रोजी मंजूर झाली असून ती दि.१९.११.१९९१ पासून अंमलात आली आहे. तसेच मुळ हद्दीची सुधारित विकास योजना दि.१८.०४.२००१ रोजी भागश: मंजूर झाली असून ती दि.०१.०९.२००१ पासून अंमलात आली आहे. वगळलेल्या भागाची पुनर्प्रसिद्ध विकास योजना दि.१७.०८.२००२ रोजी भागश: मंजूर झाली असून ती दि.०१.१०.२००२ पासून अंमलात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेस २० वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्याने सदर वाढीव हद्दीची प्रारुप सुधारित विकास योजना तयार करण्यासंदर्भात दि.०१.०८.२०१४ रोजी महानगरपालिकेने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २५ अन्वये विद्यमान वापर नकाशा तयार केला होता. तसेच दि.०४.०२.२०१६ रोजी कलम २६ अन्व्ये प्रारुप विकास योजना राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र, याविरुद्ध मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१९८१/२०१६ दाखल झाली होती. यामध्ये दि.०५.०४.२०१६ रोजीच्या निर्णयान्व्ये कलम २६ अन्व्येची कार्यवाही सुरु ठेवण्याची मुभा दिली मात्र, प्राप्त आक्षेपांवर अंतिम निर्णय घेवू नये, असे आदेशित केले. यानंतर दि.२०.०७.२०१६ रोजीच्या निर्णयानुसार, कलम २६ अन्वये प्रसिध्दीकरण व विकास योजना मंजूरीसाठी कलम ३० अन्वये शासनास सादर करणेसाठी कलम २१(४अ) मधील तरतूदी लागू राहतील असा निर्णय दिला होता. मा.उच्च न्यायालयाने दि.०५.०८.२०१६ रोजीच्या निर्णयानुसार, दि.०५.०४.२०१६

चा निर्णय कायम असल्याचे स्पष्ट केले होते. या निर्णयाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिकेमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०७.११.२०१६ रोजीच्या आदेशानुसार, मा.उच्च न्यायालयाचे दि.०५.०८.२०१६ चे अंतरिम आदेश कायम आहेत असा निर्णय दिला.

तथापि छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने, त्यांना अधिनियमान्वये प्रदत्त असलेल्या अधिकारात, मुळ हददीची विकास योजना सुधारीत करणे व वाढीव हद्दीची विकास योजना एकत्रितरित्या तयार करण्याचा निर्णय घेतला त्यानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मूळ हद्दीची विकास योजना सुधारीत करण्याची + वाढीव हद्दीची विकास योजना तयार करण्याबाबत कलम २३ सह ३४ व ३८ अन्वये दि.१९.०१.२०२२ रोजी ठराव पारीत केला असून तत्सबंधी दि.१७ ते २३ मार्च, २०२२ रोजी राजपत्रात प्रसिध्दीकरण झालेले आहे.

यानंतर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने विद्यमान वापर नकाशा तयार करणे व तद्नुषंगिक कार्यासाठी नगर रचना अधिकारी नियुक्त करणेबाबत सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर यांना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २४ अन्वये प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावानुषंगाने सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर यांनी दि.०२.०५.२०२२ रोजी अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे व विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रात २० X ३० च्या चौ. फुटाच्या क्षेत्राचे प्लॉटची विक्री होणे व सदर प्लॉटवर घरे बांधून झोपडपट्ट्यांची संख्या वाढ होऊ नये या संदर्भाने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमध्ये प्रशासकीय विभाग कार्यरत असून, त्याच्या अधिपत्याखाली कर्मचारी वर्ग कार्यरत आहे व त्यामार्फत त्यावर वेळोवेळी कार्यवाही प्रस्तावित करण्यात येते. अशा वसाहतींमध्ये मुलभूत सोईसुविधा पुरविण्यासंदर्भाने महानगरपालिकेतर्फे योग्य ती खबरदारी घेण्यात येते.

***********

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन      लक्षवेधी सूचना क्र. २३८२**

**ॲड.माणिकराव कोकाटे विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २३८२ पुढील प्रमाणे आहे :-**

"जि.नाशिक, मालेगाव येथील संगमेश्वर भागातील भूखंड क्र. ९६ ते १००, सदर भूखंडावर गेले ५० वर्षाहून अधिक काळ लघु व्यवसाय करणारे दुकानदार, हॉटेल आदी व्यवसायीकांना प्रस्तावित समावेश न करता, मिळकतधारकांनी महापालिका आयुक्तांची दिशाभूल करून बेकायदेशीररित्या बांधकाम परवानगी दिल्याचा प्रकार नुकताच उघडकीस येणे, सदर प्रकरणी मिळकत मालक बाळू अहिरे व आर्किटेक्ट मुकुंद चिंधडे यांना महापालिकेने नोटीस बजावण्यात येणे, परंतु नोटीसला उत्तर देण्यापूर्वीच मिळकतधारकांनी वहिवाटीचा रस्ता खोदल्याने येथील लघु व्यवसायीकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण होणे, मिळकत मालक तथा आर्किटेक्ट यांनी मंजुर नकाशाप्रमाणे काम न करणे, जुना आग्रा रोड येथे सुमारे ३५ तर पाठिमागे १५ पत्राशेड दुकाने असणे, परवानगी दिलेल्या मंजुर नकाशात सदरहू दुकानांचा कोणताही समावेश नसल्याने सदरहू अनेक वर्षापासून व्यवसाय करीत असलेल्या दुकानदारांवर बेकारीचे संकट कोसळणे, सदरहू जागेत पालिका प्रशासनाने आर्थिक संगनमताने भ्रष्ट मार्गाचा अवलंब करुन बेकायदेशीरपणे अटी व शर्तीचे उल्लंघन करून बांधकाम परवानगी दिल्याचा प्रकार उघडकीस येणे, कब्जेदार भाडेकरूंच्या ताब्यातील क्षेत्रात तफावत निर्माण करुन कमी दर्शविणे, वहिवाटीचे रस्ते बंद करणे, डी. पी. रोड मोकळे नसतानाही मोकळे दर्शविणे, कलम ४७ अन्वये अपिलातील निर्णयाप्रमाणे न्यायप्रविष्ट क्षेत्राची अद्याप पालिकेने मोजणी न करणे, विविध शासकीय स्तरावरील या प्रकरणी झालेले आदेश प्रलंबित ठेवणे, जे बनावट कागदपत्र महापालिकेत बांधकाम परवानगीसाठी दाखल केले त्या कागदपत्रांविरोधात जागा मालकावर फौजदारी दावा क्र. ५३६/२०१४ दाखल असून पुन्हा तिच कागदपत्रे विचारात घेऊन बांधकाम परवानगी देणे, बांधकाम परवानगी मिळवताना कब्जेदार भाडेकरूंना मोजणी नकाशात न दर्शवणे, मा.लोकआयुक्त यांच्या चौकशी आदेशानुसार सहाय्यक संचालक, नगररचना, श्री. माने यांनी सादर केलेल्या दि. २०/१२/२०१९ रोजीच्या अहवालावर अंमलबजावणी न करणे. पीआयएल ६३/२०१५ या मा. उच्च न्यायालयातील दाव्यात महापालिकेने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राप्रमाणे वस्तूस्थिती जागेवर नसणे, महासभेत सदर बांधकाम परवानगी रद्द करणे कामी ठराव सर्वानुमते मंजूर झाला असतानादेखील सदर ठरावाची अंमलबजावणी न करणे, सदरहू प्रकरणी पालिका आयुक्त श्री.भालचंद्र गोसावी यांच्यासह त्यांचे विविध अधिकारी यांनी आर्थिक संगनमताने मिळकत मालक व विकासक यांना झुकते माप देऊन लघु

व्यवसायीक भाडेकरुंवर बेदखल होण्याची पाळी आणणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

विषयांकित लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने निवेदन खालीलप्रमाणे आहे.

मालेगांव शहराची नगर रचना योजना क्र. १ सन १९६२ मध्ये मंजूर झालेली आहे. तद्नंतर मालेगांव शहराची दुसरी सुधारित विकास योजना सन २००६ मध्ये भागश: मंजूर असून, उर्वरीत विकास योजना सन २००९ मध्ये मंजूर झालेली आहे. सदरच्या मंजूर विकास योजनेनुसार अंतिम भुखंड क्र. ९६ ते १०० ही जागा १२.० मी., १८.० मी. व ३०.० मी. विकास योजना रस्त्यांने बाधीत होत असून, उर्वरीत जागा रहिवास विभागात समाविष्ट आहे.

विषयाधिन जागेपैकी अंतिम भुखंड क्र. ९६ व ९७ च्या एकत्रिकरण व उपविभागणी नकाशास मालेगांव महानगरपालिकेने दि. १६/१/२०१४ अन्वये मंजुरी दिली असून, अंतिम भुखंड क्र. (९६+९७)/ब व भुखंड क्र. ९८,९९ व १०० च्या एकत्रिकरणास मालेगांव महानगरपालिकेने दि.१६/१/२०१४ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तर अंतिम भुखंड क्र. (९६+९७)/अ [सध्याचे भु.क्र.९६/क] या जागेवरील बांधकामास दि. १६/१/२०१४ अन्वये मंजुरी दिली आहे व अंतिम भुखंड क्र. (९६+९७)/ब+९८+९९+१०० [सध्याचे भु.क्र.९६/अ] या जागेवरील बांधकामास दि.१६/१/२०१४ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सदर भु.क्र.९६/अ या जागेवर आग्रारोड सन्मुख ३५ टपऱ्या व पश्चिमेस १५ टपऱ्या अश्या कच्च्या स्वरुपाची अस्तित्वातील बांधकामे असून ती बांधकाम नकाशावर दर्शविण्यात आलेली नसल्याची बाब जागा मालक यांनी कामास प्रत्यक्ष सुरुवात केल्यानंतर मालेगांव महानगरपालिकेस याबाबत प्राप्त अनेक लेखी तक्रारीद्वारे निदर्शनास आल्यावर याबाबत खुलासा करावा अन्यथा, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५१ अन्वये बांधकाम परवानगी रद्द करण्यात येईल, असे जागा मालक यांना महानगरपालिकेने कळविले होते.

अंतिम भुखंड क्र. (९६+९७)/ब+९८+९९+१०० [सध्याचे भु.क्र.९६/अ] वरील ताबेदार यांनी मा. न्यायालयात रे.मु.न. ८१, ८२ व ८३ व इतर अपिल दाखल केली होती. मा. न्यायालयाने दि. २६/३/२०१४ अन्वये दिलेल्या आदेशानुसार, जमीन मालकास विद्यमान कच्च्या मिळकतीचा ताबा घेण्यास तात्पुरती स्थगिती दिली होती. त्या अनुषंगाने मालेगांव महानगरपालिकेने संपुर्ण जमीनीचा ताबा प्राप्त होईपर्यंत बांधकाम परवानगीस दि.०२/०८/२०१४ रोजी स्थगिती दिलेली होती. मालेगांव महानगरपालिकेने दिलेली स्थगिती रद्द करणेबाबत शासनाकडे कलम ४७ अन्वये दाखल अपील प्रकरणी मालेगाव महानगरपालिकेने न्यायप्रविष्ट क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्रावरील सुधारित बाधकाम नकाशे प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीस अधीन राहून मंजूर करावेत असा निर्णय शासनाने कलम ४७ अपील प्रकरणी फेब्रुवारी, २०१६ मध्ये दिलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी श्री. सुरेश महेंद्र पवार यांनी मा. लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त

कार्यालयाकडे दि.२८/११/२०१७ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मा. लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त यांचे कार्यालयाने दिलेल्या निर्देशानुसार तत्कालीन आयुक्तांच्या आदेशानुसार मालेगाव महानगरपालिकेचे तत्कालीन सहायक संचालक, नगररचना, श्री. संजय माने (शासकीय आस्थापना) यांनी तपासणी करुन दि.०५/१२/२०१९ रोजी सादर केलेल्या कार्यालयीन टिपणीमध्ये महानगरपालिकेकडून देण्यात आलेली बांधकाम परवानगी लागू असलेल्या नियमावलीनुसार नसल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५१ नुसार रद्द होणेस व जागेवरील बांधकाम मंजूर बांधकाम परवानगी नकाशाशी विसंगत असल्याने कलम ५२, ५३ नुसारच्या कार्यवाहीस पात्र ठरत असल्याचे नमूद करण्यात आले होते. सदर टिपणीच्या आधारे महानगरपालिकेकडून दि. २०/१२/२०१९ चे पत्राव्दारे मा. लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त कार्यालयास अहवाल सादर करण्यात आता होता.

तसेच जमीनधारकाने ४.५० मी. सामासिक अंतरात (रस्त्यालगतची अस्तित्वातील बांधका बांधकाम यामधील अंतर) नकाशाव्यतिरिक्तचे अतिरिक्त बांधकाम (Projected Passage / Cantilever Projection) केले असल्याने दि.०१/०२/२०२० रोजी महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ व ५३ अन्वये नोटीस बजावलेली होती.

नगर रचना योजना क्र.१ मध्ये समाविष्ट क्षेत्रात कोणते नियम लागू करावेत याबाबत मालेगांव महानगरपालिका यांनी मार्गदर्शन अपेक्षिलेले असता शासनाने दि.२२/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मालेगांव महानगरपालिकेसाठी वेळोवेळी मंजूर नगर रचना योजना व विकास योजना क्षेत्रासाठी लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीबाबत महानगरपालिकेस मार्गदर्शन केले आहे.

प्रकरणी मा. उच्च न्यायालयात जमीनधारक श्री. कमलकार शंकर पवार व इतर यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ३५४४/२०१८ यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१४/०१/२०२० रोजी "The Municipal Corporation, therefore, shall be at liberty to take further action by following due process of law" असे आदेश पारित केले आहेत.

तथापि, सदर अनधिकृत बांधकामावर कार्यवाही न केल्याचे नमूद करून जमीनधारक श्री. कमलाकर शंकर पवार व इतर यांनी मा. उच्च न्यायालयात अवमान याचिका क्र.CP-ST-93965-2020 IN WP-3544-2018 दाखल केली आहे. सदर अवमान याचिकेत मा. उच्च न्यायालयाने दि.१५/१०/२०२० रोजीच्या अंतरीम आदेशान्वये रिट याचिका क्र. ३५४८/२०१८ मधील दि.१४/०१/२०२० नुसार महानगरपालिकेने कलम ५२ अन्वये नोटीस बजावूनही कार्यवाही केली नसल्याबाबत वादी यांचे म्हणणे योग्य असल्यास मालेगांव महानगरपालिका यांनी ४ आठवडयात दि.१४/०१/२०२० रोजीच्या आदेशाचे अनुपालन करावे असा आदेश पारीत केलेला आहे.

प्रकरणी जमीनधारक श्री. कमलाकर शंकर पवार यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका क्र. ३८७२/२०२१ मध्ये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील श्री. संजय

जाधव, नगररचनाकार-II यांनी दि.२४/०८/२०२२ रोजी आयुक्त व मालेगाव महानगरपालिका यांच्यावतीने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञापत्राद्वारे भाडेकरू / कब्जेदार यांची उक्त अनधिकृत बांधकामे काढून टाकणेबाबत मालेगाव महानगरपालिकेने पोलीस विभागाकडून पोलीस बंदोबस्ताची मागणी केली असून, सदर अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेकामी येणारा खर्च व पोलीस बंदोबस्तासाठी येणा-या अंदाजित खर्चाच्या रक्कमेचा भरणा संबंधित जमीनधारक श्री. कमलाकर शंकर पवार यांनी मालेगाव महानगरपालिकेकडे केला आहे. शासनाने दि.१०/११/२०२२ रोजीचे पत्राद्वारे मालेगाव महानगरपालिका हद्दीतील संगमेश्वर वार्डातील अं.भू.क्र. ९६ ते १०० (सध्याचा ९६-अ, ९६-ब ९६-क) वरील भाडेकरूंना मालेगाव महानगरपालिकातर्फे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमाच्या कलम ५२/५३ अन्वये बजाविण्यात आलेल्या नोटीसीना स्थगिती दिली असुन स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत मालेगांव महानगरपालिकेस कळविले असता मालेगांव महानगरपालिकेने दि.१४/१२/२०२२ रोजी शासनास अहवाल सादर केलेला आहे. महानगरपालिका यांनी सादर अहवालाच्या प्रकरणाबाबत मोठया प्रमाणावर तक्रारी प्राप्त होत असल्याने त्याचे निरसन करण्याचे व तक्रारदाराचे समाधान होण्यासाठी संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत सदर प्रकरणाची तपासणी करण्याची शिफारस केलेली आहे. त्यास अनुसरुन प्रकरणी मालेगांव महानगरपालिकेकडुन देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीबाबत संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत सखोल चौकशी करुन शासनास स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचा प्रस्ताव सादर करण्याची तजविज ठेवली आहे.

---------------------

## महाराष्ट्र विधानसभा

**नगरविकास विभाग** **लक्षवेधी सूचना क्र.२३८८**

### सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**सर्वश्री. रवींद्र धंगेकर, अमीन पटेल, अशोकराव चव्हाण, नानाभाऊ पटोले, भिमराव तापकीर विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३८८ पुढीलप्रमाणे आहे:-**

" पुणे महानगरपालिकेने घरमालकांना देण्यात येणारी मिळत करातील ४० टक्के सवलत रद्द केल्याने याचा फटका हजारो पुणेकरांना बसणे, राज्यात दिवसेदिवस महागाई वाढत असुन महागाईमुळे पुणेकरांवरीलही खर्चाचा बोजा वाढत असणे, त्यातच मिळकत करात देण्यात येणारी ४०% सवलत बंद झाल्यामुळे पुणेकरांना मोठा आर्थिक फटका बसणे, १९७० सालापासून सन २०१८ पर्यंत मिळालेला सवलत व्याजासहित पुणेकरांकडून वसुल करण्याचे आदेश देण्यात आल्याने यासंदर्भात पुणे म.न.पा ने वसुली व व्याज घेण्यावर स्थगिती द्यावी असा ठराव करुन शासनाकडे पाठविला असतानांही याबाबत शुध्दीपत्रक शासनाने अद्यापही काढलेले नसणे, मुंबई शहरात ५०० चौ.फुटाच्या आतील घरांना सवलत दिली जाते परंतु पुणेकरांना देण्यात आलेली सवलत रद्द करुन त्याची वसुली करण्यात येत असल्याने पुणे शहरातील नागरिकांत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना याबाबत राज्याशासनाने चौकशी करुन करण्यात येणारी वसुलीला करण्यात येणारी वसुलीला स्थगित देऊन कर सवलत कायम करण्याची तसेच मुंबईच्या धर्तीवर पुणे शहरातील ५०० चौ.फुटाच्या आतील घरांना कर माफ करण्याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया "

### मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

पुणे महानगरपालिकेने मुख्य सभा ठराव क्र. ५ दि.०३.०४.१९७० नुसार करपात्र रक्कम ठरविताना १०% ऐवजी १५% वजावट दिली. तसेच घरमालक स्वतः रहात असल्यास त्या जागेचे भाडे वाजवी भाड्याच्या ६०% इतके धरण्यास मान्यता दिली व त्यानुसार कार्यवाही करण्यात येत होती. तथापि, सदर वजावटींबाबत कायद्यात तरतूद नसल्याने मा. महालेखाकार यांचे लेखापरीक्षण आक्षेपावर झालेल्या लोकलेखा समितीच्या शिफारसीनुसार ठराव क्र. ५ दि. ०३.०४.१९७० दिनांक ०१.०८.२०१९ चे शासन निर्णयानुसार विखंडीत केलेला आहे.

त्यानंतर मुख्य सभेने ठराव क्र. ३२०, दि.२८.८.२०१९ अन्वये १) सन २०१०-११ पासून ५% वार्षिक करपात्र रक्कमेतील फरक पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्याचा दि. २८.०५.२०१९ चा शासन निर्णय रद्द करणेत यावा २) मुख्य सभा ठराव क्र. ५ दि.०३.०४.१९७० निलंबित/विखंडीत करण्यात येऊ नये महापालिकेमार्फत मिळकत करातून देण्यात येणारी ४०% सवलतः पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्यासाठी बंद करावी लागणार आहे. ३) तत्कालीन महापलिका आयुक्त तसेच मनपा आस्थापनेवरील अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये व ४) ४०% सवलत चालू ठेवण्यास राज्य शासनास विनंती करणे, अशा एकूण ४ बाबींकरिता मान्यता दिलेली आहे. उपरोक्त वस्तुस्थितीचा कायद्याच्या विसंगत असे निर्णय घेतलेले असल्याने सदर ठरावाची पूर्णपणे अंमलबजावणी करणे शक्य नसल्याने ठरावाचे अंशतः विखंडन करून मिळणेबाबत कर आकारणी व कर संकलन कार्यालयाने शासनास प्रस्ताव सादर केला होता.

त्यानुसार शासनाने दि.१७.०९.२०२१ च्या शासन निर्णयाअन्वये सदर ठरावातील १, २ आणि ४ या बाबी अमान्य केल्या तसेच बाब क्र. ३ ला मान्यता देण्यात आली असून सदर ठरावाचे अंशत: निलंबन केले आहे. तसेच सदर प्रस्तावात प्रस्ताविल्यानुसार इमारतीचे वाजवी भाडे ६०% धरून करपात्र मूल्याच्या ४०% दिलेल्या सवलतीच्या अनुषंगाने वसूल करावयाची फरकाची रक्कम दि. ०१.०८.२०१९ पासून वसूल करण्यास मान्यता दिलेली आहे.

सदरील निलंबनावर नगर सचिव, पुणे महानगरपालिका दि.८.०४.२०२२ च्या पत्रान्वये अन्वये अभिवेदन सादर केले असून ठराव क्र. ३२०, दि.२८.८.२०१९ विखंडीत न करता या ठरावातील सर्व म्हणजे क्र.१ ते ४ या बाबीस शासन मान्यता मिळावी, असे अभिवेदन करण्यास मुख्य सभेने ठराव क्र.८३८, दि.१७.२.२०२२ नुसार मान्यता दिली असल्याचे कळविले आहे.

शासन निर्णय दि.१७.०९.२०२१ नुसार कार्यवाही करताना मिळकतकरामध्ये १५% वजावटीचा लाभ घेतलेल्या मिळकतींची संख्या सुमारे ८.८२ लाख इतकी असून त्यावरील सवलत सन २०१० पासून १०% केल्यास अंदाजे रकम रु. १४१.४७ कोटी इतकी फरकाची रक्कम वसुली करावी लागणार आहे. दि.०१.०८.२०१९ पासून इमारतीचे वाजवी भाडे ६०% धरून करपात्र मूल्याच्या ४०% दिलेल्या सवलतीच्या मिळकतींची संख्या सुमारे ५.०४ (लक्ष) इतकी आहे. तसेच दि. ०१.०४.२०१९ पासून नवीन आकारणी झालेल्या मिळकतींना ४०% सवलतीचा लाभ देण्यात येत नाही.

सद्यस्थितीत शासन निर्णय दि.१७.०९.२०२१ नुसार दि.०१.०८.२०१९ पासून वाजवी भाडे ६०% धरून देण्यात येणारी ४०% सवलत रद्द केलेली असल्याने व करपात्र रक्कम निश्चित करतांना देण्यात येणारी १५% सवलती ऐवजी १०% सवलत करून फरकाची रक्कम दि. ०१.०४.२०१० पासून वसूल करावी लागणार असल्याने नागरिकांवर मिळकत कराचा अतिरिक्त बोजा पडणार आहे.

कर आकारणी व कर संकलन विभागाकडील जीआयएस सर्व्हे अंतर्गत ९७५४६ मिळकतींची ४०% सवलत काढणेत आलेली होती. त्या मिळकतींच्या फरकाच्या रक्कमेबाबत मिळकतधारकांना दि.२३.०८.२०२२ रोजी पाठविण्यात आलेल्या एसएमएस मुळे मिळकतधारकांमध्ये संभ्रम निर्माण होऊन मोठ्या प्रमाणत तक्रारी प्राप्त झाल्याने महापालिका आयुक्त यांनी दि.२४.०८.२०२२ रोजी प्रेस नोट द्वारे वरील ४०% फरकाची रक्कम वसुली करण्यास स्थगिती दिलेली आहे.

पुणे महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नाचा विचार करता, सद्यस्थितीत मिळकतकर हा महत्वाचा उत्पन्नाचा स्रोत आहे. यापूर्वी असलेला आयातकर, स्थानिक संस्था कर हे रद्द करण्यात आलेले आहेत.

त्याचप्रमाणे दि. ३१ मे पूर्वी संपूर्ण मिळकतकर भरल्यास सर्वसाधारण कराची चालू मागणीची रक्कम रु. २५,०००/- पेक्षा कमी आहे त्यांना सर्वसाधारण कराच्या चालू मागणी रकमेत १०% सूट व ज्याची सर्वसाधारण कराची चालू मागणीची रक्कम रु. २५,००१/- पेक्षा अधिक आहे त्यांना सर्वसाधारण कराच्या चालू मागणी रकमेत ५% सूट देण्यात येते. त्यामध्ये सुमारे १० कोटी इतके उत्पन्न सन २०२२-२३ या वर्षात सवलतीमुळे कमी झालेले आहे. त्याचबरोबर माजी सैनिकांच्या विधवा पत्नी व वीरमाता यांना एका निवासी मिळकतीचे मिळकतकरात सवलत देण्यात येते. मा.बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजने (माजी सैनिक व सैनिक विधवा/पत्नी यांना मालमत्ता करातून सूट) अंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये वास्तव्य करणाऱ्या माजी सैनिक व माजी सैनिक विधवा/पत्नी यांना मालमत्ता करातून सूट दिली जाते. तसेच रेन वॉटर हार्वेस्टिंग, सोलर सिस्टम, व्हर्मी कम्पोस्टिंग या प्रकल्पापैकी कोणताही १ प्रकल्प राबविल्यास ५% व २ प्रकल्प राबविल्यास १०% सवलत देण्यात येते.

वरील सर्व बाबी विचारात घेता ५०० चौ. फुटापेक्षा कमी क्षेत्र असलेल्या निवासी मिळकतीचा कर माफ केल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नावर विपरीत परिणाम होणार आहे.

मुंबई महानगरपालिकेची कर आकारणी ही भांडवली मुल्यावर आधारित केली जाते. पुणे महानगरपालिकेची मिळकत कर आकारणी ही चटई क्षेत्र निर्देशांक आधारावर केली जाते व संपूर्ण इमारतीला ऑक्यूपायर वाईज वेगवेगळी बिले दिली जातात व ५०० चौ. फुटापेक्षा कमी क्षेत्र असलेल्या निवासी मिळकतीची संख्या ४ ते ४.५ लक्ष इतकी आहे.

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात ५०० चौरस फुटापेक्षा कमी असलेल्या मिळकतींची संख्या ही मोठ्या प्रमाणात असून ,त्यापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न हे अंदाजे रु.४०० ते ५०० कोटी इतके आहे. एकुण वार्षिक उत्पन्नाचा विचार करता ५०० चौरस फुटापेक्षा कमी असलेल्या मिळकतींना इतक्या मोठ्या प्रमाणात माफी देणे पुणे महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने संयुक्तिक नसून त्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या संपूर्ण आर्थिक उत्पन्नाचा समतोल राखण्यास अडचणीचे होणार आहे.

***********

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक २४२४**

**श्रीमती यामिनी यशवंत जाधव, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई बेस्ट उपक्रमातील मागील सुमारे १६ वर्षाहून अधिक कालावधीपासून नैमित्तिक (CAUSAL ) कामगार म्हणून कार्यरत असलेल्या ७१४ कामगारांना कायम करण्यात आलेले नसल्याने सदरहू कामगारांच्या वतीने यापूर्वी सातत्याने बेस्ट प्रशासनाकडे निवेदने सादर करून, पाठपुरावा करून तसेच आंदोलनाचा मार्ग ही त्यांनी अवलंबिलेला तरीही बेस्ट प्रशासनाकडून या संदर्भात झालेले दुर्लक्ष व टाळाटाळ झाल्याने सदरहू कामगारांनी औद्योगिक न्यायालयाकडे दाद मागितली असता, औद्योगिक न्यायालयाने या संदर्भात सदरहू कर्मचाऱ्याच्याबाजूने न्याय देऊन, त्यांना कायमस्वरूपी नवघानी पदावर सामावून घ्यावे, असे स्पष्ट आदेश दि. १५.१०.२०१९ रोजी बेस्ट प्रशासनाला दिल्यानंतरही बेस्ट प्रशासनाने या आदेशाचे पालन न केल्यामुळे, सदरहू नैमित्तिक कामगारांनी मा. मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन आपल्या समस्या त्यांच्या समोर मांडलेल्या असता, मा. मुख्यमंत्र्यांनी या नैमित्तिक कामगारांना बेस्ट उपक्रमामध्ये कायमस्वरूपी घेण्यात यावे असे स्पष्ट आदेश बेस्ट महाव्यस्थापक यांना देऊनही त्याकडेही दुर्लक्ष व टाळाटाळ झालेले असल्याने या कामगारांनपैकी मध्यतंरीच्या काळात काही कामगारांचे मृत्यू झालेले असणे, काही कामगारांचे वय ४० ते ४५ वर्ष उलटलेले असून व काही कामगार दोन तीन वर्षात सेवा निवृत्त होण्याची संभावना असल्याने या कामगारांवर आता पर्यंत झालेल्या अन्यायामुळे त्यांचामध्ये निर्माण झालेले नैराश, काहींनी आपले जीवन ही संपविलेले असणे, सध्या सदरहू नैमित्तिक कामगारांना मिळणारे अत्यल्प वेतन, यामुळे त्यांची व त्यांच्या कुटुंबियांची झालेली व होत असलेली आर्थिक कोंडी व उपासमार, या संपूर्ण प्रकरणा संदर्भात सखोल चौकशी होऊन, या कामगारावर कोणत्याही प्रकारे अन्याय होऊ नये, म्हणून त्यांना औद्योगिक न्यायालयाच्या आदेशानुसार विनाविलंब बेस्ट उपक्रमामध्ये कायमस्वरूपी सामावून घेण्याची आवश्यकता, तसेच याप्रकरणी जाणीवपूर्वक टाळाटाळ करणाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता या प्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

### -: मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

बेस्ट उपक्रमात सन १९९१ पूर्वी सेवानिवृत्त कामगारांच्या मुलांना "हंगामी नवघाणी" या पदावर थेट भरतीद्वारे नियुक्त केले जात असे. सन १९९१ मध्ये विविध काटकसरींच्या उपाययोजनांनुसार "हंगामी नवघाणी" या पदावर थेट भरती न करता त्या कामाकरिता नैमित्तिक कामगारांची नेमणूक करण्याचे ठरविण्यात आले व त्यानुसार सेवानिवृत्त कामगारांच्या मुलांची सन २०१२ पर्यंत नैमित्तिक कामगार म्हणून नियुक्ती करण्यात आली. सदर नैमित्तिक कामगारांना सन २०१५ पर्यंत रिक्त जागांची उपलब्धता तसेच रिक्त पदे भरण्याची आवश्यकता यानुसार टप्प्याटप्प्याने नवघाणी या कायमस्वरुपी पदावर नियुक्ती करण्यात आली. तद्नंतर बेस्ट उपक्रमाची बिकट आर्थिक स्थिती विचारात घेता व बृहन्मुंबई

महानगरपालिकेने आखून दिलेल्या विविध काटकसरींच्या निर्बंधांमुळे तसेच नैमित्तिक कामगारांना नवघाणी या पदावर कायमस्वरुपी घेण्याकरिता दिनांक २९.०३.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील बिंदूनामावलीनुसार विविध प्रवर्गातील अनुशेष असलेल्या प्रवर्गाच्या रिक्त जागांच्या उपलब्धतेअभावी नैमित्तिक कामगारांना नवघाणी पदावर कायमस्वरुपी घेणे शक्य झालेले नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने बेस्ट उपक्रमामध्ये भरतीबाबत घातलेले निर्बंध शिथिल करण्यास व नवघाणी संवर्गाच्या बिंदूनामावलीत सद्य:स्थितीच्या अनुशेषामध्ये अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग अशी पदे असल्यामुळे त्यामध्ये शिथिलता आणून सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या व खुल्या प्रवर्गाच्या नैमित्तिक कामगारांना नवघाणी, श्रेणी पी १ / टी १ संवर्गाची रिक्त पदे व भविष्यात रिक्त होणाऱ्या पदांवर नियुक्ती करुन ती पदे आवश्यकतेनुसार भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

मा. औद्योगिक न्यायालयाने दिनांक १५.१०.२०१९ रोजी दिलेल्या आदेशाविरोधात बेस्ट उपक्रमाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका स्टॅम्प क्र. २८३/२०२० दाखल केली असून, मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०५.०२.२०२० रोजीच्या आदेशानुसार मा. औद्योगिक न्यायालयाच्या आदेशास स्थगिती **दिली आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.**

*******

## महाराष्ट्र विधानसभा

सामान्य प्रशासन विभाग — लक्षवेधी सूचना क्र.४१

श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४१

"राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांच्या मुख्य परीक्षा यापुढील काळातही चालू वर्षापासून वस्तुनिष्ठ स्वरुपात न घेता वर्णनात्मक स्वरुपात घेण्याचा निर्णय घेणे, याच्या निषेधार्थ एमपीएससी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुणे येथील अलका टॉकीज चौकात दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी आंदोलन केले असल्याचे निदर्शनास येणे, नवीन शैक्षणिक पॅटर्न सन २०२५ पासून लागू करण्याची मागणी सदर एमपीएससीच्या विद्यार्थ्यांकडून करण्यात येणे, आतापर्यंत एमपीएसी मार्फत वस्तुनिष्ठ स्वरुपात परीक्षा घेण्यात येणे, मात्र आता माजी आयएएस अधिकारी चंद्रकांत दळवी यांच्या समितीने केलेल्या शिफारशीनुसार विद्यार्थ्यांना एमपीएससी ची मुख्य परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने द्यावी लागणार असणे, त्यासाठी सदर विद्यार्थ्यांचा विरोध नसून नवीन पॅटर्न सन २०२५ पासून लागू केल्यास एमपीएससीच्या परीक्षेची तयारी करण्यास पुरेसा वेळ मिळेल यासाठी सदर विद्यार्थ्यांनी आंदोलन करुन शासनाचे लक्ष वेधलेले असणे, परंतु शासनाची भूमिका अनुकूल नसल्याने सदर विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झालेले असणे, याबाबत शासनाने योग्य निर्णय घेऊन सदर एमपीएससीची विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धापरीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांकडून दिनांक १३.१.२०२३ ते दि.१४.१. २०२३ रोजी अलका टॉकीज चौक, पुणे येथे राज्यसेवा मुख्य परीक्षा, नवीन पॅटर्न सन २०२५ पासून लागू करावा या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले होते.

भारतीय संविधानाच्या कलम ३१५ अन्वये लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली असून शासन सेवेसाठी सुयोग्य उमेदवारांची शिफारस करण्याची जबाबदारी आयोगावर सोपविण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग सांविधानिक दृष्ट्या स्वायत्त संस्था असून आयोगामार्फत परीक्षा प्रक्रिया राबविण्याबाबत धोरण ठरविले जाते.

राज्य सेवा (पूर्व) परीक्षा व राज्य सेवा (मुख्य) परीक्षेचा अभ्यासक्रम व परीक्षा योजना यांचा एकत्रितपणे सर्वंकष अभ्यास करुन आयोगास शिफारस करण्यासाठी आयोगामार्फत दि. २७ सप्टेंबर, २०२१ रोजी त्रिसदस्यीय अभ्यासगट गठीत करण्यात आला होता. सदर त्रिसदस्यीय अभ्यासगटाने प्रस्तुत विषयावर सर्वंकष विचार विनिमय करुन त्यांचा अहवाल आयोगास दि. २ मे, २०२२ रोजी सादर केला. अभ्यासगटाचा अहवाल स्विकृत करुन आयोगाने दि. २४ जून २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार राज्य सेवा (पुर्व) व राज्य सेवा (मुख्य) परीक्षेची परीक्षा योजना आयोगाच्या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीसाठी प्रसिध्द केली होती. त्यानुसार वर्णनात्मक

स्वरुपाची सुधारित मुख्य परीक्षा योजना, राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०२३ पासून लागू करण्यात येईल असा निर्णय आयोगाने घेतला होता.

तथापि, सदरहू परीक्षा वर्णनात्मक स्वरुपात सन २०२५ पासून घेण्याची उमेदवारांची मागणी व त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती तसेच तयारीसाठी पुरेसा वेळ मिळावा अशी उमेदवारांनी केलेली मागणी, या बाबी विचारात घेऊन फेरविचारांती सुधारित परीक्षा योजना व नवीन अभ्यासक्रम वर्णनात्मक स्वरुपात सन २०२५ पासून घेण्यात येणाऱ्या राज्यसेवा परीक्षेपासून लागू करण्यात यावा असा निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक २३.०२.२०२३ रोजी घेतला आहे. सदर निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर दि.२३.२.२०२३ च्या प्रसिध्दीपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आला आहे.

-----------------o-----------------------

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

सामान्य प्रशासन विभाग | लक्षवेधी सूचना क्र.१५२५

श्री.अभिमन्यु पवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५२५

"राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत कर्मचारी मयत झाल्यास सदर कुटुंबाच्या उपजिविकेसाठी सदर मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील वारसास अनुकंपा तत्त्वावर शासकीय सेवेत घेतले जात असणे. अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसाठी विविध विभागात मोठ्या प्रमाणावर अर्ज प्राप्त असून अनेकांची वयोमर्यादा संपली असतानाही व वयोमर्यादा संपत आली असतानाही हजारो अनुकंपाधारक नोकरीच्या प्रतीक्षेत असणे. वयोमर्यादा संपली असल्याचे व संदरील वारस हे नोकरीपासून वंचित राहीले असल्याचे निदर्शनास येणे. अनुकंपा तत्त्वावर वारस म्हणून अर्ज केलेल्या परंतु वयोमर्यादा संपलेल्या वारसा नंतर दुसऱ्या वारसास अनुकंपाच्या नियुक्तीसाठी अर्ज देता येत नसल्याने अनेक अनुकंपाधारक कुटुंबातील वारस नोकरीपासून वंचीत राहिले असल्याचे निदर्शनास येणे. सदर मयत कर्मचाऱ्यांच्या वारसास अनुकंपा तत्त्वावर प्रतिक्षा करुनही नोकरी न मिळाल्याने व वयोमर्यादा संपल्याने सदर कुटुंबात नैराश्याची भावना निर्माण झाली असणे. राज्यातील वयोमर्यादा संपत आलेल्या अनुकंपाधारकांसाठी अधिसंख्य पदे त्या त्या विभागात निर्माण करुन त्यांना सेवेत घेण्याबाबत किंवा वयोमर्यादा संपल्यास इतर वारसास अनुकंपासाठी अर्ज करण्याची परवानगी देऊन नवीन वारसास नोकरी देण्याबाबत सुधारित शासन आदेश निर्गमित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

शासकीय सेवेत असताना कर्मचारी/अधिकारी दिवंगत झाल्यास त्याच्या कुटुंबावर ओढावणाऱ्या आर्थिक आपत्तीत कुटुंबियांना तातडीने मदत मिळण्याच्या उद्देशाने अनुकंपा नियुक्तीची योजना लागू करण्यात आली. त्यानुसार सद्य:स्थितीत गट 'अ' ते गट 'ड' मधील शासकीय कर्मचारी सेवेत असताना दिवंगत झाल्यास त्याच्या कुटुंबियांना शासन सेवेत अनुकंपा तत्वावर गट 'क' व गट 'ड' मधील पदांवर नियुक्ती दिली जाते. प्रचलित अनुकंपा धोरणानुसार गट 'क' किंवा गट 'ड' श्रेणीत प्रतीवर्षी रिक्त होणा-या पदाच्या २०% पदांवर अनुकंपा नियुक्ती केली जाते. अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देताना शासन सेवेतील रोजगारावर असलेली मर्यादा देखिल विचारात घेणे आवश्यक आहे. अनुकंपा नियुक्ती योजनेनुसार अनुकंपा नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे असून प्रतिक्षासूचीतील उमेदवारांना वयाच्या ४५ वर्षापर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्यांची नावे वयाची ४५ वर्षे पूर्ण होताच आवश्यक ती नोंद घेऊन प्रतिक्षासूचीतून काढून टाकण्यात येतात. शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या पात्र कुटुंबीयांचे नाव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये घेतल्यानंतर प्रतिक्षासूचीवरील उमेदवाराचे निधन झाल्यास त्याच्याऐवजी त्याच्या कुटुंबातील अन्य पात्र उमेदवाराचे नाव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये घेण्यात येते. याव्यतिरिक्त अन्य कारणास्तव प्रतिक्षासूचीवरील उमेदवाराच्या जागी अन्य उमेदवाराचे नाव प्रतिक्षासूचीवर घेण्यात येत नाही.

अनुकंपा नियुक्तीचे प्रयोजन विचारात घेता तसेच कोवीड-१९ च्या पार्श्वभमीवर अनुकंपा नियुक्त्या जलदगतीने होण्यास सहाय्यभूत म्हणून अनुकंपा नियुक्तीची प्रमाणित कार्यपध्दती (SOP) दि.२६.०८.२०२१ च्या आदेशान्वये प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार अनुकंपा नियुक्तीची कार्यवही करण्याबाबत सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच अनुकंपा नियुक्ती जलद गतीने होण्यासाठी सर्व विभागीय आयुक्त यांची आढावा बैठक आयोजित करुन जिल्हानिहाय अनुकंपा नियुक्तीच्या आकडेवारीचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार सन २०२२ मध्ये अनुकंपा प्रतिक्षासूचीवरील गट-क च्या ९४० व गट-ड च्या ७८९ अशा एकूण १७२९ उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती देण्यात आली आहे. सद्य:स्थिती डिसेंबर, २०२२ अखेर अनुकंपा प्रतिक्षासूचीवर गट-क मध्ये ४,८३८ व गट-ड मध्ये ३,१५० असे एकूण ७,९८८ उमेदवार अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतिक्षासूचीवर आहेत. तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील पदभरतीकरीता सुधारित आकृतीबंध अंतिम झालेल्या विभागांना सरळसेवेची १००% पदे भरण्यास मुभा देण्यात आली व ज्या विभागांचा आकृतीबंध अद्याप अंतिम झालेला नाही त्यांना सरळसेवेची ८०% पदे भरण्यास शासन निर्णय, वित्त विभाग दि.३१.१०.२०२२ अन्वये मुभा देण्यात आली आहे. ही बाब विचारात घेता अनुकंपा नियुक्तीसाठी पदे उपलब्ध होवून अनुकंपा नियुक्तीची प्रतिक्षासूची काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.

****************

लक्षवेधी सूचना क्रमांक ८२७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्रीमती मनिषा चौधरी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८२७ पुढीलप्रमाणे आहे :-

"फुलशेती, फळशेती, कृषी पर्यटन इत्यादीसह कृषीसंबंधित उत्पादनांचा शेती (इतर) या गटामध्ये वर्गीकरण करून वाढीव दराने आकारणी केल्याने पालघर जिल्ह्यातील शेतकरी मेटाकुटीला आलेला असणे, अशा सर्व कृषीसंबंधित उत्पादनांना पूर्वापार कृषी गटाप्रमाणे वीज बिल आकारणी व्हावी यासाठी महावितरण कंपनीकडे शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने साकडे घालणे, महावितरण कंपनीने दिनांक ३ एप्रिल, २०२० परिपत्रकानुसार शेतीशी संलग्न अनेक उत्पादनांचा वीज दर शेती (इतर) या गटामध्ये वर्गीकरण केलेले असणे, त्यामुळे कृषी गटातील ग्राहकांना ३.७९ रुपये प्रति युनिट इतक्या होणाऱ्या वीज दर आकारणीऐवजी शेती (इतर) गटात पाच रुपये वीस पैशांनी आकारणी होऊ लागणे, विशेष म्हणजे राज्यात अनेक वीज मंडळांत हा निर्णय अमलात आलेला नसताना कोकणातील शेतकऱ्यांवर ही दरवाढ लादली गेली असणे, याकडे कंपनीचे लक्ष वेधण्यात येणे, जिल्ह्यातील शेतकरी हा पूर्ण वेळ फुलशेती, फळशेती करत नसणे, तर भात व इतर धान्यांच्या पिकांसोबत आंतरपीक म्हणून वेगवेगळया फुल, फळांची लागवड करत असणे, विशेष म्हणजे फुलशेतीला तसेच चिकू, केळी, आंबा व नारळ यांना इतर पिकांच्या तुलनेत खूप कमी प्रमाणात पाणी लागते, याकडे लक्ष वेधताना पाण्याची मोठी आवश्यकता असणाऱ्या ऊस पिकाकडे मात्र महावितरण कंपनीने नवीन वर्गीकरणात समाविष्ट केलेले नसणे, परिणामी सर्व कृषीसंबंधित उत्पादनांना पूर्वापार कृषी गटाप्रमाणे वीज बिल आकारणी करणेसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदीनुसार मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वर्गवारी व त्यांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय वीजदर) विनियम, २०१९ नुसार एकुण महसुलाची गरज व त्याचप्रमाणात वीजदर ठरवून मिळावेत याकरीता मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे वितरण कंपनीतर्फे प्रस्ताव सादर करावा लागतो. या प्रस्तावाची मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून पडताळणी झाल्यानंतर वर्तमानपत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करण्यात येते. त्यानंतर मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगातर्फे राज्यातील महसुली मुख्यालयांच्या ठिकाणी जाहिर सुनावणी घेण्यात येते. ग्राहकांनी उपस्थित केलेल्या सुचना/हरकती/ अभिप्राय विचारात घेउन व संपूर्ण नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगातर्फे वीज दराबाबत निर्णय घेण्यात येतो.

मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. ३० मार्च, २०२० रोजी 'आर्थिक वर्ष २०२०-२१ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी (प्र.क्र. ३२२/२०१९) बहुवर्षिय वीजदर आदेश निर्गमित केलेले आहेत. त्या अनुषंगाने सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याकरीता महावितरण कंपनीने दि.०३ एप्रिल, २०२० च्या परिपत्रकान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना निर्देशित केले आहे.

माहे जून, २०१५ पूर्वी मा. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांनी वेळोवेळी निर्धारीत केलेल्या वीजदर आदेशामध्ये कृषी तथा कृषी पुरक कारणांसाठी "कृषी" ही एकच वर्गवारी लागू होती. मा. महाराष्ट्र

विद्युत नियामक आयोगाने वीज दर आदेश क्र. १२१/२०१४ दि.२६ जुन, २०१५ नुसार फलोत्पादन, फुल शेती, रोपवाटिका (नर्सरी), वृक्षारोपण, मत्स्यपालन, रेशीम शेती, पशुपालन फार्म इत्यादी कारणांसाठी वापरात असलेल्या वीज वापरांची वर्गवारी "कृषी-इतर" मध्ये समाविष्ट केली आहे. त्यानुषंगाने सन २०१५ पासून सदर ग्राहकांना "कृषी-इतर" वर्गवारी लागू करण्यात आलेली आहे.

कृषी या वर्गवारीमध्ये मध्ये कृषी मीटर असलेले व मीटर नसलेल्या कृषी ग्राहकांचा यामध्ये समावेश आहे. सदर वीज वापर हा शेतीपंपाकरीता व पंप हाऊस मधील ४० वॅट पर्यंतच्या बल्बच्या वापराकरीता आहे.

कृषी- इतर या वर्गवारी मध्ये कृषी संबंधीत इतर घटकांसह फलोत्पादन, फुल शेती, रोपवाटिका (नर्सरी), वृक्षारोपण, मत्स्यपालन, रेशीम शेती, पशुपालन फार्म इत्यादी घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

सदर आदेशान्वये आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू इ. फळपिके घेणाऱ्या बागांना म्हणजेच फलोत्पादनाकरीता वीज वापर असलेल्या ग्राहकांना "कृषी इतर" या वर्गवारीत समावेश करण्यात आला असून त्यानुसार वीज दर आकारणी करण्यात येत आहे.

मा. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाकडे मध्यावधी आढावा याचिका (आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२२-२३ करीता समायोजन व आर्थिक वर्ष २०२३-२४ ते २०२४-२५ करीता वीजदर सुधारणा) सादर करण्यात आली आहे. सदर याचिकेमध्ये फळशेतीचे वर्गीकरण करण्याबाबत सुस्पष्टता द्यावी अशी विनंती करण्यात आलेली आहे.

पालघर जिल्ह्यात फेब्रुवारी, २०२३ अखेर एकूण १४१७९ शेतीपंप व ६१६४ शेती- इतर दर संकेत असलेले वीज ग्राहक आहेत.

******************

लक्षवेधी सूचना क्रमांक १२५२

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्री. भास्कर जाधव, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १२५२ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील अन्य फळपीक उत्पादक जिल्हयांमध्ये शेती व कृषी पंपांची वर्गवारी ही 'कृषी' गटामध्ये असताना केवळ रत्नागिरी जिल्हयातील शेती व कृषी पंपांची वर्गवारी ही 'अकृषीक' गटामध्ये करण्यात आलेली असणे, परिणामी, जिल्हयातील आंबा, काजू, फणस, नारळ, सुपारी बागायतदार, रोपवाटिका व्यवसायिक यांच्या शेती, कृषीपंपाची वीजबिले आधी येणाऱ्या बिलांपेक्षा चारपटीने जास्त येत असणे, सदर भरमसाठ बिलांची महावितरण कंपनीकडून जबरदस्तीने वसुली केली जात असणे आणि बिले न भरल्यास वीज खंडीत करण्याचे प्रकार सुरू असणे, त्यामुळे शेतकरी, बागायदारांमध्ये प्रचंड निराशेचे आणि संतापाचे वातावरण असणे, गेल्या काही वर्षात निसर्ग, तौक्ते यासारखी एकापाठोपाठ एक झालेली मोठी वादळे, सतत होणारा अवकाळी पाऊस यामध्ये जिल्हयातील बागायतदार अक्षरशः मेटाकुटीस आलेला असणे, बदलत्या नैसर्गिक वातावरणाचा सतत बसणारा फटका, त्यात शासनाने शेती व कृषी पंपांची वर्गवारी ही 'कृषी' गटामध्ये केल्याने तब्बल चारपटीने जास्त येणारी बिले, यामुळे जिल्हयातील बागायतदार, शेतकरी व संबंधित व्यवसायिकांपुढे मोठे संकट उभे राहिले असून बागायती करायच्या कशा, असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण होणे, केवळ रत्नागिरी जिल्हयातील बागायतदारांच्या बाबतीत लावण्यात आलेला हा निकष अत्यंत अन्यायकारक असणे, तो तात्काळ रद्द करण्यात यावा, या गंभीर विषयाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

राज्यातील वीज ग्राहकांची वर्गवारी व वीजदर हे मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगातर्फे नियामक प्रक्रीया राबवून निश्चित करण्यात येतात व त्याप्रमाणे वीज वापराच्या वर्गवारीनुसार वीज दरांची आकारणी महावितरणतर्फे करण्यात येते. माहे जून, २०१५ पूर्वी मा. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांनी वेळोवेळी निर्धारीत केलेल्या वीजदर आदेशामध्ये कृषी तथा कृषी पुरक कारणांसाठी "कृषी" ही एकच वर्गवारी लागू होती. मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीज दर आदेश क्र. १२१/२०१४ दि.२६ जून, २०१५ नुसार फलोत्पादन, फुल शेती, रोपवाटिका (नर्सरी), वृक्षारोपण, मत्स्यपालन, रेशीम शेती, पशुपालन फार्म इत्यादी कारणांसाठी वापरात असलेल्या वीज वापरांची वर्गवारी "कृषी-इतर" मध्ये समाविष्ट केली आहे. त्यानुषंगाने सन २०१५ पासून सदर ग्राहकांना "कृषी-इतर" वर्गवारी लागू करण्यात आलेली आहे.

कृषी या वर्गवारीमध्ये मध्ये कृषी मीटर असलेले व मीटर नसलेल्या कृषी ग्राहकांचा यामध्ये समावेश आहे. सदर वीज वापर हा शेतीपंपाकरीता व पंप हाऊस मधील ४० वॅट पर्यंतच्या बल्बच्या वापराकरीता आहे.

कृषी-इतर या वर्गवारी मध्ये कृषी संबंधीत इतर घटकांसह फलोत्पादन, फुल शेती, रोपवाटिका (नर्सरी), वृक्षारोपण, मत्स्यपालन, रेशीम शेती, पशुपालन फार्म इत्यादी घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

सदर आदेशान्वये आंबा, काजू, नारळ, सुपारी, चिकू इ. फळपिके घेणाऱ्या बागांना म्हणजेच फलोत्पादनाकरीता वीज वापर असलेल्या ग्राहकांना "कृषी इतर" या वर्गवारीत समावेश करण्यात आला असून त्यानुसार वीज दर आकारणी करण्यात येत आहे.

(कृ.मा.प.)

महावितरण हा स्वतः सुध्दा एक ग्राहक असून ज्यास वीज खरेदी करावी लागते. तसेच पायाभुत सोयीसुविधांची देखभाल व दुरुस्ती करावी लागते. महानिर्मिती, महापारेषण व इतर कंपन्या त्यांच्या देयकात महावितरणला कोणतीही माफी किंवा सवलत देत नाही.

जे ग्राहक देय दिनांकापर्यंत वीज देयकाचा भरणा करत नाहीत, अशा ग्राहकांना मोबाइल SMS देयक भरणा करण्यासंदर्भात आवाहन करण्यात येते. महावितरणच्या स्थानिक कर्मचाऱ्यांद्वारे ग्राहकास वीज देयक भरणा करण्याबाबत वारंवार तोंडी सूचना दिल्या जातात. त्यानंतर विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ५६ (अ) अन्वये ग्राहकास नोटीस दिली जाते. नोटीस कालावधी संपल्यानंतरही ग्राहकाने वीज देयकाचा भरणा न केल्यास नाईलाजाने विद्युत खंडीत केला जातो.

रत्नागिरी जिल्ह्यातील कृषी (इतर) वर्गवारी असणाऱ्या एकूण ४५२३ चालु ग्राहकांपैकी १४२७ इतक्या ग्राहकांकडे रु.८५.५२ लाख रकमेची थकबाकी असून, त्यापैकी माहे जानेवारी, २०२३ पासून रत्नागिरी जिल्हा अंतर्गत थकबाकी पोटी कृषी (इतर) वर्गवारीतील कोणत्याही ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत ठेवण्यात आलेला नाही.

सद्यस्थितीत शेतकऱ्यांचे या वर्षी अतीवृष्टीमुळे झालेले नुकसान व सध्या सुरु असलेला रब्बी हंगाम विचारात घेऊन मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांनी दिलेल्या निर्देशानुसार कृषीपंप ग्राहकांचा वीज पुरवठा चालू बिल किंवा थकबाकी वसुलीकरीता तसेच इतर कोणत्याही कारणास्तव पुढील आदेशापर्यंत खंडीत करण्यात येऊ नये असे निर्देश महावितरणच्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना त्यांच्या दि.१०.१२.२०२२ च्या पत्रान्वये देण्यात आलेले होते. परंतु "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" अंतर्गत अनेक सवलती देऊनही दिवसेंदिवस कृषी ग्राहकांचे वीज देयक भरण्याचे प्रमाण कमी होत असल्यामुळे महावितरणची कृषी ग्राहकांची एकूण थकबाकी वाढत रु.४८,६८९ कोटी पर्यंत पोहोचली आहे. त्यामध्ये मागील ५ वर्षांपासून १५,२३,४२६ कृषी ग्राहकांनी एकही वीज देयक भरले नसल्यामुळे त्यांची थकबाकी रु.२१,१०२ कोटी झाली आहे. त्यामुळे महावितरणची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली असल्याकारणाने कृषी ग्राहकांनी किमान चालू वीज देयक भरणा करुन महावितरणला सहकार्य करणे अपेक्षित आहे.

मा. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाकडे मध्यावधी आढावा याचिका (आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२२-२३ करीता समायोजन व आर्थिक वर्ष २०२३-२४ ते २०२४-२५ करीता वीजदर सुधारणा) सादर करण्यात आली आहे. सदर याचिकेमध्ये फळशेतीचे वर्गीकरण करण्याबाबत सुस्पष्टता द्यावी अशी विनंती करण्यात आलेली आहे.

******************

4182-19

लक्षवेधी सूचना क्रमांक २००५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्री. अभिमन्यु पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २००५ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यात एप्रिल, २०१८ नंतर आजतागायत हजारो शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतीतील वीज पंपासाठी अर्ज करून डिमांड भरले असणे, सदरील शेतकरी यांना स्वखर्चाने वीज जोडणी घेण्याबाबत व त्यासाठी लागणारा पोल वायर व इतर साहित्य घेण्याबाबत महावितरण विभागाकडून सांगण्यात येणे, ज्यांची आर्थिक क्षमता नाही असे शेतकरी स्वखर्चातून वीज जोडणी साठी लागणारा प्रचंड खर्च करू शकत नसल्याने आजतागायत वीज जोडणीच्या प्रतीक्षेत असणे, गेली चार ते पाच वर्षापासून शेतकऱ्यांना वीज जोडणी मिळाली नसल्याने शेतात विहीर व विंधन विहीर यांना पाणी असतानाही ते पिकांना देता ण आल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असणे, औसा विधानसभा मतदारसंघात जवळपास सर्वच गावातील शेतीपंपाचे रोहित्र हे ओव्हर लोड झाल्याने शेतकऱ्यांना योग्य दाबाने वीज पुरवठा होत नसणे, ओव्हर लोड रोहित्र सातत्याने नादुरुस्त होणे, महिनोमहिने वीजपुरवठा खंडित राहत असल्याने शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे नुकसान होत असणे, अनेक उपकेंद्रातील रोहित्र हे ओव्हर लोड असल्याने नवीन उपकेंद्र व उपकेंद्राच्या रोहित्राची क्षमता वाढ करण्याबाबत RDS योजना अंतर्गत या कामांना मंजुरी दिलेली असणे, परंतु उपकेंद्र मंजूर होऊन अनेक वर्ष झाली असतानाही उपकेंद्राच्या कामासाठी निधीची तरतूद झालेली नसणे, गावठाण फिडर सेपरेशन करण्याची कार्यवाही प्रलंबित असणे, पोल व तारा ह्या जुन्या व जीर्ण झाल्याने व आयुष्मान संपल्याने बदलण्याची आवश्यकता असणे,गावोगावी असलेले रोहित्राची दुरुस्ती दरवर्षी होत नसणे, अनेक रोहीत्र उघडे असणे, कीटक्याट सह केबल व इतर साहित्य महावितरण विभागाकडून पुरवठा केला जात नसणे,ऑईल संपले या कारणाखाली रोहित्र महिनो महिने दुरुस्त करून वीजपुरवठा सुरु केला जात नसणे, घरावरून गेलेल्या लाईन, वाकलेली पोल, झोल झालेल्या लाईन, घराला चिकटलेल्या लाईन यामुळे जीवित व वित्त हानीचा धोका होण्याची शक्यता निर्माण झाली असणे,महावितरण चे अधिकारी कर्मचारी मुख्यालयी राहत नसणे, ग्राहकांच्या तक्रारीची दखल तत्परतेने घेतली जात नसणे, परिणामी शेतकऱ्यांत तीव्र नाराजीची भावना निर्माण झाली असणे, राज्यातील वीज जोडणीसाठी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना महावितरण विभागाकडून त्वरित वीज जोडणी देण्यासाठी तसेच मागेल त्या शेतकऱ्यांना वीज जोडणी व योग्य दाबाने वीज पुरवठा करण्यासाठी राज्यशासनाने योजना राबविण्याबाबत व त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत आणि वीज ग्राहकांचे प्रलंबित प्रश्न तत्परतेने निकाली काढण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

राज्यात दि. ०१ एप्रिल, २०१८ पासून पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित असलेल्या कृषीपंप अर्जदारांना वीज जोडणी देण्याकरिता शासनाने "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" दि.१८.१२.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केले आहे.

सदर धोरणानुसार नवीन कृषीपंप वीज जोडणीकरिता आवश्यकतेनुसार सर्व्हिस वायरद्वारे, लघुदाब वाहिनी पासुन २०० मीटर अंतरापर्यंत लघुदाब वाहिनीवर एरियल बंच केबलद्वारे, उच्चदाब वाहिनी पासुन ६०० मीटर पर्यंत अंतर असणाऱ्या कृषी पंपांना उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे वीज पुरवठा करण्यात येत आहे.

शेदा - एच - ००८५ (७५० - ४ - २३)

तसेच उच्चदाब वाहिनी पासुन ६०० मीटर पेक्षा जास्त अंतर असणाऱ्या कृषीपंपांना सौर ऊर्जेद्वारे वीज पुरवठा करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत लघुदाब वाहिनीपासून २०० मिटरपर्यंत अंतर असणाऱ्या कृषीपंपांना महावितरण स्वनिधीतून वीज जोडण्या देत आहे. परंतु सुरुवातीस ग्राहकांना स्वखर्चाने पायाभुत सुविधा उभारावयाच्या आहेत. सदर खर्चाचा परतावा त्या ग्राहकाच्या वीज बिलातुन करण्यात येत आहे. अन्यथा महावितरणद्वारे निधी उपलब्धतेनुसार अर्जदाराच्या पैसे भरण्याच्या दिनांकाच्या क्रमवारीनुसार वीज पुरवठा करण्यात येत आहे.

सदर योजनेअंतर्गत अर्जदाराने स्वेच्छेने त्याच्या कृषीपंप वीज जोडणीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारल्यास, त्या पायाभूत सुविधांचा खर्च ग्राहकाच्या पुढील वीज बिलातून समायोजित करण्याची तरतुद असल्याने या खर्चाचा कृषी ग्राहकावर कुठलाही अतिरिक्त बोजा पडत नाही. सदर बाब ही ऐच्छिक असून कृषी ग्राहकांवर बंधनकारक नाही. जर अर्जदाराची यासाठी आर्थिक कुवत नसेल तर अशा अर्जदारांना First Come First Serve Basis वर ज्येष्ठता यादीनुसार व आर्थिक तरतुदीनुसार वीज जोडणी देण्यात येते. अशा कृषीपंप अर्जदारांना कृषी आकस्मिकता निधीमधून वीज जोडणी देण्यात येत आहे.

सदर धोरणांतर्गत उच्चदाब वाहिनीपासुन ६०० मीटर पर्यंत अंतर असणाऱ्या कृषी पंपांना उच्चदाब वितरण प्रणालीद्वारे वीज पुरवठा करण्याकरिता वीज जोडणी व अनुषांगिक पायाभुत सुविधा उभारण्याकरिता वार्षिक रु.१५०० कोटी इतके भागभांडवल शासनाद्वारे महावितरण कंपनीस देण्याची मंजूरी देण्यात आली आहे. सन २०२१-२२ करिता तयार करण्यात आलेल्या रू. १५०० कोटीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी देण्यात आली असून सर्वसाधारण घटकांकरिताच्या भागाकरिता रू. ५०० कोटी वितरित करण्यात आले असून उर्वरित रक्कम वितरणाची कार्यवाही सुरू आहे. तसेच सन २०२२-२३ च्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देण्याचेही नियोजित आहे.

महावितरणमार्फत सन २०१७-२०१८ पासुन दि. ०४ मार्च, २०२३ पर्यंत कृषीपंपांना विविध योजनेअंतर्गत ६.२१ लक्ष नवीन वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत.

सद्यस्थितीत कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० मधील थकीत कृषीपंप धारकाकडून जमा झालेले रु. १०८१ कोटी इतका निधी कृषी आकस्मिकता निधीमध्ये उपलब्ध असून त्यापैकी ग्रामपंचायत स्तरावर एकूण निधीच्या ३३% इतका निधी उपलब्ध आहे. तसेच जिल्हास्तरीय कृषी आकस्मिकता निधी मधुन एकूण १२२ नवीन उपकेंद्र, २४ उपकेंद्रातील रोहीत्राची क्षमता वाढ व ९७ उपकेंद्रांमध्ये अतिरिक्त रोहीत्र आस्थापित करणे इत्यादी कामांना मंजुरी देण्यात आली असून जिल्हा स्तरावर आतापर्यंत एकुण ३२३ कोटी रूपयांचे कार्यादेश (LOA) देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध असलेल्या कृषी आकस्मिकता निधी मधुन एकूण रू. ५३० कोटी रूपयांचे कार्यादेश (LOA) देण्यात आले आहेत. ही सर्व कामे सध्या प्रगतीप्रथावर आहेत.

औसा उपविभागामध्ये दि. ०१ एप्रिल, २०१८ नंतरच्या २५४४ वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. तसेच ७३३ वीज जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहे व उर्वरित १६०९ वीज जोडण्या कृषी आकस्मिक निधीच्या उपलब्धतेनुसार देण्यात येत आहेत.

औसा उपविभागामध्ये शेतकऱ्यांना योग्य दाबाने वीज पुरवठा करणे व रोहित्रांचे ओव्हरलोडींग कमी करण्यासाठी "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" अंतर्गत व जिल्हा नियोजन निधी अंतर्गत एकुण २७२ ठिकाणी अतिरीक्त रोहीत्र व रोहीत्र क्षमता वाढ ही कामे करण्यात आली असुन, सुधारीत वितरण क्षेत्र

योजनेअंतर्गत (RDSS) एकुण २३२ ठिकाणी अतिरीक्त रोहीत्र व रोहीत्र क्षमतावाढ प्रस्तावित करण्यात आली आहे. ३३/११ केव्ही क्षमेतेचे ३ नविन उपकेंद्रे, ६ उपकेंद्रांमध्ये नविन अतिरीक्त रोहीत्र (५ MVA Power Transformer) व एका उपकेंद्रामध्ये (Power Transformer) क्षमतावाढ तसेच गावठाण फीडर सेपरेशनची कामे मंजुर करण्यात आली आहेत. या शिवाय, "कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०" अंतर्गत माळुंब्रा येथे नवीन ३३/११ के.व्ही उपकेंद्र (1X५ MVA) मंजुर करुन त्याची ई-निविदा प्रक्रिया सुरु आहे.

RDSS योजने अंतर्गत लातूर मंडळामध्ये "वितरण प्रणालीतील हानी कमी करणे" यासाठी रु. ७४५.८५ कोटी, वितरण प्रणालीचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण या कामासाठी रु. ४२१.०९ कोटी व स्मार्ट मिटरसाठी रु. २४३.०३ कोटी अशी एकुण रु.१,४०९.९७ कोटी रुपयांची कामे प्रस्तावित आहेत. त्यापैकी "वितरण प्रणालीतील हानी कमी करणे" व स्मार्ट मिटरींग साठी निविदा प्रसिद्ध केली आहे व कार्यादेश देण्याचे काम सूरु आहे. तसेच लातूर मंडळा अंतर्गत फीडर सेपरेशन कामासाठी रु.३८४.८१ कोटी ची निविदा प्रसिद्ध केली आहे व कार्यादेश देण्याचे काम सुरू आहे. सदर निविदेमध्ये लातूर विभागा मधील १२२ फीडर्स, निलंगा विभागा मधील १०८ फीडर्स व उदगीर विभाग मधील १२१ फीडर्स ची कामे समाविष्ट आहेत. तसेच RDSS योजने मधील "विद्युत प्रणाली आधुनिकीकरण" कामामध्ये लातूर मंडळात एकूण १६ उपकेंद्रे, १५ ठिकाणी अतिरिक्त उपकेंद्र रोहित्र बसविणे व १२ ठिकाणी रोहित्र क्षमतावाढ करणे ही कामे प्रस्तावित आहेत. सदर कामाची मंजुरी प्रकिया सुरु आहे.

निलंगा विभागासाठी RDSS योजनेमध्ये "वितरण प्रणालीतील हानी कमी करणे" अंतर्गत रू. २८१.९५ कोटी ची कामे प्रस्तावित आहेत. तसेच वितरण प्रणालीचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण या कामासाठी रु.९२.५६ कोटी, स्मार्ट मिटरसाठी रु.५७.६९ कोटी अशी एकुण ४३२.२० कोटी रुपयांची कामे प्रस्तावित आहेत.

औसा उपविभागामधील घरावरुन गेलेल्या विद्युत वाहिनीचे स्थलांतरित करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुचवलेली कामे DPDC योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सन २०२१-२०२२ मध्ये पुर्ण करण्यात आलेली आहेत. नैसर्गिक आपत्ती व तांत्रिक बिघाडामुळे वीज पुरवठा खंडीत झाल्यास महावितरण मधील कर्मचाऱ्यांमार्फत व आवश्यकतेनुसार सूचीबद्द कंत्राटदारांच्या मदतीने वीज पुरवठा कमीत कमी वेळेत पुर्ववत करण्यात येतो.

लातूर मंडळात सन २०२२-२३ साठी देखभाल व दुरुस्तीच्या कामांकरीता रु. १९.३७ कोटी इतका निधी आहे व त्यापैकी रु. १६.३७ कोटी इतका खर्च करण्यात आला असून रु. ३.०० कोटी इतका निधी उपलब्ध आहे.

निलंगा विभागातील देखभाल व दुरुस्तीची कामे मे, २०२२ पासून १० सुचीबद्ध ठेकेदारांकडुन करुन घेण्यात आलेली आहेत. सदरील कामासाठी खर्च रु ५४.१० लक्ष झालेला आहे. त्याअंतर्गत २०३ लघुदाब वाहीनींच्या तारांचा झोळ काढणे व झुकलेले पोल सरळ करणे, १७९ मोडलेले पोल बदलणे, ११६ उच्चदाब वाहिन्यांच्या तारांचा झोळ काढणे व झुकलेले पोल सरळ करणे, ४९ उपकेंद्रातील दुरुस्तींची कामे, २७ ए बी स्वीच दुरुस्तीची कामे करणे व बदलणे, ७८ कीटकॅट व जळालेले केबल व लग्ज बदलणे, २४ रोहीत्रांचे अर्थिंग बदलणे, २७९ नादुरुस्त झालेल्या रोहीत्रांची वाहतुक करणे इत्यादी कामे करण्यात आली आहेत.

निलंगा विभागातील काम करणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांना मुख्यालयाच्या ठिकाणी राहण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याची पडताळणी वरीष्ठ कार्यालयाकडून वेळोवेळी केली जाते.

पडताळणीच्या वेळी मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नसल्याचे आढळून आलेल्या एकूण ०७ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात येवुन त्यांचेवर शिस्तभंग कारवाईची प्रक्रिया चालु आहे.

निलंगा विभागातील औसा उपविभागामध्ये कृषी पंपाचे ५९३० रोहीत्रे आहेत. त्यापैकी सन २०२२-२३ मध्ये (दि.०१.०४.२०२२ ते ०१.०३.२०२३ पर्यंत) ८३० रोहीत्रे नादुरुस्त झाली होती. त्यापैकी ८१७ रोहीत्रे वेळेत बदलली आहेत व उर्वरीत १३ रोहीत्रे बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

सन २०२२-२३ मध्ये दि.२८.०२.२०२३ पर्यंत लातूर जिल्ह्यासाठी ३६१ किलोलिटरचा ऑईलचा साठा उपलब्ध करुन देण्यात आला. सद्स्थितीत ३२ किलोलिटर ऑईलचा साठा लातूर मंडळाच्या क्षेत्रिय भांडारामध्ये शिल्लक आहे. तसेच सन २०२२-२३ मध्ये दि. २८.०२.२०२३ पर्यंत निलंगा विभागातील नादुरुस्त रोहीत्रा साठी १३५.३२ किलो लिटर ऑईल प्राप्त झाले असुन उपलब्ध झालेल्या ऑईल नुसार १३५० रोहीत्र बदलण्यात आली आहेत.

*******************

लक्षवेधी सूचना क्रमांक २०२०

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्री. धर्मरावबाबा आत्राम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २०२० पुढीलप्रमाणे आहे :-

"अहेरी, सिरोंचा, ऐटापल्ली, भामरागड व मुलचेरा तालूका (जि.गडचिरोली) अतिदुर्गम, ग्रामीण, जंगलाने व्याप्त व नक्षलग्रस्त भाग असणे, येथील नागरीक ग्रामीण भागातील असल्यामुळे विजेचा कमी प्रमाणात वापर होत असणे, परंतू या विभागात महावितरण कंपनीकडून हजारों नागरीकांना १ लक्ष पर्यंत विजेचे बिल येत असल्याची बाब निदर्शनात येणे, याबाबत नागरीकांकडून अनेकदा विज वितरण कंपनीकडे तक्रार करुनसुध्दा यामध्ये सुधारणा न होण्याची गंभीर बाब समोर येणे, विजेचे बिल न भरल्यामुळे नागरीकांना विजेचे कनेक्शन कापण्याबाबत वारंवार धमक्या मिळणे, विज वितरण कंपनी कडून नागरीकांना विजेचे बिल भरण्याबाबत दबाब टाकण्यात येणे, त्यामुळे बिनाकारण नागरीकांना मानसीक त्रास होणे, परिणामी जनतेत विज वितरण कंपनी बद्दल तिव्र नाराजी पसरल्याचे चित्र निदर्शनात येणे, याबाबत दोषी अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्याकरीता आंदोलन करण्याची स्थानीक जनतेची सततची होत असलेली मागणी, यामध्ये सुधार करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महावितरण, ग्राहकास त्याच्या मिटर वापराप्रमाणे वीज देयक देण्यास कटीबध्द आहे. महावितरणच्या ग्राहकांचे मिटर वाचन करण्याकरीता उपविभागीय स्तरावर ई- निवेदेद्वारे कंत्राट देण्यात येते. सदर कंत्राटदारांनी मोबाईल ॲपद्वारे ग्राहकाच्या प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन मीटरचा फोटो व मिटरचे अचूक रिडींग घेणे अपेक्षित असते. महावितरणच्या मोबाईल ॲपद्वारे दरमहा मिटर वाचन करण्यात येत असलेल्या ग्राहकांची संख्या एकूण २.३६ कोटी इतकी आहे. महावितरणच्या अहेरी, सिरोंचा, ऐटापल्ली, भामरागड व मुलचेरा तालूका (जि. गडचिरोली) हा अतिदुर्गम भाग आहे. येथील घरगुती वीज ग्राहकांचा मासिक वापर हा सरासरी ४० ते ५० युनिट असा आहे. हा भाग ग्रामीण, जंगलाने व्याप्त व नक्षलग्रस्त आहे. या भागात पावसाळ्यात संपूर्ण व्यवस्था कोलमडून जाते व अतिदुर्गम भागातील रस्ते सुध्दा वाहून जातात त्यामुळे काही वेळा ग्राहकांच्या प्रत्यक्ष मिटर वाचनामध्ये अडथळे येतात.

आलापल्ली व मुलचेरा उपविभागाअंतर्गत असलेली मे. श्री इलेक्ट्रीकल्स ही रिडींग एजन्सी डिसेंबर, २०१९ पासून कार्यरत होती. तसेच एटापल्ली व भामरागड उपविभागाअंतर्गत मे. विजय इलेक्ट्रीकल्स ही रिडींग एजन्सी ऑगस्ट, २०२१ पासून कार्यरत होती. या दोन्ही एजन्सीजचे मार्च, २०२२ अखेरीस रिडींग घेण्याचे प्रमाण ५० ते ६०% इतकेच होते. त्यामुळे ग्राहकांना सरासरी वीज वापराचे वीज देयक निर्गमित होऊन ग्राहकांच्या तक्रारींमध्ये वाढ झालेली होती. त्यामुळे वरील नमूद दोन्ही रिडींग एजन्सीज यांचे कार्यादेश रद्द करुन सदर दोन्ही एजन्सीजचे मिटर रिडींगचे कंत्राट दि. २६.०४.२०२२ ला रद्द करण्यात आले व नवीन रिडींग एजन्सी मे. शिवम इलेक्ट्रीकल्स यांची दि. २१.०४.२०२२ रोजी नेमणूक करण्यात आली.

जुन्या एजन्सीने मिटर वाचन व्यवस्थित न केल्यामुळे तेथील ग्राहकांना कित्येक महिन्यांपासून कमी वापराची वीज देयके निर्गमित होत होती. परंतू सदर ग्राहकांचा प्रत्यक्ष वीज वापर देण्यात आलेल्या देयकापेक्षा कित्येक पटीने जास्त होता. त्यामुळे नवीन मिटर रिडींग एजन्सीने अचुक रिडींग घेतल्या नंतर सदर ग्राहकांचे संचित युनिटचे वीज देयक तयार झाले. सदर वीज देयक योग्य / संचित महिन्यांमध्ये विभागणी करुन त्यानुसार वीज आकारणी करण्यात

आली आहे व सरासरी वीज देयकाची भरणा करण्यात आलेली रक्कम वजा करुन सुधारित वीज देयके निर्गमित करण्यात आली आहेत.

वरील नमूद केलेल्या उपविभागाअंतर्गत एकूण ९०,९४३ ग्राहक असून त्यांना आर्थिक वर्ष- २०२२-२३ (आजपर्यंत) १०,००,३७३ वीज देयके देण्यात आलेली आहे. त्यापैकी वीज देयक रु.५० हजारापेक्षा जास्त असलेले ४१४ देयके आहेत व त्यापैकी ३३५ ग्राहकांची वीज देयक दुरुस्ती करण्यात आली आहे व १६३ ग्राहकांनी वीज देयकाचा भरणा केलेला आहे. उर्वरीत ग्राहकांना वीज देयक सविस्तरपणे समजावून सांगण्यात आले आहेत. सदर ग्राहकांना सुधारित वीज देयके सुलभ हप्त्याने भरण्याची सुध्दा मुभा देण्यात आलेली आहे. जे ग्राहक वीज देयकाचा भरणा करीत नाहीत त्या ग्राहकांशी कंपनीच्या नियमानुसार वीज देयक भरण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. सद्यस्थितीत आलापल्ली विभागाअंतर्गत ८२ वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत आहे.

तसेच सदर प्रकरणात महावितरणचे एकूण तीन सहाय्यक लेखापाल व दोन उच्चस्तर लिपिक यांनी कामात दुर्लक्ष केल्यामुळे व मिटर रिडींग एजन्सीच्या कामावर योग्य नियंत्रण न ठेवल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याकरिता विभागीय चौकशीची प्रक्रिया दि. १६.०३.२०२३ च्या आदेशानुसार सुरु करण्यात आली आहे.

महावितरणद्वारे ग्राहकाला स्वतःचे मिटर वाचन मोबाईलद्वारे नोंद करण्याची सुविधा पूर्वी पासूनच उपलब्ध करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे रिडींग एजन्सीने घेतलेल्या मीटर वाचनाची माहिती मोबाईल संदेशाद्वारे ग्राहकाला कळविण्यात येते. एजन्सीने घेतलेल्या रिडींगबाबत ग्राहक सहमत नसल्यास ग्राहकास मोबाईल ॲपद्वारे मीटर वाचन महावितरणला कळविण्याची सुविधा उपलब्ध आहे.

ग्राहकाला त्याच्या वीज देयकाची माहिती SMS द्वारे देण्यात येते. ग्राहकाला वीज देयकासंदर्भात कोणतीही तक्रार असल्यास त्या ग्राहकाला उपविभागीय कार्यालय, महावितरणचे वेबसाईट, मोबाईल ॲप इत्यादी ठिकाणी तक्रार नोंदविण्याचे पर्याय उपलब्ध आहेत. प्राप्त झालेल्या तक्रारीचे त्वरित निरसन करण्यात येते. ग्राहकांना अचुक वीज देयक देण्याबाबत महावितरणद्वारे सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

*******************

H183 - 19

गृह विभाग

## लक्षवेधी सूचना

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ६४ पुढीलप्रमाणे आहे:-

"व्हिसाची मुदत संपल्यानंतर देखील मुंबईत बेकायदा वास्तव्य करणा-या परदेशी नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात असून ६०% गुन्हे हे त्यांच्याकडून घडत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये बेकायदा वास्तव्य करणा-या परदेशी नागरिकांसाठी डिटेन्शन सेंटर सुरु करण्याचा प्रस्ताव सादर झाला असणे, परंतु, सदर योजना प्रत्यक्षात आली नसणे, त्यामुळे सदर प्रस्तावावर निर्णय घेण्याची गरज असून लवकरात डिटेन्शन सेंटर सुरू करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

राज्यातील विविध ठिकाणी अनधिकृत व्हिसा / दस्तऐवजाशिवाय अनेक विदेशी नागरिक वास्तव्य करीत असून त्यांच्याकडून मोठया प्रमाणात गुन्हे घडत असल्याचे निदर्शनास आलेले नाही. व्हिसाची मुदत समाप्त झालेले तसेच गुन्हा शाबित झाल्यानंतर कारागृहातून शिक्षा भोगून मुक्त झालेले विदेशी नागरिक यांना त्यांच्या मायदेशात परत पाठविणे आवश्यक असते. तथापि, अशा विदेशी नागरिकांना त्यांच्या मायदेशात परत पाठविण्यासाठी प्रवासाचे दस्तऐवजाची पूर्तता करण्यासाठी काही कालावधी लागतो. सदर कालावधीमध्ये विदेशी नागरिकांना स्थानबध्द करण्यासाठी स्थानबध्दता केंद्र स्थापन करणे आवश्यक आहे. व्हिसाची मुदत समाप्त झालेल्या तसेच शिक्षा भोगून मुक्त झालेल्या विदेशी नागरिकांना ठेवण्यासाठी स्थानबद्धता केंद्र राज्यात नसल्याने सदर केंद्र स्थापन करण्याबाबत विचार विनिमय सुरु आहे. कायमस्वरुपी स्थानबद्धता केंद्रासाठी जागा निश्चित करुन ते स्थापन करण्यासाठी काही कालावधी लागू शकतो ही बाब विचारात घेवून तात्पुरत्या स्वरुपातील स्थानबद्धता केंद्र स्थापन करण्याबाबत विचार करण्यात येत आहे. तात्पुरत्या स्वरुपातील स्थानबद्धता केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून शासनास प्राप्त झाला असून कार्यवाही सुरु आहे.

**********

रोटे H/0061 (800-4-23)

गृह विभाग

विशा ३/अ

## लक्षवेधी सूचना क्र.१३८९

## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

मा.श्री.अबू आजमी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३८९ पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्रातील मानखुर्द शिवाजीनगर तसेच भिवंडी शहरातील तरूण वर्ग अंमली पदार्थाच्या आहारी जाणे. भिवंडी शहारात गोरगरिब नागरिक मोठ्या प्रमाणावर राहत असणे. भिवंडी शहर पावरलूम शहर असल्यामुळे इतर स्थलांतरित व अस्थलांतरित असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर कामगार वर्ग वास्तव्यास असणे. तसेच राहणीमाणाचा दर्जा खालावालेला असल्यामुळे तरूणवर्ग ( विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, शालेय शिक्षण न घेणारे विद्यार्थी ) मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थाच्या आहारी गेलेला असणे. येथील तरूणवर्ग हिरॉईन, कोकेन, आदी. या अंमली पदार्थाचे सेवन करत नसून डॉक्टरांच्या विनापरवानगी मेडिकल स्टोअर्स मधून सहज उपलब्ध होणारी औषधे. उदा. कफ सिरप, आयोडॅक्स, यांच्या आहारी जाणे. तसेच इतर अंमली पदार्थ ( बोली भाषेनुसार ) पेपर बटन, चरस, गांजा, एम.डी, व्हायटनर या पदार्थाच्या आहारी गेला असणे. या सर्व गोष्टींवर अंकुश ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासन तसेच गृह विभागाचे अधिकार असून देखील दोन्ही विभागाचे संग्नमत नसणे. सबब अन्न व औषध प्रशासन आणि पोलिस प्रशासनाची संयुक्त कार्यदलाची निर्मिती करण्याबाबत. शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

सन २०२२ मध्ये मानखुर्द व शिवाजीनगर परिसरामध्ये अंमली पदार्थ जवळ बाळगले बाबत एकुण ८१ गुन्हे दाखल केले असुन त्यामध्ये १२४ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.नमुद आरोपींकडुन ६७०. ३८३ किलो ग्रॅम वजनाचा किंमत अंदाजे रू.१४,१७,५१,८७७/- इतक्या किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेला आहे. तसेच सेवनार्थी विरोधात एकुण ७०६ गुन्हे नोंद करून त्यामध्ये ७४१ आरोपीविरूध्द कारवाई करण्यात आलेली आहे.

परिमंडळ २, भिवंडी परिसरात अन्न व औषध प्रशासन तसेच पोलीस यांनी कोडीन युक्त व इतर नशेसाठी वापरण्यात येणा-या औषधांच्या गैरवापराच्या अनुषंगाने सन २०२१-२२ मधे १० गुन्हे दाखल केले असुन भिवंडी शहरात कोडीन युक्त व इतर नशेसाठी वापरण्यात येणा-या औषधांच्या खरेदी विक्री मधे अनियमितता आढळुन आलेल्या ९ औषध दुकानाविरुद्ध कारवायी करण्यात आलेली आहे.

सन २०२२ मध्ये अन्न व औषध प्रशासन तसेच पोलीस विभागाने संयुक्तपणे कारवाई करून ०१ गुन्हा दाखल केलेला असुन त्याची निर्गती करण्यात आलेली आहे. तसेच सदर गुन्हयात ०१ आरोपीस अटक करण्यात आलेली असुन त्याचे ताब्यातुन एकुण रू २८,००५/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. सन २०२२ व सन २०२३ मध्ये मध्ये एकुण ०४ केसेस दाखल करण्यात आलेले असुन चारही गुन्हयांची निर्गती करण्यात आलेली आहे तसेच चारही गुन्हयात एकुण ०५ आरोपीतांना अटक करण्यात आलेली असुन त्यांचे ताब्यातुन एकुण रू ११,५३,२५० /- किंमतीचा अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आलेला आहे.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात परिमंडळ २, भिवंडी हद्दीत अंमली पदार्थाचे सेवन करणा-या इसमांविरूद्ध सन २०२२ ते आजपावेतो खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेल्या आहेत.

२१५१



सन २०२२ ते दिनांक २६/०२/२०२३ पर्यत

| अ.क्र | वर्गवारी | वर्ष | गुन्हे दाखल | अटक आरोपी |
|---|---|---|---|---|
| १ | गांजा | २०२२ | १२१ | १२६ |
| २ | सेवन | २०२३ | ३७ | ३७ |

औषध निरीक्षकांद्वारे वेळोवेळी किरकोळ औषध विक्रेत्यांच्या औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियमा अंतर्गत तपासण्या करण्यात येतात. त्यावेळी विना प्रीस्क्रीपशनद्वारा औषधाची विक्री केली जाते किंवा कसे ही बाब सुध्दा पडताळण्यात येते. व कायद्याचे उल्लंघन करणा-यांच्या विरुद्ध त्यांचे परवाने निलंबन/परवाने रद्द ची कारवाई घेण्यात येते.

एप्रिल २०२१ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत करण्यात आलेल्या तपासण्या व त्याअनुषंगे घेण्यात आलेली कारवाई याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कालावधी | किरकोळ विक्री पेढ्यांच्या केलेल्या तपासण्या | परवाने निलंबन | परवाने रद्द | गुन्हा दाखल |
|---|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ | ९२८३ | १७२३ | ३७५ | ०२ |
| २ | एप्रिल २०२१ ते डिसेंबर २०२२ | ८२५९ | २०२१ | ४२४ | ५४ |

महाराष्ट्र राज्य अंमली पदार्थ कायद्यान्वये दाखल गुन्हे सन २०२० ते २०२२ खालील प्रमाणे.

| अ.क्र | वर्ष | गुन्हे दाखल | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| १ | २०२० | ४७०९ | ५३२१ |
| २ | २०२१ | १०६६० | १२१५५ |
| ३ | २०२२ | १३६६५ | १४४८१ |

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेला आहे. अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थांबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तसेच केंद्र शासनाच्या दि.२५.०३.२०२२ च्या आदेशानुसार अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची व कार्यकारी समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

**********

गृह विभाग

१४५

लक्षवेधी सुचना क्र.१८३६

**लक्षवेधी सुचना क्र.१८३६**

**सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन**

मा.श्री. भास्कर भाऊराव जाधव, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे-

"रत्नागिरी जिल्हयात वाढत्या गुन्हेगारीबरोबरच अंमली पदार्थांचा विळखा घट्ट होत चाललेला असणे, रत्नागिरी शहर व परिसर त्याचे मुख्य केंद्र असल्याचे समोर येणे, या ठिकाणाहून गांजा, चरस, टर्की पावडर, मेथ्यॅक्युलॉन (एमडी) सारख्या अंमली पदार्थांची छुपी वाहतूक व तस्करी सुरू असणे, दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ रोजी रत्नागिरी शहरातील शांतीनगर भागात एका तरूणीसह चैघेजण अंमली पदार्थांची विक्री करताना आढळून येणे, त्यांच्याकडे सुमारे २ लाख रू. किंमतीचे अंमली पदार्थ आढळून येणे, माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये रत्नागिरी शहरातील मिरकरवाडा येथे गांजा हा अंमली पदार्थ विक्रीसाठी बाळगणाऱ्या एका तरूणावर पोलिसांनी कारवाई केलेली असणे, त्याच्याकडे सुमारे १८ हजार रू. किंमतीचा गांजा आढळून येणे, त्याआधी मार्च २०२२ मध्ये शहरातील एका लॉजवर टाकलेल्या छाप्यात मेथ्यॅक्युलॉन (एमडी) हा विक्रीसाठी आणलेला अंमली पदार्थ आढळून येणे, त्याची किंमत सुमारे ५ लाख रू. इतकी असणे, याप्रकरणी केरळमधील दोघांना झालेली अटक, कारवाई झाल्याने या घटना समोर येणे, परंतु, मोठया प्रमाणात छुप्या पध्दतीने अंमली पदार्थांची तस्करी होत असणे, अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांचा आंतरराष्ट्रीय टोळयांशी संबंध असल्याचे स्पष्ट होवूनही मुख्य सूत्रधारांवर कारवाई करण्यास पोलिसांना आलेले अपयश, अंमली पदार्थांबरोबरच गोवा बनावटीच्या लाखो रूपयांच्या दारूची राजरोसपणे बेकायदा वाहतूक सुरू असल्याच्या घटनांमध्ये झालेली वाढ, दिनांक २५ जानेवारी २०२३ वा त्या सुमारास मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर (जि. रायगड) नजीक ४ लाख १८ हजार रू. किंमतीची गोवा बनावटीची विदेशी दारू एका कारमध्ये आढळून येणे, अशाचप्रकारे दिनांक ३१ ऑक्टोबर २०२२ वा त्यासुमारास सुमारे २४ लाख रू. किंमतीची गोवा बनावटीची दारू घेवून नाशिकच्या दिशेने निघालेला मोठा कंटेनर महामार्गावर कळंबस्ते, ता. चिपळूण (जि. रत्नागिरी) येथे आढळून येणे, याचदरम्यान कळंबस्ते गावातील एका घरामध्ये लाखो रूपयांच्या दारूचा साठा आढळून येणे, दररोज मोठया प्रमाणात राजरोजपणे बेकायदा गोवा बनावटीच्या दारूची वाहतूक होत असताना मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर जागोजागी तपासणीसाठी उभ्या असलेल्या महामार्ग पोलिसांच्या नजरेतून दारू भरून चाललेली कंटेनरसारखी वाहनाना महामार्ग विभागाचे पोलीस जाणीपूर्वक दुर्लक्ष करणे, बेकायदा वाहतूक करणारे आणि महामार्ग पोलीस यांचे असलेले संगनमत, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली संतापाची व चिडीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

टेरा-एप-१३८२(७३०-२-२३)

**मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

अंमली पदार्थ संदर्भात रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात सन २०२२ मध्ये एकुण १२ गुन्हे दाखल असून अंदाजे एकुण रुपये ५,५७,६८०/-किंमतीचा अंमली पदार्थ जप्त केले असुन त्यामध्ये १४ आरोपीना अटक केली आहे .तर जिल्ह्यात २१ गुन्हे दाखल असुन अंदाजे एकुण रुपये ५,८८,७५५/- किंमतीचा अंमली पदार्थ जप्त केले असुन २१ आरोपीना अटक केली आहे.

दि. १६ फेब्रुवारी २०२३ रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती रत्नागिरी समोरील रस्त्यावर २ आरोपी १० ग्रॅम वजनाचा amphetamine व methqualone अंमली सदृश्य पदार्थ गैरकायदा विक्री करित असल्याचे आढळून आले, म्हणुन रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ३८/२०२३ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोविकारावर परिणामकरणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये कलम ८(क), २२(अ) प्रमाणे दिनांक १७/०२/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीच्या ताब्यातून एकुण रू २,२२,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी एका तरुणीसह चार जणांना अटक करण्यात आली आहे.

दिनांक १५/१०/२०२२ रोजी रत्नागिरी शहरातील मिरकवाडा येथे एक तरुण ०.३७४ किलोग्रॅम गांजा विक्री करीत असताना आढळून आल्याने त्याच्याविरुद्ध रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.३८१/२०२२, गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोविकारावर परिणाम करणारे अधिनियम १९८५ अन्वये कलम ८(क),२०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल आहे व आरोपीला अटक करण्यात आली आहे.

दिनांक ०१/०३/२०२२ रोजी ०४:३० वा चे सुमारास निलराज लॉज मध्ये ९९ ग्रॅम वजनाचा एम डी सदृश्य अमली पदार्थ गैरकायदा विक्री करित असल्याचे आढळून आले म्हणुन २ आरोपी(राज्य केरळ) विरुद्ध रत्नागिरी शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं १०१/२०२२ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोविकारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(क),२१(क) प्रमाणे २ आरोपी(राज्य केरळ) विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीच्या ताब्यातून रू ४,९५,०००/- किंमतीचा ९९ ग्रॅम वजनाचा एम. डी. सदृश्य अंमली पदार्थ रू २१०००/- किंमतीचे ४ मोबाईल व इतर साहित्य मिळून रू ५,१६,०५०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.तसेच आरोपींचा आंतरराष्ट्रीय टोळयांशी संबंध असल्याचे गुन्हयाचा तपासात निष्पन्न झालेले नाही.

दि. २४.१.२०२३ रोजी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील धामणदेवी गावाजवळ ता. पोलादपूर जि रायगड येथे गोवा बनावटीची विदेशी दारू वाहतूक करीत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ अंतर्गत गुन्हा रजिस्टर क्र. ०४/२०२३ दि. २४.०१.२०२३ रोजी नोंदविलेला आहे. या गुन्हयात गोवा बनावटीचे विविध ब्रॅन्डचे ३०४ लि. विदेशी मद्य ज्याची अंदाजे किंमत रु. २,५७,२८०/- व कार जप्त करण्यात आलेली आहे. या गुन्हयात जप्त केलेली कार, मद्य व आरोपीचा मोबाईल इ. ची एकुण किंमत रु. ४,१८,३८०/- इतकी आहे. या गुन्हयात २ इसमांना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाच्या सखोल तपास चालू आहे.

दिनांक ०१/११/२०२२ रोजी ०१.४४ वा आरोपी बाबासाहेब सुखदेव बुधवंत हा आपल्या मालकीच्या कंटेनर मधुन गोवा बनावटीची विदेशी दारु गैरकायदेशीर बिगर परवाना, वाहतूक करीत असताना मुंबई गोवा महामार्गावर कळंबस्ते फाटा येथे आढळून आल्याने त्याच्याविरुध्द चिपळुण पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. ३५७/२०२२ महाराष्ट्र दारुबंदी कायदा क ६५ (ई)(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीच्या ताब्यातून रु २४,४५,०७२/-एवढी गोवा बनावटीची दारु व रु १०,००,००/- किंमतीचा कंटेनर जप्त करण्यात आले आहे.

त्याच प्रमाणे दिनांक ०२/११/२०२२ रोजी चिपळुण पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाने कळंबस्ते बौध्दवाडी ता चिपळुण येथील घर क्र ३१८, येथे छापा टाकला असता आरोपीत राजाराम तानाजी जोईल याने गैरकायदा विनापरवाना एकुण रु ४,७४,००२/- किंमतीची गोवा बनावटीची दारु ताब्यात बाळगले स्थितीत मिळुन

आला म्हणुन चिपळुण पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ३५९/२०२२ महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये कलम ६५ (ई) प्रमाणे दिनांक ०३/११/२०२२ रोजी गुन्हा दाखल आहे.गुन्ह्याचा तपास चालू आहे.

महामार्ग पोलीस विभागामार्फत महामर्गावरील होणा-या मोटार अपघातांचे ठिकाणी तात्काळ भेट देणे, अपघाताला तात्काळ वैदकीय उपचार मिळणेकामी रुग्णालयात दाखल करणे, वाहतूक कोंडी होऊ नये याकरिता उपाययोजना करणे तसेच महामार्गावर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-या कसुरदार वाहन चालक यांच्यावर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करणे हे महामार्ग पोलीसांचे मूळ उद्दिष्ट आहेत. अंमली पदार्थ विरोधात स्थानिक गुन्हे अन्वेषन विभाग व स्थानिक पोलीस ठाणे हे कारवाई करत असतात.त्यानुसार दि.२१.०२.२०२३ रोजी टेम्पो क्र.एम एच ०८ ए पी १६०९ हे धोकादायकरित्या वाहन चालवित असल्याचे आढळून आल्याने तपासणीअंती वाहनामधे ५६ बॉक्स गोवा बनावटीची दारु व ५ सुट्या बाटल्या असा माल आढळल्याने चालकावर कणकवली पोलीस स्टेशन गु. र. क्र ४९/२०२३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ ए,६५ ई अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकांमध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेला आहे. अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थांबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. राज्यामध्ये ॲन्टी नार्कोटीक्स टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे तसेच केंद्र शासनाच्या दि.२५.०३.२०२२ च्या आदेशानुसार अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थांवर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.

**********

<u>लक्षवेधी सूचना क्र.२२००</u> <u>गृह विभाग</u>

महाराष्ट्र विधानसभा

प्रथम(अर्थसंकल्पीय) अधिवेशन- २०२३

**श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्रीमती गीता जैन, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२०० पुढीलप्रमाणे आहे :-**

" न्यायालयाच्या आदेशानुसार/जामिनावर सुटलेल्या आरोपीस शिवडी(मुंबई) पोलीस स्टेशनला पकडून आणून पोलीस निरीक्षक सचिन माने व इतर पोलिसांनी बेदम मारहाण करुन आरोपीस त्याचे मूत्र पाजण्याची घटना जानेवारी २०२३ मध्ये घडणे, एप्रिल २०२२ मध्ये MH०४-KF८७९७ या ट्रॅक्टर मधून चोरलेले डिझेल टेम्पो क्र. MH०४-GR-७०८१ मध्ये सापडल्यावरुन शिवडी पोलीस स्टेशनचे निरीक्षक सचिन माने यांनी कोणताही गुन्हा न नोंदविता आरोपींना सोडून देणे, शिवडी पोलीस स्टेशन हद्दीत गुटखा, एमडीएच, अवैध रसायने इ. अंमली पदार्थाची खुले आम विक्री होत असणे, जुगार मटका इत्यादी चालू असणे, शिवडी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रेती बंदर, लकडा बंदर या ठिकाणी करोडो रुपयांच्या रेतीची अनधिकृतरित्या उत्खनन, साठवणूक, वाहतूक होत असूनही त्याकडे पोलीसांनी जाणून-मधून दुर्लक्ष करणे, शिवडी पोलीस स्टेशनच्या जवळ समुद्रकिनारी अनेक मोठी सप्लाय व्हेसल, बार्ज, बेवारस स्थितीत ठेवण्यात येत येऊन त्याद्वारे समुद्र मार्गे येणारे चोरीचे डिझेल, गुटखा, अंमली पदार्थ भंगार इत्यादी किना-यावर आणणे व सुरक्षा सुरक्षकांकडून त्याची विक्री होत असणे, दुरुस्तीसाठी आणलेल्या जुन्या जहाजांवरील कित्येक टन लोखंडाना गंज व तेल समुद्रात प्रदूषण वाढविणे, दिनांक १२ फेब्रुवारी,२०२३ रोजी रात्री या प्रकारची माहिती देऊनही शिवडी पोलीसांनी कोणतीही कारवाई न करणे, सद्या सदर पोलीस स्टेशनच्या हद्दीत अनेक अनधिकृत गॅरेजेस पार्किंग, गोडाऊन मध्ये मोठमोठ्या कंटेनरमधून आणलेला गुटखा, अंमली पदार्थ साठवून ठेवणे, शिवडी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये समुद्र मार्गाने अतिरेकी मुंबईत येण्याचा धोका निर्माण होणे, पोलीस निरीक्षक सचिन माने व त्यांच्या अंतर्गत काम करणारे दहा-बारा पोलीस कर्मचारी यांना हप्ता देण्यासाठी गैरकाम करणारे गुन्हेगार वारंवार पोलीस स्टेशनला येत असणे, शिवडी परिसरातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती धोक्यात आलेली असणे पोलीस निरीक्षक व इतर पोलीस यांचे विरुध्द त्वरित कारवाई करण्याची आवश्यकता झाल्याने केलेली व करावयाची कारवाई, शासनाची भूमिका व प्रतिक्रिया "

**मा. उप मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन**

शिवडी पोलीस ठाणे येथे दि. २० नोव्हेंबर,२०२२ रोजी गु.र.क्र.५०६/२०२२ कलम ३२६, ३४१, ५०६, ३४ भा.द.वि. अन्वये दाखल झाला होता. या गुन्हयातील तीन आरोपी असून यापैकी २ आरोपींना अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयामध्ये एका पाहिजे आरोपीचा शोध घेणे सुरु होते.

पोलीसांना तपासामध्ये सहकार्य करावे व इतर अटींवर अटक झालेल्या दोन आरोपींना मा. सत्र न्यायालयाने जामिन मंजूर केला होता. सदर जामिनावरील आरोपींना तपासाकामी पोलीस ठाणेस माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये बोलावून पोलीसांनी त्यांच्याकडे पाहिजे आरोपीबाबत अधिक चौकशी केली आहे. यातील एका आरोपीने दि. ०६.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शिवडी पोलासांबाबत छळवणूकीची तक्रार केली होती. तथापि, सदर तक्रारीच्या अनुषंगाने या आरोपीचा दि. ०९.०२.२०२३ रोजी जबाब नोंदविला असता त्यांनी पाहिजे आरोपी न मिळाल्यास पोलीस त्रास देतील या भीतीपोटी सदरची तक्रार केली असल्याचे जबाबामध्ये सांगितले व सदर तक्रारीबाबत पोलीसांविरोधात कोणतीही तक्रार नसल्याचे जबाबामध्ये नमूद केले आहे.

माहे एप्रिल,२०२२ मध्ये शिवडी पोलीस ठाणे येथे ऑईल बेकादेशीर व धोकादायकरित्या साठा करुन विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करणे इ.बाबत गुन्हा रजिस्टर क्र.८७/२२ कलम २८५, ३३६, ३४ भादवि सह कलम ३, ७ जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयामधील ४ आरोपी हे तेलाचा टँकर क्र. MH 04 KF 8797 या मल्टीॲक्सेल टँकरमधून २०० लिटर क्षमतेचे ४ तेलाचे ड्रम चोरी करताना आढळून आले होते. या ४ आरोपींमधील २ आरोपी तेलाच्या टँकरचे ड्रायव्हर व क्लिनर आहेत. सदर गुन्हयामध्ये चोरी केलेल्या तेलाची वाहतूक करण्याकरीता वापरलेला लहान मालवाहू टेम्पो क्र. MH-04-GR-7081 मुद्देमाल म्हणून जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये तेलाचा टँकर क्र. MH 04 KF 8797 चे मालकाचा जबाब नोंद केला असता त्यांनी नमूद टँकरवर नेमलेले ड्रायव्हर व क्लिनर यांनी संगनमताने त्यांच्या वाहनातील तेल त्यांच्या अपरोक्ष इतर आरोपींना चोरी करु दिले असल्याबाबत सांगितले. तेलाचा टँकर क्र. MH 04 KF 8797 मधील मालाच्या सर्व खरेदी पावत्या व वाहनाचे सर्व कागदपत्रे पडताळून त्याची खात्री केल्यानंतर सदर टँकर मालकाची नमूद गुन्हयामध्ये कोणतीही भूमिका निष्पन्न न झाल्याने भविष्यात न्यायालयामध्ये मुद्देमाल उपस्थित करण्याच्या अटीवर तेलाचा टँकर क्र. MH 04 KF 8797 हे वाहन मूळ मालकाला परत देण्यात आले आहे.

शिवडी पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध धंदे चालू असल्याबाबत बातमी प्राप्त होताच त्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येते. सन २०२२-२०२३ मध्ये अवैध गुटखा विक्रीप्रकरणी ३, अवैध रसायने प्रकरणी ७, अवैध मटका जुगार प्रकरणी ९ व अंमली पदार्थ प्रकरणी ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

शिवडी पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील रेतीबंदर येथे कोणत्याही प्रकारे रेतीचे अनधिकृत उत्खनन केले जात नसून या ठिकाणी अधिकृत वाळू विक्रेत्यांची वाळू साठवणूकीची जागा आहे. येथून मुंबई मध्ये छोटया प्रमाणात वाळु विक्री केली जाते. शिवडी पोलीस ठाणे येथे अवैध वाळू उत्खननाची कोणत्याही प्रकारची लेखी तक्रार अथवा गोपनीय बातमी प्राप्त झाल्याची अभिलेखी नोंद नाही.

शिवडी पोलीस ठाणे हद्दीत रेती बंदर, लकडा बंदर, घासलेट बंदर, पावडर बंदर, हाजीबंदर, कोळसाबंदर व कौलाबंदर हे ०८ लॅन्डीग पॉईन्ट्स असून सदर लॅन्डीग पॉईन्ट्स व त्यांच्या सभोवतालचा परिसर हा मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या मालकीचा आहे. या ०८ लॅन्डीग पॉईन्ट्सवर शिवडी पोलीस ठाण्याच्या मार्फतीने दिवस रात्र पहारा/बंदोबस्त असतो. तसेच दिवसपाळी/रात्रपाळी कर्तव्य निरीक्षक हे नियमितपणे लॅन्डीग पॉईन्ट्सला भेट देत असतात. यलोगेट पोलीस ठाण्याच्या मार्फतीने पोलीस नौकांद्वारे नमूद परिसरामध्ये दिवसरात्र गस्त सुरु असून त्यामुळे शिवडी पोलीस ठाणे हद्दीमध्ये समुद्रमार्गे अतिरेकी मुंबईत येण्याचा धोका उद्भवू नये यासाठी दक्षता घेण्यात येत आहे. शिवडी पोलीस ठाणे हद्दीत वेळोवेळी प्राप्त झालेल्या अनधिकृत व्यवसायासंबंधातील तक्रारींवर योग्य ती कायदेशीर कारवाई केली आहे.

एकंदरीत शिवडी पोलीस ठाणे आवारामध्ये गैर काम करणारे कोणतेही गुन्हेगार येत नसून आर्थिक बाबतीत कोणतीही तक्रार प्राप्त नाही. शिवडी पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधित ठेवण्याची दक्षता घेण्यात येते.

****************

लक्षवेधी सूचना क्र.२३७९ | गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा

प्रथम(अर्थसंकल्पीय) अधिवेशन- २०२३

**श्री. किशोर पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३७९ पुढीलप्रमाणे आहे :-**

" शेतक-यांना वसूलीचा त्रास देत असलेल्या बजाज फायन्सास कंपनीला धडा शिकविण्यासाठी श्री.प्रथमेश मधुकर पवार, बाळासाहेब शिवसेना तालुका प्रमुख, अमळनेर, जि. जळगांव यांनी कंपनीच्या कार्यालयासमोर दि.१०.०१.२०२३ रोजीच्या सुमारास आंदोलन करणे, या प्रकरणी कलम आयपीसी ३९५ सारखा गुन्हा दाखल करणे, सदरी प्रकरणी मागे घेण्याकरिता अमळनेर पोलिस निरिक्षक श्री. विजय शिंदे यांनी सुमारे ३५ लक्ष रुपयांची केलेली मागणी, त्यातील १० लाख रोख रक्कम पो.कॉ.श्री. शरद पाटील यांनी घेणे, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दि. २८.०१.२०२३ रोजी च्या सुमारास लेखी निवेदन सादर करणे, या निवेदनानुसार सविस्तर चौकशी करुन कारवाईचा अहवाल सादर करण्याचे अ.मु.स., गृह यांना आदेश देणे, परंतु अदयापही या प्रकरणी कोणतीच कारवाई न झाल्याने निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाची करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रया व भूमिका."

मा. उप मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

दिनांक १०.०१.२०२३ रोजी अमळनेर, जिल्हा जळगांव येथील श्री.प्रथमेश मधुकर पवार यांनी त्यांच्या साथीदारांसह कर्जाच्या वसूलीसंदर्भात बजाज फायनान्स कंपनीच्या अमळनेर येथील कार्यालयासमोर आंदोलन केले होते. आंदोलनकर्त्यानी बजाज फायनान्स कंपनीच्या कार्यालयात येऊन सामानाची तोडफोड केल्याप्रकरणी फिर्यादी श्री.विकास सुभाष पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अमळनेर पोलीस स्टेशन भाग-५, गु.र.नं.१७/२०२३ भा.दं.वि. क्र. ३९५, ५०४, ५०६, ४२७ प्रमाणे दि. ११.०१.२०२३ रोजी गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हे मागे घेण्याकरीता अमळनेर पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक श्री. विजय शिंदे यांनी सुमारे ३५ लक्ष रुपयाची केलेली मागणी, त्यातील १० लाख रोख रक्कम पो.कॉ. शरद पाटील यांनी घेणे अशा आशयाचे निवदेन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.२८.०१.२०२३ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिले

होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना शासन स्तरावरुन कळविण्यात आले होते.

सहायक पोलीस अधीक्षक, चोपडा उपविभाग, चोपडा यांनी याप्रकरणी चौकशी केली असून चौकशीमध्ये या प्रकरणी अमळनेर पोलीस स्टेशन भाग-५, गु.र.नं.१७/२०२३ भा.दं.वि. क्र. ३९५, ५०४, ५०६, ४२७ प्रमाणे दि. ११.०१.२०२३ रोजी दाखल गुन्हा हा तपासात सबळ पुरावे हस्तगत करण्यात आले असल्याने दाखल झाल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी दाखल केलेला गुन्हा खोटा असल्याचे दिसून येत नाही. तसेच सदर प्रकरणी गुन्हयातील आरोपीतास गुन्हयातून बाहेर काढणेकामी तपास अधिकारी अथवा इतर कोणाचाही आर्थिक देवाण-घेवाण अगर हस्तक्षेप दिसून आला नाही. सद्य:स्थितीत प्रस्तूत प्रकरणातील गुन्हा तपासावर आहे.

****************

लक्षवेधी सूचना क्र. २४६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

मा. विधानसभा सदस्य श्री. छगन भुजबळ व डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४६ खालीलप्रमाणे आहे.

"पुणे येथे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या स्थापनेचा विषय गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, गोर-गरीब नागरिकांसाठी सदर खंडपीठाची अत्यंत आवश्यकता असणे, पुणे येथे मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे खंडपीठाची स्थापना होणेबाबत दिनांक २२ मार्च, १९७८ रोजी महाराष्ट्र विधानसभेत ठराव संमत होवून विधानसभेने मा. प्रमुख न्यायाधीश मुंबई उच्च न्यायालय, भारत सरकार महाराष्ट्र सरकार व मा. राष्ट्रपती यांना मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठाची पुणे व छत्रपती संभाजीनगर येथे स्थापना होणेबाबत सूचना केलेली असणे, राज्याची फेररचना कायदा कलम ५१ (३) प्रमाणे फिरते खंडपीठ स्थापना करण्याचे अधिकार मा. प्रमुख न्यायाधीश मुंबई उच्च न्यायालय यांना असणे, दिनांक २६ फेब्रुवारी, १९८१ रोजी केवळ छत्रपती संभाजीनगर येथे उच्च न्यायालयाची खंडपीठाची मंजुरी देण्यात आलेली असणे, मात्र पुण्यातील उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ स्थापना करणेचा विषय प्रलंबित राहिलेला असणे, पुण्यातील मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठाची स्थापना होणेसाठी जमीन उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असणे, पुण्यातील उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची स्थापना करणेकामी मंत्री मंडळाने मा. उच्च न्यायालय मुंबई तसेच मा. सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांचेकडे शिफारस करण्याची तसेच सदर खंडपीठासाठी राज्य सरकारने आर्थिक नियोजन करणे व निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असणे, मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची पुणे येथे स्थापना करण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया ."

---

मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री, विधि व न्याय विभाग यांचे निवेदन

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे एक कायम बेंच औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) व पुणे येथे स्थापन करण्यासंबंधी राष्टपतींना विनंती करण्याचा ठराव दि. २२/०३/१९७८ रोजी महाराष्ट्र विधानमंडळाने पारित केला होता. केंद्र शासनाच्या दि. २६/०६/१९८४ रोजीच्या अधिसुचनेन्वये छत्रपती संभाजीनगर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे एक खंडपीठ स्थापन करण्यात आले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याची मागणी पुणे जिल्हयासह राज्यातील कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, अमरावती, नांदेड अशा अनेक भागातून तेथील नागरीक, वकील संघटना, लोकप्रतिनिधी यांचेमार्फत मागील अनेक वर्षापासून सातत्याने होत आहे. विधानमंडळ अधिवेशनांमध्येही लोकप्रतिनिधींमार्फत त्यासंबंधीची चर्चा अशासकीय ठराव, तारांकीत/ अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, अर्धा तास सूचना इत्यादी आयुधांमार्फत उपस्थित करण्यात येते.

पुणे खंडपीठ स्थापनेबाबतचे लोकप्रतिनिधी यांचे दि. १९/०१/२०२३ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

राज्यात उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यापूर्वी त्यास राज्य पुर्नरचना अधिनियम, १९५६ च्या कलम ५१ (२) नुसार मा. मुख्य न्यायमूर्तींची सहमती आवश्यक आहे. देशातील विविध राज्यांमध्ये त्या त्या उच्च न्यायालयाची खंडपीठे स्थापन करण्यासंदर्भात काही निकष विहीत करण्यासाठी जसवंत सिंग समितीचे गठन करण्यात आले होते. या समितीच्या निकषांच्या आधारे राज्यात मुंबई उच्च न्यायालयाचे तिसरे खंडपीठ स्थापन करता येईल किंवा कसे, यासंदर्भात उच्च न्यायालयाकडून स्थापित पेंडसे समितीने १९८७ साली सादर केलेला अहवाल विचारात घेऊन कोल्हापूर व अन्यत्र कोठेही उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन न करण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने घेतला होता.

खंडपीठ स्थापनेच्या मागण्यांच्या अनुषंगाने उच्च न्यायालयाकडून वेळोवेळी अभिप्राय मागविण्यात आले असता उच्च न्यायालयाचे खंडपीठ अन्यत्र स्थापन करणे लाभदायक व उचित नसल्यामुळे ते स्थापन न करण्याचा पूर्वीचाच निर्णय कायम असून त्यात कोणताही बदल करणे गरजेचे वाटत नाही, असे अभिप्राय उच्च न्यायालयाकडून प्राप्त झाल्यामुळे प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आलेला नाही.

नवीन खंडपीठ स्थापनेच्या विविध स्तरातून होणाऱ्या मागणीस अनुसरुन सदर मागणी तपासून अहवाल सादर करण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. मुख्य न्यायमूर्तींनी तीन न्यायमूर्तींची समिती गठीत केली आहे. तथापि, उच्च न्यायालयाने त्यांच्या दि. ०२/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदरहू समितीच्या मा. न्यायमुर्ती यांची अन्य राज्यातील उच्च न्यायालयात झालेल्या बदलीमुळे तसेच अन्य कारणाने सदरहू समिती पुर्नगठित करण्याचे कामकाज सुरू असल्याचे कळविले आहे.

जसवंत सिंग समितीने निर्धारित केलेल्या निकषांच्या आधारे मुंबई उच्च न्यायालयाचे राज्यात आता एकच खंडपीठ स्थापन केले जाऊ शकते. त्यानुसार राज्यात अनेक ठिकाणांहून होणारी खंडपीठ स्थापनेची मागणी विचारात घेऊन त्याबाबतचा मंत्रीमंडळाचा निर्णय उपलब्ध करण्याबाबत मा. मुख्य न्यायमुर्ती यांनी त्यांच्या दि. ११/०८/२०१४ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदय यांना कळविले होते.

राज्यात उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ स्थापन करण्यास बराचसा कालावधी लागू शकतो, ही बाब विचारात घेवून प्रलंबीत खटल्यांची संख्या, मुंबई शहरापासूनचे अंतर व लोकसंख्या या निकषांवर कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच पुणे येथेही मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात यावा, अशी शिफारस करण्याबाबतचा निर्णय दि. १२/०५/२०१५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. तशी शिफारस मा. मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना दि. १७/०७/२०१५ रोजीच्या शासन पत्रान्वये करण्यात आली आहे. शासनाच्या सदर शिफारशीचा सकारात्मक विचार करण्याची फेरविनंती

दि. २८/०२/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी त्वरित निर्णय होण्याकरिता बैठक आयोजित करण्याबाबत शासन पत्र, दि. १९/०१/२०१९ अन्वये मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना विनंती करण्यात आली असून शासन पत्र, विधि व न्याय विभाग, दि.१९/०३/२०२० अन्वये सदर विनंतीकडे उच्च न्यायालय प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे नियमित खंडपीठ स्थापन होईपर्यंत शक्य तितक्या लवकर कोल्हापूर येथे सर्किट बेंच स्थापन करण्याची विनंती शासन पत्र, दि. ०८/३/२०२२ अन्वये मा. मुख्य न्यायमुर्ती यांना करण्यात आली आहे. त्यास अनुसरून मा. मुख्य न्यायमुर्ती यांनी त्यांच्या दि. १५/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, दि. १०/०३/२०२२ रोजी कोल्हापूर खंडपीठ कृती समितीचे सदस्य तसेच विभागातील अन्य बार असोसिएशन्सचे सदस्य यांचेसोबत बैठक अयोजित करण्यात आली होती. बैठकीत फिरते खंडपीठ स्थापनेसंबंधीची कार्यपद्धती, त्याच्या कायदेशीर बाबी तसेच फिरते खंडपीठ कार्यरत होण्याकरिता आवश्यक पायाभूत सुविधा विचारात घेऊन, फिरते खंडपीठ स्थापनेबाबत निर्णय होण्याकरिता काही अवधी आवश्यक असल्याचे उपस्थितांच्या निदर्शनास आणण्यात आले आहे.

तसेच राज्यात मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ/फिरते खंडपीठ स्थापन करण्याची बाब उच्च न्यायालयाच्या विचाराधीन असल्याने याबाबत निर्णय झाल्यावर त्याकरिता आवश्यक पायाभुत सुविधा, निधी उपलब्धतेच्या अनुषंगाने कार्यवाही करणे उचित होईल.

---

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय अधिवेशन)

**लक्षेवधी सूचना क्र.७४६**

सर्व मा. डॉ. नितिन राऊत, ॲड. यशोमती ठाकूर(सोनावणे), श्री. धिरज देशमुख, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यातील धर्मादाय संघटनेतील सहाय्यक धर्मादाय आयुक्त या पदावरील एका अधिकाऱ्याची धर्मादाय उप आयुक्त, जळगावं येथे रिक्त पदावर माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये पदोन्नती झालेली असणे, धर्मादाय संघटनेमध्ये सध्या मुंबई, ठाणे व सोलापूर या ठिकाणी प्रतिनयुक्तीवर कार्यरत असलेल्या तीन न्यायिक अधिकारी/न्यायधीश यांची सेवा मा.उच्च न्यायालयास प्रत्यावर्तीत न झाल्याने पदोन्नती करीता पात्र असणाऱ्या नियमित अधिकाऱ्यांना धर्मादाय उप आयुक्त या पदावर पदोनन्ती मिळण्यास विलंब होत असणे, सदरील तीन न्यायिक अधिकाऱ्यांची/न्यायाधिशांची सेवा मा.उच्च न्यायालयास प्रत्यावर्तीत करणेकामी विधि व न्याय विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित असतानाही त्याबाबत कार्यवाही न होणे, तसेच या तीन न्यायिक अधिकाऱ्यांची/न्यायाधिशांची सेवा मा. उच्च न्यायालयास प्रत्यावर्तीत करून घेणेकामी मा.महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून विधी व न्याय विभागाच्या पत्रव्यवहारास प्रतिसाद दिला जात नसणे, त्यामुळे शासनाने चौकशी करून सदरील अधिकारी यांना पदोन्नतीसाठी निर्देश देणे आवश्यक असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी या संघटनेतील अधिकारी-कर्मचारी यामध्ये पसरलेले असंताषाचे वातावरण व नाराजीची भावना, परिणामी शासनाने चौकशी करून सदरील अधिकाऱ्यांना तातडीने पदोन्नती देणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

सन २०२१-२०२२ या निवडसूची वर्षामध्ये धर्मादाय उप आयुक्त, जळगाव या प्रत्यक्ष रिक्त एका पदावर सेवा ज्येष्ठतेनुसार पात्र श्री.मोहन द. गाडे यांची सामान्य प्रशासन विभागाने अनौ. सं. क्र.७८१/२०२२, दि.२५.७.२०२२ अन्वये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून व पदोन्नतीच्या प्रस्तावास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता मिळेपर्यंत, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती विधि व न्याय विभाग, शासन आदेश, दि.१९.०९.२०२२ अन्वये पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामुळे धर्मादाय संघटनेतील धर्मादाय उप आयुक्त, गट-अ या संवर्गात मंजूर १७ पदे असून, त्यापैकी पदोन्नतीच्या कोट्यातील ०९ पदापैकी ०६ पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत.

तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ या निम्न संवर्गातून धर्मादाय उप आयुक्त,गट-अ या संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदांवर पदोन्नतीने अधिकारी पात्र झाले असून, संबंधित अधिकाऱ्यांना पदोन्नती व तद्नंतर पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. तथापि, सद्यस्थितीत धर्मादाय उप आयुक्त, गट-अ या संवर्गातील ०३ पदांवर (धर्मादाय उप आयुक्त, ठाणे, सोलापूर व मुंबई) न्यायिक अधिकारी प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत. सबब, धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवर सद्या कार्यरत असलेल्या १) श्रीम.रजिता महेश चव्हाण, धर्मादाय उप आयुक्त, ठाणे; २) श्रीम.सुनिता दुंडप्पा कंकणवाडी, धर्मादाय उप आयुक्त, सोलापूर; ३) श्री. वैभव के. जाधव, धर्मादाय उप आयुक्त, मुंबई या न्यायिक अधिकाऱ्यांच्या सेवा न्यायिक सेवेत परत घेतल्यास, पदोन्नतीच्या कोट्यातील पदे भरणे, शासनास शक्य होईल. त्याअनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याबाबतची विनंती विधि व न्याय विभागाच्या शासन पत्र, दि.१९.०९.२०२२ अन्वये मा.महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्यात आली आहे.

तद्नंतर सन २०२२-२०२३ या निवडसूची वर्षामध्ये सहायक धर्मादाय आयुक्त, गट-अ या निम्न संवर्गातून धर्मादाय उप आयुक्त,गट-अ या संवर्गात पदोन्नती देण्यासाठी निवडसूची तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

*******

४३३ ९०७

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

विधानसभा सदस्य मा. डॉ. नितिन राऊत, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. अमित विलासराव देशमुख, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय जगताप, श्री. धिरज देशमुख, श्री. बळवंत वानखडे, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. जितेश अंतापूरकर, श्री. मोहनराव हंबर्डे, श्री. माधवराव पवार, श्री. राजेश एकडे, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.११४९ पुढीलप्रमाणे आहे.

**"राज्यात ॲट्रॉसिटी खाली चालणाऱ्या सर्व प्रकरणाचे तसेच खटल्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे, दि.१६ जानेवारी २०१६ पासून अनिवार्य केले असून मात्र आजतागायत मुंबई उच्च न्यायालय आणि अनुसूचित जाती अनुसूचित जमाती विशेष न्यायालय, मुंबई येथे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, त्यामुळे सदर खटल्यांमध्ये पारदर्शक न राहता त्यामधील दोष सिद्धतेचे प्रमाण अतिशय कमी झालेले असल्याचे आढळून येणे, जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हाधिकारी, मुंबई यांची तशी व्हिडिओ रेकॉर्डिंग व्यवस्था करण्याची जबाबदारी असून त्यांना सन २०१८ पासून सतत मागणी व विनंती करुनही व्यवस्था करण्यात केली जात नसणे, त्यामुळे एकूण न्यायव्यवस्थेबाबत निर्माण झालेली संशयाची भावना तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वर्गात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, ही अतिशय गंभीर बाब असून याबाबत राज्य शासनाने चौकशी करून मुंबई उच्च न्यायालयाल व अनुसूचित जाती अनुसूचित जमाती विशेष न्यायालय, मुंबई ॲट्रॉसिटी संदर्भातील खटल्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याबाबत त्वरित आदेश देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

---

**मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री, विधि व न्याय विभाग यांचे निवेदन**

अनुसुचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ (२०१५ मध्ये सुधारीत) च्या कलम १५(अ)(१०) नुसार सदर अधिनियमांतर्गत सर्व प्रकरणांच्या सुनावण्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याबाबतची तरतूद आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने प्रद्युमन बिश्त वि. भारत सरकार व इतर (रिट याचिका क्र.९९/२०१५) मध्ये दि.१४.०८.२०१७ रोजीच्या आदेशान्वये राज्यातील सर्व दुय्यम न्यायालयांतील न्यायदान कक्षांमध्ये टप्प्याटप्प्याने ऑडिओ रेकॉर्डिंगसह सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार, राज्यात

प्रायोगिक तत्वावर नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई आणि लघुवाद न्यायालय, मुंबई या दोन न्यायालयांमध्ये ऑडिओ रेकॉर्डिंगसह सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे मा. उच्च न्यायालयाकडून निश्चित करण्यात आले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्देशांनुसार न्यायदान कक्षांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्यास, अनुसुचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ (२०१५ मध्ये सुधारीत) च्या कलम १५(अ)(१०) नुसार व्हिडिओ रेकॉर्डिंगची पूर्तता होईल किंवा कसे ही बाब मा. उच्च न्यायालयाच्या प्रशासकीय समितीच्या विचाराधीन आहे. ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंगकरीता सीसीटीव्ही कॅमे-यांची सुविधा राज्यातील सर्व न्यायालयांमध्ये अद्याप उपलब्ध नाही.

मुंबई येथील नगर दिवाणी व सत्र न्यायालय तसेच, लघुवाद न्यायालयांमध्ये ऑडिओ रेकॉर्डिंगसह सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याकरीता Government E-Marketplace (GeM) पोर्टलवर ई-निविदा प्रक्रिया राबवून सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत मा. उच्च न्यायालयास दि.२६.०९.२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

---------------

(१८२)

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय अधिवेशन)

### लक्षवेधी सूचना

अॅड. अशोक पवार, सर्वश्री. दिलीप मोहिते-पाटील, चेतन तुपे, सुनिल शेळके, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १७८८ पुढीलप्रमाणे आहे :-

"पुणे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालय जनसंपर्क अधिकारी यांची बैठक दिनांक १४/१२/२०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे पार पडली असून या बैठकीमध्ये अनेक धर्मादाय हॉस्पीटल गरीब रुग्णांना १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेतून उपचार करण्यास टाळाटाळ करत असल्याचे बैठकीमध्ये चर्चा होणे, मिटींगला गैरहजर राहणाऱ्या हॉस्पीटलवर लेखी स्वरुपात कारवाई करावी, लोकप्रतिनिधींनी फोन केला असता अनेक हॉस्पीटलचे जनसंपर्क अधिकारी फोन घेत नसल्याने त्यांना समज देणे, ज्या हॉस्पीटलचा आयपीएफ निधी संपलेला असून जे हॉस्पीटलचा निधी तोट्यात आहे त्या हॉस्पीटलचे ऑडीट करण्याची आवश्यकता असणे, सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी व रात्री ७ वाजलेनंतर जनसंपर्क अधिकारी हॉस्पीटलमध्ये उपलब्ध नसणे, काही धर्मादाय हॉस्पीटलमध्ये महिला जनसंपर्क अधिकारी असल्याने रात्री फोन करण्यास मर्यादा येतात याकरिता नोडल ऑफीसरची २४ तास संपर्क साठी नेमणूक करणे, काही धर्मादाय हॉस्पीटल सरकारी जमिन घेतात व नंतर कंपनी कायद्यांतर्गत पळवाट काढून धर्मादाय योजनेतून बाहेर पडतात अशा रुग्णालयांची चौकशी करणे आवश्यक असणे, पुणे जिल्ह्यातील काही धर्मादाय रुग्णालय आयपीएफ च्या रुग्णांना बाहेरुन औषधे आणण्यास सांगितली जाणे, धर्मादाय रुग्णालयामध्ये रुग्ण भरती झाल्यानंतर सदर रुग्णांना सांगितले जाते की बाहेरील डॉक्टर शस्त्रक्रियेसाठी आल्यास त्याची फी द्यावी लागेल परंतू वास्तिवक पाहता ती जबाबदारी धर्मादाय हॉस्पीटलची असल्याने याबाबच्या सूचना हॉस्पीटलला होणे आवश्यक असणे, धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीबांसाठी १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेची प्रभावी अमंलबजावणी होणेकरिता या सर्व चॅरेटी हॉस्पीटलमध्ये बाह्यरुग्ण तपासणी आयपीएफ योजनेत समावेश करणे, मेडिकल बिले आयपीएफ मध्ये समाविष्ठ करणे, जनसपर्क अधिकारी यांचे नाव, मोबाईल नंबर, १० टक्के राखीव खाटा सवलत योजनेतून उपचार घेत असल्यास नोटीस बोर्डवर रुग्णाच्या नावासहित रक्कम तपशिल लिहिण्यात यावा, समितीचा बोर्ड, रुग्ण भरतीचा बोर्ड दर्शनी भागात मराठी मध्ये लावणे, २४ तास जनसंपर्क अधिकाऱ्यांची नेमणुक करणे,. जनसंपर्क अधिकाऱ्यांचे कार्यालय हॉस्पीटलच्या दर्शनी भागात असणे, १० टक्के राखीव खाटा व आयपीएफ निधी कोणत्या हॉस्पीटलमध्ये शिल्लक आहेत याबाबतच्या तपशिल वेबसाईटवर टाकण्यात यावा व तो रोज अपडेट करण्यात यावा, चॅरिटी हॉस्पीटलची मिटींग दर महिन्याला घेण्यात यावी, आयपीएफ च्या रुग्णांना बाहेरुन खाजगी मेडिकल मधून औषधे न आणता हॉस्पीटलने पुरविणे, रुग्णाला कोणत्या गोष्टी सवलतीमध्ये मिळू शकतात याबातचा उल्लेख दर्शनी भागात बोर्डवर लावणे याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

### मा. उप मुख्यमंत्री महोदयाचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणीकृत सार्वजनिक न्यास संचालित धर्मादाय रुग्णालयांनी अधिनियमाच्या कलम ४१ अअ अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका (पीआयएल) क्रमांक ३१३२/२००४ मध्ये आदेशित केलेल्या योजनेचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. सदरची योजना ही दिनांक ०१/०९/२००६ पासून अंमलात आलेली आहे. सदर योजनेतील खंड २ नुसार प्रत्येक धर्मादाय रुग्णालयांनी त्यांचेकडील वापरातील एकूण खाटांच्या १० टक्के खाटा ह्या निर्धन रुग्णांकरिता मोफत व १० टक्के

खाटा ह्या दुर्बल घटकांतील रुग्णांकरिता सवलतीच्या दराने उपचाराकरिता राखीव ठेवणे बंधनकारक आहे. सदर योजनेतील खंड ४ नुसार प्रत्येक धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन रुग्णांचा निधी (आयपीएफ) असा स्वतंत्र निधी निर्माण करुन त्यात (निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्ण सोडून) इतर सर्व रुग्णांच्या स्थूल देयकांच्या त्याच्या २ टक्के रक्कम कोणतीही वजावट न करता जमा करावी, अशी तरतुद आहे. तसेच, खंड ७ नुसार सदर खात्यामध्ये जमा होणारी रक्कम ही संबंधित धर्मादाय रुग्णालयाच्या स्वाधीन राहील व त्या रकमेचा विनियोग फक्त निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना वैद्यकीय उपचार करणेकरिताच करावा लागेल, अशी तरतुद आहे.

उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी विधि व न्याय विभागाच्या शासन निर्णय दिनांक २२/०७/२०१० अन्वये प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. उक्त योजनेच्या अंमलबजावणीबाबत पुणे जिल्ह्याकरिता गठित समितीचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १४/१२/२०२२ राजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये सर्वश्री राहुल कुल व अॅड. अशोक पवार, मा. विधानसभा सदस्य उपस्थित होते. समितीने बैठकीमध्ये पुणे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयांमध्ये योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत विविध निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार उक्त बैठकीमधील चर्चेच्या अनुषंगाने, समितीचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांनी पुणे जिल्ह्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांना दिनांक २३/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे सुचना दिल्या आहेत. १) रुग्ण अथवा त्यांचे नातेवाईक यांचेकडुन उत्पन्नाचा दाखला व रेशनिंग कार्ड हे दोनच कागदपत्रे घ्यावेत. २) रुग्ण अथवा त्यांचे नातेवाईक यांचेकडून जागेचा उतारा, जमिनीचा ७/१२ उतारा किंवा बँक पास बुक, अशा प्रकारी कागदपत्रांची मागणी करु नये, ३) रुग्ण अथवा त्यांचे नातेवाईकांना व्यवस्थापनाची परवानगी घ्यावी लागेल, अशी उत्तरे देवू नये. याबाबत निर्णय समाज सेवकांनीच घ्यावा, ४) जिल्हाधिकारी समितीमधील सदस्य यांचे ई-मेल, व्हाट्सअॅप किंवा हस्तबटवड्याने प्राप्त पत्रांना एका दिवसात उत्तरे द्यावीत व ५) धर्मादाय रुग्णालयांतील डॉक्टरांनी उपचार करणार नाही अशी भूमिका घेऊ नये. या सुचनांचे पालन करणे धर्मादाय रुग्णालयांना बंधनकारक आहे.

तसेच यासंदर्भात धर्मादाय उप आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक १५/०३/२०२३ राजी प्राप्त अहवालानुसार नमूद करण्यात येते की, पुणे येथील जिल्हास्तरावरील बैठकींना अनुपस्थित असणाऱ्या नोडल ऑफिसर्स यांचेवर कायद्यानुसार कारवाई करावी व यापुढील बैठकीत सर्व नोडल आफिसर्सनी उपस्थित राहावे, अशा सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार नोडल ऑफिसर्स यापुढील बैठकीत गैरहजर राहिल्यास त्याबाबत चौकशी करुन कारवाई करण्यात येईल. लोकप्रतिनिधींनी फोन केला असता अनेक हॉस्पीटलचे जनसंपर्क अधिकारी फोन घेत नसल्याने त्यांना समज देणेसंदर्भात दिनांक १४/१२/२०२२ च्या बैठकीमध्ये तसेच यासंदर्भात पुणे जिल्ह्यातील दिनांक १६/०१/२०२३, १५/०२/२०२३ व २८/०२/२०२३ रोजी पार पडलेल्या देखरेख समितीच्या बैठकीत उपस्थित धर्मादाय रुग्णालयांच्या असोसिएशनच्या प्रतिनिधींना उक्त बैठकीत दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

ज्या हॉस्पीटलचा निर्धन रुग्ण निधी संपलेला असून ज्या हॉस्पीटलचा निधी तोटयात आहे त्या हॉस्पीटलचे ऑडीट करण्याची आवश्यकतेबाबत नमूद करण्यात येते की, यासंदर्भात योजनेतील खंड ११ नुसार जर एखाद्या मनिन्यात निर्धन रुग्णांच्या निधी खात्यामध्ये अधिक किंवा तूट असेल तर ते येणाऱ्या पुढील महिन्यात जुळवून घ्यावे. जर निर्धन रुग्णांच्या निधी खात्यातील जमा व निर्धन रुग्ण आणि दुर्बल घटकातील रुग्णांच्या उपचाराकरिता येणाऱ्या खर्चास सहा महिन्यापेक्षा जास्त काळ असमतोलपणा असेल, तर त्या धर्मादाय रुग्णालयाने ही बाब देखरेख समितीच्या (मॉनिटरींग कमिटी) निदर्शनास आणून द्यावी की जेणेकरुन देखरेख समिती योग्य ते निर्देश सदरहू धर्मादाय रुग्णालयास देवू शकतील.

H/113-19

सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी व रात्री ७ वाजलेनंतर जनसंपर्क अधिकारी हॉस्पीटलमध्ये उपलब्ध नसणे व काही धर्मादाय हॉस्पीटलमध्ये महिला जनसंपर्क अधिकारी असल्याने रात्री फोन करण्यास मर्यादा येतात याकरिता नोडल ऑफीसरची २४ तास संपर्कासाठी नेमणुक करणेबाबत तशी उपलब्धता ठेवण्याबाबत बैठकीमध्ये सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, देखरेख समितीमध्ये सूचना किंवा अनुपालन करत असल्याबाबत रूग्णालयांकाडून अहवाल मागविण्यात आला आहे, याबाबत कसूर आढळून आल्यास चौकशी करून कार्यवाही करण्यात येईल.

काही धर्मादाय रुग्णालय सरकारी जमिन घेतात व नंतर कंपनी कायद्यांतर्गत पळवाट काढून धर्मादाय योजनेतून बाहेर पडतात अशा रुग्णालयांची चौकशी करणे आवश्यक असणे, अश्या प्रकारची तक्रार आल्यास चौकशी करून कार्यवाही करण्यात येते. काही धर्मादाय रुग्णालय आयपीएफच्या रुग्णांना बाहेरुन औषधे आणण्यास सांगितले जाणे, याबाबत रुग्णालयांकडे औषधे उपलब्ध असताना जाणिवपूर्वक बाहेरून औषधे आणण्यास सांगण्याबात आढळल्यास चौकशी करून कार्यवाही केली जाते.

धर्मादाय रुग्णालयामध्ये रुग्ण भरती झाल्यानंतर सदर रुग्णांना बाहेरील डॉक्टर शस्त्रक्रियेसाठी आल्यास त्याची फी द्यावी लागणे याबाबत नमूद करण्यात येते की, योजनेच्या तरतुदीनुसार रुग्णालयामध्ये ज्या सेवा / शस्त्रक्रिया अथवा सवलती आहेत त्या देण्याची जबाबदारी रुग्णालयाची आहे.

बाह्यरुग्ण तपासणी आयपीएफ योजनेत समावेश करणेबाबत नमूद करण्यात येते की, बाह्य रुग्ण तपासणी आयपीएफ योजनेत समाविष्ट केले जातात. तसेच हॉस्पिटल अंतर्गत मेडिकल बिले असल्यास सदरील बिल आयपीएफ मध्ये समाविष्ट केली जातात. न केल्यास कार्यवाही केली जाते. यासंदर्भात योजनेच्या खंड ९ नुसार औषधे, उपयोगात आणलेल्या वस्तु (कंझ्युमेबल्स) व शरिराच्या आत लावलेल्या वस्तु (इम्प्लांटस्) याचा आकार हा रुग्णालयांनी खरेदीच्या किंमतीत लावावा, अशी तरतुद आहे.

प्रत्येक रुग्णालयामध्ये जनसंपर्क अधिकारी यांचे नांव, त्यांचे मोबाईल क्रमांक, १० टक्के राखीव खाटा. तसेच विधानमंडळाच्या तदर्थ संयुक्त समितीचे फलक व रुग्ण भरतीचे फलक दर्शनी भागात मराठी भाषेमध्ये लावले आहेत. परंतु त्यात योजनेंतर्गत रुग्णांच्या नावासहित रक्कमेबाबतचा तपशील लिहिण्याची तरतूद नाही. रोजच्या खाटांची उपलब्धता धर्मादाय संकेतस्थळावर उपलब्ध केली जाते. प्रत्येकाचा खर्च किती हे संकेतस्थळावर प्रकाशित करण्याची संकेतस्थळावर तरतूद नाही. जी रुग्णालये संकेतस्थळावर खाटा अद्ययावत करत नाहीत त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येते.

तसेच, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी आदेशित केलेल्या योजनेच्या देखरेखीसाठी खंड १६ नुसार प्रत्येक जिल्हास्तरावर धर्मादाय सह आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली देखरेख समिती गठीत करण्यात आली आहे. सदर देखरेख समितीची बैठक महिन्यातून एक वेळा व आवश्यक वाटल्यास किमान दोन वेळा घेण्यात येते.

योजनेच्या खंड २१ नुसार प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाने त्यांच्या रुग्णालयाच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर योजना प्रदर्शित करणेबाबत तरतुद आहे. त्यानुसार प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाने योजना प्रदर्शित केली आहे. योजनेप्रमाणे रुग्णालयात उपलब्ध असलेली शस्त्रक्रिया / उपचार व सवलती देणे बंधनकारक आहे.

यापुर्वी मा. उच्च न्यायालयीन योजनेच्या अंमलबजावणीत कसूर करणाऱ्या पुणे जिल्ह्यातील दोन रुग्णालयांविरुद्ध फौजदारी प्रकरण दाखल करण्यात आले आहेत व दोन धर्मादाय रुग्णालयांच्या सोई सुविधा काढण्यात आलेल्या आहेत. तसेच, पुणे जिल्ह्यातील एका धर्मादाय रुग्णालयाचा मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार धर्मादाय रुग्णालयाच्या यादीतून वगळण्यात आले आहे व एका धर्मादाय रुग्णालयाच्या सोई सुविधा काढून टाकण्याकरिताचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

*******

H/113-2

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२३

**लक्षवेधी सूचना २२७५**

मा.श्री.राजू (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२७५ पुढीलप्रमाणे आहे :-

"सार्वजनिक न्यास नोंदणी, ठाणे यांचे कडील वज्रेश्वरी देवी संस्थान नोंदणी सन १९५३ ची असुन यांचे नावे ठाणे जिल्हा व मुंबई या ठिकाणी अनेक जमिन मिळकती असुन सन १९६३ च्या विश्वस्तांनी नमुद परिशिष्ट १ मिळकतीचा तक्ता सार्वजनिक न्यास नोंदणीस पुर्वीच सादर केलेला असणे. नंतरच्या नविन विश्वस्तांनी सन १९९३ साली चेंज रिपोर्ट दाखल केल्यानंतर भुमि अभिलेख, भिवंडी यांच्या सन १९२० च्या रेकॉर्ड आकारफोड पत्रकानुसार पुर्वीपार असलेले जमिनदार व शेतकरी यांच्या नोंदीप्रमाणे खाजगी मिळकती शेतकऱ्याचे असताना जाणुनबुजून शेतकऱ्याच्या खाजगी मिळकतीमध्ये नंतरच्या विश्वस्तांनी आणलेल्या चेंज रिपोर्टमुळे न्यासनोंदणीचे अधिकारी देवस्थानचे विश्वस्त व महसुल अधिकारी यांनी संगनमत करून हेतुस्पर गैरलाभ मोक्याच्या जमिनीचे गैरलाभ मिळावणे, म्हणुन खाजगी जमिनीत देवस्थान नोंदी घेतल्या गेल्या वास्तविक पाहता सन १९६३ च्या परिशिष्ट १ देवस्थान जमिन मिळकत तक्त्याप्रमाणे देवस्थानाने जमिन काबिज करावी व इतर खाजगी मिळकतीतून त्यांची नोंद कमी करण्याची आवश्यकता, कारण देवस्थान जमिन मिळकतीचे विश्वस्तांनी मोठया प्रमाणावर अफरातफर व दान हुडीचे पैशांचे ७ करोड रुपयांचे घोटाळा केलेला असणे, सदर जमिनींपैकी भिवंडी येथील कणेरी गाव फेणेगाव मध्ये काही जमिन मिळकतीमध्ये अन्यायकारक देवस्थान नोंद घेऊन अनेक लोकांच्या जमिनी अडकुन ठेवलेले असणे, वज्रेश्वरी देवस्थान या जमिन मिळकतींचे सार्वजनिक न्यास नोंदणी, ठाणे यांच्याकडे जमिन मिळकतीचा तक्ता उपलब्ध असून कणेरी व फेणेगांव येथील जमिनीचे वर्णन सदर जमिन मिळकत तक्त्यामध्ये संपुर्ण गावच नसुन फक्त काही मिळकतींचेच सर्व्हे नंबर नमुद केलेले असणे, सदर जमिन देवस्थान परिशिष्ट १ मिळकत तक्त्यामध्ये कणेरी येथील सर्व्हे क्र. ३९ व ६५ तर फेणे येथील सर्व्हे क्र. ५, १८, १९, २० हे सर्व्हे नंबर नमुद नसुन या सर्व्हे नंबरमध्ये वज्रेश्वरी देवस्थानच्या विश्वस्तांनी गैरव्यवहाराच्या व गैरलाभाच्या दृष्टीकोनातून महसूल अधिका-यांना हाताशी धरून महसूल खात्याच्या रजिस्टरला संपुर्ण गाव (एंटायर विले) म्हणुन नोंदणी केल्यामुळे स्थानिक शेतक-यांना जमिनदारांना गेल्या कित्येक वर्ष याचा मोठा आर्थिक फटका बसलेला असणे, त्या जमिनदारांचा व शेतक-यांचा विकास खुंटलेला असुन देवस्थान इनाम वर्ग-३ अशी नोंद असल्यामुळे विकासकामी परवानगी मिळण्यास बाधा येत असणे, त्यामुळे हि वस्तुस्थिती जाणून देण्यासाठी जमिन मिळकत तक्त्याप्रमाणे देवस्थानाची नोंद दुरुस्त करण्यासाठी दि. १७/११/२०२२ रोजी प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांच्याकडे निवेदन सादर केलेला असणे, परंतु अद्याप सदर प्रकरणी शेतकऱ्यांना व जमिनदारांना नाहरकत दाखला देण्यासाठी देवस्थानचे विश्वस्त व महसुल अधिकारी यांच्या

कृ.मा.प.

गैरव्यवहाराचा व गैरलाभाचा दृष्टिकोन असल्याने सार्वजनिक न्यास नोंदणी विभाग यांचा आशिर्वाद लाभल्याचे दिसुन येत असल्याने शासनाने याची गंभीररीत्या उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवरती कार्रवाई करून बेकायदेशीर संपुर्ण गाव (एंटायर विलेज) रद्द करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाई शासनाची प्रतिक्रिया व शासनाची भुमिका"

---

## निवेदन

**मा. उपमुख्यमंत्री (श्री देवेंद्र फडणवीस)** **विधी व न्याय विभाग**

वज्रेश्वरी देवी संस्थान हा न्यास ठाणे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय येथे नोंदणीकृत असून त्याचा नोंदणी क्र.ए-१९२ आहे. सदरचा न्यास दि.०४.०७.१९५३ रोजी नोंदणीकृत झालेला आहे. उपलब्ध परिशिष्ट १ च्या प्रतीनुसार वजेश्वरी देवी न्यासाच्या वडवली (वज्रेश्वरी) इनाम फॉरेस्ट, भिवंडी, गणेशपुरी, गुंज ता.वाडा (ten inam), कणेरी ता. भिवंडी (ten inam) बिवर ता.वसई, आंबोडा ता.वसई, फेणे संपूर्ण गाव (whole village) इत्यादी मिळकतीच्या नोंदी दिसून येतात. त्याचे सर्व्हे नंबर देखील नमुद करण्यात आलेले आहेत.

चेंज रिपोर्ट क्र.२५०/१९९३ अन्वये फेणे गावातील मिळकतीबाबत पुढीलप्रमाणे नोंद घेतल्याची दिसून येते. नोंद - Out of Whole village Fene Survey No.15 and 22 are sold by me Mr.trustees but the trust has reserved its rights to recover the revenue out of these lands.

न्यासाच्या नावे परिशिष्ट- १ ला नमूद असलेल्या मिळकती दावा क्र.१/१९६३ च्या हुकूमनाम्याच्या प्रतीमध्ये दिसून येतात.

मौजे फेणे, ता. भिवंडी येथील दुमाला जमीनीची नोंदवही - गांव नमुना नं.३ पाहता, त्यामध्ये देवस्थान निरंतर, भूमापन क्र.१ ते २२ सर्व, आकारणी रु.३३०.९३ असून, शासनास येणे असलेली रक्कम रु.२०.३१, दुमालदारांकडील शिल्लक किंवा नुकसान रु.३१०.६९ अशी नोंद आहे. तसेच मौजे कणेरी, ता.भिवंडी येथील दुमाला जमीनीची नोंदवही - गांव नमुना नं.३ पाहता, त्यामध्ये देवस्थान निरंतर, भूमापन क्र. १ ते ६५ सर्व, आकारणी रु.९८४.३४ असून, शासनास येणे असलेली रक्कम रु.४७.७५, दुमालदारांकडील शिल्लक किंवा नुकसान रु.९३६.५९ असे नमूद आहे.

मौजे कणेरी व फेणे या गावांचा Land Alienation Register मधील अनु.क्र.८३ व ५१ मध्ये समावेश आहे. सदर Land Alienation Register पाहता मौजे कणेरी या गावांची नोंद क्र.८३ वर असून सदरची नोंद तपासता त्यामध्ये रकाना क्र.3 Name of present Alienee मध्ये Shri Wajra Yogini Devi Manager, Baliramgiri Ramchandragiri, रकाना क्र.४ देवस्थान वर्ग ३, रकाना क्र.५ व ६ सनद क्रमांक ७४, दि.१४/०७/१८६४, तसेच रकाना क्र.११ मध्ये

कृ.मा.प.

Permanent, रकाना क्र.१२ मध्ये संपूर्ण गाव (Entire Village) व रकाना क्र.२१ मध्ये पहाता (१) This village is not surveyed. (२) (Two Annas settlement judi was fixed on the revenue of twelve annas on palm trees and entered in the sanad अशी नोंद दिसून येत आहे. Baliramgiri Ramchandragiri, रकाना क्र.४ देवस्थान वर्ग-३, रकाना क्र.५ व ६ सनद क्रमांक ७३, दि.१४/०७/१८६४, तसेच रकाना क्र.११ मध्ये Permanent, रकाना क्र.१२ मध्ये संपूर्ण गाव (Entire Village) व रकाना क्र.२१ मध्ये पहाता (१) This village is not surveyed. (२) One rupee settlement judi was fixed on the revenue of ७-१२-० on palm trees and entered in the sanad. अशी नोंद दिसून येत आहे.

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.डीईव्ही-२०१०/ प्र.क्र.९/ल-४, दिनांक ३०/०७/२०१० अन्वये, गाव नमुना नं.३ व लॅण्ड ॲलिनेशन रजिस्टर मधील देवस्थान इनामाच्या जमीनीची माहिती संकलित करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसेच सदर जमीनीचे विहीत कार्यपध्दती अवलंबाशिवाय आणि सक्षम प्रधिकारी यांचे पूर्वपरवानगीशिवाय हस्तांतरण होऊ शकत नाही, असे हस्तांतरण झाल्यास सदर आदेशाची वैधता तपासून बेकायदेशीर असलेल्या आदेशाविरुध्द सक्षम न्यायालयात अपिल दाखल करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय सक्षम न्यायालयाचे आदेश नसताना देखील बेकायदेशीररित्या फेरफार झाले असल्यास सदरचे फेरफार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५७ नुसार पुन: निरीक्षणात घेणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.डीईव्ही-२०१५/ प्र.क्र.१५१/ज-१३अ, दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१८ नुसार राज्यातील देवस्थानाच्या जमीनीची तपासणी तसेच या जमीनी बेकायदेशीर हस्तांतरीत झाल्या असल्यास पूर्ववत देवस्थानांच्या नावे करण्याबाबत पूरक दिशा निर्देश दिले आहेत. सदर परिपत्रकानुसार अंशत: व पुर्णत: सारामाफी असणारे देवस्थानच्या जमीनीची बेकायदेशीर आणि सक्षम प्राधिकारी अथवा शासनाचे पूर्वपरवानगीशिवाय हस्तांतरण झाले असल्यास त्याबाबतची कार्यवाही करणेबाबत निर्देश दिले आहेत. मौजे कणेरी व फेणे, ता. भिवंडी येथील गाव नमुना नं.३ मध्ये देवस्थान निरंतर व Land Alienation Register मध्ये Entire Village असे नमूद आहे. त्यानुसार दोन्ही गावचे सर्व मिळकतीचा देवस्थान इनाम वर्ग-३ मध्ये समावेश होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सदर परिपत्रकामधील निर्देश या दोन्ही गावांतील मिळकतींना लागू होत असून सदर गावातील मिळकतीचे हस्तांतरण करण्यास सक्षम प्राधिकारी यांचे पूर्व परवानगीची आवश्यकता असल्याचे महसूल व वन विभागाने कळविले आहे.

मा.प्रधान सचिव, महसूल विभाग, मुंबई यांचेकडे दि.१७/११/२०२२ रोजी दाखल केलेले निवेदन तहसील कार्यालय, भिवंडी या कार्यालयास मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दि.३०/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाले आहे. सदर निवेदनामध्ये अर्जदार, श्री.काळूराम पांड्या धापसी (आदिवासी) यांचे कुळमुखत्यार धारक श्री.नागेश किसनराव निमकर यांनी मौजे कणेरी येथील सर्व्हे नंबर ३९, ६५ व फेणे येथील सर्व्हे नंबर ५ ह्या मिळकती देवस्थान इनाम वर्ग ३ मधून वगळणेत येणे संदर्भात विनंती केलेली आहे. परंतु मौजे कणेरी व

कृ.मा.प.

फेणे, ता. भिवंडी येथील गाव नमुना नं.३ मध्ये देवस्थान निरंतर व Land Alienation Register मध्ये Entire Village असे नमूद आहे. त्यानुसार दोन्ही गावच्या सर्व मिळकतीचा देवस्थान इनाम वर्ग-३ मध्ये समावेश होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे दि.०६/०२/२०१८ च्या परिपत्रकामधील निर्देश या दोन्ही गावांतील मिळकतींना लागू होत आहेत. अर्जदार यांची विनंती पाहता देवस्थान इनाम वर्ग-३ करणेबाबतची विनंती आहे. मात्र देवस्थान इनाम वर्ग-३ मिळकती हस्तांतरण करण्यास सक्षम प्राधिकारी यांच्या पूर्व परवानगीची आवश्यकता आहे.

सबब, नवीन विश्वस्तांनी सन १९९३ साली चेंज रिपोर्ट दाखल केल्यानंतर भूमी अभिलेख भिवंडी यांच्या सन १९२० च्या रेकॉर्ड आकारफोड पत्रकानुसार पूर्वापार असलेले जमिनदार व शेतकरी याच्या नोंदीप्रमाणे खाजगी मिळकती शेतक-यांच्या असताना जाणूनबुजून शेतक-यांच्या खाजगी मिळकतीमध्ये नंतरच्या विश्वस्तांनी आणलेल्या चेंज रिपोर्टमुळे न्यास नोंदणीचे अधिकारी, देवस्थानचे विश्वस्त व महसूल अधिकारी यांनी संगनमत करुन हेतुपुरस्सर मोक्याच्या जमिनीचे गैरलाभ मिळविले. ही बाब वस्तुस्थितीस धरुन नाही/खरी नाही.

********

2245
20/3/23

लक्षवेधी सूचना क्र.१५७१

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

श्री. हरिभाऊ बागडे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५७१ पुढीलप्रमाणे आहे:-

"पंतप्रधान आवास योजनेसाठी जिल्हा प्रशासनाणे महापालिकेला तिसगाव, पडेगाव, हर्सुल, चिखलठाणा, सुंदरवाडी या ठिकाणी जागा दिल्या असणे. या जागांवर सुमारे ४० हजार घर बांधणीसाठी स्थळ पाहणी न करता DPR तयार करणे, मार्च २०२२ पर्यंत निविदा प्रक्रिया अंतिम करणे गरजेचे असल्यामुळे घाई गडबडीत त्याची निविदा प्रक्रिया पण राबवली जाणे घरे बांधण्यासाठी दिलेल्या जागेवर अतिक्रमरण, डोंगराळ भाग व खदाणी असणे, महापालिकेने या गृहनिर्माण योजनेसाठी एकाच कंत्राटदाराला पात्र करणे, कंत्राटदाराची आर्थिक कुवत न तपासता त्याला कार्यारंभ आदेश देणे, कंत्राटदाराची निविदाप्रक्रिये मध्ये रिंग करुन निविदा मिळविणे नंतर महानगरपालिकेने झालेली निविदा प्रक्रिया रद्द करणे, पंतप्रधान आवास योजने अंतर्गत गरजू व गरीब नागरिकांना तात्काळ घरे मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत ६ प्रकल्पांतर्गत मंजूर ३९७६० सदनिका बांधण्यास केंद्रिय मान्यता व सनियंत्रण समितीने (CSMC) दिनांक ३० मार्च, २०२२ च्या ६० व्या बैठकीत मंजूरी दिली आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) ची अंमलबजावणी करण्यासाठी मौजे हर्सुल येथील गट क्रमांक २१६ मधील १.०२ हे.आर. मौजे पडेगांव येथील गट क्रमांक ६९ मधील ३.१६ हे. आर व मौजे तीसगांव येथील गट क्रमांक २२५/१ मधील १५.०५ हे.आर या जमिनी दिनांक ०८.०२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी यांचेकडून महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात आल्या. मौजे तीसगांव येथील गट क्रमांक २२७/१ मधील ८६.२५ हे.आर ही जमीन दिनांक ०२.०३.२०२२ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी यांचेकडून महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात आली. याशिवाय मौजे सुंदरवाडी येथील गट क्रमांक ९ मधील ४.४६ हे.आर व गट क्रमांक १० मधील ११.३२ हे.आर आणि मौजे चिकलठाणा येथील गट क्रमांक ४७३ मधील ६.७२ हे. आर या जमिनी दिनांक ०९.०३.२०२२ च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी यांचेकडून महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात आल्या. त्यामध्ये, पडेगाव (गट नं.६९), सुंदरवाडी(गट नं.९ व १०), तिसगाव (गट नं. २२५/१ व २२७/१), चिखलठाणा (गट नं.४७३) व हर्सुल (गट नं.२१६) या ठिकाणी एकूण १२७.९७ हेक्टर क्षेत्रफळावर प्रधानमंत्री आवास योजना(शहरी) राबविण्यात येत आहे. त्यासाठी १९.२२ हेक्टर जागेवर घरकुल बांधण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली. या मूळ निविदेतील तांत्रिक व वित्तिय बांबीमध्ये

रोटा H/00057 (750+4-23)

कोणताही बदल न करता वाढीव ८६.२५ हेक्टर व २२.०५ हेक्टर जागेवरील घरकुल बांधण्याचे काम संबंधित न्युनत्तम निविदाकारास देण्यात आले होते.

संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेबाबत शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी/अडचणीच्या अनुषंगाने मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०१.१२.२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत देण्यात आलेल्या निदेशानुसार दिनांक ०५.१२.२०२२ च्या शासन आदेशान्वये प्रस्तुत प्रकरणी अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. तसेच, दिनांक ०९.१२.२०२२ च्या आदेशान्वये आर्थिक व्यवहार्यता तपासणी उपसमिती तसेच स्थळ पाहणी व घरकुले निश्चितीकरण उपसमिती अश्या दोन उप समित्या गठीत करण्यात आल्या होत्या.

महानगरपालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सहा प्रकल्पाअंतर्गत ३९७६० सदनिका बांधण्याकरीता राबविलेल्या निविदा प्रक्रियेसंदर्भात आर्थिक व्यवहार्यता तपासणी उपसमिती तसेच स्थळ पाहणी व घरकुले निश्चितीकरण उपसमिती या दोन्ही उपसमितींनी सादर केलेला अहवाल व त्यावरील आयुक्त, महानगरपालिका, यांचे अभिप्राय विचारात घेऊन समितीने त्यांचा अहवाल शासनास सादर केला आहे.

त्यानुसार, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका एकूण १२७.९७ हेक्टर जागेवर प्रधानमंत्री आवास योजना राबवित असली तरी तिथे असलेली टेकडी, पाण्याचे तळे, अतिक्रमणे इत्यादी बाबी विचारात घेता, निव्वळ बांधकामासाठी उपलब्ध असलेल्या ३६.१६ हेक्टर जागेवर अंदाजे १७९१९ सदनिका बांधता येणे शक्य आहे. तसेच, संबंधित विकासकाने पडेगाव येथील प्रकल्पासाठी सुरक्षा अनामत रक्कम भरली असल्यामुळे तिथे ७२८ सदनिकांचे काम देण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्याच्या व उर्वरीत सर्व भुखंडावर सदनिका बांधण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याच्या सुचना आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगर पालिका यांना दिनांक ०६.०२.२०२३ च्या शासनपत्रान्वये देण्यात आल्या होत्या.

समितीचा अहवाल पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी नगर विकास विभाग, महसूल व वन विभाग, म्हाडा प्राधिकरण व जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना पाठविण्यात आला आहे. त्याआधारे नगर विकास विभाग तसेच महसूल व वन विभागामार्फत निविदा प्रक्रियेमधील अनियमिततेबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासा मागवून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

समितीचा अहवाल विचारात घेऊन आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी हर्सुल, तिसगांव, सुंदरवाडी व चिखलठाणा येथील Letter of Award (LOA) रद्द केले आहेत. तसेच, निविदा प्रक्रियेमध्ये फसवणूकीची बाब उघडकीस आल्यामुळे पडेगांव करता प्रदान करण्यात आलेले LOA ही रद्द करण्यात आले आहेत.

सदर प्रकरणी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत संबंधित निविदाकाराने आर्थिक पात्रता नसतांना देखील अतिरिक्त काम करण्यास सहमती दर्शवून महानगरपालिकेची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाल्याने तसेच निविदाकार मे. समरथ मल्टीबीज इंडिया प्रा.लि., मे. इंडोग्लाबल इन्फ्रास्ट्रक्चर सर्विसेस व मे. जॅगवार ग्लोबल सर्विसेस या तीन्ही निविदाकारांनी एकाच आय.पी. (I.P. Address) वरुन निविदा दाखल केल्याचे आढळून आल्याने, निविदेतील अट क्र. १७.१७ मधील Restrictive Practices चा अवलंब केल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट झाल्याने तिन्ही

निविदांकारांच्या संयुक्तिक भागीदारी संस्थेच्या सर्व भागीदारांवर संबंधीत पोलीस स्टेशन सिटी चौक येथे गु.र.न. ७९/२०२३ अन्वये दिनांक २३.०२.२०२३ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

समितीने केलेल्या शिफारशीनुसार प्रत्यक्ष जागेवरील वस्तुस्थिती विचारात घेऊन आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी मौजे तिसगांव येथील गट क्रमांक २२५/१, २२७/१, मौजे पडेगांव येथील गट क्र. ६९ आणि मौजे सुंदरवाडी येथील गट क्रमांक ९ व १० मधील एकुण २४.४९ हे.आर. क्षेत्रावर प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत गृहप्रकल्प उभारणीसाठी दिनांक १३.०३.२०२३ रोजी नव्याने निविदा प्रसिध्द केल्या आहेत. त्याचप्रमाणे, प्रधानमंत्री आवास योजनेच्या सदनिका बांधण्याकरीता राबविण्यात आलेल्या निविदाप्रक्रियेशी संबंधित छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या तत्कालीन अधिकारी व कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या दिनांक १३.०३.२०२३ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, सदर अधिकारी/ कर्मचारी यांचा खुलासा प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

*****

लक्षवेधी सूचना

९८८

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.अतुल बेनके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २३०० पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईतील चिंचपोकळी (पूर्व) डॉक्टर कंपाऊंड येथील सी.एस.क्र.१ए/७८२, २/७८३, ७८४, ७८५ आणि ७८६ माझगांव विभाग या जुन्या उपकरप्राप्त प्रोग्रेसिव्ह चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पात १६ वर्षे इतका कालावधी होऊनही विकासकाने १९९ पैकी १०४ भाडेकरुंचे पुनर्वसन केले नसल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच दि.१३.०३.२०२३ रोजी उघडकीस येणे, सदरहू पुनर्विकास प्रकल्पात म्हाडाला देय असलेल्या ३ हजार ५९५ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळापैकी केवळ २०१७ साली १२२० चौ.मी.क्षेत्रफळच सुपुर्द करुन उर्वरित २३७४.९६ चौ.मी. क्षेत्रफळ विकासकाने म्हाडाचे मुख्य अधिकारी व संबंधित अधिकार यांचेबरोबर आर्थिक संगनमत करुन परस्पर विक्री करुन ३२ कोटीचा आर्थिक घोटाळा केल्याचे निदर्शनास येणे, सदरहू पुनर्विकास प्रकल्पात ५ इमारतीं पैकी ३ पुनर्वसनासाठी इमारत व एक विक्रीसाठी आणि १ संयुक्त याप्रमाणे बांधकाम करण्याचे प्रस्तावित करण्यात येणे, सन २०१६ मध्ये शासनाने प्रकल्पास परवानगी देताना भाडेकरुंच्या पुनर्वसनाचा चटई क्षेत्रफळामध्ये चटई क्षेत्र निर्देशांकात मुक्त क्षेत्र फंजीबल क्षेत्र यांचा समावेश करु नये या अटिवर सुधारित ना हरकत प्रमाण पत्र देण्याच्या म्हाडाच्या प्रस्तावास गृहनिर्माण विभागाने सन २०१४ मध्ये मंजूरी देण्यात येणे, तसेच जुन्या इमारतीमधील सर्व वहिवाट दारांचे नव्या इमारतीमध्ये पुनर्वसन झाल्याशिवाय आणि अधिकचे म्हाडाला देय असलेले क्षेत्र म्हाडाकडे स्वाधीन केल्याशिवाय ओ.सी. देण्यात येऊ नये असेही शासनाने स्पष्ट करणे, असे असतानाही म्हाडाने शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करुन व ना-हरकत प्रमाणपत्रांच्या अटींचे पालन केले नसतानाही १० हजार ७८२ चौ.मी.बांधीव क्षेत्रफळाच्या संपूर्ण विक्री इमारतीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र नियमबाह्य व बेकायदेशीरपणे देण्यात येणे, उक्त प्रकल्पात गेली ५ वर्षापासून विकासकाने म्हाडाला देय असलेले २३७४.९६ चौ.मी.अतिरिक्त क्षेत्रफळ परस्पर विक्री केले असतानाही अद्याप विकासकाविरुध्द म्हाडाने कोणतीच कार्यवाही न करता प्रकरण कोट्यावधी रुपयाचा आर्थिक गैरव्यवहार करुन संगनमताने दडपून टाकणे, तसेच सदरहू प्रकल्पात विकासकाने बांधलेल्या सदनिका चटई क्षेत्र निर्देशांकात मुक्त क्षेत्र आणि फंजीबल क्षेत्र नसल्याचा प्रकार उघडकीस येऊन अद्यापही १०४ भाडेकरुंचे पुनर्वसनासाठी कोणतीच कार्यवाही न करता त्यांना बेघर करण्यात येणे, तसेच सदरहू समस्येबाबत विधानसभेत उपस्थित प्रश्नास चुकीचे उत्तर देऊन शासनाची दिशाभूल करण्यात येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, येथील भाडेकरु रहिवाशी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

भूकर पाहणी क्रमांक १ए/७८२, २/७८३, ७८३, ७८४, ७८५ आणि ७८६ माझगांव विभाग या मिळकतीच्या पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्रधारकास दि.२४.११.२००६ रोजी (२.५ चटईक्षेत्र निर्देशांक) व तद्नंतर दि.३०.०४.२०१४ रोजी (३.०० चटईक्षेत्र निर्देशांक) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले आहे.

ना-हरकत प्रमाणपत्रधारकांने सदर योजनेत एकुण ०५ इमारती प्रस्तावित केल्या असून त्यापैकी ०३ इमारती (इमारत क्र.०१, ०२ व ०३) या मुळ भाडेकरु / रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी राखीव असून इमारत क्र.०४ व ०५ विक्रीसाठी प्रस्तावित आहे. ना-हरकत प्रमाणपत्रधारकांने पुनर्वसनाच्या इमारत क्र.०१, ०२, ०३ व विक्रीपैकी इमारत क्र. ०५ यांचे बांधकाम पुर्ण केलेले आहे. सदरहू इमारतींकरिता ना-हरकत प्रमाणपत्रधारकाच्या मागणीनुसार, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने भोगवटा प्रमाणपत्र प्राप्तीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र दि.१७.०४.२०१७ रोजी प्रदान केले आहे. तसेच, इमारत क्र.०१, ०२ व ०३ या नवीन पुनर्विकसित इमारतीत एकूण १९९ भाडेकरु / रहिवाशांना ना-हरकत प्रमाणपत्रधारकामार्फत कायमस्वरुपी निवासस्थान पुरविण्यात आले आहे.

म्हाड अधिनियम, १९७६ च्या परिशिष्ट-३ नुसार या योजनेमध्ये विक्रीसाठी उपलब्ध क्षेत्रफळाच्या १५ % अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ (३५९५.६५ चौ.मी.) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास सुपूर्द करण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्रधारकाने सन २०१७ मध्ये करारनामा केलेला आहे. त्यापैकी, १२२०.६९ चौ.मी. क्षेत्रफळ विकासकाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास सुपूर्द केले आहे. योजनेचे काम अजूनही प्रगतीपथावर असून, विक्रीसाठी राखीव असलेल्या इमारतीपैकी इमारत क्र.०४ मध्ये उर्वरित २३७४.९६ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मंडळास उपलब्ध होणार आहे. सदर क्षेत्रफळ सुपूर्द केल्याशिवाय विकासकास इमारत क्र.०४ चे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून दिले जाणार नाही.

मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.१२५५/२०१६ मधील आदेशानुसार, विकास नियंत्रण नियमावली १९९१ नुसार रहिवाशी / भाडेकरुंना देण्यात येणाऱ्या सदनिकांचे नकाशे मंजूर करताना १०% बाल्कनी, बॉक्स छज्जा व निचेस हे मुक्त क्षेत्र होते. परंतु, दि.०६.०१.२०१२ नंतर विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील सुधारित तरतूदीनुसार सदर क्षेत्र हे चटईक्षेत्र निर्देशांकात अंतर्भूत करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेला सुधारित नकाशे मंजूर करण्यास सांगितले. त्यानुसार, मुंबई इमारत व दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ना-हरकत प्रमाणपत्रानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि.२७.०४.२०१७ रोजी भोगवटाप्रमाणपत्र दिले आहे.

सदर योजनेमधील भाडेकरु/रहिवाशांकडून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सखोल चौकशी, तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास एक महिन्यात सादर करण्याच्या सूचना मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, म्हाडा यांना दि.२३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

**********

लक्षवेधी सूचना

डॉ. राहूल आहेर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २१४० पुढीलप्रमाणे आहे:-

"नाशिक जिल्हयाचा टंचाई अंतर्गत गांव, वाडी, वस्ती यांना टँकरने पाणी पुरवठा करणेसाठी टँकर मंजुर करतांना शासन नियमानुसार सर्व प्रथम जिल्हयात उपलब्ध असलेले शासकिय टँकरव्दारे पाणी पुरवठा करणेबाबत निर्देश असल्याने शासकिय विभागांकडे उपलब्ध असलेले टँकर यांचे पाणी पुरवठा करणेबाबत आदेश होणे, सदर शासकिय टँकर गटविकास अधिकारी यांचे कार्यालयात हजर झाल्यानंतर सर्वाधित तालुक्याचे गटविकास अधिकारी हे स्थानिक पातळीवर डिझेल पुरवठादार यांचेशी संपर्क साधुन टँकरसाठी शासनाकडून निधी उपलब्ध होईल व त्यांव्दारे त्यांचे देयकाचे वितरण केले जाईल या अटीवर डिझेल पुरवठा करणेबाबत विनंती करत असणे, या टंचाई कालावधीत नाशिक जिल्हयात एकूण १४ शासकिय टँकरव्दारे पाणीपुरवठा सुरू असणे, सदरच्या तालुक्यांना टँकरव्दारे माहे एप्रिल २०२२ ते जून २०२२ या कालावधीत नियमितपणे सुरु असणे, यासाठी सुमारे ३ महिन्याचा कालावधी होऊन गेल्याने व शासनाकडुन निधी प्रलंबीत असल्याने संबंधीत डिझेल पुरवठादार यांनी संबधीत गटांकडे देयक मिळणेबाबत विनंती केलेली असल्याने गटविकास अधिकारी यांनी शासनाकडे वारंवार मागणी करणे, परंतु सदरचा निधी अद्याप अप्राप्त असणे, यामध्ये चांदवड ५४५५००० व देवळा २२००००० निधी प्रलंबित असणे, नाशिक जिल्ह्याचे एकूण ५४४६६१० इतका निधी प्रलंबित असणे, आगामी काळातही पाणी पुरवठा करण्यासाठी शासनाकडून टँकरद्वारे पुरवठा होणार असल्याने प्रलंबित देयके तात्काळ देणे गरजेचे असणे, त्यामुळे याबाबत शासनाने तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा.मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

राज्यात ग्रामीण भागातील गावांच्या/वाडयांच्या/वस्त्यांच्या १ कि.मी. परिसरातील सार्वजनीक उदभवातून दरडोई दर दिवशी २० लिटरपेक्षा कमी पाणी उपलब्ध होण्याची शक्यता असल्यास संबंधित जिल्हाधीकारी यांना अशा ठिकाणी टंचाई घोषीत करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. टंचाई घोषीत केल्यानंतर ती निवारण्याकरिता परिभाषित केलेल्या १० उपाययोजनापैकी किमान खर्चीक योजना राबविण्यासाठी स्थायी आदेशान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. टँकरने पाणी पुरवठा

करण्याची उपाययोजना इतर उपाययोजना त्या क्षेत्रात/भागात अस्तीत्वात येऊ शकत नसल्यास, शेवटचा पर्याय म्हणून योजण्यात येते.

सदर उपाययोजना उपयोगात आणताना शासनाचा खर्च किमान व्हावा याकरिता शासकीय टँकर उपयोगात आणले जातात. शासकीय टँकर अपुरे पडत असल्यास अथवा उपलब्ध नसल्यास खाजगी टँकरचा विचार करण्यात येतो.

नाशिक जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०२१ ते जून, २०२२ या टंचाई आराखड्यानुसार टँकरने पाणीपुरवठा करणे व खाजगी विहीर अधिग्रहण करणे या दोन उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात आलेली होती. माहे एप्रिल, २०२२ च्या सुरुवातीच्या कालावधीत नाशिक जिल्हायात एकूण ३ गावाकरिता २ शासकीय टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला असून माहे जून, २०२२ मध्ये ९२ गावे व १६१ वाडयाकरिता १४ शासकीय व ७१ खाजगी असे एकूण ८५ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे. तर, ७८ खाजगी विहिरी अधिग्रहण करण्यात आल्या होत्या.

सदर टंचाई कालवधीत टंचाई निवारणार्थ घेण्यात आलेल्या उपाययोजनांपैकी खाजगी टँकरने पाणी पुरवठा केलेल्या देयकांसाठी रु. ४ कोटी २९ लाख १५ हजार व खाजगी विहीर अधिग्रहण करण्याकरीता खर्ची पडलेल्या देयकांसाठी रु. ४६ लाख ५६ हजार अशी एकूण रु.४ कोटी ७५ लाख ८१ हजार इतक्या निधीची मागणी विभागीय आयुक्त, नाशिक यांनी शासनाकडे केली आहे. मात्र, त्यामध्ये शासकीय टँकरच्या इंधन खर्चाकरीता निधीची मागणी करण्यात आलेली नाही.

राज्यात टंचाई निवारणार्थ घेण्यात आलेल्या उपाययोजनांसाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये रु. ९३ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला. त्यापैकी टंचाई कालावधी सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या कालवधीतील देयकांसाठी रु. ९२ कोटी ९८ लाख २९ हजार इतका निधी क्षेत्रिय कार्यालयांना वितरीत करण्यात आलेला आहे.

सदर निधी वगळता, टंचाई निवारणार्थ योजिलेल्या विविध उपाययोजनेवरील खर्चापोटी देयकाची अदायगी करण्यासाठी चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मंजूर झालेल्या पुरक मागणीद्वारे प्राप्त निधीतून क्षेत्रीय कार्यालयांना मार्च, २०२३ अखेरपर्यंत निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येत आहे, त्यामध्ये नाशिक जिल्ह्यातील प्रलंबित देयकांचाही समावेश आहे.

---

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. धनंजय मुंडे, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्य शासनाच्या अंगिकृत विज वितरण महानिर्मिती कंपनीमध्ये कनिष्ठ अभियंता व सहाय्यक अभियंता या पदाच्या पदभरतीची जाहिरात महानिर्मिती कंपनीमार्फत या वर्षी प्रसिध्द करण्यात येणे, सदर जाहिरातीमध्ये, आरक्षित वर्गाला अधिवास प्रमाणपत्र (डोमीसाईल-Domicile Certificate) सादर करणे अनिवार्य करण्यात आल्याचे निदर्शनास येणे परंतु सदर जाहिरातीमध्ये खुल्या वर्गातील उमेदवारांना तसे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य नसल्याचे दि. २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे नोकरभरतीमध्ये राज्यातील खुल्या प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय होण्याची शक्यता नाकारता न येणे तसेच अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य नसल्याने परराज्यातील उमेदवार सदर भरती प्रक्रियेत सहभागी होण्याची शक्यता असल्याने राज्यातील स्थानिक उमेदवारांना नोकरीची संधी उपलब्ध होण्यावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता, त्यामुळे महानिर्मितीच्या पदभरती प्रक्रियेत सर्व उमेदवारांनाच अधिवास प्रमाणपत्र (डोमीसाईल सर्टिफिकेट) अनिवार्य करण्याबाबत शासनाने तसे शुध्दीपत्रक तातडीने काढण्याची मा. लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी करण्यात येणे व तसेच मा. उपमुख्यमंत्री यांना पत्र-निवेदने देण्यात आल्याचेही माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, परिणामी राज्यातील मा. लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी लक्षात घेता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**श्री. देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन**

महानिर्मिती कंपनीकडून सहाय्यक अभियंता व कनिष्ठ अभियंता या पदांची अनुक्रमे ३३९ जागा व ३२२ रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक १७.११.२०२२ रोजी सरळसेवा जाहिरात क्र. १०/ २०२२ प्रसिध्द करण्यात आली होती. सदर पदांच्या जाहिरातीमध्ये जे उमेदवार आरक्षित प्रवर्गाचे लाभ घेऊ इच्छितात अशा उमेदवारांना महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असल्याबाबत महानिर्मितीच्या जाहीरात क्र. १०/२०२२ मध्ये नमूद करण्यात आले होते व सदर जाहिरातीमध्ये खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना अधिवास प्रमाणपत्र सादर करण्याबाबत कोणताही उल्लेख करण्यात आला नव्हता.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या गट-अ व गट - ब संवर्गातील विविध पदांसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरात क्र. ४५/२०२२ मधील अनुक्रमांक ५.१३ व गट-क संवर्गातील विविध पदांसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरात क्र. ७७/२०२२ मधील अनुक्रमांक ५.१४ मध्ये नमूद

P81



केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. म्हणजेच खुला (अराखीव) प्रवर्ग वगळून इतर सामाजिक व समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारांना अधिवास प्रमाणपत्र (डोमीसाईल - Domicile Certificate) सादर करणे आवश्यक ठरते. याशिवाय महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६, दि.१०.०७.२००८ अन्वये, "महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नियुक्ती देण्यासंदर्भात सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, भारतीय संविधानाच्या अनुछेद ३०९ खालील परंतुका अन्वये प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार तयार करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियमांच्या प्रारुपामध्ये महाराष्ट्र राज्यात किमान वास्तव्याची अट अंतर्भूत करण्यात आलेली नाही. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून देण्यात येणाऱ्या जाहिरातीमध्येही अशा प्रकारची अट विहित केलेली नसते."

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग यांच्या परिपत्रक दि.३१.०८.२०१२ च्या अनुक्रमांक (क) मध्ये नमूद केले आहे की, इतर राज्याच्या (महाराष्ट्र राज्याखेरीज) मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारण करीत असलेला उमेदवार हा मागास प्रवर्गाचे लाभ घेण्यासाठी केवळ सदरील मुळ राज्यात / केंद्र शासनात पात्र असेल, तथापि, सदरील व्यक्ती महाराष्ट्र राज्यात मागास वर्गासाठी अनुज्ञेय असलेल्या लाभासाठी पात्र असणार नाही.

उपरोक्त नमुद तरतुदीनुसार महानिर्मिती कंपनीद्वारे जाहिरात क्र. १०/२०२२ मध्ये आरक्षित प्रवर्गाचे लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाण (डोमीसाईल Domicile Certificate) सादर करणे अनिवार्य करण्यात आले होते व खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र सादर करण्याबाबत कोणताही उल्लेख करण्यात आला नव्हता.

तथापि, महानिर्मिती कंपनीच्या उपरोक्त जाहिरातीच्या अनुषंगाने खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांना देखील महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (डोमीसाईल-Domicile Certificate) अनिवार्य करण्याबाबत उमेदवारांकडून महानिर्मिती कंपनीस निवेदने प्राप्त झाली होती. त्यामुळे महानिर्मिती कंपनीने अधिसूचना क्र. ११३१३ दि. ०५.१२.२०२२ अन्वये सहाय्यक अभियंता व कनिष्ठ अभियंता या पदांच्या सरळसेवा जाहिरात क्र. १०/२०२२ अन्वये अर्ज सादर करताना सर्व उमेदवारांना (आरक्षित प्रवर्ग व खुला प्रवर्ग) अधिवास प्रमाणपत्र (डोमीसाईल-Domicile Certificate) सादर करणे बंधनकारक असल्याबाबत नमुद केले आहे.

*******************

१२०

<u>महाराष्ट्र विधानसभा</u>

<u>सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन</u>

**<u>लक्षेवधी सूचना क्र.१२६</u>**

**श्री.रोहित पवार, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली सूचना ( लक्षेवधी सूचना) पुढीलप्रमाणे आहे :-**

"सीना नदीवरील दहा कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे लातूर टाईप बॅरेजमध्ये रुपांतर करण्याची विस्तार व सुधारणा कार्यक्रमांतर्गत मान्यता मिळालेली असणे, सर्वेक्षण व अंदाजपत्रकाचे काम पूर्ण झालेले असून अद्यापही विभागाकडून कुठलीही कारवाई झालेली नसणे, सदर दहा कोल्हापूर बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याच्या कामास प्रायोगिक तत्वावर मान्यता दिलेली असतांना देखील सद्यःस्थितीत काम स्थगित असणे, सीना नदीवरील दहा कोल्हापूर पध्दतीचे बंधाऱ्याचे लातूर बॅरेजमध्ये रुपांतर करण्याबाबत **शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."**

---

## मा.उपमुख्यमंत्री(जलसंपदा) यांचे निवेदन

सीना नदीवरील १० को.प.बंधाऱ्यांचे लातूर टाईप बॅरेजमध्ये रुपातंर करण्याच्या स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने पत्र क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२४६/२२/सिंव्य(कामे), दि.२८/०६/२०२२ अन्वये सीना नदीवरील १० को.प.बंधाऱ्यांचे रुपांतरण बॅरेजमध्ये करणेचे काम विस्तार व सुधारणा कार्यक्रमांतर्गत प्रायोगिक तत्वावर हाती घेण्यास व सदर कामाकरिता आवश्यक सर्वेक्षण व अन्वेषण महामंडळाच्या सर्वेक्षणाच्या ठोक तरतूदीतून करून विहित पध्दतीने प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत मान्यता दिलेली आहे.

त्यानुषंगाने सीना नदीवरील को.प.बंधाऱ्याचे लातूर टाईप बॅरेजमध्ये रूपांतर करण्याच्या कामाचे प्राथमिक अन्वेषण अहवाल तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे. सदर कामाचा प्राथमिक अन्वेषण अहवाल तयार झाल्यानंतर विस्तार व सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत काम करण्याच्या प्रस्तावास प्रचलित नियमांच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्याचे नियोजन आहे.

********

रोता (H-1501-1-750)

लक्षवेधी सूचना क्र. १३२
महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री. रोहित पवार, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१३२ पुढीलप्रमाणे:-

"राज्यातील कुकडी प्रकल्पातील डिंभे माणिक डोह या बहुप्रतिक्षित बोगद्याच्या कामाला शासनाने मान्यता दिलेली असणे, सदर बोगद्याच्या बांधकामामुळे पावसाळ्यात डिंभे धरणातून वाहून जाणारे पावसाचे अतिरिक्त पाणी बोगद्याद्वारे माणिक डोह धरणात साठविले जाणे, सदर अतिरिक्त पाण्यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील कर्जतसह पारनेर, श्रीगोंदा आणि करमाळातालुक्यांना कुकडी प्रकल्पातुन एक अतिरिक्त आवर्तन मिळण्याची शक्यता असणे, इतकेच नव्हे तर या बोगद्यामुळे पुणे सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यातुन जाणाऱ्या राज्यातील सर्वात लांब अशा कुकडी डाव्या कालव्याला देखील अतिरिक्त आवर्तन मिळणार असल्याचे व त्यामुळे पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगांव आणि शिरुर तालुक्यातील पाण्याचा कोटा आहे तसाच राहणार असल्याने त्यावर कोणताही परिणाम होणार नसल्याचेही निदर्शनास येणे, याप्रकरणी शासनाने काही त्रुटी काढून त्याची पूर्तता करण्याबाबत कार्यकारी संचालक, म.कृ.खो.वि.महामंडळ यांना आदेशित करण्यात येणे, त्यानूसार त्रुटींची पूर्तता महामंडळाने करण्यात येऊन त्याबाबतचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात येणे व सदर प्रस्तावात, "कुकडी प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता शासनाने दि. ०८/११/१९६६ मध्ये दिलेली असल्याने सदरहु प्रशासकीय मान्यताही केंद्रीय पर्यावरण विभागाच्या नोटीफिकेशनच्या पुर्वी प्राप्त झालेली असल्याने आता नव्याने या प्रकल्पास पर्यावरण तसेच केंद्रीय जल आयागाच्या मान्यता घेण्याची आवश्यकता नसल्याचे प्रस्तावात महामंडळाकडून नमूद करण्यात येणे, अतिरिक्त पाणी बोगद्याच्या माध्यकातून माणिक डोह धरणात साठविण्यात आल्यास, धरण दरवर्षी भरणार असल्याने पूढील काळात कूकडी प्रकल्पासाठी पाणी कमी पडणार नसल्याचे दिसून येणे, तथापि बोगद्याचे काम सुरु करण्याबाबत जनतेची आग्रही मागणी असून शासनाने अद्याप बोगद्याचे काम सुरु केलेले नसणे, परिणामी भागातील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नैराश्येची भावना, याबाबत शासनाने सदर बोगद्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देऊन बोगद्याचे काम तातडीने हाती घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भुमिका."

---

श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

कुकडी प्रकल्पांतर्गत १) माणिकडोह २) वडज ३) येडगांव ४) डिंभे ५) पिंपळगाव जोगे या पाच धरणाचा समावेश होतो. कुकडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात पुणे जिल्हयातील १) आंबेगाव २) शिरुर ३) जुन्नर व अहमदनगर जिल्हयातील १) पारनेर २) कर्जत ३) श्रीगोंदा या तालुक्यातील तसेच सोलापूर जिल्हयातील करमाळा तालुक्यातील १,५५,०५६ हेक्टर लाभक्षेत्राचा समावेश आहे.

कुकडी प्रकल्पांतर्गत येडगाव धरणापासुन सुरु होणाऱ्या २४९ किमी लांबीच्या कुकडी डाव्या कालव्याद्वारे ८९,८७८ हे. सिंचन करण्यात येते. कुकडी डाव्या कालव्याचा वार्षिक पाणी वापर २०.७२ टि.एम.सी. असुन येडगाव धरणाचा उपयुक्त पाणी साठा १.९४ टि.एम.सी. आहे. कुकडी डाव्या कालव्यासाठी येडगाव धरणामध्ये वरील बाजुस असणाऱ्या डिंभे, माणिकडोह, पिंपळगाव जोगे, वडज धरणामधून पाणी सोडले जाते. माणिकडोह धरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर १९८६ ते २०२२ पर्यतचा येवा तपशिलाप्रमाणे तीन वर्षी माणिकडोह जलाशय पूर्ण क्षमतेने भरला आहे. माणिकडोह धरणस्थळ येथील येवा ५.१०१ टीएमसी इतका आहे. म्हणजेच ५.९० टीएमसी इतके पाणी कमी येते.डिंभे धरणाचा नियोजित पाणीवापर १४.६६ टीएमसी आहे. डिंभे धरणस्थळ येथील ७५ टक्के विश्वासार्हतेचा येवा १७.५६ अब्ज घनफूट असून त्यानुसार २.९० टीएमसी जादा पाणी उपलब्ध आहे. हे अतिरिक्त पाणी माणिकडोह जलाशयात डिंभे, माणिकडोह बोगद्याद्वारे घेणे असा प्रस्ताव आहे.

डिंभे धरणातून ५५ किमी लांबीच्या डिंभे डावा कालव्याद्वारे ६.२१ टि.एम.सी. पाणी येडगाव धरणात घेण्याची प्रकल्पीय तरतुद आहे. डिंभे डाव्या कालव्याचे काम रोहयो मधुन १९८० च्या दशकामध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

सततच्या कालवा आवर्तनाने भराव खचल्याने व अस्तरीकरणाची तुटफूट झाल्याने कालवा संकल्पित विसर्गाने चालत नाही तसेच मोठ्या प्रमाणात गळती व कालवा फुटीचे प्रकार होत आहेत. डिंभे डावा कालवा संकल्पित विसर्गाने न चालल्याने कालव्यावरील ३६,५२४ हे. क्षेत्रास सिंचन सुविधा पुरविणेसाठी वेळ लागतो व कुकडी डावा कालवा आवर्तनास आवश्यकता असताना व संकल्पित विसर्गाने येडगाव धरणात पाणी येत नाही. यास्तव कुकडी डावा कालवा आवर्तनामध्ये व्यत्यय येतो. यास्तव डिंभे डावा तीर कालव्यास पर्याय म्हणून डिंभे धरणाचे पाणी बोगद्याद्वारे माणिकडोह धरणात सोडणेच्या पर्यायाची आवश्यकता निर्माण झाली.

प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन मा. मंत्री, वैद्यकिय शिक्षण, जलसंपदा विभाग व लाभक्षेत्र विकास यांच्या अध्यक्षतेखाली दि.१२/१०/२०१८ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत डिंभे डावा तीर कालव्यास पर्याय म्हणून डिंभे धरणाचे पाणी बोगदयाद्वारे माणिकडोह धरणात सोडणेच्या कामाचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण करणेचा प्रस्ताव सादर करणेच्या सुचना देण्यात आल्या. बैठकीत दिलेल्या सुचनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या ९९ व्या नियामक मंडळाच्या बैठकतील ठराव क्र.९९/८ नुसार दि.१३ फेब्रुवारी २०१९ रोजी बोगद्यास मान्यता देण्यात आली आहे.

बोगद्याचे सविस्तर सर्वेक्षण व संकल्पन करण्यास शासन पत्र दि.०७ ऑगस्ट २०१९ अन्वये खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे:-

१)कुकडी प्रकल्पाच्या नियोजनाबाहेरील काम असल्याने प्रस्तूत कामाची तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता तसेच अभियांत्रिकी बदलाची स्विकारार्हता व निकडी बाबत राज्य तांत्रिक सल्लागार समितीचे अभिप्राय घेण्यात यावेत.

२)प्रस्तुत कामाचा समावेश कुकडी प्रकल्पाच्या मंजुर तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये नसल्याने सदर कामास सक्षम प्राधिकरणाची (मा.मंत्रिमंडळाची) मान्यता घेणे आवश्यक आहे.

३) प्रस्तुत कामास पर्यावरण मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही करावी.

त्यानुषंगाने डिंभे, माणिकडोह बोगद्याचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम प्रगतीपथावर आहे. एकूण १६.१० किमीपैकी १४.०० किमीचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम पूर्ण झाले आहेत. राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या (SLTAC) दि.१०/०६/२०२० रोजीच्या ४१ व्या बैठकीमध्ये डिंभे, माणिकडोह बोगद्याचा अहवाल, बोगद्याची MDDL व डिंभे डाव्या कालव्याची MDDL सारखीच ठेवण्याच्या अभिप्रायासह अंतिम करणेत आला. राज्य तांत्रिक सल्लागार समितीने (SLTAC) दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून शासनास प्राप्त झाला. कुकडी प्रकल्पाची मुळ प्रशासकीय मान्यता सन १९६६ मधील असुन, डिंभे, माणिकडोह जोड बोगदा प्रस्ताव कुकडी प्रकल्पाचाच भाग असल्याने आता नव्याने या प्रकल्पास पर्यावरण विभागाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

शासनाने दि.२८/०६/२०२२ च्या पत्रान्वये "प्रस्तावित जोड बोगद्यामुळे डिंभे धरणाच्या पाणी वापरात तसेच एकत्रित कुकडी समुहाच्या व्याप्तीत व सिंचनक्षेत्रात कोणतीही वाढ वा घट होत नसल्याचे प्रस्तावित सुधारीत प्रशासकीय मान्यता सादर करतेवेळी क्षेत्रिय कार्यालयाने प्रमाणित करुन बोगद्याच्या कामास सुप्रमामध्ये समावेश करण्यास तत्वत: मान्यता कळविली आहे. बोगद्याच्या कामाचा अंतर्भाव करुन चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर करावा व बोगद्याच्या तळपातळी संदर्भात राज्य तांत्रिक सल्लागार समितीने (SLTAC) शिफारस केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे दि.२७/०९/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये निर्देश दिले आहेत. डिंभे, माणिकडोह जोड बोगद्याचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच डिंभे, माणिकडोह जोडबोगद्याचे काम कुकडी प्रकल्पाच्या चतुर्थ सुप्रमा अहवालामध्ये समाविष्ठ करण्यासाठी डिंभे, माणिकडोह जोडबोगद्याचे रु.३५९.०८ कोटी इतक्या किंमतीचे सुधारीत अंदाजपत्रक क्षेत्रिय स्तरावर तयार करण्यात आले आहे.

**********************************

H|95A-19

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

श्रीम. नमिता मुंदडा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २९८ पुढीलप्रमाणे:-

" धनेगाव, ता. केज, जि, बीड. प्रकल्पाची ०.५० मीटर ने उंची वाढवण्यास शासनाने दि. ०३/०४/२००१ रोजी मान्यता दिली असणे, व सदर काम यांत्रिकी विभाग दापोडी, पुणे. यांच्या मार्फत सन- २००१ मध्ये सुरु होऊन एका वर्षाच्या आत पूर्ण करण्यात आले असणे, सदर उंची वाढीमुळे केज, जि. बीड. तालुक्यातील डाव्या तीरावरील १२ गावांची ५२.१५ हेक्टर शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली असणे, परंतु अद्याप सदर शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा मावेजा देण्यात आला नसणे, मागील १४ वर्षपासून मावेजा पासून शेतकरी वंचित असणे, त्यामुळे शेतक-यांच्या मनात शासनाविषयी असंतोषाची भावना निर्माण होणे, तेव्हा सदर प्रकरणी तातडीने संबंधित शेतक-यांना संपादित जमिनीचा मावेजा देण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

## मा. उप मुख्यमंत्री(जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांचे निवेदन

बीड जिल्हयातील धनेगांव ता.केज येथे मांजरा नदीवर धरण बांधण्यास शासन निर्णय क्र. पीआयएन/३९९३५/२५ दिनांक २८/७/१९७५ अन्वये रु.१७.१४ कोटीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. प्रकल्पाचे काम सन १९७५ मध्ये सुरु करुन सन १९८० मध्ये पुर्ण करण्यात आलेला असुन तद्नंतर प्रकल्प व्यवस्थापनासाठी लातूर पाटबंधारे विभाग लातूर यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. मा.मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य) यांच्या समवेत दि.०३/०४/२००१ रोजी मांजरा प्रकल्प उंचीवाढ संदर्भात बैठक होऊन त्यात धरणाची उंची ०.५० मी. ने वाढविण्याचे ठरले. त्यानुसार मांजरा प्रकल्पाच्या व्दितीय सुधारीत अंदाजपत्रकात सदर धरण उंची वाढीचा अंतर्भाव करण्यात आला आहे. मांजरा प्रकल्प व्दितीय सुप्रमास प्रस्तावास शासन निर्णय दि.०९/०१/२००३ रोजी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

मांजरा प्रकल्पांतर्गत १८ वक्र दरवाजांची ०.५० मी ने उंची वाढीचे काम यांत्रिकी विभाग दापोडी पुणे यांचे मार्फत सन २००१ मध्ये सुरु होऊन एक वर्षात पुर्ण करण्यात आलेले आहे. उंची वाढ या कामाअंतर्गत धरणाच्या माती कामाची उंची वाढविण्यात आलेली नाही.

मांजरा प्रकल्पाच्या उजव्या तिरावरील ता.कळंब जि.उस्मानाबाद मधील ५ गावांचे ३९.७८ हे.ची संयुक्त मोजणी २००८ मध्ये करण्यात आली व उजव्या तिरावरील ता.केज जि.बीड मधील १२ गावांची ५४.६५ हे. ची संयुक्त मोजणी सन २०११ मध्ये करण्यात आली.

मांजरा धरणाची मुळ भूसंपादन पातळी ६४२.३७ मी.असून मांजरा धरणाची ०.५० मी. ने उंची वाढविल्यामुळे येणारी पुर्ण संचय पातळी ६४२.३७ मी. आहे. ज्याचे भूसंपादन पुर्वीच झालेले असल्यामुळे व पाणीसाठा पुर्वी संपादित केलेल्या पातळीत असल्याने अतिरिक्त भूसंपादन करण्याची आवश्यकता नसल्याने पुढील कार्यवाही करण्यात आली नाही. तद्नंतर मुख्य अभियंता (जसं),जलसंपदा विभाग,औरंगाबाद यांनी पत्र दि.१६/०३/२०१६ अन्वये सादर केल्यानुसार मांजरा धरणाची उंची वाढवल्यानंतर करावे लागणारे अतिरिक्त भूसंपादन अव्यवहार्य असल्यामुळे करण्यात येऊ नये अशा आशयाचा अहवाल महामंडळ पत्र दि.०७/०५/२०१६ अन्वये शासनास सादर केलेला आहे. मांजरा धरणात उंची वाढविल्यानंतर धरण १० वेळेस पूर्ण भरलेले आहे. या काळात जमिन पाण्याखाली जात असल्यामुळे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले नाही, अथवा शेतक-यांनी नुकसान भरपाई मागितल्याचे प्रकरण निदर्शनास आले नाही, असा क्षेत्रिय स्तरावरील अहवाल आहे.

मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे मांजरा प्रकल्पाची उंची वाढविल्यामुळे होणारे अतिरिक्त भूसंपादन कऱावे म्हणून बाधीत शेतक-यांनी रिट पिटिशन दाखल केलेले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

H189- 1a

**महाराष्ट्र विधानमंडळाचे सन२०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन,**

**महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्रीमती श्वेता महाले,विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.११३४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यात प्रकल्प कार्यान्वित करतांना बाधित लोकांचे पुनर्वसन करण्यात येणे, पुनर्वसन करताना घरासोबतच तेथील नागरिकांना मूलभूत सोई सुविधा सुद्धा उपलब्ध करून देण्यात येणे, परंतू सदर बाधित नागरिकांना सदर जागेचा कब्जा हक्क देताना सदर जागेच्या मूल्यांकनानुसार काही ठराविक रक्कम भरून घेतल्या शिवाय जागेचा कब्जा हक्क दिल्या न जाणे, प्रकल्प राबविताना प्रकल्पामुळे सदर नागरीक अगोदरच बाधित झालेला असणे, शेतकऱ्यांची जमीन हेच त्यांचे सर्वस्व असून त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालणे, त्यामुळे सदर बाधीत नागरिक कब्जा हक्क रक्कम भरू शकत नसणे, पर्यायाने सदर बाधितास जमिनीचा किंवा मिळालेल्या घराचा हक्क न मिळणे, त्यामुळे राज्यभरातील अनेक प्रकल्प ग्रस्तांनी कब्जा हक्क रक्कम भरलेली नसल्याने त्यांना त्यांच्या हक्काचं घर मिळालेले नसणे, तसेच केवळ याच कारणामुळे अनेक पुनर्वसनाचे प्रकल्प रखडलेले असणे, उदा. माझ्या चिखली तालुक्यातील पेन टाकळी प्रकल्पातील घाणमोड, मानमोड, अंशतः बाधीत पांढर देव या पुनर्वसित गावातील नागरिकांना अजूनही त्यांच्या प्लॉटचा कब्जा हक्क दिलेला नसणे, कोणतेही पुनर्वसन करताना त्या ठिकाणी सर्व सुविधा शासनाकडुन उपलब्ध करून देत असताना केवळ कब्जा हक्क रक्कम बधिताकडून घेणे संयुक्तिक नसणे, यासाठी पुनर्वसीत गावातील लाभार्थीना प्लॉट किंवा घरे देताना कब्जा हक्क रक्कम न घेता देण्यात यावे किंवा कब्जा हक्क रक्कम शासनाने भरावी अशी होणारी मागणी, याकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यावरील कार्यवाही तथा उपाययोजना. "

**मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन**

महाराष्ट्र राज्यात प्रकल्पांमुळे बाधित होणा-या लोकांचे पुनर्वसन, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९, व भूमीसंपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ नुसार करण्यात येते. सदर कायद्यातील तरतुदीप्रमाणे प्रकल्प बाधितांना सुविधा पुरविण्यात येतात. प्रकल्पबाधितांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचा प्रत्यक्ष ताबा देतांना कब्जे हक्काची रक्कम शासन निर्णय क्र.आरपीए-१०७०/Occupancy/R-1,दिनांक ४.९.१९७१ नुसार निश्चित करुन सदरची रक्कम प्रकल्प बाधितांनी जमा करणे अभिप्रेत आहे. सदर रक्कम भरण्यात आल्यानंतरच प्रकल्प बाधितांना जागेचा प्रत्यक्ष ताबा देण्यात येतो. प्रकल्प बाधितांनी कब्जे हक्काची रक्कम न भरल्याने प्रकल्पांचे पुनर्वसन रखडलेले असणे ही वस्तुस्थिती आहे.

चिखली तालुक्यातील पेनटाकळी प्रकल्पांतर्गत पूर्णत: बाधित धानमोड,मानमोड गावातील बाधितांची कुटुंब संख्या १८८ असून, त्यासाठी कब्जे हक्कापोटी अंदाजे रु.१.८० कोटी व अंशत: बाधित पांढरदेव या गावातील ५४ कुटुंबे असून, त्यापोटी कब्जे हक्काची रक्कम रु.०.६५ कोटी इतकी भरणे अपेक्षित आहे. उपरोक्त नमूद गावातील बाधितांना जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्यामार्फत भूखंड वाटप

करण्यात आलेले असून, कब्जे हक्काची रक्कम न भरल्याने प्रत्यक्ष भूखंडाचा ताबा देण्यात आलेला नाही व सदर गावांचे पुनर्वसन करतांना कायद्याप्रमाणे नागरी सुविधा शासनामार्फत पुरविण्यात येत आंहेत.

कब्जे हक्काची रक्कम न घेता किंवा सदरची रक्कम शासनाने भरावी या मुद्दयाच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींकडून विभागास प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कब्जे हक्काची रक्कम माफ करणे ही बाब पुनर्वसन कायदा,१९९९ व २०१३ नुसार मदत व पुनर्वसन विभागास अभिप्रायार्थ सादर करण्यात आली असता कब्जे हक्काची रक्कम न घेणे किंवा सदरची रक्कम शासनाने भरणे या बाबीमुळे वित्तीय भार वाढणार असल्याने त्याबाबत वित्त विभागाचे अभिप्राय घेणेबाबत मदत व पुनर्वसन विभागाने अभिप्राय दिलेले आहेत. त्यानुसार वित्त विभागाचे अभिप्राय घेवून सदर बाबत उचित निर्णय घेण्याचे नियोजित आहे.

*************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक १४२५

**श्री. महेंद्र दळवी, श्री. शांताराम मोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" भिवंडी, जि.ठाणे मधील खारभूमी योजनेच्या खूप मोठ्या खांडी असनू खाड्यांमधील खार पाणी शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, ग्रामपंचायत कांबे हद्दीतील तळेखार खारभूमी योजनेत मोठ्याप्रमाणात खांडी असणे, सदरच्या खांडी दुरूस्ती करण्याची स्थानिक लोकप्रतीनिधी व शेतक-यांकडुन उपविभागीय अभियंता, खारभूमी उपविभाग, भिवंडी यांच्याकडे वर्षानोवर्षे होत असलेली मागणी, परंतू संबंधित अधिकारी शेतक-यांना न्याय देण्याच्या दृष्टीने कोणतीच कार्यवाही न करणे, तसेच अंजुर दिवे खारभूमी योजना या योजनेच्या बांधावर कोणत्या प्रकारे काम न झाल्याचे निदर्शनास येणे , त्या कामांचे उपविभागीय अभियंता, खारभूमी उपविभाग, भिवंडी यांच्या मार्फत प्रत्यक्षात काम न झाल्याचे देयक (बी-१/६७-२०१९-२०२०) कंत्राटदाराला अदा करणे, तसेच मालोडी ग्रामपंचायत, ता.भिवंडी जि.ठाणे हद्दीतील अन्नपुर्णा खारभूमी योजनेच्या अंतर्गत मोठ्या प्रमाणात खांडी असून मागील दोन वर्षे पासुन शेतक-यांकडून खांड्यांची दुरूस्ती करण्यात यावी याकरिता उपविभागीय अभियंता, खारभूमी उपविभाग, भिवंडी यांच्याकडे मागणी करूनही संबंधित अधिका-याकडून कोणती कार्यवाही न करणे, शेतक-यांच्या शेती नापीक करून शेतजमीन विकासकांना विकण्यास भाग पाडण्यास संबंधित अधिका-यामार्फत प्रवृत केले जात असल्याचे तक्रार प्राप्त असणे, संबंधित अधिकारी वर्षानोवर्षे एकाच ठिकाणी काम करत असणे स्थानिक नागरिकांमध्ये व शेतक-यांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, खा-या पाण्यामुळे शेतजमीनीचे होणारे नुकसान तसेच स्थानीक लोकांच्या घरात खारपाणी जाऊन घराचे होणारे नुकसान थांबविण्यासाठी तसेच अधिकाराचा गैरवापर करणा-या उपविभागीय अभियंता, खारभूमी उपविभाग, भिवंडी, जि.ठाणे यांच्या विरूध्द शासन कोणती तातडीची कार्यवाही व उपाय योजना करणार आहे, या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात एकूण २१ पूर्ण झालेल्या खारभूमी योजना असून २ योजना बांधकामाधीन आहेत. पूर्ण झालेल्या योजनांपैकी मागील ५ वर्षात गाणेफिरंगी पाडा व गावखार जुनादुर्खी या २ योजनांचे नूतनीकरण सन २०२२ मध्ये पूर्ण करण्यात आले असून सद्य:स्थितीत काल्हेर केवणी मोतीदिवा व कोळ्याचा कोपरा या योजनांच्या नूतनीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

भिवंडी तालुक्यातील खारभूमी योजनांवर वारंवार पडणाऱ्या खांडीवर उपाययोजना करण्याकरीता विभागाकडून सन २०२१-२२ या वर्षात भिवंडी तालुक्यातील ११ योजनांची दुरुस्तीची कामे विस्तार व सुधारणा योजनेअंतर्गत हाती घेण्यात आली होती. त्यापैकी कांबेकटाई व तळीखार या २ योजना वगळता इतर ९ योजनांच्या उपाययोजना पूर्ण झाल्या असून कांबेकटाई व तळीखार योजनांच्या दुरुस्तीच्या कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून सदरचे काम मे २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

अंजूर दिवा योजनेच्या सा. क्र. ३३३० ते सा. क्र. ४१६० मधील भागातील मोठ्या प्रमाणात बांधाची धूप झाल्याने बी -१/६७-२०१९-२० अन्वये सन २०१९-२० च्या आर्थिक वर्षात अंजुर गावाचे रहिवासी भिवंडी लोकसभा मतदार संघाचे खासदार व सध्याचे केंद्रीय पंचायत राज्यमंत्री माननीय श्री. कपिल पाटील यांनी प्रत्यक्ष भेटीत सुचविल्याप्रमाणे सदर दुरुस्तीचे काम हे विस्तार व सुधारणा या लेखाशिर्षांतर्गत मार्च २०२० अखेर पूर्ण करून घेण्यात आले असून सद्य:स्थितीत सदरचे काम सुस्थितीत आहे. मागील ५ वर्षात अंजुर दिवा योजनेवर रुपये २८.८३ लक्ष रकमेची एकूण कामे करण्यात आली आहेत. सदर कामांबद्दल अद्याप पर्यंत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

रेटा H|००३| (450-4-23)

(म.मा.प.)

या व्यतिरिक्त चोरखार अन्नपूर्णा खारभूमी योजनेच्या नूतनीकरणाच्या कामाचे अंदाजपत्रक शेतकरी/लाभार्थी संस्थेच्या मागणी प्रमाणे तात्काळ तयार करून सदर कामास प्रशासकीय मान्यता ऑक्टोबर, २०२१ मध्ये देण्यात आली असून दरसूचीतील बदल, स्वामित्व शुल्कातील वाढ व जीएसटी दरातील वाढ यामुळे तांत्रिक मान्यता किंमत ही प्रशासकीय मान्यता किंमतीपेक्षा जास्त येत असल्याने प्रत्यक्षात निविदा न काढता सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. सदर प्रस्तावास मान्यता प्रदान करुन त्याची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन चोरखार अन्नपूर्णा योजनेचे संपूर्ण काम मे, २०२४ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

विभागाच्या अखत्यारीतील सर्व योजनांची शासनाने वितरित केलेल्या निधीच्या मर्यादेत देखभाल दुरुस्ती व नूतनीकरणाची तसेच बांधकामाची सर्व कामे करण्यात येत असल्याने व भिवंडी तालुक्यातील कांबेकटाई व तळीखार वगळता इतर सर्व योजनेंचे बांध सद्यस्थितीत सुस्थितीत असल्याने शेतकऱ्यांची शेती जाणूनबुजून नापिक करण्याचा व शेतजमीन विकासकांना विकण्यास भाग पाडण्यास प्रवृत्त करण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

सन २०२१ व सन २०२२ च्या पावसाळ्यात बंधाऱ्यांची दुरावस्था झाल्याने व खांडी पडल्याने स्थानिक लोकांच्या घरात पाणी शिरल्याची कोणतीही तक्रार या विभागास प्राप्त झालेली नाही. मागील ३ वर्षात भिवंडी तालुक्यातील स्थानिक शेतकऱ्यांकडून ११ कामांची व केंद्रीय राज्यमंत्री यांचे कडून १ कामाची मागणी विभागास करण्यात आली असून त्यापैकी ७ कामे पूर्ण करण्यात आली असून ५ कामे प्रगतीपथावर आहेत.

जनहित याचिका क्रमांक ८६/२००६ मध्ये माननीय उच्च न्यायालयाने निर्देशित केल्याप्रमाणे भिवंडी तालुक्यातील ३२ गावांमधील ५५४.८२ हेक्टर राखीव वनक्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून घोषित केलेल्या वनक्षेत्राचे प्रत्यक्ष सीमांकन न करता यापूर्वीच अस्तित्वात असलेल्या खारभूमी बांधाच्या चालू असलेल्या २ कामांवर (भरोडी व काल्हेर केवणी मोती दिवा ता. भिवंडी) वनविभागाने वन गुन्हा दाखल केला असल्याने भिवंडी तालुक्यातील खारभूमी बंधाऱ्याचे काम करताना कंत्राटदारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून त्यांना काम करण्यासाठी मशिनरी उपलब्ध होत नसल्याने कामांच्या गतीवर परिणाम होत असून यावर्षी सुरू असलेली कामे मंद गतीने सुरू आहेत. दिनांक १३/०३/२०२३ रोजी उपविभागीय अधिकारी, भिवंडी (महसूल) यांच्या कार्यालयात वनपरिक्षेत्र अधिकारी (कांदळवन कक्ष) व तालुका भूमी अभिलेख अधिकारी यांचे सोबत बैठक पार पडलेली असून त्यात वन विभागामार्फत मोजणी शुल्क भरून राखीव वनक्षेत्राचे सीमांकन करण्याचे व तोपर्यंत खारभूमी बंधाऱ्याच्या दुरुस्तीची कामे सुरू ठेवण्याचे आश्वासित केले आहे. खारभूमी बंधाऱ्याचे काम करताना विभागातर्फे पुन:प्रापित क्षेत्रातील लाभार्थी संस्था यांना विश्वासात घेऊन कामे केली जात असल्याने व कामाची देखरेख स्वतः लाभार्थी संस्था करीत असल्याने सहसा कामाविषयी तक्रार प्राप्त होत नाही.

उपविभागीय अभियंता, खारभूमी विकास उपविभाग, भिवंडी या पदावर श्री. सुभाष माने दिनांक ०६/०३/२०१९ पासून कार्यरत असून दिनांक ३१/०५/२०२२ रोजीच्या नियमित बदल्यांमध्ये श्री. माने पात्र होते. परंतु शासनाने सर्वच बदल्यांना स्थगिती दिल्यामुळे सन २०२२ मध्ये नियमित बदल्या झालेल्या नसल्याने श्री. माने अद्याप उपविभागीय अभियंता या पदावर त्याच कार्यालयात कार्यरत आहेत व यात त्यांचा दोष आढळून येत नाही.

********

## लक्षवेधी सूचना क्र.१४३१
## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री. राम विठ्ठल सातपुते, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१४३१ पुढीलप्रमाणे:-

"माझ्या माळशिरस मतदार संघातील कायम दुष्काळी भागाला पाणी मिळावे म्हणून नीरा देवधर धरणाची योजना तयार करण्यात येणे, सन १९८४ साली महाराष्ट्र सरकारने सातारा व सोलापूर जिल्हयातील कायम दुष्काळी भागाला पाणी मिळावे म्हणून नीरा देवधर धरणाची योजना तयार करण्यात येणे. सन १९९५ साली युती सरकारने या योजनेला मंजूरी देउन प्रत्यक्ष कामाला सुरूवात होऊन व सन २००१ ला १२ टीएमसी क्षमतेचे धरण बांधून पूर्ण होणे. सन २००१-०२ पासून या धरणातील पाणी वीर धरणात सोडण्यात येत असणे. या पाण्याचा उपयोग या धरणाच्या कार्यक्षेत्राबाहेरील गावांना होत असणे. माळशिरस तालुक्यातील २२ गावांपैकी १६ गावांना या योजनेचा लाभ मिळावा म्हणून आपल्या युती सरकारकडून सुधारित प्रशासकीय मान्यता मंजूर करणे. परंतु २२ गावांपैकी ९ गावे अद्यापही या योजनेत समावेश होण्यापासून वंचित असणे. मार्च २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये भरीव निधीची तरतुद करून फडतरी (शिवारवस्ती), लोंढेमोहितेवाडी, भांब, गारवाड,मगरवाडी, पठाणवस्ती, तरंगफळ. सुळेवाडी, शिंगोर्णी व बचेरी या गावांचा समावेश नीरा देवधर प्रकल्प योजनेमध्ये समावेश होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील निरा देवघर प्रकल्पास शासन निर्णय दि.२९/०५/१९८४ अन्वये रु.६१४७.६६ लक्ष रकमेस मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. तदनंतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा निर्णय दि.२९/०५/२००० अन्वये रु.५८८६५.२४ लक्ष रकमेस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता तसेच दि.१६/१०/२००२ अन्वये रु.९१०९०.९० लक्ष किंमतीस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे भोर, खंडाळा, फलटण व माळशिरस या चार तालुक्यातील एकूण ४३०५० हे. क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

नीरा देवघर धरणात सन २००८ पासून पूर्ण क्षमतेने तर गुंजवणी धरणात सन २००७ पासून ०.७० टी.एम.सी. पाणीसाठा निर्मीत झालेला होता. या दोन्ही प्रकल्पांच्या कालव्याची कामे पूर्ण होऊ न शकल्याने त्यांच्या नियोजीत लाभक्षेत्रात पाणी वापर होऊ शकत नाही, ही बाब विचारात घेऊन या पाण्याचा वापर होण्याच्या दृष्टीने या दोन्ही धरणात उपलब्ध होणाऱ्या पाणीसाठयापैकी ६० टक्के पाणी नीरा डावा

कालव्यासाठी व ४० टक्के पाणी नीरा उजवा कालव्यासाठी दि.०४/०४/२००७ रोजीच्या आदेशानुसार शासनाने दि.०४/०४/२००७ ते दि.०३/०४/२०१२ या कालावधीसाठी मंजुरी दिली होती. तदनंतर दिलेली मंजुरी पुढील ५ वर्षाकरिता म्हणजेच दि.०४/०४/२०१२ ते दि.०३/०४/२०१७ पर्यंत वाढविण्यात आली होती. सदर मुदत संपुष्टात आल्यानंतर सन २०१९ पर्यंत कालवा सल्लागार समितीने ठरलेल्या नियोजनानुसार निरा डावा व उजव्या कालव्यासाठी पाणी वाटप पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांच्यामार्फत होत आहे.

निरा देवघर धरणाचे काम सन २००८ मध्ये पुर्ण झाले असून सन २००८ पासून धरणामध्ये पुर्ण क्षमतेने म्हणजे ११.९१ टी.एम.सी. पाणीसाठा करण्यात येत आहे. निरा देवघर उजवा कालव्याच्या १५८ कि.मी. लांबी पैकी ६५ कि.मी. पर्यंतचे कालव्याचे काम पूर्ण झाले असून सन २०१६-१७ पासून कालव्यामध्ये पाणी सोडून सिंचन करण्यात येत आहे. उर्वरीत ६६ ते १५८ कि.मी. मधील काम बंद पाईपलाईनद्वारे करण्याचे प्रस्तावीत आहे. सदर काम तसेच डावा कालवा, गावडेवाडी, शेखमिरवाडी आणि वाघोशी या तीन उपसा सिंचन योजनाची प्रकल्पास तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर हाती घेण्याचे नियोजित आहे. या प्रकल्पाच्या रु.३९७६.८३ कोटी खर्चाचा तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास दि.२२/०२/२०२३ रोजीच्या मा. मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

माळशिरस तालुक्यातील फडतरी (शिवारवस्ती), भांब, गारवाड, मगरवाडी, पठाणवाडी, तरांगफळ, सुळेवडी, शिंगोणी, बेचरी ही गावे निरा देवघर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात समाविष्ट नाहीत. निरा देवघर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात माळशिरस तालुक्यातील १०९७० हे. क्षेत्र (ICA) समाविष्ट असून मंजूर द्वितीय सुप्रमा अहवालाप्रमाणे माळशिरस तालुक्यातील, गिरवी, पिंपरी (कचरेवस्ती), लोणंद, कण्हेर, इस्लामपूर, रेडे, मांडकी, गोरडवाडी, धर्मपुरी (बांम्बूर्डी), कारुंडे, मोरोची, नातेपुते, मांडवे, माळशिरस (मोहीतेवाडी), मोतेवाडी, दहीगाव अशा एकूण १६ गावांचा समावेश आहे.

शासन निर्णय दि.०२/०२/२०१०७ मधील निर्देशानुसार निरा देवघर प्रकल्पात बंद नलिका वितरण प्रणालीमुळे बचत होणारे पाणी वाटपाबाबत शासन स्तरावर उचित निर्णय घेण्यात येईल. प्रकल्पासाठी सन २०२३-२४ वर्षासाठी रु.३५० कोटी रकमेची तरतूद क्षेत्रिय कार्यालयाने प्रस्तावित केली असून प्रकल्प लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

****************************************

H95-B-19

<u>लक्षवेधी सूचना क्र. १५७४</u>

<u>महाराष्ट्र विधानसभा</u>

<u>सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन</u>

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री. विश्वजित कदम, श्री. अशोकराव चव्हाण, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१५७४ पुढीलप्रमाणे:-

"सांगली व सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी भागाला कायमस्वरूपी पाणी मिळावे यासाठी शासनाने टेंभू योजना सुरू करणे, परंतू टेंभू सिंचन योजना ३० वर्षांपासून रखडली असणे, मुख्य जोड कालव्यासह पोट कालव्यांच्या अस्तरीकरणाचे काम निकृष्ट झाले असणे, वारंवार तक्रारी करूनही कामे पारदर्शक झाली नसणे, अस्तरीकरणाच्या कामास तडे गेल्याने लाखो लिटर पाणी वाया जात असणे, त्यामुळे मागील काही वर्षांत या योजनेच्या झालेल्या कामाची चौकशी व्हावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होणे, सांगली व सोलापूर दुष्काळी भागातील सुमारे ८० हजार हेक्टर क्षेत्राला पाणी देण्याची ही योजना असून आशिया खंडातील सर्वात मोठी योजना म्हणून ही योजना ओळखली जाणे,कराड येथील कृष्णा नदीचे पाणी अडवून चक्क सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यापर्यंत सुमारे २१३ गावांना पाणी देण्याचा या योजनेचा मूळ उद्देश असणे, टेंभू योजना सुरु झाल्यापासून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची चर्चा सातत्त्याने जनमानसात होत असणे, या योजनेच्या अस्तरीकरणाला केवळ दोन ते तीन वर्षात तडे जाणे, या योजनेचे काम जलद करण्यापेक्षा योजना वर्षानुवर्षे रखडत ठेवणे, याकडेच अधिकाऱ्यांनी लक्ष दिले नसणे, असे आरोप शेतकरीवर्गातून होत असणे, परिणामी २७ वर्षांत ही योजना आज देखील पूर्ण क्षमतेने सुरू झालेली नसणे, त्यामुळे दुष्काळी जनतेमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन टेंभू धरणाचे काम तातडीने पुर्ण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

---

श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

टेंभू उपसा सिंचन योजनेतून विविध टप्प्यांद्वारे २२ टी.एम.सी.पाणी उचलून सातारा, सांगली व सोलापूर जिल्हयातील ७ तालुक्यातील एकूण २४० गावामधील ८०,४७२ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे. सातारा जिल्ह्यातील ५ गावे, सांगली जिल्ह्यातील २०४ गावे व सोलापूर जिल्हयातील सांगोला तालूक्यातील ३१ गावांचा लाभक्षेत्रातर्गंत समावेश आहे.

टेंभू उपसा सिंचन योजना, ता. कराड, जि. सातारा या प्रकल्पास शासन निर्णय दि.०४/०२/२०१९ अन्वये रु.४०८८.९४ कोटी इतक्या किंमतीची द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली आहे. प्रकल्पावर सन २०२२-२३ अखेर रु.११८८.६२ कोटी इतका खर्च झाला आहे.

टेंभू उपसा सिंचन प्रकल्पाचा समावेश केंद्र सरकारच्या (विशेष पॅकेज) बळीराजा जलसंजीवनी योजनेत सन २०१६-१७ मध्ये समावेश केला आहे. प्रकल्पामधील जवळपास ७४,००० हे. सिंचन क्षेत्राची निर्मिती म्हणजेच प्रकल्पाच्या एकूण सिंचनक्षेत्राच्या ९०% सिंचन निर्मिती ही बळीराजा जलसंजीवनी योजनेंतर्गत झाली आहे. सदर प्रकल्पावरील नियोजित सर्व टप्प्यांवरील कामे पूर्ण करुन कार्यान्वित करणे तसेच सर्व मुख्य व शाखा कालव्यांची कामे पूर्ण झाली आहेत.

टेंभू प्रकल्पाच्या एकूण ५ टप्प्यापैकी सुरूवातीचे टप्पा-१ अ, टप्पा-१ ब, टप्पा-२, सन २००९ ते सन २०१४ या कालावधीत, टप्पा-३ अ, टप्पा-३ ब सन २०१४ मध्ये , टप्पा-४ वेजेगांव नोव्हेंबर-२०१८ मध्ये व टप्पा-५ भूड एप्रिल-२०१९ मध्ये कार्यान्वित करणेत आले आहेत. तासगांव तालुक्यातील ७७०० हे क्षेत्रासाठी असलेल्या विसापूर पुणदी उपसा योजनेचे सर्व टप्पे सन २०१७ मध्ये कार्यान्वित करणेत आले आहेत.

टेंभू प्रकल्पाच्या मुख्य जोड कालव्याव्यतिरिक्त सर्व मुख्य कालवे, शाखा कालवे यांची अस्तरीकरणाची कामे गुणवत्तापूर्ण झाली असून सर्व कालवे प्रवाहीत झालेले आहेत. टेंभू कालव्याची अस्तरीकरणाची कामे पूर्ण करताना गुण नियंत्रण विभागाच्या मार्गदर्शनाखाली तपासणी करण्यात आली आहे व वेळोवेळी चाचण्या घेऊन दृढीकरण करण्यात आले आहे. टेंभू प्रकल्पाच्या कामाबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही तसेच सिंचनविषयक विशेष चौकशी समितीकडून झालेल्या चौकशीमध्ये सदर प्रकल्प दोषमुक्त आहे. दरवर्षी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पावरील कामे करण्यात आली आहेत.

टेंभू प्रकल्पाच्या ४३१ कि.मी. लांबीच्या मुख्य कालव्यापैकी ४३० कि.मी. लांबीच्या कालव्याची कामे पूर्ण झाली आहेत. तसेच सर्व कालवे प्रवाहीत झाले आहेत. मुख्य कालव्यापैकी ५० कि.मी. लांबीतील कामे बंदीस्त नलीका प्रणाली (PDN) पध्दतीने पुर्ण झाली आहेत. वितरण व्यवस्थेची सर्व कामे सन २००९-१० ते सन २०२१-२२ मध्ये पुर्ण करण्यात आली असून सातारा, सांगली व सोलापूर जिल्हयात प्रकल्पीय सिंचन क्षमता ८०,४७२ हे. पैकी ७७७७३ हे. क्षेत्र सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे. उर्वरीत लाभक्षेत्र विकास कामे प्रगतीपथावर असून जून २०२३ अखेर संपूर्ण योजना कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

सन २०१४ पासून टेंभू उपसा सिंचन योजनेची सिंचन आवर्तने पार पाडण्याची व्यवस्थापन विभागास जबाबदारी देण्यात आली असून सन २०१६-१७ ते सन २०२१-२२ मध्ये अनुक्रमे १६९४४ हे., २७७७४७ हे., ३४६७६ हे., ४१७४६ हे., ४२१७६ हे., ५१६७९ हे. सिंचन क्षेत्रासाठी ११.३८ टी.एम.सी., ११.५४ टी.एम.सी., १५.६३ टी.एम.सी., ८.८९ टी.एम.सी., ९.५६ टी.एम.सी., ९.९५ टी.एम.सी. पाणी उचलण्यात आली आहे. सन २०१७-१८पासून ते सन २०२१-२२ पर्यंत रु.१२.९० कोटी इतकी पाणीपट्टी वसूली करण्यात आली आहे.

टेंभू प्रकल्पाची फक्त कडेगाव तालुक्यातील ३९०० हे. क्षेत्रावरील पारंपारीक वितरण व्यवस्था वगळता सर्व वितरण व्यवस्था (७४,००० हे.) बंदिस्त नलिकेद्वारे करण्यात आली असून सर्व क्षेत्रात याद्वारे पाणी देण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत टेंभू प्रकल्पाच्या सर्व टप्प्यांवरील पंपगृहे पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करुन निर्मित झालेल्या सिंचनक्षेत्रास पाणी देता येणे शक्य आहे. सन २०१८-१९ मध्ये महत्तम १५ टी.एम.सी. पाणी वापर केला आहे व योजना नियोजित पूर्ण क्षमतेने २२ टी.एम.सी. पाणी वापरास कार्यान्वित केली आहे.

**********************************

H/95-८-19

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.१८३८**

**श्री.धिरज देशमुख , वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

" लातूर (जि.लातूर) तालुक्यातील तावरजा मध्यम प्रकल्पाची दुरुस्ती मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, त्यामुळे अद्याप मोठया प्रमाणात पाणीगळती होऊन परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी व शासनाचे आर्थिक नुकसान होत असणे, त्यामुळे मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी व ग्रामस्थांनी तत्कालीन शासनाकडे पाठपुरावा करणे, त्यामुळे सदर प्रकल्पाच्या दुरुस्तीची पाहणी केली जाणे, यामुळे शासनाने सदर प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी ४१ कोटी ५९ लाख रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकाला ६ जानेवारी २०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देणे, मात्र या अंदाजपत्रकाला प्र.मा.मिळून एक वर्ष उलटले असतानाही अद्याप निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नसणे, त्यामुळे सदर प्रकल्पाच्या दुरुस्तीचे काम रखडणे, त्यामुळे शासनाने या प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करुन दुरुस्तीचे काम शासनाने तातडीने हाती घ्यावे, अशी मागणी होत असणे, परंतू त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष,परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना,त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

तावरजा मध्यम प्रकल्प हा गोदावरी खोरे अंतर्गत लातूर जिल्हयाच्या औसा तालुक्यातील तावरजा नदीवर बांधण्यात आलेला असून, या प्रकल्पांतर्गतच्या माती धरण व सांडव्याचे बांधकाम सन १९८२ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. तावरजा प्रकल्पांतर्गत एकूण २० कि.मी.लांबीचा डावा कालवा व २९ कि.मी.लांबीचा उजवा कालवा असून प्रकल्पाचे एकूण सिंचन क्षेत्र ३६०३ हे. आहे. मूळ प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा २०.५३ द.ल.घ.मी. इतका आहे. सन १९९७-९८ मध्ये सांडव्यावर १० X १ मीटर या आकाराची ४८ स्वयंचलित द्वारे उभारण्यात येऊन त्याद्वारे ७.२ दलघमी पाणीसाठा वाढवून प्रकल्पाचा एकूण पाणीसाठा २७.७३ द.ल.घ.मी करण्यात आला आहे.

सन २००२ पासून स्वयंचलित द्वारांमधून होणा-या गळतीमुळे पाणीसाठा कमी झाल्याने त्याचा सिंचन व बिगर सिंचनावर परिणाम झाल्याबाबत अनेक अडचणी उद्भवल्या आहेत. तसेच सन २०१६ ते सन २०१८ या वर्षांमध्ये अतिवृष्टीमुळे द्वारांचे सुरळीत परिचालन झाले नाही.

हिवाळी अधिवेशन २०१७ मध्ये विधानसभा तारांकित प्रश्न क्र.१०२४१९ अन्वये मा. विधीमंडळात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तावरजा मध्यम प्रकल्पाचे संपूर्ण ४८ दरवाजे बदलण्याबाबत निर्णय घेतला जाईल असे आश्वासन क्र. १९९ सन २०१७ देण्यात आले होते. त्या अनुषंगाने दि.२४.०१.२०१८ रोजी क्षेत्रिय अधिकारी, यांत्रिकी विभाग व मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना,नाशिक यांच्या संयुक्त पाहणीनुसार सुचविण्यात आलेल्या कायमस्वरुपी उपाययोजनेच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाने तावरजा मध्यम प्रकल्पाच्या अस्तित्वातील स्वयंचलित द्वारे पूर्णपणे काढून त्याऐवजी सांडव्यावर उभी

उचलद्वारे बसविणे व त्या अनुषंगाने मातीधरण दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास विशेष दुरुस्ती अंतर्गत रु.४१.५९ किंमतीस दि.०६.०१.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर क्षेत्रिय स्तरावर तांत्रिक मान्यता प्रदान करण्यापूर्वी, प्रकल्पाच्या पुराचा अभ्यास करुन ३०७२ क्यूमेक्स (घनमीटर प्रति सेकंद) ऐवजी १९०२ क्यूमेक्स या सुधारीत पूर अभ्यासास मुख्य अभियंता यांच्या सक्षम स्तरावर मान्यता देण्यात आली. त्यामुळे संकल्पनात बदल झाला आहे.४८ ऐवजी आता २६ गेटचे संकल्पन करण्यात आलेले आहे. त्यानुसार तांत्रिक मान्यतेसाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

तावरजा प्रकल्पाची सन २०१८-१९ च्या दरसूचीनुसार मूळ प्रशासकीय किंमत रु.४१.५९ कोटी आहे. दरम्यानच्या काळात दरसूचीत वाढ झालेली आहे. दरसूचीच्या वाढीमुळे प्रकल्पास शासनाची सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. सुप्रमा साठी लागणारा कालावधी लक्षात घेता, सदर प्रकल्पाची निविदा काढणे व मंजूर प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत खर्च करण्यासाठी प्रस्ताव नियामक मंडळापुढे ठेवून दि.२१.०३.२०२२ रोजीच्या नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत तशी मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यामुळे आता प्रकल्पाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देऊन निविदा प्रक्रिया राबविण्याचे नियोजन आहे.

---

लक्षवेधी सूचना क्र. १९२७
महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये श्री. दिलीप मोहिते-पाटील, ॲड. अशोक पवार, श्री. चेतन तुपे, श्री. सुनिल टिंगरे, श्री. रोहित पवार, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. सुनिल शेळके, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१९२७ पुढीलप्रमाणे:-

"पुणे जिल्हयातील भामा आसखेड धरण प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी (राजगुरुनगर) तालुक्यातील मौजे नाणेकरवाडी, गोणवडी, रासे, कडाचीवाडी, खराबवाडी, चाकण,काळूस,मेदनकरवाडी आदि १८गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने संपादित केलेल्या असणे, शासनाच्या दि.५ ऑगस्ट,२०१९ रोजी शासन निर्णयान्वये पुनर्वसनासाठी संपादित केलेल्या जमिनीबाबत लाभक्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत व भविष्यात अशा सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नसल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यांत आलेले असणे, त्यामुळे शेतकऱ्यांनी कालवा नको, कालव्यामधून शेतीला पाणी नको, अशी भूमिका घेऊन ग्रामपंचायतीने तसे ठराव पारित केलेले असणे, खेड तालुक्यातील सदर १८ गावांतील जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर शासनाने मारलेले शेरे व निर्बंध उठविण्याबाबत संबंधित सर्व शेतकऱ्यांनी शासनाकडे आतापर्यंत वारंवार मागणी करण्यांत येणे, त्यानुसार त्यासंदर्भात दि.२२/१०/२०२० रोजी मा.जिल्हाधिकारी यांचे पुणे येथील दालनात झालेली बैठक, शेतकऱ्यांची मागणी व पुनर्वसित जमिनीच्या लाभक्षेत्रातील जमिनीबाबत शासननिर्णयात नमूद केलेली परिस्थिती लक्षांत घेण्यांत येणे व त्यानुसार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांनी भामा आसखेड प्रकल्पाच्या खेड तालुक्यातील उर्वरित ३४६५ हे.लाभक्षेत्र भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून वगणेबाबत व सदर पुनर्वसनासाठी राखीव शेरे उठविण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाकडे दि.२२ जानेवारी,२०२२ च्या पत्रान्वये तसा प्रस्ताव पाठविण्यांत आलेला असणे, तथापि गेल्या वर्षांपासून सदरचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, परिणामी तेथील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नैराश्याची भावना, त्यामुळे शासनाने त्याबाबत तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना न्याय देण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) महोदयांचे निवेदन

भामा आसखेड प्रकल्प ता.खेड, जि.पुणे प्रकल्पांतर्गत ८.१४ अ.घ.फु. एकूण पाणीसाठा असलेले धरण बांधण्यात आले असून सन २०१० पासून पाणीसाठा निर्मिती करण्यात आली आहे. या प्रकल्पाचा प्रकल्पीय पाणीवापर ६.६६ अ.घ.फु. असून त्यापैकी मूळ नियोजनानुसार सिंचनासाठी ६.६५२ तर पिण्यासाठी ०.००८ अ.घ.फु. पाणीवापर प्रस्तावित होता.

भामा आसखेड प्रकल्पांतर्गत कालव्याचे काम सुरु असताना सदर प्रकल्पावरील सिंचनाऐवजी बिगर सिंचनातून पिण्यासाठी पुणे महानगरपालिकेसाठी २.६७१ अ.घ.फु., पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी २.१४७ अ.घ.फु., चाकण व लगतची १९ गावांकरीता ०.१७७ अ.घ.फु., चाकण नगरपरिषद, चाकणसाठी ०.०७७ अ.घ.फु. आळंदी नगरपरिषद नळ पाणी पुरवठा योजनेसाठी ०.१४० अ.घ.फु. असे एकूण ५.२१२ अ.घ.फु. पाणी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांन्वये आरक्षित केले आहे. तसेच जलाशयावरील उपसा

सिंचनाद्वारे भिजणाऱ्या ६% क्षेत्र व भामा नदीवरील को.प. बंधाऱ्याद्वारे सिंचनासाठी ०.७८३ अ.घ.फु. पाणी आवश्यक आहे. बाष्पीभवन ०.५३१ अ.घ.फु. विचारात घेता एकूण प्रस्तावित सुधारीत पाणीवापर ६.५२६ अ.घ.फु. (५.२१२+०.७८३+०.५३१) होत आहे. प्रकल्पिय पाणीवापरातुन ०.१३ अ.घ.फु. (६.६६०-६.५२६) इतके अत्यल्प पाणी शिल्लक राहत आहे.

उपरोक्त सुधारीत जलनियोजनानुसार पाणी आरक्षित केल्याने सिंचनासाठी पाणी उपलब्ध नसल्याने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या ९५ व्या बैठकीमध्ये भामा आसखेड प्रकल्पाचे उजवा व डावा कालवा रद्द करण्याबाबत नियामक मंडळाने शासनास शिफारस केली असून भामा आसखेड प्रकल्पाचे कालवे रद्द करण्याबाबतचा प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

भामा आसखेड प्रकल्पाचे एकुण लाभक्षेत्र २३११० हे. असुन, खेड तालुक्यातील प्रकल्प अहवालानुसार ९०८८ हे. क्षेत्रापैकी ५६२२.८२ हे. क्षेत्र तसेच हवेली तालुक्यातील प्रकल्प अहवालानुसार ६५८७.०० हे. व दौंड तालुक्यातील प्रकल्प अहवालानुसार ७४३५.०० हे. पूर्ण क्षेत्र (१००%) असे एकूण १९६४४.८२ हे. क्षेत्र वगळण्याचा महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ठरावाच्या विविध बैठकांमध्ये निर्णय घेतला आहे.

उर्वरीत भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये असणारे खेड तालुक्यातील ३४६५.१८ हे. क्षेत्र व १९६४४.८२ हे. क्षेत्र असे एकूण २३११० हे. क्षेत्र लाभक्षेत्रातून वगळणेबाबतचा प्रस्ताव महामंडळाने दि.२२/०१/२०२२ आणि दि.३१/०३/२०१८ च्या पत्रान्वये सादर केला असून, सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

भामा आसखेड प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पूनर्वसन कायदा १९८६ मधील कलम १६(२) अन्वये प्रकल्पबाधित व्यक्तींना ६५% रक्कम भरल्यास पर्यायी जमीन मिळणेबाबत तरतूद आहे. भामा आसखेड प्रकल्पामुळे प्रकल्पबाधित झालेले १४१४ खातेदार आहेत. त्यापैकी पर्यायी जमिनीसाठी पात्र खातेदार ५१४ असून त्यापैकी १८५ खातेदारांना पर्यायी जमिनीचे वाटप सिंचन प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात करण्यात आले आहे. उर्वरीत ३२९ खातेदारांबाबत महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.१४/०६/२०२२ नुसार जमीन वाटपाबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. त्याव्यतिरिक्त ८४२ प्रकल्पग्रस्तांना जमिनीऐवजी रोख रु.९५.५२ कोटी रकमेचे वाटप केले आहे. १८५ खातेदारांपैकी १३७ खातेदारांना भामा आसखेड प्रकल्पात खेड तालुक्यातील ५८ हे.४८ आर ६९ खातेदारांना व दौंड तालुक्यातील ४४ हे. ७५ आर ६८ खातेदारांना असे एकूण १०३ हे. २३ आर आणि ४७ खातेदारांना चासकमान प्रकल्पातील ४८ हे. ५७ आर जमिनीचे वाटप केले आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.०५/०८/२०१९ अन्वये राज्यातील ज्या पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामधील खातेदारांच्या जमिनींना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत व भविष्यातही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होण्याची शक्यता नाही, अशा लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र जमिनीच्या ७/१२ उताऱ्यामधील इतर हक्कातील नोंदीमध्ये "पुनर्वसनासाठी राखीव" असे नोंदविण्यात आलेले शेरे उठविण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "आढावा समिती" स्थापन केली आहे. त्यानंतर महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.१८/०१/२०२२ अन्वये दि.०५/०८/२०१९ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी स्तरावर अशा प्रस्तावांची छाननी सुरु आहे.

**************************************

H/95-D-19

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**श्री सुरेश वरपुडकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २०७० पुढीलप्रमाणे:-**

"परभणी जिल्हयातील सेलु येथील ब्रम्हवाकडी येथे निम्न दुधना धरण प्रकलपात ७५ टक्के पाणीसाठी हात असून बॅक वॉटरमुळे हया प्रकल्पात पूर्ण १०० टक्के पाणीसाठी न होणे, बॅक वॉटरमुळे शेतकऱ्यांना शेतीवर परिणाम होणे, लवादाप्रमाणे मराठवाडयाला ६० टीएमसी पाणी मिळणे आवश्यक असताना फकत ३५ टीमएसी पाणी अडविण्यात येणे, मराठवाउयाला गोदावरीच्या उपनद्यावरील बंधारा प्रकल्पात पणी अडविले जात असून ६० टीएमसी पाण्याचे उद्दीष्ट गाठण्यासाठी बॅरेजची १०० टक्के कामे आवश्यक असणे, डाव्या कालव्याची कामे ६९ कि.मी. व उजव्या कालव्याची ४८ कि.मी. सोय झालेली असणे, परंतु कालव्याच्या वितरिकेचे अस्तरीकरणाची कामे झालेली नसणे, डावा व उजवा कालवा मिळून एकूण ८४.५० कि.मी.चे अस्तरीकरणाची कामे शिल्लक असणे, या बंधाराच्या अनेक वितरिकेच्या टेलचे शेवटचे टोक हे खाजगी शेतकऱ्यांच्या जमिनीत सोडले असून त्यापासून नाले व नदीचे अंतर अंदाजे २०० ते ३०० मिटरपर्यत असल्याने या चऱ्यामुळे त्या शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जाऊन त्यांचे नुकसान होत असणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, निम्न दुधना प्रकल्पात पाणी क्षमता पूर्ण होत नसल्याने या भागाला पाणी पुरवठा करण्यास येणाऱ्या अडचणी, यासाठी राज्य शासनाने चौकशी करुन बॅक वॉटरमुळे बाधीत होणाऱ्या शेतकऱ्यांचे व वितरिकेच्या चऱ्यांमुळे शेतीचे नुकसान होणाऱ्या शेतकऱ्याच्या जमीनी संपादीत करुन त्यांना योग्य मोबदला देण्याची आवश्यकता व निम्न दुधना धरण पूर्ण क्षमतेने पूर्ण भरण्यासाठी करावयाची उपाययोजना व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

मा. उप मुख्यमंत्री(जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांचे निवेदन

निम्न दुधना प्रकल्पाचे जलाशयातील पाणी बुडीत क्षेत्राच्या असंपादित क्षेत्रात जात असल्याने सन २०२२ च्या पावसाळ्यात पाणीसाठा ७५% एवढा मर्यादित ठेवण्यास नियामक मंडळाचा ठराव क्र. ८०/०९ दि.०८/०६/२०२२ अन्वये मान्यता दिलेली आहे.

मध्य गोदावरी उपखोऱ्यात लवादानुसार अनुज्ञेय होणाऱ्या अतिरिक्त पाण्याचे प्रस्तावास शासनाने दि.१४.१०.२०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानूसार मध्य गोदावरी उपखोऱ्यात आता एकुण ११३ अघफू पाणीवापर अनुज्ञेय झालेला आहे. सद्य:स्थितीत एकूण १४.१५४ अघफू (४००.६८ दलघमी ) पाणी शिल्लक असून, त्यापैकी १९२.८१ दलघमी (६.८०अघफू) चे नियोजनास शासनाने तत्वत: मान्यता दिलेली असून उर्वरित २०७.८७ (७.३४ अघफू) दलघमी पाण्याचे नियोजन अंतिम करणेची कार्यवाही प्रगतीत आहे.

| अ. क्र. | कालवे/ उर्सियो | लांबी (किमी) | पूर्णत्व वर्ष | प्रकल्पीय सिंचन क्षेत्र (ICA) (हेक्टर) | निर्मित सिंचन क्षेत्र (ICA) (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ. उजवा तीर कालवा | ४८ किमी कामे पूर्ण | २०१९-२० | परभणी :-१२,८२८ | परभणी :-१२,६४८ |
| | ब. पुच्छ कालवा | २४.८६ पूर्ण | २०२१-२२ | | |

शेटा H/92 (750-4-23)-1    ल.प्र.ना.प.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | क. वितरण व्यवस्था | मातीकाम व बांधकामे पूर्ण | अस्तरीकरण कामे एकूण १६४ किमी पैकी १११ किमी पूर्ण, अस्तरीकरण कामे ६७.६८% पूर्ण, मार्च २०२४ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. | | |
| २ | अ. डावा तीर कालवा | ६९ पूर्ण | २०१७-१८ | परभणी:- १५,६७९<br>जालना :- १९१<br>एकूण :- १५,८७० | परभणी:- १५,५८९<br>जालना :- १९१<br>एकूण :- १५७८० |
| | ब. शाखा कालवा | ४.४१ पूर्ण | | | |
| | क. वितरण व्यवस्था | मातीकाम व बांधकामे पूर्ण | अस्तरीकरण कामे एकूण २३९ किमी पैकी २०७.५० किमी पूर्ण, अस्तरीकरण कामे ८६.८२% पूर्ण, मार्च २०२४ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. | | |
| ३ | ४ उपसा सिंचन योजना | पूर्ण | २०१६-१७ | जालना :- ५,७४० | जालना :- ५,७४० |
| | | | एकूण क्षेत्र :- | ३४,४३८ | ३४,१६८ |

लाक्षेवि भाग-१ ची २१८५२ हे. क्षेत्राची कामे पूर्ण झालेली असून उर्वरित ६८४६ हे. क्षेत्राचे कामे प्रगत असुन मार्च २०२४ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. निम्न दुधना प्रकल्पाच्या बहुतांश वितरिका, लघुवितरिका व उपवितरीका यांचा शेवट (Tail End) हा खाजगी गटात झालेला आहे, सदर स्थळापासून नाला, नदीचे अंतर सरासरी २०० मीटर आहे. सदर लघुवितरिका व उपवितरीकांच्या शेवटी एस्केप स्ट्रक्चर बांधण्यात आलेले आहे, संबंधित शेतकरी वितरिका शेवट ते नाल्यापर्यंत टेलिंग (Tailing) करिता खोदकाम करण्यास विरोध करतात. संबंधित शेतकऱ्यांनी सदर लांबी करिता भूसंपादन करण्याबाबत वेळोवेळी अर्ज दिलेले आहेत. सदर टेलिग (Tailing) करिता भूसंपादनाची ५१.४६ हेक्टर क्षेत्राचे ची तरतूद प्रकल्पाचे चतुर्थ सुप्रमा मध्ये करण्यात आलेली आहे. प्रकल्पाचा चतुर्थ सुप्रमा प्रस्ताव शासनस्तरावर प्रगतीत असून त्यास मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर भूसंपादन करणे शक्य होणार आहे. यामुळे संबंधित शेतकऱ्यांचे दरवर्षी होणारे नुकसान टाळून कालवा संचलन करणे सुलभ होणार आहे.

सन २०२२-२३ मध्ये निम्न दुधना प्रकल्पात ७५% पाणी साठा झालेला असून, प्रस्तावित प्राथमिक सिंचन कार्यक्रम (PIP) २०२२-२३ नुसार रब्बी हंगामात ४ पाणीपाळीद्वारे १०,५०० हे. व उन्हाळी हंगामात ६,०००हे. असे एकूण १६,५०० हे. क्षेत्रावर सिंचन कार्यक्रम राबविण्याचे नियोजन केलेले आहे. त्यामुळे या भागाला पाणी पुरवठा करण्यास अडचण नाही.

नियामक मंडळाचे ठराव क्र. ७७/३६ अन्वये बॅक वॉटरमुळे बाधीत होणाऱ्या शेतकऱ्यांचे भूसंपादनाबावत कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे. नियामक मंडळाचे ठराव क्र. ८०/०९ अन्वये निम्न दुधना प्रकल्पाचे बुडीत क्षेत्राच्या असंपादित क्षेत्राचे भूसंपादन कार्यवाही प्रगतीत असून सदर भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर निम्न दुधना धरण पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करणे शक्य होईल.

**********************************************

H192-1a

२०६

लक्षवेधी सूचना क्र.७३

**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. किसन कथोरे, श्री. प्रशांत ठाकूर, श्री. बंटी भांगडीया, श्री. विनोद निकोले, श्री. संजय केळकर, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, श्री. योगेश सागर, श्री. अतुल भातकळकर. मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"पालघर जिल्ह्यातील बोईसर पूर्वेकडील किराट येथील दगड खाणीत करण्यात येणा-या भुसुरुंग स्फोटांमुळे जवळच्या आदिवासी पाड्यांतील नागरिकांच्या घरांना तडे जाऊन ही घरे राहण्यासाठी धोकादायक बनली असल्याचे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, भुसुरुंग स्फोट करण्यासाठी बोअर मशीनचा बेकायदेशीर वापर केला जात असल्याचेही निदर्शनास येणे, किराट गावात मुंबई- डोदरा एक्सप्रेस वेचे काम सुरू असून मोंटे कार्लो या ठेकादार कंपनीकडून रस्त्याच्या भरावासाठी लागणा-या मातीकरीता यंत्राद्वारे टेकड्या पोखरण्याचे काम सुरू असणे, बोईसर शहरापासून पाच- दहा कि.मी.च्या पट्ट्यात असणरा-या गुंदले, नागझरी, लालोंडे, किराट आणि तिहे या गावांशेजारील हिरवेगार डोंगर आणि टेकड्या गौणखनिज उत्खननासाठी खाण आणि क्रशर मालकांनी उद्ध्वस्त करणें, यामध्ये काही खाणींनी संरक्षित जंगल भागात अतिक्रमण करून तो भाग गिळंकृत केला असणे, खदानीतील दगड काढण्यासाठी जिलेटिनद्वारा नियंत्रित स्फोट करण्यात येणे, त्याचबरोबर दिवस-रात्र स्फोटांचा तीव्र कानठळ्या बसविणारा व कानांच्या पडद्यांना इजा पोहचविणारा आवाज, क्रशर मशीनमधून निघणारे घातक धुलिकण व गौणखनिज वाहतूक करणा-या अवजड वाहनांची सतत वाहतूक यामुळे होणारे प्रचंड प्रदूषण याने आरोग्य व पर्यावरणाचे गंभीर प्रश्न निर्माण होऊन लोकांसोबतच जंगलातील वन्यजीव यांचे देखील जगणे मुश्कील झाले असणे, त्यामुळे उक्त प्रकरणी चौकशी करून तात्काळ ही भुसुरुंग स्फोटांचे प्रमाण कमी करण्याची आवश्यकता व नागरिकांना दिलासा देण्याची गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया.,"-

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

पालघर तालुक्यात मुंबई वडोदरा या राष्ट्रीय महामार्ग निर्मितीचे काम मे. मोंटे कार्लो प्रोजेक्ट कंपनी तर्फे करण्यात येत असून. सदरहू प्रकल्पाकरीता आवश्यक असलेल्या गौणखनिज उत्खनन व वाहतुक करणेची परवानगी उपविभागीय अधिकारी, पालघर व जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून देण्यात आल्या आहेत.

मौजे किराट ता. जि. पालघर येथील महामार्गाच्या कामासाठी लागणाऱ्या माती व दगड उत्खननासाठी भुसूरंग स्फोट (ब्लास्टींग) करण्यात येत आहे. सदर भुसूरंग स्फोटामुळे नजीकच्या रहिवाशांच्या घरांना तडे जाऊन घराचे नुकसान होत असलेबाबतची बातमी न्युज १८ लोकमत वाहिनी तसेच पुढारी या वृत्तपत्रात दिनांक ३१.०१.२०२३ रोजी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने दिनांक ३१.०१.२०२३ रोजी तहसिलदार, पालघर यांनी जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालयाचे वरीष्ठ सहाय्यक, मंडळ अधिकारी लालोंडे, तलाठी किराट, ग्रामसेवक किराट, सरपंच किराट, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ व पत्रकार यांचेसह संयुक्त स्थळपाहणी केली.

सदर स्थळ पाहणीमध्ये मौजे बोरशेती येथील गट नं. १६१, १९६, १९८, १९९ येथील क्षेत्रातून १,००,००० ब्रास दगड उत्खनन करण्याकामी सबंधित कंपनीस जिल्हाधिकारी, पालघर याच्या दिनांक २८.०९.२०२२ अन्वये परवानगी देण्यात आलेली आहे. मौजे बोरशेती येथील गट नं. १६१, १९६, १९८, १९९ लगत असलेल्या मौजे किराट (पवारपाडा) येथील ग्रामस्यांच्या घराची प्रत्यक्ष पाहणी केली असता एकुण २७ ग्रामस्थांच्या घराला तडा व भेगा गेल्याचे दिसून आले. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या तरतूदीन्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी दिनांक ०५.१२.२०२२ च्या पत्रान्वये सदर शासकीय प्रकल्पासाठी लागणारी माती/मुरूम/दगड या गौण खनिज रात्रीच्या वेळी उत्खनन व वाहतूक करण्यास अटी व शर्तीच्या अधीन परवानगी दिलेली आहे. तसेच मौजे किराट (गेटीचापाडा) येथील गट नं. ३९१ मध्ये १०,००० ब्रास दगड उत्खननासाठी सबंधित कंपनीस जिल्हाधिकारी, पालघर यांचे दिनांक २६.०८.२०२२ अन्वये परवानगी देण्यात आलेली आहे. सदर जागा ही उंच टेकडीची खडकाळ असून सदर जागेमध्ये जुनी दगडखान आहे. सदर रस्त्याचे काम करीत असताना रोड मार्जिन मध्ये येणारा टेकडीतील दगड कटींग करताना भुसुरुंग स्फोट (ब्लास्टींग) करण्यात येत आहे. त्यामुळे सदर गट नंबर ३९१ च्या जमिनीस लागून असलेल्या जाधवपाडा, गेटीचापाडा येथील रहिवाशांच्या घराला हादरे बसत असून घरांना तडा गेल्याचे दिसून आले आहे.

तहसिलदार, पालघर यांच्या चौकशी अहवालाचे अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक १७/०२/२०२३ च्या पत्रान्वये ब्लास्टिंगसाठी देण्यात आलेल्या मार्यादिप्रमाणेच ब्लास्टींग करणे व त्यासाठी दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे तसेच गावकऱ्यांना विश्वासात घेऊन नुकसान झालेल्या २६ घरांची दुरुस्ती करुन द्यावी व यापुढे अशा प्रकारच्या घटना या पुढे घडणार नाहीत याची खबरदारी घेण्या बाबत संबंधीत कंपनी यांना कळविणेत आलेले आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण ठाणे व मे. मोंटे कार्लो वडोदरा मुंबई एक्सप्रेस वे प्रा. लि. यांचे दरम्यान मुंबई एक्सप्रेस हायवेचे काम करणेकामी करारनामा झाला असून संबंधितांनी सदर मार्गावर येणारे अडथळे दूर करणेकामी विस्फोटक वापरणेकरीता संयुक्त मुख्य विस्फोटक नियंत्रक, नवी मुंबई यांचेकडून परवाना प्राप्त परवानाधारक श्री. सिध्दीविनायक ऍटरप्रायझेस तर्फे प्रो.प्रा.प्रविण पाटील रा.कुडूस, ता.वाडा यांचेशी करारनामा केला असून, सदरचे काम करणेकामी जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून विस्फोटक अधिनियम २००८ चे नियम १०२ व १०३ नुसार ना हरकत दाखला देण्यात आलेला आहे.

बोईसर परिसराच्या आजुबाजूस गुंदले, नागझरी, लालोंडे, किराट आणि निहे या भागात एकुण १० खाणी व २४ दगड क्रशर असुन सदरचे दगडखणी व क्रशर हे खाजगी मालकीच्या जागेवर असून कोणत्याही खाण मालकाने गौणखनिज उत्खनन करण्यासाठी संरक्षित जंगल भागात अतिक्रमण करून तो भाग गिळंकृत केलेला नाही. सदरचे खाण मालक व क्रशरमालक उत्खनन व क्रशर करताना आवश्यक त्या परवानग्या घेऊन सुरू आहेत

पालघर जिल्हयातील बोईसर व आजूबाजूच्या परिसरात निहे, नागझरी, किराट, लालोंडे, बोरशेती, गुंदले, किराट इत्यादी भागात जिल्हाधिकारी कार्यालयातुन एकूण २४ क्रशरधारकांना महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनीयमन) नियम २०१३ मधील उपनियम ७१ अन्वये विक्रेत्याचे लायसन देण्यात आले आहे. सदर क्रशर धारक यांनी प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडून परवानगी घेतलेली असून सदरहू क्रशर मशिन हे साधारणतः लोकवस्ती पासून दूर असुन वायु प्रदूषण होऊन नागरीकांच्या जिवीतास धोका निर्माण झाल्याचे निर्दशनास आलेले नाही.

पालघर तालुक्यातील मौजे निहे, नागझरी, किराट, लालोंडे, बोरशेती, गुंदले या दगड खदान परवानाधारक यांना खाजगी जागेत उत्खनना बाबत लागणारे विविध विभागाचे परवानगी घेऊन संबंधितास परवानगी देण्यात आलेली आहे. सदर भागात अतिक्रमण करुन तो भाग गिळंकृत केला असणे अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

*************

लक्षवेधी सूचना क्र. २२२९

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर), विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२२९.**

"जालना जिल्ह्यातील पाटोदा साठवण तलाव प्रकल्प, बरबडा बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प व खोराडसावंगी लघु पाटबंधारे प्रकल्पांची भुसंपादन मावेजा व पुनर्वसनाची कामे मागील २० वर्षांपासुन प्रलंबित असणे, पाटोदा साठवण तलाव प्रकल्प ता. मंठा जि.जालना या प्रकल्पास मूळ प्रशासकीय मान्यता रु. १५.२१ कोटीची असुन सन २००२-०३ मध्ये प्राप्त असणे, तसेच प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु.१३०.६६ कोटी असुन सुप्रमा प्रस्ताव शासन स्तरावर मंजुरीकरीता प्रलंबित असणे, प्रकल्पाचे मातीकाम ८५% झाले असुन सांडव्याचे सर्व काम बाकी असणे, प्रकल्पाची अद्याप धार दाबण्यात आलेली नसुन भुसंपादन व पुनर्वसनाचे कामे प्रलंबित असणे, लिंबेवडगाव गावाचे पुनर्वसनाकरिता अद्याप जागा निश्चीतीची कार्यवाही झालेली नसणे, प्रकल्पास एकूण आवश्यक भूसंपादन (हे.) २८८.३७ असून २८८.३७ एवढे भुसंपादन झाले असणे, पुनर्वसनाकरिता एवढे २८.५४ हे क्षेत्र आवश्यक असणे, त्यासाठी एवढा १४०० निधी आवश्यक असणे, तसेच मौजे लिंबेवडगाव येथील बाधित गावाच्या बांधकामाचे मुल्यांकनाकरिता रु.१००० लक्ष एवढा निधी आवश्यक असणे, खोराडसावंगी लघु पाटबंधारे प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता रु.३.६७ कोटीची असुन सन १९९९-२००० मध्ये प्राप्त असणे, तसेच प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. २२.५८ कोटी असुन दि.०५/०३/२०१९ रोजी प्राप्त असणे, प्रकल्पाचे काम ८०% पुर्ण झालेले असुन प्रकल्पाची धार दाबण्याची कार्यवाही करणे अत्यंत आवश्यक असणे, प्रकल्पाचे पुनर्वसनाच्या कामाची कार्यवाही अजुन प्रलंबित असणे, प्रकल्पास एकूण आवश्यक भूसंपादन (हे.) ८१.५० असुन ७०.४२ हे एवढे भुसंपादन झाले असणे, उर्वरित ११.०८ हे एवढे भुसंपादन करणे बाकी असुन त्यांस रु. २७५ लक्ष एवढा निधी आवश्यक असणे, प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रात मौ. माळसावंगी शिवारातील ३१ घरे बाधीत होत असणे, सदरील ३१ घरांसाठी पुनर्वसना ऐवजी एक रक्कमी स्वेच्छा पुनर्वसन अनुदान प्रस्तावित असणे, त्यांस रु. १७० लक्ष एवढा निधी आवश्यक असणे, बरबडा बृहद लघु पाटबंधारे प्रकल्प या प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता रु.१२.०९ कोटीची असुन सन १९९९-२००० मध्ये प्राप्त असणे, तसेच प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. २९.८७ कोटी असुन दिनांक २५/११/२००५ रोजी प्राप्त असणे, प्रकल्पाचा द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता रु. ३५५.७७ कोटी शासनाकडे मंजुरीकरिता प्रलंबित असुन मंजुरी आवश्यक असणे, प्रकल्पाचे काम ८०% पुर्ण झालेले असुन प्रकल्पाची धार दाबण्याची कार्यवाही करणे तसेच मौ. आकणी गावाचे पुनर्वसनाबाबत अद्याप पर्यंत कार्यवाही झालेली नसुन सुधारित प्रशासकीय मान्यता मंजुरी अत्यंत आवश्यक असणे, प्रकल्पास एकूण आवश्यक भूसंपादन (हे.) ४५९.५१ असुन २७२.८ हे एवढे भुसंपादन झाले असणे, उर्वरित

**१८६.७१ हे एवढे भुसंपादन करणे बाकी असुन त्यांस रु. ७५०० लक्ष एवढा निधी आवश्यक असणे, पुनर्वसनाकरिता एवढे ६३.७० हे क्षेत्र आवश्यक आहे. त्यासाठी एवढा रु. २५०० लक्ष निधी आवश्यक आहे. तसेच मौजे आकणी येथील बाधित गावाच्या बांधकामाचे मुल्यांकनाकरिता रु. २००० लक्ष एवढा निधी आवश्यक आहे. याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."**

---

**मा.उप मुख्यमंत्री ( जलसंपदा) यांचे निवेदन :-**

पाटोदा साठवण तलाव ता. मंठा जि. जालना या प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता रु.१५.२१ कोटी सन २००४ मध्ये प्राप्त आहे. सदर प्रकल्पाची सुधारित प्रशासकीय मान्यतेचा रु.१३०.६६ कोटींचा प्रस्ताव मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव शासन स्तरावर सादरीकरणात आहे.या प्रकल्पाचे माती धरणाचे काम ८५% पुर्ण झालेले आहे. प्रकल्पाच्या घळभरणीचे काम तसेच सांडव्याचे काम बाकी आहे.सदर प्रकल्पासाठी एकुण २८८.३७ हे. जमिनीची आवश्यकता असुन संपूर्ण जमीन संपादित करण्यात आली आहे व संपूर्ण मावेजा प्रदान करण्यात आलेला आहे. तसेच २८.५४ हे. क्षेत्र पुनर्वसनाकरिता आवश्यक आहे व त्यास अंदाजे रु. १४ कोटी निधी लागणार आहे. सन २०२३-२४ प्रकल्पासाठी रु.३० कोटी एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रामध्ये मौ. लिंबेवडगाव बाधित होत असुन पुनर्वसन करणे प्रस्तावित आहे. एकुण ७२४ घरांच्या मुल्यांकनाचे काम प्रगतीपथावर आहे.मुल्यांकनाकरिता रु.३६.४३ कोटी एवढी तरतुद सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावात करण्यात आलेली आहे व पुनर्वसनासाठी जागेच्या स्थळ निश्चितीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या गावातील काही नागरीकांनी स्वेच्छा पुनर्वसन अनुदान स्विकारण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे पुनर्वसन स्विकारणाऱ्या व स्वेच्छा पुनर्वसन अनुदान स्विकारण्याऱ्या नागरीकांचे एकमत अद्याप होवु शकले नाही. सदर कार्यवाही पुर्ण होताच पुनर्वसनाकरीता जमीन संपादीत करुन प्लॉट वाटप व नागरी सुविधांची कामे पुर्ण करणे नियोजित आहे.

खोराडसावंगी लघु पाटबंधारे प्रकल्प ता. मंठा जि. जालना या प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता सन २००१ मध्ये ३.६७ कोटीस तसेच प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता रु.२२.५८ कोटी दि. ०५.०३.२०१९ रोजी प्राप्त आहे. सदर प्रकल्पाचे काम अद्यापपर्यंत ८०% पुर्ण झालेले आहे. धरणाच्या घळभरणीचे काम बाकी आहे. सदर प्रकल्पासाठी एकुण ८१.५० हे. जमिनीची आवश्यकता असुन त्यापैकी ७०.४२ हे.जमीन संपादित करण्यात आली असुन उर्वरित ११.०८ हे.क्षेत्राचा सरळखरेदीने भुसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, जालना यांना सादर करण्यात आलेला आहे. तसेच या प्रकल्पामध्ये मौ. माळसावंगी हे गाव पुर्णत: बाधीत होत असुन ३१ घरे बाधित होत आहेत. सदर घरांचा एकरकमी स्वेच्छा पुनर्वसन अनुदानाचा रु.१.६८ कोटीचा प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त झाला असून मदत व पुनर्वसन विभागाच्या सहमतीने त्यावर उचित निर्णय घेण्याचे नियोजित असून त्यानंतर मोबदला वाटप व पुनर्वसन कार्यवाही पूर्ण करुन प्रकल्पाचे काम पूर्ण करणे नियोजित आहे.

बरबडा बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प ता. मंठा जि.जालना या प्रकल्पास मुळ प्रशासकीय मान्यता सन २००१ मध्ये १२.०९ कोटी इतक्या किंमतीस व प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु.२९.८७ कोटी इतक्या किमंतीस दि. १५.११.२००५ रोजी प्राप्त आहे. तसेच रु.३५५.७७ कोटी द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव नियामक मंडळाच्या ठरावाप्रमाणे मा.मंत्रीमंडळ मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शासन स्तरावर प्रगतीत आहे. या प्रकल्पांतर्गत मातीधरणाचे व सांडव्याचे एकुण ८०% काम पुर्ण झालेले असून घळभरणीचे काम अद्याप बाकी आहे. या प्रकल्पास ५२३.२१हे. एवढे क्षेत्र आवश्यक असुन २७२.८ हे. क्षेत्राचे भुसंपादन पुर्ण करण्यात आलेले आहे. बुडीत क्षेत्रात बाधीत मौजे आकणी गावाचे पुनर्वसनाकरिता ६३.७० हे.क्षेत्र संपादन करणे आवश्यक आहे. मौजे आकणी गावच्या पुनर्वसनासह रु.३५५.७६ कोटी किमंतीच्या व्दितीय सुप्रमा प्रस्तावास मान्यतेच्या निर्णयानंतर सदर प्रकल्पाबाबत उर्वरीत कार्यवाही करणे नियोजित आहे.

******************

लक्षवेधी सूचना क्र. ११०७.

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन-२०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

**श्रीमती मनिषा चौधरी, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" गेली अनेक वर्षे किनारपट्टीलगत वास्तव्य करुन असणाऱ्या मच्छिमारांच्या घंरालगतची जागेचा वापर उदा. जाळी ठेवणे, मासे सुकविणे, बोटी शाकारणे, बोटी दुरुस्त करणे याकरीता करत असणे, मच्छिमारांच्या वसाहती लगत किंवा गावालगत मोकळी जागा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २२ अन्वये तरतुदीनुसार विहित करण्यात हरकत नसावी, असा निर्णय शासनाकडून घेण्यात येणे, वहिवाटीच्या जागा/जमिनीचे ७/१२ त्यांचे नावे होण्याची कार्यवाही मुंबई विभागात (कोळीवाडा सिमांकन) सुरु असणे, परंतू कोकण विभागातील इतर सर्व जिल्हयांमध्ये सिमांकन करण्याची कार्यवाही अद्यापी चालू झालेली नसणे, सदर मोकळया जागांचे वाटप अन्य कारणासाठी मोठया प्रमाणावर होत असल्याचे कारण दाखवून सदर जागा मच्छिमारांना वापर करण्यास शासनाकडून होत असलेला विरोध, मच्छिमारांविरोधात शासनाकडून होत असलेली कारवाई, परिणामी मच्छिमार धंद्यावर होत असलेला विपरित परिणाम, मच्छिमारांमध्ये शासनाप्रति निर्माण झालेली तीव्र चीडीची व संतापाची भावना, मच्छिमारांच्या गावालगतच्या, वसाहतीलगतच्या खुल्या जागा मच्छिमारांच्या धंद्याकरीता म्हणजेच मासे सुकविणे, जाळी सुकविणे, जाळी विणणे, बोटी दुरुस्त करणे, बोटी शाकारणे याकरीता कोकणातील सर्व जिल्हयातील मच्छिमारांच्या घरालगतची जागेचे (कोळीवाडा/गावठण) सिमांकनाचे काम पुर्णकरुन तातडीने विहित करुन देण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

---

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

शासन परिपत्रक ४ फेब्रुवारी, १९८३ मधील तरतुदीनुसार मच्छीमारांच्या गावालगतच्या/ वसाहतीलगतच्या खुल्या सरकारी जागा मच्छिमारांच्या धंदयासाठी म्हणजेच जाळी सुकविणे/जाळी विणणे, मासे सुकविणे, बोटी शाकारणे/ दुरुस्त करणे या करिता मच्छिमारांच्या गावालगत/वसाहती लगतच्या सोयीस्कर खुल्या जागा महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम-२२ खालील तरतुदींनुसार अभिहस्तांकित करण्याच्या सूचना शासनाने कोकण विभागातील जिल्हाधिकाऱ्यांना यापूर्वीच दिलेल्या आहेत. सदर सुचनांनुसार कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्हयांमध्ये प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने मच्छीमारांच्या गावालगतच्या/ वसाहतीलगतच्या खुल्या सरकारी जागा मच्छिमारांच्या धंदयासाठी म्हणजेच जाळी सुकविणे/जाळी विणणे, मासे सुकविणे, बोटी शाकारणे/ दुरुस्त करणे या करिता राखीव जागा अशा नोंदी गांव नमूना नं.७/१२

पत्रकामध्ये इतर अधिकारामध्ये घेण्यात आलेल्या आहेत. याव्यतिरिक्त मत्स्यव्यवसाय विकास विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

राज्यातील सर्व गावांच्या गावातील जमिनीचे GIS आधारित सर्वेक्षण व भूमापन करणेबाबतचा गावठाण जमाबंदी प्रकल्प हा ग्रामविकास विभाग, भूमि अभिलेख विभाग व भारतीय सर्वेक्षण विभाग यांच्या संयुक्त सहभागाने राबविणेबाबत दि.२०.०२.२०१९ रोजीचे शासन निर्णयाने मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यामध्ये गावठाण असलेल्या गावांमध्ये गावठाणातील मिळकतींची ड्रोनव्दारे सर्व्हेक्षण सुरू करण्यात आलेले आहे. त्यासअनुसरून कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्हयांमध्ये सागरी किनाऱ्यालगत गावठाण परिसिमेतील घरांचे महास्वामित्व योजनेंतर्गत ड्रोन प्लाईंग सर्व्हेचे काम प्रगतीत आहे. किनाऱ्यालगत वसलेल्या मच्छीमार बांधवाच्या गावठाणातील मिळकती त्यांचे नावावर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

कोकण विभागांतर्गत ज्या ठिकाणी महसूल अभिलेखात गावठाण दर्शविण्यात आलेले नव्हते, अशा ठिकाणी गावठाणांचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिनांक १७ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. सर्वेक्षणाअंती अशा गावठाणांची निश्चिती झाल्यानंतर त्या ठिकाणी नगर भूमापन योजना लागू करुन अशा गावठाणांमधील मच्छिमार बांधवांच्या घरांची जागा त्यांच्या नावे करण्याची कार्यवाही करता येईल.

मत्स्य विभागाने कळविल्यानुसार मुंबई शहर जिल्हयात १२ व मुंबई उपनगर जिल्हयात २९ असे एकूण ४१ कोळीवाडे आहेत. त्यापैकी ३१ कोळीवाडयांच्या बाहेरील हद्दींचे सर्व्हेक्षण व सिमांकन करण्यात आलेले आहे. मुंबई उपनगर जिल्हयातील २३ कोळीवाडयांचे सिमांकन पूर्ण झाले असून ६ कोळीवाडयांमध्ये जागेवर मूळ आदिवासी लोक राहत असून आदिवासी पाडे व आदिवासी लोकवस्ती असल्याचे दिसून आले असल्याने त्या ठिकाणी सिमांकनास विरोध आहे. तसेच मुंबई शहर जिल्हयामध्ये एकूण १२ कोळीवाडयांपैकी ८ कोळीवाडयांची सिमांकन मोजणी झालेली आहे तर उर्वरित ४ ठिकाणी कोळीवाडयांचे अस्तित्व दिसून आलेले नाही.

मुंबई शहर जिल्हयातील कोळीवाडा सीमांकन हद्दीमध्ये समाविष्ट मिळकतींच्या मिळकपत्रिका मूळ भूमापनावेळी/ तदनंतरचे सर्व्हेक्षण झाले त्या त्या वेळी उघडणेत आल्या असून त्यावर खाजगी व्यक्ती, संस्था, प्राधिकरण यांची नोंद दाखल असल्याचे निदर्शनास येते. मुंबई शहर जिल्हयातील कोळीवाडा सिमांकनामध्ये येत असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा, मुंबई पोर्ट ट्रस्ट, तटरक्षक दल, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प इत्यादी प्राधिकरणांच्या मिळकती व खाजगी मालकी असलेल्या मिळकती सिमांकनात येत असल्याने त्यांनी घेतलेल्या आक्षेपांस अनुसरून संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी देण्याकरीता सुनावणी घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेस्तरावर सुरू आहे.

**********

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे पहिले अर्थसंकल्पिय अधिवेशन

**श्री. सुनिल शेळके, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.११७६ पुढीलप्रमाणे आहे:-**

"मौजे मोरमारेवाडी (ता.मावळ,जि.पुणे) हे महसूली गांव ग्रुप ग्रामपंचायत करंजगाव अंतर्गत असणे, या गावातील धनगरपाडयावर एकूण ११ कुटुंबातील ग्रामस्थ असून गावालगतच्या उंच डोंगर पठारावर त्यांची एकूण ११ घरे, गोठे आणि लागवडी योग्य शेतजमीन, निवासी घरे, गोठे, शेती यासह शेकडो वर्षापासून सदर कुटुंबे वास्तव्य करीत असल्याचे निदर्शनास येणे, सदर कुटुंबिय ग्रामस्थांना इंग्रजकालीन राजवटीपूर्वी मावळ तालुक्यातील अनेक गावे/भूखंड तत्कालीन राजकीय व प्रशासकीय व्यक्ती व संस्थांना वतने म्हणून बहाल करण्यात येणे व त्यामध्ये श्री.कर्वे, इनामदार परिवाराला मिळालेल्या वतनावरील मोरमारेवाडी येथील धनगरपाडयाला देखील वतन मिळाले असणे, त्यानंतर सन १९६८ साली ग्रामपंचायत करंजगाव अस्तित्वात येऊन धनगरवाडयातील सर्व घरांची नोंद ग्रामपंचायत दप्तरी असून या सर्व घरांचा व शेतीचा शासकीय कर, पट्टया इत्यादी कर तेव्हांपासून सदर ग्रामस्थ शासनास अदा करीत असणे, तथापि सन १९५७ च्या कुळ कायद्याअंतर्गत सदर कुटुंबियांची नावे त्यावेळी ७/१२ च्या उताऱ्यावर नोंद झालेली नसणे, तथापि सन १९६८ साली त्यापैकी काही कुटुंबाचा कूळ म्हणून ७/१२ च्या उताऱ्यावर नोंद असल्याचे निदर्शनास येणे, परंतु सन २००६ यावर्षी श्री कर्वे, इनामदार (वतनदार) यांनी सदर ग्रामस्थांच्या वहिवाटीच्या जमिनीसह सर्व जागा मुंबईतील ओझोन लँड प्राईव्हेट लिमिटेड या कंपनीला परस्पर विकल्याचे निदर्शनास येणे व त्यासाठी कंपनीने प्रस्तुत गटाच्या सातबारा उताऱ्यावरील नोंद देखील दुरुस्थ (काढून टाकल्याने) केल्याचेही निदर्शनास येणे, याप्रकरणी सदर ग्रामस्थांनी दिनांक १० डिसेंबर, २०२२ रोजी मा.महसूल मंत्री यांना सविस्तर लेखी निवेदन देऊन वहिवाटीच्या हक्काची जमिन त्यांच्या नावे शासनाने करुन देण्याची मागणी करण्यात येणे, परंतु अद्यापही शासनाकडून कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी संबंधित सर्व ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण, याबाबत शासनाने चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

---

**मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

मौजे मोरमारवाडी येथील स.नं.३ (वाडी विभाजनापूर्वीचा करंजगाव येथील स.नं.२२९) क्षेत्र ३२३.७५ हे.आर या जमीनी मूळ श्री.रामचंद्र नारायण कर्वे वगैरे २१ यांनी धारण केल्या असल्याचे सन १९५८-५९ सालचे ७/१२ वरून दिसून येते. तथापि, मूळ खातेदार श्री.रामचंद्र नारायण कर्वे वगैरे २१ यांनी जमीन महसूल न भरल्यामुळे तहसिलदार, मावळ यांचेकडील आदेश दि.२५/०७/१९५९ व उप विभागीय अधिकारी मावळ उपविभाग, पुणे यांचेकडील आदेश दि.२५/०७/१९५९ अन्वये काही क्षेत्र जमीन महसूल न भरल्याच्या कारणास्तव "सरकार जमा" करणेचे आदेश होऊन फेरफार २२९ दिनांक १२/०६/१९७० अन्वये "आकारी पड" अशी नोंद दाखल झालेली आहे. तथापि, सदर आदेशामध्ये किती क्षेत्र आकारी पड झाले याबाबत उल्लेख नाही. तथापि फेरफार क्र.२२९ चे अवलोकन केले असता अकारीपड क्षेत्र १०१.५८ हे.आर. असल्याचे दिसून येते. तथापि उपविभागीय अधिकारी, मावळ यांनी दिनांक २१/१२/२०१६ रोजीच्या आदेशान्वये दावा जमीनीवर असलेल्या आकारीपड क्षेत्राबाबत योग्य व आवश्यक त्या कागदपत्रांचा अभ्यास करुन सदरचे क्षेत्र

७/१२ वर योग्यरित्या दाखविणेबाबत उचित कार्यवाही करण्याबाबत आदेश दिले असून, आकारीपड क्षेत्रासंदर्भात चौकशी होऊन अंतिम आदेश पारीत करण्या दरम्यानच्या कालावधीत सदर जमीनीच्या अधिकार अभिलेखात इतर हक्कात आकारीपड क्षेत्राचे निर्धारण करण्याच्या कार्यवाहीवर प्रलंबित असा शेरा नोंदविण्याचे आदेश दिले आहेत. तथापि, उपरोक्त आदेशानुसार अद्याप आकारीपड क्षेत्राचे निर्धारण झालेले नाही.

उपरोक्त क्षेत्राचा फाळणीबारा करुन ७/१२ चे विभाजन करण्यात आलेले आहे. वरील उपविभागीय अधिकारी, मावळ यांच्या दिनांक २१/१२/२०१६ च्या आदेशामध्ये नमुद केलेनुसार सर्वे नं. ३/२/१ क्षेत्र २९९ हे ०० आर अधिकार अभिलेख सदरी इतर हक्कामध्ये आकारी पड क्षेत्राचे निर्धारन करण्याच्या कार्यवाहीसाठी प्रलंबित अशा नोंदी घेणेत आलेल्या आहेत. तसेच सदर प्रकरणी अद्याप आकारीपड क्षेत्राचे निर्धारन झालेले नसतानाही मूळ मालकांनी सर्वे नंबर ३/२/१ मधील संपूर्ण क्षेत्र (२९९ हे. आर.क्षेत्र) श्री.राजेंद्र राजाबाली सिंग, ओझोन लँड प्रा. लि. व इतर १४ कंपन्यांना विक्री केलेले आहे. त्यानुसार फेरफार क्र.५३२, ५३६ व ५३८ अन्वये मौजे मोरमारवाडी, ता.मावळ, जि.पुणे येथील गट क्र.३/२/१ एकुण क्षेत्र २९९ हे. आर. च्या कब्जेदार सदरी समाइकामध्ये ओझोन लॅन्ड प्रा.लि. व इतर १४ आणि सरकारी आकारी पड नाव दाखल आहे. याशिवाय सदर मिळकतीचे सन १९५७ ते १९७२ पर्यंत पेरेपत्रक सदरी गवतपड असून त्यानुसार सन १९५७ ते १९७२ याकालावधीत सदर जमिनी वहिवाटीखाली नसल्याचे दिसून येते. सदर जमीनीचे सन १९७२-७३ ते २०१४-१५ पर्यंतचे ७/१२ पाहता पिकपाहणीतील वहिवाट सदरी श्री.धाऊ दाजी शेडगे व इतर यांच्या नावाची नोंद दिसून येते. तथापि सदरच्या वहिवाटीची नोंद कोणत्याही आदेशाशिवाय तलाठी यांच्याद्वारे झाली असल्याचे दिसून येते. त्यानंतर सन १९७२-७३ नंतर सदर जमिनीमध्ये भात, वरई, नाचणी यासारखी पिके घेतल्याचे पीक पाहणी सदरातील नोंदीवरुन दिसून येते.

सदर जमिनीच्या वहिवाट सदरी असलेल्या व्यक्तींनी तहसिलदार, मावळ यांचेकडे सन २००८ मध्ये कुळकायदयातील ३२-ग मधील तरतूदीनुसार सदर जमिनीची किंमत निर्धारित करुन मिळणेसाठीचा दावा दाखल केला होता. परंतु तत्कालीन तहसिलदार, मावळ यांनी सदर कुळ हे दि.०१/०४/१९५७ रोजी कुळ नसल्याने तसेच सदर जमिन ही खाजगी वन संपादन कायद्याचे तरतुदीनुसार संपादित झाली असल्याने तहसिलदार मावळ यांनी त्यांच्या दि.१३/०१/२००९ रोजीच्या आदेशान्वये सदर दावा फेटाळून लावलेला आहे.

सदर जमिनीच्या संदर्भात ओझोन लँड अॅग्रो प्रा.लि. यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.९२२/२०१५ संदर्भात मा.उच्च न्यायालयात दिलेल्या दिनांक १८/०६/२०१५ रोजी आदेशानुसार मौजे मोरमारवाडी, ता.मावळ येथील गट नं.३ क्षेत्र ३२३.७५ पैकी १५१.४८ हे. आर क्षेत्र खाजगी वन संवर्गातून कमी करण्यात आलेले आहे.

तहसिलदार, मावळ यांच्या दिनांक १३/०१/२००९ रोजीच्या आदेशा विरुध्द कुळ कायदा कलम ७४ मधील तरतूदीनुसार सदर व्यक्तींनी उपविभागीय अधिकारी, मावळ मुळशी उपविभाग, पुणे यांचेकडे सन २०१८ मध्ये अपिल दाखल केले होते. सदर अपिल उप विभागीय अधिकारी, मावळ मुळशी यांनी त्यांच्या दि.०२/०८/२०२१ रोजीच्या आदेशन्वये फेटाळणेत आलेले आहे. याशिवाय सदर जमिनीमध्ये एकुण २४ व्यक्तींच्या घरांच्या नोंदी ग्रामपंचायत कडील ८ अ रजिस्टरमध्ये दाखल असल्याचे दिसून येते. सदर नोंदी आजही ग्रामपंचायत कडील ८ अ रजिस्टरला अस्तित्वात आहेत.

मावळ तालुका धनगर समाज विकास परिषद संघटना यांनी दिनांक १०/१२/२०२२ रोजी मौजे मोरमारवाडी, ता.मावळ, जि.पुणे येथील डोंगरपठरावरील मूळ स्थानिक कुटुंबांना त्यांच्या मिळकतीपासून अन्यायकाररित्या बेदखल करण्यात येत असल्याबाबत निवेदन सादर केले असून सदर निवेदनाद्वारे सदर

जमिनीचा मालकी हक्क मिळण्याची विनंती केलेली आहे. तथापि, संबंधितांचा कूळाचा दावा तहसिलदार, मावळ तसेच उपविभागीय अधिकारी मावळ-मुळशी यांच्या स्तरावर फेटाळण्यात आलेला आहे.

तसेच ओझोन लॅन्ड प्रा. लि. यांच्याकडून प्रस्तुत तक्रारदार यांचे कुटूंबाना सदर जमिनीतून बेदखल करण्यासाठी धमकी दिल्याचा कोणताही गुन्हा अथवा तक्रार दाखल झाली नसल्याबाबतचा अहवाल पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन कामशेत यांनी दिला आहे.

---

लक्षवेधी सूचना क्र.१४८९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री.राजेश पाडवी, सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४८९ पुढीलप्रमाणे आहे. :-**

" नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील अमोणी, कालीबेल, चौगाव बुद्रुक, रोझवा, रापापूर, सोमावल खुर्द, ढेकाटी इत्यादी गावातील साधारणतः ६५९ वनहक्क दाव्यांचा समावेश असणे, सदर दावेदारांनी वनहक्क कायदे अंतर्गत मागणी केलेले क्षेत्र साधारतः ५५० हेक्टर इतके असणे, सदर अतिक्रमण असल्याचे पुरावे सदर अतिक्रमण धारकांकडे असणे, तसेच आजतागायत सदर वनपट्टे अतिक्रमण धारकांच्या ताब्यात असून जमीन कसत असणे, मागील दोन वर्षापासून अति पावसामुळे पिकांचे नुकसान झाल्याने त्यांना नुकसान भरपाई सुद्धा शासनाकडून मिळत असणे, परंतु, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वनवासी (वन हक्काची मान्यता ) अधिनियम २००६ व नियम २००८ नुसार कलम ३ ( १ ) ( क ) अन्वये वैयक्तिक वनहक्क दावे दाखल केलेले असूनही फेटाळणे, कारण सन १९९५ मध्ये सरदार सरोवर प्रकल्प ग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी महसूल विभागाकडे वर्ग केलेली असणे, परंतु, प्रशासनाच्या दुर्लक्षाने सदर वनजमिनीवरील अतिक्रमण नमूद केल्याचे नसणे, त्यामुळे सदर वनजमीन दावे जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडे शिफारस न करता फेटाळले जाणे, याबाबत स्थानिक प्रशासनाने मा. प्रधान सचिव, वने व अप्पर मुख्य सचिव, महसूल व मा. आयुक्त, आदिवासी विभाग यांना वारंवार पत्रव्यवहार करून मार्गदर्शन मागविलेले असणे, परंतु, शासनाकडून अद्याप पावेतो कुठलेही मार्गदर्शन प्राप्त न होणे, त्यामुळे सदर वनहक्क दाव्यांवर कोणतीही कार्यवाही होत नसणे, परिणामी वनहक्क धारक जनतेमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

---

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील अमोणी, कालीबेल, चौगाव बुद्रुक, रोझवा, रापापूर, सोमावल खुर्द, ढेकाटी इत्यादी गावातील ग्रामस्तरीय वनहक्क समितीकडे प्राप्त झालेले वनहक्क दावे ग्रामस्तरीय वनहक्क समितीने चौकशी करून उपविभागस्तरीय समितीकडे निर्णयास्तव सादर केलेले आहेत.

१२१



सदरचे दाव्यातील जमीन ही सन १९९४-९५ मध्ये सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी वनविभागाने निर्वनीकरण करुन महसूल विभागाकडे वर्ग केलेली आहे. सदरची जमीन ही सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी असल्याने सदर दावे उपविभागीय स्तरीय समिती, तळोदा भाग, तळोदा यांचे स्तरावरुन फेटाळण्यात आले आहेत.

मदत व पुनर्वसन विभागाच्या दिनांक २५.०१.२०१९ च्या शासन निर्णयान्वये वनदावे प्रलंबित असलेल्या सर्व शेतकऱ्यांना देखील निविष्टा अनुदानासाठी पात्र समजण्यात यावे व त्यांनाही अनुज्ञेय असलेली मदतीची रक्कम प्रदान करण्यात यावी अशा सूचना असल्याने व सदर दावेधारकांबाबत अंतिम निर्णय झालेला नसल्याने, राज्यातील २०१८ च्या खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने शासनाच्या मदतीचा लाभ देण्यात आलेला आहे.

सदर दावे हे सन १९९४-९५ मध्ये सरदार सरोवर प्रकल्पातील बाधितांच्या पुनर्वसनासाठी वन विभागाकडून निर्वनीकरण करून महसूल विभागाकडे हस्तांतरीत केलेल्या जमिनीवरील आहेत. सदरहू जमिनीचा वनांचा दर्जा हा निर्वनीकरणामुळे संपुष्टात आलेला असल्याने, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम, २००८ सुधारणा नियम २०१२ मधील तरतूदीनुसार वन दाव्याबाबत कार्यवाही करण्यास अडचणी निर्माण होत असल्यामुळे, जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी शासनाचे मार्गदर्शन मागविले आहे.

प्रस्तुत प्रकरणी मार्गदर्शन मागविण्यात आलेल्या मुद्यांबाबत आदिवासी विकास विभाग, वन विभाग, मदत व पुनर्वसन विभाग व महसूल विभागाचे अभिप्राय घेण्यात येत असून शासन स्तरावर सर्वंकष विचारविनिमय करुन जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना यथाशीघ्र मार्गदर्शन करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

*********

लक्षवेधी सूचना क्रमांक-१९२५

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**ॲड. अशिष जयस्वाल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यात नागरिकांना मोठ्या प्रमाणात घर बांधकामासाठी व शासनाच्या विविध बांधकामांसाठी वाळुची उपलब्धता नसल्याने प्रत्येक नागरिकांना चोरीची वाळु घेतल्याशिवाय पर्याय नसणे, शासनाचा मोठा महसूल बुडणे व सामान्य नागरिकांना प्रचंड त्रास होणे, पोलीस व महसूल यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी अनेक ठिकाणी हप्ते घेऊन सर्रास वाळुचोरीला अभय देणे तर दुसरीकडे काही ठिकाणी मोठा दंड ठोठावुनही त्याची वसुली न होणे, डम्प ला अवैध मुदतवाढ देऊन त्या नावावर अवैधरित्या वाळु विक्रीचे परवाने देणे, घरकुल व शासकीय आवास योजनेसाठी मोफत रॉयल्टी पासेस वितरीत करण्यास महसूल अधिकाऱ्यांची अनास्था, राज्यात घरासाठी नियमानुसार स्वामित्व धन स्वीकारून रॉयल्टी पासेस देणे, तहसीलदारांची जबाबदारी असताना राज्यात कुठेही तहसीलदारांनी ही योजना न राबविणे, एका बाजुला घरकुलाचे बांधकाम करण्याबाबत शासनाचा प्रयत्न तर दुसरीकडे ट्रॅक्टर पकडुन प्रति ट्रॅक्टर तीनपट स्वामित्व धन व एक लक्ष रूपयांची शास्ती वाहनावर लावण्याचे गावातील ट्रॅक्टर मालकांचा पोलीस व महसूल विभागाकडून छळ होणे तर मोठ्या ठेकेदारांना पोकलेननी अवैध उपसा व वाहतुकीकरिता सुट देणे, त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात वाळु माफीया सक्रिय होणे व याबाबत शासनाने धोरणात दुरूस्ती करण्याची गरज असताना शासनाचे याकडे दुर्लक्ष होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

जिल्हाधिकारी यांनी वाळू उत्खननासाठी पर्यावरण अनुमती घेऊन लिलावासाठी निश्चित केलेल्या मात्र यशस्वीरित्या बोली न लागलेल्या वाळूघाटांपैकी अथवा या कारणास्तव जिल्हाधिकाऱ्याकडून विशेषत: राखीव ठेवण्यात आलेल्या वाळूघाटातून प्रचलित दरानुसार स्वामित्वधन आकारुन रहिवाशास त्यांच्या घरगुती किंवा शेतीच्या प्रयोजनासाठी तहसीलदाराची लेखी पूर्व परवानगी घेऊन पाच ब्रासपर्यंत वाळू काढण्यास महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम,१९६८ च्या कलम ३ अन्वये परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित तहसिलदार यांचेमार्फत कार्यवाही

केली जाते.खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम,१९५७ नियम ७८ नुसार गौण खनिजाची वाहतूक करण्यासाठी वाहतूक पास देण्याची कार्यवाही करण्यात येते.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४८(७) नुसार अवैधरित्या गौण खनिज उत्खनन करणा-यास गौण खनिजाच्या बाजारमुल्याच्या ५ पट पर्यंत शास्ती करण्याची तरतूद आहे. गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीबाबत शास्ती आकारण्याची कारवाई करताना एकाच प्रकारच्या अनियमीततेच्या प्रकरणात वेगवेगळी शास्तीची रक्कम आकारली जाणार नाही, तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांना भेदभाव करण्यास वाव राहू नये, याद्दष्टीकोनातून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८ (७) खालील प्रकरणांच्या वर्गवारीप्रमाणे शास्तीची रक्कम आकारण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना शासन निर्णय क्रमांक गौखनि १०/०३०६/प्र.क्र.२६९/ख दिनांक १४/०६/२०१७ अन्वये दिशानिर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ कलम ४८(८) अन्वये अवैध उत्खनन करण्यासाठी वापरण्यात आलेल्या यंत्रसामग्रीला प्रकारनिहाय रुपये २५,०००/- ते ७,५०,०००/- इतकी शास्ती करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

राज्यात दिनांक ०१/०४/२०२२ ते दिनांक ३१/०१/२०२३ पर्यंत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ७,९५९ प्रकरणी ७५.५९ कोटी दंडाची वसुली करण्यात आली आहे. तसेच, १,००७ प्रकरणी गुन्हे दाखल करुन ६३२ अरोपीना अटक करण्यात आली आहे व ३,६११ वाहने/यंत्रसामुग्री जप्त करण्यात आली आहे.

राज्यात गौण खनिजाचे अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी गाव पातळीवर ग्राम दक्षता पथक, तसेच, महसूल, परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.

राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने वाळू/ रेती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने तसेच अनधिकृत उत्खननास आळा घालण्याच्या उद्देशाने सर्वंकष धोरण राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

*******

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

## श्री शिरीष चौधरी, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२१४२

"लातूर जिल्हयातील उदगीर शहरातील सर्वे नं.२१७/१ मधील ०१ हेक्टर ८२ क्षेत्रास रहिवाशी प्रयोजनार्थ (NA) अकृषी परवानगी देण्यात आली असून ही परवानगी संबंधित तहसिलदार यांनी सर्व नियम धाब्यावर बसत बेकायदेशीर व चुकीच्यापध्दतीने केली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, सर्वे नं.२१७ मधील १ हेक्टर, ८२ आर हा परवाना चुकीचा असणे, उदगीर तहसिलदारानां अधिकार नसतानाही चुकीच्या पध्दतीने हा NA प्रस्ताव मंजुर केला असणे त्यामुळे या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्याची आवश्यकता सदर अकृषी (NA) परवाना रद्द करावा ही मागणी नागरिकांनी केली असणे हे लक्षात घेता शासनाने त्वरीत संबंधित दोषी अधिका-यांसह इतर दोषापिंतावर कार्यवाही करण्याची आवश्यकता लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची कार्यवाही."

---

## श्री. राधाकृष्ण विखे पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौ. उदगीर, जि. लातूर येथील सर्वे क्र.२१७/१ मधील १ हे. ८२ आर क्षेत्रास अकृषी परवानगी मिळणेकरीता श्री. आकाश शिवलींग सोनटक्के व इतर यांनी दि.०५.०१.२०२१ रोजी उपविभागीय अधिकारी, उदगीर यांचेकडे अर्ज केला होता. जिल्हाधिकारी यांच्या दि.२८.०५.२०२१ च्या आदेशानुसार नगरपालिका व नगरपरिषद हद्दीतील रहीवास व वाणिज्य अकृषिक परवानगी देण्याचे अधिकार तहसीलदार यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, उदगीर यांचेकडील प्राप्त प्रस्ताव व दि.१७.०३.२०२२ च्या पत्रानुसार मौजे उदगीर येथील सर्वे क्र.२१७/१ मधील १ हे. ८२ आर क्षेत्र रहीवास प्रयोजनार्थ सर्व आवश्यक कागदपत्रांच्या आधारे तहसीलदार, उदगीर यांच्या दि.२३.०३.२०२२ रोजीच्या आदेशान्वये अकृषिक परवानगी देण्यात आली होती.

माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये श्री. सोनटक्के व इतर यांनी अकृषिक आदेश रद्द करण्याकरीता तहसील कार्यालय, उदगीर येथे अर्ज केला. सदर प्रकरणात सुनावणी होऊन सर्व संबंधित पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी देण्यात आली. सुनावणीअंती दि.२२.०९.२०२२ च्या आदेशान्वये तहसीलदार, उदगीर यांनी अकृषिक आदेश रद्द करण्याबाबतचा अर्ज नामंजूर केला.

सदर निकालाच्या नाराजीने श्री. सोनटक्के व इतर यांनी उपविभागीय अधिकारी उदगीर यांचेकडे अपील केले असून सदर अपीलाच्या ६ वेळा सुनावण्या होऊन दि.२०.०३.२०२३ रोजीच्या सुनावणीमध्ये प्रकरण निकालासाठी राखून ठेवण्यात आले आहे.

---

रोटा/एव-१५१[ ७५०-४-२०२३]•

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.ज्ञानराज चौगुले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"नाशिक जिल्हा परिषदेत संगणक खरेदी प्रक्रियेत गैरप्रकार व अनियमितता झाल्याचा गंभीर प्रकार लेखा व वित्त विभागाच्या तांत्रिक तपासणीत झाल्याने याबाबत सामान्य प्रशासन विभागावर ठपका ठेवल्याचा प्रकार दिनांक २८/१/२०२३ रोजी निदर्शनास येणे, त्यानंतर जिल्हापरिषदेच्या सीईओ आशिमा मित्तल यांनी १ कोटी १४ लाखांच्या खरेदी प्रक्रियेसाठी ठेवलेला दर १० टक्क्यांहून अधिक असल्याने रद्द करण्याची शिफारस करण्यात आल्याने सामान्य प्रशासन विभागावर संगणक खरेदी प्रक्रिया रद्द करण्याची नामुष्की ओढवणे, १० लाखांच्या आतील बांधकामे व खरेदी प्रक्रिया यांची निविदा प्रक्रिया राबविली जात नसल्याने त्याची खरेदी जीईएम पोर्टलवर करण्यात येणे असा अलिखित नियम असतानाही, सामान्य प्रशासन विभागाने १ कोटी १४ लाख रुपयांची संगणक खरेदी जीईएम पोर्टलवर करण्यात येणे, आय-५ प्रकारात ३० संगणक पुरविण्यासाठी मिनिटेक सिस्टीम्स इंडिया लि. या कंपनीची निवड करण्यात येणे, सामान्य प्रशासन विभागाने २१ नोव्हेंबरला सर्वात कमी दर असलेल्या पुरवठादारास वाटाघाटीसाठी बोलविण्याची परवानगी मागणारी फाईल मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करण्याची तयारी केलेली असणे, मात्र त्याच दिवशी माध्यमांनी या संगणक खरेदीमुळे नाशिक जिल्हा परिषदेचे १२ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची बातमी प्रसिध्द होणे, त्यामुळे घाईघाईने सामान्य प्रशासन विभागाने ती फाईल मुख्य लेखा व वित्त विभागाकडे पाठविली असता त्यानुसार लेखा व वित्त विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडून या संगणक खरेदी प्रक्रियेतील सर्व सहभागी संस्थांनी जीईएम पोर्टलवर जोडलेली कागदपत्रे मागविणे, त्या कागदपत्रांची तपासणी केली असता त्यात कागदपत्रे असूनही काही पुरवठादार अपात्र ठरविण्यात येणे, तर पात्र ठरविलेल्या पुरवठादारांची काही कागदपत्रे अपूर्ण असल्याचे आढळून येणे, तसेच सामान्य प्रशासन विभागाने संगणक पुरवठ्यासाठी अंतिम निवड केलेल्या पुरवठादार कंपनीचेही काही कागदपत्रे अपूर्ण असल्याचे समोर येणे, त्यामुळे लेखा व वित्त विभागाने या अपूर्ण कागदपत्रांची यादी सामान्य प्रशासन विभागाला डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात दिलेली असणे, सदर खरेदी प्रकरणात अनियमितता झाल्याचे आढळून आले असतानाही, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्तल यांनी अद्याप जबाबदारी निश्चित करुन कोणावरही कारवाई न करता सदर प्रकरण दडपून टाकल्याचा घडलेला प्रकार, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सामान्य प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांना तात्काळ बडतर्फ करुन त्यांची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

श्री.गिरीष महाजन, मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत जिल्हा परिषद सेसमधून सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात सामान्य प्रशासन विभागांतर्गत रु.१ कोटीची तरतूद करणेत आली होती. तसेच अर्थ विभागामार्फत रु.११ लक्ष २५ हजार तरतूद करणेत आली होती. त्यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागामार्फत दि. २०/०४/२०२२ रोजी विषयांकित खरेदी प्रकरणी मंजुरीकामी नस्ती अर्थ विभागामार्फत मुख्य

२२८



कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आली. सदरची नस्ती अर्थ विभागाकडून आक्षेप लावून तसेच विभागाकडून पुर्तता करून दि. ०४/०८/२०२२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरची खरेदी GEM पोर्टलवरुन करणे कामी मंजुरी देण्यात आली आहे. सदर मंजुरी रु. ९९ लक्ष चे संगणक खरेदी मान्यता देण्यात आल्याने शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक यांचेकडून सदरचे खरेदीबाबतचे सर्व Specifications बाबतचे अभिप्राय घेणेत आले.

तदनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेनंतर GEM वर निविदा प्रसिध्द करणेत आली आहे. निविदा प्रसिध्दीनंतर निविदेत सहभागी होणाऱ्या निविदाधारक यांनी उपस्थित केलेल्या शंकाना वेळेत Reply करणेत आला असून त्यांची कागदपत्रे Download करुन कागदपत्रांचे आधारे उप मुख्य कार्यकारी अधिकार यांच्यामार्फत Financial Bid उघडण्यात आले आहे. Financial Bid उघडण्यात आली असता MINITEK SYSTEMS INDIA PRIVATE LIMITED यांचे दर न्युनतम आढळून आले. तथापि MINITEK SYSTEMS INDIA PRIVATE LIMITED यांचेशी पुढील कार्यवाही/अनुषंगिक चर्चा करणेकामी नस्ती अर्थ विभागामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडेस पाठविणेत आली. अर्थ विभागाने १०% पेक्षा जास्त तफावत असल्याबाबत नमूद केले आहे.

शासन निर्णय दि. १.१२.२०१६ मधील ६.१ परिशिष्ट १ प्रपत्र अन्वये Estimated Cost रु. ५५०००/- नमूद केली आहे. Desktop Computer हे i-३ व i-५ अशा दोन प्रकारचे प्रस्तावित करणेत आले होते. Desktop Printer व UPS हे शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक यांचेकडील मान्य Specifications नुसार असले तरी Estimated Cost पेक्षा जादा दराचे दिसून आले. त्यामुळे Estimated Cost व L-१ यांचेकडील साहित्याचे अंतिम दर यांत १० % पेक्षा जास्त तफावत असल्याने दि. ०१/०१/२०१६ चे परि.४.४.३.१ "ब" मध्ये नमूद केल्यानुसार फेर निविदा काढणे क्रमप्राप्त राहील, असे नमूद करून नस्ती अर्थ विभागात सादर करणेत आली आहे.

दि. ०४/०१/२०२३ अन्वये फेर निविदा करणे बाबत स्पष्ट आदेश देणेत आलेले आहेत. मात्र शासन परिपत्रक, वित्त विभाग दि.९ फेब्रुवारी २०२३ मधील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार फेर निविदा काढण्यात आलेली नाही. सदर खरेदी प्रकरणी उक्त प्रमाणे कार्यवाही राबविणेत आली आहे. मात्र कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष पुरवठा आदेश संबंधितांना देण्यात आलेले नाही. तसेच पुरवठा आदेश न दिल्याने कोणत्याही प्रकारचे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले नाही. वर्तमानपत्रातील बातम्यांमध्ये रु.१२ लाखाचे नुकसान झाल्याचे बातम्या प्रसिध्द झाल्या असल्या तरी सदरचे बाबतीत कोणत्याही प्रकारची खरेदी झाली नसल्याने कोणतीही प्रशासकीय व आर्थिक अनियमितता झालेली नाही व जिल्हा परिषद व शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

*****

226

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

श्री.शांताराम मोरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २१७८ पुढीलप्रमाणे आहे:-

"पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी श्री. आगे यांनी पदभार स्विकारल्यापासुन गैरव्यवहाराची मालिकाच सुरु असणे, मतदारसंघातील गोरगरीब शेतकऱ्यांची लूट चालू असणे, भूसंपादनाचे अनेक प्रकल्प सुरु असल्यामुळे त्यांनी त्यांनी नेमलेल्या दलालांनमार्फत इच्छित वसूली झाल्याशिवाय कामे न करणे, अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांनी केलेल्या आर्थिक व्यवहाराची त्यांच्याकडील वापरातील तीन मोबाइल नंबरचे सीडीआर वापरून चौकशी केल्यास वस्तुस्थिति समोर येणे, अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास विलंब होणे, याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधि यांनी वारंवार तक्रारी करूनही कोणतीही कारवाई होत नसल्याने भूधारकांमधे/खातेधारकांमधे शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापचे वातावरण याबाबत शासनाने तातडीने करावयाची करवाई व प्रतिक्रिया"

---

### श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

पालघर जिल्हयातील वाडा उपविभागा अंतर्गत वाडा व विक्रमगड तालुक्यांचा समावेश आहे. उप विभागीय अधिकारी, वाडा, या उपविभागा अंतर्गत १) मुंबई-वडोदरा महामार्ग, २) गारगाई पाणीपुरवठा प्रकल्प व ३) देहरजे मध्यम प्रकल्प (पाणी पुरवठा) हया प्रकल्पांसाठी भुसंपादनाची कार्यवाही चालू आहे.

मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्ग प्रकल्पाचे भूसंपादनाकरिता भारत सरकार यांचे राजपत्र का. आ. ६४९ (अ) दि.०३/०३/२०१५ रोजी प्रसिध्द करुन उपविभागीय अधिकारी, वाडा यांची "सक्षम प्राधिकारी" म्हणून नियुक्ती करणेत आली आहे. सदर प्रकल्पांतर्गत वाडा तालुक्यातील मौजे गोराड, केळठण व निंबवली या गावातील ४२.०६ हे. आर. जमीन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम,१९५६ नुसार संपादन करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्या अनुषंगाने तिन्ही गावांतील बाधित शेतकऱ्यांना उपविभागीय अधिकारी, वाडा यांचे कार्यालयाकडून आतापर्यंत ३९.९२ हे. आर. क्षेत्रासाठी रु.१,८९,११,४५,०८०/- इतकी रक्कम अदा करणेत आली आहे.

सद्यस्थितीत २.९४ हे. आर. क्षेत्रावरील खातेदारांचे गा.न.नं. ७/१२ संयुक्तीक असल्याने ते एकमेकांना मोबदला वाटपासंदर्भात सहमती देत नसल्याने मोबदला मे. दिवाणी न्यायालय, ठाणे येथे पाठविण्यात आलेला असुन उपविभागीय अधिकारी, वाडा यांनी संपुर्ण ४२.०६ हे. आर. क्षेत्राचा ताबा घेऊन गा.न.नं. ७/१२ सदरी संपादन संस्थेचे नाव घेणेत आले आहे. मोबदला

वाटप करताना कार्यालयामध्ये बायोमॅट्रीक, तसेच फोटो घेवून संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये मोबदल्याची रक्कम चेकद्वारे RTGS ने जमा करण्यात येते. उपरोक्त भूसंपादन प्रकरणी दर निश्चिती व निवाडा दि.१५/०२/२०१९ रोजी मंजूर करणेत आलेला आहे.

मुंबई-बडोदरा महामार्गासाठी वाडा तालुक्यातील मौजे निंबवली, गोराड व केळवण या गावातील क्षेत्र संपादित होत असून, श्री. आगे-पाटील हे सदर पदावर हजर झाल्यापासून बाधित शेतकऱ्यांना ४.३४ हे. आर. क्षेत्रासाठी रु.२१,३२,४७,७४८/- इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. तसेच, ३१ प्रकरणांमध्ये बाधित खातेदार यांचेमध्ये आप-आपसात वाद असल्याने उपविभागीय अधिकारी, वाडा, यांच्या कार्यालयात मोबदला रक्कम स्विकारणेसाठी संबंधित हजर राहत नसल्याने, सदर प्रकरणे मा. दिवाणी न्यायालय, ठाणे यांचेकडे वर्ग करणेबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत.

तसेच, देहरजे मध्यम प्रकल्पाची ११ (१) ची अधिसुचना प्रसिध्द केलेली असून, गारगाई पाणी पुरवठा प्रकल्पाच्या भूसंपादनाची प्रक्रिया अद्यापपर्यंत सुरु करण्यात आलेली नाही. त्यामुळे, मोबदला वाटप करण्याच्या स्तरावर (Payment Disbursement Stage) सदर प्रकल्प प्रलंबित नाहीत.

--------o-------

## लक्षवेधी सूचना क्र.२२७२

### महाराष्ट्र विधानसभा
### सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**सर्वश्री. संजयमामा शिंदे, अजित पवार, बबनराव शिंदे, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक २२७२ पुढीलप्रमाणे आहे:-**

" सोलापूर जिल्ह्यातील कुर्डूवाडी शहर हे महत्वाचे शहर असून एक मोठी बाजारपेठ असणे, रेल्वे जंक्शन मुळे शहराचे महत्व आणखीन वाढलेले असणे, गेल्या कित्येक वर्षापासून वर्ग-ब मालमत्ता धारकांचा प्रश्न प्रलंबित असणे, गेल्या चार ते पाच पिढ्या कब्जे वहिवाटीत आणि मालकी हक्कात राहणाऱ्या जवळपास ९१७ मालमत्ता असणे, या मालमत्ता बाबत १९९४ ला सिटीसर्व्हे करणाऱ्या चमूने सदर मालमत्याची नोंद महाराष्ट्र शासन सदरी ब वर्ग केलेली असणे, त्या नोंदीमुळे शहरातील जवळपास सर्व व्यापारी मालमत्ता धारक अडचणीत येवून त्यांना विस्थापित होणेची परिस्थिती निर्माण झालेली असणे, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, सोलापूर यांनी या ब वर्ग मालकी प्रकारावर "महाराष्ट्र शासन" लावलेली नोंद सदोष असल्याचे सांगणे, नगर भूमापक नियम पुस्तक सिटी सर्व्हे मॅन्युअल १९८८ कलम १२७ प्रमाणे सत्ता प्रकारच्या व्याख्येप्रमाणे सत्ताप्रकार ब मध्ये मिळकत धारकांच्या सदरी महाराष्ट्र शासन नाव दाखल करणे अपेक्षित नसून फक्त ग वर्ग मालमत्ता धारक हा कायमस्वरुपी "महाराष्ट्र शासन" असतो असे नमूद करणे, या ९१७ चे मालमत्तेचे वर्गीकरण एक आकडा ब प्रकार ७६५ आणि इतर १५२ असे असणे, यापैकी जवळपास ३६५ मालमत्तेचे महाराष्ट्र शासन नाव कमी करणेत आले असणे, मात्र उर्वरित मालमत्ता धारकांना अद्याप न्याय मिळालेला नसणे, शासनाने त्यांचे ११०९ व २०१२ मधील शासन निर्णयाव्दारे कार्यवाही करण्याचे आदेशित केले असतानाही महसूल विभागामार्फत पर्यायाने उप विभागीय अधिकारी कुर्डूवाडी (ता.माढा) यांचे मार्फत कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, तद्नंतर उप विभागीय अधिकारी, कुर्डुवाडी, यांचे कार्यालयात संबंधित मालमत्ता धारक, प्रशासन व लोकप्रतिनिधींची बैठक पार पडणे, उप अधिक्षक भुमी अभिलेख, माढा यांना यासाठी दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी विशेष कॅम्प घेण्याची सुचना करणे, मात्र उप अधिक्षक या कॅम्पसाठी गैरहजर राहणे, त्यामुळे अद्यापही सदरचा प्रश्न आहे तसाच असणे, एकंदरीत सदरचा प्रश्न खूप वर्ष प्रलंबित असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी चिड निर्माण होणे, यांच्या पिढीजात मालमत्ता त्यांना मिळणे विषयी त्यांची होत असलेली मागणी याबाबत, संबंधित मालमत्ताधारक यांना न्याय देण्यासाठी शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे कुर्डूवाडी, ता.माढा, जि.सोलापूर येथील एकूण ९१७ मालमत्तांबाबत १९९४ मध्ये तत्कालीन विशेष जिल्हा निरीक्षक भुमि अभिलेख तथा चौकशी अधिकारी यांनी सदर मालमत्तांचे धारक सदरी महाराष्ट्र शासन व धारणाधिकार 'ब' अशी नोंद घेतलेली होती. सदर मालमत्तांचा तपशील खालील प्रमाणे आहे,

| धारक | हक्कदार | मिळकतींची संख्या |
|---|---|---|
| १) महाराष्ट्र शासन | महाराष्ट्र शासन नावे नोंद | ११९ |

शेरा K/0034 (650-34-23)

| | | |
|---|---|---|
| २ ) महाराष्ट्र शासन | वहिवाटदारांचे नावे नोंद | १२२ |
| ३ ) महाराष्ट्र शासन | पट्टेदार नावे नोंद | ३९० |
| ४ ) महाराष्ट्र शासन | इतर हक्कदारांचे नावे नोंद | २८६ |
| एकूण | | ९१७ |

तदनंतर तत्कालीन राज्य मंत्रीमंडळाने दिनांक ०६/०८/२००९ रोजीच्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन ज्ञापन क्र.जमीन ३७०६/सीएम-२६१/प्र.क्र.सो.१६०/भाग-३/ज-५, दिनांक ३१/०८/२००९ तसेच शासन ज्ञापन शुध्दीपत्रक दिनांक १८/०२/२०१२ नुसार मौजे कुर्डुवाडी, ता. माढा येथील ९१७ मिळकतींचे विशिष्ट अटी व शर्तीवर अतिक्रमण नियमित करणेबाबत निर्देश देण्यात आलेले होते.

शासनाच्या दिनांक ३१/०८/२००९ तसेच शासन ज्ञापन शुध्दीपत्रक दिनांक १८/०२/२०१२ मधील निर्देशाच्या अनुषंगाने दिनांक ३०/११/२०१५ रोजी जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख, सोलापूर यांनी ९१७ मिळकतीपैकी ३९० मिळकतींच्या संदर्भात 'ब' या मालकी सत्ताप्रकारावर "महाराष्ट्र शासन" ही लावलेली नोंद सदोष असल्याचे नमूद करून नगर भूमापन नियम पुस्तिका, १९१८ चे कलम १२७ प्रमाणे 'ब' सत्ताप्रकारच्या व्याख्येप्रमाणे सत्त प्रकार 'ब' मध्ये मिळकत धारकांच्या सदरी "महाराष्ट्र शासन" ही नोंद कमी करुन धारक सदरी मिळकतधारकांचे नाव नमूद करण्याबाबत तत्कालीन विशेष जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख तथा चौकशी अधिकारी यांचे आदेश महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २५८ अन्वये पुर्नविलोकनात घेण्याबाबत उप अधिक्षक भुमि अभिलेख, माढा यांना निदेशित केले होते. त्यास अनुसरुन आजअखेर एकुण ३९० मिळकत पत्रिकेवरील धारक असलेले "महाराष्ट्र शासन" नाव कमी करून पट्टेदार यांची नावे धारक सदरी "ब" या नियंत्रित सत्ताप्रकारावर दाखल केलेली असून अशा प्रकारे एकूण ९१७ मिळकतींपैकी भाडेपट्ट्याने दिलेल्या ३९० मिळकतींवरील कार्यवाही पुर्ण झालेली आहे. मात्र ११९ मिळकती या मुळच्या महाराष्ट्र शासनाच्या असल्यामुळे तसेच सदर मिळकती ह्या भाडेपट्ट्याने दिलेल्या नसल्याने तसेच अशा मिळकतींच्या मिळकत पत्रिकेंवर वहिवाटदार अथवा इतर हक्क सदरी कोणत्याही नोंदी नसल्याचे आढळून आल्यामुळे या मिळकतींबाबत निर्देशानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

कुर्डुवाडी शहरातील उक्त एकूण ९१७ मिळकतींपैकी ४०८ मिळकतींवरील ज्या मिळकत धारकांच्या नोंदी वहिवाटदार सदरी तसेच इतर हक्क सदरी आहेत अशा मिळकतधारकांना अतिक्रमणधारक असे समजून शासन निदेशानुसार अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या स्तरावर विशेष अभियान राबवून कार्यवाही प्रगतीमध्ये आहे. त्यास अनुसरून ४०८ मिळकतींपैकी ४५ मिळकतींमध्ये अतिक्रमण नियमानुकुल करून धारक सदरी असलेले महाराष्ट्र शासन हे नाव कमी करून मिळकत धारकांची नावे धारक सदरी "ब" या नियंत्रित सत्ताप्रकारावर दाखल करण्यात आलेली आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांचेकडील दिनांक १२/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, माढा विभाग, कुर्डूवाडी व उप अधिक्षक, भूमि अभिलेख, माढा यांना शासन निर्देशानुसार कार्यवाही करणेचे अनुषंगाने सदर मोहीमेस जनसामान्यात व्यापक प्रसिध्दी देवून दिनांक १७/०१/२०२३ रोजी कॅम्प आयोजित करुन मिळकतधारकांना आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच उप अधिक्षक, भूमि अभिलेख, माढा हे सदर पथकाचे प्रमुख म्हणून नेमणेत आलेले असल्याने पथकातील इतर सदस्याकडून मौजे कुर्डूवाडी येथील अतिक्रमण नियमित करणेची कार्यवाही होणेकामी जागेची स्थळ पाहणी पंचनामा करुन परीपुर्ण छाननी तक्ता आवश्यक कागदपत्रे/पुरावे प्राप्त करुन परीपुर्ण अहवाल उपविभागीय अधिकारी, माढा विभाग, कुर्डुवाडी यांचेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

या पार्श्वभुमीवर दिनांक १७/०१/२०२३ रोजी उपविभागीय अधिकारी, माढा विभाग, कुर्डुवाडी यांचे कार्यालयात विशेष कँपचे आयोजन करणेत येऊन सदर कँपमध्ये उप अधिक्षक भूमि अभिलेख यांचे प्रतिनिधी म्हणून संबंधित परिरक्षण भूमापक, कुर्डूवाडी हे हजर होते. सदर कँपमध्ये एकूण ११८ अर्ज प्राप्त झालेले असून शासनाचे ज्ञापन दिनांक ३१/०८/२००९ व शुध्दीपत्रक दिनांक १८/०२/२०१२ मधील तरतुदीनुसार अतिक्रमणे नियमित करणेसाठी लागणारी कागदपत्रे (जसे आरक्षणाचा तपशिल, बांधकाम परवाने- न.पा.कुर्डूवाडी यांचेकडून, मुल्यांकन दाखला- दुय्यम निबंधक यांचेकडून, खरेदी दस्त व प्रतिज्ञापत्र) अर्जदारांकडून प्राप्त करून घेवून प्रकरणे नियमानुकूल करणेची कार्यवाही उप विभागीय अधिकारी, माढा व जिल्हाधिकारी, सोलापूर कार्यालयाकडून अंतिम टप्यामध्ये आहे. वरीलप्रमाणे विशेष मोहिम राबवून उर्वरित २४५ मिळकतींबाबत परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त करुन घेवून अतिक्रमणे नियमानुकूल करणेची कार्यवाही लवकरच करणेची दक्षता घेण्यात येत आहे. मात्र यासाठी मिळकतधारकांचे सहकार्य ही अपेक्षित आहे.

*******************************

लक्षवेधी सूचना क्र.६४७

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. अजित पवार, श्री. जयंत पाटील, श्री. छगन भुजबळ, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. धनंजय मुंडे, श्री. संजय बनसोडे, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. चेतन तुपे, श्री. विनोद निकोले व श्री. दौलत दरोडा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"अंडयाचे मनमानी दर' जाहीर होत असल्यामुळे राज्यातील कुक्कुट पालक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत असल्याची बाब नुकतीच उघडकीला येणे, राष्ट्रीय अंडी समिती (एनइसीसी) कडून अंड्याचे दर अचानक कमी केल्याने राज्यातील कुक्कुटपालक शेतकरी अडचणीत आले असणे, परिणामी पक्षी पालकांचे भविष्यात फार मोठे आर्थिक नुकसान होणारे असणे, कोणत्याही ठोस कारणाशिवाय अंड्याचे दर अचानक कमी केले जात असल्याकडे संबंधित मंत्र्यांकडे निवदेन देऊनही त्याच्या संदर्भात शासनाच्या संबंधित विभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, कोणत्याही कायदेशीर अधिकाराशिवाय राष्ट्रीय अंडी समिती अंडयाचे दर कोणत्याही प्रकारच्या शास्त्रोक्त अभ्यासाशिवाय जाहीर करत असल्याची प्रथा थांबण्याची आवश्यकता, गेल्या काही दिवसांपासुन राज्यात दररोज सव्वा कोटी अंडयांचा तुटवडा असताना आणि उत्पादन खर्चात अचानक वाढ होत असताना राष्ट्रीय अंडी समन्वय समिती, अंडी उत्पादन खर्च, मागणी आणि पुरवठा अशा कोणत्याही वास्तविक माहितीच्या आधारावर दर जाहीर करत नसणे, ही संस्था कुक्कुटपालकांच्या ऐवजी व्यापाऱ्यांच्या बाजुने काम करीत असणे, त्यामुळे पक्षी पालकांचे होत असलेले नुकसान टाळण्यासाठी राज्य सरकारने हस्तक्षेप करण्याची आवश्यकता, अंडयांची किमान आधारभूत किंमत ठरण्यासाठी कायदेशीर संस्था स्थापन करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जोडधंदा म्हणुन कुक्कुटपालन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनामध्ये निर्माण झालेली नाराजीची भावना, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना"

---

मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांचे निवेदन

अंडी विक्रिच्या दरावर शासनाचे अथवा पशुसंवर्धन विभागाचे कोणतेही नियंत्रण नाही. देशात अंडयाच्या दरात दरदिवशी बदल होत असून, राज्यात राष्ट्रीय अंडी समन्वय समिती (NECC) मार्फत दररोज अंडी विक्रीचे दर प्रसिध्द केले जातात.

शेहा - H-0147 (७10-4-23)

खाजगीरित्या कुक्कुट पालन करणारे शेतकरी तसेच, कुक्कुट व्यवसाय करणाऱ्या कंपन्या यांना कुक्कुट पालन व्यवसाय करतांना येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करण्यासाठी दि.२१.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रात राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीचे गठन करण्यात आलेले आहे.

या समितीमध्ये राज्याच्या वेगवेगळया भागातून शेतकरी प्रतिनिधी जसे, कंत्राटी पध्दतीने मांसल कुक्कुट पालन व्यवसाय, ओपन पध्दतीने मांसल कुक्कुट पालन व्यवसाय व अंडी उत्पादन करणाऱ्या कुक्कुट पालक व्यावसायिकांच्या प्रत्येकी पाच प्रतिनिधींचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे, सदर समितीमध्ये खाजगी कुक्कुट व्यवसाय करणाऱ्या (पिल्ले व खाद्य) कंपन्या, राज्य स्तरीय बँकर्स समितीचे प्रतिनिधी तसेच NECC च्या प्रतिनिधींचा समावेश आहे.

NECC मार्फत अंडी विक्रीचे दर ठरवतांना अंमलात आणण्यात येत असलेल्या कार्यपध्दतीची माहिती सदर समन्वय समितीच्या माध्यमातून घेण्यात येत आहे. सदर माहिती प्राप्त करुन शासनाच्या विविध विभागाशी संबधित बाबींसंदर्भात आवश्यक त्या शिफारशी व उपाययोजना सुचविण्याची कार्यवाही सुरु आहे.

***

२४८

लक्षवेधी सूचना क्र.७८६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

मा.कुमारी आदिती तटकरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७८६ पुढीलप्रमाणे आहे :-

"रायगडसह कोकण पट्टयातील समुद्र किनारपट्टीवर पर्सिसन नेटच्या सहाय्याने अत्याधुनिक ट्रॉलर्सकडून बेसुमार मासेमारी होत असणे, एलईडी व ओव्हर फिशिंगसह बोटींची संख्या वाढलेली असणे, त्यामुळे सागरी प्रदूषणातही मोठया वाढ झालेली असणे, दरवर्षी पावसाळयात नारळी पोर्णिमेपर्यंत महाराष्ट्रात सागरी मासेमारीवर कायद्याने बंदी घालण्यात येत असणे, बंदीच्या काळातही पर्ससिन, एलईडीच्या माध्यमातून बेकायदेशीर मच्छीमारी केली जात असल्याने मासळीचे उत्पादन प्रतिवर्षी घटत चालले असणे, पर्यायाने राज्याच्या महसुलामध्ये घट होत असून परकीय चलनावरही विपरीत परिणाम होत असणे, परराज्यातील बोटी राज्यातील सागरी किनाऱ्यामध्ये घुसखोरी करून चोरटी मासेमारी करत असल्याने किनारपट्टी भागात मत्स्यदुष्काळ झालेला असणे, पारंपारिक मच्छिमारांना मात्र बंदीच्या काळात मासेमारी करता येत नसल्याने राज्यातील स्थानिक व पारंपारिक भूमिपुत्र मच्छीमारांचा व्यवसाय डबघाईला आलेला मोठे नुकसान सहन करावे लागत असल्याने कर्जबाजारी झालेले असणे, डिझेल परतावाही वेळेत मिळत नसल्याने कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढत असणे, मत्स्यदुष्काळामुळे अनेक मच्छीमारांमध्ये बेरोजगारीचेही प्रमाण वाढलेले असणे, मासेमारी हा एकमेव उदरनिर्वाहाचा मार्ग असल्याने कुटूंवियांच्या उपजिविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, पर्यायाने मत्स्यव्यवसायावर अवलंबून असलेली मोठी रोजगाराची साखळीही नष्ट होण्याची गंभीर परिस्थिती निर्माण झालेली असणे, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करून आवश्यक कार्यवाही व उपाययोजना करण्याची लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी करूनही आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील मच्छिमारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, पर्सिसन, एलईडी मासेमारीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या लाखो मच्छिमार बांधवांना सहाय्य केले जात नसल्याने दि.१९ डिसेंबर, २०२२ रोजीपासुन नागपूर येथे सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशकाळात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, उपासमारी, कर्जबाजारीपणामुळे अडचणीत सापडलेला मच्छिमार आत्महत्यासारख्या मार्ग निवडण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, यासंदर्भात कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्याला एकूण ७२० कि.मी. लांबीची किनारपट्टी लाभलेली असून, कोकण विभागामध्ये एकूण ०७ सागरी जिल्हयांचा समावेश आहे. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा) २०२१ कायद्यातील सुधारित तरतूदीन्वये अनधिकृत नौकांस आळा घालण्याच्या दृष्टीन शास्तीच्या रक्कमेमध्ये वाढ करण्यात आलेली आहे. त्याव्यतिरिक्त मासेमारी नौका, मासेमारी जाळे, नौकेवरील साहित्य व मासळी जप्त करण्याची तरतूद आहे. तसेच परप्रांतीय नौका राज्याच्या जलधी क्षेत्रात घुसखोरी

करून मासेमारी करताना निदर्शनास आल्यास अशा नौकांना जास्तीत जास्त शास्ती लादण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात पर्ससीन मासेमारीचे नियमन करण्यात आलेले आहे. मासेमारी व्यवसायातील विविध घटकांचे विशेषत: पारंपारिक मच्छिमारांचे हितसंबंध जोपासणे व मासेमारी प्रयत्नांचे व्यवस्थापनाव्दारे मत्स्यसाठयाचे जतन करून, कमाल शाश्वत मत्स्योत्पादन राखणे हा आहे. त्याचप्रमाणे राज्याच्या जलधीक्षेत्रात एलईडी लाईटच्या सहाय्याने मासेमारी करण्यासाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. शाश्वत मासेमारी टिकून राहण्याच्या अनुषंगाने उपलब्ध गस्ती नौकेव्दारे राज्याच्या जलधी क्षेत्रात प्रभावीपणे गस्त घालून अनधिकृत नौकांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. त्यानुसार दि.२३/११/२०२१ ते २८/०२/२०२३ पर्यंत एकूण ४२१ अनधिकृत नौकांवर कारवाई करण्यात आलेली असून रू.१०८.७६ लक्ष इतकी दंडाची रक्कम म्हणून महसूल शासन जमा करण्यात आलेला आहे.

मासळीच्या साठयाचे जतन तसेच मच्छीमारांची जिवीत व वित्त यांचे रक्षण या हेतूने शासन आदेश दि.१ जून, २०१५ अन्वये १ जून ते ३१ जुलै सर कालावधीत राज्याच्या जलधी क्षेत्रात यांत्रिक मासेमारी नौकांस पावसाळी मासेमारी बंदी घालण्यात आलेली आहे. या कालावधीत मासळीच्या जिवांना प्रजोत्पादनास पोषक वातावरण असते. मासेमारी बंदीमुळे मासळीच्या बिजनिर्मिती प्रक्रियेस वाव मिळून मासळीच्या साठयाचे जतन होते. सदरची मासेमारी बंदी ही यांत्रिक-यंत्रचलित नौकांकरिता लागू असून बिगर यांत्रिक नौकांना यामध्ये सूट देण्यात आलेली आहे. शाश्वत मत्स्यव्यवसाय टिकून राहण्यासाठी सदर मासेमारी बंदी लागू करण्यात आलेली आहे.

शाश्वत मासेमारीचा समतोल राखण्याच्या दृष्टीने अनधिकृत मासेमारीस आळा घालण्यात येत आहे. मागील तीन वर्षाची सागरी मस्त्स्य उत्पादनाची आकडेवारी सन २०१९-२० (४४३५९३ मे.टन), सन २०२०-२१ (३९८५११ मे.टन) व सन २०२१-२२ (४३२७४८ मे.टन). सदर आकडेवारी पाहता मत्स्य उत्पादनात मोठया प्रमाणात घट झाल्याचे दिसून येत नाही. कोरोना रोगाचा प्रादुर्भाव, नैसर्गिक चक्रीवादळे यामुळे काही अंशी मत्स्य उत्पादनात घट झालेली आहे.

सन २०२० मध्ये देशामध्ये कोरोना वैश्विक महामारीचा संसर्ग उद्भवलेला होता. सदरच्या महामारीचा संसर्ग इतरत्र पसरू नये म्हणून केंद्र शासनामार्फत निर्बंध घालण्यात आल्यामुळे संपूर्ण देशात टाळेबंदी घोषित करण्यात आलेली होती. सदरच्या कालावधीमध्ये घोषित करण्यात आलेल्या टाळेबंदीचा मत्स्य व्यवसायावर परिणाम झाला आहे, ही वस्तु:स्थिती आहे. तसेच सदर कालावधीमध्ये आदर्श कार्यप्रणालीचा अवलंब करून मासेमारी व मत्स्य विक्री करण्यास अटी शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात आलेली होती.

राज्यातील मच्छिमारांचे डिझेल प्रतिपुर्तीसाठी अर्थसंकल्पीत रू.६३.०० कोटी व पूरक मागणी रू.१००.०० कोटी असा दोन्ही मिळून रू.१६३.०० कोटी इतका मंजूर निधीपैकी रू.१६१.०० कोटी इतका निधी प्राप्त झालेला असून पात्र मच्छिमार लाभार्थ्यांना DBT व्दारे वितरीत करण्यात आलेला आहे.

---ooo---

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन लक्षवेधी सूचना क्रमांक : २७६

मा. श्री. रविशेठ पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२७६ खालीलप्रमाणे आहे :-

"रायगड जिल्हयातील अलिबाग वन विभागातील वडखळ रेंजमध्ये सन १९९० चे दरम्यान रोजंदारी मजूरांनी सेवेत नियमित करण्यासाठी वन विभागाविरूध्द औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे (यु.एल.पी.) ६१३/१९९१ दि.०१.११.१९९१ अन्वये खटला दाखल केला आणि मा. औद्योगिक न्यायालयाने सदर खटल्याचा निकाल दि.३१.०३.२००० रोजी शासनाच्या विरूध्द व मजूरांचे बाजूने दिला. मात्र, त्यानंतर सदर निकालाविरूध्द शासनाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.०३.०५.२००२ रोजी क्र.३२५६/२००२ अन्वये रिट पिटीशन दाखल करणे, मा. उच्च न्यायालयाने दाखल रिट पिटीशनवर दि.१५.०६.२०१८ रोजी पुन्हा खटल्याचा निकाल शासनाच्या विरूध्द व मजूरांच्या बाजूनेच देणे, मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशास पाच वर्षे लोटूनही न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करीत संबंधित मजूरांना अधिकारी वर्गाकडून अदयापी सेवेत सामावून न घेणे, तसेच त्यांना अदयाप कुठल्याही प्रकारचे लाभ न देणे, या बाबी मुख्यत्वे निदर्शनास येणे, हा घटनाक्रम व अधिकाऱ्यांचे मुजोर वर्तन पाहता या वनमजूरांवर झालेल्या अन्यायास कारणीभूत ठरलेल्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी, व त्यामुळे न्याय मिळणेस झालेल्या व होत असलेल्या विलंबामुळे यामुळे मजूरांमध्ये पसरलेले नाराजीचे वातावरण यावर या मजूरांना सत्वर दिलासा देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## मा. मंत्री (वने) याचे निवेदन

महसूल व वन विभागाच्या दि.३१.०१.१९९६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार वन विभागातील योजना / योजनेत्तर योजनेवर दि.०१.११.१९९४ रोजी प्रतिवर्षी किमान २४० दिवस याप्रमाणे सलग ५ वर्षे काम केलेल्या रोजंदारी मजुरांना अधिसंख्य वनमजूर या पदावर कायम करण्याची तरतूद आहे. तसेच दि.१६.१०.२०१२ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार वन विभागातील योजना / योजनेत्तर योजनेवर दि.०१.११.१९९४ ते दि.३०.०६.२००४ पर्यंत सलग पध्दतीने अथवा तुटक-तुटकरित्या प्रतिवर्षी किमान २४० दिवस याप्रमाणे किमान ५ वर्षे काम केलेल्या व दि.०१.०६.२०१२ ला कामावर असण्यास पात्र ठरणा-या रोजंदारी मजुरांना अधिसंख्य वनमजूर या पदावर कायम करण्याची तरतूद आहे.

अलिबाग वन विभागातील श्री. पांडुरंग हरी पाटील व इतर-२, रोजंदारी मजूर हे दि.३१.०१.१९९६ व दि.१६.१०.२०१२ च्या शासन निर्णयामधील अटी व शर्तीची पुर्तता करीत नसल्यामुळे त्यांना शासन सेवेत कायम करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे श्री. पांडुरंग हरी पाटील व इतर यांनी शासन सेवेत कायम करुन कायमपणाचे फायदे मिळणेसाठी मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे वन विभागाचे विरोधात तक्रार यु.एल.पी. क्रमांक ६१३/१९९१ दाखल केली असता मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी दिनांक ३१.०३.२००० रोजी मजुरांच्या बाजुने निर्णय दिला आहे. सदर निर्णयाविरुध्द विभागाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका

क्रमांक ३२५६/२००२ दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये दिनांक १५.०६.२०१८ रोजी मजुरांच्या बाजूने अंतिम निर्णय दिला आहे.

मा. औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी तक्रार युएलपी क्रमांक ६१३/१९९१ मध्ये दिलेल्या निर्णयाची व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३२५६/२००२ मध्ये दिनांक १५.०६.२०१८ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सदर ३ रोजंदारी मजूरांकरिता दिनांक ३१.०३.२००० पासून तीन अधिसंख्य वनमजूरांची पदे पूर्वलक्षी प्रभावाने निर्माण करुन त्यानुसार त्यांना दिनांक ३१.०३.२००० पासून ते नियत वयोमानानुसार ६० वर्ष पूर्ण झालेपर्यंत देय होणारी वेतन थकबाकीची रक्कम रुपये ६,९८,३८८/- (अक्षरी सहा लाख अठ्ठयाण्णव हजार तीनशे अठ्ठयाऐंशी फक्त) अदा करण्याच्या प्रस्तावास विधी व न्याय विभागाने दि.२७.०२.२०२३ रोजी सहमती दिली आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर शासन मान्यतेने अधिसंख्य वनमजूर या पदावर नियमित करुन अनुज्ञेय लाभ अदा करण्यात येईल.

*********

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन
## लक्षवेधी सूचना क्र:-२१९५

श्री. राजन साळवी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.२१९५ पुढीलप्रमाणे आहे :-

"विद्यापीठे व संलग्नित अशासकिय अनुदानित अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र महाविद्यालये, तंत्रनिकेतने, औषधनिर्माण शास्त्र व वास्तुशास्त्र आणि तत्सम संस्थांना अनुदान अदा करण्याबाबत शिक्षण व युवा सेवा विभाग शा.नि.क्र.सीटीई११७७/ १३१/६२६ (३३४०)/९ दि.१८ मे, १९७८ मधील नियम क्र.२,६,९ व ११ अन्वये कार्यवाही होणे अपेक्षित असले तरी नियम डावलून अनुदान मूल्यनिर्धारण तंत्रशिक्षण संचालनालयातर्फे करण्यात येत असणे, सदर शासन निर्णयातील नियम क्र.२ नुसार संपूर्ण खर्चाची जबाबदारी केवळ शासनाचीच असून त्यात अनुदानित संस्थांची कोणत्याही विशिष्ट खर्चाकरीता भागीदारी/हिस्सेदारी नसणे, तसेच नियम क्र.९ नुसार संस्थेच्या अंदाजपत्रकातील मान्य खर्चाच्या ९० टक्के तुलना प्रत्यक्षात झालेल्या तुटीसोबत जोडून बघून त्यातील जे कमी असेल ते विचारात घेणे अपेक्षित असणे, तसेच नियम क्र.११ नुसार संस्थेच्या आर्थिक मंडळाने मंजूर केलेल्या व व्यवस्थापाकिय मंडळाने मान्य केलेले अंदाजपत्रक अनुदानाचे मूल्यनिर्धारण करतांना व तदृंतर त्याप्रमाणे अनुज्ञेय अनुदान निश्चित करतांना अंतिम मूल्यनिर्धारण अहवालात विचारात घ्यावे असे अभिप्रेत असतांना तसे प्रत्यक्षात होत नसल्याचे दिसून येते असणे, राज्यातील अशासकिय अनुदानित संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दि.२१ ऑगस्ट, २०१५ नंतर पूर्ण वेतन मिळत नसून ते त्यांच्या बँक खात्यातही थेट जमा होत नसणे, याबाबत गती ई-वेब संघटनेने तत्कालिन मुख्यमंत्री यांच्याकडे दि.११ जुलै २०१८ रोजी निवेदन सादर करण्यात येणे, त्यावर तात्काळ चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश देण्यात येऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही न होणे, डॉ.नंदनवार, सहसंचालक, तं.शि.विभागीय कार्यालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अशासकिय अनुदानित अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र तसेच तंत्रनिकेतन संस्थांमधील कर्मचाऱ्यांना एचटीई सेवार्थ प्रणाली लागू होण्यापूर्वी पूर्ववत संपूर्ण वेतन अदा होण्याच्या दृष्टीने एका समितीचे गठण करुन विविध उपाय सुचविणारा स्वयंस्पष्ट चौकशी अहवाल समितीने सादर केलेला असणे, तंत्रशिक्षण संचालनालयाद्वारे संस्थांचा अंतिम मूल्यनिर्धारण अहवाल तयार करतांना दि.१८ मे, १९७८ च्या शासन निर्णयानुसार करणे अपेक्षित असतांनाही दि.४ सप्टेंबर, १९९९ च्या शासननिर्णयाचा सोयीस्कररित्या वापर केला जात असणे, दि.४ सप्टेंबर, १९९९ च्या शासननिर्णयाला वित्त विभागाची सहमती नसतानाही नियम क्र.६ मध्ये उच्च तंत्र शिक्षण विभागाने बदल केलेला असणे, मा. प्र.सहसंचालक डॉ.नंदनवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत १०० टक्के अनुदान अदा करण्याबाबत विसंगती दूर करण्याची शिफारस करण्यात येणे, याबाबतही अद्याप कोणताच निर्णय न होणे, एचटीई सेवार्थ प्रणाली शासननिर्णय दि.२१ ऑगस्ट, २०१५ कार्यान्वित होण्यापूर्वी संस्थांना दिल्या जाणाऱ्या अनुदानातून १०० टक्के वेतन कर्मचाऱ्यांना मान्य खर्च म्हणून नियमानुसार मिळत असणे, जे ही प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर ९० टक्के दराने मिळत असणे, या प्रणालीमधून कर्मचाऱ्यांचे वेतन परिगणित करतांना मूळ वेतनच मुळात १० टक्के कमी दराने विचारात घेतल्याने त्यावर परिगणित करावयाचा महागाई भत्ता, घरभाडे यांच्या परिगणनेमध्ये ही त्याप्रमाणात कपात केली जात असणे, परिणामी कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असून त्यांच्यामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.२१ ऑगस्ट २०१५ रोजीच्या सेवार्थ प्रणाली लागू करण्याच्या शासननिर्णयात परिच्छेद क्र.१० मधील विसंगती दूर करण्यासाठी शुध्दीपत्राचा प्रारुप मसुदा समितीने दिला असतानाही त्यावर अद्याप कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने निर्णयात्मक कार्यवाही

करण्याची आवश्यकता, तसेच १०० टक्के अनुदान लागू करण्याच्या अनुषंगाने शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

**श्री.चंद्रकांतदादा पाटील, मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे निवेदन**

तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्थांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.२९ ऑक्टोबर, १९७७ च्या शासन निर्णयान्वये दि.१ एप्रिल, १९७७ पासून वेतन व वेतनेत्तर बाबींसाठी ७५% ऐवजी ९०% अनुदान देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.

तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१८ मे, १९७८ च्या शासन निर्णयान्वये अशासकीय अनुदानित संस्थांना वेतन व वेतनेत्तर बाबींसाठी अनुदान देण्याकरीता मुल्यनिर्धारणाचे नियम करण्यात आले असून, सदर नियमानुसार कार्यपध्दती व अनुषंगीक सुत्र विहित करण्यात आले आहे. तसेच परिरक्षण अनुदान हे संस्थेच्या संपूर्ण वर्षाच्या मान्य खर्चाच्या ९० टक्के किंवा तूट (मान्य खर्च वजा उत्पन्न) यापैकी जे कमी असेल ती रक्कम देण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्यानुसार अशासकीय अनुदानित संस्थांचे मुल्यनिर्धारण हे दि.१८ मे, १९७८ च्या शासन निर्णयानुसार करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार शासनाकडून ९० टक्के अनुदान देण्यात येत असुन, संस्थांना अनुदान देतांना साधारणपणे त्या वर्षाच्या अंदाजित आवर्ती खर्चाच्या आधारे चार हप्त्यामध्ये अदा करण्यात यावे, तसेच पहिले तीन हप्ते आगाऊ स्वरुपात देण्याचे व चौथा हप्ता मागील वर्षातील तपासलेल्या हिशोबाच्या आधारे येणाऱ्या वर्षात अंतिम समायोजन करुन देण्यात यावे, अशी तरतूद आहे.

उपरोक्त धोरणानुसार उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.२१ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सर्व संस्थांना वेतन प्रदान करण्यासाठी एचटीई सेवार्थ संगणक प्रणाली लागू करण्यात आलेली आहे. या शासन निर्णयातील परिच्छेद क्र-१० नुसार ९० टक्के अनुदानास पात्र असलेल्या अशासकीय अनुदानित संस्थेतील कर्मचाऱ्यांचे वेतन एचटीई सेवार्थ प्रणालीद्वारे शासन अनुदानातून व उर्वरित १० टक्के अनुदान संस्थास्तरावरुन करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन एचटीई सेवार्थ प्रणालीमार्फत इलेक्ट्रॉनिक पध्दतीने त्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येत आहे.

या धोरणानुसार निश्चित केलेली कार्यपध्दती अद्याप कार्यान्वित असून, त्यामध्ये बदल झालेला नाही.

शासकीय अनुदानित तंत्रशिक्षण संस्था कर्मचारी कल्याण मंडळ (गतीवेब) या संघटनेचे दि.११ जुलै, २०१८ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झालेले होते. त्यास अनुसरुन सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती व समितीचा अहवाल तंत्रशिक्षण संचालनालयाने शासनास सादर केलेला आहे. प्रस्तुत अहवालानुसार ९० टक्के ऐवजी १०० टक्के अनुदान देणेबाबत शिफारस केली होती. तथापि, अनुदान देण्याबाबतचे शासनाचे पूर्वीचे धोरण अद्याप कायम आहे.

विभागाच्या दि.१९ ऑक्टोबर, १९७७ व दि.१८ मे, १९७८ च्या शासन निर्णयातील अनुदान सुत्राप्रमाणे तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्थांना एचटीई सेवार्थ प्रणालीद्वारे २०१६ पासून अनुदान वितरीत करण्यात येत आहे. परिणामी २५ तंत्रशिक्षण संस्थांना सन २०१९-२० पर्यंतच्या मूल्यनिर्धारण अहवालानुसार रु.१०.२१ कोटी इतक्या निधीचे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्याने या अनुदानाची वसूली करण्याचे निर्देश लोकलेखा समितीने दि.१० नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीमध्ये दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच वरील संस्थांव्यतिरिक्त इतर संस्थांचे मूल्यनिर्धारण करताना अधिकचे अनुदान वितरीत करण्याचे निदर्शनास आल्यास त्याप्रकरणी देखील वरीलप्रमाणे कार्यवाही करावी, असे तंत्रशिक्षण संचालनालयास निदेश देण्यात आलेले आहेत.

****

H/114-19

## लक्षवेधी सूचना

### महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन

**डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. छगन भुजबळ, श्री. जयंत पाटील, श्री. दिलीप वळसे पाटील, श्री. रोहित पवार, श्री.दत्तात्रय भरणे, श्री. शेखर निकम, श्री. संजय बनसोडे यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २०९ खालीलप्रमाणे आहे-**

" मुंबई आणि उपनगर जिल्हयातील २२२ आदिवासी पाडयांवर पिढयानपिढया राहणा-या आदिवासींना मुलभूत सोयी सुविधा पुरविल्या जात नसल्याने त्यांना त्रासदायक अडचणींचा सामना करावा लागत असणे, येथील आदिवासी नागरिकांना शिक्षण, आरोग्य, पाणी, जमिनीवरील मालकी हक्कासाठी नेहमीच झगडावे लागत असल्याने मुंबईतील वांद्रे येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर दिनांक ०६ फेब्रुवारी,२०२३ रोजी मोर्चा काढून आंदोलन केलेले असणे, आदिवासींच्या जमिनीचे सीमांकन केले जात नसल्याने धनदांडगयांकडून त्यांच्या जमिनी हडप केल्या जात असणे, जातीचे दाखले मिळत नसल्याने चांगल्या शाळेत मुलांना दाखल करता येत नसणे, रेशनचा हक्क , पाण्याची उपलब्धता यासाठी आजही झगडावे लागत असणे, आदिवासींना पाडयांवर कॅम्प लावून जातीचे दाखले देण्यात यावेत, मुंबई उपनगर जिल्हयातील २२२ आदिवासी पाडयांना गावठाणे घोषित करुन तशी भूमीहक्क अभिलेखात नोंद करावी, आदिवासींना त्यांच्या घराखालील जमिनीचे मालक घोषित करावे, वनहक्क कायदा २००६ प्रमाणे वनपट्टे देण्यात यावेत व तशी रितसर भूमी हक्क अभिलेखात नोंद करावा, संजय गांधी राष्ट्रीय उदयानातील आदिवासी शेतकऱ्यांना वन कर्मचा-यांकडून नाहक त्रास दिला जात असणे , राष्ट्रीय उदयानात वन कर्मचाऱ्यांकडून वन संवर्धन कायदयाचे उल्लंघन केले जात असणे या व इतर न्याय मिळावा यासाठी लोकप्रतिनिधी, कष्टकरी शेतकरी संघटना व आदिवासी संघटनांनी मा. आदिवासी विकास मंत्री, मा. जिल्हाधिकारी , मुंबई उपनगर यांचेकडे दिनांक ७ फेब्रुवारी ,२०२३ रोजी तसेच वारंवार मागण्या केलेल्या असणे, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील आदिवासी जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, आपल्या न्याय मागण्यांसाठी दि.२७ फेब्रुवारी,२०२३ रोजीपासून सुरु होणा-या विधीमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशन काळात मोर्चा काढून तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतलेला असणे, हक्काच्या मुलभूत सोयी सूविधा मिळत नसल्याने विकासापासून वंचित राहिलेल्या आदिवासी पाडयांवर आदिवासींना दिलासा देण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन सदरबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया "

---

### मा. मंत्री आदिवासी विकास यांचे निवेदन

मुंबई येथे प्रकल्प अधिकारी , एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, सुरु झाले आहे. मुंबई उपनगरात/दुर्गम भागात/ नागरी वस्तीत झोपडपट्टीच्या स्वरुपात एकूण २२२ आदिवासी पाडे आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार मुंबई उपनगराची एकूण लोकसंख्या ९३,५६,९६२ असून त्यापैकी आदिवासी लोकसंख्या १,०४,५६० आहे. (१.१२%). आरे कॉलनी गोरेगांव, नॅशनल पार्क व गोराई येथे आदिवासी पाडे असून इतर

ठिकाणी आदिवासी लोकसंख्या विखुरलेल्या स्वरुपात आहे. सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे मुंबई शहर जिल्हयाची एकूण लोकसंख्या ३०,८५,००० असून आदिवासी लोकसंख्या २५,००० आहे. आदिवासी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येची टक्केवारी ०.८१ % आहे. मुंबई शहरामधील झोपडपट्टयांमध्ये आदिवासी वस्ती विखुरलेल्या स्वरुपात आहेत.

कष्टकरी शेतकरी संघटना, यांचेकडून मुंबई उपनगर जिल्हयातील आदिवासींच्या मागण्यांबाबत दि. ०६/०२/२०२३ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयास प्राप्त झाले होते. लोकप्रतिनिधी/ आदिवासी संघटना तसेच आदिवासी बांधव यांचेकडून पाण्याची पाईपलाईन टाकणे, बोअरवेल टाकणे, सौर दिवे बसविणे, समाजमंदिर बांधणे इ. विकास कामे करण्यासाठी प्रकल्प कार्यालय, मुंबई यांचेकडे निवेदने प्राप्त होत असतात. सदर निवेदनांच्या अनुषंगाने प्रत्यक्ष पाडयांत भेट देवून स्थळ पाहणी अहवाल सादर करण्यात येतो. जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनेतून आदिवासी पाडयांत /वस्तीत पाण्याची पाईपलाईन टाकणे, बोअरवेल टाकणे, सौर दिवे बसविणे, समाजमंदिर बांधणे इ. विकास कामे घेण्यात येतात.

गोरेगांव, मालाड, बोरीवली, भांडूप येथील आदिवासी पाडयांमध्ये आरोग्य केंद्रातील कर्मचारी व स्वयंसेविका घरभेटीद्वारे सर्वेक्षण करतात व आरोग्य सेवा पुरवितात. फिरता दवाखाना संकल्पनेद्वारे आदिवासी पाडयात आठवडयातून आरोग्य शिबीरे आयोजित करुन औषधे वितरीत केली जातात.

महानगरपालिकेच्या पी/दक्षिण, आर/दक्षिण , आर/मध्य , आर/उत्तर, एस येथील आदिवासी पाडयांना जलजोडण्या देवून पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. सदर आदिवासी पाडयांना सद्यस्थितीत सुरळीत पाणीपुरवठा होत आहे.

शासनाकडून नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयास अंत्योदय योजनेकरिता १८५१२ इतके इष्टांक देण्यात आलेला असून त्यापैकी १५४२८ इतका इष्टांकाची पूर्तता करण्यात आलेली आहे. प्राधान्य कुटुंब योजनेतील ८१५९३८५ इतका इष्टांक देण्यात आलेला असून त्यापैकी ६८६२८४२ इष्टांकाची पूर्तता करण्यात आलेली आहे. या कार्यालयात इष्टांक शिल्लक असल्याने पात्र लाभार्थ्यांना योजनेत समाविष्ट करण्यात येत आहे.

मुंबई उपनगर जिल्हयातील कुर्ला, अंधेरी, बोरीवली तहसिलदार कार्यालयांकडून वेळोवेळी शिबिरे आयोजित करुन प्रचलित शासन निर्णयानुसार विहित मुदतीत जातीचे दाखले वितरीत करण्यात आले आहेत.

संजय गांधी राष्ट्रीय उदयानाचे एकूण क्षेत्रामधील आरे येथील २.८६७ चौ. कि.मी क्षेत्र हे राखीव वन म्हणून अधिसूचित झाले आहे. त्यानुसार संजय गांधी राष्ट्रीय उदयानाचे व्यवस्थापन सन १९६९ मध्ये वन खात्याकडे सोपविण्यात आले. त्यावेळी ११ आदिवासी पाडयांमध्ये ४६ कुटुंबे वास्तव्यास होती. सन २०१० च्या सर्वेक्षणानुसार, उदयानात ४३ पाडयांमध्ये १७९५ आदिवासी कुटुंबे वास्तव्यास होती. मा. उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र ३०५/९५ आदेशान्वये दि. ०१/०१/१९९५ पूर्वीच्या अतिक्रमणाचे उदयानाबाहेर पुनर्वसन करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानंतर मा. उच्च् न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र. २०२५/२००४ मधील नोटीस ऑफ मोशन क्र. ४६५/२००७ नुसार " संजय गांधी राष्ट्रीय उदयानातील आदिवासी पाडयांना नव्याने नागरी सुविधा पुरविता येणार नाहीत."

परंतु शासन स्तरावरील दिनांक २०/०४/२०१२, ११/०९/२०१३ व २७/०९/२०१३ रोजी झालेल्या बैठकीमधील निर्देशानुसार कार्यान्वयीत यंत्रणेकडून प्राप्त दाखल्यांच्या आधारे अस्तित्वात असलेल्या नागरी सुविधांच्या दुरुस्तीस संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उदयान यांचेकडून परवानगी देण्यात येते.

रिट याचिका क्र. ३०५/९५ मधील उच्च् न्यायालयाच्या निर्देशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उदयानातील पात्र झोपडपट्टी धारकांचे संघर्षनगर, चांदिवली येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे पुनवर्सन करण्याची कार्यवाही चालू आहे .

संजय गांधी राष्ट्रीय उदयानातील अतिक्रमणांचे पुनर्वसनासंबंधी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/०९/२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये संजय गांधी राष्ट्रीय उदयान परिसरातील पात्र आदिवासी पाडयांचे पुनर्वसन करण्यासाठी आरे व्यतिरिक्त इतर जागा निश्चित करण्यासाठी मा. मंत्री पर्यटन व राजशिष्टाचार तथा पालकमंत्री मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. दिनांक १३/०१/२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या समितीच्या बैठकीमध्ये आरे जागेव्यतिरिक्त इतर संभाव्य जागांची निवड करुन अतिक्रमित क्षेत्रांची स्थानिक परिस्थिती विचारांत घेवून लाभार्थी व संबंधित विभाग यांना सोयीस्कर ठरणारे क्षेत्र निश्चित करण्यासाठी सर्वसमावेशक सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची गृहनिर्माण विभाग व नगर विकास विभाग यांचेस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वन निवासी (वनहक्काची मान्यता ) अधिनियम २००६ नियम २००८ सुधारीत नियम २००८ सुधारीत नियम २०१२ मधील तरतूदीनुसार, सद्यस्थितीत संजय गांधी राष्ट्रीय उदयानाच्या मुंबई उपनगर जिल्हयात येणा-या वनक्षेत्रावरील हक्कांकरिताच्या दाव्यांस जिल्हास्तरीय समितीकडून मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही. सद्यस्थितीत साई बांगोडा आदिवासी गावठाण येथील वनक्षेत्रांवरील हक्कांकरिताचे एकूण ८० दावे प्राप्त झाले आहेत. त्यानुसार वनहक्क समितीकडून वनहक्क दाव्यांबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

---------------------------

लक्षवेधी सूचना क्र.२४३

मा. श्री. छगन भुजबळ व डॉ. जितेंद्र आव्हाड विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २४३ खालीलप्रमाणे आहे :-

"दि. ५ जानेवारी २०२३ रोजी पेठरोड (नाशिक) येथील एकलव्य इंग्रजी शाळेतील निवासी वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या जेवणात अळ्या निघाल्याचे उघडकीस आलेले असणे, दिनांक ६ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांनी सतत निकृष्ट दर्जाच्या भोजनाचा पुरवठा होत असल्याचा आरोप करीत वसतिगृहात ठिय्या मांडून अन्नत्याग आंदोलन केलेले असणे, या विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी आदिवासी विकास विभागाने सेंट्रल किचन संस्थेकडे काम दिलेले असणे, त्यांच्याकडून पुरवठा होत असलेले अन्न निकृष्ट दर्जाचे असल्याची विद्यार्थ्यांकडून वारंवार तक्रार केली जाणे, मात्र या तक्रारीकडे दुर्लक्ष करून टाळाटाळ केली जात असणे, सतत निकृष्ट दर्जाचे जेवण मिळत असल्याने त्रस्त झालेल्या विद्यार्थ्यांनी आंदोलन केलेले असणे, सदर प्रकरणी संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार भोजन मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

डॉ. विजयकुमार गावीत मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे निवेदन

शासकीय आश्रमशाळा मुंढेगाव, ता. इगतपूरी, जि. नाशिक येथील मध्यवर्ती स्वयंपाकगृहातून नाशिक, राजूर व जव्हार या प्रकल्पातील ३७ शासकीय आश्रमशाळा व ५ एकलव्य निवासी शाळा अशा एकूण ४२ शाळांतील सुमारे १५,००० विद्यार्थ्यांना भोजन व अल्पोपहार पुरविण्यात येतो.

एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल पेठरोड, ता.जि. नाशिक या शाळेत देखील उक्त प्रमाणे पुरवठा करण्यात आलेल्या मुगडाळीच्या वरणामध्ये दिनांक ०६ जानेवारी, २०२३ रोजी एका विद्यार्थ्यास अळी दिसल्याचे त्याने प्राचार्यांच्या निदर्शनास आणले व त्यानंतर विद्यार्थ्यांनी जेवणावर बहिष्कार घातला.

सदर घटनेची माहिती मिळाल्याबरोबर तातडीने अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांनी नाशिक प्रकल्प कार्यालयातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), तसेच

मध्यवर्ती स्वयंपाकगृहाचे प्लांट मॅनेजर यांच्यासह दि. ६ जानेवारी २०२३ रोजी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट दिली. अपर आयुक्त यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या भोजनात तात्काळ सुधारणा करण्याबाबत संबंधित यंत्रणा व संबंधित सर्व अधिकारी, कर्मचारी यांना समज दिली. तसेच घटनेची सविस्तर चौकशी करण्याबाबत प्रकल्प अधिकारी, नाशिक यांना निर्देश दिले. त्यानुसार प्रकल्प कार्यालय, नाशिक यांचे स्तरावरुन सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे.

प्रकल्प कार्यालयाच्या स्तरावरुन चौकशी समितीने प्रत्यक्ष मध्यवर्ती स्वयंपाकगृह मुंढेगाव येथे घटनास्थळी, भेट देऊन चौकशी केली. चौकशीनुसार मध्यवर्ती स्वयंपाकगृहातील अन्नधान्यात अळया आढळुन आल्या नाहीत. सदर घटनेच्या दिवशी इतर ४१ शाळांनाही भोजनाचा पुरवठा झालेला होता, या ४२ शाळांकडून जेवणाबद्दल कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. मध्यवर्ती स्वंयपाकगृहास पुरवठा केले जाणारे धान्य एफ.एस.एस.आय प्रमाणीत होते. तसेच यापूर्वी चपाती थंड न करता गरम असतानाच भरत असल्या कारणाने वाफेमुळे त्या चिकटत असल्याचे लक्षात आल्याने त्या आता थंड करुन भरण्यात येत आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत जेवणाबाबत विदयार्थ्यांची कोणतीही तक्रार नाही.

*************************

२५८

<u>लक्षवेधी सूचना क्र. ३१४</u>

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.दिपक चव्हाण, श्री.हसन मुश्रीफ, श्री.बाळासाहेब पाटील, श्री.दिलीप मोहिते-पाटील, श्री.सुनिल भुसारा, श्री.चेतन तुपे, श्री.मंगेश चव्हाण, श्री.गणपत गायकवाड, श्री.कुमार आयलानी, डॉ.किरण लहामटे, श्री.दौलत दरोडा, श्री.अतुल बेनके, श्री.संजय बनसोडे, डॉ. जितेंद्र आव्हाड विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.

"राज्यामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ४१७ शासकीय आश्रमशाळा असून या सर्व आश्रमशाळांमध्ये १६ हजार ४४३ पदे मंजूर असून त्यापैंकी ९ हजार ५५३ (५९%) पदांची भरती करण्यांत येऊन ६ हजार ६९० पदे रिक्त असणे, तसेच शिक्षक व मुख्याध्यापकांची दोन हजार ७३१ पदे रिक्त असणे, तसेंच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची तर ५१६ पदे रिक्त असल्याचेही निदर्शनास येणे, त्याचप्रमाणे राज्यात ५४० अनुदानित आश्रमशाळांमध्ये ९५४ पदे रिक्त असणे, यावरुन आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील आश्रमशाळांतील रिक्त पदे मागील अनेक वर्षांपासून भरण्यात आलेली नसणे, शासनाच्या तसेच अनुदानित आश्रमशाळांमधील आदिवासी बालकांच्या मृत्युसंदर्भात रिक्त पदे भरती हे महत्वाचे कारण असले तरीही जे कर्मचारी सध्या आश्रमशाळेमध्ये जे शिक्षक, कर्मचारी कार्यरत आहेत ते त्याच आश्रमशाळांसाठी काम करतात का याची छाननी होण्याची गरज असणे, ज्या आश्रमशाळांमध्ये शिक्षक मिळत नाहीत, तिथे अतिरिक्त शिक्षक असलेल्या शाळांमधील शिक्षकांची नियुक्ती का केली जात नाही याचाही शासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज व्यक्त होत असणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण व समग्र विकास करणाऱ्या वातावरणापासून या शाळा दुर्गम भागांमध्ये आहेत त्याठिकाणी गरज आहे त्याच ठिकाणी आश्रमशाळांची उपलब्धता आहे का, याबाबत सर्वेक्षण करण्याची तसेंच सर्व आश्रमशाळांचे किमान दोन वर्षांतून एकदा मूल्यमापन करण्याबाबत व दर्जाप्रमाणे या आश्रमशाळांना शेरे देण्यांत यावेत, अशी जनतेकडून शासनाकडे मागणी करण्यांत येणे, शासकीय आश्रमशाळांमध्ये आजच्या घडीला ६ हजार ६९० पदे रिक्त असल्याचे राज्य मानवी हक्क आयोगापुढे झालेल्या सुनावणीमध्ये मान्य करुन माहे डिसेंबर, २०२२ या महिन्यांमध्ये पदभरतीची प्रक्रिया सुरु करु असे शासनामार्फत आयोगापुढे सांगण्यात आल्याचेही निदर्शनास येणे, अद्याप मात्र त्याबाबत कार्यवाही झालेली नसणे, सबब, यासर्व प्रकरणी शासनाने आढावा घऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

---

### डॉ.विजयकुमार गावित, मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे निवेदन

आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त सद्यस्थितीत ४९९ शासकीय आश्रमशाळा आहेत. सुधारित आकृतीबंधानुसार या सर्व शासकीय आश्रमशाळांमध्ये एकूण १०४४३ पदे मंजूर असून यापैकी ७२५२ पदे भरलेली असून शिक्षक संवर्गाची २७२१ तर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ४७० अशी एकूण ३१९१ पदे रिक्त आहेत. राज्यात एकूण ५४२ अनुदानित आश्रमशाळा कार्यान्वीत

आहेत. सदर आश्रमशाळांसाठी मंजूर एकूण १३९७६ पदांपैकी १२६६९ पदे भरलेली असून १३०७ पदे रिक्त आहेत. देशात उद्भवलेल्या कोव्हीड विषाणूच्या पार्श्वभूमीवर आर्थिक उपाययोजना म्हणून वित्त विभागाच्या दि.०४.०५.२०२० च्या शासन निर्णयान्वये कर्मचारी भरतीवर निर्बंध घालण्यात आले होते. तथापि विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून ज्या शासकीय आश्रमशाळेवर शिक्षकांची रिक्त पदे आहेत त्या शासकीय आश्रमशाळेवर प्रकल्प कार्यालय स्तरावरुन तासिका तत्त्वावर उमेदवारांची नियुक्ती करण्यात येते.

२. ज्या आश्रमशाळेसाठी शिक्षक कर्मचारी कार्यरत आहेत ते त्याच आश्रमशाळेत काम करीत आहेत. तसेच ज्या आश्रमशाळेमधील १ ते ४ , १ ते ७ तसेच १ ते १० चे वर्ग विद्यार्थी संख्या अभावी बंद झाले आहेत त्या आश्रमशाळेतील शिक्षकांचे समयोजन अन्य आश्रमशाळेतील रिक्त पदावर करण्यात आलेले आहे. आदिवासी भागामध्ये ज्या ठिकाणी संस्थेची शाळा नाही अशा दुर्गम ठिकाणी ज्या ठिकाणी आवश्यकता आहे अशाच ठिकाणी शासकीय आश्रमशाळा सुरु करण्यात आलेल्या आहेत.

३. शासकीय आश्रमशाळा गुणवत्ता तपासणी साठी आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दिनांक २३.०१.२०१४ अन्वये स्वतंत्र शिक्षण कक्षाची निर्मिती करण्यात आली असुन त्यामध्ये, सह आयुक्त, (शिक्षण), सहाय्यक आयुक्त (शिक्षण), सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी (कार्यालय) व कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी (निरिक्षक) ही पदे मंजुर करण्यात आलेली आहेत. १० आश्रमशाळासाठी १ या प्रमाणे १२० कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी ही पदे मंजुर आहेत. कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी हे महिन्यातुन २ वेळा शाळेला भेटी देऊन त्या शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी वर्ग निहाय घटक नियोजन, वार्षिक नियोजन अध्यापनाचे कार्य चालु आहे किंवा कसे याची तपासणी विद्यार्थ्यांची गुणवत्ता ही सातत्यपुर्ण सर्वकष मुल्यमापनाच्या आधारे मुल्यमापन केले जाते. त्यानुसार शासकीय आश्रमशाळांचा दर्जा ठरविला जातो.

४. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दिनांक २०.९.२०२२ अन्वये राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त अनुदानित आश्रमशाळांचे मुल्यमापन करण्याबाबत संबधित उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन करण्यात आलेले आहे.

५. शासकीय आश्रमशाळेतील मृत्यु प्रकरणाच्या अनुषंगाने राज्य मानवी हक्क आयोग मुंबई येथे दि.१५.१२.२०२२ रोजी झालेल्या सुनावणीच्या दरम्यान तत्कालीन आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी शासकीय आश्रमशाळेतील रिक्त पदे भरण्यात येतील असे आयोगास आश्वासित करण्यात आले होते.

६. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दि.१६.११.२०२२ अन्वये क्षेत्रिय सर्व कार्यालयातील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ३१.१०.२०२२ अन्वये पदभरतीवरील निर्बंध शिथील करुन पदभरतीस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच आदिवासी विकास विभागातील सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यात आला असून त्यानुसार भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## श्री.रत्नाकर गुट्टे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना.

श्री.नागनाथ विश्वनाथ लटपटे, मु.अ.के.प्रा. शा. मन्नाथ नगर, गंगाखेड यांची तात्काळ बदली करुन चौकशी समिती नेमुन निलंबीत करणे बाबतचे निवेदन स्थानिक प्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री महोदयांना देणे, या अनुषंगाने श्री.नागनाथ विश्वनाथ लटपट मु.अ.कें.प्रा.शा. मन्नाथ नगर, गंगाखेड २५ वर्षापासून गंगाखेड तालुक्यात ठाण मांडून बसले असणे, तसेच यापुर्वी २००१ ते २००२ दरम्यान सदरील शिक्षक हा डोंगरपिंपळा ता.गंगाखेड या ठिकाणी सेवेत असताना गंगाखेड पोलीसात त्यांच्यावर ३०२ चा गुन्हा नोंद असणे, सदरील गुन्ह्यात ते आरोपी असून सदर प्रकरण अद्याप प्रलंबित असताना पुन्हा त्यांना त्याच शाळेवर कार्यरत ठेवल्याने श्री.लटपटे राजकीय वरदहस्त वापरत शाळेतील कर्मचाऱ्यांना वेठीस धरत असून मनमानी करीत असणे, त्यामुळे ते शाळेत आणि गावात राजकारण करीत आहे असे स्पष्ट होत असणे, गावातील राजकारणात त्यांचा उघडपने वावर असणे ग्रामपंचायत बैठकांना देखील ते उपस्थित असणे, अधिकाऱ्यांच्या गाड्याचा देखील दे स्वत:च्या कामासाठी वापर करीत असल्याचे निदर्शनास आले असणे, त्यांनी गैरमार्गातून मोठ्या प्रमाणात संपत्ती गोळा केल्याचे निदर्शनास येत असतानाही प्रशासनाकडून दुर्लक्ष करणे, त्यामुळे श्री.नागनाथ विश्वनाथ लटपटे मु.अ.के. प्रा. शा. मन्नाथनगर, गंगाखेड यांची तात्काळ बदली करुन चौकशी समिती नेमुन निलंबित करण्याची आवश्यकता असतानाही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने ग्रामस्थामध्ये तिव्र नाराजी व्यक्त होत असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---------------

## मा.श्री.गिरीष महाजन, मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

जिल्हा परिषद, परभणी कार्यालयाच्या दिनांक ९.३.२०२३ अन्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर चौकशी समितीमध्ये उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), तालुका आरोग्य अधिकारी, गट शिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चौकशी समितीस संबंधित मुख्याध्यापकाचे गैरवर्तन, राजकारणात सक्रीय सहभाग, पत्नी सरपंच असल्याने ग्रामपंचायतीमधील सर्व कारभाराची चौकशी इत्यादी बाबींवर चौकशी करण्यासाठी सूचना केलेल्या आहेत.

श्री.नागनाथ विश्वनाथ लटपटे, मुख्याध्यापक यांच्यावर करण्यात आलेले आरोप हे गंभीर स्वरुपाचे असल्याने चौकशी समितीच्या कामकाजात कोणतीही बाधा निर्माण होऊ नये, याकरिता त्यांची अन्य शाळेमध्ये पदस्थापना करण्यात यावी, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना दिनांक २०.३.२०२३ च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेले आहेत.

उक्त चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधिताविरुध्द नियमानुसार योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

रोटा M/1774 (750-3-23)

-------

## श्री.विक्रमसिंह सावंत, श्री.नानाभाऊ पटोले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना.

"राज्याच्या सीमावर्ती भागातील सांगली व सोलापूर जिल्ह्यातील कन्नड माध्यमाच्या जिल्हा परिषद शाळेत अनुसूचित जमाती संवर्गातील शिक्षक उपलब्ध करुन देण्याचा वारंवार प्रयत्न करुनही या संवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध झालेला नसणे, रिक्त पदापैकी बहुतांशी पदे अनुसूचित जमाती संवर्गातील असून या संवर्गात एकही उमेदवार आजपर्यंत नियुक्त झालेल्या नसणे, सन २०१३, २०१७, २०१९ मध्ये भरती करण्यात आली परंतु यावेळीही एकही पात्र उमेदवार नियुक्त न होणे, मागील १२ वर्षापासून सीमावर्ती भागातील कन्नड अल्पभाषिक व अल्पसंख्यांक शाळेत शिक्षक भरती झाली नसल्यामुळे अपुरे शिक्षकांमुळे कन्नड शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात येणे, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेले तीव्र संतोषीची भावना, याबाबत राज्य शासन चौकशी करुन अनुसूचित जमातीतील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदला बदलीने पदे भरणे, व पदे आरक्षणातून मुक्त करुन शासन निर्णयानुसार अन्य संवर्गातील पात्र उमेदवारांना उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---------------

## मा.श्री.गिरीष महाजन, मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

जिल्हा परिषद, सांगली आणि जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडून प्राप्त अहवालाचे अवलोकन केले असता जिल्हा परिषद, सांगली येथे सन २०१३ व २०१७ मध्ये जाहिरात दिलेली नसल्याने शिक्षक भरती झालेली नाही. तसेच सन २०१९ मध्ये पवित्र प्रणालीवर अनुसूचित जमाती प्रवर्गाची यादी उपलब्ध झालेले नाही. तसेच जिल्हा परिषद, सोलापूर येथे कन्नड माध्यमाची एकूण ३५९ शिक्षकांची पदे मंजूर असून ३१८ शिक्षक कार्यरत आहेत व ४१ पदे रिक्त आहेत. त्यापैकी अनुसूचित जमातीची १० पदे रिक्त आहेत.

राज्यातील सर्व व्यवस्थापनातील (स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका आणि खाजगी शैक्षणिक संस्थांतर्गत शाळा) शिक्षण सेवकांची भरती प्रक्रिया पवित्र पोर्टल या संगणकीय प्रणालीद्वारे करण्याबाबतचा निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक २३.६.२०१७ च्या शासन निर्णयाद्वारे घेतलेला आहे.

सन २०२० पासून पवित्र प्रणालीद्वारे जिल्हा परिषद आणि खाजगी शिक्षकांची भरती प्रक्रिया झालेली नाही. तथापि, सन २०२३ मध्ये शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती प्रक्रियेसंदर्भात राज्यामध्ये उमेदवारांची अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा घेण्यात आली असून त्याबाबतचा निकाल अद्याप लागलेला नाही. सदर परीक्षेचा निकाल लागल्यानंतर सर्व जिल्हा परिषदा, खाजगी शाळा, महानगरपालिका यांच्याकडून मागणी प्राप्त करुन त्यानुसार संबंधितांना रिक्त पदांच्या मागणीनुसार शिक्षण सेवक उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत राबविली जाईल.

-------

रोटा म/1773 (750-3-23)

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मौजा भंडारा, (ता. जि. भंडारा) येथील शहरसिमेतील ऐतिहासीक वारसा असलेल्या लालबहादूर शास्त्री या जिल्हा परिषदेच्या शाळेचा भुखंडावर "बांधा-वापरा-हस्तांतरीत करा" या योजनेखाली स्थानीक नेते मंडळी, संबंधीत विकासक व जिल्हा परिषदचे अधिकारी यांनी संगनमत करुन आर्थीक हव्यासापोटी शासनाची दिशाभूल केल्याचे निदर्शनास येणे. भंडारा शहरातील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी मौल्यवान असलेला भूखंड ठराविक विकासकाला अत्यंत कमी किंमतीत मिळण्याकरीता निवीदेच्या अटी व शर्ती ठरविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, ठराविक विकासकाला निविदा मंजूर होणे, परंतू सदर बांधकामात अनियमीतता असल्याने स्थानिकाकडून अनेक तक्रारी प्राप्त होणे, त्याअनुषंगाने उच्च न्यायालयात प्रकरण गेले असता न्यायालयाने विकासकाला मंजूर कामाव्यतीरिक्त इतर काम न करण्याबाबत निर्देश दिले असणे, तद्नंतर विकासकाकडून न्यायालयाच्या निर्देशाकडे डोळेझाक करुन अतीरिक्त बांधकाम करण्यात येणे, त्यामुळे परिसरातील फुटपाथ विक्रेत्यांचे नुकसान होणे, त्याबाबत जिल्हाधिकारी भंडारा यांच्याकडे निवेदन देण्यात येणे, नुकसान भरपाई न मिळाल्यास सामाजीक कार्यकर्ता यांनी आंदोलन करण्याची पूर्वसूचना देण्यात येणे, तसेच सदर शाळेच्या खेळाच्या मैदानाची जागा अन्यत्र दाखवून शाळेतील खेळाच्या मैदानात विकासकाला बांधकाम करण्याची परवानगी देण्यात येणे. याबाबत भंडारा शाळा बचाव समितीने तक्रार करुन सुध्दा त्यावर कोणत्याच प्रकारची कार्यवाही करण्यात न येणे. सदर शाळेतील मुलांच्या खेळण्याच्या जागेवर बांधकाम झाल्याने मुलांना खेळण्याकरीता क्रिडांगण नसल्याची गंभीर बाब समोर येणे. या सर्व प्रकारामुळे विकासकाला शासनाने दिलेली परवानगी रद्द करण्याची स्थानीक जनतेकडून वारंवार होणारी मागणी. स्थानीक लोकप्रतिनीधी या नात्याने मी बांधकामाच्या अनियमीततेबाबत पत्रव्यवहाराने शासनाचे ध्यानाकर्षन केल्यानंतर सुध्दा शासनाच्यावतीने कोणतीही कार्यवाही न होणे त्यामुळे स्थानीक जनतेत पसरलेली तिव्र असंतोषाची भावना यावर शासनाने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन**

ग्राम विकास विभागाच्या दि.१० मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये, भंडारा जिल्ह्यातील मनरो लालबहादूर शास्त्री हायस्कुल व जनपद जुनी जिल्हा परिषद इमारत ता.भंडारा येथील जिल्हा परिषदेच्या ताब्यातील भूखंड खाजगीकरणाच्या माध्यमातून "बांधा, वापरा व हस्तांतर करा" (BOT) या तत्वावर विकसित करणेबाबत मंजुरी देण्यात आली आहे. भंडारा जिल्हा परिषदेच्या ताब्यातील भूखंड लाल बहादूर शास्त्री मनरो हायस्कूल येथे खाजगीकरणाच्या माध्यमातून बीओटी तत्वावर विकसित करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने दि.२८ फेब्रुवारी २०१८ रोजी ठराव पारित केला आहे. तसेच, दि.१६ मार्च २०१८ रोजी जिल्हा परिषदेने महासभेत सदर भूखंड खाजगी करणाच्या माध्यमातून बीओटी तत्वावर विकसित करण्याचा ठराव पारित केलेला आहे. प्रस्तुत निविदेच्या सुसाध्यता अहवालास विभागांनी दि. २ जुन २०२० रोजी

मान्यता प्रदान केली आहे. त्या अनुषंगाने दि.१० डिसेंबर २०२० रोजी स्पर्धात्मक निविदा बोलावण्यात आल्या. निविदा सादर करण्याचा अंतिम दि.४ जानेवारी २०२१ रोजी ऐकुन ४ निविदाधारकानी निविदा सादर केल्या होत्या. निविदा तांत्रिक पडताळणी दि.८ जानेवारी, २०२१ ते दि. २२ जानेवारी, २०२१ या काळात करण्यात आली. दि.२७ जानेवारी, २०२१ रोजी सर्वोत्तम विकासकाची निविदा निश्चित करण्यात आली. आर्थिक निविदा उघडण्यात येवून मे. प्रभात कन्स्ट्रक्शन्स जेव्ही या महत्तम ना परतावा अधिमूल्य देणाऱ्या विकासकाची निविदा निश्चिती करण्यात आली. सदर निविदा प्रक्रियेला दि.१० मार्च, २०२१ रोजी विभागाकडून अंतिम मंजुरी प्रदान करण्यात आली. शासनाकडून निविदा प्रक्रीयेला तसेच प्रकल्पाला अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यानंतर विकासकाला निविदा स्विकृती पत्र देण्यात येवून रु ४५.०० लक्ष रुपयांची बँक हमी स्वरुपात घेण्यात येवून दि.३१ मार्च, २०२१ रोजी विकासकाला कार्यारंभ आदेश देण्यात आला. निविदेतील अटी व शर्तीनुसरुन विकासकाद्वारे स्थानिक नियोजन प्राधिकरणकडे बांधकाम विकास शुल्काचा भरणा केल्यानंतर बांधकाम नकाशास दि.४ जून, २०२१ रोजी नगरपरिषदेद्वारे मंजुरी प्रदान केली आहे. दि.५ ऑगस्ट, २०२१ रोजी विकासकाला भूखंडावर बांधकाम करण्यास परवानगी देण्यात आली. त्या अनुषंगाने दि.६ ऑगस्ट, २०२१ पासून बांधकामास सुरुवात करण्यात आले होते. परंतु उपरोक्त प्रकल्प बांधकामास शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने मध्ये जनहित याचिका क्र PIL-२३/२०२१ दाखल केली असून, दि.२२ सप्टेंबर, २०२१ रोजी या याचिकेवर सुनावणी करताना लालबहादूर शास्त्री हायस्कूल येथील उपरोक्त बांधकामास पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आलेली आहे. लाल बहादूर शास्त्री मनरो शाळेच्या पूर्व तसेच उत्तर दिशेच्या रस्त्याच्या कडेने बसून काही किरकोळ अस्थायी फुटपाथ विक्रेता विक्री व्यवसाय करतात. त्यापैकी कोणत्याही फुटपाथ विक्रेत्याने व्यवसाय करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या जागेचा वापर केलेला नाही. भंडारा जिल्हा परिषदेच्या लाल बहादूर शास्त्री मनरो हायस्कूलच्या भूखंडावर कुठलेही अतिक्रमण अस्तित्वात नव्हते त्यामुळे जिल्हा परिषदेद्वारा किंवा जिल्हा परिषदेने नियुक्त विकासक मे. प्रभात कन्स्ट्रक्शन्स जेव्ही यांचेद्वारा कुठलेही अतिक्रमण हटविण्याचा प्रश्न उद्भवला नाही किंवा अतिक्रमण हटविण्या संदर्भात पत्रव्यवहार किंवा तत्सम कारवाई केलेली नाही. उपरोक्त बांधकामासंदर्भात विविध फुटपाथ संघटना तसेच राजकिय पक्षांच्या संघटनांनी माहे जून, २०२१ ते माहे ऑगस्ट, २०२१ या कालावधीमधे लाल बहादूर शास्त्री मनरो शाळेच्या पूर्व तसेच उत्तर दिशेच्या रस्त्याच्या कडेने बसून किरकोळ विक्री व्यवसाय करणाऱ्यां फुटपाथ दुकानदारांसंदर्भात जिल्हा परिषदेकडे किमान १०० चौरस फुट क्षेत्रफळ आकाराचे दुकान बांधकाम शासकीय किंमतीतील दरानुसार उपलब्ध करुन देण्यासंदर्भात विनंती केली आहे. **सद्यस्थितीत लाल बहादूर शास्त्री मनरो हायस्कूलच्या बांधकामाला स्थगीती असून मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपिठात उपरोक्त याचीके संदर्भात जिल्हा परिषद भंडाराचे वतीने न्यायालयात "शपथपत्र" सादर करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे लाल बहादूर शास्त्री हायस्कूल भूखंड खाजगी विकासकामार्फत बीओटी तत्वावर विकसित करणे हा प्रकल्प न्यायप्रविष्ट आहे.**

******************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
लक्षवेधी सूचना क्र. १०३८

श्री. अबू आजमी, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, श्री. सुभाष धोटे, अ‍ॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. सुनिल प्रभू मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १०३८ पुढीलप्रमाणे आहे.

---

"जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत यवतमाळ जिल्ह्यातील दोन्ही पाय समान नसलेल्या जिल्हापरिषद व खाजगी (प्राथमिक व माध्यमिक) शाळेतील शालेय विद्यार्थ्यांच्या पायाची तपासणी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करण्याबाबतचा निर्णय यवतमाळ जिल्ह्याचे तत्कालिन पालकमंत्री यांनी घेणे, त्यानुसार अधिष्ठाता, श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ रोजी शिक्षणाधिकारी माध्यमिक, प्राथमिक, जिल्हापरिषद, नगरपरिषद, यवतमाळ यांना लेखी पत्राव्दारे डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा.लि. यांच्याकडून शालेय विद्यार्थ्यांच्या पायाची तपासणी करण्याबाबत निदेश देणे, त्यानुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शाळा जिल्हापरिषद, यवतमाळ यांनी मुख्याध्यापक, जिल्हापरिषद व खाजगी (प्राथमिक व माध्यमिक) यांना दिनांक १ मार्च, २०१९ रोजी डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा. लि. यांच्या सहकार्याने श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांच्यावतीने दिनांक ४ मार्च, २०१९ रोजीपासून जिल्हापरिषद व खाजगी (प्राथमिक व माध्यमिक) नगरपरिषद येथील जवळपास १०० शाळेतील मुलांचे पाय तपासून त्यांच्यावर उपचार करण्यात येणे, परंतु, डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा.लि. यांनी संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांची तपासणी केल्याचा खर्च जवळपास ५० लाखांपेक्षा जास्त असून तो आजमितीपर्यंत या संबंधित कंपनीस अदा केलेला नसणे, त्यामुळे संबंधित कंपनीचे लाखोचे नुकसान झाल्यामुळे डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा. लि. या कंपनीच्या मालकांवर व कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आलेली असणे, त्यांच्याकडून आत्महत्या करण्याचा होत असलेला प्रयत्न, डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा.लि. या कंपनीचे देयक तात्काळ वितरीत करण्याची संबंधितांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मंत्री (वै.शि.) यांचे निवेदन

तत्कालिन मा. पालकमंत्री, जिल्हा यवतमाळ यांच्यामार्फत अधिष्ठाता, श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांना सन २०१९-२० करीता जिल्हा वार्षिक योजनेच्या नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील नगरपरिषद, जिल्हापरिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या पायाची तपासणी करुन दोष असलेल्या विद्यार्थ्यांना आर्थोटिक सपोर्ट पुरवठा करणे या योजनेबाबत मे. डॅबस्टर फुट ॲन्ड ॲन्कल प्रा. लि. या कंपनीने सादर केलेल्या अंदाजपत्रकाच्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता प्रदान करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. सदर योजनेचा एकूण खर्च अधिष्ठाता यांच्या वित्तीय अधिकार मर्यादेपेक्षा जास्त असल्याने, संस्थेमार्फत रु.४४.५७ लक्ष एवढ्या रकमेचा प्रस्ताव तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळण्याकरिता वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयास सादर करण्यात आला. संचालनालय स्तरावर सदर प्रस्तावाची तपासणी केली

असता, त्यात आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत संचालनालयामार्फत कळविण्यात आले. तथापी, सदर त्रुटींची पुर्तता संस्थेकडून आजमितीपर्यंत करण्यात आलेली नाही.

उक्त प्रस्तावास मान्यता प्राप्त न झाल्याने तसेच सदर योजनेकरीता जिल्हा वार्षिक निधीमधून संस्थेस निधी उपलब्ध झालेला नसल्याने, अधिष्ठाता, श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ यांनी शिक्षणाधिकारी माध्यमिक, प्राथमिक, जिल्हा परिषद, नगरपरिषद, यवतमाळ यांना कोणतेही लेखी आदेश दिलेले नाहीत. तसेच, डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा. लि. या कंपनीसही दोन्ही पाय समान नसलेल्या विद्यार्थ्यांची तपासणी करण्याबाबत कार्यारंभ आदेश संस्थेमार्फत देण्यात आली नसल्याने, मे. डॅब्स्टर फुट अँड अँकल प्रा. लि. या कंपनीचे देयके अदा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

**************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.११३६

---

"बुलढाणा येथील वैद्यकीय महाविद्यालयास मान्यता देण्याची घोषणा तत्कालीन वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री मा.डी.पी. सावंत यांनी केलेली असणे, तत्कालीन मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव यांनी दिनांक २२ मे, २०१८ मध्ये त्यांच्या दालनात उच्चस्तरीय सचिव बैठक घेऊन बुलढाणा येथील मेडिकल कॉलेजसाठी लागणाऱ्या अटी व पात्रतेच्या निकषासाठी समिती पाठवून अहवाल मागविलेला असणे, त्यावर छत्रपती संभाजीनगर येथील घाटी मेडिकल कॉलेजचे डॉ कैलास झीने यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय समिती बुलढाणा येथे येऊन गेलेली असणे, समितीने बुलढाणा येथे उपलब्ध खाटा, निकषाप्रमाणे उपलब्ध जागा, उपलब्ध पायाभूत सुविधांची पाहणी करून बुलढाणा येथे मेडिकल कॉलेजची स्वतंत्र इमारत जरी नसली तरी जिल्हा सामान्य रुग्णालय, क्षय आरोग्य धाम, नवीनच बांधण्यात आलेली स्त्री व बाल रुग्णालयाची इमारत व तेथील जागा व इतर लागणाऱ्या पायाभूत सुविधा उपलब्ध असल्याने ह्या उपलब्ध सुविधेतच मेडिकल कॉलेज तात्काळ सुरु होऊ शकते असा सकारात्मक अहवाल व अभिप्राय शासनास सादर करण्यात आलेला असणे, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने निर्धारीत केलेल्या मापदंडानुसार जिल्हा बुलढाणा येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ४३० रुग्णखाटांचे संलग्नित रुग्णालय निर्माण करण्याबाबततचा सुधारीत प्रस्ताव संचालनालयाने दिनांक १० मार्च, २०२१ रोजी शासनास सादर केला असून सदर प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर मान्यतेसाठी सादर करायच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागास अभिप्रायार्थ पाठविण्यात आला असणे, तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाने सुद्धा आपला अभिप्राय सकारात्मक दिलेला असणे, राज्यातील वैद्यकीय महाविद्यालय नसलेल्या इतर नंदूरबार, सिंधुदुर्ग व जिल्ह्यात शासनाने वैद्यकीय महाविद्यालयास मान्यता दिलेली असणे, परंतू बुलढाणा जिल्हा मेडिकल कॉलेजला मान्यता न दिल्याने नागरिकांमध्ये पसरलेला तिव्र असंतोष, यासाठी बुलढाणा जिल्हा वैद्यकीय महाविद्यालयास तातडीने मान्यता देण्यासाठी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मंत्री (वै. शि.) यांचे निवेदन

जिल्हा बुलढाणा येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित रुग्णालय स्थापन करण्यासाठी दिनांक २२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीत समिती गठीत करण्याचे निर्देश देण्यात आले होते. सदर निर्देशाच्या अनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय स्थापनेच्या दृष्टीकोनातून प्राथमिक तपासणी करण्यासाठी डॉ.कैलास झीने, प्राध्यापक व विभागप्रमुख न्यायवैद्यकशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत दि. २९.०५.२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील ३०६ खाटांचे जिल्हा सामान्य रुग्णालय आणि १०० खाटांचे स्त्री रुग्णालय अशा मिळून एकूण ४०६ खाटा तात्पुरत्या स्वरुपात नि:शुल्क वापरास उपलब्ध करुन देण्यास सार्वजनिक आरोग्य विभागाने देखील सहमती दर्शवली होती. यानुषंगाने वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत मार्च,२०२१ मध्ये सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. तथापि, दरम्यानच्या कालावधीत ज्या जिल्ह्यांत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नाही, त्याठिकाणी प्रत्येकी १००

विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणेबाबत एकत्रित प्रस्ताव मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुषंगाने प्रस्ताव सादर करण्याची सूचना आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांना देण्यात आली. त्यानूसार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावात बुलढाणा जिल्ह्याचा देखील समावेश आहे. सद्यस्थितीत ज्या जिल्ह्यांत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नाही, त्याठिकाणी प्रत्येकी १०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रूग्णालय स्थापन करण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभाग, नियोजन विभाग, महसूल विभाग व वित्त विभाग यांचे अभिप्राय घेवून प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

## लक्षवेधी सूचना

श्री. सुभाष देशमुख, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात सोलापूर जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत राबविण्यात आलेल्या जलजीवन मिशनच्या कामात अनियमितता झाली असल्याची बाब माहे मार्च २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास येणे, याची सखोल चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्याच्या सूचना पालकमंत्री महोदयांनी जिल्ह्यात घेतलेल्या आढावा बैठकीत दिल्या असणे, जलजीवन मिशनच्या कामातील अनियमितता संदर्भात स्थानिक वृत्तपत्रात जलजीवन मिशन ठेकेदाराचे पोषण या वृत्तमालिद्वारे सर्व जिल्ह्याचे लक्ष वेधले असणे, जलजीवन मिशन अंतर्गत कोणत्याही प्रकारची बिले कामाची गुणवंता तपासल्याशिवाय काढण्यात येऊ नयेत, तसेच कामासाठी जैन किंवा फिनोलेक्स कंपनीचे पाईप वापरण्यात यावे, कामाची गुणवंचा फेरतपासणी झाल्याशिवाय ठेकेदाराची बिल काढण्यात येऊ नये ज्या ठेकेदाराची आर्थिक पात्रता नाही अशांना कामे देण्यात येऊ नये, अशा कडक पालकमंत्र्यांनी सूचना देणे, जिल्हा भरात जलजीवन मिशनच्या माध्यमातून हजारो कोटी रुपयांची कामे सुरु असून नियमांना हरताळ फासुन ही कामे मंजुर करण्यात येत असणे, त्यामुळे जलजीवन मिशन हे अधिकार्यांसाठी चराऊ कुरण बनत असल्याने या योजनेचे मातेरे होत असताना दिसत असणे, त्यामुळे यात गुंतलेल्या अधिकारी, कर्मचार्यांवर तात्काळ कार्यवाही करण्याची गरज असणे, त्यामुळे जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या कामाविषयी नाराजी व्यक्त होत असून असंतोष व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही."

## मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

सोलापूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या जल जीवन मिशन योजनेमधील अनियमितेसंदर्भात स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्यांबाबत तसेच जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिनांक ०४/१०/२०२२ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत केली आहे.

अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांच्या अध्यक्षेखाली गठीत सदर त्रिसदस्यीय चौकशी समितीस दिनांक ०४/१०/२०२२ पर्यंत कार्यारंभ पारित झालेल्या एकुण १८९ कामांच्या

निविदा चौकशीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या. सदर चौकशी समितीचा अंतिम चौकशी अहवाल दिनांक ०९/०३/२०२३ रोजी जिल्हा परिषदेस प्राप्त झालेला आहे.

जल जीवन मिशनच्या कामाची गुणवत्ता तपासल्याशिवाय बिले अदा करण्यात येऊ नये म्हणून, उप अभियंता व संबंधित सर्वांना दिनांक १६/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रगतीपथावर असलेल्या कामांना गट विकास अधिकारी/उप अभियंता यांची समिती गठीत करून वारंवार पाहणी/तपासणी करण्याबाबत तसेच कामाच्या दर्जाबाबत खात्री करण्याच्या सूचना उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, सोलापूर व कार्यकारी अभियंता यांना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे अभियान संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, नवी मुंबई यांच्या दिनांक १५/०२/२०२३ रोजीच्या पत्रानुसार जल जीवन मिशन योजनेच्या कामाच्या तांत्रिक तपासणी करिता M/S TUV SUD South Asia Pvt. Ltd. या त्रयस्थ संस्थेची नियुक्ती केलेली आहे. तांत्रिक तपासणी झाल्याशिवाय अंतिम देयक अदा केले जाणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत चालु असलेल्या सर्व जिल्ह्यातील कामांची गुणवत्ता राखण्यासाठी शासन मान्य कंपनीचे पाईप, साहित्य वापरण्यात यावे याबाबत उप अभियंता व मक्तेदारांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच जिल्हा परिषदेमार्फत निर्गमित करण्यात आलेल्या कार्यारंभ आदेशामध्ये संबंधित ग्रामपंचायत, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता यांनी संयुक्तपणे पाहणी करून काम योग्य झाले असल्याचे व कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणीत करून देयक अदा करणेबाबतची अट समाविष्ट करण्यात आलेली आहे.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडून जिल्हा परिषदेस दिनांक ०९/०३/२०२३ रोजी चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झालेला आहे. सदर चौकशी अहवालानुसार तत्कालिन कार्यकारी अभियंता व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक १३/०३/२०२३ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. संबंधितांचा खुलासा प्राप्त होताच नियमानुसार उचित कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

**************************

(२९७)

लक्षवेधी सूचना क्रमांक-२२३५

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**श्री.विजय वडेट्टीवार, श्री.सुनिल केदार, श्री.अस्लम शेख, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे. :-

"चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यात अनेक सरकारी व खाजगी कोळसा खाणी असल्याने कोळसा माफियाकडून दोन्ही जिल्ह्यात नियमबाह्य, अवैधरित्या कोलवाशरीज सुरु असणे, नियमबाह्य सुरु असलेल्या कोल माफीयांच्या कोल वाशरीजकडे पोल्युशन सर्टिफिकेट, कॅमेन्स सर्टिफिकेट, सन २०२१ च्या शासन निर्णयानुसार साठा करावयाचा असल्यास डिलर परमीट यासह अनेक महत्वपूर्ण सर्टिफिकेट नसल्यामुळे कोल माफियाकडून मनमानी कारभार सुरु असणे, यात उच्च दर्जाच्या कोळशाची मोठ्या प्रमाणात चोरी होत असणे, अनेक ठिकाणी कोळसाच्या साठ्याची नियमबाह्य साठवणूक करण्यात येणे, या कोलवाशरीजमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याने नागरिकांना, दम्याच्या श्वसनाचा यासह इतर गंभीर आजार होणे, केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र प्रदुषण मंडळाद्वारे २४ तास घेण्यात येणाऱ्या हवा गुणवत्ता निरीक्षणाची सन २०२२ ची धक्कादायक आकडेवारी समोर आली असून गत वर्षात ३६५ दिवसात चंद्रपूरमध्ये केवळ २९ दिवस प्रदूषण मुक्तीचे ठरणे, कोल वॉशरीजकडून मोठ्या प्रमाणात होत असलेली कोळसाची चोरी व प्रदूषण, याबाबत वारंवार तक्रारी होत असतांना सुध्दा कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### श्री.दादाजी भुसे, मा.मंत्री (खनिकर्म) यांचे निवेदन

पर्यावरण विभागाच्या चंद्रपूर येथील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात वेस्टर्न कोलफिल्ड लि. या कंपनीच्या एकूण ४२ कोळसा खाणी असून, यापैकी १० कोळसा खाणी सद्य:स्थितीत बंद आहेत तर ०५ खाजगी कोळसा खाणी कार्यरत आहेत. त्यामुळे या जिल्ह्यामध्ये "कोल वॉशरीज व कोल डेपो" यासारखे कोळशावर आधारीत प्रक्रिया उद्योग कार्यरत आहेत.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक २४/०८/२०१६ च्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार, चंद्रपूर जिल्ह्यात ०७ तर यवतमाळ जिल्ह्यात ०६ "कोल वॉशरीना" महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून अटी व शर्तीसह मंजुऱ्या प्रदान करण्यात आलेल्या आहेत. या मंजुरीच्या अटी व शर्तीनुसार, संबंधीत उद्योग घटकांनी हवा प्रदुषण नियंत्रण यंत्रणा जसे स्क्रबर, बॅग फिल्टर बसविलेले असून, याठिकाणी नियमितपणे पाणी शिंपडण्याची कार्यवाही केली जाते तसेच बहुतांश उद्योगांनी प्रदुषण नियंत्रण यंत्रणा अद्ययावत केलेल्या आहेत. याशिवाय कार्यरत उद्योग घटकांची मंडळाच्या पथकाकडून वेळोवेळी प्रत्यक्ष पाहणी केली जात असून, यादरम्यान त्रुटी आढळून आल्यास, याआधारे संबंधीत घटकावर उचित कार्यवाही करण्यात येत असते. उक्त कोळसा डेपो आणि कोलवॉशरीज मधून निर्गमित होणाऱ्या कोळशाचा अंतिम वापरकर्ता हे महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती केंद्र, कोराडी व चंद्रपूर हे असून, त्यांच्या मार्फत कोळशाच्या दर्जाची वेळोवेळी तपासणी केली जात असत. कोळशाच्या गुणवत्तेसंदर्भात कोणतीही तक्रार आजपावेतो खनिकर्म विभागाच्या स्थानिक कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

उक्त एकूण १३ उद्योगांपैकी ०४ घटकांचे पर्यावरण संमतीपत्राची मुदत संपल्याने, त्याचे नुतणीकरण करण्यासाठी आणि ०१ घटकाची मार्च, २०२३ अखेर असलेली मुदत संपण्यापूर्वी, त्याचेही नुतणीकरण करण्यासाठी म.प्र.नियंत्रण मंडळाकडे अर्ज प्राप्त झाले आहेत.

याशिवाय पडोली व घुग्गुस या रस्त्यावर पर्यावरण विभागाकडील निश्चीत केलेले निकष न पाळता, मागील बऱ्याच वर्षापासून जवळपास ३२ अवैध कोळसा डेपो असून, सदरचे कोळसा डेपो बंद करण्यासंदर्भात मागील ३-४ वर्षापासून पर्यावरण विभागामार्फत प्रयत्न सुरु आहेत. यात मुख्यत्वे सदरचे डेपो बंद करण्याबाबत नोटीस देणे, न्यायालयीन प्रकरण खटला दाखल करण्यासंदर्भात नोटीसाही देण्यात आल्या होत्या, यासंदर्भात जिल्हाधिकारी स्तरावरही वारंवार बैठकाही घेण्यात आल्या होत्या तथापि, या कोळसा डेपोधारकांकडून

पर्यावरणदृष्टया कोणतेही निकष पाळण्यात आलेले नसल्याने, सदर डेपो बंद करण्यासंदर्भात पर्यावरण विभागामार्फत निर्देश देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र खनिज (अवैध उत्खनन, वाहतूक व साठवणूक प्रतिबंध) नियम दिनांक १६/०६/२००१ च्या अधिसूचनेतील तरतुदी आणि दिनांक २६/०८/२०२१ च्या अधिसूचनेद्वारे करण्यात आलेल्या सुधारणेनुसार, जिल्हा प्रशासनाकडून कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र खनिज (अवैध उत्खनन, वाहतूक व साठवणूक प्रतिबंध) नियमात दिनांक २६/०८/२०२१ च्या अधिसूचनेन्वये झालेल्या सुधारणेनुसार, कोल डेपो करिता चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यात एकूण १८ अर्ज उप संचालक, भूविज्ञान व खनिकर्म प्रादेशिक संचालनालय, चंद्रपूर यांचेकडे प्राप्त झाले असून, यापैकी ०९ कोलडेपोंना नियमानुसार, डीलर परमीट मंजूर करण्यात आलेले आहे. उर्वरित कोलडेपोंना अपुऱ्या कागदपत्रांअभावी अद्याप परवानगी देण्यात आलेल्या नाहीत.

याशिवाय मे.वेस्टर्न कोलफिल्ड लि. यांच्या अहवालानुसार, त्यांचे मालकीच्या खाणीतून निघणारा कोळसा, त्यांच्या सेल्स डिपार्टमेंटद्वारे, त्यांचेशी संबंधीत असलेल्या कंपन्या अथवा व्यक्तींना थेट वितरीत करण्यात येत असून, या वितरणामध्ये कोणताही अवैध प्रकार निदर्शनास आलेला नाही.

याशिवाय, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर यांचेमार्फत महाजनकोच्या औष्णिक विद्युत प्रकल्पाला मे.वेस्टर्न कोल फिल्ड लि. यांच्याकडील खाणीतून कोळसा घेऊन, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाकडून चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यात नियुक्त करण्यात आलेल्या व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून मंजुरी असलेल्या ०५ वॉशरी मार्फत वॉश करुन महाजेनको यांना पुरवठा करण्यात येत आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्या दिनांक २१/०२/२०२३ च्या अहवालात, सन २०२१-२०२२ या वर्षातील एकूण रुग्णाच्या आकडेवारीनुसार, प्रदुषणामुळे आजाराच्या प्रमाणात वाढ झाल्याचे निश्चित सांगता येत नाही, असे नमूद केले आहे.

तर, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या अहवालानुसार, वणी परिसरात कार्यरत ०६ कोल वॉशरीजमुळे होणाऱ्या प्रदुषणामुळे दमा या आजारांचे एकूण ३१ रुग्ण आढळून आले असून, या सर्व रुग्णांवर आरोग्य विभागामार्फत योग्य ते औषधोपचार व पाठपुरावा सुरु आहे.

चंद्रपूर शहरात व चंद्रपूर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिसरात असलेल्या खुटाळा गावात सतत हवा गुणवत्ता तपासणी केंद्र कार्यरत असून, या दोन्ही केंद्रातील माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीमधील धुलीकणांचे (PM10)व श्वसनीय धुलीकणांचे (PM2.5) प्रमाण खालीलप्रमाणे आहे.:-

| अ.क्र. | तपासणी केंद्राचे नाव | धुलीकण ($PM_{10}$) २४ तास मर्यादा 100 Micro Gram qubic/m3 | | धुलीकण ($PM_{2.5}$) २४ तास मर्यादा 60 Micro Gram qubic m3 | |
|---|---|---|---|---|---|
| | | मर्यादेत दिवस | मर्यादेबाहेर दिवस | मर्यादेत दिवस | मर्यादेबाहेर दिवस |
| १ | उद्योग भवन, चंद्रपूर | १८४ | १८१ | ९७ | २६८ |
| २ | म.औ.वि.मं.परिसर, खुटाळा | १८८ | १७७ | १४ | ३५१ |

याशिवाय चंद्रपूर महानगरपालिकेने शहराच्या हवेतील प्रदुषणावर नियंत्रण आणण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी चंद्रपूर शहर कृती आराखडा तयार केला असून त्याची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे. यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून महापालिकेस रु.१.२४ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

******************

लक्षवेधी सूचना क्र.५८४

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**मा.श्री.प्रशांत ठाकूर, मा.श्री.समीर कुणावर, मा.श्री.महेश बालदी, मा.श्रीमती मनिषा चौधरी, मा.श्री.अमित साटम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५८४ पुढीलप्रमाणे आहे :-**

" तळोजे (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील केमस्पेक केमिकल्स लि. कंपनीच्या व्यवस्थापनेने कोणतीही पूर्व सुचना न देता बेकायदेशिररित्या ठेकेदारी पद्धतीवर काम करणाऱ्या स्थानिक प्रकल्पग्रस्त ११८ कामगाराना कमी केले असल्याचे माहे फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले असणे, गेल्या अनेक वर्षापासून प्रामाणिकपणे काम करीत असणाऱ्या कामगारांना केमस्पेक केमिकल्स कंपनीच्या व्यवस्थापनाने अचानकपणे कामावर कमी केल्यामुळे कामगारांच्या कुटुंबावर उपासमारीची पाळी आली असणे, कामगारांच्या हित संरक्षणासाठी असलेल्या कायद्याचे सर्रासपणे पायदळी तुडवून कंपनी व्यवस्थापनाने कामगारांवर अन्याय केला असणे, अशा मुजोर कंपनीच्या व्यवस्थापनाच्या विरोधात कामगारांनी गेट बंद आंदोलन केले असणे, परंतु कंपनी व्यवस्थापनाकडुन कोणत्याही प्रकारचे सहकार्य मिळत नसल्यामुळे कामगारांमध्ये कंपनी व्यवस्थापना विरोधात प्रचंड असंतोषाची लाट निर्माण झाली असणे, त्यामुळे शासनाने कंपनी व्यवस्थापनावर तातडीने कारवाई करून ठेकेदारी पद्धतीवर काम करणाऱ्या स्थानिक प्रकल्पग्रस्त ११८ कामगारांना कामावर घेण्याबाबत शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

मे. केमस्पेक केमिकल्स प्रा. लि. ही आस्थापना सन २००२ पासून प्लॉट नं ३-सी, ३-बी १, तळोजा औद्योगिक वसाहत, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथे कार्यरत असून सदर आस्थापनेत 'केमिकल्स' चे उत्पादन घेतले जाते. या आस्थापनेत १४४ कायम कामगार, २१५ कार्यालयीन कर्मचारी तसेच ९ कंत्राटदारांमार्फत ३५७ कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. कायम तसेच कंत्राटी कामगारांचे नेतृत्व जय भारतीय जनरल कामगार संघटना व कामगार

कॉंग्रेस या दोन संघटना करीत आहेत.

मे.केमस्पेक केमिकल्स प्रा.लि. या आस्थापनेतील ठेकेदार मे.व्हिजन इंटीग्रेटेड सर्व्हिसेस व्हेंचर्स प्रा.लि. व मे.व्यंकटेश एंटरप्रायझेस या ठेकेदारांकडील ११८ कंत्राटी कामगारांना कोणतीही पूर्वसुचना न देता ठेकेदारांनी माहे जानेवारी २०२३ मध्ये कामावरून कमी केलेले आहे. या कारणास्तव परिणामीत कामगारांनी माहे फेब्रुवारी २०२३ पासून गेटबाहेर आंदोलन सुरू केलेले आहे.

ठेकेदारांकडील कंत्राटी कामगारांना कोणतीही पूर्वसूचना न देता कामावरून कमी केलेले असल्यामुळे कामगार उप आयुक्त, रायगड कार्यालयातील क्षेत्रीय सरकारी कामगार अधिकारी यांचेमार्फत आस्थापनेस दि.१६.०२.२०२३ रोजी प्रत्यक्ष भेट देवून तपासणी करण्यात आली. तसेच, मुख्य व्यवस्थापन व ठेकेदार याना विविध कामगार कायद्यांतर्गत २६ निरीक्षण शेरे पारित करण्यात आलेले आहेत. निरीक्षणावेळी काही त्रुटी आढळून आल्याने व्यवस्थापन व ठेकेदारांविरूद्ध कारणे दाखवा नोटीस बजावून मुख्य व्यवस्थापन व कंत्राटदारांविरूध्द विविध कामगार कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पनवेल यांचे न्यायालयात २० खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

११८ कंत्राटी कामगारांना कामावरून कमी केल्याबाबत जय भारतीय जनरल कामगार संघटनेने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कामगार उप आयुक्त, रायगड कार्यालयामार्फत दि.२०.०१.२०२३ ते दि.२४.०२.२०२३ दरम्यान उभयपक्षांच्या बैठका घेऊन विवादात तडजोडीच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले, परंतू समेट झाला नाही.

एखाद्या कामगारास कामावरून कमी केल्यावर त्यास पूर्ववत कामावर घेण्याबाबत संघटना/कामगार हे " औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ " अंतर्गत समेटात विवाद कामगार कार्यालयात उपस्थित करू शकतात, अथवा " महाराष्ट्र कामगार संघटनेस मान्यता आणि कामगार अनुचित प्रथा प्रतिबंध अधिनियम, १९७१ " अंतर्गत परस्पर न्यायालयात प्रकरण दाखल करण्याचीही तरतूद आहे. या संदर्भात संघटनेस कामगार उप आयुक्त, रायगड कार्यालयामार्फत लेखी स्वरूपात कळविण्यात आले आहे. तथापि, संघटनेकडून अद्याप औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ अंतर्गत समेटात विवाद उपस्थित करण्यात आलेला नाही.

दरम्यानच्या काळात कंत्राटदाराकडे कंत्राटी कामगारांना महागाई भत्ता बोनस व रजेच्या पगाराचा फरक मिळवून देणेबाबत पाठपुरावा केल्याने कंत्राटदाराने दि.२२.०२.२०२३

रोजी १०१ कंत्राटी कामगारांच्या बँक खात्यात महागाई भत्ता, बोनस व रजेच्या पगारातील फरकापोटी एकूण रुपये ४,१२,७२३/- इतकी रक्कम जमा केलेली आहे.

********

शेठा (H-1531 - 3 - 700)

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ९७४ पुढीलप्रमाणे आहे:-**

"वर्षभरापुर्वी सुरू झालेल्या कामगार मध्यान्ह भोजन योजने अंतर्गत बांधकाम कामगारांना कामाच्या स्थळी दोन वेळेचे जेवण देण्याच्या शासनाच्या हेतूला भष्ट्राचाराची किड लागल्याचे चित्र निर्देशनास येणे, वर्षभरात गडचिरोली जिल्हयात बनावट संख्या दाखवून तब्बल ११ कोटीचे देयके काढल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, इमारत व बांधकाम कल्याणकारी मंडळ कार्यालयामार्फत कुठलिही शहनिशा न करता देयके काढणे, त्यामुळे सदर योजनेत मोठया प्रमाणात भष्ट्राचार झाल्याची शंका निर्माण होणे, सुरवातीला नोंदणीकृत कामगारांनाच भोजन पुरविण्यात यावे असे निर्देशीत असतांना सबंधित कंत्राटदाराने अधिकाऱ्यांशी संगणमत करून अनोंदीत कामगारांना सुध्दा भोजन वाटप करने, त्यामुळे नेमके भोजन किती व कोणाला वाटप करता येत आहे याबाबत माहीती गोळा करने शक्य नसणे, त्याचा फायदा घेऊन कंत्राटदाराने अव्वाच्या सव्वा संख्या दाखवून वर्षभरात कोटयावधीचे देयके मंजूर करवून घेणे, गडचिरोली जिल्हयात मागील वर्षभरात ११ कोटी ३७ लाखांचे देयके येथील बांधकाम कल्याणकारी मंडळाने डोळे झाकून अदा करणे. याबाबत माहीती विचारल्यास नोंदीत अनोंदीत कर्मचाऱ्यांची माहिती उपलब्ध नसणे, सद्यस्थितीत ज्या गावांमध्ये भोजन वाटप सुरू आहे, त्याठिकाणी माहीती घेतली असता तेथे बांधकामच सुरू नसल्याचे दिसून येणे, त्यामुळे मागील वर्षभरापासून जिल्हयात हा प्रकार सुरू असणे व यात कोटयावधीचा घोटाळा झाल्याची शंका उपस्थित होणे, त्यामुळे या भ्रष्टाचाराचे लोण राज्यभर पसरले असल्याची शक्यता नाकारता न येणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण करुन त्यांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक सुरक्षा, आरोग्य व अन्य अशा विविध कल्याणकारी योजनेंतर्गत लाभ दिला जातो. त्यानुसार सामाजिक सुरक्षा योजनेंतर्गत राबविण्यात येत असलेल्या अन्य योजनेप्रमाणेच नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी दिनांक १२.०३.२०१८ रोजी मध्यान्ह भोजन योजना सुरु करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. शासनाच्या दिनांक २७.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील ३६ जिल्हयात नोंदीत, अनोंदीत व नाका बांधकाम कामगार लाभार्थ्यांना मध्यान्ह भोजनासह रात्रीच्या भोजनाचा लाभ देण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने गडचिरोली जिल्ह्यात अटल आहार योजनेंतर्गत मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन वाटप माहे नोव्हेंबर, २०२१ पासून सुरु करण्यात आले आहे.

२.	अटल आहार योजनेकरीता प्रथमत: ज्या ठिकाणी बांधकामाशी संबंधित कामे सुरू आहेत, तेथील संबंधित कंत्राटदारामार्फत तसेच संबंधित ग्रामपंचायत कार्यालयांतर्गत मनरेगा कामगारांकरीता व विटभट्टी कामगारांकरीता संबंधित विटभट्टी ठेकेदारामार्फत सरकारी कामगार अधिकारी कार्यालय, गडचिरोली या कार्यालयास कामगारांच्या यादीसह निवेदन सादर करण्यात येते. सदर प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने कामाच्या ठिकाणी क्षेत्रीय अधिकारी यांचे कडून प्रत्यक्ष भेट देऊन काम सुरू असल्याची व उपस्थित कामगारांची पडताळणी करण्यात येते.

३.	त्यानुसार कामाच्या ठिकाणी मध्यान्ह व रात्रीचे भोजन पुरविण्याकरीता मंडळाने नियुक्त केलेल्या संस्थेला नोंदीत, अनोंदीत व नाका बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेसह रात्रीचे भोजनाचा लाभ देण्याकरीता मान्यता देण्यात येते. तद्नंतर, मंडळाव्दारे ठरवून दिलेल्या (१८% वस्तू सेवा करासह) रु.६२.७०/- प्रति लाभार्थी मध्यान्ह भोजन दरानुसार देयके नियुक्त संस्थेव्दारे दरमहा सरकारी कामगार अधिकारी, गडचिरोली या जिल्हा कार्यालयास सादर केली जातात. मंडळाद्वारे नियुक्त संस्थेकडून सदर देयके जिल्हा कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर जिल्हा कार्यालयाव्दारे मान्यता देण्यात आलेल्या बांधकामाचे ठिकाण व भोजन वाटप झालेल्या एकूण कामगार संख्या याची पडताळणी जिल्हा कार्यालयामार्फत केली जाते. तद्नंतर जिल्हा कार्यालयाचा तपासणी अहवाल, अभिलेख जतन प्रमाणपत्र व विभागीय कार्यालयाच्या शिफारशीसह सदर देयके ही मंडळास सादर केली जातात व त्यानंतर मंडळ स्तरावरुन सदर देयके मंजूर करण्यात येतात. त्या अनुषंगाने गडचिरोली जिल्हयात माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ मासिक सरासरी २,७०,५१९ इतक्या बांधकाम कामगारांनी घेतला असून त्यासाठी पुरवठादार संस्थेस अदा केलेली सरासरी रक्कम रु.१,६९,६१,५८७/- इतकी आहे. तसेच माहे जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत रात्रीच्या भोजनाचा लाभ मासिक सरासरी २,४४,३५२ इतक्या बांधकाम कामगारांनी घेतला असून त्यासाठी पुरवठादार संस्थेस अदा केलेली सरासरी रक्कम रु.१,५३,९९,६८१/- इतकी आहे.

४.	मध्यान्ह भोजन योजनेतील अन्न पदार्थाची गुणवत्ता चांगली असावी, या करीता सरकारी कामगार अधिकारी, गडचिरोली कार्यालयाव्दारे शासकीय/NABL या नामांकित प्रयोगशाळेकडून महिन्यातून किमान एकदा तपासणी करुन घेण्यात येते. मंडळाच्या दिनांक ३०.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार नोंदित, अनोंदीत व नाका बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेसह रात्रीचे भोजन वाटपाची कार्यवाही सुरू आहे. तसेच सदर योजनेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार, भ्रष्टाचार किंवा घोटाळा झालेला नाही.

---

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**सर्वश्री. श्रीमती यामिनी जाधव, वि.स.स. सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २०८० पुढीलप्रमाणे आहे:-**

"मुंबईतील भेंडीबाजार येथील बोहरी मोहल्ला येथील इमारतीचे बांधकाम सुरु असतांना लिफ्टची तार तुटल्यामुळे लिफ्टमधील दोन कामगार खाली पडले. त्यामध्ये एका कामगाराचा मृत्यू झाला व दुसरा कामगार गंभीर जखमी झाला. सदरहू बांधकामाच्या कंत्राटदाराने कामगारांसाठी कोणतीही सुरक्षा व्यवस्था केलेली नव्हती. विकासक व ठेकेदार यांच्या निष्काळजीपणामुळे एका कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. कामगार कायद्याप्रमाणे मृताच्या कुटुंबियांना १५ लाख रुपयांची नुकसान भरपाई देणे आवश्यक असतांना याप्रकरणी केवळ ७ लाख रुपये मृत कामगाराच्या कुटुंबियांना देण्यात आली आहे. हे पाहता सदर मृत कामगाराच्या कुटुंबियांची फसवणूक करण्यात आली आहे. सदर बांधकाम ठेकेदार व विकासकाने कामगारांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने कोणतीही व्यवस्था बांधकामाच्या जागेवर केलेली नव्हती. राज्यात मुंबईसह इतरत्र अशा प्रकारच्या अनेक घटना घडत असतात, त्यामध्ये अनेक गरीब कामगारांची फसवणूक केली जाते. "दि. ०८/०७/२०१९ रोजी तत्कालीन कामगार मंत्री श्री. संजय कुटे यांनी आपल्या पत्र ( जावक क्र. जा.क्र.मंत्री/का/ विजाभज इमाव विमाक/३७/२०१९) द्वारे (आंदोलनकारक) श्री. प्रदीप सुरेश मगरे महाराष्ट्र चिटणीस, नवीन अखिल महाराष्ट्र माथाडी, वाहतूक आणि जनरल कामगार संघटना, प्लॉट न.६५, सेक्टर - २८, वाशी, नवी मुंबई यांचे दिनांक ०३/०७/२०१९ रोजीच्या निवेदन मध्ये एकूण कामगारांच्या विविध ८ मुद्यांवर आंदोलन सुरु होते. सदर निवेदन संदर्भात मा. प्रधान सचिव याना निवेदन मधील तक्रारी संदर्भात १५ दिवसांत अहवाल सादर करण्यास कळवले होते. तरी सदर अहवाल अद्यापि सादर न होणे, रेल्वे माथाडी मंडळ मधील टोळी क्र. १९५ मधील श्री. दगडू बबन खरात (रजि नः १९९०९) या कामगाराला इतर कामगारांसोबत प्रवेश परवाना देण्याचे मुंबई उच्च न्यायालय च्या writ petition ३२६७ of २०२२ च्या खटल्याचा आदेशा मध्ये निमूद असताना सुद्धा त्याला प्रवेश परवाना दिला नाही व टोळी ला आदेशाप्रमाणे काम न देणे, दक्षिण मुंबई मध्ये मोठ्या प्रमाणात रहिवाशी इमारतींचे पुनर्विकास व बांधकाम सुरु आहे. सदर बांधकाम मध्ये माथाडी कायद्याचा धाक दाखवून काही पक्षांचे उपनेते व कामगार संघटनेचे पदाधिकारी माथाडी कायद्याचा धाक दाखवून बेकायदेशीर रित्या बांधकाम विकासक कडून वसूल करत आहेत. सदर प्रकार मुळे खऱ्या माथाडी कामगार मोठ्या प्रमाणात आपल्या कामाशी वंचित राहत असून त्याचे आर्थिक नुकसान होत आहे व शासनाने नेमलेल्या माथाडी मंडळाची लेव्ही हि बुडत आहे. तरी सदर प्रकरणात कामगार विभाग, माथाडी मंडळ व मुंबई पोलीस हे रोकण्यासाठी काही उपाय योजना न करणे, विविध प्रकारे मागणी करूनही शासन व पोलिस कोणतीच कार्यवाही करीत नसल्याने माथाडी कामगारांमध्ये अन्यायची भावना निर्माण होऊन, अत्यंत तिव्र स्वरूपाचा असंतोष खदखदाने, यावर शासनाने तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता विचारात घेता, कारावयाची कार्यवाही व उपाययोजना"

## मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

मे. सैफी बुरहानी अपलिफ्टमेंट ट्रस्ट (एसबीयूटी) क्लस्टर १, बोहरी मोहल्ला, भेंडीबाजार, मुंबई ४०० ००९ येथे दिनांक ०६.०६.२०२२ रोजी दुपारी २.०० वाजता बांधकाम चालू असताना लिफ्टची तार तुटल्यामुळे २ कामगार लिफ्टसह खाली पडले, त्यात मोहम्मद विश्वरवी अब्दुलहैं सय्यद, वय २२ वर्षे या कामगाराचा मृत्यू झाला असून करीमूल एलियास विपुल खान, वय २३ वर्ष हा कामगार किरकोळ जखमी झालेला आहे.

अपघाताच्या बाबतची माहिती मिळताच क्षेत्रीय सरकारी कामगार अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देऊन विविध कामगार अधिनियमांतर्गत निरीक्षण शेरे पारित केले. सदर प्रकरणाबाबत सर जे.जे.मार्ग, पोलीस ठाणे भायखळा, येथे गु.र.क्र.४४१/२०२२ व ४४२/२०२२ अन्वये दिनांक ०७.०६.२०२२ रोजी प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आलेला आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ चे नियम २६३ अन्वये आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने दिनांक २०.०६.२०२२ रोजी पासून तात्काळ काम बंद करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियमाअंतर्गत पारित केलेल्या निरीक्षण शेरेच्या अनुषंगाने मुख्य निरीक्षक यांच्या समोर सुनावणी होऊन पुतर्ता न केलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने रु. ३९,०००/- इतकी रक्कम दंड म्हणून ठोठविण्यात आली. सदर दंडाची रक्कम व्यवस्थापनाने भरलेली आहे. तसेच कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० अंतर्गत प्रस्तुत प्रकरणी मा. न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

मयत कामगारांचे वारसास कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ नुसार नुकसान भरपाई देण्याचे दायित्व मुख्य मालक (विकासक) व कंत्राटदार यांचे असून त्याकरिता मा.श्रमिक आयुक्त तथा कामगार न्यायालय, मुंबई यांना मृत कामगारांच्या वारसास नुकसान भरपाई मिळवून देणेबाबत दिनांक ०१.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार मा. श्रमिक आयुक्त तथा कामगार न्यायालय, मुंबई कार्यालयाने दिनांक २५.०८.२०२२ रोजी श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ च्या कलम १०(अ) नुसार संबंधित व्यवस्थापनास नोटीस पाठविली आहे.

व्यवस्थापनातर्फे मोहम्मद विश्वरवी अब्दुलहैं सय्यद, वय २२ वर्षे या मयत कामगाराचे वडील सय्यद मोहम्मद अब्दुल है व मोठी बहीण श्रीमती सायदा समीरान्निशा यांस १:१ प्रमाणात एकूण रु.७,००,०००/- इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्यात आली आहे. तसेच जखमी कामगार करीमूल एलियास विपुल खान, हा किरकोळ जखमी झालेला असल्याने त्याचा हॉस्पीटलमधील उपचाराचा खर्च व्यवस्थापनाने केलेला असून कामगाराने दिनांक ०७.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये व्यवस्थापनाबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे लिहून दिले आहे.

दि रेल्वे गुड्स क्लिअरींग ॲण्ड फॉरवडींग एस्टॅब्लिशमेंटस लेबर बोर्ड, या मंडळामध्ये मे. आर.सी.एफ. लि., चेंबूर, मुंबई ही आस्थापना मंडळात नोंदीत आहे. सदर आस्थापनेमध्ये माथाडी स्वरुपाच्या कामाकरीता नेमून दिलेले सुमारे ६०० नोंदीत कामगार कार्यरत आहेत. तत्कालीन मा. मंत्री (कामगार) यांना दि. ०३.०७.२०१९ रोजी चिटणीस, नवीन अखिल महाराष्ट्र माथाडी, वाहतुक आणि जनरल कामगार संघटना, मुंबई यांच्याकडून निवेदन प्राप्त झाले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने सह आयुक्त कामगार (माथाडी) यांनी शासनास अहवाल सादर केलेला आहे.

मंडळातील नोंदीत कामगार श्री. बबन दगडू खरात यांना टोळी क्र. १९५ मधील एका कामगाराने दिलेल्या राजीनामाच्या रिक्त जागेवर मे. आर.सी.एफ.लि., चेंबूर, मुंबई येथे टोळी क्र.१९५ मध्ये नेमून देण्यात आले होते. तथापि, मे. आर.सी.एफ.लि., चेंबूर, मुंबई यांचेकडून प्रवेश परवाना मिळण्याबाबत मंडळामार्फत वेळोवेळी लेखी पत्राद्वारे व्यवस्थापनास विनंती करण्यात आली आहे.

कामगारांना मे. आर. सी. एफ. लि., व्यवस्थापनाने सुमारे वीस कामगारांना प्रवेश परवाना नाकारल्याने मंडळाने वेळोवेळी व्यवस्थापनेस पत्राद्वारे सदर कामगारांना प्रवेश परवाना देण्यास व्यवस्थापनेस सुचित करण्यात आले होते. या अनुषंगाने व्यवस्थापनाने मा.मुंबई उच्च न्यायालयातील याचिका क्र.१३४०३/२०२२ दाखल केली होती. त्यामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २८.०४.२०२२ रोजी अंतिम आदेश पारीत करुन मंडळाने सदर प्रकरणी सर्व संबंधितांची सुनावणी घेऊन कामगारांना प्रवेश परवाना देण्यासंदर्भात निर्णय द्यावा, असे आदेशित केले होते. त्यानुसार मंडळाने दिनांक २६.०५.२०२२ रोजीच्या आदेशाद्वारे आस्थापनेत मंडळाद्वारे नेमुन दिलेल्या सर्व नोंदीत कामगारांना व्यवस्थापनेने विनाअट तात्काळ प्रवेश परवाने द्यावेत, असे आदेशित केले होते. सदर आदेशास व्यवस्थापनाने मा. मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र. डब्ल्यू पी/३२६७/२०२२ द्वारे आव्हान दाखल केले होते. सदर याचिका मा. मुंबई उच्च न्यायालयाने निकाली काढून मंडळाचे दिनांक २६.०५.२०२२ रोजीचे आदेश कायम केलेले आहेत. त्यानंतर व्यवस्थापनाने दोन कामगारांना प्रवेश परवाने जारी केले, परंतु श्री. दगडु बबन खरात (रजि.नं.१९९०९) यांच्या प्रवेश परवानाच्या अनुषंगाने त्यांच्या संघटनेने मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका क्र. डब्ल्यू पी/९२२४/२०२१ अद्यापही न्यायप्रविष्ठ असल्याचे व्यवस्थापनाने दिनांक २१.१२.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे मंडळास कळविले आहे. त्यामुळे सदर कामगाराला आस्थापनेद्वारे अद्यापपर्यंत प्रवेश परवाना देण्यात आलेला नाही. सदर याचिका दि. २१.०३.२०२३ रोजी पुढील सुनावणी करीता ठेवण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अर्जदार अनुपस्थित राहिल्याने पुढील सुनावणी दि.१०.०४.२०२३ रोजी ठेवण्यात आली आहे.

दक्षिण मुंबईमध्ये रहिवाशी इमारतींचा पुर्नविकास व बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी माथाडी कायद्यांचा धाक दाखवून होत विकासकाकडून होत असलेल्या वसूलीच्या विषयाबाबत मंडळाकडे विकासकाकडून कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही. तसेच मंडळामध्ये संबंधित संघटनेकडून अथवा मालकाकडून मालक नोंदणी अर्ज व कामगार नोंदणी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांची तात्काळ दखल घेऊन मंडळामार्फत योजनेच्या तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येते.

अशा प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी शासन स्तरावर तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या दालनात दि.१३.०५.२०१५ रोजी झालेल्या बैठकीतील सुचनेनुसार शासनाने दि. ०६.०९.२०१६ रोजी कृती आराखडा तयार केला. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली कृती आराखडा समिती गठीत करण्यात आली आहे. ज्यामध्ये गृह विभागाचा अधिकारी देखील समाविष्ट आहे. अशा स्वरुपाच्या तक्रारी सदर कृती आराखडा समितीकडे केल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

---

लक्षवेधी सूचना क्र.१२७

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

श्री.रोहित पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १२७ पुढील प्रमाणे आहे :-

"कर्जत तालुका जिल्हा अहमदनगर येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याच्या दृष्टीने मोजे पाटेगाव व खंडाळा येथील सहाशे वीस हेक्टर क्षेत्राची सह मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन यांचे अध्यक्षतेखाली भूमी निवड समिती मार्फत दिनांक १८ डिसेंबर, २०२१ रोजी स्थळ पाहणी करण्यात आलेली असणे प्रादेशिक अधिकारी नाशिक यांनी दिनांक १५ मार्च, २०२२ च्या पत्रांवर स्थळ पाहणे अंतिम भू निवड समितीने दिलेल्या सूचनेनुसार ड्रोन सर्वे करून नकाशा नुसार क्षेत्र प्रस्तावित करणे तत्कालीन मंत्री यांच्या साप्ताहिक आढावा व विशेष आढावा बैठकीत सदर प्रस्तावास प्रकरण ६ व खंड (२) तरतुदी लागु करण्यास औद्योगिक विकास मंडळाने प्रस्तावित करणे त्या अनुषंगाने कर्जत येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यास उच्च अधिकार समितीने तत्वत: मान्यता देणे तथापी अद्यापही सदर औद्योगिक क्षेत्राची अधिसुचना विभागामार्फत पारित न होणे परिणामी महाराष्ट्र राज्यात उद्योग येण्यास इच्छुक असताना त्यांना औद्योगिक क्षेत्र उपलब्ध न होणे स्थानिक नागरिकांना रोजगार न उपलब्ध होणे परिणामी कर्जत व जामखेड तालुक्यासह जिल्हयात नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे कर्जत औद्योगिक क्षेत्राची अधिसुचना होऊन उद्योग स्थापन होणे करीता शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया".

### मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

कर्जत व जामखेड, जिल्हा अहमदनगर येथे औद्योगिक वसाहत निर्माण करणे या विषयासंदर्भात मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/०१/२०२० व दिनांक ०५/०४/२०२२ रोजी आढावा बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. दिनांक २९/०१/२०२० रोजी झालेल्या बैठकीत (१) कर्जत तालुक्यात प्राथमिक सर्वेक्षण करून औद्योगिक क्षेत्राची व्यवहार्यता तपासण्यात यावी व तसा अहवाल उच्चाधिकार समितीच्या विचारार्थ सादर करण्यात यावा (२) जामखेड तालुक्यात महसुल विभागातर्फे शासकीय जमीन मोफत उपलब्ध होत असल्यास जामखेड तालुक्यातही औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याबाबतचा विचार करण्यात यावा, असे निर्णय घेण्यात आले होते.

यानुसार मौजे पाटेगांव व खंडाळा, तालुका कर्जत येथील क्षेत्राची सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) यांच्या अध्यक्षतेखालील भुनिवड समिती ने दिनांक १८/११/२०२१ रोजी स्थळपाहणी केली होती. सदर क्षेत्राचा ड्रोन सर्वे दिनांक २४/०१/२०२२ ते २६/०१/२०२२ या कालावधीमध्ये करण्यात आला आहे.

उच्चाधिकार समितीच्या दिनांक १४/०७/२०२२ च्या १४३ व्या बैठकीत प्रस्तावित कर्जत औद्योगिक क्षेत्राकरिता अहमदनगर जिल्ह्यातील मौजे पाटेगांव येथील खाजगी क्षेत्र ३०७.०८ हे.आर व मौजे खंडाळा येथील खाजगी क्षेत्र १४४.४५ व सरकारी क्षेत्र ७.१९ हे.आर असे एकूण ४५८.७२

हे.आर क्षेत्रापैकी वनजमीनी/वन्यजीव अभयारण्य/इको सेंसिटीव क्षेत्र/बंफर क्षेत्र वगळुन तसेच संबंधित सर्व विभागाचे नाहरकत घेऊन महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या प्रकरण ६ कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करण्यास उच्चाधिकार समितीने तत्वत: मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या प्रकरण ६ कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागु करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यात म.औ.वि. महामंडळाने २९३ औद्योगिक क्षेत्र विकसित केली असुन महामंडळामार्फत विविध आकाराचे ९४,३३५ भुखंड पाडण्यात आले आहेत. सदर ९४,३३५ भुखंडापैकी ६४,२१४ औद्योगिक, ६७७७ व्यापारी व ४२५७ निवासी भुखंडाचे वाटप करण्यात आले आहेत. तसेच सदर कर्जत/जामखेड औद्योगिक क्षेत्रात गुंतवणुकदारांनी भूखंडाची मागणी केल्यास Pass Through पध्दतीने भूखंड उपलब्ध करून देण्याची तजवीज ठेवली आहे.

*********************

३०८

लक्षवेधी सूचना क्र. ८३१

महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**श्री. अमित झनक, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, श्री. सुभाष धोटे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ८३१ पुढील प्रमाणे आहे :-**

"अहमदनगर एम.आ.डी.सी. तील भूखंड क्रमांक RH-६२ निवासी जागेकरीता राखीव भुखंड लाभार्थ्याला वितरीत करण्याचे काढलेले आदेश, लाभाच्यांने सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन भूखंडाच्या किमतीचा एम.आ.डी.सी. कडे केलेला भरणा देकार पत्र देऊनही एम.आ.डी.सी. ने अचानकपणे उक्त भुखंडाऐवजी निवासासाठी योग्य नसलेला भूखंड क्र. RL १३ या भुखंडाचे केलेले वाटप, सदरचा भूखंड निवासासाठी योग्य नसल्याने भुखंड बदलून देण्यात यावा अशी वेळोवेळी आणि वारंवार प्रादेशिक कार्यालय पुणे, नाशिक तसेच मंत्रालयीन सचिव आणि मा. उद्योग मंत्री यांच्याकडे दिनांक २७ जानेवारी, २०२३ रोजी केलेली लेखी मागणी, एम.आय.डी.सी. ने पुन्हा निवासी भुखंडाचे वाटप करताना प्रतिक्षा यादीवरील लाभार्थ्यांना प्रथम भुखंड मिळणे मान्यताप्राप्त असताना त्यांना डावलून इतर लाभार्थ्यांना केलेले वाटप, परिणामी लाभार्थ्यांमध्ये एम.आ.डी.सी. विरुध्द पसरलेला असंतोष, लाभार्थ्यांने नियमानुसार भूखंडाचा वाटप केल्यास माहे फेब्रुवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात आंदोलन करण्याचा आणि आत्मदहनाचा दिलेला इशारा, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक अधिकारी, पुणे कार्यालयात दि. १९/१२/२००२ रोजी श्री. शशिकांत भास्करराव गवांदे व श्री. चंद्रकांत भास्कराव गंवादे यांनी अहमदनगर औद्योगिक क्षेत्रातील RH-६२ मधून निवासी भूखंड मिळणेबाबत अर्ज सादर केला होता. त्यानुसार प्रादेशिक अधिकारी, मऔविम, पुणे कार्यालयाने दि. ०४/०३/२००३ रोजी ४०० चौ.मी. निवासी भूखंडाचे देकार पत्र आदेश निर्गमित केले आहे. त्याअनुषंगाने अर्जदाराने इसारा रक्कम रु. ३२०००/- दि. ०८/०४/२००३ रोजी मऔवि महामंडळास जमा केलेली आहे. तद्नंतर प्रादेशिक अधिकारी, पुणे कार्यालयाने भूखंड क्र. आर एल-१३, क्षेत्र ३९० चौ.मी. चे वाटप आदेश दि. ०९/०६/२००३ अन्वये निर्गमित केलेले आहे. अर्जदाराने वाटप पत्रानुसार विहीत कालावधीत भूखंडाची उर्वरित रक्कम न भरता भुखंड बदलून मागितला होता. परंतू, भूखंड बदलून मिळत नसल्याचे पाहून अर्जदाराने दि. २८/११/२००३ च्या पत्रान्वये भूखंड क्र. RL-१३ या भूखंडाच्या खरेदीमध्ये स्वारस्य नाही. तरी भरलेली इसारा रक्कम रु. ३२,०००/- परत करण्याबाबत विनंती केली. सदर विनंतीनुसार प्रादेशिक अधिकारी, मऔविम, पुणे यांनी इसारा रक्कम रु. २६,६९४/- परत करणेबाबत परतावा आदेश दि. ०७/०१/२००४ रोजी निर्गमित केला.

अर्जदारास प्रादेशिक अधिकारी, पुणे कार्यालयाने मऔवि महामंडळाच्या लेखा व वित्त विभागास इसारा रक्कम मिळाल्याची खातरजमा केली असता, सदरची इसारा रक्कम अर्जदारास मिळाली नसल्यामुळे पुन:श्च परतावा आदेश दि. ०४/०८/२०१२ रोजी निर्गमित केला. म्हणजेच भूखंडाचे वाटप पत्र रद्द करण्याची कार्यवाही प्रादेशिक अधिकारी, मऔविम, पुणे यांनी पूर्ण केली आहे. त्यानुसार मऔवि महामंडळाच्या लेखा व वित्त विभागाकडून अर्जदारास दि. १३/०९/२०१२ च्या पत्रान्वये इसारा रक्कम रु. २६,६९४/- चा धनादेश दि. ११/०९/२०१२ रोजी सिंडीकेट बँक चिंचवड, पुणे-१९ अन्वये पाठविण्यात आला. परंतू, अर्जदाराकडून सदरचा धनादेश Refused असा शेरा मारुन परत आला आहे.

तद्नंतर अर्जदाराने दि. १२/११/२०१२ रोजी भूखंड क्र. RL-५३ मिळणेबाबत मागणी केली आहे. त्याअनुषंगाने अर्जदाराने इसारा रक्कम न स्वीकारता पुन:श्च भूखंड वाटपाची विनंती जरी केली असली तरी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे सन- २०१३ मध्ये जनहित याचिका क्रमांक PIL ६८/२०१३ दाखल झाली होती व त्याचा निकाल माहे जून २०१६ मध्ये लागला आहे. त्यामुळे अर्जदाराच्या भूखंड क्र. RL-५३ च्या मागणीबाबत त्या दरम्यान कार्यवाही करण्यात आली नाही.

दि. ०७/०१/२०१६ मध्ये मऔवि महामंडळाने सर्वच औद्योगिक क्षेत्रामध्ये व्यापारी व निवासी भूखंडाचे वाटप निविदा पध्दतीने करण्याचे धोरण निश्चित केले. परिणामी, सदर अर्जदारास भूखंडाचे वाटप सरळ पध्दतीने करता आले नाही. तसेच सद्य:स्थितीत अहमदनगर औद्योगिक क्षेत्रात निवासी भूखंडाचे निविदा पध्दतीने वाटप करण्याची तरतूद आहे.

**********************

३०८

लक्षवेधी सूचना क्र. २०१०

महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्रीमती. सीमा हिरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २०१० पुढील प्रमाणे आहे :-

"राज्यात नाशिकच्या उद्योजकाकडून मागील दोन वर्षापासून वसूल करण्यात येत असलेल्या दुहेरी फायर सेस तात्काळ बंद करण्याचे निर्देश मा. उद्योग मंत्री महोदयांनी माहे डिसेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास देणे, नाशिक जिल्ह्यातील उद्योग क्षेत्राला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर मा. उद्योग मंत्री महोदयांकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बैठक होऊन विविध समस्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन उद्योग मंत्री महोदयांनी देऊन दोन महिन्याचा कालावधी होऊन गेला तरी या बैठकीत दिलेल्या आश्वासनाची प्रशासनाने अद्याप पर्यंत अंमलबजावणी न केल्याने नाशिक येथील उद्योजक आर्थिक अडचणीत येत असणे, अंबडचे फायर स्टेशन महापालिकेकडे हस्तांतरित करणे आठवड्याभरात पोलीस स्टेशन सुरू करणे, पावर प्रोजेक्ट वगळता इतर जमीन परत घेण्यासाठी कायदेशीर बाबी तपासण्याचे निर्देश देणे, बंद जकात नाक्याजवळ औद्योगिक वसाहतीत सीईटीपी प्रकल्प उभारणे, सोलार धोरण कायम ठेवावे, चांगल्या वीज पुरवठ्यासाठी महावितरण सुविधा द्याव्यात, सातपूर अंबड मध्ये ड्रेनेजसाठी अमृत दोन योजनेतून पालिकेने प्रस्ताव द्यावा, वर्गणीला पायबंध घालणारे निर्भया धोरण राबविण्यात यावे, आधी मागण्यांचा वापर झालेला असणे, त्याचबरोबर मा. उद्योग मंत्री महोदया बरोबर झालेल्या बैठकीत इतर मागण्यांच्या ही तात्काळ मंजूर करून उद्योजकांना दुहेरी फायर सेस पासून मुक्ती देण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अंबड औद्योगिक क्षेत्रात जून-२०१९ पासून अग्निशमन केंद्र कार्यान्वित आहे. अंबड औद्योगिक क्षेत्र नाशिक महानगरपालिका हद्दीत येत असल्याने उद्योजकास महानगरपालिकेकडून ही अग्निशमन कर लावण्यात येतो. सदर एकाच सेवेसाठी दूहेरी शुल्क न आकारण्यासाठी दि. ०७/१२/२०२२ रोजी बैठक मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत अग्निशमन केंद्र नाशिक महानगरपालिकेस हस्तांतरीत करावे व हस्तांतरानंतर मऔवि महामंडळाने फायर सेस लावू नये, असा निर्णय सदर बैठकीत घेण्यात आला. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अंबड येथील अग्निशमन केंद्र नाशिक महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याची कार्यवाही मऔवि महामंडळाच्या स्तरावर सुरु असून आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना सदर केंद्र हस्तांतरीत करण्याबाबतचे संमतीपत्र देण्यासाठी दि. ०९/०३/२०२३ च्या पत्रान्वये मऔवि महामंडळामार्फत विनंती करण्यात आलेली आहे. नाशिक महानगरपालिकेची संमती प्राप्त होताच मऔवि महामंडळाच्या संचालक मंडळाची मंजूरी प्राप्त करुन अग्निशमन केंद्र हस्तांतरीत करण्यात येईल.

अंबड व सातपूर पोलीस स्टेशनचे विभाजन करुन नविन एमआयडीसी पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत पोलीस आयुक्त, नाशिक तसेच लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने अंबड औद्योगिक क्षेत्रात पोलीस स्टेशन करीता मऔवि महामंडळाचा भूखंड क्र. पी-२२, क्षेत्रफळ ८३२२ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड वाटप करण्यात आलेला आहे.

अतिरिक्त सिन्नर (विशेष आर्थिक क्षेत्र) औद्योगिक क्षेत्रामधील मे. इंडिया बुल्स कंपनीला १०४७.०० हे.आर क्षेत्र वाटप करण्यात आलेले आहे. त्यापैकी ५७८.४२ हे.आर क्षेत्र प्रोसेसिंग झोन व ४३३.०५ हे.आर क्षेत्र नॉनप्रोसेसिंग झोनसाठी आहे. मे. इंडिया बुल्स यांच्याकडून प्रोसेसिंग झाल्यावर औष्णिक विद्युत केंद्र उभारण्यात आले असून, त्याचा विकास पूर्णपणे होवूनही सदर प्रकल्प बंद अवस्थेत आहे. प्रोसेसिंग झोनमध्ये मे. इंडिया बुल्स यांनी ४.४० कि.मी. लांबीचे रस्ते बांधलेले आहेत. मात्र, इतर कोणत्याही पायाभूत सुविधा कंपनीने दिलेले नाहीत. सदर प्रोसेसिंग झोनमध्ये ५ भूखंड वाटप झालेले असून मे. इंडिया बुल्स कंपनीने कोणताही विकास केलेला नाही. विहीत कालावधीत सदर क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा न दिल्यामुळे व पुर्णत: विकास न केल्यामुळे सदर जमिन मऔवि महामंडळाकडून परत घेण्याची कार्यवाही सुरु असून प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक यांच्यामार्फत दि. २१/०२/२०२२ रोजी नोटीस देण्यात आलेली आहे.

राज्याचे अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण- २०२०, दि. ३१/१२/२०२० च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले असून, सदर धोरणांतर्गत पारेषण संलग्न सौर ऊर्जा निर्मितीचे एकूण १२९३० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामध्ये १०,००० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प व २००० मेगावॅट क्षमतेचे रुफटोप सोलर प्रकल्पांचा समावेश आहे. या धोरणातंर्गत सौर ऊर्जा निर्मितीचे प्रकल्प राज्यातील वीज वितरण/ निर्मिती कंपन्या खाजगी विकासक स्थानिक/ नागरीक स्वराज्य संस्था, शासकीय संस्था, भागीदारी संस्था, खाजगी व्यक्ती, निमशासकीय संस्था, सहकारी संस्था, शेतकऱ्यांचे गट हे या धोरणानुसार प्रकल्प आस्थापित करण्यास अनुज्ञेय आहेत. अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण २०२० ची अंमलबजावणी सन-२०२७ पर्यंत करण्यात येणार आहे.

अंबड औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांना महावितरणच्या तीन ३३/११ केव्ही उपकेंद्राद्वारे (स्थापित क्षमता ६५ एमव्हीए व महापारेषणच्या १३२/३३/११ केव्ही (स्थापित क्षमता २०० एमव्हीए) अतिउच्चदाब उपकेंद्राद्वारे वीजपुरवठा करण्यात येतो. तसेच सातपूर औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांना महावितरणच्या दोन ३३/११ केव्ही उपकेंद्राद्वारे (स्थापित क्षमता ५० एमव्हीए) व महापारेषणच्या १३२/३३/११ केव्ही (स्थापित क्षमता १५० एमव्हीए) अतिउच्चदाब उपकेंद्राद्वारे वीजपुरवठा करण्यात येतो. नाशिक जिल्हयातील उद्योजकांना महावितरणकडून मागणीनुसार वीजपुरवठा करण्यात येतो. सद्यस्थितीत स्थापित क्षमतेच्या तुलनेत अधिकत्तम मागणी कमी असल्यामुळे औद्योगिक वीज ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यास तांत्रिक अडचण निर्माण होत नाही. सदर औद्योगिक वसाहतीमधील अस्तित्वात असलेल्या ग्राहकांची व भविष्यातील येणाऱ्या उद्योजकांची मागणी लक्षात घेऊन तसेच औद्योगिक ग्राहकांना अधिक दर्जेदार वीजपुरवठा करण्याच्या दृष्टिने सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) खालील कामे अंतर्भूत आहेत.

१) नवीन उपकेंद्र, अंबड (३३/११ केव्ही, २x५ एमव्हीए).

२) ३३/११ केव्ही अंबड -३ उपकेंद्रातील २ पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढ (५ एमव्हीए ते १० एमव्हीए क्षमतावाढ).

३) नवीन स्विचिंग स्टेशन अंबड २.

४) ३३/११ केकी पोल फैक्टरी उपकेंद्र येथे ५ एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर.

सदर कामांना सन २०२३-२४ मध्ये केंद्र शासनाची मान्यता मिळणे अपेक्षित आहे. केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन सदर कामे प्राधान्याने हाती घेण्यात येतील. महावितरणतर्फे देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितपणे करण्यात येतात व सदर कामे करण्याकरीता महावितरणतर्फे स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात येते.

सदर बाबतीत नाशिक महानगरपालिकेकडून डीपीआर तयार करण्याची कार्यवाही चालू असून त्यासाठी आवश्यक माहिती म.औ.वि. महामंडळाकडून महानगरपालिकेस दि. २३/०६/२०२२ रोजी देण्यात आलेली आहे.

अंबड औद्योगिक क्षेत्रात सीईटीपी प्रकल्पासाठी भुखंड क्र. पी - ३० क्षेत्रफळ ८९०० चौमी नाममात्र दराने मऔवि महामंडळाकडून नाशिक सीईटीपी फाऊंडेशनला वाटप करण्यात आला आहे. सदर प्रकल्प हा सातपूर व अंबड औद्योगिक क्षेत्रातील धातू प्रक्रिया उद्योगामधून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रियेसाठी आहे. सदर प्रकल्पाची किंमत साधारण रु. २०.०० कोटी व सांडपाणी प्रक्रियेचा खर्च रु. ७३५.०० प्रति घमी इतका जास्त असल्यामुळे सदर प्रकल्पाची किंमत लघू उद्योजकांना परवडणारी नसल्याने प्रकल्पाच्या किंमतीत घट करण्यासाठी व प्रकल्प सुसाध्य होणेसाठी सदर सीईटीपीचे प्रक्रिया केलेले सांडपाणी नाशिक महानगरपालिकेच्या ड्रेनेज लाईन मधून ७० एम.एल.डी. एस.टी.पी. मध्ये टाकल्यास प्रकल्पाची किंमत कमी होवून प्रकल्प लघु उद्योजकास परवडणारा होईल. त्यासाठी मऔवि महामंडळाकडून नाशिक महानगरपालिकेस सदर परवानगीबाबत विनंती करण्यात आली. त्याअनुषंगाने नाशिक महानगरपालिकेने नीरी या संस्थेचा अहवाल प्राप्त करण्याबाबत मऔवि महामंडळास कळविलेले आहे. मे. नीरी, नागपूर यांनी दि. २९/१२/२०२२ रोजी अनुकूल अहवाल दिलेला असून तो नाशिक महानगरपालिकेस देण्यात आलेला आहे. सदर बाबतीत नाशिक महानगरपालिकेने काही तांत्रिक मुद्दे उपस्थित केलेले असून त्या बाबतीत दि. १७/०२/२०२३ रोजी नाशिक महानगरपालिका, म. औ. वि. महामंडळ व निरी यांची बैठक झाली असून त्यामध्ये मे. निरी यांनी नाशिक महानगरपालिकेच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्र (STP) बाबत काही माहिती मागविण्यात आली असून, सदर माहिती मे. निरी यांना देऊन निरी च्या अंतिम अहवालानंतर नाशिक महानगरपालिकेचे संमती पत्र प्राप्त होताच सीईटीपी प्रकल्प राबविणेसाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कार्यान्वित करण्यात येईल.

तसेच या संदर्भात दि.१४/०३/२०२३ रोजी मा. मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली असून सदर प्रकरणी तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**********************

लक्षवेधी सूचना क्र. २२८५

महाराष्ट्र विधानसभा

सन- २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

डॉ. बालाजी किणीकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २२८५ पुढील प्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने मौजे – सावली, तालुका जिल्हा ठाणे येथील भूखंड क्र. २२, २३ व २४ महसूल सर्वे नंबर ३५ ते ४६, ५७ ते ६४, ७३, ७७, ११० ते ११३ व १२० ते १२९ या ९५ एकर ०२ गुंठे जमिनीचे दि. ०६/०६/१९६६ रोजी भूसंपादन करणे, संरक्षित कुळ यांना जाणीव पूर्वक डावलून कै. नागीनचंद शहा यांचा मालकी हक्क दाखवत कायद्यामध्ये तरतूद नसताना जमीन संपादनाच्या बदल्यात त्यांना भूखंड प्राप्त करून दिला जाणे, यामुळे मुळ जमीन मालक असलेल्या संरक्षित कुळाला मोबदला मिळल्या पासून वंचित राहावे लागणे, कुळाच्या संदर्भात जिल्हाधिकारी, ठाणे यांचे दि. १०/०८/१९९६ च्या पत्राकडे तसेच मा. उच्च न्यायालयातील WRIT क्र.WP ९५३६/२०१८ या WRIT मुळे निर्माण झालेल्या न्याय प्रवाष्ठातेकडे महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाणे, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ कुळांच्या संदर्भात सक्षम प्राधिकरण नसतानाही, सदर प्रश्न महसूल विभागाकडे प्रलंबित असताना परस्पर निर्णय घेतले जाणे, तसेच सदर भूखंडासंदर्भात ULC प्रक्रिया पूर्ण करणेकरिता महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ यांनी नगरविकास यांचा अहवाल न घेता परस्पर निर्णय घेतला जाणे, यामुळे १००% प्रिमियम आकारण्याचा शासनाचा दि.२३/११/२००७ रोजीचा शासन निर्णयाचे उल्लंघन होणे, या सर्व बाबींलक्षात घेता तत्कालीन उद्योग मंत्री यांनी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने केलेल्या भु संपादनास व हस्तांतरणास दि.०५/०३/२०१८ रोजी स्थगिती देऊन सखोल चौकशी करण्याचे आदेश देणे, वरील सर्व वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करत त्याच बरोबर कै. नागीनचंद शहा हे दोषी असल्याचा संबधित चौकशीतून आलेल्या अहवालाकडे दुर्लक्ष केले जाणे, तत्कालीन उद्योग मंत्री यांनी कै. नागीनचंद शहा यांच्या वारसांच्या क्षतीपूर्ती व बंधपत्र घेण्याच्या अटीवर त्यांनीच दिलेली स्थगिती चे आदेश रद्द करणे, सदर भूखंडाचे संपादन करणे व सदर भूखंडाच्या बदल्यात कै. नागीनचंद शहा यांच्या वारसांना अतिरिक्त भूखंड देणे व त्यावर विकासकामाची परवानगी / नाहरकतची कार्यवाही करणे, तत्कालीन उद्योग मंत्री यांनी सदर स्थगिती उठवल्याने संरक्षित कुळ यांच्यावर अन्याय करत दोषींना पाठीशी घातले जात असल्याने त्यांनी केलेल्या कार्यवाहीमुळे शासनाचा महसूल बुडलेला असणे, यामुळे सदर प्रकरणी चौकशी होऊन कार्यवाही होण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया व कार्यवाही."

मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

मौजे सावली तालुका जिल्हा ठाणे येथील सर्व्हे नंबर ३५ ते ४६, ५७ ते ६४, ७३, ७७, ११० ते ११३ व १२० ते १२९ या जमिनीसंदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार प्रकरण ६ ची अधिसूचना दि. २६/१०/१९६२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. तद्नंतर कलम ३२ (२) ची अधिसूचना आणि कलम ३२ (१) ची अंतिम अधिसूचना दि. ३०/०६/१९६४ रोजी प्रसिद्ध झाल्यानंतर संपादित जमिनीचा ताबा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास प्राप्त झाला आहे. सदर जमिन संपादनावेळी श्री. नगिनदास शाह व इतर यांची नावे ७/१२ चे कब्जेदार सदरी दाखल होती.

तसेच मौजे-सावली, तालुका जिल्हा ठाणे येथील सर्व्हे नंबर ३५ ते ४६, ५७ ते ६४, ७३ ७७, ११० ते ११३, १२० ते १२९ या जमिनीस कुळे होती. अपर तहसिलदार, ठाणे यांनी कुळ कायदा कलम ७० ब प्रमाणे दावे लावून दि. २२/०२/१९६६ रोजी कुळांविरुध्द झालेल्या निर्णयाविरुध्द कुळांनी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांनी अपर तहसिलदार, ठाणे यांचे यासनासमोर दाखल केलेल्या अपिलामध्ये तत्कालीन उपजिल्हाधिकारी ठाणे यांनी अपर तहसिलदार, यांचे दि. २२/०२/१९६६ रोजीचे आदेश रद्द करुन कुळ कायदा कलम ३२ (ग) प्रमाणे जमिनीची किंमत कळविणेबाबत दि. २६/१०/१९६७ रोजी आदेश पारित करणेत आले होते. तद्नंतर जमिन मालक श्री. नगीनदास यांनी सदर आदेशाविरुध्द महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांचे न्यायासनाकडे दाखल केलेल्या अपिलामध्ये श्री.नगीनदास शाह यांचे अपिल फेटाळण्यात येऊन कुळांचे बाजुने आदेश दि. १५/११/१९६८ पारीत केलेले होते. त्याप्रमाणे तत्कालीन अपर तहसिलदार ठाणे यांनी सदर जमिनीच्या कुळ कायदा मधील कलम ३२(ग) प्रमाणे जमिनीची किंमत निश्चित करणेबाबतचे आदेश दि. ३०/०६/१९८३ रोजी पारित केलेले आहेत. तत्कालीन अपर तहसिलदार, ठाणे यांनी कुळ कायदा कलम ३२(ग) प्रमाणे निश्चित केलेली जमिनीची किंमत कुळांनी जमिनीचे मुळ मालकांना अदा केली होती व ती जमिन मालकांनी स्विकारलेली होती.

विशेष भूसंपादन अधिकारी, ठाणे यांनी मौजे सावली, ता. जि. ठाणे येथील सर्व्हे नंबर ३५ ते ४६, ५७ ते ६४, ७३, ७७, ११० ते ११३ व १२० ते १२९ या संपादित जमिनीची सुमारे ८०% नुकसान भरपाईची रक्कम कुळांना वाटप केली असून उर्वरीत २०% नुकसान भरपाईची रक्कम मिळण्यासाठी संबंधित कुळांनी विशेष भूसंपादन अधिकारी ठाणे विनंती अर्ज केलेले होते.

दरम्यानच्या काळात मूळ जमिनमालक श्री. नगिनदास शाह यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून जमिनीची नुकसान भरपाईची रक्कम रु. १,१२,०२८/- चे ऐवजी मऔवि महामंडळासोबत करार करुन वेगवेगळे भूखंड मंजूर करुन घेतलेले आहेत. जमिन मालक श्री. नगीनदास शहा यांनी कुळांनी कलम ३२(ग) प्रमाणे भरलेली रक्कम स्विकारली होती. परंतु तद्नंतर भूसंपादन अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे श्री. नगिनदास शाह यांनी स्विकारलेली जमिनीची खरेदीची रक्कम जमा केलेली आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांचे निर्णयाप्रमाणे सदर जमिनीतील कुळे दि. ०१/०४/१९५७ रोजी जमिनीचे मालक झालेले असल्यामुळे नुकसान भरपाईची उर्वरित २०% रक्कम कुळांना अदा करणेपूर्वी श्री. नगिनदास शाह यांना यापूर्वी जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी तीन खंडाच्या रक्कमेची महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून वसुली होणे किंवा सदरचे भूखंड श्री. नगीनदास शाह यांच्याकडून काढून घेणे आवश्यक आहे, असा अहवाल जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि. १९/०८/१९९६ च्या अ.शा. पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे.

श्री. नगिनदास शाह व त्यांचे कुटुंबीय यांचेकडून भूखंडाची प्रिमियम रक्कम, भूखंडाचा विकास खर्च वसूल करुन खालील भूखंड ९९ वर्षांच्या लीज करारावर मऔवि महामंडळाकडून वाटप करण्यात आले आहेत.

| भूखंड क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. | अंतिम करारनामा दिनांक | भूखंडधारकाचे नांव |
|---|---|---|---|
| २२ | १७३६१० | २३/५/१९६७ | श्री. नगिनदास शाह |
| २३ | ६४५१८ | २३/०५/१९६७ | श्रीमती. जयलक्ष्मी नगिनदास शाह |
| २३ पैकी | ३१६४१ | | श्रीमती. जयलक्ष्मी नगिनदास शाह |
| २४ | ८७२३२ | २३/०५/१९६७ | श्रीमती. रसिकबाई नगिनदास शाह |
| २४ पैकी | ८३२१ | ०७/०३/१९६८ | श्रीमती. रसिकबाई नगिनदास शाह |

मऔवि महामंडळाने त्यांचेसोबत केलेल्या विशेष करारनाम्यामध्ये भूखंड विकासाचा कालावधी नमूद केलेला नाही व हस्तांतरणाची पूर्ण मुभा भूखंडधारकास दिलेली आहे. त्याबाबतचा प्रकरणी भूखंडनिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे.

<u>भूखंड क्र.२२</u>

महापे औद्योगिक (टी.टी.सी.) क्षेत्रातील भूखंड क्रमांक २२ क्षेत्रफळ १७३६१० चौ.मी. चे वाटप श्री. नगीनदास शाह यांना करणेत आलेले असुन भुखंडाचा अंतिम करारनामा दि. २३/५/१९६७ रोजी कार्यान्वित करुन दि. २७/९/१९६८ रोजी ताबा देण्यात आलेला आहे. भूखंडधारकाने दि. २२/१२/१९७४ रोजी इमारत पूर्णत्वाचा दाखला घेतलेला आहे. तद्नंतर सदर भूखंडाचे खालीलप्रमाणे हस्तांतर झालेले आहे.

१. पहिले हस्तांतर श्री. नगीनदास शाह यांचेकडून दि. १०/१२/१९७३ रोजी मे. भारत पलव्हराईझिंग मिल्स प्रा. लि. यांचे नावे झाले आहे.
२. मे. भारत पलव्हराईझिंग मिल्स प्रा. लि. यांचेकडे भूखंड क्र. २२ चे विभाजन करुन भूखंड क्रमांक २२/१ क्षेत्र ७३६०० चौ.मी. हे मे.ई.आय.डी. पॅरी इंडीया लि. यांचे नावे तसेच भूखंड क्र. २२/२ क्षेत्र १०००१० चौ.मी. मे. पॅरी केमिकल्स लि. यांचे नावे दि. ७/१२/१९९५ रोजी झाले आहे.
३. मे. ई.आय.डी. पॅरी इंडीया लि., भूखंड क्र. २२/१ चे कंपनीच्या नावात मे. कोरोमंडल फर्टीलायझर्स लि. असा बदल होवुन महामंडळाने पत्र दि. २८/११/२००३ अन्वये सदर बदलाची नोंद घेतली आहे.
४. मे. कोरोमंडल फर्टीलायझर्स लि. भूखंड क्र. २२/१ चे कंपनीच्या नावात मे. कोरोमंडल इंटरनॅशनल लि. असा बदल होवुन महामंडळाने पत्र दिनांक ३/१०/२०१३ अन्वये सदर बदलाची नोंद घेतली आहे.

<u>भूखंड क्र. २३, २३ पैकी व २४, २४ पैकी</u>

महापे औद्योगिक (टी.टी.सी.) क्षेत्रातील भूखंड क्रमांक २३ क्षेत्रफळ ६४५१८चौ.मी. व भूखंड क्रमांक २३ पैकी क्षेत्रफळ ३१६४१ चौ.मी. चे वाटप श्रीमती जयलक्ष्मी नगिनदास शाह यांना करणेत आलेले होते. भुखंडाचा अंतिमकरारनामा दि. २३/५/१९६७ रोजी कार्यान्वित करणेत आलेला आहेत. तसेच भूखंड क्रमांक २४ क्षेत्रफळ ८७२३२ चौ.मी. व भूखंड क्रमांक २४ पैकी क्षेत्रफळ ८३२१ चौ.मी. चे वाटप श्रीमती रसिकबाई नगीनदास शाह यांना करणेत आलेले होते. भुखंडाचा अंतिम करारनामा कार्यान्वित करणेत आलेला आहेत.

मऔवि महामंडळाच्या दि. १२/०३/२०१० च्या पत्रानुसार सदरचे भूखंड क्र. २३, २४ आणि २४ पैकी M/s.Industrial Minerals & Chemical Co. Pvt. Ltd. यांचे नांवे हस्तांतर करण्यात आले आहे. भूखंड क्र. २३ पैकी क्षेत्र ३१६४१ चौ.मी. चा अंतिम करारनामा दि. १३/०४/२०१० रोजी M/s.Industrial Minerals & Chemical Co. Pvt. Ltd. यांचे नांवे कार्यान्वित करण्यात आला. सदर भूखंडाचा औद्योगिक वरुन IT Activity करीता वापर करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

सदर कंपनीचे भागधारकांमध्ये बदल झाल्याने भूखंडधारक M/s.Industrial Minerals & Chemical Co. Pvt. Ltd. यांनी मऔवि महामंडळास दि. ३१/०३/२०१७ रोजी पत्रानूसार, भागधारक बदलाची नोंद घेण्याची विनंती केली आहे. त्यानुसार सनदी लेखापाल M/s. A.C. Dhame & Co. यांचेकडील दि. ३१/०३/२०१७ च्या प्रमाणपत्रानुसार कंपनीचे संपूर्ण भागधारक आणि भागभांडवलामध्ये बदल होऊन सदरचे भागभांडवल Tata Reality and Infrastructure Limited

आणि Standard Chartered Real Estate Investment (Singapore) VII Pvt. Ltd. या भागधारकांना दिले आहेत.

श्री. गंगाराम गौरोजी पाटील व इतर ६ यांनी सदर भूखंडासाठी संपादित जमिनीच्या संदर्भात मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर ठाणे यांचे मा. न्यायालयात दावा क्र. १७१२/२०१२ दाखल केला आहे. सदर दाव्याबाबत मऔवि महामंडळाने त्यांचे मा. न्यायालयात म्हणणे सादर केले असून सदरचा दावा सुनावणी तथा निर्णयास्तव प्रलंबित आहे.

त्याचबरोबर श्री. विकास परशुराम पाटील यांनी मऔवि महामंडळाने मौजे सावली येथील सर्व्हे नं. ११३/१, ११३/२ व ११३/३ मध्ये आरेखीत केलेल्या भूखंड क्र. २३ आणि २४ बाबत मा. दिवाणी न्यायालय, वाशी येथे दावा क्र. १४२/२०१५ तसेच सर्व्हे नं. ४१/१, ७७/२, ११२/२ बाबत दिवाणी न्यायालय, वाशी येथे दावा क्र. ११८/२०१५ दाखल केला असून, सदर दावे प्रलंबित आहेत.

तथापि, सदर दाव्यांमध्ये स्थगिती आदेश नसल्याने किंवा कुठल्याही दावे दाखल असण्याच्या कारणपरत्वे कार्यवाही थांबविण्याची आवश्यकता नसल्याने प्रचलित धोरणानुसार फरकाची रक्कम आकारुन हस्तांतरणास परवानगीबाबत मऔवि महामंडळाने त्यांच्या विधी विभागाने अभिप्रायांनुसार निर्णय घेतला आहे. तसेच नगर विकास विभागाचे शासन निर्णय दि. २३/११/२००७ नुसार सदरहू जमिनीस कलम २० खाली युएलसी बाबत सवलत देण्यात आलेली नाही. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णय सदर प्रकरणी लागू होत नाही. त्यामुळे भूखंड हस्तांतरण प्रकरणात युएलसी अधिमुल्याची रक्कम वसूल न करता M/s. Industrial Minerals & Chemical Co. Pvt. Ltd. यांच्या कंपनीतील भागधारकांमध्ये झालेल्या बदलाची मऔवि महामंडळाकडून पत्र दि. २१/१२/२०१७ नुसार रु. १२०,३२,५५,८००/- इतक्या फरकाच्या रकमेचा भरणा केल्यावर नोंद घेण्यात आली आहे. तथापि शासनाच्या दि. ०७/०३/२०१८ आणि दि. १०/१०/२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आल्यानुसार उक्त भूखंडाच्या हस्तांतरणाबाबत पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देऊन प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून मऔवि महामंडळामार्फत नियुक्त करण्यात आली होती.

सह मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांनी सादर केलेल्या दि. १२/०३/२०१९ रोजीच्या चौकशी अहवालास अनुसार "महापे औद्योगिक क्षेत्रातील (टीटीसी) भूखंड क्र. २२, २३ व २४ च्या हस्तांतरणासंदर्भात देण्यात आलेले स्थगन आदेश रद्द करण्यात येत आहेत. त्यामुळे मऔवि महामंडळाच्या प्रचलित नियमाच्या आधारे हस्तांतरणाबाबतची कार्यवाही करावी. हस्तांतरीत कंपनीकडून कुळांच्या हक्कासंदर्भात स्टॅम्प पेपरवर Indemnity Bond लिहून घेण्यात यावा. तद्नंतर हस्तांतरण प्रक्रिया करण्यात यावी," असे दि. ३०/०५/२०१९ च्या शासन पत्रान्वये मऔवि महामंडळास कळविण्यात आले आहे. त्यानुसार भूखंडधारक यांनी दि. २४/०६/२०१९ रोजी नोटरी केलेला Undertaking-cum- Indemnity Bond मऔवि महामंडळास सादर केला आहे. सदरच्या भूखंडाचे हस्तांतरण महामंडळाच्या धोरणानुसार नियमोचित शुल्क वसूल करुन करण्यात आलेले आहे.

**************************

२९१



लक्षवेधी सूचना क्र.२३७५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

श्री. समाधान अवताडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २३७५ पुढील प्रमाणे आहे :-

"श्री. नितीन गवळी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक तथा उपजिल्हाधिकारी या पदावर दिनांक २२/०१/२०२० पासून प्रतिनियुक्तीने कार्यरत असणे, श्री. नितीन गवळी, यांची त्यानुसार शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन आदेश क्र. आयडीसी-२०२०/प्र.क्र. ४३ / उद्योग-१४ दिनांक २३/०१/२०२० अन्वये श्री. नितीन गवळी यांची प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक या पदावर प्रथमत: १ वर्षासाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली असणे, सदर नियुक्ती दिनांक २१/०१/२०२१ रोजी संपुष्ठात आली असणे, परंतु करोना महामारीच्या पार्श्वभुमीवर औद्योगिक विकासांची कामे सुयोग्यरित्या होण्यासाठी श्री. गवळी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ नाशिक यांच्या सेवांची शासनास आवश्यकता असल्याने त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीत तत्कालीन शासनाने दिनांक २२/०१/२०२१ पासून पुढील १ वर्षाकरीता म्हणजेच दिनांक २१/०१/२०२२ पर्यंत तसेच शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील शासन आदेश क्र. आयडीसी- २०२०/प्र. क्र. ४३ / उद्योग-१४ दिनांक ०९/०३/२०२२ च्या शासन आदेशान्वये श्री नितीन गवळी यांच्या प्रतिनियुक्तीस दिनांक २३/०१/२०२२ पासून पुढील दोन वर्ष म्हणजेच दिनांक २२/०१/२०२४ पर्यंत अथवा पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिलेली असल्याचे संदर्भिय आदेशात नमुद असणे,उपरोक्त प्रमाणे श्री. नितीन गवळी, उपजिल्हाधिकारी यांचे नियुक्ती बाबत उद्योग. ऊर्जा व कामगार विभागाने आदेश निर्गमित केले असणे, परंतु सदर मुदतवाढीस महसुल व वन विभागाची मान्यता घेण्यात आलेली नसणे, उद्योग व्यवसायात वाढ होण्याकरता सदर अधिकारी असताना प्रत्यक्षात मात्र मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैव्यवहार करून उद्योजकांना त्रास देत असल्याच्या तक्रारी प्राप्त होणे,यामुळे सदर उद्योजकांमध्ये शासनाबद्दल असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, याकरता शासनाने श्री नितीन गवळी, उपजिल्हाधिकारी यांची चुकीच्या पद्धतीने झालेली प्रतिनियुक्ती त्वरित रद्द करून करावयाची कारवाई...."

## मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

महसूल व वन विभाग, शासन आदेश दिनांक २०/०१/२०२० अन्वये श्री. नितिन गवळी, उपजिल्हाधिकारी यांची प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या सेवा उद्योग विभागास वर्ग करण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरून उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन आदेश दिनांक २३/०१/२०२० अन्वये श्री. नितिन गवळी, उपजिल्हाधिकारी यांची प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक या पदावर एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. श्री.नितिन गवळी, उपजिल्हाधिकारी यांनी दिनांक ०३/०३/२०२० रोजी प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक या पदाचा कार्यभार स्विकारला आहे.

तदनंतर श्री. नितिन गवळी, उपजिल्हाधिकारी यांचा मऔवि महांडळातील प्रतिनियुक्ती कालावधी दिनांक २१/०१/२०२१ रोजी संपुष्टात आल्याने मऔवि महामंडळाने केलेल्या शिफारशीस अनुसरून उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन आदेश दिनांक २९/०६/२०२१ अन्वये कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर औद्योगिक विकासाची कामे सुयोग्यरित्या होण्यासाठी दिनांक २२/०१/२०२१ पासून पुढील १ वर्षाकरीता त्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली होती.

तदनंतर मऔवि महामंडळाने दि.१८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये श्री. नितिन गवळी, उपजिल्हाधिकारी यांच्या सेवेची महामंडळास आवश्यकता असल्याने श्री.गवळी यांच्या प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक या पदावरील प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरून उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन आदेश दिनांक ०९/०३/२०२२ अन्वये श्री. नितिन गवळी, उपजिल्हाधिकारी यांच्या प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक या पदावरील प्रतिनियुक्तीस दिनांक २३/०१/२०२२ पासुन पुढील दोन वर्ष म्हणजेच दिनांक २२/०१/२०२४ पर्यंत अथवा पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन आदेश दिनांक ०८/०९/२०२२ अन्वये श्री. नितिन गवळी, उपजिल्हाधिकारी यांना प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक या पदावरून प्रशासकीय कारणास्तव दिनांक ०८/०९/२०२२ (म.नं.) पासून कार्यमुक्त करून त्यांच्या सेवा मूळ महसूल विभागाकडे प्रत्यावर्तित करण्यात आलेल्या होत्या.

तथापि सदर शासन आदेशाविरुध्द श्री. नितिन गवळी, उपजिल्हाधिकारी यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेला मूळ अर्ज क्र. ९१२/२०२२ मध्ये मा. न्यायाधिकरणाने दिनांक १४/०९/२०२२ रोजीच्या निकालाद्वारे दिनांक ०८/०९/२०२२ रोजीचे शासन आदेश रद्द केले होते.

तदनंतर श्री. नितिन गवळी, उपजिल्हाधिकारी यांनी मा. न्यायाधिकरणात व्यक्तिःश उपस्थित राहुन सदर मूळ अर्ज क्र. ९१२/२०२२ मागे घेत असल्याबाबतचे लेखी निवेदन मा. न्यायाधिकरणास सादर केल्याने, मा. न्यायाधिकरणाने दिनांक २९/०९/२०२२ रोजीच्या आदेशान्वये सदर याचिका खारीज (Disposed (off) केली आहे.

महसूल व वन विभाग, शासन आदेश दिनांक ३०/०९/२०२२ अन्वये श्री. नितिन गवळी, उपजिल्हाधिकारी यांच्या प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक या पदावरील प्रतिनियुक्तीस सन २०२३-२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महसूल विभागाच्या शासन निर्णयास अनुसरून उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन आदेश दिनांक १०/११/२०२२ अन्वये श्री. नितिन गवळी, उपजिल्हाधिकारी यांच्या प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक या पदावरील प्रतिनियुक्तीस दिनांक २२/०१/२०२४ पर्यंत किंवा पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ कायम ठेवण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

*************

लक्षवेधी सूचना क्र.२४

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

ॲड. आशिष शेलार, ॲड .पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. योगेश सागर, श्री. किसन कथोरे, श्री. प्रशांत ठाकूर, श्री. कुमार आयलानी, डॉ. बालाजी किणीकर , श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, ॲड . यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. अबु आजमी मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४ पुढीलप्रमाणे :-

"देशात पर्यायाने राज्यात रक्तदानाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रक्त पेढ्यांमध्ये रक्त संकलित करून गरजू रुग्णांना दिले जाणे, मात्र याच रक्त साठ्यातून रुग्णांना रक्त संक्रमित करतेवेळी बाधित रक्ताचा पुरवठा झाल्याने संसर्ग रोगाच्या अनेक घटना घडल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापूर येथे एका गरीब शेतकरी कुटुंबातील बालिकेला रक्त संक्रमित करताना एच.आय. व्ही. रोगाचा संसर्ग झाल्याचे उघडकीस येणे, नागपूर मध्ये थालेसेमियाच्या ४ रुग्णांना माहे मे, २०२२ मध्ये एच.आय.व्ही. ची लागण होणे, त्याकरिता केंद्र शासनाच्या माध्यमातून आरोग्य विभागाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत या गोष्टीवर प्रतिबंधक उपाय करण्याकरिता केंद्र शासनाने अमरावती जिल्ह्यातील नेट चाचणीचा पायलट प्रोजेक्ट राबविणे, त्या करिता सन २०२१-२२ करिता केंद्र शासनाने ९७ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून देणे, परंतु राज्य शासनाच्या आरोग्य विभागातील अमरावती जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या अटी व शर्तीनुसार आपल्या मर्जीतील ठेकेदाराला निविदा लागणार नाहीत हें लक्षात आल्यानंतर हा प्रकल्प रद्द करून या प्रकल्पाची गरज नसल्याचे सांगण्यात येणे, केंद्र सरकार पायलट प्रोजेक्ट राबविण्याकरिता पैसे देत असताना राज्यातील सरकारी बाबूंच्या निष्क्रियतेमुळे व उदासिनतेमुळे राज्याचे नुकसान होणे, याबाबत शांसनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### प्रा.डॉ.तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यामध्ये ३६६ शासकिय / अशासकिय रक्तकेंद्रामार्फत सर्वसाधारणपणे मागील पाच वर्षात सरासरी १७ लक्ष युनीट (रक्तपिशव्या) संकलित करण्यात आल्या. सन २०२२ चे रक्तसंकलन १९.२८ लक्ष युनीट होते. त्यापैकी १९.०७ लक्ष युनीट हे स्वैच्छिक रक्तदानाव्दारे संकलित करण्यात आले आहे. स्वैच्छिक रक्तदान हे सुरक्षित रक्तदान आहे. स्वैच्छिक रक्त संकलनाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य अग्रणी आहे.

रक्तकेंद्रामार्फत रक्त संकलन केल्यानंतर औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ नुसार एच. आय. व्ही., एच. बी. व्ही. व एच.सी. व्ही. तपासणी एलायझा पध्दतीने करण्याचे बंधन आहे व सदरील चाचण्या करुनच रुग्णांना रक्तपिशव्या वितरीत करण्यात येतात. तसेच सदरच्या कायदयाप्रमाणे रुग्णांना रक्त वितरीत करण्यापूर्वी खालील चाचण्या बंधनकारक आहेत.

(१) एच.आय.व्ही,

(२) एच. बी. व्ही १ कावीळ (Hepatitis B Virus)

(३) एच.सी. व्ही. (Hepatitis C Virus))

(४) व्ही. डी. आर.एल. (सिफिलीस), (VDRLY)

(५) मलेरीया

वरील सर्व चाचण्या झाल्यानंतरच रुग्णांना रक्तकेंद्रातून रक्त वितरीत करण्यात येते.

सन २०२२ मध्ये संकलित केलेल्या रक्तामध्ये एच. आय. व्ही. एच. बी. व्ही. व एच.सी.व्ही. चे प्रमाण खालील प्रमाणे होते.

| संकलित रक्ताचे एकूण युनीट | एच. आय. व्ही. पॉझीटिव्ह युनीट | एच. बी. व्ही. पॉझीटिव्ह युनीट | एच.सी. व्ही. पॉझीटिव्ह युनीट |
|---|---|---|---|
| १९.२८ लक्ष युनीट (रक्तपिशव्या) | ४४६५ युनीट (रक्तपिशव्या) ०.२३ % | १५५७० युनीट (रक्तपिशव्या) ०.८१% | ५७५८ युनीट (रक्तपिशव्या) ०.३०% |

वरील सर्व बाधित रक्तपिशव्या या discard करण्यात आल्या होत्या.

दिनांक ०१.०९.२०२१ रोजी हे लोकमत अकोला या वृत्तपत्रात बी.पी. ठाकरे रक्तकेंद्र, अकोला या खाजगी रक्तकेंद्रातून एच. आय. व्ही. संक्रमित रक्त दिल्याने मुर्तिजापूर येथील ८ महिन्यांची चिमुकली बाधित झाली अशा मथळयाखाली बातमी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन, अकोला, विभागीय रक्त संक्रमण अधिकारी, अकोला व केंद्रीय औषध नियंत्रक, पश्चिम विभाग, मुंबई यांचेतर्फे संयुक्त तपासणी करण्यात आली असता असे आढळून आले की, बी.पी. ठाकरे रक्तकेंद्र, अकोलाव्दारे एलायझा चाचणी पुरेशा गांभीर्याने केली नसल्याने रक्तकेंद्र दोषी असल्याचे दिनांक ०५.०९.२०२१ रोजी आढळले. त्यानंतर अन्न व औषध प्रशासन, अमरावती यांचेमार्फत दिनांक १६.११.२०२१ च्या आदेशान्वये सदरच्या रक्तकेंद्रांचा परवाना दिनांक १७.०२.२०२२ पासून रद्द करण्यात आला होता. तथापी, अपिलिय अधिकाऱ्यांनी सदर आदेशात अंशतः बदल करून परवाना रद्द करण्याऐवजी रक्तकेंद्रांचे ७ दिवसाच्या कालावधीसाठी निलंबनाची शिक्षा दिनांक २८.०६.२०२२ रोजी ठोठावली.

तसेच नागपुर मधील शासकिय व अशासकिय रक्तकेंद्रामधून पुरवठा करण्यात आलेल्या रक्तामुळे थालेसेमिया व सिकलसेल या आजाराने ग्रस्त बालकांना एच. आय. व्ही. ची लागण झाल्याबाबतची बातमी दिनांक २२.०५.२०२२ रोजीच्या दैनिक लोकमत वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने वैद्यकिय अधिक्षिका, डागा स्मृती रुग्णालय, नागपुर यांनी अन्न व औषध प्रशासनाचे प्रतिनिधी, केंद्रीय औषध नियंत्रक यांचे प्रतिनिधी व रक्त संक्रमण क्षेत्रातील तज्ञ यांची समिती गठीत केली होती. या समितीने सविस्तर चौकशी केली. समितीने ज्या खाजगी रक्तकेंद्रातून रुग्णांना रक्त पुरवठा करण्यात आला होता त्या रक्तकेंद्रांना भेट देऊन सदर रुग्ण हे बाधित नसतानाच्या कालावधी पासून ते बाधित कालावधी पर्यंतचे सर्व दस्तऐवज तपासले असता, असे लक्षात आले की, कोणत्याही रुग्णाला एच. आय. व्ही / एच.सी. व्ही. संक्रमित रक्तपिशवी देण्यात आलेली नव्हती व समिती अशा निष्कर्षाप्रत आली की, रक्तातूनच बाधा झाली असे सिध्द झालेले दिसून येत नाही. त्याप्रमाणे समितीने दिनांक २२.०६.२०२२ रोजी वैद्यकिय अधिक्षिका, डागा स्मृती स्त्री रुग्णालय, नागपूर यांना सादर केला.

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ नुसार त्याअंतर्गत असलेल्या अधिनियमाप्रमाणे एच.आय.व्ही.,एच.सी.व्ही.,एच.बी.व्ही.ची एलायझा पदतीने चाचणी करणे बंधनकारक आहे. परंतु नॅट टेस्ट (न्युक्लिईक ॲसिड टेस्ट) अतिरिक्त सुरक्षा म्हणून ऐच्छिक आहे. त्याचप्रमाणे सहाय्यक संचालक जनरल, नॅको, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी नॅको किंवा एन.बी.टी.सी. किंवा कोणतेही नियामक प्राधिकरण नॅट टेस्ट करणे बंधनकारक करत नाही असे कळविले आहे. त्यामुळे नॅट टेस्ट करणे हे कायदयानुसार बंधनकारक करता येणार नाही. नॅट टेस्ट ही एलायझा व्यतिरिक्त एक अतिरिक्त चाचणी आहे.

केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरिता फक्त अमरावती रक्तकेंद्रासाठी Pooled NAT करण्यासाठी रु. ९७.४ लक्ष अनुदान मंजूर करण्यात आले होते. राज्यातील सर्व शासकिय रक्तकेंद्रातील रक्त संकलनाचे नॅट चाचणी करावयाची झाल्यास त्यासाठी प्रतिवर्षी रु. २०.०० कोटी अनुदानाची आवश्यकता होती. त्यामुळे त्याला मान्यता देण्यात आली नव्हती व अमरावती रक्तकेंद्राकरीता निविदा काढण्यात आलेली नव्हती.

********

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

मा.ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.अमित साटम, कॅप्टन आर.सेल्वन,श्री.किसन कथोरे, श्री. प्रशांत ठाकूर, श्री. बंटी भांगडिया, श्री. सुभाष थोटे, श्री. संजय केळकर, श्री.विनोद निकोले, श्री.मंगेश चव्हाण, श्री.योगेश सागर,श्री.अतुल भातखळकर, श्री. गणपत गायकवाड,श्री.संतोष दानवे,श्रीमती श्वेता महाले मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ११६ पुढीलप्रमाणे आहे -

---

"मुंबईसह राज्यामध्ये गोवराचा उद्रेक झाल्यानंतर रुग्णांचे तातडीने निदान व्हावे यासाठी राज्यात निदान प्रयोगशाळा उभ्या करण्याच्या सूचना गोवर राज्य कृती दलाने दिल्या असणे, मात्र तीन महिन्यापेक्षा अधिक कालावधी उलटल्यानंतही कोणतीच उपाययोजना करण्यात न येणे, गोवरचा उद्रेक आटोक्यात आणण्यासाठी राज्य सरकारने तातडीने पावले उचलून वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक यांच्या अध्यक्षतेखाली गोवर राज्य कृती दलाची स्थापना करणे, कृती दलाने तातडीने काही महत्वपूर्ण निर्णय घेणे त्यामुळे शासनाने तातडीने निदान प्रयोग शाळा उभ्या करण्याची गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया"

---

डॉ. प्रा. तानाजी सावंत, मंत्री (सा.आ.) यांचे निवेदन

गोवर हा आजार विषाणूमुळे होणारा संसर्गजन्य आजार आहे. सदर आजार लसीकरणामुळे टाळता येणारा आजार आहे. हा आजार मुख्यत्वे ५ वर्षाखालील मुलांमध्ये आढळतो. या आजाराची प्रमुख लक्षणे- ताप, खोकला, वाहणारे नाक, डोळयांची जळजळ, सुरुवातीला चेहऱ्यावर आणि नंतर उर्वरित शरीरावर लाल सपाट पुरळ ही या आजाराची प्रमुख लक्षणे आहेत. गोवर मुळे काही मुलांमध्ये अतिसार, मध्य कर्ण संसर्ग, न्युमोनिया, क्वचित फेफरे, अंधत्व किंवा मेंदूसंसर्ग अशी गुंतागुंत होऊ शकते.

सन २०२२ पासून राज्यातील गोवरची परिस्थिती खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | एकूण उद्रेक | निश्चित निदान झालेले रुग्ण | गोवरमुळे मृत्यू झालेली संख्या |
|---|---|---|---|
| २०२२ | २१५ | १८१९ | २१ (मुंबई-११, भिवंडी-४, ठाणे मनपा-३, वसई-विरार -२, कल्याण-डोंबिवली मनपा-१) |
| २०२३ (दि. २६.२.२०२३ अखेर) | १२ | ४५८ | ६ (मुंबई -४, वसई विरार -१, पुणे-१) |

सन २०२२ मध्ये राज्यात १८१९ गोवरचे रुग्ण आढळून आले. सद्यस्थितीत राज्यामध्ये गोवर रुग्णांचे प्रमाण कमी झाले असून, माहे जानेवारी, २०२३ मध्ये २३९ व माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये २१९ गोवर रुग्ण सापडले आहेत. राज्यातील रुग्णांच्या गोवर निदानासाठी पुढे नमूद तक्यातील ३ ठिकाणाच्या प्रयोगशाळामध्ये तपासणी केली जाते. या तिनही प्रयोगशाळा डब्लयूएचओ मानांकित (WHO Accredited ) आहेत. या प्रयोगशाळांची नावे व राज्यातील जोडलेले जिल्हे खालील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रयोगशाळेचे नाव | जोडलेले जिल्हे |
|---|---|---|
| १. | नॅशनल इन्स्टियुट ऑफ व्हायरॉलॉजी, मुंबई युनिट | पुणे, कोल्हापूर, ठाणे, लातूर, अकोला, औरंगाबाद विभागातील जिल्हे |
| २. | बी. जे मेडीकल कॉलेज, अहमदाबाद | नाशिक विभागातील जिल्हे |
| ३. | इन्स्टियुट ऑफ प्रिव्हेनटीव्ह मेडिसिन, हैद्राबाद | नागपूर विभागातील जिल्हे |

गोवर आजारा करीता राज्य कृती दलाची स्थापना दि. २ डिसेंबर, २०२२ रोजी करण्यात आली असून राज्य कृती दलाने वेळोवेळी गोवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मार्गदर्शन करीत असते. राज्य कृती दलाची दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजीच्या झालेल्या बैठकीमध्ये गोवर निदानासाठी राज्यामध्ये आणखी नवीन प्रयोगशाळा निर्माण करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार कस्तुरबा रुग्णालय, मुंबई येथील प्रयोगशाळा सुरु करण्यासाठी तेथील प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांचे प्रशिक्षण पुर्ण करण्यात आले असून, बाह्य गुणवत्ता हमी पॅनल (External Quality Assurance panel) ची तपासणी करुन त्यानंतर प्रयोगशाळा कार्यान्वित करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

सद्यस्थितीमध्ये गोवरचे रुग्ण कमी झाले आहेत, तरी आवश्यकतेनुसार प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात येतील.

*******

# महाराष्ट्र विधानसभा

## लक्षवेधी सूचना क्रमांक १७९

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. छगन भुजबळ, श्री. जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७९ पुढीलप्रमाणे आहे :-

"ठाणे जिल्ह्यामध्ये चार हजारांवर मुले शाळाबाह्य असल्याचे आरोग्य विभागाने केलेल्या सर्वेक्षणामधून माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये निदर्शनास येणे, ग्रामीण, शहरी आणि मनपा विभागातील शून्य ते १८ वर्ष वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करुन आवश्यकतेनुसार उपचार तथा शस्त्रक्रिया करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत "जागरूक पालक, सुदृढ बालक" अभियान राबविण्यात येत असणे, या अभियानांतर्गत जिल्हा स्तरावर केलेल्या सूक्ष्म कृती आराखड्यात ग्रामीण भागात ६ ते १८ या वयोगटात ४ हजार २६९ बालके ही शाळाबाह्य असल्याची बाब समोर आली असणे, जिल्ह्याच्या शिक्षण विभागाने जून महिन्यात केलेल्या सर्वेक्षणानुसार एकही विद्यार्थी शाळाबाह्य नसल्याचे सांगितले असणे, त्यामुळे आरोग्य विभागाने केलेले सर्वेक्षण नेमके कधीचे आहे आणि कोणते सर्वेक्षण खरे आहे असा प्रश्न उभा राहिला असणे, मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यातील ० ते १८ या वयोगटातील बालकांच्या आरोग्य तपासणीला सुरुवात झाली असणे, या अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, आश्रमशाळा, अंध-दिव्यांग शाळा, अंगणवाड्या, बालगृह बालसुधार गृहे, अनाथालये, समाजकल्याण व आदिवासी विभाग वसतिगृहे, खाजगी नर्सरी, बालवाड्या, खासगी शाळा आणि खासगी कनिष्ठ महाविद्यालये तसेच शाळाबाह्य अशा ० ते १८ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींची आरोग्य तपासणी होणार असणे, या तपासणी दरम्यान आजारी आढळलेल्या बालकांवर त्वरित उपचार आणि संदर्भ सेवा पुरविण्यात येणार असणे, जागरूक पालक, सुदृढ बालक अभियानांतर्गत ठाणे जिल्ह्यातील पाच तालुक्यातील ० ते १८ या वयोगटातील जवळपास ४ लाख ९३ हजार ८३४ बालकांची तपासणी केली जाणार असणे, त्यामध्ये १ लाख ५५ हजार ७०० बालक हे ० ते सहा वयोगटातील असून उर्वरित ३ लाख ३८ हजार १३४ बालक हे सहा से १८ वयोगटातील असणे, शालेय शिक्षण विभागाकडून केल्या जाणाऱ्या सर्व्हे मध्ये मात्र शाळाबाह्य मुलांची आकडेवारी लपविण्यात येत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

---

**प्रा.डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे निवेदन.**

राज्यामध्ये दिनांक ०९/०२/२०२३ पासून "जागरूक पालक, सुदृढ बालक" हे महत्वकांक्षी अभियान सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत आहे. राज्यात सदर अभियानामध्ये

अंदाजे २.९२ कोटी बालकांचे आरोग्य तपासणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय शाळा व कनिष्ठ महाविदयालये, आश्रमशाळा, अंध-दिव्यांग शाळा, अंगणवाड्या, बालगृहे / बाल सुधारगृहे, अनाथालये, समाज कल्याण व आदिवासी विभाग वस्तीगृहे (मुले/मुली), खाजगी नर्सरी, बालवाडया, खाजगी शाळा व खाजगी कनिष्ठ महाविद्यालये तसेच शाळाबाह्य ० ते १८ वर्षापर्यंतची मुले/मुली यांची तपासणी करण्यात येत आहे व आजारी आढळून आलेल्यांवर उपचार व संदर्भ सेवा पुरविण्यात येणार आहे.

प्रत्येक जिल्ह्यांनी नियोजनाच्या दृष्टीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील बालकांची माहिती स्थानिक स्तरावरुन घेवून सुक्ष्मकृती आराखडा बनविलेला आहे. यात विटभट्टया, बांधकाम, ऊसतोड इ. ठिकाणी असलेल्या स्थलांतरीत बालकांचा सुध्दा समावेश आहे. ही बालके काही ठिकाणी स्थानिक/ जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील शाळेत नोंदणीकृत नसतात. त्यामुळे त्यांना तपासणीसाठीच्या सुक्ष्मकृती आराखडयाच्या दृष्टीने शाळाबाह्य म्हणून नमुद करण्यात येते. ही मुले त्यांच्या स्वगृही/स्वजिल्ह्यातील शाळेत नोंदणीकृत असु शकतील. ठाणे जिल्हयाच्या ग्रामीण भागाचा सुध्दा सुक्ष्मकृती आराखडा प्राप्त झालेला आहे. त्यातसुध्दा शाळेतील व शाळाबाह्य बालके दर्शविलेली आहेत. सदर सुक्ष्मकृती आराखडा हा "जागरूक पालक, सुदृढ बालक" या अभियानातील आहे व त्याअनुषंगाने या सर्व बालकांची तपासणी करण्यात येणार आहे. तसेच तपासणी पथकांव्दारे स्थलांतरीत ठिकाणे उदा. कार्यक्षेत्रातील बांधकामाची ठिकाणे, विटभट्टया, ऊसतोड कामगार इ. ठिकाणी बालकांची तपासणी करण्यात येणार आहे. शिक्षण विभागाचे सर्वेक्षण आणि "जागरूक पालक, सुदृढ बालक" या अभियानातील आराखडा यांची तंतोतंत तुलना करता येणार नाही.

*********************

<u>लक्षवेधी सूचना क्र.२१०</u>

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

मा.डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. छगन भुजबळ, श्री.जयंत पाटील, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री. रोहित पवार, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. शेखर निकम, श्री. संजय बनसोडे, श्री. सुनिल प्रभू मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना २१० पुढीलप्रमाणे

---

राज्याच्या विविध भागात सुमारे १ लाख ६९ हजार पेक्षा जास्त रुग्णांमध्ये सिकलसेल, ॲनेमियासारख्या दुर्धर आजार असल्याची गंभीर माहिती दि.०२ फेब्रुवारी, २०२३ रोजी उघडकीस येणे, नंदूरबार, धडगावसह विदर्भातील दूर्गम भागात या आजाराचे सर्वाधिक रुग्ण असणे, सिकलसेलचे निदान होण्यासाठी ज्या प्रगत चाचण्या कराव्या लागतात त्या सरकारी रुग्णालयामध्ये होत नसणे, त्यामुळे दुर्गम भागातील नागरीकांना ४० ते ५० किलोमीटर पायपीट करुन शहरामध्ये धाव घ्यावी लागत असणे, तर काही चाचण्यांसाठी मुंबईकडे जावे लागत असणे, त्यामुळे या आजाराच्या रुग्णांना वेळेत उपचार मिळत नसणे, देशपातळीवरील सिकलसेलच्या एकूण रुग्णसंख्येपैकी सुमारे ३० टक्के रुग्ण महाराष्ट्रात असल्याची चिंताजनक माहिती उघडकीस येणे, या आजाराच्या निर्मूलनासाठी शासनाकडून आवश्यक उपाययोजना केल्या जात नसणे व दुर्लक्षपणामुळे पर्यायाने सदरची परिस्थिती अधिकच गंभीर बनत चाललेली असणे, मुलांमधील स्वमग्नता आजारासारखेच सिकलसेल आजारामुळे पुढील काळात परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता असणे, त्यामुळे सदर प्रकरणी युध्दपातळीवर उपाययोजना करणे नितांत गरजेचे असणे, या आजारांच्या निर्मूलनासाठी आवश्यक उपाययोजना करण्यास प्रशासनास अपयश आलेले असणे, स्वमग्नता व सिकलसेल या आजारांचे निदान व उपचारासाठी सर्व सरकारी आरोग्य केंद्रामध्ये सुविधा उपलब्ध करुन देणे अत्यंत गरजेचे असणे, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, स्वमग्नता, सिकलसेल सारख्या आजारांचे वेळेत निदान होत नसणे व निदान झाल्यानंतर ग्रामीण, निमशहरी भागातील रुग्णांना कोणत्याही प्रकारची सुविधा मिळत नसल्याने चिंताजनक परिस्थितीमध्ये भर पडलेली असणे, यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन सदरबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.

---

मा.प्रा.डॉ.तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण यांचे
निवेदन

सिकलसेल हा अनुवंशिक आजार असुन यामध्ये लाल रक्तपेशी काही विशिष्ट परिस्थितीत आपला गोल आकार बदलून कोयत्याच्या आकाराच्या होतात. साधारण रक्तपेशी हया गोल आकाराच्या असतात आणि त्या रक्तवाहिन्यांमधुन शरीराच्या सर्व भागांपर्यंत सहज ऑक्सीजन वाहुन नेतात. सिकलसेल असलेल्या रक्तपेशी घट्ट आणि चिकट असल्यामुळे रक्तवाहीन्यांमधुन सहज वाहून जाऊ शकत नाही त्या रक्तपेशी रक्तवाहीन्यांमध्ये अडकुन हातपाय व महत्वाच्या अवयवांना रक्तपुरवठयामध्ये

अडथळा निर्माण करतात. त्यामुळे तिव्र वेदना, सांधेदुखी, गंभीर संसर्ग अशी लक्षण व महत्वाचे अवयव निकामी होण्याचा धोका निर्माण होतो, याला सिकलसेल क्रायसीस संबोधण्यात येते. सद्यस्थितीत सिकलसेल क्रायसीसवर सर्व शासकीय रुग्णालयात मोफत उपचार करण्यात येतो.

- आदिवासी समाजामध्ये सिकलसेल आजाराचे प्रमाण इतरांपेक्षा जास्त आढळून आले आहे.
- सिकलसेलचे प्रकार:

  A) सिकलसेल वाहक - सिकल हिमोग्लोबीन ४०% पेक्षा कमी असल्यास (या व्यक्ती बऱ्यापैकी निरोगी असतात परंतु पुढील पिढीमध्ये रोगाच्या प्रसारासाठी जबाबदार असतात)

  B) सिकलसेल ग्रस्त/ पीडित- सिकल हिमोग्लोबीन ४०% पेक्षा जास्त असल्यास ............

सन २००८ पासून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सिकलसेल नियंत्रण कार्यक्रम राज्यातील २१ जिल्हयात सर्व आदिवासी जिल्ह्यांसह (ठाणे, नाशिक, नंदुरबार, अमरावती, गोंदिया, गडचिरोली, पालघर, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, धुळे, जळगाव, बुलढाणा, नांदेड, वाशिम, अकोला, औरंगाबाद, रायगड आणि हिंगोली) राबविण्यात येत आहे.

१) या कार्यक्रमांतर्गत सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र/ ग्रामीण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय/ जिल्हा रुग्णालयात सिकलसेल रुग्णांसाठी सोल्युबिलिटी चाचणी, निश्चित निदानासाठी एच.पी.एल.सी.चाचणी मोफत करण्यात येते. त्यानूसार सिकलसेल रुग्णांना लाल, वाहकांना पिवळे व निरोगी व्यक्तींना पांढरे कार्ड वाटप करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत करण्यात येणाऱ्या तपासण्यांद्वारे नवीन सिकलसेल रुग्ण तसेच वाहक यांचे निदान होते. सदर तपासणीसाठी आवश्यक असणारे Solubility Kits याची खरेदी राज्यस्तरावर हाफकिन मार्फत करुन जिल्हयांना वितरीत करण्यात येतात. तसेच काही प्रमाणात Solubility Kits खरेदीसाठी जिल्हयांना निधी राज्यस्तरावरुन वितरीत करण्यात येतो. सदर आजाराच्या निश्चित निदानासाठी आवश्यक असणारे HPLC तपासणी सर्व जिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र येथे (HLL) हिंद लॅब मार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

२) या कार्यक्रमांतर्गत राज्यात सन २००८ ते जानेवारी २०२३ पर्यंत एकूण २.३५ कोटी सोल्यूबिलिटी चाचणी करण्यात आल्या, निश्चित निदानानंतर त्यामध्ये २१०८३ सिकलसेल रुग्ण व २,५६,६९० सिकलसेल वाहक आढळून आलेले आहेत.

३) नंदुरबार जिल्हा व विदर्भ विभागात सिकलसेल रुग्णांचे प्रमाण तुलनेने इतर विभागापेक्षा जास्त आहे.

४) या कार्यक्रमांतर्गत करण्यात येणा-या तपासण्यांद्वारे नवीन सिकलसेल रुग्ण तसेच वाहक यांचे निदान होते, त्यामुळे या रुग्णसंख्येत दरवर्षी नव्याने वाढ होत असल्याचे निर्दशनास येते. राज्यात जानेवारी २०२३ मध्ये एकुण १४० नवीन रुग्ण तपासणीत आढळुन आले आहेत.

५) तसेच या रुग्णांना आवश्यक औषधोपचार, प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन फोलीक ॲसीड, हायड्रोक्सीयुरिया व आवश्यकतेनुसार रक्तपुरवठा सर्व रक्तपेढ्यांमधुन रुग्णांना विनामुल्य देण्यात आलेला आहे. सदर उपचारासाठी आवश्यक असणारे औषधी (Tab Hydroxyuree, (Folic Acid) याची खरेदी राज्यस्तरावर हाफकिन मार्फत करुन जिल्हयांना वितरीत करण्यात येतात. तसेच काही प्रमाणात निधी जिल्हयांना या औषध खरेदीसाठी राज्यस्तरावरुन वितरीत करण्यात येतो. या रुग्णांना या आजाराचा सिकलसेल क्रायसिस म्हणजेच हाडांचे दुखणे, सांध्यांचे दुखणे, ताप येणे,

दम लागणे, रक्तक्षय अशी लक्षणे दिसून येतात. अशा रुग्णांवर सर्व शासकीय रुग्णालयामध्ये मोफत उपचार व गरजेनुसार रक्तसंक्रमण करण्यात येते. त्यामध्ये T.Hydroxurea, Folic Acid, Antibiotic व वेदनाशामक औषधांचा वापर करण्यात येतो. तसेच या रुग्णांना निमोनिया (फुफुसाचा संसर्ग) होण्याचा धोका असल्यामुळे या रुग्णांसाठी "निमोकोकल" लस खरेदी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्याचा या रुग्णांस फायदा होणार आहे.

६) शासन निर्णय क्र. साआवि/२००१/प्र.क.२०६/आरोग्य-७ , मंत्रालय, मुंबई - ४०००३२, दि. ०५ डिसेंबर, २००१ नुसार सिकलसेल रुग्णांना रक्त संक्रमणाची आवश्यकता असल्यास मोफत रक्त संक्रमणाची सोय उपलब्ध करण्यात आली आहे. मागील वर्षी या रुग्णांसाठी अंदाजे २१२२ रक्तपिशव्या मोफत देण्यात आल्या आहेत.

(७) महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये सिकलसेल आजार समाविष्ट केल्यामुळे या योजने मार्फत रुग्णांवर मोफत उपचार करण्यात येतो.

८) दि.०९ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या गृह विभागाच्या शासन निर्णयानुसार सिकलसेल रुग्णाला उपचारासाठी मोफत एस.टी. प्रवास सवलत लागू करण्यात आली आहे.

९) या कार्यक्रमांतर्गत उपाययोजना म्हणून विवाहपूर्व व विवाहपश्चात समुपदेशन वैद्यकीय अधिकारी, तंत्रज्ञ, समुपदेशक, एएनएम व आशा यांचे मार्फत करण्यात येते. सिकलसेल रुग्णांना लाल, वाहकांना पिवळे कार्ड वाटप करण्यात येते, त्यानुसार या रंगीत कार्डातील स्त्री-पुरुषांनी परस्परांमध्ये विवाह टाळण्याबाबत समुपदेशन करण्यात येते. जनतेमध्ये सिकलसेल आजाराबाबत जागृती व्हावी यासाठी दरवर्षी दि. ११ ते १७ डिसेंबर या कालावधीमध्ये सिकलसेल सप्ताह साजरा करण्यात येत असुन त्याद्वारे समुपदेशन करण्यात येते.

१०) नविन सिकलसेल बालक जन्माला येण्यावर आळा घालण्यासाठी गर्भजल तपासणी सुविधा / Prenatal Testing CVS / Amniocentesis) BMT Centre, Borivali, Mumbai येथे मोफत उपलब्ध करुन देण्यात आली आहेत व रुग्णास मुंबईच्या सेंटर पर्यंत येण्याचा प्रवासभत्ता / Sample Transportation चा खर्च अनुज्ञेय आहे.

११) विदर्भातील रुग्णांकरिता डागा स्मृती रुग्णालय, नागपूर येथे नवीन गर्भजल तपासणी केंद्र चालू करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

१२) या कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व रुग्णालये तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथे निधी व मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. त्याद्वारे रुग्णांच्या तपासण्या व उपचार करण्यात येतात. वरील सर्व जिल्हयांमध्ये या कार्यक्रमांतर्गत जिल्हा समन्वयक, समुपदेशक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, तालुका सिकलसेल सहाय्यक व पीयर सपोर्ट ही पदे मंजूर आहेत.

१३) सद्यस्थितीत केंद्र शासनाने सिकलसेल नॅशनल मिशन कार्यान्वित केले आहे, त्यानुसार उपलब्ध करण्यात आलेल्या पोर्टलमध्ये सदर रुग्णांचा तपासणी अहवाल upload करण्यात येत आहे. तसेच केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे सिकलसेल संबंधित राज्यस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तरावर समिती गठित करण्यात येत आहे.

१४) विविध विभागाच्या शासन निर्णयाद्वारे सिकलसेल रुग्णास खालील प्रमाणे मदत करण्यात येते.

- दि. २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार संजय गांधी निराधार योजनेमध्ये सिकलसेल रुग्णांना (स्वतःचा चरितार्थ चालु न शकणारे स्त्री-पुरुष) दरमहा रु.१००० अर्थसहाय्य देण्यात येते.
- दि. ०४ मार्च, २०१७ रोजीच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार सिकलसेल रुग्णांना सर्व प्रकारच्या परिक्षेच्या प्रश्नप्रत्रिका सोडविण्यासाठी प्रति तास २० मिनिटे अधिकचा वेळ देण्यास मान्यता देण्यात आली आहे,
- दि.१४ सप्टेंबर,२०१८ रोजीच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णयानुसार सिकलसेल रुग्णांना दिव्यांगत्व प्रमाणपत्र देण्यात येते.

*******

३२९

# महाराष्ट्र विधानसभा

## विधानसभा लक्षवेधी सूचना

## सन २०२३ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन

मा.डॉ.विनय कोरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्यात मलकापूर हे अतिदुर्गम व डोंगराळ प्रदेशातील व कोल्हापूर रत्नागिरी रस्त्यावर वसलेले व मोठी बाजारपेठ असलेले शहर असणे, तसेच रत्नागिरी-नागपूर हायवे मलकापूर शहरावरून जात असणे, सदर हायवेवर अपघात होत असणे, रत्नागिरी व कोल्हापूर यांच्यामध्ये मोठी दुर्घटना घडल्यास कोणताही दवाखाना नसणे, त्यामुळे अनेक लोक वैद्यकीय उपचार वेळेत न मिळाल्यामुळे त्यांचे निधन झालेले असणे, तसेच जंगलाचा परिसर असल्यामुळे सर्पदंश आणि वन्य प्राण्यांच्या हल्ल्याच्या अनेक घटना घडत असणे, त्यांना सुद्धा वेळेत उपचार तेथे मिळत नसणे, त्यामुळे उपजिल्हा रुग्णालयासाठी लोकसंख्येची जी अट आहे त्याचा विचार न करता या विशिष्ट पार्श्वभूमीवर उपजिल्हा रुग्णालय देण्याची गरज असणे, मलकापूरच्या १० किलोमीटर परिघांमध्ये ६० ते ६५ खेडी असणे, मलकापूर शहरासह आजूबाजूच्या खेड्यांमधील लोकसंख्या वाढल्याने सध्याचे ग्रामीण रुग्णालय, मलकापूर आरोग्य सेवा देण्यासाठी अपुरे पडत असणे, अत्यवस्थ रुग्णांना जिल्हा रुग्णालयांमध्ये हलविण्यासाठी सध्या ७० ते ८० किलोमीटर अंतर जाते वेळेस रुग्ण दगावण्याची शक्यता असणे, मलकापूर सारख्या अतिदुर्गम व डोंगराळ प्रदेशातील शहरात उपजिल्हा दर्जाचे रुग्णालय नसणे, त्यामुळे सदर शहर व आजूबाजूच्या खेड्यातील रुग्णांना अति तातडीची आरोग्य सेवा मिळण्यासाठी बऱ्याच अडचणी असणे, त्यामुळे सध्याच्या ग्रामीण रुग्णालयाचे काळानुरूप श्रेणीवर्धन करून ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय करणे गरजेचे असणे, सध्या अपघातातील रुग्ण, प्रसूतीपूर्व माता, गंभीर आजारी रुग्ण यांना तातडीची आरोग्य सेवा मिळण्यासाठी अडचणी असणे, त्यामुळे सदर विभागातील नागरिकांची चांगली शासकीय आरोग्य सेवा उपलब्ध करण्याबाबतची मागणी असणे, याबाबत होत असलेल्या दिरंगाईमुळे त्यांच्यामध्ये पसरलेले नैराश्यचे वातावरण अशाप्रकारे शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची व सध्याच्या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा.प्रा.डॉ. तानाजी सावंत मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन :-

ग्रामीण रुग्णालय, मलकापूर, जि.कोल्हापूर या आरोग्य संस्थेची स्थापना दि.२०.६.१९९४ रोजी करण्यात आलेली असून सदरचे रुग्णालय सद्या जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर यांचे अधिनस्त कार्यरत आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार शाहूवाडी तालुक्याची लोकंसख्या १,८५,६६१ इतकी आहे. शाहूवाडी तालुका हा मुख्यत: डोंगराळ व अतिदुर्गम भागामध्ये येतो. सध्या शाहूवाडी तालुक्यामध्ये ग्रामीण रुग्णालय, मलकापूर हे ३० खाटांचे एकमेव ग्रामीण रुग्णालय कार्यरत असून सदरचे रुग्णालय

हे कोल्हापूर पासून ४८ किमी अंतरावर आहे. ग्रामीण रुग्णालय, मलकापूर या ३० खाटाच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये २५ मंजूर पदांपैकी १६ पदे भरलेली असून ९ पदे रिक्त आहेत. त्यामध्ये वैद्यकीय अधिक्षकाचे १ पद मंजूर असून सदरहू पद रिक्त आहे, वैद्यकीय अधिकारी, गट-अ ची ३ पदे मंजूर असून, ३ पदे रिक्त आहेत. तथापि, सदरहू ३ रिक्त पदे सद्यस्थितीत कंत्राटी स्वरुपात भरण्यात आलेली असून त्यामध्ये १ बालरोगतज्ञ, १ भुलतज्ञ व १ एमबीबीएस अर्हताधारक अधिकारी यांचा समावेश आहे. तसेच अधिपरिचारिकांची एकूण ७ पदे मंजूर असून त्यापैंकी ३ पदे रिक्त आहेत व त्यापैंकी कंत्राटी पध्दतीने २ पदे नियुक्त करण्यांत आलेली आहे. प्रयोगशाळा तंत्रज्ञाचे १ पद रिक्त आहे. तसेच सफाईगाराचे १ पद रिक्त आहे. ग्रामीण रुग्णालय, मलकापूर येथे रुग्णांना सर्व तज्ञ रुग्णसेवा पुरविण्यांत येतात. कोल्हापूर ते मलकापूर हे अंतर ४८ किमी एवढे असून कोल्हापूर शहरामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ट्रामा केअर युनिट सुरु आहे.

सन २०२२-२३ मध्ये ग्रामीण रुग्णालय, मलकापूर येथे ३२२६७ बाहयरुग्ण सेवा, २९२६ आंतररुग्ण सेवा, ४७ अपघात आंतररुग्ण सेवा, ३४७ प्रसूती, २५ सिझेरीयन, ११२ टयुबॅकटॉमी शस्त्रक्रिया, १२० लेप्रोस्कोपी शस्त्रक्रिया, १२१ पीपीआयुसीडी, ४१७ लहान शस्त्रक्रिया, २४३ मोठया शस्त्रक्रिया, २४६२९ प्रयोगशाळा चाचण्या, १६४७ क्ष-किरण चाचण्या, ३६ शवविच्छेदन करण्यांत आले आहेत, तसेच ८८९ श्वानदंश, ७१ सर्पदंश व ५४ अननोन बाईट यांचेवर उपचार करण्यांत आलेले आहेत.

ग्रामीण रुग्णालय, मलकापूर येथे आवश्यक तो औषधीसाठा उपलब्ध असून सदर ठिकाणी श्वानदंशावरील ए.आर.व्ही. व ए.आर.एस. इंजेक्शन व सर्पदंशावरील ए.एस.व्ही. इंजेक्शन मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. ग्रामीण रुग्णालय, मलकापूर येथील बेड ऑक्युपन्सी रेट सरासरी ४५ टक्के इतका आहे. ग्रामीण रुग्णालय, मलकापूर आवारामध्ये लेबर रुम, ऑपरेशन थिएटर, स्कील लॅब व तालुका वैद्यकीय अधिकारी यांचे कार्यालयाचे बांधकाम सुरु आहे त्यामुळे ग्रामीण रुग्णालय, मलकापूर येथील आवारामध्ये नवीन बांधकाम करण्याकरीता जागा उपलब्ध नाही. तसेच या आरोग्य संस्थेमार्फत रुग्णांना तज्ञ रुग्णसेवा पुरविण्यांत येत आहेत.

सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित राज्याचा बृहत आराखडा MRSAC या शासकीय संस्थेमार्फत सॅटेलाईट मॅपिंगव्दारे तयार करण्यात आला होता. त्याच धर्तीवर सदर संस्थेकडून सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित राज्याचा जोडबृहतआराखडा तयार करण्यासाठी MRSAC या संस्थेची नेमणुक करण्यात आली असुन राज्यातील आरोग्य संस्थाचे मॅपिंगचे काम जवळपास पुर्ण झाले असुन प्रमाणीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. लोकसंख्या व अंतराच्या निकषानुसार नवीन संस्थाचे स्थान निश्चिती करण्यात येत असून त्यानुसार सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे तयार केलेल्या संस्थेच्या बृहत आराखडयाचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर संस्थाना मंजूरी देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार ग्रामीण रुग्णालय, मलकापूर येथील ३० खाटांचे रुग्णालयाचे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत प्रस्तावाची निकषानुसार तपासणी करण्यात येत असून त्यानुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

****************

लक्षवेधी सूचना क्रमांक -११४४

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
## मा. श्रीमती श्वेता महाले , विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.

"स्त्रियांमध्ये आढळुन येणाऱ्या कर्करोगामध्ये गर्भाशयमुखाचा कर्करोग क्रमांक २ वर असणे, दरवर्षी भारतात जवळपास १ लाख २५ हजार नवीन केसेसची नोंद होणे व त्यापैकी जवळपास ७० हजार स्त्रियांचे मृत्यू होणे, म्हणजे कोरोनाच्या बरोबरीने महिलांचा दरवर्षी मृत्यु होत असणे, या कॅन्सरचे मुख्य कारण आहे HPV [ Human Papilloma Virus] हा विषाणू. यापैकी ८०% सर्व्हायकल कॅन्सर हे HPV १६/१८ याने होणे, या कॅन्सर वर लस उपलब्ध असून जगात मागील १४ वर्षांपासून आतापर्यंत ३५० दशलक्ष व भारतात जवळपास ५ कोटी स्त्रियांनी ही लस घेतलेली असणे, ही लस पूर्णतः सुरक्षित असणे, ही लस १००% प्रतिबंधक तरी HPV १६/१८ द्वारे होणाऱ्या गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून सर्वोत्तम संरक्षक लस असणे, खुल्या बाजारात या लसीची किंमत ३ हजारा पेक्षा जास्त असल्याने सर्वसामान्य महिलांना परवडत नसणे, त्यामुळे ही लस शासकीय स्तरावर मोफत उपलब्ध करून दिल्यास मोठ्या प्रमाणात या कर्करोगाने महिलांचा होणारा मृत्यू दर रोखल्या जाणे, त्यामुळे गर्भाशयमुखाचा कर्करोग Cervical Cancer वर आळा घालण्यासाठी ही लस मोफत उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

---

## मा.प्रा.डॉ. तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन

स्त्रियांमध्ये आढळून येणा-या कर्करोगामध्ये गर्भाशयमुखाचा कर्करोग दोन क्रमांकावर आहे. GLOBACON (Global Cancer Incidence, Mortality Prevalence) २०२० च्या सर्व्हेनुसार गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचे चे प्रमाण (Incidence rates) १८.३ % आहे.

गर्भाशय मुख कर्करोगाचे एक कारण HPV या विषाणूचा संसर्ग असून कर्करोग शरीरामध्ये निर्माण होण्याची प्रकिया ही दीर्घकालीन असते. या करिता प्रतिबंधात्मक उपाय म्हणून HPV लसीकरण हा एक उपाय आहे. किशोरवयीन मुलींना वयाच्या ९ ते १४ व्या वर्षी ही लस देण्यात येते, महिलांमध्ये गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग हा वयाच्या मुख्यतः ३० वर्षानंतर आढळून येतो.

गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचे प्रमाण कमी करण्यासाठी जीवनशैली मध्ये बदल, जनजागृती करणे, चाळणी (स्क्रिनिंग), लवकर निदान, उपचार करणे व आवश्यक रुग्णांना संदर्भित केले जाते. तसेच लसीकरण करणे आवश्यक आहे.

दरवर्षी ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमित्त विविध माध्यमातून आरोग्य शिबिरे प्रभात फेरी शाळा, महाविद्यालय येथे व्याख्यान सत्रे, प्रश्नमंजुषा, पोस्टर्स व रांगोळी स्पर्धेद्वारे जनजागृती करण्यात येते.

याअंतर्गत ३० वर्षावरील सर्व स्त्रियांची गर्भाशयमुख तपासणी VIA या चाचणीद्वारे केली जात आहे. या चाचणीमुळे गर्भाशयमुख कर्करोगाचे प्राथमिक टप्प्यात निदान होऊ शकते व परिणामी लवकर उपचार दिल्यास रुग्ण पूर्णतः बरा होऊ शकतो.

कर्करोगाच्या निदानाकरिता बायोप्सी, सायकॉलॉजी Hindustan Life care Ltd. (HLL) या प्रयोगशाळेमार्फत करण्यात येते. कर्करोगाचे निदान झालेल्या रुग्णांवर टाटा मेमोरीयल हॉस्पिटल येथून प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी व टाटा कॅन्सर वॉरियर्स मार्फत किमोथेरपी जिल्हा रुग्णालयात किंवा महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत खाजगी रुग्णालयात उपचार केले जातात.

गुंतागुंतीच्या आवश्यक रुग्णांना पुढील उपचाराकरिता टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई, राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कँन्सर हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, नागपूर, विवेकानंद मेडिकल फाउंडेशन ॲण्ड रिसर्च सेंटर, लातूर, राज्य कर्करोग संस्था, छत्रपती संभाजीनगर, संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती व नाशिक या संस्थांमध्ये संदर्भित केले जाते.

महिलांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर होऊ नये म्हणून सन २०२३-२४ या वर्षात केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यातील ९ वर्षे ते १४ वर्षे या वयोगटातील अंदाजे ५५,८७,७७० मुलींना HPV (Human papillomavirus) ही लस दिली जाणार आहे. सदर लसीचे दोन डोस सहा महिन्याच्या अंतराने दिले जातील. सदर मोहिमेचे लसीकरण पूर्ण झाल्यानंतर नियमित लसीकरण कार्यक्रमात या लसीचा समावेश करण्यात येणार आहे. लसीचा पुरवठा केंद्रशासनाकडून करण्यात येणार आहे.

*************************

३२५

## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

मा.श्री.पृथ्वीराज चव्हाण, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"कराड तालुक्यामध्ये सामान्य व गोर-गरीब जनतेच्या आरोग्य सेवेकरिता स्व. सौ. वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालय हे वैद्यकीय सेवा देत असून जवळच्या इतर तालुक्यातील रुग्णांकरिता सोयीचे रुग्णालय असणे, राष्ट्रीय महामार्ग ४ च्या जवळ असलेल्या (१०० खाटांची व्यवस्था) स्व.सौ. वेणूताई चव्हाण रुग्णालयाने शासन दरबारी २०० खाटांचे रुग्णालय व ट्रॉमा केअर युनिटचा प्रस्ताव सादर सन २०१८ मध्ये केला असणे, २०० खाटांच्या रुग्णालय व्यवस्थेसह शासनाकडील सन २०१८ पासून प्रलिंबत ट्रॉमा केअर सेंटरचा प्रस्ताव मंजूर करुन रुग्णालयातील रिक्त पदे भरणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.प्रा.डॉ.तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन :-

कुटीर रुग्णालय, कराड या रुग्णालयाचे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत दि.१३.०५.२००३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर रुग्णालयामध्ये सन २०१४ मध्ये नेत्रविभाग व जळीत कक्षाचे बांधकामही करण्यात आलेले आहे. या रुग्णालयाचा बेड ऑक्युपन्सी रेट ९० पेक्षा जास्त आहे. तसेच दरमहा ३०० च्या जवळपास प्रसुती होतात व सदर रुग्णालय राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वरील महत्वाचे शासकीय रुग्णालय आहे. सदर रुग्णालयात दरवर्षी सरासरी ६०० ते ८०० पोष्टमार्टेम केसेस होतात. तसेच दररोज ३०० पेक्षा जास्त बाहय रुग्ण उपचारासाठी येत असतात. या संस्थेच्या आवारात ए.आर.टी.सेंटरही कार्यरत आहे.

उपजिल्हा रुग्णालय, कराड, जि.सातारा याचे १०० खाटांवरुन २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत तसेच उपजिल्हा रुग्णालय, कराड, जि.सातारा येथे खासबाब म्हणून ट्रॉमा केअर युनिट स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव दि.२८.११.२०१८ व दि.२९.०१.२०१८ अन्वये शासनास प्राप्त झाला होता. तथापि, शासनाने दि. १४.०३.२०१९ च्या पत्रान्वये सदर प्रस्ताव सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे तयार करावयाच्या जोडबृहत आराखडयामध्ये प्रचलित निकषानुसार तपासून एकत्रित सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच शासनाने दि.१०.३.२०२३ च्या पत्रान्वये सन २०११ च्या लोकसंख्येनुसार आरोग्य संस्थांच्या बृहत आराखडयामध्ये काम सुरु असून त्या अनुषंगाने कराड, जि.सातारा येथे ट्रामा केअर युनिट व १०० खाटांवरुन २०० खाटांचे सामान्य रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा नव्याने प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कळविले आहे.

सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत राज्याचा आरोग्य संस्थेचा बृहत आराखडाच्या प्रस्ताव सादर करतांना ज्या बाबींचा अवलंब करण्यात आला होता त्या सर्व बाबीचा अवलंब करून सन २०११ च्या लोकसंख्येनुसार राज्याचा बृहत आराखडयाचा प्रस्ताव सादर करण्याबाबत आयुक्तालयाला शासनामार्फत कळविण्यात आले व त्यामध्ये सन २००१ चा राज्याचा बृहत आराखडा MRSAC या शासकीय संस्थेमार्फत सॅटेलाईट मॅपिंगव्दारे तयार करण्यात आला होता. त्याच धर्तीवर सदर संस्थेकडुन सन २०११ चा राज्याचा जोडबृहतआराखडा तयार करण्यासाठी MRSAC या संस्थेची नेमणुक करण्यात आली असुन राज्यातील सदर आरोग्य संस्थाचे मॅपिगचे काम जवळपास पुर्ण झाले असुन प्रमाणीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. लोकसंख्या व अंतराच्या निकषानुसार नवीन संस्थाचे स्थान निश्चिती करण्यात येवून त्या संस्था सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे जोडबृहत आराखडयात मंजूरीकरीता राज्याचा एकत्रित प्रस्ताव शासनास सादर करण्याची कार्यवाही आयुक्तालय स्तरावर सुरू आहे.

सद्यस्थितीत उपजिल्हा रुग्णालय, कराड, जि.सातारा हे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये कार्यान्वित असून सदर रुग्णालयामध्ये एकूण १०० मंजूर पदांपैकी ७५ पदे भरलेली असून रिक्त असलेल्या पदांमध्ये वैद्यकीय अधिक्षक-१, वैद्यकीय अधिकारी, गट-अ ची २, दंत शल्य चिकित्सक २, वैद्यकीय अधिकारी, गट-ब १, वर्ग-३ ची ९ व वर्ग-४ ची १० पदे रिक्त आहेत. असे एकूण २५ पदे रिक्त आहेत.

उपरोक्त रिक्त पदांपैकी वैद्यकीय अधिक्षक हे पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येत असून वैद्यकीय अधिकारी गट-अ ही पदे शासनाच्या स्वतंत्र निवड मंडळामार्फत भरण्यात येतात ती पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शासन निर्णय, दि.०३.१२.२०१८ नुसार सदर रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला अधिकार देण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

तसेच कोरोना १९ च्या पार्श्वभुमीवर आरोग्य सेवेचे सक्षमीकरण करणे निकडीचे असल्याने या विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवेतील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

***********************

328

# महाराष्ट्र विधानसभा

## लक्षवेधी सूचना क्रमांक १६९४

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. रवि राणा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १६९४ पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र राज्यातील समुदाय आरोग्य अधिकारी सी.एच.ओ. यांनी त्या त्या जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांना त्यांच्या अलीकडेच विविध मागण्यांचे निवेदन दिले असणे. त्यामध्ये त्यांच्या बदल्या करण्याचें संबंधी मागण्यांचा समावेश असणे. या अनुषंगाने दिव्यांग ४४% डॉक्टर कुमारी कोमल चंद्रशेखर अग्रवाल समुदाय आरोग्य अधिकारी C.H.O. यांनीही त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अमरावती, जिल्हा आरोग्य अधिकारी अमरावती तसेच विभागीय आयुक्त अमरावती यांना त्यांच्या प्रकरणी न्याय मिळवून देन्यासंबंधाने दि.०६/०२/२०२३ रोजी निवेदन व स्थानीक लोकप्रतिनिधींनीही दिले असणे. असे असताना अमरावती विभागीय आयुक्तांनी यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्र.३०३/२०२३ दि. १५/०२/२०२३ रोजी उपसचिव सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई यांना पत्र पाठवून डॉक्टर कोमल चंद्रशेखर अग्रवाल सी एच व समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या प्रकरणी तातडीने शासन स्तरावरुन आदेश होण्याबाबत शासनाचे उपसचिव सा. आरोग्य विभाग यांना व मुख्यमंत्री सचिवालय कक्ष अमरावती विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती या विभागाचे विशेष कार्य अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक ३६/२०२३/दि.०६/०२/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे प्रधान सचिव सा.आ. विभाग मंत्रालय, मुंबई आयुक्त राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती, अकोला यांना डॉ. कोमल अग्रवाल, समुदाय आरोग्य अधिकारी C.H.O. यांचे प्रकरणांची दखल घेऊन न्यायोचित निर्णय घेण्याबाबत कळविले असणे. म्हणून शासनाने उपरोक्त मागणी तातडीने निकाली काढण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची निर्णयात्मक कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

---

### प्रा.डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे निवेदन.

आयुष्यमान भारत - आरोग्यवर्धिनी कार्यक्रम हा केंद्र शासनाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे. या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील लोकांना प्रतिबंधात्मक, प्रबोधनात्मक व उपचारात्मक आरोग्य सेवा बरोबरच औषधोपचार व प्रयोगशाळा तपासणी मोफत दिली जात आहे. या कार्यक्रमांतर्गत १३ प्रकारच्या आरोग्य सेवा दिल्या जातात. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार आरोग्यवर्धिनी केंद्र-उपकेंद्रामध्ये समुदाय आरोग्य अधिकारी (Community Health Officers) या पदावर आयुर्वेद, युनानी व बी.एस्सी. नर्सिंग पदवीधारकांना नियुक्त केले जात आहे.

आरोग्यवर्धिनी कार्यक्रम हा केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे राज्यात राबविला जात आहे. या कार्यक्रमांतर्गत आजपावेतो ८१६६ समुदाय आरोग्य अधिकारी कार्यरत आहेत. सदर सर्व समुदाय आरोग्य अधिकारी यांना शासनाने सुनिश्चित केलेल्या जिल्ह्यांना प्राधान्य देवून टप्याटप्याने पदभरती करण्यात आली आहे. त्यामध्ये दुर्गम अतिदुर्गम भागातील आरोग्यवर्धिनी उपकेंद्रामध्ये प्राधान्याने समुदाय आरोग्य अधिकारी यांची भरती करण्यात आली आहे.

शासकीय सेवेतील दिव्यांग कर्मचाऱ्याची बदली त्याच्या राहत्या ठिकाणाजवळ करण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक - दिव्यांग सुधारित शब्द क्रमांक १००४/पत्र क्रमांक १८/०४/१६-अ, मंत्रालय मुंबई दिनांक १५-१२-२००४ रोजी वितरीत करण्यात आला आहे. परंतू, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी स्वरुपात नियुक्ती करण्यात आलेल्या समुदाय आरोग्य अधिकारी व इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांना बदली धोरण लागू नाही.

समुदाय आरोग्य अधिकारी हे पद राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी पद आहे. सदर पदावर कार्यरत अधिकारी यांची बदली करण्याचे सध्या कुठलेही धोरण नाही.

*********************

**महाराष्ट्र विधान सभा**

**सन २०२३ चे पहिले(अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

**श्री.रवि राणा मा. विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांना दिनांक १८ जानेवारी २०२३ रोजी पत्र देऊन अमरावती जिल्ह्यातील सामान्य रूग्णालय हॉस्पिटल ला डॉक्टर भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय असे नामकरण करण्याकरिता सोबतच इतरही अमरावती जिल्ह्यातील शहरातील हॉस्पिटलचे नामकरण करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यासाठी जिल्हाधिकारी अमरावती यांचे कडे दिला असणे. तसेच यांच्या मार्फत राज्याचे माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री यांनाही प्रस्ताव पाठविला असणे त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांना प्राप्त पत्रा प्रमाणे अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र दिनांक २३ जानेवारी २०२३ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा सामान्य रूग्णालय अमरावती यांना वरील नामकरण करण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले असणे. त्यामध्ये पत्रात नमूद केल्याप्रमाणे उक्त विषयी प्रस्ताव तयार करून जिल्हाधिकारी यांचेमार्फत शासनास सादर करावा व ज्या लोकप्रतिनिधींनीही याबाबत शिफारस केली आहे त्यांना अवगत करण्याबाबत सदर पत्रात कळविले असणे. अद्याप पर्यंत शासनाकडे हा प्रस्ताव प्राप्त झाला नसणे अमरावती जिल्ह्यातील नागरिकांनी वरील नामकरण याबाबत वारंवार विचारणा होत असणे म्हणून शासनाने तातडीने निर्णयात्मक आदेश काढण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व या संबंधाने शासनाची प्रतिक्रिया व शासनाची भूमिका."

<u>प्रा. डॉ. तानाजी सावंत मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, यांचे निवेदन.</u>

अमरावती जिल्हयातील इर्विन हॉस्पीटल या नावाने प्रसिध्द असलेल्या जिल्हा सामान्य रुग्णालयाला भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय असे नामकरण करण्याकरीता शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत मा.खासदार सौ.नवनीत रवि राणा अमरावती जिल्हा यांनी यांचे पत्र दिनांक ३०.१२.२०२२ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांना कळविले आहे. तसेच सदर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यांचे पत्र दिनांक २३.०१.२०२३ अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, अमरावती या कार्यालयास कळविले आहे.

त्याचप्रमाणे अमरावती जिल्हयातील डफरिन या नावाने प्रसिध्द असलेले स्त्री रुग्णालयाला राजमाता जिजाऊ रुग्णालय असे नामकरण करण्याकरीता शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत मा.खासदार सौ.नवनीत रवि राणा, अमरावती जिल्हा यांचे पत्र दिनांक ०२.०१.२०२३ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना कळविले आहे. तसेच सदर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यांचे पत्र दिनांक १३.०१.२०२३ अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, अमरावती या कार्यालयास कळविले आहे.

अमरावती जिल्हयातील स्त्री रुग्णालयाचे परिसरात विस्तारीकरण बांधकाम पूर्ण झालेली २०० खाटांची क्षमता असलेल्या नविन इमारतीला (रुग्णालयाला ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालय) असे नामकरण करण्याकरीता शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत मा.खासदार सौ.नवनीत रवि राणा अमरावती जिल्हा यांनी यांचे पत्र दिनांक ०२.०१.२०२३ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना कळविण्यात आले आहे. तसेच सदर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यांचे चे पत्र दिनांक २३.०१.२०२३ अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, अमरावती या कार्यालयास कळविण्यांत आले आहे.

वरील तीनही प्रस्ताव जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, अमरावती यांनी दि.१६.०२.२०२३ च्या पत्रान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांना पाठविले असून, उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला यांनी दि.२८.०२.२०२३ च्या पत्रान्वये आयुक्तालयास सादर केले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि.१ जून, २०१२ नुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील आरोग्य संस्था व इतर मालमत्तेला महापुरुषांचे नाव देण्यास खालील कारणामुळे मनाई करण्यात आली आहे.

१. कोणतेही नाव सुचविले असता त्याबाबत मत भिन्नता निर्माण होण्याची शक्यता असते.
२. एकदा ही पद्धत मान्य केल्यास नावे देण्याचे व ते बदलण्याचे वेळोवेळी वजास्त प्रस्ताव प्राप्त होत जातील.
३. नाव देण्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न त्या त्या भागात निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
४. नावे देण्याच्या प्रस्तावास राजकीय स्वरुप देण्याची बऱ्याच वेळा शक्यता असते.

वरील प्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील आरोग्य संस्था व इतर मालमत्तेला महापुरुषांचे नाव न देण्याबाबत धोरण शासन निर्णय दि.१ जून, २०१२ नुसार निश्चित करण्यात आले आहे.

****************

## महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सूचना

मा.श्री.बबनराव लोणीकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे :-

"जालना जिल्हयातील परतूर शहराची लोकसंख्या ६० हजारापेक्षा अधिक असून मंठा शहराची लोकसंख्या देखील ५० हजार पेक्षा अधिक असणे, परतूर व मंठा येथे सन २०१७ पासून ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असणे, या ठिकाणी असलेल्या ग्रामीण रुग्णालयावर या शहराचा भार असल्यामुळे येथे उपजिल्हा रुग्णालय होणे अत्यंत गरजेचे असणे, परतूर व मंठा या दोन्ही तालुक्याची ठिकाणे दोन राष्ट्रीय महामार्गाने जोडल्या गेले असल्यामुळे त्यात शेगाव पंढरपूर पालखी मार्ग, संभाजीनगर-नांदेड राष्ट्रीय महामार्ग यांचा समावेश असणे, त्यामुळे या ठिकाणी अपघाताचे प्रमाण जास्तीचे असून अशा वेळेला आरोग्याच्या सुविधा ऐनवेळी उपलब्ध होत नसणे, परतूर व मंठा या ग्रामीण रुग्णालयाच्या उप जिल्हा रुग्णालय रुपांतर प्रस्तावास तात्काळ मान्यता मिळणे आवश्यक असणे, परतूर व मंठा या दोन्ही तालुक्यातील लोकसंख्येची घनता बघता उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आरोग्याच्या अधिकाधिक सुविधा उपलब्ध होणे गरजेचे असल्याने याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.प्रा.डॉ. तानाजी सावंत मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण यांचे निवेदन :-

परतूर (जि.जालना) या ग्रामीण रुग्णालयाचे ३० खाटांवरुन ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत तत्कालीन पालकमंत्री यांनी दि.१५.५.२०१५ रोजी दिलेल्या सूचनेनुसार आयुक्तालयाने सदरहू प्रस्ताव तपासून दि.२८.७.२०१५ रोजी शासनास सादर केला होता. तद्नंतर आयुक्तालयाने दि.२०.९.२०१९ च्या पत्रान्वये फेर सुधारित प्रस्ताव शासनास सादर केला होता. दरम्यानच्या काळात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.८.१२.२०२१ रोजी परतुर (जि.जालना) या ग्रामीण रुग्णालयाचे ३० खाटांवरुन १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत तत्कालीन मा.आरोग्यमंत्री महोदय यांना विनंती केली होती. परंतू यापूर्वी आयुक्तालयाने दि. २०.०९.२०१९ च्या पत्रान्वये परतूर, जि.जालना या रुग्णालयाचे ३० खाटांवरुन ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला असून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी परतूर, जिल्हा जालना या ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करणेबाबत विनंती केली असल्याने त्याअनुषंगाने प्रस्ताव तपासून योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

शासन निर्णय दि.१७ जानेवारी, २०१३ अन्वये ग्रामीण रुग्णालय, मंठा चे ३० खाटांवरुन ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयास मान्यता प्रदान करण्यांत आलेली आहे. त्या अनुषंगाने उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ, औरंगाबाद यांचेकडून दि.४.२.२०२२ च्या पत्रान्वये

सदर श्रेणीवर्धीत उपजिल्हा रुग्णालय, मंठा करीता मुख्य इमारतीचे बांधकामाचे रु.३२१३.१९ लक्ष व निवासस्थानाच्या बांधकामाचे रु.२८७८.९१ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक व आराखडे मान्यतेकरीता दि.२५.४.२०२२ रोजी शासनास सादर करण्यांत आले होते. सदरहू प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.११.१०.२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यतेकरीता सादर करण्यांत आला होता. तथापि, सदरहू बैठकीमध्ये प्रस्तुत प्रस्तावाची विहित मानके/ नजिकच्या परिसरातील अस्तित्वातील रुग्णालये विचारात घेवून, सदर परिसरात नविन उपजिल्हा रुग्णालयाच्या अधिकारी / कर्मचारी निवासस्थानाची आवश्यकता/गरज आहे किंवा कसे याची पुनःश्च तपासणी करण्यास सूचित केले होते. त्याअनुषंगाने शासनाने दि.२३.११.२०२२ च्या पत्रान्वये आयुक्तालयास कळविण्यात आले असून सदर माहिती प्राप्त होताच त्याअनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

ग्रामीण रुग्णालय, मंठा, जि.जालना येथे संलग्न २० खाटांचे ट्रामा केअर युनिट मंजूर करण्यांत आलेले असून त्या ठिकाणी आवश्यक असणारी १५ मंजूर पदे भरलेली आहेत. तसेच त्या ठिकाणी आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध असून, अपघातग्रस्त रुग्णांवर आवश्कतेनुसार उपचार करण्यांत येत आहेत.

सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत राज्याचा बृहत आराखडाच्या प्रस्ताव सादर करतांना ज्या बाबींचा अवलंब करण्यात आला आहे त्या सर्व बाबींचा अवलंब करून सन २०११ च्या लोकसंख्येनुसार राज्याचा बृहत आराखडयाचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सन २००१ चा राज्याचा बृहत आराखडा MRSAC या शासकीय संस्थेमार्फत सॅटेलाईट मॅपिंगव्दारे तयार करण्यात आला होता. त्याच धर्तीवर सदर संस्थेकडुन सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे राज्याचा जोडबृहतआराखडा तयार करण्यासाठी MRSAC या संस्थेची नेमणुक करण्यात आली असुन राज्यातील आरोग्य संस्थाचे मॅपिगचे जवळपास काम पुर्ण झाले असुन प्रमाणीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

लोकसंख्या व अंतराच्या निकषानुसार नवीन संस्थाचे स्थान निश्चिती करण्यात येत असून त्यानुसार सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे तयार केलेल्या संस्थेच्या बृहत आराखडयाचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर संस्थाना मंजूरी देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

-------

335

५३

## महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
## विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

**(श्री.रोहित पवार, डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.छगन भुजबळ, श्री.जयंत पाटील, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री.दत्तात्रय भरणे,श्री.शेखर निकम,श्री.संजय बनसोडे,श्री.दिलीपराव बनकर,श्री.दिपक चव्हाण,श्री.हसन मुश्रीफ, श्री.अनिल पाटील, श्री.शामराव उर्फ बाळासाहेब पाटील,श्री.यशवंत माने,श्रीमती सुमन पाटील,श्री.बाबासाहेब पाटील,श्री.दिलीप मोहिते-पाटील,श्रीमती सरोज आहिरे, श्री.बाळासाहेब आजबे,श्री.संजयमामा शिंदे,डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.चेतन तुपे,श्री.मंगेश चव्हाण,श्री.विकास ठाकरे,श्री.नानाभाऊ पटोले,श्री.अमिन पटेल, श्री.विजय वडेटटीवार,श्री.अस्लम शेख,ॲड.यशोमती ठाकूर(सोनावणे),श्री.सुनिल केदार,श्री.संजय जगताप, श्री.शिरीष चौधरी,श्रीमती सुलभा खोडके,श्री.गणपत गायकवाड,श्री.कुमार आयलानी,डॉ.किरण लहामटे, श्री.पृथ्वीराज चव्हाण, श्री.संदिप क्षिरसागर, श्री. धनंजय मुंडे, श्री. अजित पवार वि.स.स.)**

"सन 2016 मध्ये मुंबईतील अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवस्मारकांच्या प्रकल्प कामाचे मा.पंतप्रधान यांचे हस्ते जलपूजन करण्यात आलेले असणे, त्यानंतर शिवस्मारकाच्या या प्रकल्पामुळे पर्यावरणाला धोका असल्याचे तर मत्स्यव्यवसायाला फटका बसणार असल्यामुळे पर्यावरणप्रेमी व मच्छीमार संघटना, यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यावर, मा.न्यायालयाने त्याबाबत तोंडी स्थगिती दिल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे न्यायालयाच्या निर्देशानुसार, स्मारकाचे काम बंद ठेवण्यात आले असल्याचे माहे जानेवारी 2019 मध्ये निदर्शनास येणे, त्या विरोधात राज्य शासनाने सदर कामावरील बंदी उठविण्याबाबत माहे फेब्रुवारी, 2019 मध्ये केलेली विनंती मा.न्यायालयाने फेटाळली नसल्याचे सांगण्यात येणे, शिवस्मारकाच्या कामासंदर्भातील ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता, शासनाने शिवस्मारकाचे काम सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

.................................................................................................................................

## मा.मंत्री, सा.बां. (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

मुंबई लगतच्या अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २८ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या कामासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर निविदा मागवून आवश्यक त्या निविदा प्रक्रीया पूर्ण करुन दि. २८ जून, २०१८ रोजी कंत्राटदार मे. लार्सन अँड टुब्रो यांच्या सोबत रू. २५८१ कोटी + वस्तु व सेवा कर इतक्या रकमेसाठी करारनामा करण्यात आला. करारनाम्यातील अटीनुसार कंत्राटदारास दि. १९ ऑक्टोबर, २०१८ ही Commencement date देण्यात आली. कार्यारंभ आदेशानंतर कंत्राटदाराकडून सर्वेक्षण, चाचणी इ. कामे सुरू करण्यात आली होती. करारनाम्यानुसार प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी Commencement date पासून ३६ महिने म्हणजेच दि. १८ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत होता.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १९ डिसेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुंबई लगत अरबी समुद्रात उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकास रु. ३६४३.७८ कोटी रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

प्रकल्पाचा पर्यावरण दाखला व इतर अनुषंगीक बाबींच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. ५८/२०१७ व जनहित याचिका क्र. ८/२०१८ दाखल करण्यात आलेल्या होत्या. मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी या दोनही जनहित याचिकांच्याबाबत अंतरीम दिलासा न दिल्यामुळे याचिका कर्त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुमती याचिका दाखल केली होती. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दि. ११ जानेवारी, २०१९ रोजी विशेष अनुमती याचिकेच्या सुनावणी दरम्यान प्रतिवाद्यांना उत्तर सादर करण्याची नोटीस निर्गमित करून Not to proceed with construction activity असे आदेश दिले होते. सदरची बाब मा. सर्वोच्च न्यायालयातील शासकीय वकीलानी दि. १४ जानेवारी, २०१९ रोजीच्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागास कळविली होती. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशास अनुसरून प्रकल्पाचे काम दि. १५ जानेवारी, २०१९ पासून बंद आहे. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रकल्पासाठी जागेच्या निवडीबाबत, पर्यावरण परवानगी व इतर अनुषंगीक बाबींच्या अनुषंगाने नवीन रिट याचिका क्र. १४०२/२०१९ दाखल करण्यात आली होती. दि. ०३ मार्च, २०२० रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर घेण्यात आलेल्या सुनावणी दरम्यान विशेष अनुमती याचिका निकालात काढून रिट याचिका क्र. १४०२/२०१९ सुनावणीसाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेल्या जनहित याचिका क्र. ५८/२०१७ सोबत चालवण्याचे निर्देश दिले होते.

यापैकी दोनही जनहित याचिका प्रकरणी मा.उच्च न्यायालयात सर्व प्रतिवाद्यांनी प्रतिज्ञापत्रे सादर केलेली असून रिट याचिकेमधील चार प्रतिवाद्यांपैकी राज्य शासनाच्या सा.बां.विभाग व मत्सव्यवसाय विभाग यांची प्रतिज्ञपत्रे मा.उच्च न्यायालयात सादर झाली असून राज्याच्या व केंद्राच्या पर्यावरण विभागा मार्फत अद्याप प्रतिज्ञापत्र सादर करावयाचे असून त्याबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी सुनावणीची तारीख अद्याप जारी केलेली नाही.

मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल जनहित याचिका प्रकरणी राज्य शासनामार्फत मा. महाधिवक्ता यांच्याबरोबरच वरिष्ठ विधिज्ञ श्री. विजयसिंह थोरात हे नामांकीत विधिज्ञ शासनाची बाजू मांडत आहेत. तसेच रिट याचिका प्रकरणी शासनाची बाजू बळकट करण्यासाठी शासनामार्फत नामांकित व वरिष्ठ विधीज्ञ श्री. दरायस खंबाटा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रकल्पासंबंधी दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणांच्या आदेशास अनुसरून पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

.....................................

## महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन**

**कुमारी आदिती तटकरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील लोणेरे नजीक रेपोली गावाजवळ दि. 19 जानेवारी, 2023 रोजी ट्रक आणि इको कारमध्ये समोरासमोर धडक होऊन भिषण अपघात होणे, या दुर्देवी अपघातात एकाच कुटूंबातील दहा जणांचा मृत्यू होणे, अद्याप शासनाकडून मृतांच्या वारसांना मदत न मिळणे, महामार्गाच्या दुरावस्थेमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असणे, काही ठिकाणी उड्डाणपूल आणि दुभाजकाची कामे सुरु असल्याने रस्त्यावरील वाहतूक डायव्हर्ट करण्यात आली असणे, असे असतांना महामार्गावर कुठेही वाहतूक डायव्हर्ट केल्याचे फलक किंवा दिशादर्शक फलक लावले नसणे, वाहनचालक गोंधळात पडून अनेक छोटे मोठे अपघात होणे, महामार्ग व्यवस्थेच्या निष्काळजीपणामुळे दहा निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागणे, सदर अपघाताची शासनाकडून सखोल चौकशी होणे, दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणे, सततच्या अपघातांमुळे कोकण परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चीडीची भावना, दुरावस्थेत असलेल्या महामार्गावरील अपघातांच्या वाढत्या प्रमाणामुळे त्यांचेमध्ये निर्माण झालेले चिंतेचे तथा हवालदिल वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (सार्वजनिक बांधकाम (सा.उ.वगळून) यांचे निवेदन

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ लांबीवरील इंदापूर कि.मी. ८४/००० ते कि.मी. ११०.७५० या पॅकेज क्र.१ मधील लांबीमध्ये रेपोली गावाजवळ कि.मी. १०३.५६० मध्ये दि. १९.०१.२०२३ रोजी पहाटे सुमारे ४.४० वाजता ट्रक आणि इको कारमध्ये समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात घडल्याची व १० लोक मृत्यूमुखी पडल्याची घटना घडली आहे. सदर अपघाताच्या ठिकाणी सुमारे २ कि.मी लांबीमध्ये चारपदरी काँक्रीटीकरणाचे काम जवळ जवळ पूर्ण झाले आहे. तसेच सदर अपघात झालेल्या भागाच्या लांबी मध्ये आवश्यक त्याठिकाणी सुचना फलक कंत्राटदारा मार्फत महामार्गावर लावण्यात आलेले होते.

सदर प्रकरणी पोलीस विभागा मार्फत ट्रक वाहन चालकावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या एफ. आय. आर. मध्ये, 'ट्रक वाहन चालकाने ट्रक चालवत असताना महामार्गावरील मौजे. उसरघरच्या हद्दीमध्ये मंड ढाब्या समोर महामार्गावर असलेल्या दिशादर्शक फलकाकडे दुर्लक्ष करुन ट्रक साधारण १२०० मीटर अंतर विरुध्द दिशेने अती वेगाने चालवित घेऊन जाऊन पहाटे ४.४० वाजण्याच्या सुमारास ईको कारला धडक मारल्याचे व ट्रकची फिटनेसची मुदत संपलेली असल्याचे नमुद केले आहे. तसेच सदर अपघाता बाबत गोरेगाव पोलीस स्टेशन ता.माणगाव जि.रायगड यांचे मार्फत पुढील तपास सुरु असून सदर तपासनानुसार संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

रोट। H/1769 (7/30-3-23) दळे.मा.प.

पोलीस विभागाकडून प्राप्त आकडेवारीनुसार सदर महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरु झाल्यापासुन मागील ५ वर्षामध्ये तुलनात्मकदृष्ट्या पाहता अपघातांच्या संख्येमध्ये घट झाली असून मृत्यूदरही कमी झालेला आहे.

सदर महामार्गावरील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी बाह्य वळणमार्ग काढण्यात आलेले आहेत व रस्ते सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या ठिकाणी वेगमर्यादा फलक, सूचना फलक, क्रॅश बॅरीअर, कॅट आईज, डेलिनेटर्स, ब्लिंकर्स, रिफ्लेक्टर इ. उपाययोजना करण्यात आल्या आहेत. पावसाळयामध्ये पडलेले खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.तसेच पोलीस विभागाकडून प्राप्त अहवालानुसार अपघातांच्या अनुषंगाने जड-अवजड वाहनांची वाहतूक करणाचे चालक/ मालक संघटनांचे पदाधिकारी यांची भेट घेवून चालक/मालक यांना वाहनाचे दिवे, रिफ्लेक्टर स्पष्ट दिसुन येतील याबाबत प्रबोधन करण्यात आले आहे. रस्ता सुरक्षा अभियान २०२३ अंतर्गत जड-अवजड, चारचाकी दुचाकी वाहनचालक यांना वाहतुक नियमांचे पालन करण्याबाबत प्रबोधन कार्यक्रम करण्यात आले आहेत. महामार्गावर गस्त नेमण्यात येत असून जनसंपर्क अधिक वाढवण्यात आला आहे व मृत्युंजय दुत योजनांतर्गत प्रशिक्षण देउन नेमलेले मृत्युंजय दुत यांची बैठक घेवुन त्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. ॲब्युलन्स,फायर ब्रिगेड, स्थानिक प्रशासन इ. महत्वाचे यंत्रणेचे संपर्क क्रमांक ठेवण्यात आले असून महामार्गावरील पोलीस ठाणे यांचेशी समन्वय ठेवण्यात आलेला आहे.

***************

महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. भास्कर जाधव, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (३) अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १३८५**

लक्षवेधी सूचना

"रत्नागिरी जिल्हयातील मौजे करंबवणे (ता. चिपळूण) आणि मौजे बहिरवली (ता. खेड) या दोन तालुक्यांना जोडणाऱ्या वशिष्ठी खाडीवर पूल उभारणीच्या कामास सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पीय कामांमध्ये निधीसह मंजुरी मिळालेली असणे, चिपळूणसह खेड, दापोली, मंडणगड तालुक्यातील प्रवाशी व पर्यटकांसाठी हा पूल सोयीचा आणि किमान ८० ते १०० किलोमीटर अंतर वाचविणारा असणे, असे असताना गेल्या पाच वर्षात पुलाच्या कामाला सुरूवात न होणे, याबाबत तारांकीत प्रश्नांच्या माध्यमातून शासनाला विचारणा केली असता 'सदर कामाबाबत तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्याच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करून आवश्यक परवानग्या प्राप्त करण्याचे नियोजन आहे' असे लेखी उत्तर गेली ५ वर्ष वेळोवेळी देण्यात येणे, त्यामुळे या प्रक्रियेला खरंच इतका कालावधी लागतो का ?, की या पुलाचे काम होवू नये याकरिता जाणीवपूर्वक विलंब केला जात आहे ? असे प्रश्न निर्माण होणे, पाच वर्ष उलटूनदेखील कामाला सुरूवात न झाल्याने चिपळूण, खेड, दापोली, मंडणगड या तालुक्यांतील नागरिक व प्रवाशांमध्ये निर्माण झालेली प्रचंड संतापाची व चिडीची भावना, या कामाच्या विलंबास जबाबदार संबंधितांवर कारवाईची होत असलेली मागणी, ही गंभीर बाब लक्षात घेवून याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा.श्री. रविंद्र चव्हाण, मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन**

रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यातील चिंचघर कोरेगांव मुंबके बहिरवली भडवळे प्र.जि.मा.१४ रस्त्यावर दाभोळ खाडीवर बहिरवली (खेड) ते करंबवणे (चिपळूण) दरम्यान मोठया पुलाचे बांधकाम करणे, या कामास मार्च २०१७ मध्ये रु. ३९००.०० लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

चिंचघर कोरेगांव मुंबके बहिरवली भडवळे रस्ता हा प्रजिमा १४ दर्जाचा आहे. या रस्त्याची लांबी ४१.०० कि.मी. इतकी असून, रूंदी ५.५० मी. आहे. मौजे बहिरवली हे गाव चिंचघर कोरेगांव मुंबके बहिरवली भडवळे रस्ता प्रजिमा-१४ च्या कि.मी. ३१/०० मध्ये आहे. वाशिष्ठी नदीपलिकडील बाजूस चिपळूण तालुक्यातील मौजे करंबवणे गाव आहे. मौजे करंबवणे हे गाव चिपळूण तालुक्यामध्ये कोंढे करंबवणे प्रजिमा २४ च्या कि.मी. १२/०० मध्ये आहे. दाभोळ खाडीवर बहिरवली (खेड) ते करंबवणे

(चिपळूण) दरम्यान मोठा पुल झाल्यास चिपळूण, खेड, दापोली व गुहागर हे चार तालुके कमी अंतराने जोडले जातील.

अधिक्षक अभियंता, संकल्प चित्र मंडळ, कोकण भवन यांनी सदर पूल हा केबल स्टेड लॉग स्पॅन ब्रिज करण्यास सूचविले व त्याअनुषंगाने पुलाचे सर्वसाधारण मांडणी नकाशा व संकल्पने तयार करण्याकरीता ऑगस्ट,२०१८ मध्ये तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली. सदर ठिकाणी ५९८ मीटर लांबीचा व रक्कम रु.१४५.४६ कोटीचा केबल स्टेड लॉग स्पॅन ब्रिजचा प्रस्ताव तज्ञ सल्लागाराने विभागास सूचविला. सदर पुलाची पोचमार्गची जागा राखीव वनक्षेत्र, कांदळवन क्षेत्र,सीआरझेड क्षेत्र यामूधन जात असल्याने सक्षम प्राधिकारणाची मान्यता घेणे व पोचमार्गाकरीता भूसंपादन आवश्यक असल्याचे निर्दशनास आले. सदर कार्यवाही अत्यंत विस्तृत व तज्ञ स्वरूपाची आहे. विविध विभागांचा अंतर्भाव असल्यामुळे संबंधित विभागांना स्वतंत्र तांत्रिक प्रस्ताव सादर करणे, त्यासाठी विविध स्तरावरील सर्वेक्षण आयोजित करणे व सातत्याने प्रस्तावाचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. सदर प्रकल्पाकरिता आवश्यक परवानगी प्राप्त करण्यासाठी दि. ०६/०२/२०२३ रोजी तज्ञ सल्लागार यांची नेमणुक करण्यात आली आहे. या सर्व परवानग्या प्राप्त झाल्यानंतरच प्रत्यक्ष पुलाचे अंदाजपत्रक तयार करणे, सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता करुन निविदा निश्चिती नंतर प्रत्यक्ष काम सुरु करुन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

******************************

३४९ १४६३

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना ~~क्र.५४०८८०१/फ~~ १४६३

**श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) पवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम क्र. १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना ~~क्र.५४०८८०१/फ~~ पुढीलप्रमाणे आहे:-**

""आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभाग कळवण यांच्या अखत्यारित पॅकेज न. एनएसके- ५४ (A & B) नाशिक जिल्ह्यातील सटाणा कळवण दिंडोरी निफाड व सिन्नर तालुक्यातील नामपूर-सटाणा-कळवण-वणी पिंपळगाव निफाड सिन्नर रस्ता रामा २७ कि.मी. ०/०० ते ७३/८०० ची सुधारणा करणे, सटाणा, कळवण, दिंडोरी, निफाड व सिन्नर जि. नाशिक (ब) नाशिक दिंडोरी, वणी प्रमुख राज्य क्रमांक ३ कि.मी. १०/७५० ते ४२/५०० रस्ता दिंडोरी ते वणी ची सुधारणा करणे या कामास सन २०१७ मध्ये प्रशासकीय मान्यता देवून मंजुरी देण्यात येणे, सदर रस्त्यास कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, नाशिक यांनी दिनांक ५ एप्रिल, २०१९ रोजी संबंधित मक्तेदार एजन्सीस कार्यारंभ आदेश देणे, मुळ प्रकल्पाची किंमत १९४.९२ कोटी इतकी असणे हा रस्ता कळवण शहरातून जात असणे, कळवण शहर हे तालुक्याचे ठिकाण असून सन २०१७ ते २०१९ या दोन वर्षाच्या काळात या ना त्या कारणाने रस्ता दुर्लक्षित राहिल्याने प्रत्यक्ष काम हे ठेकेदाराच्या चुकीमुळे संथ गतीने सुरु होणे, रस्त्याच्या कामात होणा-या विलंबामुळे नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागणे, या रस्त्याचा खर्च ४० टक्के सरकार तर ६० टक्के खासगी सहभागातून केला जाणार असणे, त्यात १५ वर्षे रस्त्यांची देखभालही ठेकेदाराला करावी लागणार असल्याचे करारनाम्यात नमूद असणे असे असतांना देखील सदरचा रस्ता गेल्या ५ वर्षापासून रस्त्याचे काम खोळबंणे, सदरचा रस्ता संबंधित मक्तेदार एजन्सीने वेळेत पूर्ण न करणे, ठेकेदाराच्या दिंरगाईस सार्वजनिक बांधकाम विभागाने पाठीशी घालणे, वेळोवेळी संबंधित मक्तेदार एजन्सीस कामास मुदतवाढ देणे, रस्त्याच्या संथगतीमुळे व रस्त्याच्या धुळीमुळे स्थानिक नागरिकांना फुफुसाचे आजार होणे, रस्त्याचे काम वेळोवेळी बंद ठेवल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली नाराजीचे वातावरण, याच मार्गावर साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेले श्री सप्तश्रृंगी देवीचे पीठ असून या ठिकाणी देशभरातून भाविक दर्शनासाठी येत असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असणे परंतु सदर रस्त्याचे काम संथगतीने होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होणे, ऑक्टोबर महिन्यात ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे २ निष्पाप नागरिकांना याच रस्त्यावर अपघात होवून आपला जीव गमवावा लागणे, परिणामी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी कळवण शहर बंद ठेवून संबंधित मक्तेदार एजन्सीवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची तहसिलदार व कळवण पोलीस स्टेशनकडे मागणी करणे, स्थानिक लोकप्रतिनीधींनी देखिल जिल्हा वार्षिक सभेत मा. पालकमंत्री यांच्या ही गोष्ट निदर्शनास आणून देवून मक्तेदार एजन्सीवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करणे, पालकमंत्री यांनी देखिल संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत

शेषा (H-1393-1 — 750)

चौकशी करुन गुन्हा दाखल करण्याचे आदेश देणे, पालकमंत्री यांनी आदेश देवून देखिल सदर मक्तेदार एजन्सीवर कोणतीही कारवाई न होणे, या सर्व कारणांमुळे नागरिकांत प्रशासनाविरोधात व शासनाविरोधात असंतोषाचे वातावरण तयार होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.""

---

**मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.**

हायब्रिड ॲन्युईटी योजने अंतर्गत

१) नाशिक जिल्हयातील सटाणा कळवण दिंडोरी निफाड व सिन्नर तालुक्यातील नामपूर-सटाणा-कळवण- वणी- पिंपळगांव निफाड सिन्नर रस्ता रामा-२७ कि.मी.०/०० ते ७३/८०० ची सुधारणा करणे. सटाणा, कळवण, दिंडोरी, निफाड व सिन्नर जि. नाशिक.

ब) नाशिक जिल्हयातील दिंडोरी, वणी प्रमुख राज्य क्रमांक ३ कि.मी. १०/७५० ते ४२/५०० रस्ता दिंडोरी ते वणी ची सुधारणा करणे.

या कामांस सन २०१७ मध्ये रू. १५२,८२,१२,४२९/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानंतर सदर कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण करून दि.०५/०४/२०१९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले. बांधकामाचा कालावधी २ वर्षे असून देखभाल व दुरूस्तीचा कालावधी पुढील १० वर्षे आहे.

दिनांक ०९ ऑक्टोबर २०२२ रोजी कळवण शहराजवळील बेळडी नदीच्या पुलाच्या नजीक रामा-२७ वरील (सा.क्र.४७/४५०) कळवण बाजूकडून नाशिक बाजूकडे जाणाऱ्या बस चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून त्याचे ताब्यातील बस भरधाव वेगाने व बेदरकारपणे चालविल्याने अपघात झाल्याची नोंद कळवण पोलीस स्टेशन येथे नोंदविलेल्या FIR मध्ये आहे. सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे

सदर अपघाताच्या ठिकाणी चौपदरी रस्ता असून, रस्त्याच्या मध्यभागी कॉंक्रिटचे दुभाजक आहे व रस्त्याच्या पलीकडच्या बाजुस काम प्रगतीत असल्याने, कामाची ठिकाणी माहिती फलक, सुचना फलक व रस्ते सुरक्षा उपाययोजना करण्यात आले होते.

सदर रस्त्याच्या प्रगतीत असलेल्या लांबी व्यतिरिक्त इतर लांबीत डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरून रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत ठेवण्यात आले आहे.

संबंधित कंत्राटदारास कोव्हीड दरम्यान काम बंद असणे, शेतकऱ्यांनी घेतलेल्या हरकतीमुळे व वन विभागाच्या मंजुरीच्या कारणास्तव मुदतवाढ देण्यात आली होती. कंत्राटदाराने मुदतवाढ देवूनही वेळेत काम पुर्ण न केल्याने सदर प्रकरणी संबंधीत कंत्राटदारावर करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

***************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**श्री.धिरज देशमुख, वि.स.स.,यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील खरोळा फाटा ते पानगाव दरम्यानच्या रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या (क्र.361एच) दुरुस्तीचा प्रस्ताव अनेकवेळा शासनास पाठवूनही त्याला अदयापपर्यंत मंजुरी मिळाली नसणे, सदर रस्त्याच्या दुरावस्थेमुळे अपघात होऊन नागरिक, शाळेतील मुलांचा बळी गेला असणे, याकडे व रस्त्याअभावी होणा-या गैरसोयीकडे शासन – प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी परिसरातील नागरिकांनी अनेकवेळा गावबंद आंदोलने व रस्ता रोको केला असणे, नागरिकांनी वेळोवेळी निवेदने सादर करुन आंदोलने करणे, शासन- प्रशासनाचा निषेध करुन रोष व्यक्त केला असणे, तरीही याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

## मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ बी लातूर-रेणापूर व राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ एच रेणापूर ते पानगाव या एकुण ४१.९५ कि.मी. लांबीसाठी रु.३३६.४७ कोटी एवढया रक्कमेचे कामास दि.२८.०३.२०१८ रोजी प्रादेशिक अधिकारी, रस्ते परिवहन व राजमार्ग मंत्रालय,मुंबई यांनी मंजुरी प्रदान केली होती. यामधील खरोळा फाटा ते पानगाव ही १४.२० कि.मी. एवढी लांबी वगळता संपुर्ण काम कंत्राटदाराने पुर्ण केले. १४.२० कि.मी. लांबीतील जागा स्थानिक शेतक-यांकडुन अडवणुक व न्यायालयीन प्रकरणांमुळे विहीत वेळेत कंत्राटदारास उपलब्ध न झाल्यामुळे या लांबीतील काम मूळ निविदेमधुन दि.११.०८.२०२१ रोजी केंद्रीय रस्ते, परिवहन व राजमार्ग मंत्रालय,यांचेकडून रद्द करण्यात आले आहे. उर्वरित लांबीच्या रस्त्याची संयुक्त मोजणी भूमी अभिलेख विभागामार्फत करुन भूसंपादनाचा अहवाल व उर्वरित कामासाठी रु.४८.६० कोटी एवढया रक्कमेची प्राप्त निम्नतम निविदेचा प्रस्ताव मंजुरीसाठी प्रादेशिक अधिकारी, केंद्रीय रस्ते परिवहन व राजमार्ग मंत्रालय,मुंबई यांना दि.२७.१२.२०२२ रोजी सादर केलेला आहे. तत्पुर्वी २६.१२.२०२२ रोजी पानगाव परिसरातील नागरिकांनी केलेल्या आंदोलनाची दखल घेवुन निवीदा मंजुर होणेबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असून त्यास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येईल दरम्यान सदर रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

***************

रोटा H/1770 (750-3-23)

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.१८८८

मा. श्री.सुभाष धोटे, ॲड यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.अस्लम शेख, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.सुनिल केदार, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील चंद्रपूर जिल्हा स्थित गडचांदूर ते नांदाफाटा या रस्त्याच्या दुरुस्ती, मजबूती व डांबरीकरणाच्या कामाकरिता सहा कोटी रुपये मंजूर झाले असून तब्बल वर्षभरानंतर परत सदरहू रस्त्याचे काम सुरु असणे, कुठलीही दुरुस्ती, मजबुती न करता थेट मातीवर डांबरीकरण केले जात असल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी काम बंद करुन चक्क हाताच्या बोटांनी डांबरीकरण केलेला रस्ता कसा उखडत आहे, याचा विडिओ व्हायरल केल्याने डांबरीकरण कामाचा फोलपणा उघड होऊन बोजवारा उडाल्याचे दिसून येणे, सहा कोटी रुपये खर्च करु सदरहू रस्ता निकृष्ट दर्जाचा बनवण्यात आल्याची चौकशी करुन संबंधित कंत्राटदारावर दंड बसवण्याबाबत मांगणी करुनही त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग, गडचांदुर कार्यालयाशी संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असणे, वर्क ऑर्डर मिळून एक वर्ष पूर्ण झाले परंतु अद्याप प्रत्यक्षात काम सुरु झाले नसणे, कंत्राटदाराने सदरहू काम दुस-या कंत्राटदारास दिले असून पावसाळयापूर्वी केलेल्या रस्त्याच्या कामात अनेक ठिकाणी मोठ-मोठ खड्डे पडल्याने सदरहू रस्त्याचे मजबुतीकरण करण्याची निकड असणे, सदरहू प्रकरणी शासनामार्फत कोणतीही दखल घेण्यात येत नसल्याने या विभागातील नागरिकांमध्ये शासनाप्रति वाढता असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.

चंद्रपूर जिल्हयातील कोरपना तालुक्यातील सावंगी बाभुळगांव राळेगांव वडीकी वणी वनोजा अंतरगांव गडचांदुर देवाडा रा.मा.क्र.३१७ सा.क्र.कि.मी. २१६/००० ते २१९/००० या कामास रु.३०० लक्ष इतका रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

चंद्रपूर जिल्हयातील कोरपना तालुक्यातील सावंगी बाभुळगांव राळेगांव वडीकी वणी वनोजा अंतरगांव गडचांदुर देवाडा रा.मा.क्र.३१७ सा.क्र.कि.मी. २१९/००० ते २२१/४०० या कामास रु.३०० लक्ष इतका रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक २१-०१-२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

सदर कामांचा वाव रुंदीकरणासह डांबरीकरण, मजबुतीकरण, कॉक्रीट रस्ता व कॉक्रीट नाली असा आहे. साखळी क्र.२१६/०० ते २१९/०० मध्ये मजबुतीकरणासह डांबरीकरण १४००.०० मिटर, कॉक्रीट रस्ता लांबी १००.०० मिटर पूर्ण झाली असून, कॉक्रीट नाली व रस्ता रुंदीकरणाचे काम प्रगतीत आहे.तसेच साखळी

क्र.२१९/०० ते २२१/४०० मध्ये मजबुतीकरणासह डांबरीकरण लांबी २१००.०० मीटर,कॉक्रीट रस्ता लांबी २००.०० मीटर पूर्ण झाली असून, कॉक्रीट नालीचे काम प्रगतीत आहे.

सदरची कामे संबंधीत कंत्राटदार कार्यान्वित करत आहे.सन २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे व राज्य मार्ग क्र.३७४ चे प्रगतीत असलेले कॉक्रिटीकरणाचे कामामुळे या रस्त्यावर वळविलेल्या वाहतुकीमुळे रस्त्यावर काही ठिकाणी पडलेले खड्डे दुरुस्त करण्यात आले असून रस्ता वाहतुकीकरिता सुस्थितीत आहे.

रस्त्याचे डांबरीकरण करण्यापूर्वी सदर रस्त्यावर काही प्रमाणात खड्डे होते. ते खोलीनुसार खडीकरणाने व डांबरीकरणाने (MPM) भरण्यात आलेले आहेत. तसेच डांबरी नुतनीकरणाकरिता रस्त्याचा पृष्ठ भाग स्वच्छ करुन करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे आवश्यक डांबरीकरणाचे काम करण्यात आले आहे.

दरम्यान गावातील काही नागरिकांनी दि.०८-०१-२०२३ रोजी नुकतेच पसरविण्यात आलेले व दबाई प्रगतीत असलेले बीटुमिनस मॅकेडम ( BM) हाताने उखडून काढल्यामुळे, सदर रस्त्याच्या काठावरील थर निघत होता. सदर थर हा नुकताच टाकलेला व दबाई प्रगतीत असलेला भाग होता. त्यामुळे डांबरीकरणाचा थर काढणे शक्य झाले होते. सदर थराचे पुर्ण दबाई झाल्यानंतर व थराचे डांबरीकरण घट्ट झाल्यानंतर या रस्त्याच्या लांबीमध्ये डांबरीकरण कुठेही उखडल्याचे आढळून आले नाही.

सदर कामे मार्च २०२३ पर्यत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

***************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. कैलास घाडगे पाटील, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अस्लम शेख, श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे -:

"सार्वजनिक बांधकाम विभाग वरळी, मुंबई येथील शासकीय इमारतीचे सन २०१८ व त्यापासून पुढे स्नेहा अ, ब, कावेरी, गोमती, शरावती, विसावा, शितल, दर्शना या शासकीय निवासस्थान इमारतीचे दुरुस्तीचे काम हाती घेतलेले असणे, हे काम एकाच व्यक्तीच्या तीन वेगवेगळया कंपनीस दिलेले असणे, काम अत्यंत संथ गतीने सुरु असणे, निवासस्थानाची कामे अर्धवट व महीनोमहिने बंद अवस्थेत ठेवणे, यामुळे निवासी इमारतीमधील रहिवाशांना धुळीचा प्रचंड त्रास होणे, यातुन वयोवृध्द, स्थानिक रहिवाशी यांना आरोग्यच्या समस्या उदभवणे, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु असलेले दुरुस्तीचे काम यामध्ये वापरण्यात आलेल्या साहित्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट असणे, यामुळे निवासस्थानामध्ये पाणी लिकेज होणे, कलर निघून जाणे, फरश्या तुटणे यासारख्या अनेक समस्या समोर जावे लागत आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाने साहित्याचा दर्जा व गुणवत्ता याची तपासणी न करणे, अल्प कालावधीतच काम पुर्ण करणे यावर कंत्राटदाराचा भर असल्यामुळे काम अर्धवट अवस्थेतच सोडून गेल्यामुळे सदर बिल्डिंगमध्ये अस्तव्यस्त सामान पडून असणे, व यामुळे रहिवाशांना त्रास होणे कंत्राटदाराने केलेल्या कामास अल्प कालावधीतच भिंतीला तडे जाणे, पाणी लिकेज होणे, भिंती ओल्या होणे यासारख्या समस्या उदभवणे या प्रकारच्या काम सुरु असताना विभागाचे अधिकारी सहाय्यक अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी आवश्यक ते निरीक्षण व पर्यवेक्षण न ठेवणे यामुळेच कंत्राट दराने निकृष्ट दर्जाचे काम करणे, सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिका-यांना रहिवाशांनी कामाची विचारपूस केल्यास दमदाटी व उद्ध्टपणे बोलणे, शासकीय निवासस्थानाचे निकृष्ट काम काम झाल्यामुळे कधीही अपघात होण्याची शक्यता निर्माण होणे, इमारतीमधील वरच्या मजल्यावर उंदीर पाईपने चढणे, निवासस्थान व परिसरामध्ये स्वच्छता न राखणे, यामुळे रहिवाशांचे आरोग्य धोक्यात येणे, याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार करुन देखील कोणतेही कारवाई न करणे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना गोमती इमारतीमध्ये शासकीय निवासस्थान वाटप होणे या निवासस्थानाची दुरुस्तीचे काम देखील याचकंत्राटदाराने हाती घेणे, या दुरुस्तीकरीता उच्च दर्जाचे साहित्य वापरणे, यामुळे इतर रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरणे कंत्राटदाराने या निवासस्थानाचे विशेष लक्ष देऊन पाठपुरावा करुन काम अल्पकालावधीतच पूर्णत्वास नेणे तसेच टेंडर मध्ये नमूद कामापेक्षा अधिकचे काम हाती घेणे, कार्यकारी अभियंता व कंत्राटदाराचे संगणमत असणे, स्नेहा अ व ब येथे पिझ्झा बॉय कडुन मुलीवर अत्याचार व चोरी झाल्याचे स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हां दाखल असुन सुध्दा कोणत्याच सुरक्षेचा उपाययोजना नसने व सी.सी.टी.व्ही गेल्या अनेक वर्षापासून बंद अवस्थेत असणे, या संपुर्ण कामाची चौकशी केल्याशिवाय अंतिम देयक अदा करु नये अशी रहिवाशांची विनंती असणे, रहिवाशी पार्किंगमध्ये नियमबाहय वर्षानुवर्ष बाहेरील व्यक्तींच्या गाडया पार्कींग करुन ठेवणे, शासकीय वसाहतीमध्ये शासनाची परवानगी न घेता भाडेपटयाने जाहिरातीचा फलक लावणे त्यासाठी वृक्षतोड व भ्रष्ट्राचार करणे, कार्यकारी अभियंता यांच्याकडे बीडीडी वरळी चा कार्यभार असणे, बीडीडी वरळी येथील कलेल्या कामामध्ये प्रचंड भ्रष्ट्राचाराच्या तक्रारी नागरीकांनी करणे याबाबत तातडीने करावयाची कारवाई व उपाय योजना."

---

मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभाग यांचे निवेदन

वरळी, मुंबई येथील स्नेहा अ व ब या इमारतींचे बांधकाम सन १९८४-८५ या कालावधीमध्ये झाले असून, प्रत्येक इमारत ही तळ+४ मजले स्वरुपात असून, स्नेहा अ व ब या इमारतींचे बांधकाम क्षेत्रफळ ३३१५.०० चौ.मी आहे. सदर इमारतींमध्ये अनुक्रमे गट-अ प्रकार-१ ची संक्रमण निवासस्थाने असून, स्नेहा अ इमारतीमध्ये २० व स्नेहा ब इमारतीमध्ये १८ सदनिका अशा एकूण ३८ निवासस्थाने आहेत. इमारतीचे बांधकाम आरसीसी पध्दतीचे आहे. सदर इमारतींचे सरासरी आयुर्मान ३८ वर्षे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार या दोन्ही इमारतींचे संरचनात्मक परिक्षण मे-२०१५ तसेच फेब्रुवारी-२०२१ मध्ये करण्यात आले. इमारतीची तत्कालीन स्थिती, इमारतीचे आयुर्मान व संरचनात्मक परिक्षण अहवालातील शिफारशीनुसार सदर इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती व अंतर्गत नुतनीकरणाच्या कामास माहे ऑक्टोबर २०२० मध्ये रु.३१७.२६ लक्ष रकमेस विविक्षित दुरुस्ती अंतर्गत मंजुरी प्रदान करण्यात आली. खुल्या निविदा पध्दतीव्दारे,

निविदा प्रक्रिया करून मे.भाग्यश्री डिझाईन कन्ट्रक्शन यांना दि.२७.५.२०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. सद्यस्थितीत काम प्रगतीपथावर असून, बाह्य भागाचे काम पूर्ण झालेले असून अंतर्गत भागात हाती घेतलेल्या ३८ सदनिकांपैकी १९ सदनिकांचे काम पूर्ण झालेले आहे व उर्वरीत सदनिकांचे काम निवासस्थानांचे उपलब्धतेनुसार लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन असून, या कामावर अद्ययावत खर्च रु.४५.०० लक्ष इतका झालेला आहे.

वरळी, मुंबई येथील कावेरी, शरावती व गोमती या इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती करण्याच्या कामास सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.बीडीजी-२०२०/प्र.क्र.०७/इमा-३ दि.२७.०२.२०२० अन्वये रु.८६०.६८ लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर इमारतींचे बांधकाम सन १९८८-८९ या कालावधीमध्ये झाले असून, प्रत्येक इमारत ही तळ+७ मजले स्वरुपात असून, प्रत्येक इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ १६०८.६४ चौ.मी आहे. सदर इमारतींमध्ये प्रकार-३ ची निवासस्थाने असून, प्रत्येक इमारतीमध्ये १६ सदनिका आहेत.

प्रशासकीय मान्यतेनंतर खुल्या निविदा पध्दतीव्दारे, निविदा प्रक्रिया करून मे.एच.एस.कन्ट्रक्शन यांना दि.०१.०२.२०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. सद्य:स्थितीत ७५ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे. कावेरी, शरावती व गोमती इमारतीमधील सर्व ४८ निवासस्थानांच्या दुरुस्ती व नुतनीकरणाची कामे मंजूर असून, त्यानुषंगाने पहिल्या टप्प्यात रहिवाश्यांची गैरसोय न होवू देता टप्प्याटप्प्याने रहिवाश्यांना इतर रिक्त निवासस्थानांमध्ये तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरीत करुन, त्यांच्या मूळ ३८ निवासस्थानांची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. सद्य:स्थितीत उक्त दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर असून, अदयापपर्यंत या कामांवर रु.८६०.६८ लक्ष खर्च झालेला आहे. तसेच काम अद्याप पूर्ण झालेले नसल्याने, कंत्राटदारास अंतिम देयक अदा करण्यात आलेले नाही.

वरळी येथील डॉ. अॅनी बेझंट मार्गावरील शितल व दर्शना या इमारतींचे बांधकाम सन १९८४-८५ या कालावधीत झाले असून, ही इमारत तळ + ७ मजले स्वरुपात आहे. प्रत्येक इमारतीमध्ये ३२ सदनिका असून दोन्ही इमारती मिळून एकूण ६४ निवासस्थाने आहेत. शितल व दर्शना इमारतींचे बांधकाम क्षेत्रफळ अनुक्रमे २४९०.४८ चौ.मी. व २९४४ चौ.मी. इतके आहे. इमारतींचे बांधकाम आर.सी.सी पध्दतीचे आहे. सदर इमारतींमध्ये अनुक्रमे गट-अ प्रकार-१ व गट-अ प्रकार २ ची निवासस्थाने आहेत. सदर इमारतींचे आयुर्मान सरासरी ३८ वर्षे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार या दोन्ही इमारतीचे संरचनात्मक परिक्षण माहे मे-२०१५ तसेच फेब्रुवारी-२०२१ मध्ये करण्यात आले आहे. इमारतीची तत्कालीन स्थिती, इमारतीचे आयुर्मान व संरचनात्मक परिक्षण अहवालातील शिफारशीनुसार सदर इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती कामास माहे फेब्रुवारी २०२० मध्ये रु.९७२.६९ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. खुल्या निविदा पध्दतीव्दारे, निविदा प्रक्रिया करून मे.काकड इंजिनिअर्स अँड कॉन्ट्रॅक्टर यांना दि.१.२.२०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. सद्यस्थितीत काम प्रगतीपथावर असून, या कामावर अद्ययावत खर्च रु.८७७ लक्ष इतका झालेला आहे.

उपरोक्त नमूद सर्व इमारतींमधील निवासस्थानांच्या दुरुस्तीची कामे एकाच वेळी करता येणे शक्य नसल्यामुळे, टप्प्याटप्प्याने दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली. तसेच काही रहिवाशी स्वखर्चाने फर्निचर, मॉडयुलर किचन इ. कामे करुन घेतात. या कारणास्तव, एका सदनिकेच्या दुरुस्तीसाठी साधारणत: दिड महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागतो. त्यामुळे, दुरुस्तीची कामे पूर्ण होण्यास विलंब होत आहे. याशिवाय, कोविड-१९ च्या दुस-या लाटेमध्ये मजूरांची कमतरता व बांधकाम साहित्य वेळेवर न मिळणे, लॉकडाऊन दरम्यान काम चालू असताना रहिवाश्यांच्या मुलांचे ऑनलाईन क्लास, अधिका-यांचे ऑनलाईन वर्क फ्रॉम होम यामुळे कामाच्या वेळेवर बंधने येत होती. कामाची मूळ मुदत ३०० दिवस इतकी होती. या सर्व कारणांमुळे उपरोक्त कामास वेळोवेळी मुदतवाढ घेण्यात आलेली आहे.

कामाच्या तांत्रिक वावामध्ये आवश्यक त्या ठिकाणी आर.सी.सी भागास गंजरोधक सळई बसवून आरसीसी भागास मायक्रोकॉंक्रीटने जॅकेटीग व १५ मीमी व ३० मीमी जाडीचा पॉलीमर गिलावा करणे, अंतर्गत दरवाजे, खिडक्या व फरशीची दुरुस्ती, इमारतीच्या अंतर्गत भागामध्ये आर.सी.सी छत व भिंतींना अनुक्रमे १२ मीमी व २० मीमी जाडीचा गिलावा करुन, प्लास्टीक इमलशन पेंटने रंगकाम, इमारतीच्या बाहय भागास अॅक्रेलिक इमलशन पेंटने रंगकाम, सदनिकांमधील प्रसाधनगृह व स्नानगृहाची दुरुस्ती, सदनिकांमधील स्वयंपाकगृहामधील कडाप्पा व ग्रेनाईटचा नवीन किचन ओटा बनविणे, इमारतीच्या छतावर गळती प्रतिबंधक उपाययोजना, सर्व जिन्यामध्ये पाय-यांवर ग्रेनाईट बसविणे व भिंतीना टाईल्स बसविणे, इमारतीच्या मल निसारण वाहिन्यांची दुरुस्ती करणे, इमारतीच्या सर्व लिफ्ट रुममधील व शाफ्टमधील दुरुस्ती कामे करणे इ. कामे समाविष्ट आहेत.

कामामध्ये वापरण्यात आलेल्या साहित्याची चाचणी दक्षता व गुणनियंत्रण प्रयोगशाळा, तुर्भे, नवी मुंबई यांच्याकडून करण्यात आलेली असून, चाचणी अहवालाचे निष्कर्ष प्राप्त झाल्यानंतरच साहित्य वापरण्यात आलेले आहे. कामे प्रगतीत असताना, ही कामे निविदेतील विनिर्देशानुसार व गुणवत्तापूर्व होण्यासाठी वेळोवेळी क्षेत्रिय अधिकारी व कर्मचारी यांनो कामाचे पर्यवेक्षण व संनियंत्रण केले आहे. निविदेतील विनिर्देशानुसार कामाची गुणवत्ता राखून कामे पूर्ण करण्यात येत आहेत. इमारत सुमारे ३५ वर्षे जुनी असल्याने काम काळजीपूर्वक करण्यात येत असून,

इमारत समुद्रकिनारी असल्याने भिंतीमधून पाणी गळती होणार नाही, याची दक्षता घेण्यात आलेली आहे. बाहय भागाच्या प्लास्टरचे काम पावसाळयापूर्वी पूर्ण करण्यात आलेले असून, पावसाळयामध्ये इमारतीच्या बाहय भागातून कोणत्याही प्रकारची गळती व ओलावा झाल्याचे निदर्शनास आलेले नाही व रहिवाश्यांकडून गळती झाल्याची कोणतीही तक्रार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्राप्त झालेली नाही. तसेच प्रगतीपथावर असलेल्या कामाची तपासणी दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडून करण्यात आलेली असून, दक्षता व गुणनियंत्रण मंडळाकडून सदर कामावर काढण्यात आलेल्या पाहणी अहवालातील प्राप्त निरीक्षणानुसार दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.

सदर काम प्रगतीत असल्याने थोडया प्रमाणात रहिवाश्यांना धुळीचा त्रास होणे क्रमप्राप्त आहे. इमारतीच्या वरच्या मजल्यावर पाईपच्या आधाराने उंदीर वर चढू नयेत याकरिता सप्टेंबर-२०२२ मध्ये उपाययोजना करण्यात आलेली आहे.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना गोमती इमारतीमध्ये शासकीय निवासस्थानांचे वाटपबाबतचे आदेश अदयापपर्यंत प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे कंत्राटदाराकडून विशेष लक्ष देणे, पाठपुरावा करुन काम पूर्णत्वास नेण्याचा प्रश्नच उदभवत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रहिवाश्यांकडून प्राप्त होणा-या तक्रारींची प्राधान्याने दखल घेऊन त्वरीत कार्यवाही करण्यात येते.

वरळी येथील डॉ ॲनी बेझंट मार्गावरील विसावा या इमारतीचे बांधकाम सन १९८०-८१ या कालावधीमध्ये झाले असून, ही इमारत तळ+४ मजले स्वरुपात आहे. तळ मजल्यावर विश्रामगृहासाठी ११ खोल्या असून, पहिला मजला ते चौथा मजला असे धरुन एकूण १६ संक्रमण निवासस्थाने आहेत. सदर इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ ११८५ चौ.मी आहे. सदर इमारतीमध्ये गट-अ प्रकार-३ चे निवासस्थाने असून, इमारतीचे बांधकाम आरसीसी पध्दतीचे आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर इमारतीचे संरचनात्मक परिक्षण माहे मे-२०१५ रोजी करण्यात आले. संरचनात्मक परिक्षण अहवालानुसार सदर इमारत धोकादायक असून, भविष्यातील मनुष्यहानी टाळण्यासाठी उक्त इमारत रिक्त करण्यात आली असून, इमारतीचे पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा बंद करण्यात आलेला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून तीन पाळीमध्ये सुरक्षारक्षक असतात. सदर सुरक्षारक्षकांकडून इमारतीमधील रहिवाशांकडे येणारे प्रत्येक अभ्यागत, डिलिव्हरी बॉय, सर्व्हिस बॉय इ. यांची रजिस्टरमध्ये वेळ व मोबाईल क्रमांकासह नोंद घेण्यात येते. सुरक्षारक्षक इमारत परिसरांची सुरक्षाविषयक सेवा बजावत असतात. तसेच जून-२०१३ मध्ये स्नेहा अ व ब येथे पिझ्झा बॉय कडून मुलीवर अत्याचार व चोरी झाल्याचे स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. त्यानंतर कोणतीही अनुचित घटना घडलेली नाही. उपरोक्त इमारतींमध्ये सी.सी.टीव्ही यंत्रणा बसविण्यात आलेली नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील शासकीय निवासी इमारतीमध्ये फक्त निवासस्थान वाटप केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची गाडी पार्कींग करण्यात येते. त्यामुळे, बाहेरील व्यक्तीच्या गाडया पार्किंग होत असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही तथापि बाहेरील व्यक्तीच्या गाडया पार्किंग होणार नाही दक्षता घेण्याबाबात सुरक्षा रक्षक यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

शासकीय वसाहतीमध्ये प्रचलित धोरणानुसार शासनाची परवानगी घेऊनच फलक लावण्यात आलेले आहेत. त्यासाठी वृक्षतोड व भ्रष्टाचार होण्याचा प्रश्नच उदभवत नाही. अशा प्रकारची कोणतीही तक्रार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्राप्त झालेली नाही.

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी तथा संचालक, मुंबई विकास विभाग चाळी या पदाचा कार्यभार आहे. यामध्ये बी.डी.डी चाळीतील रहिवाशांची पात्रता निश्चित करणे, वारसाहक्क खोली हस्तांतरण व इतर बाबींच्या सुनावण्या घेणे या कार्यभारासहित वरळी, शिवडी, नायगाव, ना.म.जोशी मार्ग येथील बी.डी.डी चाळीची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी यांच्या मार्फत करण्यात येते. सदर दुरुस्तीच्या कामास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर, शासनाच्या प्रचलित नियमानुसार निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात येतात. तद्नंतर, कंत्राटदाराने काम पूर्ण केल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने बीडीएस प्रणालीद्वारे कंत्राटदारास देयके अदा केली जातात. बी.डी.डी वरळी येथील कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याच्या नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाच्या प्रचलित नियमांनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येते.

---

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले अधिवेशन

**मा.श्री.संग्राम थोपटे, श्री.अशोकराव चव्हाण, श्री.नानाभाऊ पटोले, श्री.अमित झनक, श्री.अमिन पटेल, श्री.कुणाल पाटील, श्री.संजय जगताप, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित लक्षवेधी सूचना क्रमांक १९८५ :-**

"वेल्हे (जि.पुणे) तालुका अतिशय डोंगरी व दुर्गम असून वेल्हे तालुक्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे तोरण बांधले तो "तोरणा" गड, याशिवाय स्वराज्याची पहिली राजधानी "राजगड" हे दोन किल्ले असणे, वेल्हे तालुक्यात निसर्ग सौंदर्य असलेला मढेघाट व अनेक निसर्गरम्य ठिकाणे असून तेथे पावसाचे प्रमाण प्रतिवर्षी २५०० ते ४५०० मि.मी. असल्याने पर्यटनासाठी वेल्हे तालुक्यात राज्यातून व राज्याबाहेरुन येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठया प्रमाणात असणे, परंतु, रायगड जिल्हयातील महाड तालुक्याला जोडणारा, वेल्हे भट्टी - पासली - भोरडी - पिवशी मार्गे शेवते महाड रस्ता हा पुण्याहून कोकणात जाण्यासाठी सर्वात कमी अंतराचा साधारण ९० ते १०० किमी इतका असणे, मुख्यमंत्री सडक योर्नेतर्गत प्रस्तावित केलेला असणे, परंतू त्याला अद्याप मंजुरी मिळाली नसणे, रायगड जिल्यातील महाड तालुक्यातील रस्ता ५.५ मीटर रुंदीचा असणे, त्यामुळे प्रस्तावित रस्ता ५.५ मीटर रुंदीचा डांबरीकरण युक्त करणे छत्रपती शिवाजी महाराजाच्या राजगड व रायगड या दोन राजधान्यांना जोडणारा व पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुका व रायगड जिल्ह्यातील महाड तालुका या दोन तालुका व जिल्हयांना जोडणारा कमी अंतराचा रस्ता असतांनाही अजूनही या प्रस्तावीत रस्त्याला मंजूरी मिळालेली नसणे, हा रस्ता झाल्यास दळणवळणाची सुविधा निर्माण होऊन स्थानिकांसाठी रोजगार निर्माण होणार असणे तसेच कोकणात जाणारा मार्ग होणार असून यातून अनेक गावे मुख्य रस्त्याला जोडली जाणार असणे व सदरील रस्ता पर्यटनाच्या दृष्टीने विकसीत होणारा असल्याने या रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र नाराजीची व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन सदर रस्त्याला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

वेल्हे (जि.पुणे) व महाड (जि.रायगड) यांना जोडणारा मढेघाट अतिशय प्राचीन व ऐतिहासिक महत्व असलेला घाट आहे. या भागात सरासरी ४००० ते ५००० मी.मी. पर्जन्यमान आहे.

वेल्हे येथून महाड येथे जाण्यासाठी भट्टी — पासली — भोरडी — पिवशी मार्गे शेवते महाड रस्ता या आखणीकरीता सुसाध्यता अहवाल तयार केल्यानंतर निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार सदरचे काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

----------

रोहट/एच-१३६[७५०-४-२०२३].

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर), वि.स.स.,यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" वाटुर फाटा ता. परंतुर, जि. जालना ते चारठाणा, ता. जिंतूर, जि. परभणी हा चौपदरी सिमेंट कॉंक्रिट्चा 227 कोटी रुपये खर्च करून बांधण्यात येणारा रस्ता हा अत्यंत निकृष्ट दर्जाचा होत असून त्याबाबत वारंवार प्रशासनाकडे तक्रार केलेली असणे, परंतु तरीदेखील त्याकडे हेतू पुरस्पर दुर्लक्ष करून मोठा भ्रष्टाचार व अतिशय निकृष्ट दर्जाचे काम केले जात असणे, या रस्त्याचे बांधकाम अंदाजपत्रकाप्रमाणे होत नाही असे निदर्शनास येत असून अंदाजपत्रकाप्रमाणे साईड पंखे भरणे अपेक्षित असताना त्यात काही ठिकाणी केवळ 1 फूट खोदले असणे, तर काही ठिकाणी अर्धा फूट खोदून निकृष्ट दर्जाचे काम केले जात असणे, नाली बांधकाम देखील अंदाजपत्रकाप्रमाणे खोद्काम करणे, संपूर्ण काळी माती काढणे, त्यामध्ये मुरुम भरणे, त्यावर सोलिंग टाकून खडी टाकून कॉंक्रिट करणे असे अपेक्षित होते परंतु असे न करता सरळ सरळ जमिनीवरच बांधकाम केले जात असणे, या बांधकामासाठी वाळू किंवा दगडापासून तयार केलेली वाळू न वापरता खडी क्रेशरवरील रॉ मटेरियल असणारी भुकटी ( डस्ट ) वापरली जात असणे, अंदाजपत्रकाप्रमाणे पुर्वीचा डांबर रस्ता पूर्ण खोदणे बंधनकारक असताना अनेक ठिकाणी वरवर तर काही ठिकाणी डांबर असलेला भाग तसाच दाबण्यात आला असणे, त्यावरच मुरूम टाकण्यात आला असणे, पहिल्या लेयरसाठी खडी ऐवजी खडी क्रेशरवरची रॉ मटेरियल असणारी भुकटी ( डस्ट ) वापरली जात असणे, कॉंक्रिट करण्यासाठी वापरलेले सिमेंट निकृष्ट दर्जाचे व अत्यंत कमी किमतीचे वापरले जात असणे, शाखा अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांच्यासह कोणीही अधिकारी साइटवर थांबत नसणे, गिरगाव ता. सेलु जि. परभणी येथील तलावातून मुरूम काढण्याची परवानगी संबंधित कंत्राटदार कंपनीने घेतली होती, परंतु कंत्राटदार कंपनीने घेतली होती, परंतु कंत्राटदार कंपनीने तलावाच्या लगत १० एकर शेत जमीन खरेदी करून या शेत जमीनीतून आठ ते दहा फुटापर्यंत खोदकाम करून मुरूम उत्खनन करण्यात येणे, विशेष म्हणजे या ठिकाणाहून मुरूम उत्खननास लवादाने स्थगिती दिलेली असतानाही या ठिकाणावरून मुरूम उत्खनन करण्यात आले असणे, या रस्त्याच्या बांधकामासाठी लागणारा मुरूम मंठा तालुक्यातील पिंपरखेडा खराबे ता.मंठा जि.जालना येथील शेतकरी दत्तराव खराबे व इतर तीन शेतकरी यांच्या सुमारे दहा एकर शेतामधून आठ ते दहा फुट शेत जमीन खोदून मुरूम काढण्यात आला असणे, मात्र हा मुरूम उत्खनन करण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे केवळ काही ब्रास ची रौयल्टि भरण्यात आली प्रत्यक्षात मात्र मोठ्या प्रमाणावर मुरूम उत्खनन करण्यात आले असणे, त्यामुळे हा भ्रष्टाचार कंपनी व महसुली अधिकाराच्या मार्फत झाल्याचे स्पष्ट होणे, या रस्त्याच्या कमामध्ये झालेल्या भ्रष्टाचारामध्ये सहभागी असलेली कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्यासह अवैध उत्खनन प्रकरणी सहभागी असलेले उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, पोलिस निरीक्षक यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावायची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

### मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

वाटुर फाटा जि.जालना ते चारठाणा जि.परभणी या २७ कि.मी.अंतराच्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता किंमत रु.२२८ कोटी एवढी आहे. प्रत्यक्ष कामाची रु. १८१.६६ कोटी

रोटा H/I77H (750-3-23) C पृ.मा.प.

किंमतीची निविदा ईपीसी तत्वावर प्रसिद्ध करण्यात येऊन निम्नतर दराचा ३९.४५ % एवढा देकार कंत्राटदाराकडून प्राप्त झाला. सदरील कंत्राटदारास केंद्रीय रस्ते परिवहन व राजमार्ग मंत्रालयाकडून रु. ११० कोटी एवढ्या रकमेच्या निविदा स्वीकृतीस मंजुरी प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पासाठी निविदेतील अटी शर्तिंनुसार व आयआरसी एसपी ७३:२०१८ मध्ये नमुद केलेल्या मानगानुसार अस्तित्वातील रस्त्याचा चढ/उतार विचारात घेऊन रस्त्याचे नकाशे व संकल्पन तयार करण्यात आले. त्यास सक्षम अधिका-याने मंजुरी दिल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू करण्यात आले. मंजुर नकाशे व संकल्पनानुसार रस्त्याच्या लांबीमध्ये संकल्पित रस्त्याची अंतिम पातळी विचारात घेऊन अस्तित्वातील लांबीमध्ये आवश्यकतेनुसार खोदकाम व भराव कार्यक्षेत्रावर करण्यात आले आहे.

बांधकामाला लागणा-या वाळूची मागणी व नैसर्गिक वाळूची उपलब्धता यांचे व्यस्त प्रमाण विचारात घेऊन शासनाने मार्गदर्शक सुचना निर्गमित करून बांधकामांमध्ये नैसर्गिक वाळू ऐवजी १०० % कृत्रीम वाळू वापरण्यास शासनाने सन २०१७ मध्ये परवानगी दिलो आहे. त्यानुसार कंत्राटदाराने व्हीएसआय प्रकारचे क्रशर बसवून कृत्रिम वाळू तयार केली आहे. या वाळूच्या आवश्यक चाचण्या क्षेत्रीय प्रयोगशाळेत घेऊन रस्त्याच्या कॉक्रीट मिक्स डिजाइन तयार करून त्याप्रमाणे रस्त्याचे काम सुरू आहे .

या कामाची पाहणी केंद्रीय रस्ते परिवहन व राजमार्ग मंत्रालयाचे अधिका-यांनी केलेली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिका-यांमार्फत प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर भेट देऊन सदर कामाची वेळोवेळी पाहणी करण्यात येत आहे. क्षेत्रीय अभियंत्यांकडून विहित चाचण्या वेळोवेळी घेऊन कामाच्या गुणवत्तेची खात्री करण्यात येत आहे. सद्यस्थितीत सदर काम सुमारे ६० % पुर्ण झाले असुन प्रगतिपथावर आहे.

महसूल विभागाने दिलेल्या अहवालानुसार या कामासाठी लागणारा मुरूम हा मौ.गिरगाव बु. ता. सेलु जि. परभणी येथील पाझर तलावाच्या बुडीत क्षेत्रातील हद्दीतील संपादित क्षेत्रातून उत्खनन केला असून पाझर तलावाच्या हद्दीबाहेर उत्खनन केलेले नाही.

मौ.पिंपरखेडा खराबे ता.मंठा जि.जालना या ठिकाणी रीतसर परवानगी प्राप्त करून कामासाठी लागणा-या मुरूमाचे उत्खनन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांनी नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार याठिकाणी अतिरिक्त उत्खनन केलेले असल्याचे आढळून आले व त्या अतिरिक्त मुरूमाच्या परिमाणासाठी कंत्राटदाराने वाढीव स्वामित्वधन शासनाकडे भरणा केले आहे.

***************

महाराष्ट्र विधानसभा

सन-२०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.अनिल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (३ ) अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४३०**

**लक्षवेधी सूचना**

"जि.ठाणे, भिवंडी तालुक्यातील पिळंझे ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या भवरपाडा ते नंबर पाडादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सुमारे १ कोटी ७२ लाख रुपये खर्चुन बांधकाम करण्यात आलेल्या पुलाचे बांधकाम ठेकेदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्याचे दि. १७/१/२०२३ रोजी निदर्शनास येणे, अल्पावधीतच सदरहू पुलाच्या प्लास्टरला तडे जाणे, सदरहू ठेकेदाराने काँक्रिट कामासाठी रेतीऐवजी चक्क फेकून देण्यालायक असलेली स्टोन ग्रीड पावडर पुलाचे बांधकाम करण्यात वापरण्यात येणे, सदरहू पुलाचा पिळंझे, देपोली, साखरोली या महसुली गावांसह १५ आदिवासी पाडयातील आदिवासी जनतेची रहदारी करण्यासाठी खूपच गैरसोय होणे, सदरहू ठिकाणचा पुल प्रथम २०१८ मध्ये कोसळणे आणि त्यानंतरच्या वर्षात पुलाचा जोडरस्ता वाहुन गेल्यानंतर सदर ठिकाणी पुल व जोडरस्ता तयार करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा मागवून सदरहू पुलाचे पुन्हा नव्याने करण्यात आलेले काम निकृष्ट दर्जाचे झाल्याची स्थानिक ग्रामस्थांनी तक्रार करण्यात येणे, तसेच वाहुन गेलेल्या जोड रस्त्याच्या कामात काँक्रिट भिंत उभारण्याचे नमूद असताना, ठेकेदाराने त्या ठिकाणी दगडाचा वापर करुन निकृष्ट दर्जाच्या भिंतीचे बांधण्यात येणे, सदर पुलाचे व संरक्षक भिंतीचे काम दोन वेळा करण्यात येणे, सदर प्रकरणात सा.बां.विभागाचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता सुनिल पाटील, उपअभियंता चौधरी, कनिष्ठ अभियंता अनिल पवार आणि ठेकेदार यांनी संयुक्तपणे भ्रष्टाचार करुन कोटयावधी रुपयांच्या शासकीय निधीचा केलेला गैरव्यवहार, दोन वेळा पुलाचे निकृष्ट बांधकाम करुन शासकीय निधीचा झालेला अपव्यय, यासंदर्भात स्थानिक सरपंच व ग्रामस्थांनी याबाबत शासनाकडे तक्रार करण्यात येऊनही त्याची शासनाने दखल न घेणे, या प्रकरणातील जनक्षोभ बघता ठेकेदार विवेक पवार यांस काळया यादीत टाकण्याचे ठाणे अधीक्षक अभियंता यांचे आदेश असणे, परंतु सदर प्रकरणातील सहायक अभियंता अनिल पवार यांची मुरबाड येथे बदली करण्यात येऊन सदर प्रकरण दडपून टाकण्यात येणे, शासनाने सदरहू पुलाचे व संरक्षक भिंतीच्या बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडीट तसेच भिवंडी उपविभागात यापूर्वीच्या कामांमध्ये कनिष्ठ अभियंता, कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी संगनमताने २० ते २५ कोटी रुपये हडप केल्याचा संशय असल्याने यापूर्वी झालेल्या व सध्या सुरु असलेल्या कामांची कोकण प्रादेशिक अधिक्षक अभियंता यांच्या दक्षता व गुणनियंत्रण मंडळामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, सबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील आदिवासी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**मा.श्री.रविंद्र चव्हाण, मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन**

भिवंडी तालुक्यातील देपोली भवरपाडा, नंबरपाडा हा ग्रामीण मार्ग क्र.१०० या दर्जाचा रस्ता असून सदर रस्त्यावर सा.क्र. कि.मी १/१०० येथे १२०० मी.मी व्यासाचे ९ पाईपांचे साकावचे काम करण्यात आले होते. सदर ठिकाणी मोरीच्या वरील बाजूस डोंगरी भाग असून त्यावरुन मोठया प्रमाणात पाण्याचा प्रवाह वाहत असल्यामुळे सदर मोरी पावसाच्या पुरामुळे नादुरुस्त झाली होती. परीणामी परीसरातील आदिवासी गावे व वाड्या यांचा पावसाळयात दळणवळणाचा मार्ग खंडीत झाला होता.

सदर रस्त्यावर पूल बांधण्याचे काम नाबार्ड योजने अंतर्गत मार्च २०२० मध्ये रक्कम रु. २००.०० लक्ष चे काम मंजूर झाले. सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.११/११/२०२१ रोजी निर्गमीत करण्यात आले. काम पुर्ण करण्याचा कालावधी १२ महिने असुन सदरचे काम नोव्हेंबर २०२२ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन होते. सदयस्थितीती सदरच्या कामास मुदतवाढ देण्यात आली असुन मे २०२३ पर्यत पुर्ण करणे प्रस्तावित आहे.

सदर पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून पोहचमार्ग व संकीर्ण काम प्रगतीत आहे. या कामावर फेब्रुवारी २०२३ पर्यंत रू. १२७.५० लक्ष एवढा खर्च झाला आहे. सदर कामाबाबत दि.१६/०१/२०२३ रोजी वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली. मुख्य अभियंता सा. बां. प्रादेशिक विभाग, कोकण यांनी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकणभवन यांना सदर कामाची चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश दिले आहेत. अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकणभवन यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

******************************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**श्री.उदयसिंग राजपुत, वि.स.स.,यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्ग ५२ वरील करोडी पासून ते चाळीसगाव अट्रोम घाटापर्यंतचा रस्ता बांधण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग संस्था (एनएचआय) संभाजीनगर यांच्या मार्फत श्री दिलीप बिडकोन प्रा.लि. या कंपनीला अटी व शर्तीनुसार देण्यात येणे, या निविदेतील अटी शर्तीनुसार रस्त्यांच्या दोन्हीं बाजूला झाडे लावून जगवणे बंधनकारक असतांना जुन्या रस्त्यावर लाखो झाडांची कत्तल करुन त्या मोबदल्यात नविन झाडे लावण्यात न येणे, त्यांनी पाहिजे तशा प्रकारच्या मातीचा थर भराव न करता काळया मातीवरच सर्व डांबरीकरण करणे, या रस्त्याला अनेक ठिकाणी रस्ता पावसाळयात उन्हाळयात खचतो, रस्त्यावर अनेक प्रकारचे अँडयुलेशन निर्माण झाल्याने अपघाताचे प्रमाणसुध्दा वाढणे, तसेच रस्त्यालगतची स्टेट लाईटदेखील अनेक ठिकाणी बंद अवस्थेत असणे, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या सुमारास तसेच वारंवार प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग संस्था (एनएचआय) , संभाजीनगर यांच्याकडे तांत्रिक दर्जाची सल्लागार समिती नेमून चौकशी करण्याची लेखी मागणी करण्यात येणे, परंतु अदयापही या प्रकरणाची चौकशी न झाल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोष व संतापाची लाट, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन संबधितावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका. "

### मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ (जुना २११) सोलापुर ते औरंगाबाद मार्गे धुळे या लांबीमधील करोडी ते तेलवाडी (लांबी ५५.६१० कि.मी.) पर्यंतचे चौपदरीकरणाचे काम सन २०२२ मध्ये पूर्ण झाले आहे.

या महामार्गाच्या चौपदरीकरणादरम्यान कंत्राटदारामार्फत एकूण ५२९४ झाडे वनविभागाच्या परवानगीने तोडण्यात आली होती. आयआरसी मानकानुसार राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण पूर्ण झाल्यानंतर रस्त्याच्या मध्ये दुभाजकात एकूण ३५६२९ झाडे व रस्त्याच्या दुतर्फा एकूण २२५१४ झाडे लावण्यात आलेली आहेत. संबंधीत झाडाची देखभाल करारनाम्यानुसार कंत्राटदारामार्फत करण्यात येत आहे.

सदर महामार्गाचे बांधकाम आयआरसी मानकानुसार प्राधिकृत अभियंता (Authority Engineer) यांचे देखरेखीखाली पुर्ण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत दोष निवारण कालावधीमध्ये असुन कामामध्ये दोष उत्पन्न झाल्यावर वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येते.

तात्काळ दुरुस्ती न केल्यामुळे कंत्राटदारास करारनाम्यानुसार देखभाल दुरुस्तीच्या खर्चामधुन दंड आकारण्यात येऊन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी कंत्राटदाराच्या जोखीम व खर्चाने (Risk & Cost) दुरुस्तीचे काम करुन घेतले आहे.

बंद असलेल्या पथदिव्यांच्या संबंधी कंत्राटदारास करारनाम्यानुसार दंड आकारण्यात येऊन त्याची वसुली देखभाल व दुरुस्ती देयकामधुन करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत पथदिवे चालु आहेत. या महामार्गाच्या संपूर्ण लांबीमध्ये आजरोजी रस्ता सुस्थितीत असून मागील ६ महिन्यात मोठया अपघाताची नोंद झालेली नाही.

रोटा H/1768 (750-3-23) **************

लक्षवेधी सुचना क्र. ३५५

## महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

सर्व श्री.अबु आझमी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे: -

" मुंबई शहर व आसपासच्या विभागात शिधावाटप कार्यालयामध्ये अधिकारी व कर्मचारी यांची ४० टक्के कमतरता असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, कर्मचारी व अधिकाऱ्यांची कमतरता असल्या कारणाने सामान्य नागरिकांना विशेषत: जे मानखुर्द - शिवाजीनगर सारख्या झोपडपट्टी विभागात राहणारे नागरिक आहे अशा लोकांना शिधावाटप पत्रिका मिळण्यास व धान्य मिळण्यासाठी अडचण निर्माण होत असल्याचे हि निदर्शनास येणे, शिधावाटप कार्यालयामध्ये असलेल्या कर्मचारी व अधिकारी यांची नियुक्ती करून असणारी कमतरता लवकरात लवकर भरण्यात यावी अशी मागणी मा. विधानसभा सदस्य, सामान्य नागरिक, लोकप्रतिनिधी, सेवाभावी संस्था यांच्यामार्फत करण्यात येणे, सदर विषयी शासनातर्फे करण्यात आलेली वा येत असलेली कार्यवाही उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया"

---

## मा.मंत्री, (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे निवेदन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१७/प्र.क्र.१५६/नापू-१२, दिनांक १८/०४/२०२२ अन्वये विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयाकरीता सुधारीत आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र ७ नुसार नियंत्रक शिधावाटप संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयाकरीता ११२८ नियमित पदे व बाह्यस्त्रोताद्वारे सेवा उपलब्ध करून घ्यावयाची २६३ पदे अशी एकूण १३९१ पदांचा सुधारीत आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. सुधारीत आकृतीबंधात मंजूर पदांना अनुसरून नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या दिनांक २७/५/२०२२ रोजीच्या आदेशान्वये प्रधान कार्यालय, ५ परिमंडळ कार्यालये व ४६ शिधावाटप कार्यालयांची सुधारीत संवर्गनिहाय पदसंख्या निश्चित करण्यात आली. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-११२२/प्र.क्र.१८७/ना.पु.१५. दिनांक २५/०८/२०२२ अन्वये त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सुधारीत आकृतीबंधात मंजूर पदांना अनुसरून माहे जानेवारी २०२३ मध्ये मुंबई / ठाणे शिधावाटप क्षेत्रास संवर्गनिहाय मंजूर नियमित

११२८ पदांपैकी २४१ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांमध्ये लिपिक टंकलेखक संवर्गात १९५ पदे रिक्त आहेत. तसेच बाह्यस्त्रोताद्वारे सेवा उपलब्ध करून घ्यावयाच्या २६३ पदांपैकी ६५ पदे रिक्त आहेत.

मानखुर्द / शिवाजीनगर विधानसभा क्षेत्रातील गोवंडी या विभागात शिधावाटप कार्यालय क्र.४४ ई हे कार्यालय कार्यरत असून माहे जानेवारी २०२३ मधील सदर कार्यालयातील पदाच्या स्थिती नुसार शिधावाटप अधिकारी, सहायक शिधावाटप अधिकारी (त), सहायक शिधावाटप अधिकारी (प्र), शिधावाटप निरिक्षक (त) आणि शिधावाटप निरिक्षक (प्र) या संवर्गातील मंजुर असलेली सर्व पदे भरण्यात आलेली आहेत. तथापि लिपिक- टंकलेखकांच्या मंजुर १२ पदांपैकी ७ पदे कार्यरत असून ५ पदे रिक्त आहेत तसेच, शिपाई संवर्गातील मंजुर २ पदांपैकी १ पद भरलेले असून १ पद रिक्त आहे.

मुंबई / ठाणे शिधावाटप क्षेत्रात लिपिक टंकलेखक संवर्गातील सरळसेवेची रिक्त असलेली पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर करण्यात आलेले असुन त्यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जाहिरात प्रसिध्द झालेली आहे.

नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा मुंबई यांचेमार्फत लिपिक टंकलेखक संवर्गातील पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा विभागाकडे सादर केलेल्या लिपिक टंकलेखक संवर्गात सरळसेवेने नियुक्तीकरीता आयोगाकडून उमेदवारांचे नियतवाटप झाल्यानंतर मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रातील शिधावाटप कार्यालयातील लिपिक टंकलेखक संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही तसेच पदोन्नती संवर्गातील रिक्त असलेली पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा मुंबई यांचे स्तरावरून करण्यात येत आहे.

मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्रास सुधारीत आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर अधिकारी/कर्मचारी यांच्या कमतरतेमुळे सामान्य नागरिकांना शिधापत्रिका अथवा अन्नधान्य मिळण्यास अडचण येत असल्याबाबत तसेच अधिकारी/कर्मचारी यांची संख्या वाढविण्याबाबत विधानसभा सदस्य यांचेकडून निवेदन प्राप्त झाले असून त्यानुषंगाने वर नमुद केल्यानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनामार्फत सुरु आहे.

********************

**श्रीमती मनिषा चौधरी, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये खालीलप्रमाणे लक्षवेधी सुचना क्र.१११० उपस्थितीत केली आहे :-**

"दि.१८एप्रिल, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानूसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाअंतर्गत नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या आस्थापनेवरील १३९१ पदांना मंजुरी दिलेली असणे, विभागातील एकूण ४९९ पदे कमी करण्यात येणे, मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्राचा विचार करता, सततची वाढणारी लोकसंख्या, मुंबईवर कोसळणारी नैसर्गिक आपत्ती, तसेच कर्मचारी/अधिकारी यांचेवर कामाचा मोठा ताण पडणार असून कर्मचारी शासनाच्या महत्त्वाकांशी योजना जनतेला पूरवू न शकणे, विभागातील पदे कमी झाल्यास शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजना गरजू व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यास मोठया अडचणी निर्माण होण्याची शक्यता, अन्नधान्य, केरोसीन, बायोडिझेल व वेळोवेळी नियंत्रित करण्यात येणाऱ्या शिधाजीन्यांचा काळाबाजार रोखणे शक्य होणार नाही, हा काळाबाजार रोखण्यास कर्मचारी कमी पडल्यास जनता त्यांच्या हक्कापासून वंचित राहणे, हा विभाग लोकाभिमुख व गोरगरीब जनतेला अन्नधान्य पुरविणारा असल्याने या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची पदे कमी करु नये यासाठी होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना".

---

**मा.मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे निवेदन**

दि. २६ जून, २००३ च्या आकृतीबंधानुसार नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयाचे एकूण १८९० पदे मंजूर केली होती. वित्त विभागाच्या दि.२९ जून, २०१७ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये माहिती तंत्रज्ञानावर आधारित विविध माध्यमातून गतिमानता आणण्यासाठी प्रयत्न करुन एकूण मानव संसाधनाची मागणी ३० टक्के पर्यंत कमी करण्याचे उद्दिष्ट विहित केले होते. त्यानुसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव उपसमितीसमोर दि.३०.०७.२०१८ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला. सदर बैठकीमध्ये नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयासाठी विभागाने १४८१ पदे प्रस्तावित केली. परंतु उपसमितीने १३१४ इतक्या पदांना मान्यता दिली होती. त्यानंतर विभागाने उच्चस्तर सचिव समितीसमोर दि.११.०९.२०१९ रोजीच्या बैठकीत सुधारित आकृतीबंध सादर केला. सदर बैठकीमध्ये नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा मुंबई या कार्यालयासाठी उच्चस्तर सचिव समितीने १३१४ पदांना मंजूरी दिली होती.

त्यानंतर मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.१७.१२.२०२० रोजीच्या झालेल्या बैठकीमध्ये नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयाचा आकृतीबंध फेरसादर करण्यात यावा, अशी सूचना मा. मंत्री अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांनी दिली होती. त्यानुसार नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयाचा विभागाने १६३४ पदांचा सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव उपसमितीसमोर दि. ३०.०९.२०२१ रोजी सादर करण्यात आला. सदर बैठकीमध्ये उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि. ११.०९.२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयामध्ये बदल करण्याची बाब असल्यामुळे सदर सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर सादर करण्याची सूचना उपसमितीने केली.

त्यानुषंगाने मा.सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या समवेत दि.२५.११.२०२१ रोजी बैठक घेतली. या बैठकीमध्ये नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयाचा १३९१ एवढया पदांचा (उच्चस्तरीय

सचिव समितीने दि. ११.०९.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये पदांना दिलेल्या मंजूरीपेक्षा (७७ वाढीव पदांचा) सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर सादर करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयाचा सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर दि.२६.११.२०२१ रोजीच्या बैठकीत दुसऱ्यांदा ठेवण्यात आला होता. सदर बैठकीमध्ये नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयासाठी १३९१ पदांना मंजूरी दिली आहे.

नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई या कार्यालयासाठी उच्चस्तरीय सचिव समितीने दि.११.०९.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये पदांना दिलेल्या मंजूरीपेक्षा दि. २६.११.२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये एकूण ७७ वाढीव पदांना मंजूरी दिली आहे.

सदर पदांचे विवरण पुढीलप्रमाणे:-

| अ.क्र. | पदाचे नाव | दि.२६.६.२००३ च्या आकृतीबंधानुसार मंजूर पदे | उच्चस्तरीय सचिव समितीने दि.११.०९.२०१९ च्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली पदे | उच्चस्तरीय सचिव समितीने दि.२६. ११. २०२१ च्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली पदे | पद संख्येत वाढ |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिधावाटप अधिकारी/ मुख्य निरीक्षण अधिकारी | ६० | ५९ | ६४ | +५ |
| २ | सहा. शिधावाटप अधिकारी / कनिष्ठ लेखापाल | १६० | १५२ | १६० | +८ |
| ३ | शिधावाटप निरिक्षक/ वरिष्ठ लिपिक | ६८३ | ४१६ | ४४८ | +३२ |
| ४ | लिपिक -टंकलेखक | ५९४ | ३९७ | ४२९ | + ३२ |
| नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई | | | | | |
| | एकूण | १८९० | १३१४ | १३९१ | +७७ |

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणीकरण करण्यात आले आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये लाभार्थ्यांना PoS (Point of Sale) यंत्राद्वारे अन्नधान्याचे वितरण करण्यात येत असल्याने पात्र लाभार्थ्यांची सुनिश्चिती होते. PoS यंत्राद्वारे होणाऱ्या व्यवहारामुळे वापरात नसलेल्या शिधापत्रिकांची माहिती उपलब्ध होते. रेशनिंग कार्ड व्यवस्थापन प्रणाली मुळे शिधापत्रिका संबंधित विविध सेवांच्या ऑनलाईन प्रक्रिया करणे शक्य झाले आहे. अशा प्रकारे कमी मनुष्यबळाचा वापर करुन अन्नधान्याचे वितरण सुलभरित्या करण्यात येणे शक्य होते. विभागाची शिवभोजन थाळी योजनेमध्ये सीसीटिव्ही कॅमेरा, जीओ फेन्सिंग व आयब्लिंक फोटो अशा तंत्रज्ञानाच्या मदतीने पर्यवेक्षण करण्यात येते. अन्नधान्य वाहतुक करणाऱ्या वाहनांना GPS प्रणाली बसविल्याने कमी कर्मचाऱ्यांसह अन्नधान्य वाहतुकीवर देखरेख व नियंत्रण अधिक चांगल्याप्रकारे करणे शक्य झाले आहे. कोरोना महामारी मध्ये लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत व प्रधानमंत्री गरीब कल्याण योजने अंतर्गत यशस्वीरित्या अन्नधान्यांचे वाटप करण्यात आले आहे. राष्ट्रीय

अन्न सुरक्षा अधिनियिमांतर्गत व प्रधानमंत्री गरीब कल्याण योजने अंतर्गत मुंबई/ठाणे क्षेत्रासाठी खालील प्रमाणे एकूण नियतनाच्या प्रमाणात अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे :-

| अ.क्र. | महिना | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ वाटपाची टक्केवारी | प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत वाटपाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | जून, २०२२ | ९५% | ९९% |
| २ | जुलै, २०२२ | ९८% | १००% |
| ३ | ऑगस्ट, २०२२ | ९२% | १००% |
| ४ | सप्टेंबर, २०२२ | ९७% | १००% |

नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे अखत्यारितीतील मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रात केरोसिनची मागणी नाही. मुंबई व ठाणे क्षेत्रात (गहू+तांदुळ) या जीवनावश्यक वस्तुंचा अपहार करणाऱ्यांवर जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ नुसार दि.१.९.२०२१ ते दि.३०.११.२०२२ या कालावधीत १३ ठिकाणी गुन्हे नोंदविले असून एकूण रु.१,७६,१९,२२१/- रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच अवैध पेट्रोलियम पदार्थ विक्री करणाऱ्या २२ ठिकाणी गुन्हे नोंदविले असून यामध्ये एकूण रु.११,२५,२०,६२२/- रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे. असा एकूण ३५ ठिकाणी गुन्हे नोंदविले असून यामध्ये एकूण रु.१३,०१,३९,८४३/- रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे.

यावरुन सद्य:स्थितीत उपलब्ध असलेले अधिकारी/कर्मचा-यांच्या मदतीने मुंबई व ठाणे क्षेत्रातील अन्नधान्य काळाबाजार करणाऱ्यांवर प्रतिबंध करण्यात येतो व अन्नधान्याची उचल व वाटप सुरळीत होत आहे.

******************************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. रोहित पवार, डॉ.जितेंद्र आव्हाड,श्री धिरज देशमुख वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे:-

### लक्षवेधी सूचना क्र.१४६

"सांगली व नाशिक भागात द्राक्ष शेतकऱ्यांची अनोळखी व्यापाऱ्यांकडून फसवणूक होण्याच्या घटना समोर येणे, द्राक्षाचे भाव घसरल्यामुळे शेतकरी अडचणीत पडलेले असणे, स्थानिक व्यापारी शेतकऱ्यांना चांगला भाव देत नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असणे, अशा वेळी स्थानिक व्यापाऱ्यांपेक्षा अधिकच्या भावात माल घेण्याचे आमिष देऊन शेतकऱ्यांचा माल विकत घेतला जाणे व शेतकऱ्याला तोकडी रक्कम देऊन काही दिवसांनी उर्वरित रक्कम देण्याचे आमिष दाखविले जाणे, सांगली जिल्ह्यात जवळपास २० शेतकऱ्यांची सुमारे ५० लाखांनी फसवणूक झाल्याची घटना ९ फेब्रुवारी, २०२३ च्या सुमारास निदर्शनास येणे, हे व्यापारी व दलाल झारखंड, उत्तरप्रदेश आदि राज्यांतील असल्याचे निदर्शनास येणे, हे दलाल माल घेऊन अनरिचेबल झाल्याचे निदर्शनास येणे, तासगाव तालुक्यतील मणेराजुरी येथील २० द्राक्ष शेतकऱ्यांची सुमारे ४७ लाख रूपयांची फसवणूक झाल्याचे स्पष्ट होणे, गेल्या वर्षी याच गावातील शेतकऱ्यांची अशाच अनोळखी दलाल व व्यापाऱ्यांनी दोन कोटी रूपयांची फसवणूक होणे, असेच प्रकरण गेल्या वर्षी सन २०२२ मध्ये नाशिक व दिंडोरी व मोहाडीच्या शेतकऱ्यांसोबत देखील घडणे, या प्रकरणाची सखोल चौकशी करून सदर व्यापारी व दलाल यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करून लवकरात लवकर अटक करणे व शेतकऱ्यांना फसवणूक झालेली रक्कम परत मिळवून देणे गरजेचे असणे, या बाबत शासनाची प्रतिक्रिया व तातडीने करावयाची कारवाई."

### ** मा.मंत्री (पणन) यांचे निवेदन **

सांगली येथील तासगाव कृषी उत्पन्न बाजार समिती व नाशिक येथील दिंडोरी कृषी उत्पन्न बाजार समिती येथे द्राक्ष शेतकऱ्यांची होत असलेले फसवणूक रोखणेबाबतच्या तक्रारी तासगांव तसेच दिंडोरी येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात प्राप्त झालेल्या नाहीत.

दिनांक ०९.०२.२०२३ रोजीच्या दैनिक तरूण भारत, सांगली या वर्तमानपत्रामध्ये "तासगांव तालुक्यातील मणेराजुरी येथील २० शेतकऱ्यांची रक्कम रू.४० लाख रूपयांची फसवणूक झाली असून द्राक्ष व्यापारी पप्पू उर्फ श्री.रिजवान मलिक शेठ हे बेपत्ता आहेत. या प्रकरणी तासगांव येथील स्थानिक द्राक्ष एजंट दिलीप माळी यांना तासगांव पोलिसांनी ताब्यात घेतले असल्याची" बातमी प्रसिध्द झाली आहे.

"सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७" दि.१२.०१.२०१७ अन्वये "द्राक्ष" हे पीक नियमनमुक्त करण्यात आले आहे, त्यामुळे सदर पिकाचे उत्पादन हे बाजार समिती आवारातच विकले पाहिजे असे बंधन नाही. तथापि, तासगांव तालुक्यातील मणेराजुरी येथील फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांचे द्राक्ष खरेदी-विक्री व्यवहार हे संबंधित शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर झाले असल्याचे दिसून येत असल्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती, तासगांव येथील परवानाधारक व्यापाऱ्यांकडून द्राक्ष खरेदी-विक्रीबाबतचे व्यवहार दिसून येत नाही.

नाशिक जिल्ह्यात द्राक्ष पिकाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. परंतु द्राक्ष या पिकाचे खरेदी-विक्री व्यवहार बाजार समितीच्या आवारात होत नसून पारंपारिक पध्दतीने थेट बांधावरच होत असतात. दिंडोरी तालुक्यातील दिंडोरी पोलीस स्टेशन व वणी पोलीस स्टेशन येथे सन २०२१ ते २०२३ या वर्षात ६ गुन्हे दाखल झालेले असून ५ गुन्हाच्या बाबतीत पोलीस तपास सुरू आहे. तसेच एका गुन्ह्यामध्ये पोलिसांनी न्यायालयामध्ये खटला दाखल केला आहे.

महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतमालाची विक्री संबंधित बाजार समितीच्या आवारात परवानाधारक व्यापारी यांच्याकडून करावी, यासाठी बाजार समित्यामार्फत शेतकऱ्यांना वारंवार आवाहन करण्यात येत आहे.

************************************************

महाराष्ट्र विधानसभा सन २०२३चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन लक्षवेधी सूचना क्र.५७०

श्री. धनंजय मुंडे, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यात प्रधानमंत्री पीकविमा योजना व अन्य योजनेंतर्गत शेतीपिकांना विमा संरक्षण दिले जात असणे, सन २०२२ च्या खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात पावसाने नुकसान होऊनही पीकविमा मात्र अत्यंत अल्प प्रमाणात मिळणे, अनेक शेतकऱ्यांना विम्यापोटी भरलेल्या रक्कमेपेक्षा कमी रक्कम भरपाई म्हणून मिळालेली असणे व विमा कंपन्या मात्र कोट्यवधी रुपयांचा नफा कमवत असणे, बीड जिल्ह्यात सन २०२० पासून ८०-११० या सूत्रातील बीड पिकविमा पॅटर्न लागू करण्यात आलेला असून हा पॅटर्न इतर राज्यात देखील लागू करण्यात आलेला असणे, विमा कंपन्यांची नफेखोरी रोखणे, पिकविम्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिकाधिक फायदा व आर्थिक संरक्षण मिळण्याची तसेच प्रधानमंत्री पीकविमा योजनेच्या धर्तीवर राज्य सरकारने देखील स्वतःचे पीकविमा धोरण राबविण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (कृषि) यांचे निवेदन

प्रधानमंत्री पिक विमा योजना ही खरीप हंगाम २०१६ पासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात राबविण्यात येत आहे. सदर योजना अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरुन शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्यासाठी राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना टाळता न येणाऱ्या कारणांमुळे झालेल्या नुकसानीस विमा संरक्षण केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार देण्यात येते. सदर योजनेअंतर्गत प्रतिकुल हवामान घटकांमुळे पेरणी/लावणी/उगवण न होणे, पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट, हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान, काढणीपश्चात नुकसान, स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नुकसान या पाच बाबींमुळे झालेल्या नुकसानीस केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार विमा संरक्षण देण्यात येते. सदर योजना अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे.

पीक विमा योजनेंतर्गत राज्यात सन २०१६-१७ ते सन २०२१-२२ या कालावधीत शेतकरी हिस्सा, राज्य शासन व केंद्र शासन यांनी एकूण रु. २८ हजार ३६९ कोटी इतका विमा हप्ता अदा केला असुन पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मंजूर नुकसान भरपाई रक्कम ही रू. १९ हजार ४३९ कोटी इतकी (विमा हप्ता रकमेच्या ६९ टक्के) आहे.

पीक विमा योजनेंतर्गत विमा कंपन्यांना होणारा अवाजवी फायदा नियंत्रित करण्याच्या दृष्टीने बीड जिल्हयामध्ये खरीप हंगाम २०२० पासून बीड पॅटर्न ८०:११० (Cup & Cap Model) केंद्र शासनाच्या मान्यतेने प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात आला. त्यानुसार विमा कंपन्या एका

टेटा-H/1572 (750-3-23)

वर्षामध्ये जिल्हा समुहामध्ये एकूण विमा हप्ता रकमेच्या ११० टक्के पर्यंतचे दायित्व स्वीकारतील. तथापि एका वर्षातील देय पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम जमा विमा हप्ता रकमेच्या ११० टक्के पेक्षा जास्त असल्यास ११० टक्के पेक्षा जास्तीचा भार राज्य शासन स्वीकारेल आणि जर देय पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम जिल्हा समुहामध्ये एकूण जमा हप्ता रकमेपेक्षा कमी असेल तर विमा कंपनी विमा हप्ता रकमेच्या जास्तीत जास्त २० टक्के रक्कम स्वत:कडे ठेवेल व उर्वरीत विमा हप्ता रक्कम राज्य शासनास परत करेल.

बीड जिल्हयामध्ये खरीप हंगाम २०२० ते रब्बी हंगाम २०२१-२२ या चार हंगामामध्ये विमा कंपन्यांना दिलेला एकूण विमा हप्ता रक्कम रु. १७९३.२५ कोटी असून पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार मंजूर नुकसान भरपाई रु. ४८५.६० कोटी आहे. सदर बीड पॅटर्नमुळे विमा कंपन्यांनी २० टक्केच्या मर्यादेत रु. ३५८.६५ कोटी इतकी रक्कम देय झाली असुन नुकसान भरपाई रक्कम वगळून रु. ९४९ कोटी इतकी रक्कम विमा कंपनीकडून राज्य शासनास परत येईल.

खरीप २०२२ मध्ये बीड जिल्हयातील एकूण १६.५८ लाख शेतकरी अर्जदारांनी सहभाग घेतला असुन दि.१६.०३.२०२३ अखेर त्यापैकी एकूण ११.३१ लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रु.३२०.८१ कोटी नुकसान भरपाई मंजुर करण्यात आलेली आहे. त्यापैकी १०.१८ लाख अर्जदारांच्या बँक खात्यावर रक्कम रु. २७५.१८ कोटी जमा करण्यात आले असून उर्वरीत अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

पीक विमा योजनेंतर्गत विमा कंपन्यांना होणारा अवाजवी फायदा नियंत्रित करण्याच्या दृष्टीने संपूर्ण राज्यात केंद्र शासनाच्या मान्यतेने सन २०२२-२३ पासून ८०:११० Cup & Cap Model नुसार दि.०१ जुलै, २०२२ च्या शासन निर्णयान्वये पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत खरीप २०२२ मध्ये राज्यात ९६.६१ लाख शेतकरी अर्जदारांनी सहभाग घेतला असुन पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार दि.१६.०३.२०२३ अखेर त्यापैकी एकूण ६३.३४ लाख शेतकरी अर्जदारांना रक्कम रु. २८७८.८२ कोटी नुकसान भरपाई मंजुर करण्यात आलेली आहे. मंजूर नुकसान भरपाई पैकी ५४.५१ लाख शेतकरी अर्जदारांच्या बँक खात्यावर रक्कम रु. २५९३.७३ कोटी विमा कंपनी मार्फत जमा करण्यात आले असून उर्वरीत अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत विमाहप्त्याच्या २ टक्के/१.५ टक्के/५ टक्के रक्कम शेतकऱ्याने भरण्याची तरतूद आहे. तथापि शेतक-यांवर येणारा आर्थिक भार कमी करुन सदर कल्याणकारी योजना राज्यात राबविण्यासाठी शेतकऱ्यांना केवळ १ रुपया भरुन प्रधानमंत्री पीक विम्याच्या पोर्टलवर नोंदणी करता येईल व शेतक-यांच्या हिश्श्याचा विमाहप्ता राज्य सरकार भरण्याबाबतची घोषणा सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

******************

366

## लक्षवेधी सूचना

मा.श्री.अतुल भातखळकर , श्री.प्राजक्ता तनपूरे, श्री.छगन भुजबळ, श्रीमती सीमा हिरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१०८५ पुढील प्रमाणे आहे.

"राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी बारावीच्या इंग्रजी प्रश्नपत्रिकेत चुका केल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, प्रश्नपत्रिकेतील ८० गुणांपैकी सहा गुणांचे प्रश्न चुकल्याचा प्रकार मंडळाच्या ढिसाळ कारभारामुळे घडला असणे, त्यामध्ये, ज्युनियर कॉलेजच्या शिक्षकांनी बारावीच्या उत्तरपत्रिका तपासण्यावर बहिष्कार घातला असल्याने इंग्रजी विषयाच्या मुख्य नियामकांची बैठक झाली नसणे, त्यामुळे इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेतील त्रुटी प्रश्नी मुख्य नियामकांची संयुक्त सभा आयोजित करण्याची गरज, तसेच त्रुटीबाबत सभेकडून प्राप्त होणाऱ्या अहवालावरुन विद्यार्थ्यांना योग्य न्याय देण्याची आवश्यता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. मंत्री, शालेय शिक्षण यांनी करावयाचे निवेदन

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या प्रश्नप्रत्रिका संपादनाचे काम संबंधित विषय तज्ज्ञ, मुख्य नियामक यांचेमार्फत करण्यात येते. एका विषयाच्या प्रश्नपत्रिका संपादनाचे काम साधारण दोन-तीन विभागीय मंडळाकडून गोपनीयरित्या संपादित करुन घेतले जातात. तसेच नमुना उत्तरे ही तयार करुन घेतली जातात.

संपादित केलेल्या प्रश्नपत्रिकांची व नमुनाउत्तरे यांची पाकीटे सिलबंदरित्या मंडळाकडे जमा केली जातात. सदर संपादित केलेल्या प्रश्न पत्रिकेत चूक असू नये म्हणून प्रश्नपत्रिका संपादित केलेल्या शिक्षकांव्यतिरिक्त अन्य विषय तज्ज्ञांकडून प्रत्येक प्रश्नपत्रिकेची छाननी केली जाते व त्यामध्ये त्रुटी आढळल्यास त्या दूर केल्या जातात. तद्नंतर सदर प्रश्नपत्रिकेच्या सिलबंद पाकीटास सांकेतांक क्रमांक दिला जातो.

छाननी केल्यानंतरच यामधील लॉटरी पध्दतीने निवड करुन प्रश्नपत्रिका छपाई करण्यासाठी गोपनीय प्रेसला देण्यात येतात. यामध्ये संपूर्ण गोपनीयता बाळगली जाते. छाननी केलेल्या प्रश्न पत्रिकांचे कोणतेही सिलबंद पाकीट राज्यमंडळाकडून उघडून पाहिले जात नाही. विषय तज्ज्ञांनी छाननी केलेली प्रश्नपत्रिका व नमुना उत्तरे हे अंतिम असतात व

तेच छपाई करण्यासाठी गोपनीय प्रेसला देण्यात येतात. इ.१२ वी इंग्रजी प्रश्नपत्रिकेत झालेली चूक ही गोपनीय प्रेस स्तरावर झाली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. यासंदर्भात विषय तज्ज्ञ, सर्व विभागीय मंडळाचे मुख्य नियामक यांची संयुक्त सभा प्रचलित पध्दतीप्रमाणे पुणे विभागीय मंडळ येथे आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

तथापि, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या धोरणात्मक निर्णयाच्या संदर्भातील मागण्या शासनस्तरावर प्रलंबित असल्याने महासंघाने इ.१२ वी च्या उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार टाकला आहे. सदरचा बहिष्कार मागे घेण्याबाबत राज्य मंडळाकडून महासंघास लेखी पत्राव्दारे आवाहन करण्यात आले आहे. तसेच याबाबत मा.मंत्री, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली उच्च माध्यमिक शिक्षक संघटनेची बैठक घेण्यात आली असून त्यामध्ये सकारात्मक चर्चाही झाली आहे.

त्यामुळे महासंघाने बहिष्कार मागे घेताच विषय निहाय संयुक्त सभाचे आयोजन तातडीने करुन प्रश्नपत्रिकेतील चुकांसंदर्भात जो अहवाल संयुक्तसभेड्न प्राप्त होईल त्यानुसार परीक्षार्थ्यांना योग्य तो न्याय देऊन कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

**********

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन
## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

**मा. श्री. अतुल भातखळकर वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढील प्रमाणे आहे:-**

"बँकांमधील ठेवींना विमा संरक्षण देणाऱ्या ठेव विमा संरक्षण कायद्याच्या धर्तीवर राज्यात पतसंस्थांमधील ठेवींनाही विमा संरक्षण देण्याकरिता प्रस्ताव तयार करण्यात आल्याचे माहे जानेवारी २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामुळे, कष्टकरी वर्गापासून मध्यमवर्गीय पर्यंतच्या ठेवीदारांना सावकारी पाशातून मुक्तता मिळून आर्थिक बळ मिळणार असणे, त्यामुळे, असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देऊन त्याची अंमलबजावणी करण्याची गरज असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया..."

---

**मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतूदीनुसार राज्यामध्ये नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांची स्थापना करण्यात येते. सद्यस्थितीत राज्यात १३,४१२ नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था आणि ६,५३६ कर्मचारी सहकारी पतसंस्था अशा एकूण १९,९४८ सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत. या पतसंस्थांमध्ये ३.१० कोटी ठेवीदारांच्या एकूण रु. ९०,५०१ कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी आहेत. तसेच या पतसंस्थांच्या माध्यमातून सुमारे ४१,२६,००० कर्जदारांना रु. ६१,७९६ कोटींचे कर्जवाटप करण्यात आलेले आहे.

राज्यातील पतसंस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेले गैरव्यवहार व अन्य कारणांमुळे ठेवीदारांच्या ठेवी मिळण्यात अडचणी येत होत्या. याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. ६०/२०११ दाखल करण्यात आली होती. सदर जनहित याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने पतसंस्थामधील झालेल्या अनियमितांबाबत व ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या हेतूने शासनामार्फत करावयाच्या उपाययोजनांबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश शासनास दिले होते. मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शासनाने पतसंस्थांसाठी स्वतंत्र प्रकरण कायद्यामध्ये समाविष्ट करण्याबाबत आणि ठेवीदारांसाठी विम्यासारखी योजना लागु करण्यात येईल असे प्रतिज्ञापत्र मा. उच्च न्यायालयात सादर केले होते.

त्यानुषंगाने शासनाने राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या कामकाजामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी आणि त्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये दिनांक ७.९.२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये पतसंस्थांसाठी स्वतंत्र प्रकरण अकरा-१अ समाविष्ट केले.

त्यामधील तरतूदीनुसार राज्यातील बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी दिनांक ३१.१.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये नियमाक मंडळ गठीत करण्यात आले आहे. सदर नियामक मंडळामध्ये

पतसंस्थांचे ४ सदस्य आहेत. नियामक मंडळास पतसंस्थांमधील वैयक्तीक ठेवींची कमाल मर्यादा निश्चित करणे, ठेव / कर्जावरील व्याजदाराची किमान व कमाल मर्यादा ठरविणे, अंशदानाचा दर ठरविणे, प्रशासकीय व आस्थापना खर्चाची अनुज्ञेय कमाल मर्यादा ठरविणे, तसेच पतसंस्थांचे अधिकारी/ कर्मचारी यांच्या नियुक्तीसाठी किमान शैक्षणिक पात्रतेचे निकष ठरविणे इ. अधिकार प्राप्त झाले आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतूदींनुसार स्थिरीकरण व तरलता निधी दिनांक ११.९.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये स्थापन करण्यात आला आहे. सदर निधीसाठी नियामक मंडळाने ठरविलेल्या दराने व पद्धतीने पतसंस्थांनी अंशदान द्यावयाचे आहे. सद्यस्थितीत हा दर १० पैसे प्रति १०० रुपये ठेव असा आहे. नियामक मंडळाने रु. ५०,००० पर्यंतच्या ठेवींना संरक्षण देण्याबाबतची योजना प्रस्तावित केली असून सदर योजनेबाबत राज्यातील सर्व पतसंस्था फेडरेशनचे प्रतिनिधी यांच्यासोबत बैठक घेऊन त्यांनी केलेल्या सुचना/हरकती/निवेदने विचारात घेऊन योजनेस अंतिम स्वरुप देण्याबाबत नियामक मंडळाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे. मात्र अंशदान देण्यास बऱ्याच पतसंस्थांनी तसेच पतसंस्था फेडरेशन ने विरोध केला असून अंशदानाची तरतूद रद्द करण्याची मागणी देखील केली आहे. तथापि तरलता निधीमधून अडचणीत आलेल्या पतसंस्थांमधील ठेवीदारांना मदत करण्यात येणार असल्याने भविष्यामध्ये पतसंस्था आर्थिक अडचणीमध्ये आल्यास सामान्य ठेवीदारांना त्यांच्या ठेवीची रक्कम तात्काळ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ठेवीदारांचे आर्थिक हिताचे रक्षण होणार आहे. या सर्व बाबी विचारात घेता, नियामक मंडळाने लागु केलेले अंशदान रद्द करणे उचित होणार नाही. तथापि याबाबत तातडीच्या अंमलबजावणीची आवश्यकता विचारात घेऊन संबंधीत घटकांशी चर्चा करुन सुयोग्य अंशदान लागू करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

****

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. २२४

**मा. श्री. छगन भुजबळ व डॉ. जितेंद्र आव्हाड वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढील प्रमाणे आहे:-**

"दि. ४ फेब्रुवारी २०२३ रोजी खाजगी सावकारीच्या वसुलीला त्रासून नाशिकरोड भागामध्ये दोन संख्या भावंडानी विष प्राशन करून आत्महत्या केल्याचे निदर्शनास येणे, तसेच दि. ५ फेब्रुवारी २०२३ रोजी शहरात फूड डीलेव्हरी करणाऱ्या तरुणाने व्याजाने घेतलेल्या पैशांच्या वसुलीसाठी अपहरण केल्याची घटना नाशिक शहरातील उपनगर परिसरात निदर्शनास येणे, दि. २९ जानेवारी २०२३ रोजी सातपूर (जि.नाशिक) येथे तीन जणांनी खाजगी सावकारांच्या जाचाला कंटाळून गळफास घेवून आत्महत्या केलेली असणे, या घटनेनंतर सहकार विभागाने सातपूर मधील खाजगी सावकाराच्या घरावर छापे टाकून फाईल जप्त केल्यामुळे या प्रकरणात कारवाई करणाऱ्या पथकाबरोबर आलेल्या पोलिसांनाच खाजगी सावकाराने धमकी दिल्याची धक्कादायक बाब दि. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, माहे मार्च २०२२ मध्ये म्हसरूळ (जि.नाशिक) येथील ४२ वर्षीय व्यक्तीने, माहे जानेवारी २०२२ मध्ये अशोकनगर सातपूर येथील युवकाने तर माहे डिसेंबर २०२२ मध्ये आनंदवली येथील एका व्यक्तीने तसेच पाथर्डीफाटा येथील एका दांपत्याने तर पेठरोड येथील सुद्धा एका व्यक्तीने सावकारांच्या धमक्यांमुळे आत्महत्या केलेली असणे, नागरिकांच्या आर्थिक असहाय्यतेचा गैरफायदा घेत सामान्य नागरिकांकडून अवाच्या सव्वा दराने व्याज वसुली करणाऱ्या सावकारांचे नाशिकमध्ये पेव फुटलेले असणे, या सावकारांमुळे वर्षभरात अनेक जणांचे बळी गेलेले असणे, नाशिक जिल्ह्यातील खाजगी सावकारीवर अंकुश आणण्यासाठी सहकार आणि गृह विभागाला अपयश आलेले असणे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया...."

---

### मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-

सातपूर (जि. नाशिक) येथे तीन जणांनी खाजगी सावकारांच्या जाचाला कंटाळून गळफास घेवून आत्महत्या केल्यासंदर्भात सातपूर, पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र. २२/२०२३ सह महाराष्ट्र सावकारी अधिनियम, २०१४ चे कलम ३९ व ४५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण २१ अवैध सावकारांपैकी १० सावकारांना न्यायालयीन कस्टडी देण्यात आली असून, ७ सावकारांना जामीन मंजूर झाला आहे व उर्वरीत ४ सावकारांचा शोध सुरु आहे. या घटनेनंतर सहकार विभागाने सातपूर मधील खाजगी सावकाराच्या घरावर छापे टाकूण फाईल जप्त करण्याची कार्यवाही केली नाही. मात्र जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक कार्यालयाने दि. ३१.०१.२०२३ रोजी सातपूर परिसरात अवैध सावकारीबाबत झडतीची कार्यवाही पुर्ण केलेली असून झडती दरम्यान पोलीसांनाच खाजगी सावकाराने धमकी दिल्याची बाब आढळून आलेली नाही.

नाशिकरोड भागामध्ये दोन सख्या भावंडानी विष प्राशन करून आत्महत्या केल्याचे दि. ०५.०२.२०२३ रोजी निदर्शनास आले. त्यानुषंगाने उपनगर, पोलीस स्टेशन, नाशिक येथे गुन्हा क्र. ५१/२०२३ दाखल करण्यात आला असून पोलीसांमार्फत तपासाची कार्यवाही सुरु आहे. तथापि सदर प्रकरणामध्ये दाखल एफ.आय.आर. चे अवलोकन केले असता सावकारी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाल्याचे निदर्शनास येत नाही.

नाशिक शहरातील उपनगर परिसरात फूड डीलेव्हरी करणाऱ्या तरुणाचे अपहरण केल्याची घटना दि. ०३.०२.२०२३ रोजी निदर्शनास आली. त्यानुषंगाने उपनगर, पोलीस स्टेशन, नाशिक येथे गुन्हा क्र. ४९/२०२३ दाखल करण्यात आला असून पोलीसांमार्फत तपासाची कार्यवाही सुरु आहे. तथापि सदर प्रकरणामध्ये दाखल एफ.आय.आर. चे अवलोकन केले असता सावकारी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाल्याचे निदर्शनास येत नाही.

अशोकनगर, सातपूर येथील एका युवकाने व पाथर्डी फाटा येथील एका दांपत्याने आत्महत्या केल्याचे दि. १७.०१.२०२२ रोजी निदर्शनास आले. त्यानुषंगाने अनुक्रमे सातपूर, पोलीस स्टेशन, नाशिक येथे गुन्हा क्र. ३१/२०२२ व इंदिरा नगर, पोलीस स्टेशन, नाशिक येथे गुन्हा क्र. २१०/२०२२ दाखल करण्यात आला असून पोलीसांमार्फत तपासाची कार्यवाही सुरु आहे. तथापि सदर प्रकरणामध्ये दाखल एफ.आय.आर. चे अवलोकन केले असता सावकारी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाल्याचे निदर्शनास येत नाही.

मार्च २०२२ मध्ये म्हसरूळ (जि. नाशिक) येथील ४२ वर्षीय व्यक्तीने, डिसेंबर २०२२ मध्ये आनंदवली येथील एका व्यक्तीने व पेठरोड येथील एका व्यक्तीने सावकारांच्या धमक्यांमुळे आत्महत्या केली असल्याबाबत संबंधीत पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे अथवा तक्रारींची नोंद झाल्याचे निदर्शनास आले नाही.

नाशिक जिल्हयात एकूण २७४ नोंदणीकृत सावकार असून महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ नुसार फेब्रुवारी २०२३ अखेर एकूण ९० तक्रार अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी कलम १६ चे २२ तक्रार अर्ज असून कलम १८ चे ८ तक्रार अर्ज प्राप्त झालेले आहेत. कलम १६ च्या २२ तक्रार अर्जापैकी ४ प्रकरणी गुन्हे दाखल झालेले आहेत (नाशिक-२, निफाड-२). उर्वरित १८ मध्ये तथ्य आढळून आलेले नाही. कलम १८ च्या ८ प्रकरणांमध्ये सावकारी कायदयातील तरतुदीनुसार धाडी टाकून तथ्य आढळलेल्या ४ प्रकरणांमध्ये शेतक-याची जमीन परत करण्यात आली असून त्याबाबतचे आदेश पारित करण्यात आलेले आहेत व उर्वरित ४ प्रकरणी तथ्य आढळून न आल्याने सदर अर्ज निकाली काढण्यात आलेले आहेत.

****

३७५

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन
## लक्षवेधी सूचना क्र. २०७५

श्री. चंद्रकांत नवघरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २०७५ पुढीलप्रमाणे आहे :-

"शेतकऱ्यांनी टोकाई सहकारी लि., कुरुंद्रा, (ता. वसमत, जि.हिंगोली) या साखर कारखान्यास ऊस दिलेला असुन दिनांक १ जानेवारी ते २८ फेब्रुवारी पर्यंत कारखान्याने ऊस उत्पादक शेतकरी यांचे ऊसाचे पैसे दिलेले नसणे, या कारखान्याने खुल्या बाजारात साखर बर्गस मोलॅसेस राख हे खुल्या मार्केट विकले असून आज रोजी कारखान्यात कुठलाही माल शिल्लक नसल्याचे निदर्शनास येणे, सन २०२२-२३ या वर्षाच्या गाळपाचे अंदाजे १ लाख मेट्रीक टन ऊसाचे बील रूपये २० ते २२ कोटी शिल्लक असणे, सन २०२१-२२ या वर्षाचे ऊसाचे पैसे दिले नाहीत साखर आयुक्त, पुणे यांनी कारखान्यांवर RRC ची कारवाई केली व नंतर कारखाना प्रशासनाने कारखान्याची FRP १३ कोटी ६५ लाख रूपये शेतकऱ्यांना तीन हप्ते करून देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, आज रोजी कारखान्यात कुठलाही माल शिल्लक नसल्यामुळे साखर कारखान्याकडे सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षातील FRP चे पैसे देण्याबाबत शेतक-यांकडून होत असलेली आग्रही मागणी तथापि टोकाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष यांनी थकीत असलेले ऊसाचे २३ कोटी रूपये देणे शक्य नसल्याचे मा. साखर आयुक्त, पुणे यांना दिनांक १ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, परिणामी ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर आलेली उपासमारीची पाळी, त्यासाठी शासनस्तरावरून अध्यक्ष व संचालक मंडळास जबाबदार धरून शेतक-यांचे पैसे देण्याचे शासनाने आदेश देण्याची आवश्यकता, परिणामी शेतक-यांच्या मनात निर्माण झालेले भितीचे वातावरण व उदासिनतेची भावना, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री (सहकार) यांचे निवेदन

टोकाई सहकारी साखर कारखाना म., कुरुंदा, ता. वसमतनगर, जि. हिंगोली हा सहकार कायद्यांतर्गत नोंदणीकृत साखर कारखाना असून कारखान्याची गाळप क्षमता १२५० मे.टन प्रतिदिन आहे. कारखान्याने गाळप हंगाम २०२१-२२ मध्ये ऊस पुरवठादार शेतकऱ्यांचे ऊसबील रू. १४९६.४२ लाख अदा केले नव्हते. ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ मधील कलम ३(३) मधील तरतुदीनुसार कारखान्याने हंगामामध्ये गाळप केलेल्या ऊसाची एफआरपी प्रमाणे ऊस किंमत १४ दिवसात ऊस पुरवठादारांना अदा करणे बंधनकारक आहे. तसेच विहीत कालावधीत एफआरपी देयके अदा न केल्यास उक्त कायद्याच्या कलम ३(३ए) नुसार विलंब कालावधीकरीता १५% व्याज आकारण्याची तरतूद आहे. त्यानुसार साखर आयुक्तालयाने या साखर कारखान्याविरूध्द ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ मधील तरतुदीनुसार विहीत कालावधीत एफआरपीची रक्कम ऊस पुरवठादार शेतक-यांना १५% व्याजासह अदा करणेस कसूर केला म्हणून ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ मधील कलम ३(८) नुसार रू. १४९६.४२ लाख रकमेचे आरआरसी आदेश दिनांक ०५/१२/२०२२ अन्वये निर्गमित करण्यात आले. तसेच सदर आरआरसीची अंमलबजावणी करणेकरीता जिल्हाधिकारी, हिंगोली यांना प्राधिकृत करण्यात आले. प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड कार्यालयाकडुन प्राप्त माहितीनुसार सदर कारखान्याने गाळप हंगाम २०२१-२२ मधील गाळप केलेल्या ऊसाची संपुर्ण एफआरपी अदा केली आहे. तथापी १५% व्याज प्रलंबित आहे.

गाळप हंगाम २०२२-२३ मध्ये या कारखान्याकडे दिनांक १५/०२/२०२३ अखेर एफआरपी पोटी रू. १३८१.७५ लाख इतकी रक्कम थकीत आहे. या प्रकरणी दिनांक ०२/०३/२०२३ रोजी सुनावणी निश्चित करण्यात आली होती.

या सुनावणीच्या संदर्भात कारखान्याने दिनांक ०१/०३/२०२३ च्या पत्रान्वये लेखी म्हणणे सादर केले असून गाळप हंगाम २०२२-२३ करीता पुर्व हंगामी कामे, मशिनरी देखभाल दुरूस्ती खर्च, ऊसतोडणी वाहतुक यंत्रणा भरणेकरीता ॲडव्हान्स वाटप, कर्मचारी पगार, व्यापारी देणी, दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून घेतलेल्या विविध कर्जाचे हप्ते व त्यावरील व्याजाची रक्कम थकीत होती. प्रोसेस खर्च व अन्य गाळप अनुषंगिक खर्च भागविण्यासाठी कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे व स्थानिक बँकेचे कर्ज मिळाले नाही. कारखान्याने कर्ज प्रस्ताव तयार करून बँकेकडे सादर केला होता. तथापी सदरील कर्जे मंजूर झाली नाहीत. मागील गाळप हंगामातील एफआरपी मोठ्या प्रमाणात थकीत होती. कारखान्याने चालु गाळप हंगाम २०२२-२३ मधील साखर विक्रीपोटी व मोलॅसिस विक्रीपोटी व्यापाऱ्यांकडून ॲडव्हान्स घेवून पुर्व हंगामी कामे करून कारखाना सुरु केला. कारखान्याने चालु गाळप हंगाम २०२२-२३ मधील उत्पादित झालेली साखर व मोलॅसिस विक्री करून उपलब्ध होणाऱ्या रकमेमधून गळीत हंगाम २०२१-२२ मधील थकीत एफआरपी रक्कम दिली आहे. चालु गाळप हंगाम २०२२-२३ मधील माहे जानेवारी २०२३ व माहे फेब्रुवारी २०२३ चे ऊसबील रक्कम रूपये १९.०३ कोटी थकीत आहे. या हंगामातील हे थकीत ऊसाचे बील देणे शक्य नाही.

कारखान्याला लेखी म्हणणे मांडण्याची संधी दिली असता कारखान्याने ऊस पुरवठादार शेतकऱ्यांची ऊसबीले अदा करण्याबाबत असमर्थता दर्शविली असल्याचे दिसुन आल्याने साखर आयुक्तालयाने दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या आदेशान्वये कारखान्याविरूध्द रू. १३८१.७५ लाख रकमेची आरआरसी आदेश निर्गमित करण्यात आले आहे. तसेच सदर आरआरसीची अंमलबजावणी करणेकरीता जिल्हाधिकारी, हिंगोली यांना कारखान्याची मालमत्ता जप्ती करून त्याची विहीत पध्दतीने विक्री करून या रकमेतुन ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ मधील तरतुदीनुसार देयबाकी रकमेची खात्री करून ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना विलंबीत कालावधीसाठी १५% व्याजासह अदा करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे.

दि. २८/०२/२०२३ अखेरच्या एफ. आर. पी. अहवालानुसार टोकाई सहकारी साखर कारखाना म., कुरुंदा, ता. वसमतनगर, जि. हिंगोली या कारखान्याकडे रू. १८७३.७९ लाख एवढी एफ. आर.पी. थकबाकी आहे.

सदर कारखान्याने साखर, बगॅस, मोलॅसेस, राख हे खुल्या बाजारात विक्री केले आहे किंवा कसे? याबाबत कारखाना अभिलेख्यांची पडताळणी करणेसाठी दि. ०८/०३/२०२३ रोजी विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था (साखर), परभणी यांनी कारखान्यास प्रत्यक्ष भेट दिली. त्यांनी दिलेल्या अहवालानुसार हंगाम २०२२-२०२३ मधी.ल पांढरी साखर २३ क्विंटल व कच्ची साखर २२० क्विंटल अशी एकुण २४३ क्विंटल साखर ५० किलोच्या एकुण (४८६) बॅग्जमध्ये तसेच ९०० मे. टन बगॅस साठा आणि १८७३.५७० मे. टन मोलॅसेस साठा कारखानास्थळी आढळुन आला आहे.

**************

**ॲड.आकाश फुंडकर, श्री.शिरीष चौधरी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २५०३.**

"मुंबईतील दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड या संस्थेमध्ये शासकीय कर्मचारी खातेदार असून या संस्थेचा कारभार सहकार कायद्यानुसार चालत असणे, या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक दि. ८जुलै, २०२२ रोजी ६ मतदान केंद्रावर पार पडली असून या निवडणूक प्रक्रियेमध्ये मतदानाच्या वेळी व मतमोजणी मध्ये प्रचंड गैरव्यवहार व नियमाची पायमल्ली झाल्याचा प्रकार उघड झाला असून या निवडणूक प्रक्रियेतील सहकार पॅनल व एकता पॅनल या दोन पॅनल पैकी एकता पॅनलला मुख्य निवडणूक अधिकारी श्री.सतीश तोटावार यांनी संपूर्णपणे एकतर्फी मदत केल्याचा प्रकार उघड होणे, यामध्ये निवडणूक केंद्रावर बेकायदेशीर व्यक्तींची नियुक्ती करणे, मतदारांना ओळखपत्राशिवाय मतदानास परवानगी देणे, मंत्रालय जिमखाना येथील मतदान केंद्रावर पेपर प्रिंटेड लिस्टचा वापर करून मतदारांची रखडपट्टी करून त्यांना मतदानापासून वंचित ठेवणे, कोकण भवन सीबीडी बेलापूर येथील मतदान केंद्रावर छत्रपती संभाजीनगर येथील सुमारे दीडशे बनावट मतदारांनी मतदान केल्याने सहकार पॅनलने आक्षेप घेतला असता तो आक्षेप फेटाळणे, छत्रपती संभाजीनगर येथे चौकशी केली असता मतदान केलेले सर्व कर्मचारी त्यांच्या कार्यालयात त्यादिवशी कामावर उपस्थित असल्याची नोंद असणे, पालघर मतदान केंद्रात एकता पॅनलच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते दुचाकीवर मतपेटी रेल्वे स्टेशन पर्यंत पोहोचविण्यात येणे, एकता पॅनलच्या कार्यकर्त्यांसोबत रेल्वेमधून मतपेटी मुंबईतील मोजणी केंद्रावर आणणे, त्यावेळी सहकार पॅनलच्या कार्यकर्त्यांना प्रवेशाला मनाई करणे, चर्चगेट स्टेशन वरून खाजगी वाहनाने मतपेटी मोजणी केंद्रात आणणे, वास्तविक मतपेटी चारचाकी वाहनाने पोलीस संरक्षणात आणणे आवश्यक असताना जाणीवपूर्वक असा प्रकार करणे, मतमोजणी केंद्रासाठी संस्थेची स्वतःची प्रशस्त जागा सीबीडी बेलापूर येथे उपलब्ध असून सीसीटीव्ही कॅमेरे असतानाही त्या ठिकाणी मतमोजणीची परवानगी न देता सचिवालय जिमखाना येथे संस्थेचे अंदाजे एक लाख रुपये खर्च करून मतमोजणी केंद्र तयार करणे, मतमोजणी केंद्रावर सहकार पॅनलच्या उमेदवारांना प्रवेश व देता एकता पॅनलच्या उमेदवारांना राजरोसपणे वावर करण्यास परवानगी देणे, मतदानाच्या वेळी व मतमोजणीच्या वेळी

सहकार पॅनलने घेतलेला आक्षेपाना विचारात न घेता मनमानीपणे कारभार करणे, मतमोजणीनंतर मतपेट्या सील करून संस्थेच्या कार्यालयात ठेवणे आवश्यक असताना निवडणूक अधिकारी यांनी घाईघाईने खाजगी वाहनात मतपेट्या सील करणे, याबाबत व्हिडिओ रेकॉर्डींग उपलब्ध असणे, मतपेटी सील करताना उमेदवार, पोलिंग एजंट किंवा साक्षीदारांच्या सह्या न घेणे, दुसऱ्या दिवशी सहकार पॅनलच्या वैध मतपत्रिका आकाशवाणी आमदार निवासातील शौचालयाजवळ सापडणे, अशा अनेक प्रकारे निवडणूक अधिकारी श्री.सतीश तोटावार यांनी स्वत:च्या अधिकाराचा मनमानीपणे गैरपावर केला असणे, मतदानाच्या पूर्वी श्री.तोटावार यांनी सहकार पॅनलचे प्रमुख श्री.प्रकाश डांगे यांच्याकडे १० लाखाची मागणी करणे, याचे ऑडीओ रेकॉर्डींग उपलब्ध असणे, सहकार पॅनलकडून रक्कम न मिळाल्यामुळे एकता पॅनलला एकतर्फी मदत करणे, उपरोक्त सर्व बाबींसंदर्भात सहकार पॅनलच्या उमेदवारांनी मुख्य निवडणूक अधिकारी, पुणे, जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर, विशेष निबंधक सहकारी संस्था, पुणे, संबंधित पोलिस स्टेशन यांच्याकडे लेखी निवेदन दिलेले असणे, सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उक्त प्रकरणी चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल प्राधिकरणास दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत सादर करण्याबाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर यांना पत्राद्वारे कळविणे, एकता पॅनलचे प्रमुख भाऊसाहेब पठाण हे छत्रपती संभाजीनगर येथील कृषी विभागात शिपाई म्हणून कार्यरत असून त्यांनी गैरमार्गाने मोठी आर्थिक माया जमा केली असणे, त्यांच्या काही जवळच्या व्यक्तींच्या नावे मुंबईतील फोर्ट, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी जमिनी / घरे असणे व त्यांनी निवडणूक अधिकारी यांच्याशी आर्थिक व्यवहार केल्यामुळे एकता पॅनलला निवडणुकीमध्ये मदत मिळाल्याचे सभासदांमध्ये असलेली चर्चा, निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे न राबवता एकता पॅनलच्या बाजूने निर्णय देणे, याबाबतचे सर्व आक्षेप सभासदांनी नवीन पदाधिकारी यांच्या पहिल्या बैठकीत दि.२२ फेब्रुवारी,२०२३ रोजी उपस्थित केले असता त्याबाबत कोणतीच बाब विचारात न घेता बैठकीतून राष्ट्रगीत अर्धवट थांबवून पळून जाणे, याबाबतची तक्रार संस्थेच्या सभासदांनी दिनांक २ मार्च,२०२३ रोजी मा.मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, पोलीस आयुक्त, मुंबई यांना करणे, श्री.पठाण यांनी सोसायटीमधून स्वत:साठी व जवळच्या व्यक्तींकरिता

साक्षीदार न घेता मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप करणे, या सर्व प्रकारामुळे यापूर्वी चांगल्या रीतीने काम करणाऱ्या क्रेडिट सोसायटीचा वापर बिनदिक्कतपणे स्वतःच्या लोभापोटी करणाऱ्या नवीन पदाधिकारी व निवडणूक अधिकारी यांचे बाबत सर्व सभासदांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने या संपूर्ण गैरप्रकाराची चौकशी करून बेकायदेशीरपणे निवडणूक प्रक्रिया राबवून एकता पॅनलच्या बाजूने निर्णय देणाऱ्या निवडणूक अधिकारी श्री.सतिश तोटावार व त्यांना आर्थिक लाभ देणाऱ्या एकता पॅनलचे प्रमुख भाऊसाहेब पठाण यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यता तसेच यापूर्वी झालेल्या निवडणूकीमधील केलेली अनियमितता विचारात घेता दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड या संस्थेची निवडणूक पुनश्च घेण्याबाबत व पुढील निवडणुक होईपर्यंत प्रशासकीय अधिकाऱ्याची नेमणूक करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाचे प्रतिक्रिया."

---

**मा.मंत्री (सहकार) यांचे निवेदन**

दि. महाराष्ट्र मंत्रालय को-ऑप. क्रेडीट सो. लि., मुंबई ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदणीकृत असून सदर संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे. सदर संस्थेची सन २०२२-२३ ते २०२७-२८ या कालावधीसाठी पंचवार्षिक निवडणूक घेण्याकरीता राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक २३.०५.२०२२ रोजीच्या आदेशान्वये श्री.सतिश तोटावार, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई(३) पश्चिम उपनगरे यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यांनी सदर संस्थेचा निवडणूक कार्यक्रम दिनांक ३०.०५.२०२२ रोजी दैनिक पुण्यनगरी ह्या वर्तमानपत्रात प्रसिध्द केला. सदर संस्थेची निवडणूक महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार दि.०८/०७/२०२२ रोजी घेण्यात आली व त्याप्रमाणे, संस्थेच्या निवडणूकीचा निकाल जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई १ शहर यांचे कार्यालयास दि.११/०७/२०२२ रोजी सादर केला. त्यानुसार, निवडून आलेल्या सदस्यांमधून

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ अन्वये दि.१८/०७/२०२२ रोजी सदर संस्थेची समिती गठीत करून पदाधिकाऱ्यांची निवड केलेली आहे.

सदर संस्थेच्या निवडणूकीमध्ये सहकार पॅनल व एकता पॅनल असे दोन पॅनल निवडणूक लढवत होते. सहकार पॅनलचे प्रमुख श्री. प्रकाश डांगे हे असून एकता पॅनलचे प्रमुख श्री. भाऊसाहेब पठाण हे होते. या निवडणूकीमध्ये विद्यमान सहकार पॅनलचा पराभव झाल्याने त्यांनी सदर निवडणूकीच्या कामकाजाबाबत व निवडणूक निर्णय अधिकारी श्री. सतिश तोटावार यांच्या विरोधात राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे केलेली तक्रार दि.२८.०७.२०२२ रोजी प्राधिकरणाच्या कार्यालयात प्राप्त झाली. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई १ शहर यांनी श्री.सतिश तोटावार निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून दि.२९/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये खुलासा मागविला होता. त्यानुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दि.१२/०९/२०२२ रोजी सदर बाबत खुलासा सादर केलेला आहे. त्यामध्ये सदर संस्थेची निवडणूक पारदर्शकपणे पार पाडण्यात आलेली असून त्याबाबतचे व्हिडीओ चित्रिकरण उपलब्ध असल्याबाबत त्यांनी नमूद केलेले आहे. सदर निवडणूकीबाबत तक्रार असल्यास संबंधितांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ९१ अन्वये मा. सहकार न्यायालय येथे दाद मागणे आवश्यक होते.

तक्रारीच्या अनुषंगाने श्री.सतिश तोटावार, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई १ शहर यांचेकडे खुलासा सादर केलेला असून त्यांनी सदर खुलासा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठविला आहे. तथापि, श्री.प्रकाश डांगे व इतर यांनी दि. महाराष्ट्र मंत्रालय को-ऑप. क्रेडीट सो. लि., मुंबई या संस्थेच्या निवडणुकीसंदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे महाराष्ट्र शासन विरूध्द रिट याचिका क्र.२०७३२/२०२२ व दावा क्र.१०८७०/२०२२ असे दोन दावे दाखल असून ते न्यायप्रविष्ठ आहेत.

******

## सन २०२३ चे पहिले अधिवेशन

## लक्षवेधी सूचना क्र.२५०६

श्रीमती मनिषा चौधरी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२५०६ खालीलप्रमाणे आहे :-

"सहकारी गृहनिर्माण संस्थामधील मासिक देखभाल आकार न देणाऱ्या सभासदांच्या तक्रारी हाताळण्याबाबत दि.२ नोव्हेंबर, २००२ चे परिपत्रक सहकार व वस्त्रोद्योग विभागाने निर्गमित करणे, मासिक देखभाल आकार थांबवू नये, अस स्पष्ट असतांना उपनिबंधक सहकारी संस्था, के/पश्चिम वार्ड, वांद्रे (पु) कार्यालयात मनमानी पध्दतीने कार्यभार करणे, उलट १० ते १५ वर्ष मासिक देखभाल न भरणाऱ्या सभासदांनी संगनमत करणे, गृहनिर्माण संस्थेविरुध्द योग्य शहानिशा न करता निकाल देणे, यामुळे दहशत निर्माण होणे, असंतोष निर्माण होणे, नियम १०१ अन्वये श्री नितीन दहिभाते यांनी निकाल दिलेल्या सर्व प्रकरणांची लाचलुचपत खात्यामार्फत चौकशी करण्याची आवयश्यकता निर्माण होणे, नियम ७८ अ(१) (ब) नुसार फक्त १ सभासदांना कमी करण्याचे अधिकार असतांना किंवा निवडणूकी संबंधी प्रकरणे सहकार न्यायालयाच्या कक्षेत असतांना, त्यांच्या अधिकारात नसतांना घेतलेल्या निर्णयामुळे सभासदांची छळवणूक होणे, भ्रष्टाचाराला मोठा वाव मिळणे, बदली झाली असतांना कार्यमुक्त न करण्यासाठी गैरमार्गाचा वापर करणे, लेखापरिक्षक, प्रशासकीय अधिकारी यांची चमू करुन गृहनिर्माण संस्थेचा पैसा गिळकृत करणे, जनमानसात शासनाची प्रतिमा मलिन होत असल्यामुळे अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांची लाचलुचपत खात्यामार्फत चौकशी करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन

उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई या कार्यालयाच्या कार्यकक्षेत जुहू, विलेपार्ले (पश्चिम), अंधेरी (पश्चिम) मुंबई नं.५३, ५८, ६१, जोगेश्वरी (पश्चिम) हे उपनगरीय विभाग येतात. या कार्यालयाच्या कार्यकक्षेत एकूण २७५१ सहकारी संस्था असून एकूण २४७३ गृहनिर्माण संस्था आहेत व इतर २७८ सहकारी संस्था आहेत.

सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील मासिक देखभाल आकार न देणाऱ्या सभासदांच्या तक्रारी हाताळण्याबाबत कशा प्रकारे कार्यवाही करावी याबाबत शासन परिपत्रक क्र.सगृयो-२००२/प्र.क्र.३६५/१४ स, दिनांक ०२ नोव्हेंबर, २००२ अन्वये सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये गृहनिर्माण संस्थेतील सभासदांनी कोणत्याही कारणाने संस्थेला मासिक देखभाल आकार देण्याचे थांबवू नये असे स्पष्ट आहे. उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई यांच्याकडे काही गृहनिर्माण संस्थांबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यासंदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९-अ अन्वये संस्थांची तपासणी घेऊन, लेखापरीक्षण अहवाल व तपासणी अहवाल यामध्ये तक्रारीमध्ये तथ्य आढळलेल्या प्रकरणांमध्ये पुढील कारवाई करणे आवश्यक आहे याबाबत खात्री झाल्याने अशा प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ (सुधारीत कलम १५४ ब २९) अन्वये २०९ संस्थांची प्रकरणे दाखल झालेली होती, त्यापैकी १९८ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. कलम १०१ अन्वये प्रकरण दाखल झाल्यानंतर सदर कलमामधील तरतुदीनूसार लेखी व तोंडी म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दोन्ही बाजूकडील पक्षांना दिल्यानंतर तसेच पुरावे

तपासल्यानंतर निर्णय घेण्यात येतो. तसेच थकबाकी प्रकरणी दिलेल्या निर्णयास संस्था अथवा सभासदास आक्षेप असल्यास त्यांना वरीष्ठ कार्यालयाकडे सदर निर्णयाविरुध्द दाद मागण्याची तरतुद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५४ मध्ये आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७८ अ (१)(ब) मध्ये उपनिबंधक यांनी दिलेल्या निर्णयास आक्षेप असल्यास वरीष्ठ कार्यालयाकडे दाद मागण्याची तरतुद देखील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये करण्यात आलेली आहे. उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई या कार्यालयाकडून एकूण २० संस्थांमध्ये कलम ७८ अ (१)(ब) अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

सहकार न्यायालयाच्या कक्षेतील निवडणूकीसंबंधी प्रकरणात उपनिबंधकांनी त्यांच्या अधिकारात निर्णय घेतल्याबाबतचे कोणतेही विशिष्ट प्रकरण स्पष्ट उल्लेखासह निदर्शनास आल्यास त्याची शहानिशा करुन व कायदेशीर बाबी तपासून निर्णय घेणे शक्य होईल.

उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई यांनी त्यांच्या बदली संदर्भात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाद मागितली होती. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी त्यांच्या बदली आदेशास स्थगिती देऊन याचिका निकाली काढली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई यांनी घेतलेले निर्णय निबंधकांना प्राप्त असलेल्या अर्धन्यायिक अधिकारानुसार असल्याने, तसेच निर्णय मान्य नसणाऱ्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये अपिल किंवा पुनर्रिक्षण करण्याची तरतूद आहे. त्यामुळे अशा निर्णयांबाबत लाचलुचपत खात्यामार्फत चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. लक्षवेधी सूचनेमध्ये नमूद केलेले इतर मुद्दे कोणत्याही विशिष्ट प्रकरणांच्या स्पष्ट उल्लेखासह नसल्याने त्याची शहानिशा करणे शक्य नाही.

************************